सिद्धी प्रकाशन
श्रीनगर, नांदेड.

येथे सर्व प्रकारची पुस्तके, नियतकालिके व मासिके प्रकाशित केली जातील.
पुस्तकांसाठी ISBN नंबर उपलब्ध.

संपर्क : डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर, सौ.पल्लवी लक्ष्मण शेटे मो. 9623979067

G Pay PhonePe BHIM 9623979067

Worldwide International Inter Disciplinary Research Journal
Website : www.wiidrj.com
C/o. R.G. Umbarkar, H.No. 624, Bela Nagar, Near Maroti Mandir, Taroda Kh. Nanded - 431 605 Maharashtra (India)
Email : umbarkar.rajesh@yahoo.com
shrishprakashan2009@gmail.com
Mob : +91-9623979067

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed) Year - 7, Vol. I, Issue-LV, 28 March 2022

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

Worldwide International Inter Disciplinary Research Journal
(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. I, Issue- LV, 28 March 2022

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नित

शासकिय अध्यापक महाविद्यालय नांदेड अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष द्वारा आयोजित

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिसंवाद (ऑनलाईन)

मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा

* प्रमुख संपादक *
प्राचार्य डॉ. उर्मिला धूत

* संपादक *
प्रो.डॉ. शैला सारंग

* सह संपादक *
प्रो.डॉ. वनिता रामटेके

ISSN:2454 – 7905

***SJIF Impact Factor 2022:* 7.479**

Worldwide International Inter DisciplinaryResearchJournal

A Peer Reviewed Referred Journal

Quarterly Research Journal

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

www.wiidrj.com

Vol.I ISSUE – LV Year – 7 28 March 2022

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नित

शासकीय अध्यापक महाविद्यालय नांदेड अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष द्वारा आयोजित

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिसंवाद ऑनलाईन

मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा

प्रमुख संपादक

प्राचार्य डॉ. उर्मिला धूत

संपादक

प्रो. डॉ. शैला सारंग

सह संपादक

प्रो. डॉ. वनिता रामटेके

Editor in Chief : Mrs. Pallavi Laxman Shete

Principal, Sanskrti Public School, Nanded.(MH. India)Email:Shrishprakashan2009@gmil.com

Director :Mr. Tejas Rampurkar

(For International contact only +91-8857894082)

Address for Correspondence : House No.624 - Belanagar, Near Maruti Temple,Taroda (KH), Nanded – 431605(India -Maharashtra) **Email:**Shrishprakashan2009@gmil.com ; umbarkar.rajesh@yahoo.com

Mob. No: +91-9623979067 **Website: www.wiidrj.com**

Worldwide International Inter Disciplinary Research

(A Peer Reviewed Referred)

Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer Reviewed Referred) is quarterly published journal for Research scholars, teachers, businessman and scientists to integrate disciplines in an attempt to understand the complexities in the current affairs.

We also believe that both researchers and practitioners can contribute their knowledge by translating understanding into action and by linking theory and practice. This would enhance therelevanceand thought in various related fields.

This Journal expected to bring together specialists in the field of commerce, economics, management and industry from different part of the world to address important issues regarding commerce, management and economics. One of the objectives of the journal is to create dialogue between scholars of various disciplines.

The editor, editorial team and the publisher do not hold any responsibility for the views expressed in **Worldwide International Inter Disciplinary Research (A Peer ReviewedReferred)** or for any error or omission arising from it.

The journal will cover the following Faculties for All Subject:

• Arts/ Humanities / Soc. Sci. / Sports	• Engineering
• Commerce	• Medical /Ayurveda
• Science	• Law
• Education	• Journalism
• Agriculture	• Mass Communication- **Library sci.**
• Pharmaceutical	• Social Work
• Management	• Any Other

Director : Mr. Tejas Rampurkar (For International contact only +91-8857894082)

Printed by

Anupam Printers, (Subbranch: Nanded) Men Branch : Hyderabad (A.P.).

©Copy Right: Worldwide International Inter Disciplinary Research Journal

Cost: Rs. 400/-

Editors of Worldwide International Peer Reviewed Journal are not responsible for opinions expressed in literature published by journal.

The views expressed in the journal are those of author(s) and not the publisher or the Editorial Board. The readers are informed, authors, editor or the publisher do not owe any responsibility for any damage or loss to any person for the result of any action taken on the basis of the work (c) The articles/papers published In the journal are subject to copyright of the publisher. No part of the publication can be copied or reproduced without the permission of the publisher.

Editorial Board

प्राचार्य डॉ. संजीवनी श्रीकांत मुळे शासकीय अध्यापक महाविद्यालय आय ए एस ई औरंगाबाद.	**प्राचार्य डॉ. गणेशचंद्र नरहरराव शिंदे** यशवंत महाविद्यालय नांदेड.
डॉ. पी. विठ्ठल सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग भाषा वाड्.मय व संस्कृती अभ्यास संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.	**प्रा. डॉ. शंकर विभुते** भाषा व संशोधन विभाग इंदिरा गांधी महाविद्यालय सिडको, नांदेड.
प्रा. डॉ. केशव सखाराम देशमुख मराठी विभाग प्रमुख भाषा वाड्.मय व संस्कृती अभ्यास संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.	**प्रा. डॉ. वैजयंता नागोराव पाटील** अधिष्ठाता (आंतरविद्याशाखीय) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

Peer-Review Committee

प्रा. प्रमोद भगवानराव इंगोले सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग कै. डॉ. शंकरराव सातव महाविद्यालय, कळमनुरी	**प्रा. डॉ. दत्ता रुस्तुमराव शिंदे** मराठी विभाग प्रमुख संत तुकाराम कला व वाणिज्य महाविद्यालय, परभणी
प्रा. डॉ. सचिदानंद फुलचंद खडके मराठी विभाग शारदा महाविद्यालय, परभणी	**डॉ. सय्यद शाकेर आरिफ** सहयोगी प्राध्यापक, हिंदी विभाग शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड.
डॉ. गोविंद नारायणराव भुसारे सहयोगी प्राध्यापक, इंग्रजी विभाग शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड.	**डॉ. विठ्ठल जी. घोनशेटवाड** सहयोगी प्राध्यापक, गणित विभाग शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड.

Advisor Committee

प्राचार्य डॉ. उर्मिला मूरलिधरराव धूत शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड.	**प्रो. डॉ. वनिता देवदास रामटेके** विज्ञान विभाग शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड.
प्रो. डॉ. शैला भगवान सारंग गणित व मराठी विभाग शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड.	

कुलगुरू /संदेश/2021-2022/04 दिनांक 4 एप्रिल 2022

:: संदेश ::

शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड येथे दिनांक 28 मार्च 2022 रोजी मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा या महत्वपूर्ण विषयावर एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्टीय चर्चासत्राचे आयोजन अध्यापक महाविद्यालयात करीत असल्याचा आनंद झाला.

प्रस्तुत एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्टीय चर्चासत्र शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासक, संशोधक, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, शिक्षक, विद्यार्थी, आणि पालक यांना उपयोगी पडेल. तसेच चर्चासत्र अर्थपूर्ण चर्चेतून उदेश पूर्ण् करेल आणि विधायक परिणाम देईल असा विश्वास वाटतो. सदर आंतरविद्याशाखीय राष्टीय चर्चासत्रास मन:पूर्वक शुभेच्छा व्यक्त करून या निमित्त प्रकाशित होणाऱ्या शोधनिबंधाच्या पत्रिकेस हार्दीक शुभेच्छा!

उध्दव भोसले
कुलगुरु
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

:: संपादकीय ::

शासकीय अध्यापक महाविवद्यालय नांदेड येथे मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा या विषयावर एक दिवसीय ओतरविद्याशाखीय अभासी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. प्रज्वलितो दीप इवं प्रतिपाद या ध्येयाने प्रेरित असलेले शासकीय अध्यापक महाविद्यालय नांदेड, 1968 पासून कार्यरत आहे. राष्टाला प्रगतीपथाकडे नेण्यासाठी उद्याचा आदर्श नागरिरक घडवण्यासाठी कौशल्यपूर्ण व नितीवान चारित्र्यसंपन्न शिक्षकांची आवश्यकता आहे. असे कौशल्यपूर्ण, नितीवान चारित्र्यसंपन्न, अभ्यासू, संशोधक, चिकित्सक, शिक्षक घडविण्याचे कार्य तसेच शासनांनी वेळोवेळी आखून दिलेल्या ध्येय धोरणाची अमलबजावणी सुयोग्यरित्या करण्याचे कार्य हे महाविद्यालय सातत्याने अविरतपणे करत आहे.

अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थ्याच्या मनावर तसेच उच्च शिक्षणात कार्यरत असलेल्या अनेक घटकावर स्त्री-पुरूष समानतेचे तत्व बिंबविण्याचा प्रयत्न व स्त्री सुध्दा एक मानव आहे. तिला मन आहे, भावना आहे. असे विचार रूजवणे आज काळाची गरज आहे. मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा व स्त्रीवाद समजून घेतांना पहिल्यांदा पुरूषप्रधान संस्कृतीतील स्त्रीयांचे स्थान याचा विचार होणे आवश्यक आहे.

काळानुसार जगण्याचे संदर्भ ही सातत्याने बदलत असतात. हा बदल अचानक होत नाही. त्यामागे अनेक घटक कारणीभूत असतात. या बदलाचा परिणाम समाजाच्या एकूण जीवन व्यवहारावर होत असतो. आणि या जीवन परिघातून साहित्य वजा करता येत नाही. या साहिहत्याची नाळ त्या त्या काळातील जाणिवाशी घट्ट चिकटलेली असते. शब्दरूपाने, ती व्यक्त होत असते. यालाच आपण साहित्य म्हणतो. या साहित्यात स्त्री आणि पुरुष ओघाने आलेच स्त्री पुरूषातील नातेसंबंध निकोप असतील तरच निरोगी अशा समाजव्यवस्थेची घडी निर्माण होणार आहे. मानवी नातेसंबंधाच्या मुळाशी गेलो की, मानवी मनाची गुंतागुंत, अतर्क्यता, अपरिहार्यता, लक्षात येते. आणि आपण नाते संबंधातील समस्यांना सामोरी जाऊ शकतो.

साहित्य हा जीवनाचा आरसा आहे. कोणत्याही साहित्य कृतीतून मानवी जीवनाचेच चित्रण होते. आणि जीवनाच्या सामुग्रीतून साहित्य कृती घडत असते. त्यामुळे हे चित्रण एकट्या व्यक्तीचे नसते. तर ते समुहाचे ही असते स्त्री दु:खाचे, बंडाचे, अनेक पदर संत साहित्यात, लोकसाहित्यात, दलीत साहित्यात आधुनिनक साहित्यात व आदिवासी साहित्यात, कवितेत, विखूरलेले आहेत. त्यावर मंथन होणे गरजेचे आहे व आजची स्त्री कोणत्या उंबरठयावर उभी आहे. याचा शोध घेण्याच्या दृष्टीने या राष्टीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. या

चर्चासत्राच्या निमित्ताने प्रस्तुत विषयांची सैध्दांतिक मांडणी करण्यासाठी मा. संचालक डॉ. धनराज माने, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट राज्य पुणे, प्रो. डॉ. वंदना महाजन, प्रो. डॉ. केशव देशमुख व प्रा. विद्या कुलकर्णी, आदी या विषयातील तज्ज्ञ मान्यवरांनी महत्वपूर्ण भूमिका निभावली त्यांच्यामुळे या चर्चासत्राला वाग्मःयातील वैचारिक उंची प्राप्त झाली. त्यामुळे मी त्यांचे औपचारिक आभार न मानता कायम त्यांच्या ऋणातच राहू इच्छिते.

हे चर्चासत्र घेण्यामागे अनेकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. प्रा. पी. विठ्ल, प्रा. प्रमोद इंगोले, व प्राचार्य डॉ. संजीवनी मुळे यांचे ही मनस्वी आभार मानते.

या चर्चासत्रासाठी मा. कुलगुरू डॉ. उध्दव भोसले, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी शुभेच्छा दिल्या. त्याबद्दल त्यांचेही मनस्वी आभार मानते.

या चर्चासत्राच्या आयोजनात प्रत्यक्षपणे ज्यांनी प्रेरणा दिली. आणि मार्गदर्शन केले ते म्हणजे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उर्मीला धूत यांचेही मनस्वी आभार याशिवाय महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. शाकेर, प्रा. डॉ. रामटेके, प्रा. डॉ. भुसारे, व प्रा. डॉ. घोनशेटवाड, अधिक्षक श्री पांडे, मुख्यलिपीक श्री जाधव, लिपीक श्रीमती होळकर, श्री सोनाळे, व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी, संशोधक विद्यार्थी व पालक यांचेही सहकार्य मोलाचे ठरले.

या राष्टीय चर्चासत्रात भारतातील अनेक विचारवंत प्राचार्य, प्रोफेसर, प्राध्यापक, शिक्षक, व विद्यार्थी यांनी सहभाग घेतला व मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा या विषयावर अनेकांनी आपले शोधनिबंध सादर केले त्यांचेही मनापासून आभार, या चर्चासत्राच्या निमित्ताने संशोधन मुल्य असलेल्या शोधनिबंध ग्रंथाचे प्रकाशन करीत आहोत. यासाठी सिध्दी प्रकाशनाचे डॉ. राजेश उंबरकर यांनी यात सुंदर मांडणी व छपाई केली त्यांचेही आभार तसेच सर्व ज्ञात अज्ञातांचे पुन्हा एकदा आभार. या शोधनिबंध ग्रंथात प्रकाशित झालेले शोधनिबंध त्यातील मांडणी ही त्या त्या लेखकांची आहेत. त्यास संपादक सहमत असेलच असे नाही. त्याचे यश आणि उणिवा ही सर्वांच्या आहेत. मर्मग्राही अभ्यासक याचे स्वागतच करतील या अपेक्षेसह थांबते.

धन्यवाद !

प्रो. डॉ. शैला भगवान सारंग
संपादक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड

:: प्रस्तावना ::

शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड मार्फत आयोजित एक दिवसीय आंतर विद्याशाखीय राष्ट्रीय ऑन लाईन परिसंवाद **'मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा'** या विषयावर दिनांक २८/०३/२०२२ रोजी घेण्यात आले.

मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा चा अभ्यास करताना प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत स्त्री शिक्षणाचा अभ्यास करणे अपेक्षित आहे हा अभ्यास सदरील राष्ट्रीय ऑन लाईन परिसंवादात भाग घेणाऱ्या व शोध निबंध सादर करणाऱ्या संशोधकाने करावा हा विचार समोर ठेवून सदरील परिसंवाद घेण्यात आले.

स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व परिपोषण करणारे महत्वाचे साधन म्हणजे स्त्री शिक्षण. स्त्री शिक्षण हा कोणत्याही समाज जीवनाच्या समृद्धीचा आणि प्रगतीचा मापदंड आहे.कोणत्याही समाजाची सांस्कृतिक पातळी ही त्या समाजातील स्त्रीयांची परिस्थिती कशी आहे यावरून ठरते. वैदिक काळापासून आजपर्यंत स्त्री शिक्षणाचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, वैदिक काळात स्त्रीयांना मान होता. त्यांना मुलाच्या बरोबरीने आवश्यक असे शिक्षण मिळत असे व त्यांना उपनयनाचा अधिकार होता.उपनयनानंतर त्यांच्या अध्ययनास सुरुवात होई. लोपामुद्रा, विश्ववारा, घोषा इ.विदुषीनी ऋचा रचल्या तरब्रम्हयज्ञाच्या वेळी केल्या जाणाऱ्या तर्पणात सुलभा,मैत्रेयी, गार्गी इ. विदुषी स्त्रियांचीही नावे आढळतात. पती परगावी गेला असता पत्नीला यज्ञकर्म करण्याची परवानगी होती, याचा अर्थ स्त्रीशिवाय गृहस्थाला गृहस्थपणाच येत नसे. स्त्रीया आपल्याआपत्यांच्या श्रेष्ठ गुरु समजल्या जात.

वैदिक काळात सुरु झालेली स्त्री शिक्षणाची उच्च परंपरा त्यानंतरच्या रामायण, महाभारत काळात टिकून होती. तसेच बौद्ध-जैन-धर्मांच्या प्रारंभीच्या काळात सुद्धा स्त्रियांना शिक्षणाच्या क्षेत्रात मानाचे स्थान होते. सूत्रकाळापर्यंत स्त्रियांनी ही स्थिती होती. मात्र त्यानंतर त्यांचा सामाजिक दर्जा खालावला आणि पुरुषवर्गाला जास्त महत्व प्राप्त झाले.

स्मृतीकाळात (इ.स. ४०० ते १०००) स्मृतीनिरनिराळ्या काळात रचल्या गेल्याआहेत. त्यापैकी काही पहिल्या-दुसऱ्या शतकात रचल्या गेल्या त्यातील त्यांचा स्त्रीविषयक दृष्टीकोण हा केवळ भोग इच्छापूर्तीचे साधन- असा मर्यादित होता. या काळात स्त्रियांवर अनेक निर्बंध आले. केवळ काही ठराविक उच्चभ्रू कुटुंबातील मुलींनीच शिक्षण मिळत असे. त्यामुळे या काळातील रेवा, रोहा, माधवी, अनुलक्ष्मी इ. उल्लेख मिळतो. तर काही स्त्रीचा प्रशासनिक व स्थानिक कार्यात कार्य करताना दिसून येतात.

मध्ययुगात (११ ते १७ शतक) स्त्री शिक्षणाची पिछेहाट झालेली दिसून येते. भारतीय समाजाचे अर्धेअंग विकल झाले. या काळात स्त्रियांच्या शिक्षणाबाबत विशेष प्रयत्न झालेला नाही. मात्र बाबर बादशहाची कन्या गुलबदन बेगम हिने हुमायुनामा हा ग्रंथ लिहला व तो एक एतिहासिक दस्तवेज

ठरला.शहाजानची मुलगी जहाभरा हिने तत्कालीन मुस्लिम साधूंची माहिती संग्रहित केली. तर औरंगजेबची मुलगी झीबुन्निसा हिने मुखली या नावाने उर्दू कविता लिहल्या. म्हणजेच फक्त शाही घरान्यातल्या स्त्री या सोडल्या तर एकूणच याकाळात स्त्रीचा शिक्षणापासून वंचित राहिल्या.

आधुनिक काळात मौंट स्टुअर्ट एल्फिनस्टन (१८१९ - २७) यांच्या प्रयत्नामुळे मुंबई व पुण्यात संस्कृत पाठशाळेची स्थापना झाली आणि स्त्रीशिक्षणाचा ही प्रारंभ यांच्याच राजवटीत झाला. या चळवळीतमहात्मा फुले व सावित्री बाई फुले यांचे कार्य संस्मरणीय आहे. विसाव्या शतकाच्या आरंभी स्त्री शिक्षणात बरीच सुधारणा झाली. एकविसाव्या शतकात स्वतंत्र भारतातील स्त्रीशिक्षण क्रांतीच्या मोठ्या टप्प्यावर उभे आहे. प्रामुख्याने शहरी भागापुरते मर्यादित असलेले स्त्री शिक्षण आता ग्रामीण, दुर्गम, आदिवासी भागापर्यंत विस्तारले आहे. डॉ. बाबासाहेब अंबेडकरांनी, १९५१ साली हिंदूकोड बिल लोकसभेत सादर केले त्यात त्यांचा स्त्रीशिक्षण विषयक सन्मान, उदार दृष्टिकोन आणि स्त्री शिक्षण विषयक आस्था दिसून येते.अनेक बाबीनी हे बील पुरोगामी विचारसरणीत आणि स्त्रीच्या जीवनाला माणूसपण देणारे होते. महाराष्ट्र राज्य हे स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रातील प्रागतिक राज्य असून सावित्रीबाई फुलेदत्तक योजनेची अभिनव कल्पना महाराष्ट्रात कार्यवाहीत आणली गेली. विसावे शतकात स्त्रियांच्या उत्थापनाचे शतक होते तर एकविसाव्या शतकात स्त्रीया अनेक पदावर पुरुषांच्या बरोबरीने कार्य करताना दिसून येत आहेत. जर भारतास महासत्ता होण्याचे स्वप्न साकार करावयाचे असल्यास प्रत्येक स्त्रीचे शिक्षण दर्जेदार झाले पाहिजे.

मा. धनराज माने सर, उच्च शिक्षण संचालक (म.रा.) यांची प्रेरणा व मार्गदर्शन यामुळे हे ऑनलाईन राष्ट्रीय परिसंवाद यशस्वी होत आहे.

या परिसंवादाच्या निमित्ताने लेखनाच्या माध्यमातून ५९ संशोधक सहभागी विचारवंतांनी आपले शोध निबंध सादर केले आहे. एकूण ४११ प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

सदरील ऑनलाईन राष्ट्रीय परिसंवाद यशस्वी करण्यासाठी समन्वयक म्हणून महाविद्यालयाच्या आय. क्यु ए. सी. विभागाच्या विभागप्रमुख डॉ शैला सारंग यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक डॉ. शाकेर, डॉ रामटेके, डॉ भुसारे, डॉ घोनशेटवाड व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी देखील परिसंवाद यशस्वी करण्यात विविध भूमिका पार पाडल्या. या ठिकाणी माझ्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मी अभिनंदन करते व भावी कार्यास शुभेच्छा देते.

धन्यवाद **!!**

डॉ. उर्मिला मु. धूत
प्राचार्य,
शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड.

Guidelines for Submission of Manuscript

1. COVERING LETTER FOR SUBMISSION:

DATE: _____

To,
THE EDITOR,
WIPRJ,
Nanded.

Subject: Submission of the article with the title ……

……..……...…….

DEAR Editor,

Please find my submission of article for possible publication in your journal.

I hereby affirm that the contents of this manuscript are original. Furthermore it has neither been published elsewhere fully or partly, nor itis under review for publication anywhere.

I affirm that all author(s) have seen and agreed to the submitted version of the manuscript and their inclusion of name(s) as co-author(s).

Also, if our/my manuscript is accepted, I/We agree to comply with the formalities as given in the journal and you are free to publish our contribution in your journal.

Name and Sign of Author/Authors
Designation:
Affiliation with full address & Pin Code:
Residential address with Pin Code:
Mobile Number (s):
Landline Number (s):
E-mail Address:
Alternate E-mail Address:

2. INTRODUCTION: Manuscript must be in British English prepared on a standard A4 size paper setting. It must be prepared on a single space and single column with 1" margin set for top, bottom, left and right. It should be typed in 12point Times New Roman Font (English Article) and 16 point in DVB-TT Surekh in Pagemaker (Marathi / Hindi Article).

3. MANUSCRIPT TITLE and HEADINGS: The title of the paper should be bold capital. All the headings should be bold.All sub-headings should havealso bold.

4. AUTHOR(S) NAME(S) and AFFILIATIONS: The author(s) full name, designation, affiliation(s), address, and email address should be there.

5. ABSTRACT: Abstract should be in fully italicized text, not exceeding 250 words. The abstract must be informative.

6. KEYWORDS: Abstract must be followed by list of keywords, subject to the maximum of five.

7. FIGURES and TABLES: These should be simple, centered, separately numbered and self-explanatory, and titles must be above the tables/figures. Sources ofdata should be mentioned below the table/figure.

8. REFERENCES: The list of all references should be alphabetically arranged. It must be single spaced, and at the end of the manuscript. The author(s)should mention only the actually utilized references in the preparation of manuscript and they are supposed to follow **Harvard Style of Referencing**.

Review Process

Each research paper submitted to the journal is subject to the following reviewing process:

1. Each research paper/article will be initially evaluated by the editor to check the quality of the research article for the journal.
2. The articles passed through screening at this level will be forwarded to two referees for blind peer review.
3. At this stage, two referees will carefully review the research article, each of whom will make a recommendation to publish the article in its present form/modify/reject.
4. The review process may take one/two months.
5. In case of acceptance of the article, journal reserves the right of making amendments in the final draft of the research paper to suit the journal's standard and requirement.

Worldwide International Inter DisciplinaryResearch Journal

(A Peer ReviewedReferred)

(ISSN - 2454 7905)

COPYRIGHT WARRANTY AND AUTHORISATION FORM

Date:

TO,
THE PUBLISHING EDITOR,
Worldwide International Inter DisciplinaryResearch (A Peer Reviewed Referred),
Nanded.

SUBJECT: COPYRIGHT WARRANTY AND AUTHORISATION FORM
(The article cannot be published until this copyright authorization agreement is received by the Editor)

DECLARATION

I/We …….. the author/authors of the paper titled…….. ……authorize you to publish the above mentioned article **Worldwide International Inter DisciplinaryResearch** (A Peer Reviewed)

I/We hereby declare that:

1. This article authored by me/us is an original and genuine research work. It does not infringe on the right of others and does not contain any libelous or unlawful statements. It has not neither been submitted for publication nor published elsewhere in any print/electronic form.
2. I/We have taken permission from the copyright holder to reproduce the matter not owned by me and acknowledged the source.
3. I/We permit editors to publish the said paper in the journal or in any other means with editorial modification, if any.
4. I/We assign all the copyright of this article to the journal, and have not assigned any kind of rights for its publication to any other publisher(s).
5. I/We agree to indemnify the Editors, **Worldwide International Inter DisciplinaryResearch** (A Peer Reviewed Referred)against all claims and expenses arising from any breach of warranty on my/our behalf in this agreement.
6. In case of a paper by multi-authored article, I/corresponding authors have obtained permission to enter into agreement and assign copyright from all the co-authors, in writing and all the co-authors have thoroughly read and agreed with above warranties and authorization.
7. All disputes subject to jurisdiction of Nanded court only.

Name : ……..

Official Address :……..

…… **Pin** ……..

e-mail id :……..

Mobile and Phone No. : ……..

Signature of the Author(s) : ……..

Worldwide International Inter DisciplinaryResearch Journal

(A Peer ReviewedReferred)

(ISSN 2454 7905)

Dr. Rajesh G. Umbarkar

House No.624 - Bela Nagar, Near MarutiTemple, Taroda (KH), Nanded – 431605 (India -Maharashtra)
Phone :+91 9623979067**Email :**umbarkar.rajesh@yahoo.com / Shrishprakashan2009@gmil.com
www.wiidrj.com

Dear Editor,

I wish to be an Annual Member and agree to abide by your rules andregulations.

1. Name in Full :_____

2. Nationality: _____

3. Address for Correspondence: _____

_____

_____

Phone (STD code): _____ Mobile No : _____

4. Name of the College/Employer : _____

_____

5. Present Position/Designation: _____

6. Email Address: _____

Date: **(Signature of the applicant)**

Place: Stamp Seal:

ANNUAL SUBSCRIPTION RATES:

	Domestic	**International**
Individual	**Rs. 1500**	**$ 150**
Institutional	**Rs. 1500**	**$ 150**

Director : Mr. TejasRampurkar(For International contact only +91-8857894082)

Subscriptions must be sent by Demand Draft drawn on any Nationalized Bank at Nanded, in favour of **Mrs.PallaviLaxmanraoShete**Subscription can also be made by depositing cash or electronic transfer in our bank account.

Name of the Bank : **State Bank of India**,**Branch – TarodaNakaDist**. NANDED.(MH.,India.)
IFSC Code : **SBIN0016667**
Branch Code : 16667
Account Number : **20286425949**

INDEX

Sr. No.	Title of the Paper	Name of Author	Page No.
01.	**मध्ययुगीन संत कवयित्रींच्या साहित्यातील आधुनिक विचार**	**प्रा. विद्या कुलकर्णी**	**01**
02.	**मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा - बहिणाबाई चौधरी -एक अभ्यास**	**श्री वारुळकर प्रदीप मुरलीधर मा. डॉ. धूत यु. एम.**	**09**
03.	**मराठी कविता साहित्यातून अभिव्यक्त झालेल्या स्त्रीवादी विचारधारेचा आढावा**	**प्रा. शुभांगी विजय होले डॉ. उर्मिला धूत**	16
04.	**मराठी दलित साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**श्रीमती आशा पांडुरंग रोडगे प्रो. डॉ. व्ही. डी. रामटेके**	21
05.	**मराठी साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**प्रो. डॉ. एस. बी. सारंग श्री. डी. एम. गिरी**	25
06.	**मराठी दलित साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**श्री. अभिजीत भगवान सारंग श्री. एम. ए. शेख**	30
07.	**प्राचीन मराठी साहित्यातील आधुनिक विचार संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातून व्यक्त होणारे आधुनिक विचार एक समीक्षा**	डॉ. सुनीता यादवराव पाटील	35
08.	**"ग्रामीण कवितेतील स्त्री चित्रणाचे बदलते स्वरूप"**	**प्रा. विक्रम उ. मोरे**	39
09.	**1990 नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेतील स्त्री प्रतिमा**	**प्रा. कदम सखाराम बाबाराव प्रा. डॉ. शिंदे दत्ता रुस्तुमराव**	45
10.	**मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**प्रा. हिरा वाघ**	50
11.	"काव्यफुलेतून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा"	अंगद श्रीपती भुरे	55

12.	**स्त्रीत्व, स्त्रीवाद, स्त्रीमुक्तीआणिमराठीकविता**	**श्रीमती अनिता तुकाराम यलमटे** **डॉ. विलास पाटील**	59
13.	**साहेब खंदारे यांच्या एकांकिकांतील अभिव्यक्त स्त्री प्रतिमा**	**प्रा. डॉ. कांत वसंतराव जाधव**	63
14.	मराठी स्त्री गीतांतून अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा	साईप्रसाद मधुकर पंडित	68
15.	**मराठीतील निवडक स्त्रीवादी कवयित्रींच्या काव्यातील प्रतिमाविश्व :एक अभ्यास**	**सौ सागर गोविंदराव पांचाळ**	71
16.	**एकोणिसाव्या शतकात स्त्रीयांच्या उन्नतीसाठी महाराष्ट्रामध्ये झालेल्या कार्याचा आढावा- एक अभ्यास**	**डॉ. गोपाळ रामराव पवार** **भगवान रामकृष्ण केंद्रे**	74
17.	**संत मन्मथ स्वामी यांच्या अभंगातील स्त्री विषयक विचार**	**डॉ. विजयकुमार शिवदास ढोले**	77
18.	मराठी 'स्त्रीवादी' कादंबरीतून व्यक्त झालेली 'स्त्री' प्रतिमा	प्रा. डॉ. कल्पना गावडे	81
19.	**संत जनाबाईचे भावविश्व**	**डॉ. रवींद्र बेम्बरे**	88
20.	**सानियायांचे कथनपर साहित्य : स्त्रीच्या आत्मभानाचा प्रगल्भ प्रवास**	डॉ. माधुरी पाथरकर	92
21.	**मराठी साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	श्री. शिंदे चंद्रशेखर उत्तमराव प्राचार्य डॉ. मधुकर आं. पुंडगे	96
22.	**मराठी साहित्यातील ग्रामीण स्त्री**	सुनिल रामराव काकडे	101
23.	**विभावरी शिरुरकर यांच्या 'हिंदोळयावर' कादंबरीतील स्त्री प्रतिमा**	**प्रा. डॉ. विजय गणपतराव वारकड**	104
24.	**मध्ययुगीन भारतातील स्त्री शिक्षणाची स्थिती**	कदम गणेश पुंडलिकराव प्रा. डॉ. वैजयंता ना. पाटील	107
25.	**मराठी लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**प्रा. बबन अण्णासाहेब गित्ते**	112
26.	मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा	वैशाली सुभाष पारधे	117

27.	**मराठी लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**डॉ. वीणा सुभाष नारायणे (डॉ. लाडे)**	124
28.	**मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**मारोती कदम** **डॉ. सुनंदा गोपिनाथराव रोडगे**	130
29.	**मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा : संतश्रेष्ठ कवियित्री जनाबाई :**	**प्रा. नीता लक्ष्मणराव चौरे**	133
30.	**ना. धों. महानोर यांच्या कवितेतून येणा-या स्त्रीविषयक प्रतिमा**	डॉ. शिवसांब दिनानाथ कापसे	136
31.	संत तुकारामांच्या अभंगातील स्त्री प्रतिमा	डॉ. संभाजी शिवाजीराव जाधव	140
32.	**मराठी कथा कादंब–यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**डॉ. मंजूषा वि. भटकर**	142
33.	**"मराठी लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेली - स्त्री प्रतिमा"**	**प्रा. डॉ. सुषमा शंकरराव प्रधान-घेवंदे**	144
34.	**मराठी कवयित्री अनुराधा पाटील यांच्या कवितांमधून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**डॉ. सुलभा मुळे** सुनिता गोविंदराव चात्रे	148
35.	**मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा**	**गीतांजली भगवान रहाटे**	153
36.	इ.स. १९९१ ते २००० च्या दशकातील निवडक मराठी स्त्री आत्मकथनांचा संक्षिप्त परिचय	**प्रा. अरुण बळीराम पडघन** **प्रा. डॉ. शत्रुघ्न गिरमाजी जाधव**	157
37.	**कल्पना दुधाळ यांच्या कवितेतील स्त्री प्रतिमा कवितासंग्रह - सिझर कर म्हणतेय माती**	**प्रा. डॉ. सौ. मंगल एकनाथ डोंगरे**	162
38.	**मराठवाड्यातील कवयित्रींच्या काव्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**प्रा. डॉ. मीनाक्षी देव (निमकर)**	165
39.	**मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा**	पदमवार विठ्ठल विश्वनाथराव	170
40.	**स्त्रीलिखित कथनात्म साहित्यातील स्त्रीप्रतिमा**	प्रा. डॉ. शीतल पावसकर-भोसले	176
41.	नारायण सुर्वे आणि धूमिल यांच्या कवितेतील स्त्री प्रतिमा : काही निरीक्षणे	**डॉ. विश्वाधार देशमुख**	181
42.	**मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**डॉ. भाग्यश्री प्रभाकरराव सुभेदार**	193

43.	**वारली लोकगीतांतून अभिव्यक्त झालेली स्त्रीप्रतिमा**	डॉ. गीता जाधव	197
44.	राजकवी भा.रा.तांबे यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमा	**डॉ. महालक्ष्मी मोराळे**	201
45.	**"मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा"**	**अक्षय बालाजी रत्नपारखे**	206
46.	**आसाराम लोमटे यांच्या कथांतील स्त्री प्रतिमा**	**संजय नामदेवराव आठवले प्रा. डॉ. दत्ता रुस्तुमराव शिंद**	211
47.	**मध्ययुगीन साहित्यातील स्त्री जाणिवा**	**गोविंद शंकरराव रामदिनेवार**	215
48.	**स्त्रीवादी साहित्य आणि समीक्षा**	**प्रा. आहेर डी. के.**	217
49.	**मराठी कथा कादंबऱ्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**श्रीमती रतन अंबादास कराड**	222
50.	**मराठी लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**प्रा. निखिता वासू गावकर**	226
51.	मराठी कवितेतील स्त्री आत्मवेदना	प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे	228
52.	**मराठी आदिवासी कादंबरीतील स्त्री जाणीव**	प्रा. नवनाथ निवृत्ती बेंडे	232
53.	**मराठी दलित साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**श्रीमती चंद्रकला सटवाजी कोलगाने**	236
54.	**वा .म .जोशी लिखित मराठी कादंबरीतील स्त्री प्रतिमा**	**प्रा. राजकुमार मोरे**	239
55.	**महापुरूषांच्या मराठी लेखन साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा**	**अशोक चापटे डॉ. भागिरथी गिरी**	244
56.	**'जावे तिच्या वंशा' या कथासंग्रहातून अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा**	**श्रीमती. दुर्गा सुदिन जांभळे**	250
57.	**मराठी दलित स्वकथनांतून अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा:**	**प्रा. डॉ. रेखा वाडेकर**	254
58.	**साठोत्तरी दलित साहित्य प्रवाहातूनव्यक्त झालेला स्त्रीवाद**	**डॉ. विजया खामनकर**	259
59.	**स्त्री सक्षमीकरण (कविता)**	**सौ. सागर गोविंदराव पांचाळ**	262

मध्ययुगीन संत कवयित्रींच्या साहित्यातील आधुनिक विचार

प्रा. विद्या कुलकर्णी

'पुणे विद्यार्थी गृहाचे' एस. एस. धामणकर महाविद्यालय, नाशिक

संतसाहित्य हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक, धार्मिक वारसा असून संतत्व आणि कवित्व यांचा अपूर्व संगम या साहित्यप्रकारात झालेला दिसून येतो. समकालीन समाजाच्या धर्मजीवनाला वळण लावण्यासाठी संतांनी आपली आपली वाणी कीर्तन-प्रवचनातून व्यक्त केली. मराठवाडा हा संतांचा पवित्र भूप्रदेश मानला जातो. संत कवयित्रींची अभंगवाणी ही समाजात चिरकाळ टिकणारी आहे. मानवी जीवनातील शाश्वत सत्यांचा शोध घेणारी, स्त्रीचे अस्तित्व जपत,स्वाभिमान राखून पुरुषी वर्चस्व असणाऱ्या समाजाला निर्भयपणे प्रश्न विचारणारी स्त्री संतांची कविता संत साहित्यात महत्वाची ठरते. या कवितेला वारकरी,महानुभाव संप्रदायाचा वैचारिक व तात्विक वारसा लाभलेला असून संप्रदायाच्या माध्यमातून मध्ययुगीन कवितेची वेल स्त्री संतानी फुलवलेली निदर्शनास येते. ज्या काळात स्त्रियांना आणि शुद्रांना कोणतेही अधिकार नव्हते त्या काळात स्त्रियांना संतपदापर्यंत पोहचण्यासाठी वारकरी आणि महानुभाव संप्रदायाने महत्वाची भूमिका बजावलेली लक्षात येते.

१३ व्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची तात्विक मूहर्तमेढ रोवली आणि अठरापगड जातीच्या संतांना आणि स्त्री संतांनाही भक्ती चळवळीत समाविष्ट करून घेतले. तर महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक संत चक्रधर स्वामींनी स्त्रियांची बाजू घेत त्यांना आपल्या मठात संन्यासी स्वरूपात महानुभाव संप्रदायात सामील करून घेतले. संत ज्ञानेश्वर व संत चक्रधर स्वामी हे दोघे स्त्री मुक्ती चळवळीसाठी संत कवयित्रींस प्रेरणादायी ठरले.तर आधुनिक भारतात समाजातील धार्मिक, सामाजिकदृष्ट्या दुर्लक्षित असणारा बहुसंख्य स्त्री व अस्पृश्य वर्गाला आपल्या अधिकारांची जाणीव करून देण्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका जशी महत्वाची आहे त्याप्रमाणे म. फुल्यांचे कार्य व विचारधाराही महत्वाची ठरते. महात्मा फुल्यांचे वैचारिक साहित्य म्हणजे समाजाला अज्ञान आणि शोषण यांच्याविरुद्ध पेटून उठण्याचे,सजगता निर्माण करण्याचे कार्य करते.ज्या-ज्या ठिकाणी अन्याय होत असेल,किंवा ज्यांच्यावर झाला असेल त्या-त्या ठिकाणी महात्मा फुले संघर्ष करण्यासाठी,अन्यायाला वाचा फोडण्यासाठी पुढे सरसावलेले लक्षात राहतात. म.फुल्यांनी स्त्री-पुरुष समानता भारतीय समाजात नांदावी यासाठी आयुष्यभर भारतीय धार्मिक ग्रंथांची चिकित्सा केलीआणि त्यातील दोष दाखवून दिले. स्त्री व अस्पृश्य यांच्यावर होणारा अन्याय, चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळे समाजाचे झालेले नुकसान, भेदाभेद, शिवाशीव या सर्वांमुळे समाजात निर्माण झालेली अराजकता यावर भाष्य करत समजातील कर्मठ विचारांतील दोष सुधारण्यासाठी 'सार्वजनिक सत्यधर्माची' स्थापना केली होती. तर १३ व्या शतकात धार्मिक सुधारणांसाठी ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची उभारणी केली.

'सर्वांभूती परमेश्वर' हा विचार संतानी आपल्या काव्यातून मांडला. ज्ञानेश्वरांनी आपल्या पसायदानात वैश्विक सुखाची-शांततेची प्रार्थना केली आहे. तर संत रामदासांनी मनाचे श्लोक, दासबोध यासारख्या आपल्या रचनांतून लोकांपर्यंत व्यवहारज्ञान पोहचवले. नामदेवांनी रसाळ वाणीतून जीवनाचे तत्वज्ञान लोकांपर्यंत पोहचवले.तर एकनाथांनी भारुडे आणि गौळणी यांच्या माध्यमातून लोकांपर्यंत त्यांच्या भाषेत लोकव्यवहार पोहचवला.तुकारामांची गाथा तर सामान्य माणसासाठी खूप प्रेरणादायी ठरली आहे. आत्मबल कसे वाढवावे यासाठी त्यांचे अभंग प्रेरणात्मक ठरतात. समाजाला नवचेतना देण्याचे कार्य संतांनी वारकरी पंथाच्या माध्यमातून केले आहे.समाजातील अनिष्ट पद्धती, रूढी-परंपरा नष्ट करून समाजात सर्वांना शांततेने जगता येईल असा सोपा मंत्र म्हणजे 'परमेश्वराचे नामस्मरण आणि ते संसारात राहून भक्तीच्या माध्यमातून सहजपणे करता येते' असा सुखाचा मंत्र जनमाणसात संत कवींनी पोहचवला. संतांनी शब्दरत्नांचा हार गळ्यात घालून सामान्यांपर्यंत त्याचा सुगंध दरवळत ठेवला; तो २१ व्या शतकातही महत्वाचा ठरलेला आहे हे निदर्शनास येते. मध्ययुगीन काळातील साहित्य हे आध्यात्मिक प्रेरणेतून निर्माण झालेले असून धर्माचा पगडा समाजावर असल्याने हिंदू धर्मात अनेक देवदेवतांचे प्राबल्य माजले होते. चुकीच्या पद्धतींतून समाज रसातळाला पोहचला होता.त्याच काळात सद्चविचारांच्या संतानी समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य केले. "प्राचीन कवितेच्या तीन परंपरा उपलब्ध होत्या.तत्वविवरण व तत्वचिंतन करणारी

तत्वकविता,दुसरी परंपरा ही अख्यानकाव्यांची आणि तिसरी शृंगार कवितेची. मराठी संतकविता ही प्रामुख्याने तत्वविवरण करणारी आहे.वेद आणि उपनिषदे, रामायण-महाभारत या काव्यांच्या आदिबंधातील धागा घेऊन त्यावर ही संतांची कविता आधारलेली आहे."[१] आध्यात्मिक साधनेतून ही कविता तत्वांचा शोध घेते. गूढवादी तात्विक विवरण करणारी या काळातील संतांची कविता आहे. "गुढवाद म्हणजे स्वत:ला ईश्वराशी एका अंतिम तत्वाशी किंवा समग्र विश्वाला व्यापून राहणाऱ्या एका अंतिम तत्वाशी किंवा समग्र विश्वाला व्यापून राहणाऱ्या एका एकात्मिक तत्वाशी थेट जोडणे होय.बहुतेक धर्मात ईश्वर हेच अंतिम आणि एकात्मिक तत्व आहे असे मानले जाते. म्हणून गुढवादाचे धर्माशी अतूट नाते आहे.अढळ ईश्वरनिष्ठा, ईश्वरमय होण्याची तळमळ आणि शेवटी या ईश्वराशी एकरूप होणे ही गुढवादाची आणि पर्यायाने कवितेची त्रिसूत्री मानली जाते. ईश्वर हे अंतिम तत्व असून ते गुढ आहे. ते अज्ञात आणि अदृश्यही आहे. म्हणूनच या अंतिम तत्वाचा शोध हा या गुढवादी कवितेचा गाभा समजला जातो."[२] अशा या गुढवादी कवितेचा धर्म आणि अध्यात्म यांच्याशी जवळचा संबंध असून संतांची कविता ही ईश्वराच्या दर्शनासाठी व्याकुळ झालेली दिसून येते. "सर्वांत जुने समजले जाणारे ईशावास्य उपनिषद हे प्राचीन गुढवादी कवितेचे तसेच प्राचीन तत्वकवितेचे उत्तम उदाहरण आहे.भारतीय अध्यात्माचे सार समजल्या जाणाऱ्या भगवदगीतेतील प्रमुख सिद्धांतांचे मूळ या उपनिषदात आपल्याला दिसते. हे समस्त जग ईश्वराने व्यापून टाकले आहे. ईश्वर नाही असे एकही ठिकाण या जगात नाही' हे या उपनिषदातील पहिले महाविधान गीतेतील भक्तीयोगाचे मूळ आहे."[३]

प्राचीन मराठी साहित्य हे पद्याच्या स्वरुपात प्रकटले. संस्कृत साहित्य मिमांसक भरताने लिहिलेल्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथात'काव्य' हा शब्द समग्र वाङ्मय प्रकारांसाठी योजलेला आहे. प्राचीन कवितेची प्रेरणा ही अध्यात्मप्रवणतेची दिसून येते. अभंग, गौळण, भारुडे, देवांच्या आरत्या, खंडकाव्य, कथाकाव्य यातून ती प्रकट झाली. महदंबा, जनाबाई, मुक्ताबाई, बहिणाबाई, वेणाबाई, सोयराबाई, निर्मळा इत्यादी स्त्री संत कवयित्रींची वैभवशाली परंपरा अस्तित्वात आली. मुक्ताबाईने ज्ञानेश्वर आणि चांगदेवांना उपदेश केला. संत सोयराबाईने संत गोरोबाकाकांचे चरित्र लिहिले. वेणाबाईंनी रामदास स्वामींबद्दल लिहिले. बहिनाबाईंनी संत परंपरेची इमारतच उभी केली.स्त्री संतांनी आध्यात्मिक लोकशाहीला बळकटी देण्याचे कार्य केलेले आहे. स्त्री संतांचा मोठा प्रभाव त्या काळातील इतर संतांवर असल्याचे दिसून येते. संत कोणाला म्हणायचे हे सांगताना ताटीच्या अभंगात संत मुक्ताबाई म्हणतात -

संत तोची जाणा जगी ।
दया क्षमा ज्याचे अंगी ॥

कवयित्रींचा संतत्वापर्यंतचा प्रवास तसा तर खूपच खडतर होता. कारण एकीकडे समाज तर तर दुसरीकडे कुटुंब अशा दोन स्तरांवर त्यांना विठ्ठालाची भक्ती करताना स्त्री म्हणून झालेला त्रास यासारख्या अनेक गोष्टींवर त्यांना मात करावी लागली हे सर्वश्रुतच आहे.तरीदेखील जनाबाई आपल्या कवितेत म्हणते ,

स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास ।

तर आपल्या मोठ्या भावाला संत मुक्ताबाई अधिकारवाणीने ताटीच्या अभंगात म्हणते,

संत सुखे व्हावे पाणी ।

यासारख्या काव्यविचारांतून कवयित्रींचा प्रवास आधुनिक विचारांकडे समाजाला घेऊन जातो. ज्या काळात शाळा महाविद्यालये नव्हती, कोणत्याही शाळेत औपचारिक शिक्षण न घेतलेल्या या संत कवयित्रींचा आधुनिक विचार त्या काळात लोकभाषेतून अभंग व आख्यानकाव्याच्या माध्यमातून तळागाळापर्यंत पोहचला हे त्यांचे कार्य महत्वाचे ठरते. या स्त्री संतांच्या जीवनातील अनुभव म्हणजेच कवितेतील आर्त साद आपण लक्षात घेतली पाहिजे.संत जनाबाईंचे जीवन आणि त्यांची कविता हा स्त्री मुक्तीचा एक श्रेष्ठ असा आविष्कार आहे. त्या काळातही लग्न न करता जनाबाई, मुक्ताबाई आपले आध्यात्मिक भक्तीचे कार्य करतात. महदंबा तर बालविधवा होत्या पण संन्यास घेऊन महानुभाव संप्रदायाचे कार्य करतात. संत सोयराबाई आपल्या पतीसोबत राहत असताना आपले स्वतंत्र अस्तित्व जपत काव्य रचनेतून जातीव्यवस्थेवर प्रश्न विचारतात; तर लहानशा मुक्ताबाईची कूट अभंगांतील रचना वाचकांना थक्क करते. संत कान्होपात्रा आणि संत सोयराबाई या हीन जातीत जन्माला आल्याने त्यांचे स्त्री आणि जातीचा संदर्भ असणाऱ्या अभंगांतील वेदनेची तीव्रता निदर्शनास येते. या सर्व गोष्टी त्या काळात आणि आजही स्त्री ही दुबळी नाही हे लक्षात आणून देतात. कष्टकरी कामकरी समाजाचे नेतृत्व करणारी जनाबाईंची

कविता लक्षात राहते. जात, धर्म, पंथ, लिंग या सर्वांवर मात करत भक्ती करणाऱ्या या स्त्री संत आजच्या महिलांसमोर आदर्श ठरतात. शरीराचा विटाळ, स्त्री-पुरुष समानता, भक्तीचे ढोंग, याती शुद्ध भाव यासाख्या अनेक विषयांवर स्त्री संतानी आधुनिक विचार मध्ययुगीन काळात वार्णिलेला आहे. स्त्रीमुक्ती, स्त्रीवाद या संकल्पना मराठी साहित्यात सन १९८० नंतर रुजू लागल्या पण असे असले तरी स्त्री-संतांचा काव्यातील विचार हा तत्कालीन पुरुषी व्यवस्थेला हादरे देणारा होता. त्यामुळे त्यांचा विचार आजच्या काळातील महिला सबलीकरणातही तितकाच महत्वाचा ठरतो.

'चूल आणि मूल' या स्त्रीच्या पारंपरिक विचारांना छेद देत संत मुक्ताबाई, संत जनाबाई आयुष्यभर अविवाहित राहिल्या. तर संत महदंबेला लहान वयातच वैधव्य आले, तरीपण त्या खचल्या नाही. उलट जिद्दीने काव्यरचनेच्या माध्यमातून लोकप्रबोधन करत राहिल्या. या दोन कवयित्रींच्या कवितांतील आधुनिक प्रबोधन विचार आजच्या काळातही लागू होताना दिसतो. मुक्ताबाईची रचना संख्येने कमी अत्यल्प आहे पण त्यातील तत्वज्ञान आणि आत्मसाक्षात्काराच्या भावाने परिपूर्ण आहे. गुढ, कुटरचना हे त्यांच्या काव्यरचनांचे वैशिष्ट्य आहे. स्त्री संतांचा आधुनिक विचार त्यांच्या अभंग, कुटरचना यात सामावलेला आहे. काळाच्या, समाजाच्या अनेक मर्यादांवर मात करत त्यांनी आपल्या काव्यातून स्त्रीत्वाविषयी समाजाला प्रश्न विचारलेले आहेत. ही स्त्रीवादाची त्या काळातील सुरुवात होती. आंतरराष्ट्रीय महिला वर्ष १९७५ साली साजरे झाले. ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून साजरा केला जातोय. आजच्या काळातील स्त्रीवादी विचारधारेस कायद्याने बळकटी मिळाली आहेच; शिवाय आजच्या प्रसार माध्ममांमध्ये स्त्रीच्या स्वतंत अस्तित्वाविषयी आस्था दाखविली जातेय हा एक सकारात्मक बदल आपण म्हणू शकतो. १९ व्या शतकात समाजसुधारकांनी महिलांच्या हक्कांसंबंधी, त्यांच्या स्वतंत अस्तित्वाविषयी आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे तिच्या शिक्षणासाठी जे प्रयत्न केले ते स्त्रीवादी विचार रुजण्यासाठी भारतात पूरक ठरल्याचे लक्षात येते. बडोदा संस्थानाधिपती सयाजीराव गायकवाड आणि कोल्हापूरचे शाहू महाराज यांनी महिलांच्या शिक्षणासंबंधी घेतलेल्या भूमिकाही महत्वाच्या ठरलेल्या लक्षात येतात.सर्वांत महत्वाचे म्हणजे तळागाळातील,वंचित स्त्रियांसाठी महात्मा फुल्यांनी पुण्यात सन १८४८ मध्ये पहिली शाळा सुरु करून बहुजन समाजातील स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले; हे त्या काळातील महिलांसाठी क्रांतिकारक कार्य ठरले. शिवाय समाजसुधारकांचे कार्य महिलांच्या हक्कांसाठी प्रेरक ठरले हे सर्वश्रुत आहेच. ब्रिटीशांचे भारतातील आगमन आधुनिक विचारांना, आधुनिकतेची नवसंजीवनी देणारे ठरले. समाजात जी गतिमानता निर्माण झाली, इंग्रजी शिक्षणामुळे व पाश्चात्य विचावंतांच्या विचारांनी भारतीय तरुणांमध्ये वैचारिक नवचैतन्य निर्माण झाले. महिलांना कर्मठ सामाजिक रूढी, परंपरांच्या तावडीतून सुटका मिळावी यासाठी ब्रिटीशांनी विविध कायदे केले; तर त्याची अंमलबजावणीसाठी नीट व्हावी यासाठी सामाजिक परिवर्तनासाठी लोकांचे मत अनुकूल व्हावे यासाठी सुधारकांनी केलेले प्रयत्न लक्षात घ्यावे लागतात. १९ व्या शतकातील हे महत्वपूर्ण बदल महिलांच्या हक्कांविषयी जागृती करण्यासाठी प्रभोधनपर ठरलेले आहेत. पण मध्युयुगीन काळातील महिलांची सामाजिक, धार्मिक, आर्थिक, कौटुंबिक परिस्थिती फारच प्रतिकूल होती. समाजावर धर्माचा पगडा असल्याकारणाने मनुस्मृती, नारदसंहिता या ग्रंथांत केलेल्या वर्णनांनुसार स्त्रियांना सर्वच क्षेत्रांत डावलेले गेले होते. अशा या प्रतिकूल काळात 'ब्र' देखील उच्चारणे अवघड होते त्या काळात स्त्री संतांनी आपल्या काव्यानिर्मितीतून व्यवस्थेला प्रश्न विचारणे ही एक बंडखोरी आणि विद्रोह ठरला.

महानुभाव संप्रदायात आपल्या गुणवत्तेच्या बळावर प्रवेश मिळविणारी महदंबा मूळ नाव 'रुपाई' ही मराठी साहित्यातील आद्य कवयित्री ठरते. महानुभाव संप्रदायात प्रवेश मिळाल्यानंतर तिचे काव्य अधिक फुलत गेले. 'लीळाचरित्र' या मराठीतील आद्य गद्य ग्रंथात तिच्या स्वभावावर प्रकाश पडलेला दिसून असून ती सतत चक्रधरांना प्रश्न विचारणारी स्वभावाची, चिकित्सक वृत्तीची आहे. म्हणून चक्रधर स्वामी म्हणत: "म्हातारी जिज्ञासक एथ निरंतर काहीतसे पुसतचि असे"[४] असे तिचे वर्णन आलेले आहे. महदंबेची चक्रधर निष्ठा तिच्या वडिलांना त्या काळात आवडली नाही.कारण महदंबा ही ब्राम्हण वर्णाची त्यामुळे तिने संन्यास घ्यावा हे तिच्या वडिलांना आवडले नाही म्हणून ते म्हणतात, "रुपै वाया गेली". पण वैधव्य पदरी आल्यानंतर तिने न घाबरता संन्यास घेऊन परमार्थ प्राप्तीचा मार्ग महदंबा स्वीकारते हे धैर्य त्या काळात समाजाच्या विचारसरणीला अर्थातच मान्य नव्हते. ज्या काळात स्त्रियांना समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात अधिकार नव्हते त्या काळात महानुभाव संप्रदायाने स्त्रियांना प्रवेश देणे ही घटना अपवादात्मकच मानावी लागते. कारण एकीकडे हा पंथ 'चित्राचीही स्त्री न

पहावी' असे मानणारा आहे. पण महदंबेने आपल्या बौद्धिक सामर्थ्यावर या पंथात प्रवेश मिळविला. महानुभाव संप्रदायातील हरपाळ देवाचे परिवर्तन एका स्त्रीमुळेच झाले ती म्हणजे महदंबा हे हरपाळदेव नंतर चक्रधर झाले. चक्रधरांचे उत्तरापंथे गमन झाल्यावर महदंबेने मठ व्यवस्था बघितली. महदंबेने' धवळे' आणि 'रुक्मिणी स्वयंवर'या काव्यग्रंथांचे लेखन केले. महदंबेविषयी नागदेवाचार्य म्हणतात, "म्हातारी माझी प्रितीरक्षक: धर्मरक्षक:की गा:" असे म्हटले होते. असा संत साहित्यातील मराठी भाषेतील पहिली कवयित्री महदंबेच्या धवले आणि रुक्मिणीस्वयंवर या रचनांतील भाषासौष्ठव त्यातील सहजता सोपेपणा, प्रतिमासृष्टी भाषिक अंगांनी अभ्यासण्याजोग्या असून तिच्याकडे हा सन्मान जातो, तो यथार्थ वाटतो.

स्त्री मुक्तीची वेगळीच धार मुक्ताबाईंच्या कवितेत दिसून येते. त्या जशा स्पष्टवक्त्या होत्या त्याप्रमाणे त्यांच्या काव्यातील विचारांमधील स्पष्टता लक्षात येते.त्यांच्याबद्दल संत नामदेव म्हणतात, "लहानशी मुक्ताबाई जैशी सनकांडी । केले देशोधडी महान संत' नावाप्रमाणेच त्या सर्वामुक्त होत्या. मुक्ताई अविट मुक्तपंथरथ । असे शब्द मुक्ताबाईंच्या काव्यात वारंवार येतात. त्यांच्या कविता संख्येने अत्यल्प असल्या तरी तत्वज्ञानाने परिपूर्ण आहेत. त्यांचे ताटीचे अभंग लोकप्रिय आहे. हे अभंग तत्वविवेचनपर आहेत. ताटीचे अभंग म्हणजे बुद्धीचे असा अर्थ संत साहित्याचे अभ्यासक ल. रा. पांगारकरांनी घेतला आहे. संन्यासाची मुले म्हणून मुक्ताबाई आणि त्यांच्या भावडांचा त्या काळात समाजाने छळ केला, त्यांना वाळीत टाकले. अगदी मांडे भाजण्यासाठी खापर मिळाले नाही, तेव्हा ज्ञानेश्वरांनी योगबळावर आपल्या पाठीवर मुक्ताबाईला मांडे भाजण्यास सांगितले. हे पाहून विसोबा चाटी देखील कचरला आणि मुक्ताबाईने विसोबाला 'खेचर'म्हणजे पक्षी असे संबोधले.तेव्हापासून ते विसोबा खेचर म्हणून ओळखले जाऊ लागले. चौदाशे वर्षे वय असलेल्या योग्याला त्यांनी 'कोरा राहिलास तू' हे म्हणण्याचे सामर्थ्य मिळविले होते, यावरून त्यांची अफाट बुद्धी लक्षात येते. या विसोबा खेचर आणि चांगदेवांनी मुक्ताबाईंचे शिष्यत्व स्वीकारले होते. यावरून त्यांची योग्यता लक्षात येते. ताटीचे अभंग ती ज्ञानेश्वरांची समज काढण्यासाठी आणि त्यांना कार्यप्रवृत्त करण्यासाठी, त्यांच्या मनाची सल काढण्यासाठी केलेले आहेत. त्यात पुढील अभंगात त्या म्हणतात,

"मजवरी दया करा **।** ताटी उघडा ज्ञानेश्वरा **।**
संत जेणे व्हावे **।** जग बोलणे सोसावे **।**
तरीच अंगी थोरपण **।** जया नाही अभिमान **।**
थोरपण जेथ वसे **।** तेथ भूतदया असे **।**
रागे भरावे कवणाशी **॥** आपण ब्रम्ह सर्व देशी
ऐसी समदृष्टी करा **।** ताटी उघडा ज्ञानेश्वरा **॥**

ज्याला संत व्हायचे आहे त्याने अहंकार, अभिमान, अज्ञान राग, द्वेष, मत्सर इत्यादी आसूरी गुणांना टाळले पाहिजे. त्यांची ताटी म्हणजे दार उघडून त्यांना नष्ट केले पाहिजे, तरच अज्ञानरूपी हे सर्व गुण नाहीसे होऊन ज्ञानाची प्रभात झळकू लागेलआणि ज्ञानेश्वरा तुम्ही समदृष्टी व्हाल! ज्याचे मन पवित्र तोच योगी असून तो इतरांचे अपराध सहन करतो आणि 'विश्व जालिया वन्ही । संतमुखे व्हावे पाणी' असे तुम्ही व्हावे.शब्द हे तारणारे आणि मारणारे शस्त्र आहे. त्यामुळे सर्व विश्वात गोवलेले एकमेव सूत्र म्हणजे आत्मतत्व होय. असा उपदेश ज्ञानेश्वरांना मुक्ताबाई अज्ञानाची ताटी उघडण्यासाठी प्रवृत्त करतात. हा मोठा परिणामकारक बदल म्हणायला हवा असे मला वाटते. योगी कसा असावा हे सांगताना ती म्हणते,

"योगी पावन मनाचा **।** साहे अपराध जनाचा **।**
विश्व जालिया वन्ही **।** संतमुखे व्हावे पाणी **।**
शब्दशस्त्रे जाले क्लेश **।** संती मानावा उपदेश
विश्वपट ब्रम्हदोरा **।** ताटी उघडा ज्ञानेश्वरा **।**
लडिवाळ मुक्ताबाई **।** बीज मुद्दल ठायी
तुम्ही तरोनि विश्वतारा **।** ताटी उघडा ज्ञानेश्वरा **" ।**

ज्ञानेश्वरांनी आपल्या लहान बहिणीचे बोल नीट समजून घेतले म्हणूनच ते ज्ञानेश्वरी, अमृताभव, चांगदेवपासष्टी या ग्रंथांचे लेखन करण्यासाठी मनाने खंबीर होऊन मराठी सारस्वतात आपले ज्ञानाचे अधिक्य असणारे लेखन करून अढळ स्थान प्राप्त करू शकलेआणि शेवटी पसायदानाच्या रूपाने विश्वकल्याणाच्या भूमिकेपर्यंत पोहचू शकले. ही सर्व कृपा मुक्ताबाईंची आहे हे मान्य करावे लागते. त्यांच्या ताटीच्या अभगांतील भूमिका आधुनिक उपदेश देणारी ठरते. संत मुक्ताबाईंच्या अभंगांतून त्यांचा यौगिक अधिकार नितळपणे जाणवत राहतो. त्यांचे कुट अभंग त्यांच्यातील बौद्धिक प्रतिभा लक्षात येते.

"मुंगी उडाली आकाशी **।** तिने गिळिले सूर्याशी **।**

थोर नवलाव झाला **।** वांझे पुत्र प्रसवला **॥**

विंचु पाताळासी जाय **।** शेष माथा वंदी पाय **॥**

माशी व्याली घार झाली **।** देखोन मुक्ताई हांसली **॥**

संत मुक्ताबाईंच्या अभंगांतून त्यांचा यौगिक अधिकार नितळपणे जाणवत राहतो.

संत मुक्ताबाईंच्या समकालीन दुस़ऱ्या संत कवयित्री संत जनाबाई.वस्तुत: मुक्ताबाईंएवढीच जनाबाई प्रपंचमुक्त होत्या; जनाबाई तसे पाहिले तर अनाथ होत्या. संत नामदेवांच्या घरात त्यांचे संपूर्ण आयुष्य काबाडकष्ट करण्यातच गेले.स्वत:चा उल्लेख त्या 'नामयाची दासी' म्हणून करतात. त्यांची कविता म्हणजे स्त्रीवादी विचारांचा प्रेरणास्त्रोत आहे. 'चूल आणि मूल' या पारंपरिक विचारांना त्यांनी नकार दिलेला लक्षात येतो. शिवाय त्यांनी पत्नीकत्वही नाकारले. माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला । असा संवाद ती विठ्ठलाशी करते. 'संत वाटिकेतील जाईची वेल' असे तिच्याबद्दल अभिमानाने म्हटले जाते. संत जनाबाई कष्टकरी, श्रमकारी वर्गाचे नेतृत्व करणारी कवयित्री आहे. काम करताना अखंड रात्रंदिवस ती देवाचे नामस्मरण करते. 'दळिता कांडिता । तुज गाईन अनंता' अहोरात्र कष्ट करणारी, दु;ख, अवहेलना सहन करणारी जनाबाई त्या वेळच्या पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतही इतर स्त्रियांना उपदेश करते, "स्त्री जन्म म्हणवुनि न व्हावे उदास" हा मोलाचा स्वअनुभवातून स्फुरलेला संदेश ती समग्र स्त्री जातीला देते. कोणत्याही परिस्थितीत न थकता, नव्या उमेदीने काम करत राहिले तर दिवस नक्की पालटतील असा आशावादी विचार जनाबाई व्यक्त करतात. विषय सुखाने विनाश होतो, याबद्दलचा दृष्टांत देताना त्यांनी पतंग या किटकाचे उदाहरण दिले आहे. त्या म्हणतात,

"पतंग सुखावला भारी **।** उडी घाली दीपावरी **॥**

परि तो देहाती मुकला **।** दोही पदार्थी नाडिला **॥**

आपला विनाश होणार हे माहीत असूनही पतंग हा प्रेमापोटी स्वत:चा विनाश ओढवून घेतो, त्याप्रमाणे मनुष्य देखील विषय सुखांच्या मागे धावत राहतो आणि आत्मनाश ओढवून घेतो असे जनाबाई म्हणतात.

१३ व्या शतकात पुरुषप्रधान संस्कृतीत,धर्माचा पगडा असल्यामुळे स्त्रियांचे सर्वच बाबतींत अधिकार हिसकावून घेतलेले होते. घराचा उंबरठा ओलांडणे देखील त्यांच्यासाठी मुश्कील होते. 'स्त्री ही अध्यात्म मार्गातील धोंड असे तिला समजले जात असे. संत जनाबाई हीन जातीत जन्माला आल्याने त्यांना परमेश्वराची भक्ती करण्याचा अधिकार नाही असे जेव्हा त्यांना सांगण्यात आले त्या वेळेस त्या म्हणतात,

"डोईचा पदर आला खांद्यावरी **।** भरल्या बाजारी जाईन मी **॥**

जनी म्हणे देवा मी झाले येसवा **।** रिघाले केशवा घर तुझे **॥**

परमेश्वर भक्तीच्या किंवा 'अध्यात्म मार्गातील धोंड'असे स्त्रियांच्या बाबतीत समजले जाणाऱ्या काळात जनाबाई म्हणतात की, माझ्या भक्तीच्या मार्गात जर कोणी मला आडवले तर मी ठणकावून न घाबरता पुरुषी व्यवस्थेला न घाबरता या कामासाठी जाईन. मग मला अडवणूक करणाऱ्यांशी भांडावे लागले तरी चालेल असे त्या म्हणतात. त्या कळातील त्यांचे हे ठणकावून सांगणे ही स्त्रीवादाची सुरूवात होती असे म्हणणे उचित वाटते. त्या काळात समाजाला ही गोष्ट नक्कीच आवडली नसणार पण जनाचा विचार न करता परमेश्वर भक्ती हे त्यांचे धाडसी कृत्य धाडसी ठरले. जनाबाईंनी त्या काळात आपल्या काव्यातून नितीविचार मांडलेला लक्षात येतो. परस्त्री बद्दल मनात आदर ठेवावा हे सांगताना त्या म्हणतात,

"परधन कामिनी समूळ नाशी मना **।**

नाही रे वासना माया केली**।**

जनाबाईंनी केलेल्या रचना परमार्थ, भक्तीचे माहात्म्य सांगणाऱ्या आहेत. याशिवाय त्या काळातील पुरुषप्रधान व्यवस्थेने महिलांना अनेक बंधनांत अडकवून ठेवले होते,त्याचा विरोध करणाऱ्या आणि त्यासाठी कडक शब्दांत समज देणाऱ्या आणि महिलांची बाजू घेणाऱ्या स्त्री चळवळीच्या प्रवर्तक ठरतात. त्यामुळे आजच्या काळातील महिलांसामोरही त्या स्त्रीवादी म्हणून आदर्श आहेत. त्यांचा खालील लोकप्रिय अभंग म्हणजे पांडुरंगाकडे कोणत्याही प्रकारचा भेदभाव नसून तो सर्वांना सोबत घेऊन जाणारा आहे म्हणजेच वारकरी संप्रदयाने सर्व जाती, धर्म, स्त्री-पुरुष भेदभाव न मानता सर्वांना आपलेसे केले असून आजही हा विचार या पंथात ब्रीद मानला जातो हे स्पष्ट करणारा आहे. त्या आपल्या मधूर शब्दांत म्हणतात.

"विठू माझा लेकुरवाळा
संगे गोपाळांचा मेळा **।**
निवृत्ती हा खांद्यावरी
सोपनाचा हात धरी
पुढे चाले ज्ञानेश्वर
मागे मुक्ताई सुंदर **॥**

जनाबाई या नामदेवांच्या 'दासी'असे स्वत:ला समजतात तर संत बहिणाबाई या आपण तुकारामांच्या आपण शिष्या आहोत असे म्हणतात. ब्राह्मण जातीत जन्माला आलेल्या बहिणाबाईंच्या मुखी तुकोबांचे नाव शोभत नाही असे त्यांना सांगण्यात आले. त्यांनी मात्र आपला भक्तीचा महिमा सुरू ठेवला होता. त्यांना तुकारामांनी स्वप्नात दर्शन दिल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडून गुरुमंत्र घेतला हे बहिणाबाईंच्या पतीस आवडले नाही; त्यामुळे त्याने बहिणाबाईंचा छळ सुरू केला. अशा या प्रतिकूल परिस्थितीवर मात त्यांनी विठ्ठलाची भक्ती केली. तुकोबांच्या काव्याचा त्यांच्यावर प्रभाव दिसून येतो. माणूस आयुष्यात कितीही मोठा झाला तरी त्याच्या अंगी नम्र भाव असला पाहिजे हा यशस्वी होण्यासाठीचा मार्ग सांगताना त्या लिहितात,

"मुंगीचा तो मार्ग सापडे न वाद्या **।**
जरी तो थोर गा जाला बहू **॥**

किंवा ब्राह्मण कोणाला म्हणावे हे त्या काळात सांगताना म्हणतात,

सर्वांभूती एक आत्मा देखियलाई **।** शांतीचा वोतिला मूर्तिमंत **।**
बहिणी म्हणे जैसे आकाश सर्वत्र **।** तैसा तो एकत्र जगामाजी **॥**

जातीचा संदर्भ हा ब्राम्हणाला जन्मजात असतो, हे बहिनाबाईंना मान्य नाही. म्हणून त्या म्हणतात,

बहिणी म्हणे याती नव्हे चि ब्राह्मण
ब्राम्हणाची खून वेगळीच **।**

बहिणाबाईंनी 'वज्रसूची' उपनिषदांचा त्या काळात पुरुषप्रधान संस्कृतीची मक्तेदारी बाजूला सारून अभ्यास केला होता. 'वज्रसूची उपनिषद'हे क्रांतीकारक उपनिषद आहे. त्यात जन्मजात वर्णश्रेष्ठत्वाच्या प्रथेचा विरोध आहे. ब्राम्हणत्व किंवा चांडाळत्व जन्माने ठरत नाही ते कर्माने ठरते. हे बुद्धवचन या उपनिषदाला प्रेरक झाले आहे. लोकसाहित्याचे संशोधक रा. चि. ढेरे यांनी सप्रमाण असे करून दाखवले आहे की, बहिणाबाईने आपले ब्रम्हकर्मपर अभंग या 'वज्रसूची उपनिषदाच्या' आधारेच लिहिले आहे. त्यांच्या मते 'वज्रसूची'ची प्राप्ती कदाचित त्यांना जयराम स्वामींकडून झाली असावी."[५] संत बहिणाबाईंचा वारकरी पंथांच्या प्रगतीचा इतिहास सांगणारा प्रसिद्ध अभंग खालीलप्रमाणे-

"संतकृपा झाली इमारत फळा आली
ज्ञानदेवे रचियेला पाया **।** उभारिले देवालया **॥**
नामा तयाचा किंकर **।** तेणे रचिले ते आवार **।**
जनार्दन एकनाथ **।** खांब दिधला भागवत **।**

तुका झालासे कळस **।** भजन करा सावकाश **।**

बहिणी म्हणे फडकती ध्वजा **।** निरुपण केले वोजा**" ॥**

भागवत धर्माची परंपरा सांगणारा हा अभंग उल्लेखून डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात की, "एवढा एकच अभंग लिहूनही बहिणाबाईंची कीर्ती अमर व्हावी इतके त्यांचे मोल आहे."[६] बहिणाबाईंचे आत्मबळ मोठे होते.गुरूची छाया,पाठराखण तशी त्यांना फार मिळाली नाही. त्यांनी स्वतःला घडविले. स्वत:चा विकास केला म्हणून ती स्वयंसिद्धा आहे. त्यामुळे बहिणाबाई आजही कौतुकास पात्र आहे. डॉ. ना. ग. जोशी म्हणतात, " मराठी संतांच्या काव्य रचनेची फडकती ध्वजा म्हणूनही बहिणाबाईंचा उल्लेख मराठी साहित्याच्या इतिहासात होणे क्रमप्राप्तच आहे."[७]

संत कवयित्रींचे काव्य म्हणजे तत्कालीन अन्य स्त्रियांचे मनोबळ वाढविण्यासाठी प्रेरक संजीवनी म्हणता येईल. संत रामदासांच्या सहवासाने ज्या संत कवीच्या आयुष्याला वेगळे वळण लागले त्या म्हणजे संत वेणाबाई. मिरज या ठिकाणी या संप्रदायाचा मठ त्यांनी पुढे चालवून रामायण आणि महाभारत या काव्यांचा आधार घेत त्यांनी आपल्या रचना लिहिल्या.रामायणावर पाच कांडे त्यांनी रचली आहेत. त्यांनी रचलेले 'सुंदरकांड' हे काव्य उजवे ठरले आहे. रामायणाचा सखोल अभ्यास त्यांनी केला होता हे त्यातून लक्षात येते. वेगवेगळ्या रसांचा, अलंकारांचा उपयोग त्यांनी आपल्या काव्यात केला. संगीताचे उत्तम ज्ञान त्यांना होते. आपले समग्र जीवन त्यांनी रामायणाचा महिमा सांगणाऱ्या काव्य रचनेवर व्यथित केला. वास्तविक संत वेणाबाई या बालविधवा होत्या तरीही न डगमगता आपले आयुष्य त्यांनी परमेश्वराचे नामस्मरण करत परमार्थपर चिंतनात घालविले.

संत कान्होपात्रा शामा या गणिकेची मुलगी. परंपरागत गणिका या व्यवसायाला नकार देण्याचे धाडस तिच्यात भक्तीच्या माध्यमातून आले होते. 'चूल आणि मूल' या परंपरागत स्त्रीच्या वाट्यास आलेल्या विचारसरणीला कान्होपात्रेने नकार दिलेला लक्षात येतो. परंतु त्या काळातही वेश्येच्या जीवनात ना संसाराचा आनंद ना परमेश्वर भक्ती करण्याचा अधिकार. अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी विठ्ठलाचे नामस्मरण करण्यास सुरुवात केल्याने त्यांना समाजाचा विरोध झाला. त्या व्यथीत मनाने म्हणतात,

"मी तो आहे यतीहीन **।**
न कळे काही आचरण
याती शुद्ध नाही भाव **।**
दृष्ट आचरण स्वभाव **।**

असा आत्मनिषेध त्या व्यक्त करतात. त्यामध्ये असहायता लक्षात येते.

कान्होपात्रा या दिसायला सुंदर होत्या. बेदरच्या बादशहाच्या कामवासनेच्या त्या लक्ष्य ठरल्या. पण बादशहाला आपला देह देण्यापेक्षा त्यांनी मरण पत्करले आणि आपले सत्व राखले.या संत कवयित्रीने केलेले हे बलीदान मराठी कवितेच्या इतिहासात चटका लावून जाणारे आहे. आध्यात्मिक साधना, भक्तीच्या मार्गावर त्यांनी देहविक्रीच्या पारंपारिक व्यवसायावर मात केली. हे त्यांच्यातील मतपरिवर्तन महत्वाचे वाटते. नवऱ्याचे दास्यत्व नाकारून त्यांनी ईश्वराचे दास्यत्व स्वीकारले हा त्यांच्या जीवनातील प्रसंग प्रेरणादायी ठरतो. आपल्या अभंगात 'कान्होपात्रा तुझी दासी' असा स्वतः चा उल्लेख त्या करतात. स्त्री लंपट पुरुषांचा त्यांनी निषेध केला आहे. हे सांगताना त्या म्हणतात –

"विषयाचे संगती **।** नाश पावले निश्चिती **।**
भगे पडले इंद्राला **।** भस्मासूर भस्म झाला **॥**
चंद्र लागला कलंक **।** गुरुपत्नीशी रतला देख **।**
रावण मुकला प्राणाशी **।** कान्होपात्रा म्हणे दासी **॥"**

वरील पुरुषांचे दाखले देत विषय सुखाचा अतिरेक विनाशाकडे कसा घेऊन जातो हे त्या लक्षात आणून देतात. स्त्री संतानी आपल्या काव्यातून आध्यात्मिक विचारांतून समाजात आधुनिक विचार रुजविण्याचे कार्य केले आहे. सोबत स्त्रियांच्या विकासासाठी नवीन विचार त्या अभंगांतून मांडतात. जातीप्रथा समाजात त्या काळात घट्ट रुजलेली असल्याने प्रसिद्ध संत चोखोबा आणि त्यांची पत्नी सोयराबाई यांनी आपल्या कवितेतून जातीबद्दलचे दाखले देत त्यातून याबद्दलचे वैषम्य व्यक्त केले

आहे. 'संसार सुखाचा होईल निर्धार । नामाचा गजर सर्वकाळ' अशी त्यांनी संसाराला भक्तीची जोड देऊन तो गोड मानून घेतला. 'चोख्याची महारी' असे सोयराबाई स्वतः चा उल्लेख करत. संत चोखाबांचे संपूर्ण कुटुंब हे विठ्ठलाच्या भक्तीला आसूसलेले होते. सोयराबाईंचा भाऊ बंका याचे लग्न चोखोबांची बहिण निर्मळा यांच्याशी झाले होते. हीन जातीत जन्माला आल्यामुळे त्यांना सामाजिक अपमान व अवहेलनांना त्यांना सामोरे जावे लागले. 'पंढरीचे ब्राम्हणे चोख्याशी छळिले'अशी दुखरी नोंद त्या आपल्या कवितेत करतात. देवाच्या पायरीजवळ आपली जागा आहे,आपल्याला मंदिरप्रवेश नाही, ही खंत त्यांच्या मनात आहे.

"अवघा रंग एक झाला **।** रंगी रंगला श्रीरंग **॥**

विटाळाचे होते जाळे **।** तुटले बळे नामाच्या **।**

असा नामसाधनेचा परिणाम संत सोयराबाई सांगतात.

जात, धर्म, पंथ, लिंग या सर्वांच्या भिंती पार करून वारकरी समाजाने सर्वांना विठ्ठल भक्तीच्या प्रवाहात सामील करून घेतले. महाराष्ट्रात आध्यात्मिक लोकशाहीचा पाया संत ज्ञानेश्वरांनी घातला. स्त्री संतानी ही लोकशाही सर्वदूर कशी पोहचेल, रुजेल यासाठी प्रयत्न केलेले लक्षात येते. वारकरी संप्रदायाला बळकटी देण्याचे कार्य या स्त्री संतांनी आपल्या काव्याच्या आधारे केले आहे हे निदर्शनास येते. स्त्री संत महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, वेणाबाई, कान्होपात्रा आणि संत सोयराबाई यांच्या काव्यांतील विचार स्त्री जीवनाला बळकटी देणारा, आत्मभान जागृक करणारा आहे. 'स्त्रियांचे सक्षमीकरण' आणि स्त्रीवादी समीक्षेला उपयुक्त असा आधुनिक विचार या स्त्री संतानी आपल्या काव्याच्या आधारे १३ व्या शतकापासून तर १६ व्या शतकापर्यंत आपल्या काव्यरचनांतून व्यक्त केलेला लक्षात येतो. या संत कवयित्रींच्या अभंगांत स्त्रियांच्या भावभावनांचे चित्रण जसे येते; तसेच स्त्रियांच्या व्यथा, वेदना आलेल्या दिसतात. संसाराचे दु:खमय स्वरूप संत पुरुषांना जाणवलेले होते, पण त्याचे स्वरूप वेगळे होते. अशा स्थितीत या स्त्रियांनी जिद्दीने त्यावर मात करून अध्यात्माच्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली हे देखील महत्वाचे ठरते.

संदर्भ :

१ देशपांडे प्रकाश,संत कविता एक दृष्टिकोन (२००६),स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद,पृष्ठ १३

२ उपरोक्त, पृष्ठ १३,१४

३ उपरोक्त, पृष्ठ १५

४ म्हाइंभट 'श्रीगोविंदप्रभु -चरित्र' संपा. वि. भि. कोलते, (१९६०) मलकापूर,पृष्ठ ७५

५ ढेरे रा. चि. , संतसाहित्य आणि लोकसाहित्य काही अनुबंध (१९७८) पुणे, पृष्ठ १०३

६ तुळपुळे शं. गो. महाराष्ट्र सारस्वत पुरवणी,मुंबई (१९६३) पृष्ठ ८६९

७ जोशी ना. ग. मराठी वाड.मयाचा इतिहास,खंड दुसरा भाग १ ला,पुणे (१९८२) म. सा. प. पृष्ठ ४०२

मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा - बहिणाबाई चौधरी -एक अभ्यास

मार्गदर्शिका
मा. डॉ. धूत यु. एम.
प्राचार्या, शासकीय अध्यापक
महाविद्यालय, नांदेड

संशोधक विद्यार्थी
श्री वारुळकर प्रदीप मुरलीधर
शिक्षणशास्त्र संकुल
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड

सारांश -

बहिणाबाई चौधरी यांचे साहित्यविषयक योगदान महत्त्वपूर्ण आहे बहिणाबाई चौधरी यांचा उल्लेख खानदेश कन्या, निसर्ग कन्या म्हणून केला जातो ग्रामीण भागात एका स्त्रीच्या मुखावाटे बाहेर पडलेली 'गीतमय वाणी' म्हणजे 'बहिणाबाईची गाणी' होय.

कवी जन्मावा लागातो तो घडविला जात नाही कवी किंवा कवयित्रीला परमेश्वराची दैवीशक्ती, 'प्रतिभा' लभलेली असते 'प्रतिभाशक्ती' ही एक परमेश्वर दत्त, नैसर्गिक शक्ती होय. या प्रतिभाशक्तीची प्रचिती बहिणाबाई चौधरी आणि त्यांच्या काव्यातून दिसून येते. कवयित्री बहिणाबाई चौधरी याची गाणी ही जीवनानुभुतीतून निर्माण झालेली आहेत. त्यांना आयुष्यात जे भोगल व जगल्या तेच त्यांच्या वाणीतून प्रकट झाले आहे. बहिणाबाईनी घर, समाज, निसर्ग, परमेश्वर भक्तीत जे अनुभवले ते त्यांच्या मुखी काव्यरुपात उमटले आहे. बहिणाबाइरंनी काव्यलेखन करावे या हेतूने काव्यरचना केल्या नाहीत, तर सहज व उत्स्फूर्त अशी ही काव्यनिर्मिती झाली आहे .

प्रस्तुत शोध निबंधात बहिणाबाई चौधरी यांचे जीवन कार्य, कौटुंबिक संदर्भ जागवणारी कविता, ग्रामीणता: बहिणाबाईच्या कवितेचा स्थायीभाव, सणामुळे ग्रामीण जीवनाला येणारे उधाण, साथीच्या रोगांमुळे गावावर पडणारे मृत्यूचे सावट, चिंतनपरता हा बहिणाबाईच्या कवितेचा स्थायीभाव, बहिणाबाईच्या कवितेतील विनोदाचे स्वरुप इ. घटकांचा अभयास केलेला आहे.

प्रस्तावना -

बहिणाबाई चौधरी यांची कविता म्हणजे मराठी साहित्य विश्वातील एक चमत्कार आहे. ही कविता प्रकाशित झाल्यापासून तिने अनेकांना वेड लावले आहे. यात समाजातील सर्व प्रकारचे लोक आहेत. विध्दत्तेचा टेंभा मिरविणारे लोक बहिणाबाईच्या कवितेचे रसिक आहेत. त्याच प्रमाणे सामान्य रसिकही त्यांच्या कवितेचे चाहते आहेत. पिढया बदलल्या, रसिक बदलले तरी कवितेची मोहिनी मात्र ओसरली नाही. ज्या ग्रामजीवनातून ही कविता फुलली ते ग्रामजीवन बदलले, तरीही बहिणाबाईच्या कविता आपल्या मनावर अचल आहे. अजूनही रसिक मनाला नवनवे प्रत्यय देण्याचे सामर्ध्य त्यांच्या कवितेत आहे. एका प्रकारे मराठीतील हे अक्षर वाड्.मय आहे. म्हणून मराठी साहित्य जोपर्यंत राहील, तो पर्यत बहिणाबाइरंची कविता रसिक मनाला मोहिनी घालीत राहील यात काही शंका नाही.

गरज -

मराठी साहित्य अतिशय समृध्द आहे. मराठी साहित्य समृध्द करण्यासाठी अनेक लेखक, लेखिका यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. कथा, कविता, कादंबरी, चरित्रे, आत्मचरित्रे, समीक्षा, पोवाडे, भारुड, ओवी, लोकगीते, इ. च्या माध्यमातून मराठी साहित्य समृध्द होत आहे. मराठी साहित्य समृध्द होत असताना पुरुषा बरोबर स्त्रियांचे स्थानही महत्त्वपूर्ण आहे. मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा अभ्यास होणे गरजेचे आहे. कारण मराठी साहित्य समृध्द करण्यापाठीमागे स्त्रीयांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. यामध्ये प्रामुख्याने लक्ष्मीबाई टिळक, गोदावरी परुळेकर, सुनिती देशपांडे, मधू भंडारी, ज्योत्स्ना कदम, शांताबाई कांबळे, दुर्गा भागवत, शांता शेळके, कांचन घाणेकर, साधना आमटे, यशोदा पाडगावकर, सरोजिनी

बाबर, वासंती गाडगीळ , दुर्गा खोटे, सीमा देव, लालन सारंग, अनुताई वाघ, जयश्री गडकर, विद्या माडगूळकर यांची आत्मकथने प्रकाशित झालेली आहे. यामुळे मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

महत्त्व -

कवी जन्मावा लगतो तो घडविला जात नाही. कवीला परमेश्वराची प्रतिभाशक्ती लाभलेली असते. असेच एक प्रतिभाशक्ती कवयित्री म्हणजे बहिणाबाई चौधरी. बहिणाबाई कोणत्याही शाळेत गेल्या नाहीत. अशिक्षिस असूनही त्यांनी काव्यरचना केली. रोजचे जगणे हीच त्यांची शाळा होती. या शाळेने त्यांना भरपूर ज्ञान दिले. दिवसभर घरात, शेतात, निसर्गात, समाजात असताना त्यांनी आलेल्या अनुभवातून त्यांना काव्य सुचले. पहाटेच्या वेळी जात्यावर दळण दळताना त्यांच्या गळयातून ओव्या बाहेर पडायच्या. या ओव्या मराठी साहित्यात 'बहिणाबाईची गाणी' म्हणून अजरामर झाल्या आहेत. मराठी साहित्यातील बहिणाबाई चौधरी यांची काव्यरचना महत्तवपूर्ण आहे. म्हणून या काव्यरचनेचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. बहिणाबाई चौधरी यांनी निर्माण केलेली गाणी / काव्यरचना ही त्यांची भावोक्ती आहे.

उद्दिष्टये-

१ बहिणाबाई चौधरी यांच्या जीवन कार्याचा अभ्यास करणे.

२ बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यरचनेतील ग्रामसंस्कृती, निसर्ग, तत्त्वज्ञान व स्त्री जीवन यांचा अभ्यास करणे.

माहिती संकलन साहित्य -

माहिती संकलनासाठी दुय्यम स्त्रोत हे साधन वापरलेले आहे यामध्ये बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यरचनेवर लिहिलेली पुस्तके वापरली आहेत.

पध्दती-

बहिणाबाई चौधरी यांचा कालखंड २४ ऑगस्ट १८८० ते ३ डिसेंबर १९५१ असल्यामुळे ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब केला आहे.

बहिणाबाई चौधरी यांचे जीवन कार्य-

बहिणाबाईचा जन्म 'आसोदे' या गावी झाला २४ ऑगस्ट १८८० ही त्यांची जन्म तारीख त्या दिवशी नागपंचमी होती. बहिणाबाईच्या वडिलाचे नाव 'उखाजी' महाजन होते. आईचे नाव 'भिगाबाई' होते. त्यांचे घराण प्रसिध्द होत. श्रीमंतही होते. गावात मानसन्मान होता. सल्लामसलतीसाठी लोकांचं त्यांच्या घरी सतत येण जाण असे. आई वडिलांबद्दल बहिणाबाईना अतिशय अभिमान होता. आपल्या ओव्यांमधून माहेर, नातीगोती, यांची महती त्यांनी गायली आहे.

बहिणाबाईना तीन भाऊ होते. घनःशाम, गणपत आणि धनाजी ही त्यांची नावं एकजण शेती करीत होता. एक धार्मिक कार्यात पुढाकार घेत होता. तर एक जण धुळयात शिक्षण घेत होता. सीता, तुळसा आणि अहिल्या अशी त्या बहिणीची नाव होती. त्यांच्या बहिणी खाऊन पिऊन सुखी घरात दिलेल्या होत्या.

वडिलांना गावात मान होता. आर्थिक परिस्थिती देखील उत्तम होती. सतत माणसांनी गजबजलेल्या भरल्या घराचा बहिणाबाईना अतिशय अभिमान होता. आपल्या अनेक ओव्यांमधून बहिणाबाईनी आपल माहेर साकारले आहे.

रातदिन गजबज
असं खटल्याचं घर
दा आबादी आबाद
माझ असोदं माहेर.

बहिणाबाई चौधरी या मराठी कवयित्रिने कोणत्याही शाळेत जाऊन अक्षरे गिरवली नाहीत. रोजचं जगण हीच त्यांची शाळा होती. या शाळेनं त्यांना भरपूर ज्ञान दिलं. दिवसभर घरा- शेतात राबताना अनेक गोष्टी मनात घट्ट रुतायच्या. त्या

पहाटेला जात्यावर दळण दळताना गळयातून ओव्या बनून बाहेर पडायच्या. या ओव्या आज मराठी साहित्यात 'बहिणाबाईची गाणी' म्हणून अजरामर झाल्या आहेत. वयाच्या तेराव्या वर्षी जळगावचे खंडेराव चौधरी यांचे पुत्र नथुजी चौधरी यांच्याशी बहिणाबाईचा विवाह झाला. बहिणाबाईचे सासर एक मोठे खटल्याचे घर होते. एकत्र कुटुंब पध्दती होती. घरातील वातावरण कौटुंबिक होते. घरातील स्त्री प्रमुख म्हणजे त्यांची सासुबाई त्यांची सर्व कुटुंबावर माया होती. बहिणाबाई त्यांचा सासूविषयी म्हतात -

खटल्याचं घरमधी
देखा माझी सग्गी सासू
सदा पोटामधी माया
तसे डोयामधी आसू
हिच्या अंगामधी देव
सभावनं देवगाय
माले सासरी मियाली
जशी जल्मदाती माय

बहिणाबाई चौधरी यांच्या जीवनातील अत्यंत दुःखद घटना म्हणजे त्यांचे पती नथुजी यांचे अकस्मात निधन. त्यानंतर संसाराची जबाबदारी बहिणाबाईवर आली. शेती बटाईने दिली. शेती कसणारा जे उत्पन्न देईल ते घ्यायाचे नव-याने करुन ठेवलेले कर्ज फेडता फेडता नाकीनऊ येवू लागले. सावकार यायचा आणि कर्जावरील व्याज घेवून जायचा. मुद्दल मात्र तसेच असावयाचे. पतीच्या निधनानंतर त्यांची आर्थिक व प्रापचिंक ओढाताण झाली. परंतु त्यांनी त्याचा सामना खंबीरपणे केला.

बहिणाबाई जीवनातील संघर्ष चालू असतानाच दुष्काळ पडला. घरातील अन्नधान्य साठा संपला दुष्काळग्रस्तांसाठी जळगाव जवळ मेहरुण तलावाचे काम सुरु झाले. तलावाच्या ठिकाणी खडी फोडण्याचे काम करु लागल्या त्यावर त्यांनी कुटुंबाची गुजराण करावी लागली.

बहिणबाई वयाच्या सत्तरीला पोहोचल्या. शरीर थकलेले होते. डोळयांनाही दिसत नव्हते. डोक्यांचे ऑपरेशन झाल्यावर त्यांनी नातवंड पाहिले. बहिणाबाई चौधरी यांचा जीवनाचा शेवट सोपानदेव चौधरी यांच्याच शब्दांत, समोरच बाजेवर आई होती. तिच्याजवळ मी बसलो आणि बोललो, "तू औषधासारखा येते असं तू म्हणाली होतीस, आता तू बरी होशील" आई खिन्नपणे हसली आणि म्हणाली औसाद ठिकनावर ! आगीन देवच ! माझ्या पोटात धस्सं झाले. काही वेळाने आईने शेवटाचे श्वास घेतला.

बहिणीबाईच्याच शब्दात

आला सास गेला सास
जीवा तुझंरे तंतर
अरे जगनं मरनं
एका सासाचं अंतर !

बहिणाबाई चौधरी यांचा मृत्यू ३ डिसेंबर १९५१ रोजी झाला. बहिणाबाईना सर्वात कशाची जास्त चीड असेल तर ती माणसाच्या स्थार्थातून निर्माण झालेल्या त्याच्या कृतघ्नपणाची ! त्या माणसाला संतापून म्हणतात. माणसा, तुला नियत नाही रे. तुझ्यापेक्षा ते गोठयातले जनावर बरे. गाय न् म्हैस चारा खाऊन दूध तरी देतात. तुझे पोट भरले, की तू उपकार साफ विसरुन जातोस. कुत्रा आपले शेपूट इमानीपणाच्या भावनेने हालवतो. तर माणसा, तू आपली मान मतलब साधण्यासाठी

डोलावतोस, केवळ लोभामुळे तू माणूस असूनही कापूस म्हणजे पशू झाला आहेस. एवढे सांगून झाल्यानंतर बहिणाबाईनी माणसाला तळमळून विचारले आहे.

मानसा मानसा,

कधी व्हशील मानूस !

मानवतेलाच जणूकाही त्यांनी हे व्याकुळ हृदयाने आवाहन केले आहे ! स्वार्थाचा वणवा सर्व जगभर आज पसरलेला आहे. माणसे पशू होऊन एकमेकांशी झगडत आहेत. मानवता आज रक्तबंबाळ झाली आहे. म्हणूनच माणसा, माणसा, कधी होशील माणूस? हीच आर्त हाक मानवतेच्या कल्याणासाठी तळमळणा-या संतमहात्म्यांच्या मानवजातीपुढे आज उभी आहे. हया समस्येचा साक्षात्कार बहिणाबाईसारख्या खान देशातील एका अशिक्षित शेतकरी महिलेला व्हावा हा तिच्या प्रतिभा सामर्थ्याचा केवढा पडताळा आहे !

कौटुंबिक संदर्भ जागवणारी कविता -

बहिणाबाईंची कविता आपले कौटुंबिक जीवनसंदर्भ जागवतानाच ग्रामीण विभागातील कौटुंबिक जीवनाची सहज चित्रणे रेखाटू लागते. ग्रामीण स्त्रीमनाला आपले कौटुंबिक विश्व लाखमोलाचे वाटते. माहेरच नव्हे तर माहेराची वाटही, तिला त्याचे विशेष अपरूप वाटते. तसेच एखादी सासुरवाशीण त्यांच्या कवितांतून अनेकदा येथे तिथे डोकावताना दिसते. 'आखर्जी' या कवितेतही माहेर आणि सासर यांच्यांत हिंदोळत असलेले तरुण ग्रामीण विवाहिताचे चित्र पहावयास मिळते. ग्रामीण स्त्रीमनाला आपल्या माहेरची सगळीच माणसे कशी मोठी वाटतात हे 'माहेर' या कवितेत पहावयास मिळते.

'बापाजीच्या हायलीत

येती शेट शेतकरी

दारी खेटराची रास

घरी भरली कचेरी'

अगदी मोजक्या शब्दांत मर्मज्ञ व्यक्तिचित्रे रेखाटणे ही बहिणाबाईंच्या प्रतिभेची सहज क्रीडा आहे .

'माय भीमाई माउली

जशी आंब्याची साऊली

आम्हाईले केलं गार

सोता उन्हात तावली'

'माझी माय सरसोती ' -

ही बहिणाबाईंची त्यांच्या काव्यनिर्मितीचे रहस्य उलगडणारी एक कविता होय. तुकारामादी संतांनी आपल्या काव्यनिर्मितीचे श्रेय जसे परमेश्वराकडे सोपविले आहे. तसेच बहिणाबाईही आपल्या कवितेच्या मागे ईश्वरी प्रेरणा असल्याचे येथे नमूद करतात. 'बोलविता धनी वेगळाची' असे संत तुकारामांना वाटते. तसेच बहिणाबाईंनाही माता सरस्वती आपल्याला बोली शिकविते असे वाटत राहते. संत कवितेच्या मागील ईश्वराच्या आशीर्वादाचा फक्त निर्देश करतात. पण बहिणाबाई मात्र ह्या परमेश्वरी वरदानामुळे आपल्या मनातून कवितांचे पिक कसं येतं हे दर्शविण्यावर अधिक भर देतात.

ग्रामीणता : बहिणाबाईंच्या कवितेचा स्थायिभाव -

वस्तुत : बहिणाबाईंची कविता ही अर्वाचीन मराठीतील पहिली ग्रामीण कविता होय. ती या अर्थाने की, ती ग्रामीण जीवनातूनच मोहोरून आली आहे. या कवितेतून ग्रामीण जीवन अंतर - बाह्य रसरसलेले आहे. ही कविता ग्रामीण जीवनाच्या लहानखुऱ्या वर्तुळातच उगम पावत असली तरी तिच्या श्रेष्ठतेच्या आड मात्र ते येत नाही. उलट त्यामुळे या कवितेला तिचा सूर सापडला आहे. 'आत्मा' सापडला आहे असेच म्हणावेसे वाटते. ग्रामीण जनजीवनातूनच बहरू शकेल अशी बहिणाबाईंची

कविता असल्याने तिला तिच्या जन्मकाळीच पृथगात्मकता लाभलेली आहे. विशेष म्हणजे ग्रामीण काव्यरचनेचा कोणताही आदर्श दृष्टिसमोर नसूनही बहिणाबाईने अत्यंत सहजतेने, आत्मविश्वासाने व अधिकारवाणीने ही कविता लिहिली. कवितेच्या या वाटचालीत तिला संतकाव्य जसे साह्यकारी ठरले, तसेच परंपरेने चालत आलेल्या खानदेशी - वऱ्हाडी लोकगीतांचीही सोबत लाभली. ही बोली सुजाण चिंतनशील मनातील काव्यात्म जाणिवा व्यक्त करण्याचे सामर्थ्य संपादून सिद्ध झालेली होतीच. तिला बहिणाबाईंसारख्या तरल, संवेदनशील व चिंतनशील मनाची जोड लाभली. त्याक्षणी वऱ्हाडी खानदेशी भाषेचे, काव्याभिव्यक्तीचे सामर्थ्य एवढे उंचावले की, सामान्य रसिकांनाच नव्हे तर चोखंदळ समीक्षकांनाही तिने आपले काव्यविषयक सिद्धांत पुन्हा एकदा तपासून घेण्यास भाग पाडले. समर्थ भाषेला समर्थ प्रतिभावंत लाभताच नवनिर्मितीचा जो चमत्कार घडून येतो, त्याची प्रतीती बहिणाबाईंच्या कवितेत येऊ शकेल. बहिणाबाई काव्य करताना कुठेही अडखळत असलेल्या, शब्दांसाठी थांबलेल्या अशा दिसत नाहीत. याचे कारण त्यांचे म्हणून जे एक अनुभवविश्व होते, त्या अनुभवविश्वाची म्हणून जी काही भाषा होती ती त्यांना पूर्णत:परिचित होती, नव्हे त्यावर त्यांचे प्रभुत्व होते. म्हणूनच त्यांच्या कवितेच्या हातात भाषा हवी तशी वाकते, आकार घेते व अर्थाभिव्यक्ती साधते. या अर्थांनी बहिणाबाई या भाषाप्रभूच ठरतात.

सणांमुळे ग्रामीण जीवनाला येणारे उधाण -

ग्रामीण जीवनात काही विशिष्ट सणांना फार मोठे महत्त्व प्राप्त झालेले असते. त्यातील महत्त्वाचे सण म्हणजे' गुढीपाडवा', 'अक्षयतृतीया' व 'पोळा' होय. यापैकी 'पोळा' हा वस्तुत: बैलांचा सण. पण या दिवशी ग्रामीण माणसं बैलाला सजवून, मिरवून, त्यास गोडधोड खावयास घालून त्याचे केवढे कौतुक करतात, हे पाहण्यासारखे आहे. जगाच्या पाठीवर भारतात आणि तेही महाराष्ट्रातील ग्रामीण भागात विशेषत्वाने बैलासारख्या अवघ्या जीवनाचा आधार असणाऱ्या पशूसाठी माणूस सण साजरा करतो. मराठी माणसाला नित्य परिचयाची असणारी या दिवशीची दृश्ये बहिणाबाई केवढ्या सहजतेने चित्रित करतात ते पहा-

'आला आला शेतकऱ्या
पोयाचा रे सन मोठा
हाती घेईसन वाट्या
आता शेंदूराले घोटा
आता बांधा रे तोरनं

आणि साथींच्या रोगांमुळे गावावर पडणारे मृत्यूचे सावट-

बहिणाबाईंची कविता ही पूर्णार्धाने ग्रामीण आहे. इतकी अस्सल ग्रामीण कविता कोणत्याही अर्वाचीन मराठी कवीच्या लेखनात आढळत नाही. ग्रामीण जीवनातील सण ग्रामीण मनाला उधाण आणतात तर साथीचे रोग त्यांच्या मनाला मरगळ आणतात. म्हणूनच सणांइतकेच बहिणाबाईला लोकजीवनाला त्रस्त करणाऱ्या साथींच्या रोगांचे वर्णन करावेसे वाटते. म्हणूनच 'पिलोक' व 'खोकली माय' हे त्यांच्या कवितेचे विषय झालेले दिसतात.

'पिलोक पिलोक
आल्या पिलोकाच्या गाठी
उजाडलं गाव
खया मयांमधी भेटी

चिंतनपरता हा बहिणाबाईंच्या कवितेचा स्थायिभाव -

बहिणाबाईंची कोणतीही कविता घ्या तिचे मूळ तिच्या अखंड चिंतनाचा निर्देश करताना दिसते. बहिणाबाई हे जसे अखंडपणे निसर्गात रमलेले मन आहे तसेच ते अखंड चिंतनातही हरवलेले आहे. म्हणूनच त्यांच्या कविता सातत्याने त्यांच्या

चिंतानुभवांचा आविष्कार करीत राहतात. 'कशाले काय म्हनू नही', 'संसार', 'माझ्या जीवा', 'घरटं', 'मन', 'हिरीताचं देन घेन', 'लपे करमाची 'रेखा', 'आता माझा माले जीव', 'देव दिसला देवं कुठे' इत्यादी कविता बहिणाबाईंच्या सहज व अखंड चिंतन प्रकृतीची वैशिष्ट्ये व्यक्त करतात. 'कशाले काय म्हनू नही' या कवितेत बहिणाबाई वस्तूंचे, व्यक्तींचे, प्रवृत्तींचे, अनुभूतींचे अशारीतीने चराचरातील नजरेत भरलेल्या बाबींचे त्यांना जाणवलेले रहस्य व अर्थ सांगतात.'

बिना कपाशीनं उले
त्याला बोंड म्हनू नही
हरी नामाईना बोले
त्याले तोंड म्हनू नही.

बहिणाबाईचे नाव अजरामर करणाऱ्या त्यांच्या काही कवितांतील एक श्रेष्ठ कविता म्हणजे 'संसार' होय. बहिणाबाईंनी आधी संसार केला आणि मग संसाराचे रहस्य या कवितेत सांगितले. त्यांचे अनुभवी मन जणू माणसाला संसारातील सुखाचे रहस्य सांगू लागते. या संपूर्ण कवितेतूनच संसारिक माणसाला पदोपदी, क्षणोक्षणी सुखदु:खाचे जे गहिवर येतात ते चित्रित झाले आहेत. संसार सुखाचा व्हायचा असेल तर माणसाने त्यास कसे सामोरे जावे याचा ही कविता म्हणजे जणू वस्तुपाठच होय.

'अरे संसार संसार
जसा तवा चुल्यावर
आधी हाताले चटके
तव्हा मियते भाकर ...

बहिणाबाईच्या कवितेतील विनोदाची स्वरूप-

बहिणाबाईंची 'भिवराई ' नावाची सासू गमतीचे बोलणे बोलत असे. ती इतरांना इतकी हसवत असे की, 'हाशीसन आवघ्याचं पोट गेलं फुटीसन' अशी तिच्या आजूबाजूला बसलेल्या मंडळींची स्थिती होत असे. या भिवराईच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणाऱ्या बहिणाबाईने सहजत: विनोदाचे मर्मही सांगून टाकले आहे.

'नाव ठेये आवघ्याल
करे सर्व्यांची नक्कल
हासवता हासवता
शिकवते रे अक्कल'

'जो माणसाला हसवता हसवता अक्कल शिकवितो तोच खरा विनोद' हे विनोदाचे तत्त्वज्ञानच बहिणाबाई शिकून जातात.

बहिणाबाई व त्याच्या कवितेचे काही पैलू / वैशिष्टये -

१) बहिणाबाई या लौकिक जीवनाचा समर्थ आविष्कार करणारी अलोकिक कवयित्री होत्या.

२) बहिणाबाईचे जीवन एखाद्या नितळ तळयासारखे होते.

३) बहिणाबाईचे व्यक्तिमत्त्व कणखर असले तरी, ते मोठे श्रध्दाशीलही आहे.

४) जीवनाकडे मिश्किल दृष्टीने पाहणे हे बहिणाबाइरंच्या कवितेचे एक वैशिष्टये आहे.

५) तत्त्वदर्शन हे बहिणाबाईच्या कवितेचे एक महत्त्वाचे वैशिष्टये आहे.

६) बहिणाबाई या श्रेष्ठ प्रतिभावंतापैकी एक आहेत.

७) बहिणाबाईच्या कवितेतून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन होते.

८) बहिणाबाई आशिक्षत असूनही अहिराणी भाषेवर त्याचे प्रभुत्व होते.

९) बहिणाबाईची भाषा छापील ग्रंथाची भाषा नसून जीवनग्रंथाची भाषा आहे.

१०) बहिणाबाई चौधरी यांनी निर्माण केलेली काव्यरचना / गाणी ही त्यांची भावोक्ती आहे.

११) बहिणाबाई चौधरी काव्यरचना सहज स्फुर्त आहे.

निष्कर्ष-

१) बहिणाबाई यांना जीवनात जे अनुभव आले त्यावर त्यांना काव्य सुचलेले आहे.

२) कुटुंब, समाज, निसर्ग यामध्ये जे त्यांनी अनुभवले तेच त्यांच्या मुखी आलेले दिसून येते.

३) बहिणाबाइरंचे काव्य विविधागी व विषयानुसारी आहे.

४) बहिणाबाईच्या काव्यातून उत्तर महाराष्ट्रातील कृषीकेंद्रीत ग्रामीण संस्कृतीचे दर्शन होते.

५) बहिणाबाईनी त्यांच्या मनातील भाव - भावना स्वत: च्या बोली भाषेतून व्यक्त केल्या आहेत.

६) अशिक्षित असून त्यांनी काव्य रचना केली आहे.

७) मानव, निसर्ग, भूमाता, कष्ट यावर बहिणाबाईचे प्रेम आढळते.

८) बहिणाबाई यांचेकडे सूक्ष्म निरीक्षण शक्ती होती

९) बहिणाबाई यांच्या काव्यनिर्मितीत उत्तर महाराष्ट्रातील बोलीभाषेचे सामर्थ्य आढळते.

समारोप-

बहिणाबाई यांचे साहित्यविषयक योगदान महत्त्वपूर्ण आहे. बहिणाबाई चौधरी यांचा उल्लेख खानदेशकन्या, निसर्गकन्या म्हणून केला जातो. ग्रामीण भागातील एका स्त्रीच्या मुखावाटे बाहेर पडलेली गीतमय वाणी म्हणजेच 'बहिणाबाईची गाणी' होय. बहिणाबाईनी आयुष्यात जे अनुभवले तेच त्यांच्या काव्यात दिसून येते. बहिणाबाई चौधरी यांचा जीवनात भूमाता, माती, चिखल, पाणी यांना महत्त्वाचे स्थान आहे मातीचा चिखल अंगावर उडला म्हणजे तो भूमातेन दिलेला प्रसाद आहे. असं मानणा-यातल्या बहिणाबाई चौधरी एक होत्या. माती आणि पाणी याशिवाय निसर्गाचा जन्म होऊ शकत नाही. याबाबत बहिणाबाई चौधरी याचे ज्ञान उच्चपातळीवरचे आहे.

मानसा, मानसा

कधी व्हशीन मानूस !

मानरतेला त्यांनी दिलेल्या हया अमर संदशाने तर मराठी वाड्.मयात त्यांचे स्थान अढळच करुन ठेवलेले आहे.

संदर्भ सूची-

१) चिडगोपकर अ. अर्वाचीन मराठी कवयित्री (प्रथमावृत्ती) स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे . पान क्र. २४५, २४६, २५४, २५६, २५७, २६१

२) कोत्तापल्ले, ना. मराठी कविता : आकलन आणि आस्वाद (प्रथमावृत्ती) औरंगाबाद : स्वरुप प्रकाशन. पान क्र. १३७, १३८

३) मराठी युवकाभारती इयत्ता ११ वी (२०१९) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे. पान क्र. २१,२२

४) यादव,स. ग.(२०००)निसर्ग कन्या बहिणाबाई चौधरी. कोल्हापूर:प्रचार प्रकाशन.पान क्र. ५

५) website- www. bahinabaichaudhari Wikipedia

मराठी कविता साहित्यातून अभिव्यक्त झालेल्या स्त्रीवादी विचारधारेचा आढावा

प्रा. शुभांगी विजय होले

पीएच. डी. विद्यार्थिनी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डॉ. उर्मिला धूत

मार्गदर्शक, प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड

प्रस्तावना:

स्त्रियांचे स्वतःच्या वेगळेपणाची जाणीव प्रकर्षाने व्यक्त करणारे व स्वत्वाचा शोध घेऊ पाहणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. स्त्रीवादी साहित्य याचा अर्थ केवळ स्त्रीनिर्मित साहित्य नव्हे, तर पुरुषकेंद्री विचारव्यूहातून मुक्त अशा दृष्टिकोणातून कोणीही स्त्री वा पुरुषाने निर्माण केलेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य असेही म्हणता येईल. वास्तविक साहित्याच्या आविष्कारातील कोणत्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल, हा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे परंतु एवढे निश्चित म्हणता येईल, की बाईच्या असण्याचा, होण्याचा — म्हणजेच अस्तित्वाचा, स्वत्वाचा व अस्मितेचा — समग्रतेने वेध घेणारे,तिच्या आत्मशोधाचा प्रवास वाङ्मयीन आविष्कार म्हणून मांडणारे लेखन स्त्रीवादी म्हणता येईल. स्त्रियांच्या दुःखाच्या करुण कहाण्या पराभूत नियतिवादी दृष्टिकोणातून मांडणारे,त्यांच्याविषयी केवळ दया, सहानुभूती निर्माण करणारे, तसेच उद्धारकाच्या भूमिकेतून केलेले लिखाण हे स्त्रीवादी साहित्य म्हणता येणार नाही.

स्त्रीवाद ही एक समाजपरिवर्तन घडवू पाहणारी राजकीय वसामाजिक जाणीव आहे. या स्त्रीवादी जाणिवेचा विविध दृष्टिकोणांतून, भिन्न भिन्न पातळ्यांवरचा आविष्कार स्त्रीवादी साहित्यात आढळून येतो. काळाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीवादाची भिन्न रूपे तर दिसतातच परंतु त्यांच्यात अनेकदा परस्परविरोधही आढळून येतो. ह्याचेच प्रतिबिंब वेगवेगळ्या काळांत लिहिल्या गेलेल्या स्त्रीवादी साहित्यात दिसते. ह्या भिन्न भिन्न स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. पुरुषाच्या आधाराशिवाय स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला परिपूर्णता येऊ शकते आणि प्रेमाइतकीच, माणसासारखे जगण्याची भूक स्त्रीलाही असते हे दर्शविणारे आणि स्त्री म्हणून घडताना आलेल्या विविध अनुभवांना अभिव्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. पुरुषप्रधानतेला विरोध करणारे आणि स्त्रीचे माणूस म्हणून चित्रण करणारे साहित्य, मग ते पुरुषाने लिहिले असले तरी स्त्रीवादी ठरेल कारण तत्त्वतः स्त्रीवादी जाणीव स्त्री व पुरुष दोघांमध्येही विकसित होऊ शकते परंतु पुरुषी वर्चस्वाचा अनुभव बाई होऊन घेणे स्त्रीला अधिक समर्थपणे करता येते, असेही मानले जाते. त्यामुळे स्त्रियांचे लेखन अधिक नेमके, धारदार व प्रखर होते.

स्त्रीवादी जाणीव ही स्त्री व पुरुष या दोघांत होऊ शकते. पुरुष या जाणिवेचा समर्थक होऊ शकतो परंतु या जाणिवेचा अनुभव मात्र स्त्रीच घेत असते. स्त्री-पुरुष विषमतेचे भान येणे,ही या जाणिवेची पहिली अवस्था होय. स्त्री-पुरुष समतेच्या तत्त्वावर आधारलेल्या नवसमाजाची निर्मिती करणे, हे स्त्रीवादाचे उद्दिष्ट आहे. स्त्रीवादी जाणिवेच्या अवस्थांचे आविष्कार वाङ्मयेतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर, वेगवेगळ्या कालखंडांत आढळून येतात. स्त्रियांच्या कथा, कादंबऱ्या, कविता इ. साहित्यांतून त्यांच्या 'स्व ' त्वाचा शोध त्यांनी कसा घेतला आहे, त्याची जाणीव त्यांना कशा प्रकारे झाली आहे, वर्षानुवर्षे पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेमुळे आपण दडपले गेलो आहोत, ह्याचे भान स्त्रियांनी आपल्या कवितातून व्यक्त केले आहे. स्त्रियांचे स्त्रियांनी केलेले चित्रण, स्त्रियांचे खास वेगळे अनुभव व विषय यांचे स्त्रीवादी दृष्टिकोणातून दर्शन घडविणारे साहित्य, स्त्रीचे

स्वत्वाचा शोध घेऊ पाहणारे, स्वत्वाच्या जाणिवेने केलेले आत्मप्रकटीकरण व आत्मशोध ह्या स्त्रीवादी साहित्याच्या वेगवेगळ्या दिशा आहेत.

मराठी साहित्यात साधारणतः १९६० नंतरच्या दशकांत स्त्रीवादी साहित्य जाणीवपूर्वक लिहिले जाऊ लागले आणि सत्तर-ऐंशीच्या व नंतरच्या दशकांतही स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह काव्य, कथा, कादंबरी अशा प्रकारांत जोमाने विकसित होऊ लागला. मात्र तत्पूर्वीही स्त्रीकेंद्री साहित्याची निर्मिती अगदी प्राचीन काळापासून मौखिक वा लिखित स्वरूपात होत होती, असे दिसून येते. स्त्रियांच्या साहित्याचे मूळ प्राचीन काळापर्यंत जाऊन पोहोचते. स्त्री आपल्याशीच किंवा आपल्या सारख्याच दुसरीशी चाललेल्या संवादातून 'बाई असण्याचा', 'बाईपणाचा' अर्थ व्यक्त करीत आली आहे. मराठी लोकगीतांत हा स्त्रीत्वाचा स्वर सतत ऐकू येतो. अन्याय, बंधने, शिक्षा, दंड, तक्रार, शोषण, पुरुषांकडून मिळणारी अन्यायकारक व अपमानास्पद वागणूक, सततची अवहेलना व उपेक्षा, अपाय, इजा, आपल्याकडून चूक वा अपराध घडेल का ह्याची स्त्रीला वाटणारी धास्ती इ. स्त्रियांच्या अनु-भवविश्वाच्या कक्षेतील अशा अनेक भावना आणि तथ्ये त्यांनी लोकवाङ्मयातून शब्दांकित केलेली दिसतात. समाजाने दुर्लक्षित केलेले हे वाङ्मय स्त्रीवादी समीक्षकांनी शोधून त्यावर नवा प्रकाश टाकला आहे. मराठीत तारा भवाळकर, कुमुद पावडे, सरोजिनी बाबर इत्यादींनी लोकगीतांचे संशोधन केले आहे.

मराठीतील सुरुवातीची काव्ये म्हणजे संतकाव्ये, भक्तिकाव्ये आणि लोककाव्ये होत. एकूण मराठी काव्यांत गाथा, लावणी, पोवाडे, ओव्या, आरत्या, भजने, गवळणी, भारूडे, भोंडल्याची गाणी इत्यादींचा समावेश होतो. मराठी भाषेत संतकाव्य मोठ्या प्रमाणात लिहिले गेले. पंडिती काव्य, छंदोबद्ध काव्य, चारोळी, चित्रपट गीते, नाट्य संगीत यांचा समावेश होतो. कवी मुकुंदराज यांना मराठीचे आद्यकवी म्हणून संबोधले जाते. त्यांनी विवेकसिंधू हा काव्यग्रंथ लिहिला आहे. महाराष्ट्रातील महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई इत्यादींनी तसेच एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक इ. लेखिकांनी ललित व वैचारिक पातळीवर स्त्री-पुरुष विषमतेचे, पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेचे, तसेच स्त्रियांवरील अन्याय, जुलूम, शोषण व त्यांतून स्त्रियांना भोगावी लागणारी दुःखे, वेदनायांचे प्रभावी चित्रण केले.

संत मुक्ताबाई:

महाराष्ट्रात अनेक संत महात्म्ये होऊन गेले. या संतांबरोबरच अनेक स्त्री संत समाविष्ट आहेत ज्यांनी समाजकार्यात बहुमूल्य वाटा उचलला आहे. ज्यांनी मायमराठी च्या सारस्वतात भक्तीचा मळा फुलवला आणि मराठी साहित्याचे दालन भावसंपन्न केले, ज्यांना असामान्य बुद्धिमता लाभली, ज्या अलौकिक भावंडांच्या वलयात वाढल्या, भक्तियोग मार्ग यात पारंगत असलेल्या ज्ञानेश्वरांची बहिण म्हणजेच संत मुक्ताबाई. संत मुक्ताबाईंनी रचलेले ताटीचे एकूण ४२ अभंग प्रसिद्ध आहेत. या अभंगांमध्ये त्यांनी आत्मक्लेशामुळे दरवाजा बंद करून बसलेला आपला भाऊ ज्ञानदेव यांनी दरवाजाची ताटी उघडावी म्हणून विनवणी केली आहे.तिने ज्ञानेश्वरांना, आदिनाथांपासून गहीणीनाथांकडे आणि त्यांच्याकडून निवृत्ती, ज्ञानदेवाकडे आलेल्या नाथसंप्रदायाची आठवण करून दिली. घराण्याच्या मोठेपणाचे, योगीपणाचे स्मरण दिले. जो जनांचे अपराध सहन करतो तो योगी. अवघे विश्व जरी आपल्यावर रागावले तरी जलासारखे थंडपण घेऊन त्या क्रोधाग्निला विझवायचे. लोकांच्या शब्दरूपी शस्त्राने जरी त्रास झाला तरी चांगला उपदेश मान्य करायचा. अशा शब्दात समजावताना मुक्ताच्या शब्दांचे अभंग झाले तेच ताटीचे अभंग.

योगी पावन मनाचा | साहे अपराध जनांचा
विश्व रागे झाले वन्ही | संती सुखे व्हावे पाणी
शब्दशस्त्रे झाले क्लेश | संती मानावा उपदेश
विश्वपट ब्रम्हदोरा | ताटी उघडा ज्ञानेश्वरा

संत जनाबाई:

संत जनाबाई या संत कवयित्री म्हणून जनमानसात लोकप्रिय आहेत. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून स्त्रिया जात्यावर दळण दळताना, कांडताना त्यांच्या ओव्या गातात. संत नामदेवांच्या सहवासात जनाबाईंनीही विठ्ठलाच्या भक्तीचा ध्यास घेतला होता. 'दळिता कांडिता तुज गाईन अनंता' असे त्या म्हणत असत. संत नामदेव हेच त्यांचे पारमार्थिक गुरू होते. 'विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा।।' हा प्रसिद्ध अभंग जनाबाईंचाच आहे. त्यांना संत नामदेवांमुळे सतत संत-संग घडला होता. संत ज्ञानदेवांविषयीही त्यांचा भक्तिभाव अनन्यसाधारण होता. 'परलोकीचे तारू। म्हणे माझा ज्ञानेश्वरु।' असे त्यांनी ज्ञानेश्वरांविषयी म्हटले आहे. गौऱ्या-शेण्या वेचतांना, घरातील इतर कामे करत असताना त्या सतत देवाचे नामस्मरण करत असत. संत जनाबाईंच्या नावावर असलेले एकूण सुमारे ३५० अभंग सकल संत गाथेत मुद्रित केले आहेत. ह्या शिवाय कृष्णजन्म, थाळीपाक, प्रल्हादचरित्र, बालक्रीडा, हरिश्चंद्राख्यान अशा आख्यानरचना पण त्यांच्या नावावर आहेत. संत जनाबाईंच्या थाळीपाक व द्रौपदी स्वयंवर या भावमधुर आख्यानांनी महाकवी मुक्तेश्वरांना (संत एकनाथांचे नातू) स्फूर्ती मिळाली. संत जनाबाईंची भावकविता ही भगवंताच्या प्रेमाने ओतप्रेत भरलेली आहे. पूर्ण निष्काम होऊन लौकिक, ऐहिक भावना विसरून त्या विठ्ठलाला शरण गेलेल्या आहेत. आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडण्यापूर्वीच त्या निर्विकार झाल्या आहेत. संत जनाबाईंच्या जीवनातील अनंत अनुभूती त्यांनी त्यांच्या रचनांतून रेखाटल्या आहेत. संत नामदेवांवरील भक्ति-प्रेमभाव, संत ज्ञानदेवांविषयी असलेला उत्कट भाव, संत चोखोबांच्या भावसामर्थ्याचे अनुसरण, तसेच विठ्ठलाविषयीचा भक्तिभाव त्यांच्या काव्यात ओतप्रोत भरलेला दिसून येतो. वेळप्रसंगी देवाशी भांडायला पण त्या कमी करत नाहीत. 'वात्सल्य, कोमल ऋजुता, सहनशीलता, त्यागी वृत्ती, समर्पण वृत्ती, स्त्री विषयीच्या भावना संत जनाबाईंच्या काव्यात प्रकर्षाने दिसून येतात, तत्कालीन संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत सोपानकाका, संत गोरोबा, संत चोखा मेळा, संत सेना महाराज आदी सत्पुरुषांच्या जीवनाचा, सद्गुणांचा आढावा घेणारी पद्यरचना करून संत जनाबाईंनी पुढील पिढ्यांवर एकप्रकारे उपकारच करून ठेवले आहेत. त्यांची भाषा सर्वसामान्य माणसांच्या हृदयाला जाऊन भिडते.

महादाईसा ऊर्फ महदंबा :

१३ व्या शतकात परमेश्वर अवतार सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामीं नी स्थापन केलेल्या महानुभाव पंथातील ज्येष्ठ संन्यासिनी महादाईसा एक अग्रगण्य व्यक्ती होती. महदंबा यांचे जीवन विलक्षण होते. बालविधवा ते विद्वान संन्यासिनी, कवयित्री असा प्रवास तिने केला. संन्यासिनीचे जीवन जगताना श्री चक्रधरांच्या सेवेत, त्यांच्या भक्तीत रममाण होताना तिच्या व्यक्तिमत्त्वातील उपजत काव्याची ओढ जागी झाली. तिची भक्ती डोळस होती. बुद्धीची, चौकसपणाची त्याला जोड होती. महादाईसेला श्रीकृष्णाच्या चरित्राविषयी विशेष ओढ होती. महदाईसा मराठी साहित्यविश्वातील आद्य मराठी कवयित्री होय. या कवयित्रीला रूपाईसा या नावानेही ओळखली जात असे. ती चतुर, सडेतोड वृत्तीची होती. तिचे धवळे नावाचे लेखन महानुभाव संप्रदायात प्रसिद्ध आहे. तो वाङ्मयीन रचनाप्रकार झाला. धवळे म्हणजे विवाहप्रसंगी गायची वरगाणी अर्थात विवाहविषयक गीत होय. त्याची निर्मिती 'श्रीगोविंदप्रभूचरित्रा'तील 'विव्हावो स्विकारू' या लीळेवरून कळते. त्या गीतांत विवाहाचे आरंभापासून अखेरपर्यंत वर्णन आले आहे. ढवळ्यातील मुख्य विषय रूक्मिणी स्वयंवराचा आहे. ढवळ्याच्या उत्तरार्धात पासष्ट कडवी आहेत. ते वाचताना महदंबेचे शीघ्रकवित्व दिसते.ध्वल या संस्कृत शब्दावरून 'धवळा' व 'ढवळा' हा शब्द आलेला आहे. ते विवाहप्रसंगी भक्तांकडून गायले जात असत. महदंबेच्या ढवळ्यांची भाषा साधी, सुबोध व तात्कालिक बोलीभाषेच्या रूपाची आहे. महदंबेने ढवळ्यांप्रमाणेच 'मातृकी रुक्मिणीस्वयंवर' या काव्याची निर्मिती केली आहे. त्याची ओवीसंख्या एकशेनऊ आहे. त्या काव्याचे विशेष असे, की त्यातील कडव्यांत अ, आ, इ, ई पासूनची अक्षरे आणली आहेत. महदंबेचे 'तिच्या मानसिक आणि शारीरिक कोंडमाऱ्याचे चित्र तिच्या कृती-उक्तीतून 'लीळाचरित्रा'त दिसून येते. संन्यासीपण, निवृत्ती, जीवनभोगापासून दूर राहणे आणि आध्यात्मिक पातळीवर विचारदर्शन घडवणे अशी महदंबेच्या आयुष्याची वाटचाल

ठरली. महदंबा ही संवेदनशील सौंदर्यदृष्टी असलेली, नीटनेटकेपणा, चौकसपणा, जिज्ञासूपणा असलेली सुगरण, गाणे गाणारी, रांगोळी सुंदर काढणारी दक्ष कार्यकर्ती होती.

संत बहिणाबाई :

या एक वारकरी संप्रदायातील मराठी स्त्री संत कवयित्री आणि संत तुकारामांच्या शिष्या होत्या. बहिणा आपल्या गुरूंचा उल्लेख पदोपदी आपल्या अभंगात करीत. बहिणा म्हणते 'तुका सद्गुरू सदोहर । भेटतो अपार सुख होव ॥ तुकारामा भेटला धन्य जिने माझे कृत्यकृत्य झाले सहजाचि. संत बहिणाबाईना लहानपणापासूनच परमार्थाची व भक्तीची ओढ होती. कथा – कीर्तने, पुराण-श्रवण आणि सत्पुरुषांची सेवा यात संत बहिणाबाई रमली होती. तिने आपले गुरू संत तुकाराम महाराज व त्यांचीही गुरुपरंपरा आपल्या अभंगांत वर्णन केली आहे. तुकारामांच्या चारित्र्याचे अस्सल दर्शन त्यांच्या अभंगांतून घडते, त्यामुळे या अभंगांना विशेष महत्त्व आहे. त्यांच्या अभंगांपैकी 'संत कृपा झाली। इमारत फळा आली ॥' हा अत्यंत प्रसिद्ध अभंग आणि 'घट फुटलियावरी। नभ नभाचे अंतरी॥' हा शेवटचा अभंग सांगितल्यावर त्या समाधिस्थ झाल्या. अभंग, ओव्या, श्लोक, आरत्या इत्यादी मिळून ७३२ कविता त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या या कविता भक्तिभावाचा उत्स्फूर्त अविष्कार आहे. वेदान्ताचे प्रतिपादनही त्यात आढळते. बहिणाबाईंनी आपल्या अभंगातून 'ब्राम्हण कोण' हा विषय उपस्थित करून ब्राम्हण आणि ब्राम्हणी सनातनी वृत्तीवर स्वतः ब्राम्हण असून त्या काळात सडेतोड टीका केली. त्यांचे अभंग १७व्या शतकातील, पण ते प्रसिद्ध झाले विसाव्या शतकात. त्यांची काव्यशैली साधी सरळ आणि हृदयस्पर्शी आहे.

साठोत्तरी कालखंडात, १९७०—८० च्या दशकांत व नंतरच्या काळातही काव्यनिर्मिती करणाऱ्या अनेक कवयित्रींनी स्त्रीवादी काव्याचे दालन समृद्ध केले आहे. त्यांतील काही प्रमुख कवयित्री- अनुराधा पाटील, रजनी परुळेकर, मलिका अमर शेख, प्रभा गणोरकर, अरुणा ढेरे, नीरजा, प्रज्ञा लोखंडे, कविता महाजन, आसावरी काकडे, इत्यादी. स्त्रीत्वाचे, स्त्रीवादी जाणिवेचे, स्त्रीच्या विशिष्ट अनुभव-विश्वाचे वेगवेगळ्या पातळ्यांवरचे, भिन्न भिन्न स्वरूपाचे चित्रण त्यांच्या कवितांत आढळते. व्यक्तिनिष्ठ तसेच सामाजिक-सांस्कृतिक वास्तवाचे थेट चित्रण करणाऱ्या या कविता स्त्रीत्वाचा आत्मभानयुक्त स्वर आळवणाऱ्या आहेत. बाईचे सामर्थ्य व अनेकविध क्षमतांच्या शक्यता सूचित करणाऱ्या भविष्यवेधी कविता काही कवयित्रींनी लिहिल्या आहेत. बाईतील अपार करुणा, तिची सर्जनशीलता, नवनिर्मितीची क्षमता ही तिची बलस्थाने अनेक कवितांतून व्यक्त झाली आहेत. १९८०—९० च्या दशकांत स्त्रीवादी जाणिवेच्या काव्याचा प्रवाह लक्षणीय होता. स्त्रीकेंद्री काव्यलेखनाचे प्रमाण उत्तरोत्तर वाढतच गेले.

इ.स. १८८५ ते १९८५ एवढ्या दीर्घ कालमर्यादेचे अभ्यासाच्या दृष्टीने चार खंडांत विभाजन केले आहे. पहिला खंड - १८८५ ते १९२०: हा या कालमर्यादेचा असून केशवसुत व त्यांचे समकालीन यांच्या अर्वाचीन काव्यातील परंपराशरणता या विषयींची वैशिष्ट्ये नमूद करणारा आहे. दुसरा खंड -१९२०-१९४५ :या काळात उदयाला आलेले रविकिरण मंडळ व नवपूर्वकाव्यातील कवी-कवयित्री यांच्या काव्यविषयक जाणिवांचा आढावा घेतला आहे. तिसरा खंड - १९४५-१९६०: या काळात कवी मर्ढेकरांसारखा नवकवी होऊन गेला. मर्ढेकरांनी आणलेली नवकविता आणि त्यानंतर नवकाव्याचा झालेला विकास हे या खंडाचे वैशिष्ट्य आहे. चौथा खंड -१९६० ते १९८५:संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेमध्ये राजकीय नेते, विचारवंत, पत्रकार, लेखक यांच्याबरोबर कवी आणि शाहिरांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. कविवर्य वसंत बापट, शाहीर शाहीर अमर शेख यांच्यासारख्या कवींच्या कविता आणि पोवाड्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत जान आणली. मर्ढेकर, शरदचंद्र मुक्तिबोध, विंदा करंदीकर, पुढे सदानंद रेगे यांच्यासारख्या कवींनी खऱ्या अर्थाने मराठी कवितेला नवा चेहरा दिला. ना. धों. महानोर यांनी ग्रामीण कवितेला दिलेला मातीचा स्पर्श हा अनेक कवींच्या कवितेत आजही अनुभवायला मिळतो.

साठोत्तरी कालखंडात लिहिणाऱ्या कवींच्या अभिव्यक्तींची तऱ्हा वेगळी होती. कविता आशय, कविता रूपबंध वेगळे होते. निसर्ग, प्रेम, दु:ख, विरह, मानवी संबंध, मंत्राक्षरांनी भारलेले आयुष्य हे सर्व मांडणारी कविता या काळात लिहिली गेली

असली, तरी ती वेगळ्या रूपात आपल्यासमोर येत होती. काल्पनिक जगात रमण्यापेक्षा अनुभवातला सच्चेपणा व्यक्त करीत होती. ग्रेस, चिंतामणी त्र्यंबक खानोलकर, वसंत सावंत यांच्या कवितेत तो दिसतो. कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर, इंदिरा संत, शांता शेळके यांच्यासारख्या आधीच्या पिढीतील कवी-कवयित्रीही स्वतःचा नव्याने शोध घेत होते. गझल हा काव्यप्रकार याच काळात जन्माला आला. सुरेश भट यांनी नव्याने त्यात जान ओतली. सामाजिक भान त्यातून व्यक्त व्हायला लागले. पण गेल्या काही वर्षांत लिहिली गेलेली गझल मात्र भट यांना ओलांडून पुढे जाऊ शकली नाही. या काळात दिलीप चित्रे, अरुण कोलटकर, मनोहर ओक, भालचंद्र नेमाडे, सतीश काळसेकर, चंद्रकांत पाटील, गुरूनाथ धुरी इत्यादी कवींनी प्रस्थापित काव्य परंपरेला छेद देण्याचा प्रयत्न केला. भाषेची काव्यात्मदृष्ट्या केलेली मोडतोड, परंपरागत मांडणीला छेद देत शब्दांची केलेली काव्यात्म मांडणी, बोलीभाषेच्या किंवा जुन्या म्हणींचा केलेला उपयोग, लैंगिक जाणिवा व अनुभव यांनी भारलेल्या प्रतिमांचा केलेला वापर, चित्रात्मकता, नव्या-जुन्या पाश्चात्त्य व भारतीय संस्कृतीतील तसेच वाङ्मयातील संदर्भाचा वापर ही यांच्या कवितेची वैशिष्ट्ये होती. याच काळात लिहिणारे नारायण सुर्वे आणि नामदेव ढसाळ हेही आपल्या अनुभवातला सच्चेपणा वेगळ्या शैलीत मांडत होते. हे दोन्ही कवी खऱ्या अर्थाने प्रवाह प्रवर्तक ठरले. याच काळात लिहिणारे नारायण सुर्वे आणि नामदेव ढसाळ हेही आपल्या अनुभवातला सच्चेपणा वेगळ्या शैलीत मांडत होते. हे दोन्ही कवी खऱ्या अर्थाने प्रवाह प्रवर्तक ठरले.

१९८५ ते २०१०: दलित जाणिवेबरोबर दलित चळवळीतले अराजक, नेतृत्व हरवलेल्या भ्रष्ट व्यवस्थेत पिचलेल्या हताश तरुण पिढीची कैफियत, आजच्या जगात हरवत चाललेली मूल्यव्यवस्था, जागतिकीकरणाच्या रेट्यात माणसाला आलेले वस्तूरूप, स्त्रीचे शोषण अशा अनेक गोष्टींचा आविष्कार या काळात कवितेत दिसतो. भुजंग मेश्राम यांच्यासारख्या कवींच्या कवितेतही आदिवासी तसेच भटक्या विमुक्तांचा आदिम संघर्ष व्यक्त होतो. त्यांनी केलेला बोलीभाषेचा उपयोग पाहिल्यावर मराठी कविता प्रमाणित भाषेच्या कक्षा ओलांडून नवनव्या भाषांचे अवकाश शोधत पुढे चालली आहे हे लक्षात येते. विशेषतः चित्रे-कोल्हटकर या द्वयीचा प्रभाव असलेली कविताही गेल्या काही वर्षांत खूप लिहिली गेली.

गेल्या काही वर्षांत स्त्रीजाणिवेची कविताही प्रामुख्याने पुढे आली. प्रभा गणोरकर, रजनी परुळेकर यांच्या पावलावर पाऊल टाकून अनेक कवयित्री लिहू लागल्या. स्त्रीच्या स्वरूपाचा शोध घेतानाच पुरुष व्यवस्थेत आजपर्यंत तिला व्यक्ती म्हणून जगण्याचा नाकारलेला हक्क, तिचे शोषण, तिला आलेले वस्तूरूप, पुरुषाशी तिचा तुटलेला संवाद आणि त्यातून आलेले एकाकीपण व तुटलेपण कवयित्री त्यांच्या कवितेतून व्यक्त करू लागल्या. या समाजात एकीकडे स्त्रीचे उदात्तीकरण करणाऱ्या तर दुसरीकडे तिचे उपभोग्य वस्तूत रूपांतर करणाऱ्या पुरुषाच्या दुटप्पीपणावर त्या कोरडे ओढू लागल्या; पुरुषाला नकार देऊन स्वतःची वेगळी सृष्टी निर्माण करण्याची भाषा करू लागल्या. हे करताना त्यांच्या शब्दात बंडखोरी आली, त्यांची भाषा आक्रमक झाली. ग्रामीण कवितेचे दालन १९८५ नंतरच्या काळात अधिक समृद्ध झाले आहे. आनंद यादव यांच्या मायलेकरं या दीर्घ कवितेनंतर इंद्रजित भालेराव यांच्या अनेक कवितासंग्रहांनी ही कविता खेड्यापाड्यात पोहचली. कैलास दौंड, लक्ष्मण महाडिक, जगदीश कदम यांची ग्रामीण कविता लक्ष वेधून घेणारी ठरली. कैलास दौंड यांच्या 'उसाच्या कविता', 'वसाण', 'भोग सरू दे उन्हाचा', 'अंधाराचा गाव माझा' या कवितासंग्रहातील ग्रामीण कविता ग्राम जीवनाचे नेमके प्रत्यंतर देणारी कविता आहे. ग्रामीण जीवनाचे काव्यमय दर्शन तर त्यांतून घडतेच, पण त्याच बरोबर ग्रामजीवनातील विसंगती, त्यातील नवे प्रश्न अशा अनेक आयामांना भिडणारी ही कविता काव्यगुणानेही सरस अशीच आहे. गेल्या ५० वर्षांतील काव्यप्रवासाकडे नजर टाकली तर लक्षात येते की, आज कविता उदंड लिहिली जातेय. तरीही आपल्याला असे म्हणता येईल की, पूर्वीच्या स्त्रियांच्या लेखनातूनही स्त्री बद्दलची जाणीव, संवेदना, आत्मभान, अस्तित्वाची जाणीव तसेच त्यांच्यावर होणारे अन्याय, त्यांना समाजात मिळणारी वागणूक, त्यांची संवेदनशीलता यांचे प्रकट दर्शनमराठीसाहित्यातून दिसून येते.

संदर्भ:

1. https://mr.vikaspedia.in/education
2. https://shodhgangotri.inflibnet.ac
3. https://maharashtratimes.com/editorial/samwad/women/articleshow/32904333.cms
4. https://marathivishwakosh.org/3579/
5. https://www.bookganga.com/eBooks/Books/Details/5037277317076200103

मराठी दलित साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

श्रीमती आशा पांडुरंग रोडगे

मुख्याध्यापक, संत ज्ञानेश्वर प्राथमिक, विद्यालय , अहमदपूर

प्रो. डॉ. व्ही. डी. रामटेके

शासकीय अध्यापक महाविद्यालय, औरंगाबाद

गुरु फुले, गुरु शाहू!
गुरुर्देवो आंबेडकरा...
गुरु साक्षात सावित्रीमाई!
तस्मै श्री गुरुवे नमः

पशुचा पशुपती करण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. माणसांचा पशु होतो तेव्हा समाजाला सावरणारा कोणी तरी महात्मा प्रकट होतो. तो बुद्ध असेल किंवा ख्रिस्त असेल, सॉक्रेटिस असेल किंवा गांधी असेल; महात्मा फुले असतील किंवा शाहू, आंबेडकर असतील. स्त्री शिक्षणाची सुरुवात तर क्रांतीसुर्य महात्मा फुले यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या माध्यमातून केली. एक पुरुष शिकला तर तो फक्त एकटाच शहाणा होतो. परंतु एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शहाणे, सुशिक्षित होते. म्हणून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचा प्रचार, प्रसार केला.

विद्ये विना मती गेली |
मती विना नीती गेली ||
नीती विना गती गेली |
गती विना वित्त गेले ||
वित्ताविना शूद्र खचले |
इतके अनर्थ एका अविद्येने केले ||

भारतीय स्वातंत्र्याची प्राप्ती ही भारतीयांच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे. दीडशे वर्षांची ब्रिटिशांची गुलामगिरी संपवून भारत राजकीय दृष्टीने स्वतंत्र आणि सार्वभौम म्हणून जगाच्या नकाशात झळकू लागला. मराठी साहित्य विश्वात अनेक स्थित्यंतरे घडून आले. १९६०नंतर ग्रामीण साहित्याबरोबर दलित साहित्याची चळवळ सुरू झाली. साहित्यिक जाणिवेच्या मुळाशी होते. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे अनेक समाज घटक जागृत झाले आणि आपल्या प्रश्नासाठी चळवळ सुरू केल्या या उपेक्षित घटकांनी चळवळी सुरू केल्या. या उपेक्षित घटकांनी चळवळी बरोबरच आपले प्रश्न आपल्या साहित्यातून मांडले. साहित्य केवळ मनोरंजनाचे साहित्य न राहता ते सामाजिक प्रश्नांचे व्यासपीठ बनले. दलित साहित्यातून स्त्रियांच्या प्रश्नांचा उहापोह केला जाऊ लागला, म्हणून दलित साहित्याची पार्श्वभूमी समजून घेणे महत्वाचे ठरते.

कोणतीही व्यक्ती जन्माने श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते. व्यक्तीला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य सर्व बाबतीत असावे. शिक्षण व व्यवसायाचे स्वातंत्र्य असावे. असे मानणारी विचारसरणी आम्ही स्वीकारली पण हे अचानक घडले नाही गेल्या शंभर दीडशे वर्षात आमच्याकडे ज्या निरनिराळ्या चळवळी झाल्या त्यांचे फलित म्हणजे आजचे आमचे जीवन. त्यासाठी आपल्याकडे कोण- कोणते संघर्ष झाले, हे मागे वळून पाहणे गरजेचे असून ते दलित साहित्य समजून घेण्यासाठी उपयुक्त देखील ठरेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहेत. बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसह धर्मांतर केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काळातच त्यांच्या अनुयायांनाही कंठ फुटला. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या समाजाची स्वप्ने त्याकाळातील साहित्यिकांनी पाहिली. बाबासाहेबांनी दलितांना आवाहन केले शिका, संघटित व्हा, संघर्ष करा... बाबासाहेबांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. म्हणून बाबासाहेबांनी शिक्षण दलिता पर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या शब्दात सांगायचे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे हिंदू समाजाच्या प्रत्येक जुलमाविरुद्ध पुकारलेल्या बंडाचे प्रतीक होय.

दलित साहित्याचे स्वरूप

दलित साहित्यातून दलित जीवन व्यक्त झाले आहे. त्यात दलित स्त्री ही कुटुंबातील महत्त्वाचा घटक असल्यामुळे तिलाही लेखकांनी महत्त्वाचे स्थान दिले आहे. परंतु भारतीय समाजजीवनात स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. त्यातही दलित स्त्री ही तर गुलामाची ही गुलाम आहे. म्हणून तिला स्वतःच्या कुटुंबातील पुरुषांप्रमाणेच वर्ण व्यवस्थेतील उच्चवर्णीय जातीतील पुरुषांकडून अन्याय सहन करावा लागला. स्त्रियांना हजरो वर्षापासून गुलामीत ठेवण्याची परंपरा दलित समाजातही चालत आली होती. प्रस्तुत संशोधनाचा विषय असलेल्या बलुतं, आठवणींचे पक्षी, काट्यावरची पोटं, जिणं आमचं, माज्या जल्माची चित्तरकथा, अक्करमाशी आणि कोल्हाट्याचं पोर या सर्वच आत्मकथनातून दलित स्त्रियांची विविध रूपे व्यक्त झाली आहेत. परिवर्तनाच्या चळवळीमुळे दलितांना आत्मभान प्राप्त झाले. त्याचा परिणाम म्हणजे दलित लेखक आपल्या सभोवती चे वास्तव न्याहाळू लागला. त्या वास्तवाशी आपले नातेसंबंध शोधू लागला. शोध म्हणजेच आत्मशोध होय. इतिहासातही आपले स्थान पाहू लागला. दलित साहित्याच्या आविष्काराला निरनिराळी रूपे देणारा हा दलित साहित्यातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

सवर्ण पुरुष हे दलित स्त्रीलाही आपले गुलाम व भोगदासी समजून तिच्याकडून बलुत्याची कामे करून घेत असत. एवढेच नाही तर तिच्यावर बलात्कार करून तिच्या शरीराचा भोग घेत असत. या अन्यायाच्या विरुद्ध दाद मागण्याची कोणतीही व्यवस्था त्या काळात नव्हती.म्हणून हे सर्व सवर्ण पुरुषांकडून होणारे शारीरिक, मानसिक अन्याय-अत्याचार तिला निमूटपणे सहन करावे लागत असे. दलित स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे स्वरूप दुहेरी आहे. एक म्हणजे ती कुटुंबातील पुरुषाची गुलाम आहे तर दुसरे म्हणजे वरिष्ठ व सवर्ण वर्गातील पुरुषांची गुलाम आहे. दलित साहित्यामध्ये समाजातील अनेक प्रकारच्या स्त्रियांचे चित्रण आले आहे. सावत्र आई, बहिण, मुलगी, प्रियसी, इत्यादी...ग्रामीण जीवन अनुभवलेल्या लेखकांनी दलित साहित्य लिहिलेली असल्यामुळे ग्रामीण भागातील स्त्रियांची विविध रूपे त्यांच्या लेखनातून आविष्कृत झाली आहेत. स्त्रिया वेगवेगळ्या नात्यांनी बांधलेल्या आहेत. कधी आई म्हणून, कधी मुलगी म्हणून, कधी आजी म्हणून, कधी प्रेयसी म्हणून, तर कधी पुरुषांची रखेल म्हणून तिला जगावे लागते. स्त्रियांना पुरुषांच्या सुखासाठी अहोरात्र कष्ट घ्यावे लागते. दया पवार यांच्या बलुतं मधील दगडूची आई आपल्या मुलाला समाजातील इतर मुलांपेक्षा अधिक शिकवायचे सुसंस्कारित करायचे या जिद्दीने झपाटलेली असल्यामुळे आपले विधवापण पदरात घेऊनही या जिद्दीच्या पूर्ततेसाठी सतत झगडते. स्वतः काबाडकष्ट करून दगडूला कसलेही कष्ट करू न देता ती शिकविण्याचा प्रयत्न करते.हीच आई दगडूच्या लग्नानंतर सईशी भांडण करते. सई बद्दल दगडूला सांगते. स्त्रीच स्त्रीची शत्रू आहे. दलित समाजातील सासू-सुनेच्या नातेसंबंधातील संघर्ष येथे व्यक्त झाला आहे. दगडू च्या आईची दूध बहीण असलेली जना मावशी, बोर्डिंग जवळील पालात राहणारी गऊ, मित्राच्या घरी अभ्यासाला गेल्यावर भेटणारी बानू, दगडू च्या घरासमोर राहणारी विठाबाई, प्रेमळ असलेली दगडूच्या वडिलांची आई. अशा अनेक स्त्रियांशी दगडूचा विविध कारणाने व नातेसंबंधाने संबंध आला व या स्त्रियांचे कष्ट, त्यांचा स्वभाव आणि त्यांचे सौंदर्य पहावयास मिळाले.

सुरुवातीच्या काळात लेखन करणाऱ्या स्त्रियांच्या लेखनावर पुरुषसत्ताक मुल व्यवस्थेचा पगडा असलेला जाणवतो. आपले शरीर आणि सौंदर्य हे पुरूषासाठीच आहे अशा भावना काही लेखकांनी आपल्या कथा कवितातून मांडलेल्या आहेत. तसेच विवाह संस्थेमुळे स्त्रियांचे होणारे शोषण आणि समाजातील स्त्रीचे दुय्यम स्थान याविषयी समाज मनात हालचाल सुरु झाली. पुरुषांनी स्त्री रूपाचे गोडवे गाणाऱ्या त्या कथित उद्दात प्रतिमा निर्माण केलेल्या होत्या. देवता, सत, पतिव्रता, माता, अबला, अर्धांगी, सौभाग्यवती अशा तथाकथित रुपांना तडे जाऊ लागले. जोडीदार, मैत्रीण, सहकारी आणि कार्यकर्ती अशा नव्या रुपात जीवनाच्या अनेक क्षेत्रात स्त्री अग्रेसर होऊ लागली. तिने अर्धांगी होण्यापेक्षा पूर्णांगी होणे पसंत केले.चूल आणि मूल हे कार्यक्षेत्र मागे पडले आणि तिचे पारंपारिक रूपही पालटले. स्त्रीमुक्ती चळवळीमुळे स्त्रियांमध्ये नवी चेतना निर्माण झाली. सामान्यपणे जीवनात परिवर्तन झाले की त्याचे पडसाद वाङमयातही दिसून येतात. दलित साहित्याच्या प्रवाहाने स्वतःचे निराळेपण तर सिद्ध केले आहेच, शिवाय ह्या प्रवाहामुळे मराठी वाङमय ही समृद्ध झाले आहे आणि मराठी वाङमयाच्या कक्षा व्यापक झाल्या आहेत. म्हणून दलित साहित्य हा मराठी वाङमयातील एक महत्त्वाचा प्रवाह आहे.

बाबुराव बागूल यांच्या मते "माणसांच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे; माणसाला महान मानणारे वंश, वर्ण, जाती, श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य होय." तर केशव मेश्राम यांच्या मते, "हजारो वर्ष ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्यांना दलित म्हटले व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य असे सांगता येईल. "नामदेव ढसाळ यांनी दलित साहित्यात परिवर्तन घडवणाऱ्या कविता रचल्या ते बौद्ध- दलित चळवळीतील

अग्रगण्य नेते होते. त्यांच्या कवितांचे विषय महानगरीय जीवन, स्त्री हे होते. नामदेव ढसाळ यांनी त्यांच्या साहित्यातून दलित बांधवांच्या वेदना आणि व्यथा मांडल्या. त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव होता.

'आठवणीचे पक्षी' या आत्मकथनातून परदिसा असलेल्या प्रल्हादची मोठी बहीण प्रल्हादला कोणी नसल्यामुळे त्याचे पालनपोषण करते. त्याला आधार देते. याबद्दल तिची सासू आणि नवरा यांचा तिला धाक होता. म्हणून त्यांच्यासमोर ती प्रल्हादला काम सांगते व त्यासाठीच रागावते. तिचा नाईलाज असतो; म्हणूनच ती प्रल्हादला अनेक कामे सांगते. खरे तर अतःकरणातून ती आपल्या भावासाठी हळहळायची. या आत्मकथनातील ही स्त्री बहिणीच्या नात्याने भावाशी वागते. ती भावाच्या सुखासाठी, त्याला शिकविण्यासाठी आधार देते. तिला सासूरवास आहे. तरीही तिला भावाची माया सोडवत नाही. सालस, संयमशील, प्रेमळ अशी बहीण या आत्मकथनातून साकार झाली आहे.

'काट्यावरची पोटं' या आत्मकथनातूनही उत्तम बंडू तुपे हे पोट भरण्यासाठी पुण्याला येतात. तेव्हा त्यांची बहीण त्यांना आधार देते. तिलाही आपला भार वाटू नये म्हणून उत्तम लाकडे गोळा करून आणणे, पाणी भरणे, बहिणीच्या मुलांना सांभाळणे, बकऱ्या सांभाळणे इ. कामे करतात. या बहिणीनेच त्यांना आधार दिला होता, तिच्याबद्दल अनेक आठवणी या आत्मकथनातून आलेल्या आहेत. उत्तमला पूर्णपणे बदलून टाकणारी आणि अन्नाचा घास वाढता वाढता अतःकरण उघडून काहीबाही वाढणारी व उत्तमला माणुसकीने वागविणारी वामनराव देशपांडेची पत्नी मीना, भूकेपोटी भूईमुगाच्या शेंगा काढण्यासाठी गेलेल्या उत्तमला शेंगा न वाटता संपूर्णच शेंगा देणारी म्हातारी मालकीन या ना त्या कारणाने उत्तमला सतत भांडणारी त्याची सख्खी मोठी बहीण, विवाहापूर्वी परपुरुषाशी संबंध ठेवणारी त्यांची पास्नी. अशा विविध स्त्रीची अनेक रूपे या आत्मकथनातून आली आहेत. आपल्या पत्नीने परपुरुषांशी संबंध ठेवल्यामुळे तिला लेखकाकडून मारझोड होते. परंतु तिचा त्यांनी कायमस्वरूपी स्वीकार केलेला आहे. अशा ग्रामीण भागातील विविध भूमिका पार पाडणाऱ्या विविध स्त्रियांची विविध रूपे प्रस्तुत आत्मकथनातून आली आहेत. वर्णव्यवस्थेच्या गुलामीबरोबरच पुरुषानेही गुलाम केलेल्या दलित स्त्रीचे चित्रण या आत्मकथनातून जीवंतपणे उभे केले आहे.

प्रा. अनिल कांबळे यांनी 'सावत्र आई' या आत्मकथनातून शिक्षणासाठी जो संघर्ष करावा लागला त्याचे अस्वस्थ करणारे चित्रण मांडले आहे. लहानपणापासून भाकरीच्या तुकड्यासाठी जो संघर्ष करावा लागला कधी अर्धपोटी, तर कधी उपाशी राहावे लागले त्याचे वर्णन येते. अगदी मॅट्रिक च्या परीक्षेला जाताना सुद्धा उपाशीपोटी जावे लागले याचे वर्णन आहे. भाकरीने पोट भरत नाही म्हटल्यावर कुठे सिंधीचा गाभा खा, डव्हातले मासे खा, वास येत असलेल्या बोटक्या टाकून दे म्हणून मित्र गुरुजी म्हणत असताना गुपचूप खाऊन चिंदूक झुडपात फेकून देण्याचा प्रसंग अस्वस्थ करतो. सावत्र आई जरी छळीत असली तरी इतर माणसांच्या मध्ये मात्र माणुसकीचे दर्शन होते. पोराला शिक्षण मिळावे त्यास नोकरी लागावी त्याला कोरडे-ओरडे का होईना खायला मिळावे यासाठी तळमळणाऱ्या आजी, मोठी बहीण या आत्मकथनात दिसते. कॉलेजातील मदत करणारे प्राध्यापक कर्मचारी दिसतात. स्वतःचे शेत घेणे बाजूस सारून अनिलच्या नोकरीसाठी पैसे देणारी आत्या दिसते.तेव्हा माणुसकीचे अजूनही कुठेतरी शिल्लक आहे यावर विश्वास बसू लागतो.

आपल्या मराठीत साहित्य देशी गाईचे महत्व सांगितले जात असताना सावत्र आईच्या छळवाद याचे वर्णन आहे अनेक ठिकाणी येते विशेषतः दुसऱ्या आईला स्वतःचे मूल होत नाही तोपर्यंत हाई आईविना पोरक्या मुलांकडे बरे बघते पण तिला स्वतःची मुलं बाळ झालं की मात्र स्वार्थामुळे असो की तसेही तिची वागणूकच बदलते आपल्या स्वतःच्या मुलांना चांगले चांगले खायला देते आपल्या सावत्र मुलांना कमीत कमी पोटभर भाकरतुकडा तरी मिळावा इतका माणुसकीचा पाझर हे या स्त्रीला कसा फुटत नाही असा प्रश्न कायमचा पडलेला आहे परक्या परी त्याला मदत करणारी माणसे आपल्याच माणसासाठी कशी दुष्टपणे वागतात याचे वर्णन या आत्मकथनात येते ही सावत्र आई स्वतःच्या मुलांना घरात चांगले चांगले खाऊ घालते थंडीच्या दिवसात त्यांना घरात पांघरून झोप होते आणि सावत्र मुले मात्र थंडीत कुडकुडत उपाशीपोटी बाहेर झोपलेली असतात तरी तिला काही वाटत नाही इतका दुष्टपणा माणसात कुठून येतो उलट आणि जेव्हा भूक लागली म्हणून चोरून काय खातो तेव्हा वडिलांना कागडी करून त्याला मार बसत होते दारिद्र्य तर सगळयांनाच आहे आठ तोंडे खाणारी म्हटल्यावर काय पुरणार पण अनिल त्याची मोठी बहीण वडील सर्वजण रोजगार करून,शेण काढून, शिळेपाके आणत असताना आलेले सगळयांनी वाटून द्यावे असं या आईला का वाटत नाही? एकीकडे हे चित्र आणि एक तीळ सात जणांनी वाटून खाल्ला होता असे आपल्या संस्कृतीचे गोडवे यातील काय खरे आणि काय खोटे हेच समजत नाही. अगोदरच गरिबी आणि त्यात सावत्र आईचा छळवाद म्हणून दुष्काळात तेरावा महिनाच. सावत्र आई असा त्रास देत असतांना आजीचे आई होणे. तिला आईविना

पोरक्या पोरांसाठी दूध फुटणे, पोरे शिकावे, त्याला नोकरी लागावी यासाठी तिला तिची चाललेली धडपड, मोठ्या बहिणीची तळमळ सासरी गेल्यावर 'घार हिंडे आकाशी, तिचे चित्त पिलापाशी' या न्यायाने ती सारखी भावंडात गुंतलेली. हा मायेचा पाझरही या आत्मकथनात दिसतो. आजी आणि बहीण नसती तर अनिल च्या जीवनाची लढाई पूर्ण झाली असती का? असा प्रश्न समोर उभा राहतो. असा प्रसंग आपल्या शत्रूवरही येऊ नये असे आपण म्हणत असतो पण अनेकांना जीवनात अशी लढाई लढावी लागते त्यात कोणी हारतो तर कोणी जिंकतो. अनिल आता प्राध्यापक होवून स्थिर झाले आहेत. घर आहे. चांगला पगार आहे पण मागच्या अस्वस्थ करणाऱ्या त्या आठवणीही आहेत. त्या या आत्मकथनातून जाग्या होतात व वाचकालाही अस्वस्थ करतात. डोळयातून पाणी काढायला लावतात.

प्राध्यापक अनिल कांबळे यांच्या 'सावत्र आई' हे आत्मकथन वाचल्यानंतर मनात आलेले विचार आहेत, ही त्यांची समीक्षा नव्हे. ग्रामीण भागाचे हे चित्रण असल्याने तिथल्या जीवनाचे, ग्रामीण जीवनातील अडचणीचे दारिद्र्याचे वर्णन येते. कोणताही आडपडदा न ठेवता त्या प्रसंगाला साजेसे उदाहरण मोकळेपणाने दिले जाते. अनिल त्याचे मित्र सहलीला जात असताना त्याने रात्रीच आणलेल्या बोटक्याचा वास सुटलेला होता.पोरे पोरी नाकाला कपडा लावीत होते पण पादलेल्या माणसाला स्वतःला वास येत असला तरी तो नाकाला धरीत नाही तसे मी बोटक्याचे चिंदूक घेऊन चालत होतो असे वर्णन मनास पटते. भाषा ही एकूणच जीवनाशी साजेशी आहे. सावत्र आई म्हणते,आन्या उठकीरं का म्हशीवाणी पडलायच. वडील सावत्र आईला समजवायला जातात तर ती म्हणते, एवढा खटांबळाचं मला करणं होत नाही, उगं मीच म्हणून तुमच्या जवळ नांदायलेव दुसरी एखादी असती तर तवाच माहेरला जाऊन बसली असती. अशी भाषा ग्रामीण भागात वापरली जाते. त्यातून माणसाच्या स्वभावाचा अंदाजही आपणास येतो.उदगीर भागातील ग्रामीण भागाच्या शैलीचे, बोलीचे प्रतिबिंब या आत्मकथनात सहजपणे उमटते.

अनिल कांबळे यांचे हे आत्मकथन त्यांच्या दलित असण्यापेक्षा मला वाटते त्यांच्या गरीबीशी झगडण्याला आणि सावत्र आईच्या वागणुकीमुळे त्यांच्या जीवनात होत असलेल्या त्रासाला जास्त महत्त्व आहे.महारीण असे एक प्रकरण या पुस्तकात आहे आणि आंबेडकरांच्या प्रेरणेने दारिद्रयाशी झगडत शिक्षण पूर्ण करण्याचा लढाही यात आहे. दारिद्र्याचा प्रश्न आणि घराघरातून दिसणारी सावत्र आईची छळवणूक या आत्मकथनाचा निमित्ताने परत एकदा समोर येते आणि आपल्याला अस्वस्थ करून टाकते.

संदर्भ ग्रंथ –

१) प्रा. डॉ. अनिल कांबळे : १४ एप्रिल २०१२ ,सावत्र आई, मुक्तरंग प्रकाशन, यशवंतराव चव्हाण संकुल, लातूर ४१३५१२ पृ. क्र. २५,३४,६६

२) डॉ.भागवत विद्युत: स्त्री प्रश्नांची वाटचाल: परिवर्तनाच्या दिशेने, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे. ४११०३०पृ. क्रमांक ३६६

३) स्वातंत्र्योत्तर वागमयीन प्रवाह यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक , मार्च २०११

४) डॉ. किरवले कृष्णा: दलित चळवळ आणि साहित्य, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे. ४११०३० पृ. क्रमांक ३२४

५)मराठी युवकभारती इयत्ता बारावी: २०२०,महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

६) दिवस तुझे हे फुलायचे: सविता जाजू, विद्याभारती प्रकाशन, गुजराती शाळेसमोर,मेन रोड, लातूर ४१३५१२पृ. क्र. ५९

मराठी साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

प्रो. डॉ. एस. बी. सारंग
शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड.
श्री. डी. एम. गिरी
(मु.अ.) शासकीय निवासी शाळा, हादगाव खु. ता सेलू जि. परभणी

प्रस्तावना -

मराठी साहित्यातील स्त्रीच्या बाबतीत विचार केल्यास जीवन हे असे आहे की. स्त्रीयांचे स्वतःच्या वेगळेपणाची जाणीव प्रकर्षाने व्यक्त करणारे व स्वत:चा शोध घेऊ पाहणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. साहजिकच मराठी साहीत्यात साधारणतः १९६० नंतरच्या दशकात स्त्रीवादी साहित्य जाणीवपूर्वक लिहिले जाऊ लागले आणि सत्तर ऐशींच्या व नंतरच्या दशकांत ही स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह काव्य, कथा, कादंबरी अशा प्रकारात जोमाने विकसीत होऊ लागला. स्त्रियांची दुर्गती अत्यंत वेगवान गतीने सुरु झाली होती. समाज स्त्रियांना हीन म्हणून लेखत होते. असे असूनही आर्श्चय करण्याजोगा एक मुद्दा प्रकर्षाने लक्षात येतो तो म्हणजे या आवनतीच्या काळात ही समाजाचा आदिशक्ती वरील विश्वास कायम असावा. कर्तबगारी गाजवणा-या स्त्रियांनी व्यक्तिगत आपदावर मात केली. शत्रुचा नि:पात केला अंतर्गत कलहाचा बीमोड केला शत्रुवर झेप घ्यायला कसूर केला नाही. या स्त्रीया लोक राज्यकर्त्या म्हणून नावाजलेल्या आहेत. जसे महाराष्ट्रातील जिजाबाई सर्वदूर परिचित आहेत. छोटया शिवबाला हाताशी धरुन त्यांनी स्वराज्याचे तोरण बांधले. अशा अनेक कादंबरीतून खऱ्या स्त्री प्रतिमाचे चित्रण केलेले दिसून आले आहे.

१.२ विषय विवेचन -

विनया खडपेकर यांनी ज्ञात अज्ञात या पुस्तकात एका सामान्य स्त्रीचे असामान्य कार्य सांगितलेले आहे. अहिल्याबाई या चौंढी या गावच्या पाटील माणकोजी शिंदे यांची मुलगी होत्या १७३३मध्ये त्यांचा विवाह झाला होता अहिल्यादेवींना सासरी अतिशय मानाची वागणुक मिळत होती. त्यांचे पती खंडेराव यांनी आणखी दोन विवाह केले होते. तरी ही यांचा मान पहिला असे अहिल्यादेवी नव-याचा कारभार जवळुन पहात होत्या व सुचनाही करत होत्या खंडेरावाचा उत्कर्ष होत होता. त्यांनी अनेक लढाया जिंकल्या होत्या. बादशाहाच्याचा करीत असतांना खंडेरावांना मरण आले म्हणुन बादशहाने अहिल्याबाईंना वेरुळ परगाणा साडीचोळी म्हणुन दिला मल्हाररावांनी आपल्या मुलाच्या जागी सुनेला स्थान दिले आणि आपल्या छत्राखाली सुनेला राज्यकारभार दिला मल्हारराव जेव्हा ठिकठिकाणी जात होते तेव्हा अहिल्यादेवी सर्व काही पहात होत्या. अहिल्यादेबींना मुक्ता आणि मालेराव दोन मुले होती. मालेराव हुशार मुक्ता धिम्म होता. म्हणुन सर्वांचे लक्ष त्यांच्यावर केंद्रीत झाले होते. परंतु अवघ्या बावीसाव्या वर्षी त्याला मृत्यु आला त्या नंतर मल्हाररावही वारले घरातील तिन्ही पुरुषाचा मृत्यु झाल्यानंतर प्रश्न वारसाचा उभा राहीला. तरी अहिल्यादेवी डगमगल्या नाही त्यांनी दु:ख बाजुला ठेवुन गतीने पावले टाकली त्यांनी आपले तनमन होळकरांच्या रयतेसाठी हितासाठी वापरले. अहिल्याबाईचे कर्तृत्व डोंगराऐवढे होते. त्यांना दत्तक वारस नको होता. अहिल्याबाई खमक्या होत्या बाईला शरणागती यावी म्हणुन राघोबादादा मुद्दाम हवा तापवत होते. परंतु जनता अहिल्यादेवीच्या बाजुन होती.

अहिल्यादेवीनी बायकांच्या फौजा तयार केल्या होत्या त्या स्वतःला अबला समजत नव्हत्या त्यांचे कार्य हे प्रजेच्या हिताचे होते परमेश्वरांवर त्यांची अपार श्रध्दा होती व आपले कार्य करण्यासाठी परमेश्वरांनी आपल्यावर जबाबदारी टाकली आहे. अहिल्याबाईच्या दरबारात अनेक छोटे मोठे प्रकरण येत असत व ते त्या निकाली काढुन जमेल ती मदत करत असत.

त्यांच्या वारसाचा प्रश्न तसाच राहीला होता. परंतु त्यांना दत्तक वारस किंवा पेशव्याकडे सत्ता दयायची नव्हती म्हणुन त्या स्वतः सत्तेवर आरुढ झाल्या व राज्यकारभार पाहु लागल्या देवावरचा विश्वासही त्यांची ताकद होती. त्यासर्व नेत्र धर्म पाळत होत्या तरी एक माता म्हणुन त्यांचा मुलांचा विचार मनात येत असे. सत्तेवर आल्यावर देवाला साक्षी मानुन सर्व कार्य प्रजेसाठी करायचे असा निर्धार त्यांनी केलेला आहे. अहिल्याबाईच्या वागण्यात जबरदस्त आत्मविश्वास होता. सत्य अस त्याच्या बाबतीत स्वतःचे मन जसे ग्वाही देईल असे त्या वागत होत्या कोणाची ही फिकीर करीत नव्हत्या त्यामुळे त्यांच्या आलोट संपत्तीवर कोणीही आक्रमण करुन शकत नाही. परंतु तयांचे निर्णय वारंवार बदलत होते पुत्राला अबाधितपणे सत्तेवर ठेवणे किंवा नातावाला सत्ता मिळवुन देणे हे कधी अहिल्यादेवीचे राज्यकारभाराची प्रेरणा होऊच शकली नाही हे त्यांचे समकालीन स्त्रियांपेक्षा असलेले वेगळे पण होते सत्तेवर येताच त्यांनी शपथ घेतली होती की परमेश्वराने ज्या जबाबदा-या

माझ्यावर सोपवल्या आहेत त्या मला पार पाडायच्या आहेत. त्या शपथेशी अखेरपर्यंत प्रामाणिक राहिल्या मात्र परमेश्वर भक्ती किंवा विश्वस्ताची भुमिका यांचा अतिरेक करुन त्यांची राजकारणी बुध्दी त्यांना सांगत होती.

अहिल्याबाईंना सत्तेवरुन हटवण्याचा प्रयत्न त्यांनी अनेकदा धुडकावुन लावला. या मागे त्यांची सत्तालालसा नव्हती जे धन बाई जनकल्याणसाठी लावत ते धन फौजेकडे ओढुन घेण्यासाठी त्यांना त्या अधिकाराहुन हाटवले जात असे म्हणुन यासाठी प्राणपणने झुंजण्याची तयारी त्यांनी बोलावुन दाखवली. मात्र त्यांचा दरारा असा होता की त्यांच्यावर प्राणाची बाजी लावण्याची वेळ आलीच नाही आपल्या ताकदेची ओळख होती. अहिल्याबाईच्या धाडसी वृत्तीचे दर्शन या पुस्तकात केलेले आहे. ती सत्ताधारी होती पण ती सिंहासनावर नव्हती ती राजकारणी होती पण ती सत्तेच्या चढाओढीत नव्हती ती पेशव्यांशी निष्ठावंत होती पण ती त्यांच्यापुढे नतमस्तक नव्हती ती व्रतस्थ होती पण ती संन्यासीनी नव्हती.

अहिल्यादेवीचे सर्व चित्रण पहाता एक लक्षात येते की होळकर राज्याच्या सर्वेसर्वा अहिल्याबाई होत्या त्या आधारस्तंभ होत्या सर्वांचे छत्र हारवल्यानंतर ही त्यांनी व्यवस्थीत आपली जबाबदारी सांभाळली होती. स्त्री कर्तृत्वाची हे उत्तम व आदर्शवादी उदाहरण आहे. त्या. एक उत्तम गृहीणीदेखील होत्या त्यांनी केलेले सामाजीक कार्य धार्मीक कार्य हे खरोखरच भारतीयांना प्रेरणा देणारे आहे.

हिरकणीच बि-हाड :- सुनिता आरळीकर -

या पुस्तकात लेखिका सुनिता आरळीकर यांनी स्वतःचे आत्मकथन लिहिलेले आहे. यामध्ये त्याच्या लहानपणापासुन त्यांच्या वाटयाला आलेल्या प्रत्येक क्षण त्यांनी कशाप्रकारे घालवला यांचे वर्णन केलेले आहे. सुनिता यांचे आईकडील नाव शिवकांता होते त्यांची आई लहानपणीच वारलेली असते. त्यांनतर आईचे वडील तिचा सांभाळ करतात तिला सावत्र आई असते. कावेरीला एक सावत्र मावशी होती दोघीही सारख्याच वयाच्या होत्या मोठया झाल्यावर आजोबाने वडीलांचे नाव म्हणुन स्वत:चे नाव लावलेले असते. शिवकांताला गरिबी परिस्थितीमुळे कपडे, पुस्तके, वहया तसेच पुरेशे खायला मिळत नसे ते जातीने चांभार होते. त्याकाळी विटाळ पाळला जात असल्यामुळे शिवकांताला लहानपणी खुप त्रास व्हायचा त्यांचे आजोबा चप्पल शिवुन पैसे कमावत असे शिवकांता चप्पल जोडे लोकांच्या घरी नेवुन देत असे शिवकांता जशी मोठी झाली तशी लहान मोठी कामे करु लागली मंदीरासमोर जावुन भिक मागुन आणणे व खाणे अशी कामे करावी लागत. शिवकांता आभ्यासात हुशार असे त्यामुळे शिक्षक त्यांना मदत करायचे शिवकांताला घरकाम व शाळा करतांना तारेवरची कसरत करावी लागे. तिला अनेक कामे करावी लागे रोजाने पाणी भरणे चप्पला जोडे घरी नेवुन देणे शाळा करणे शिवकांता पाचवी पास झाल्यानंतर सातवी बोर्डाची परीक्षा देण्यासाठी जावु लागली या गोष्टीचा तिला खुप आनंद झाला. खायला पोटभर मिळत नसे तेव्हा शिक्षक तिला खुप मदत करायचे शिवकांताला गाण्याची ही आवड होती. शिकण्याचा खर्च झेपत नव्हता म्हणुन शिवकांता मोठी झाल्यावर आपल्या वडीलांकडे व सावत्र आईकडे गेली परंतु सावत्र आई तिला धासफुस करत होती खायला देत नसे व कामे करुन घेत असे. तिला सावत्र बहीण, भाऊ होते सावत्र आईने एकदा भाकरीमध्ये विष घातले होते व शिवकांताला मारण्याचा प्रयत्न केला होता. तिचे सावत्र बहीण भाऊ तिच्या वहया पुस्तके लपवुन ठेवु लागले गाई म्हैसीचे शेण काढणे. शाळेच्या विविध स्पर्धामध्ये शिवकांताला पहिला नंबर मिळत असे तेव्हा तिच्या आजोबांना खुप आनंद झालां. शिवकांता व कावेरी सातवी बोर्डाची परीक्षा चांगल्या गुणांनी पास झाल्या तेव्हा दादा-बाईला खुप आनंद झाला व ते सर्व गावांमध्ये सांगु लागले घरच्या परीस्थितीमुळे शिक्षणाचा खर्च झेपत नव्हता परंतु सर तिला मदत करायचे शिवकांताची सावत्र आई तिला नेहमी मारण्याचा प्रयत्न करत असे नंतर कावेरी व शिवकांता लातुरला गेल्या तेथे एका दवाखान्यात नर्स म्हणुन काम करु लागल्या अशातच तिची आरळीकर शी भेट झाली ते तिला खुप मदत करु लागले शिवकांता व कावेरी यांच्यात नेहमी भांडण होऊ लागले शिवकांताचे आजोबा व आजी ही लातुरला आले पण त्यांना हे पटत नव्हते.

प्रत्येक माणुस जगण्यात एकटा असतो न त्याला जगण्याचा आपला मार्ग आपणच शोधावा लागतो प्रत्येक माणसाचा हा जीवन जगण्याचा प्रकाश वेगळा असतो. अनुभव वेगवेगळे असतात. आजच्या जगण्यात एका माणसाच जगण दुस-या माणसाच्या जगण्यात अडथळा होऊ देत नाही. माणसामाणसाच्या जगण्यात अडथळा आणतात बाई म्हणुन जगण्यातला पहिला अडथळा जात पध्दती खालच्या जातीची असेल तर अडथळयांचा प्रवास सुरु होतो.

पण अशा अडथळयांचा प्रवास करतांना एखादया बाईन आपल्या जगण्याला. एक आकार दिला. एक मांडणी दिली आणि अनंत दीर्घ प्रयासानंतर जगण आपल्या ताब्यात घेतले तर व्यक्तीगत कौटुंबीक जातीय सामाजीक राजकीय आर्थीक भावनिक अशा प्रत्येकच बाबतीत अडथळयावर मात करत स्वतःच्या आणि आपल्या कुंटुबाच्या आयुष्याची उभारणी करणा-या एका बाईची गोष्ट आगदी खरीखुरी आहे.

महषी ते गौरी – मंगला आठले मर -

या पुस्तकात लेखिका मंगला आठलेकर यांनी स्त्री जीवनाचे वास्तवादी चित्रण रेखाटलेले आहे. पुरुषप्रधान संस्कृत्ती मानणारे आर्य भारतात आले हयांनी बालविवाह बहुपत्नीत्व विधवांचा अमानुष छळ सतीची चाल अशा अनेक भयानक व

स्त्रीची विटंबना करणा-या चालीरिती सुरु केल्या हिंदु समाजातील स्त्रीचा अधिकार काढुन टाकला आणि पुरुषप्रधान व स्त्री दुय्यम हे सुत्र समाजमनात पक्क रुजवुन टाकल तेव्हापासुन ते एकोणिसाव्या शतकात इंग्रजांचे राज्य येईपर्यंत स्त्रीची स्थिती काडी मात्र बदलली नव्हती सर्वत-हे चंदास्य मुकाटयान स्वीकारलेल्या होत स्त्रीनिसर्गत दुबळी म्हणुन त्याच्या अंकीत झाली नंतर तिच्यावर त्याग सेवामातृत्व अशा देवत्वाच्या कल्पना लादल्या गेल्या आणि तिला त्या शब्दाची गुंगी चढत गेली. शिक्षण नाही म्हणुन आर्थिक परावलंबन आणि निसर्गत शरीर दुबळ म्हणुन सोबतीची गरज यामुळे तिला पर्यायान समाजाला ही तिच पुरुषावर अवलंबुन असणे सवयीच झाल, स्त्रीची ही पराधीनता गैर आहे किंवा तिच्या संरक्षणापेक्षा तिच्या छळाला अधिक धोका ठरला.

स्त्री शिक्षण आणि स्त्रियांचा उदार हेच आपल्या जीवनाच श्रेय समान ण-या महर्षी कर्व्यांच बालपण चार सर्वसामान्य मुलासारख होत व याच्या पंधराव्या वर्षी त्यांचे लग्न झाले परंतु वैवाहिक जीवनाला सुरुवात झाली आणि त्यांची पत्नी मरण पावली तेव्हा त्यांच्या डोक्यात दुस-या लग्नाचा विचार येवु लागला तेव्हा विधवेशी पुर्नविवाह करायचे ठरवले. घरात बहीण व अंबाताईचे वैधव्या ते पहात होते विके शास्त्रीवर विधवेवर पुरषांची वाकडी नजर जाण्यान आणि त्यातुन गर्भधारणा होण्यान त्या स्त्रीच्या कशा विटंबना होत असे या लग्नासाठी गोदुबाईच्या वडीलांनी स्थळ सुचवले त्याकाळी अनेक विरोधी प्रतिक्रीया आल्या कर्व्याच्या पुनर्विवाहावर कडाडुन टीका झाली. त्याकाळात बालविवाहामुळे अगदी लहान कोवळया वयात मुली विधवा होत केशवपनानंतर होणार आपल्या मुलीच विद्रुप बघतांना स्त्रीवर अन्याय करणा-या अशा रुढीच्या आईबापांनी मनातल्या मनात धिकार केला असेल पण समाज रुढी पुढे ते असहाय होते मुलीच पुन्हा लग्न लावुन देण्याचे सामर्थ्य आईबडीलांमध्ये नव्हते.

रागिणी तु जिंकलीस :- अरुणा श्रींखेडे -

या पुस्तकामध्ये लेखिका अरुणा श्रींखेडे यांनी स्त्री जीवनाची कहाणी सांगितली आहे. रागिणी हीर कोकणातील असते तिची पहिले लग्न होते परंतु नवरा दुस-या बाईच्या नादाला लागतो त्यामुळे त्याच्या आईलाही तोन कोसा होतो. व सुन ही नकोसी वाटते त्यामुळे रागिणीला फसवुन घटस्फोट दिला जातो. नंतर काही दिवसांनी रागिणीचे उमेशबरोबर लग्न होते उमेश मुंबईत रहात असतो घरी आई आजोबा व बहीण असते. रागिणीला भाऊवडील वहिणी कोणी ही रागिणीला विचारपुस करत नाहीत. उमेश हा बँकेत नोकरीला असतो एकदा रागिणी व उमेश कोकणात जातात तेव्हा तिचा भाऊ वहिणी तिच्या परत जाण्याची वाट पाहतात. परत जातांना उमेश पाच हजाराचा चेक तिच्या वडीलाजवळ देतो तेव्हा त्यांना उमेशचा चांगुलपणा सर्वांना कळतो परंतु रागिणीला या गोष्टीचे फार वाईट वाटते. आपल्या इतक्या चांगल्या नव-याची पारख या माणसांना नाही याचे दुःख तिला होते. तिने आपले दुख मावशीला सांगितले उमेशला हया गोष्टीचे वाईट वाटत नाही उलट तो रागिणीला समजावुन सांगतो एकदा तिच्या भावाचे पत्र येते व तो पैसे मागत असतो व आपल्या मुलांना सांभाळतो परंतु तिला खुप राग येतो. ती पत्र फाडुन टाकते व बाथरुम-मध्ये जावुन रडु लागते रागिणीचे सासरे सासु नणंद नवरा हे खुप चांगले असतात परंतु रागिणीला इथे ही परकेपणा जाणवतो आपले जीवन पुरुषांच्या हातात आहे. आपण शेवटी आपल्या आहोत यांची जाणीव होते रागिणी मनामध्ये कुडत असते तिकडे रागिणीच्या बाबाला सुन जेवायला देत नाही म्हणुन ते ही मुंबईला येतात रागिणीला माहेरचे कोणी ही नकोस वाटते परंतु रागिणीच्या माहेरच्या लोकांचे हात चालले होते. तिचा भाऊही मुंबईला येऊन रहात असे रागिणीला उमेश प्रत्येक गोष्ट पुरवत असे तिच्या पासुन प्रत्येक दुख लांब ठेवत असे तिला पुढे शिकण्याची संधी दिली ती महिला मंडळाची अध्यक्ष झाली होती रागिणीची चुक नसतांना ही तिला घटस्फोट मिळाला होता. ति पहिल्या नव-याला विसरु शकत नव्हती पहिल प्रेम विसरण तिला शक्य नव्हते उमेश इतका सरळ मार्गी सुस्वाभावी लाजाळु व साधा ही होता दोघांचे सुर जुळले रागिणीवर खुप प्रेम करीत होता. सासुही प्रेमळ होती रागिणीवर कसलेही बंधन नव्हते रागिणी संसारात पुर्ण रमली होती परंतु रागिणीला माहेरचे प्रेम कधीही मिळाल नाही काकण चोळी भेटली नाही रागिणीचे आई लहानपणी वारली होती त्यामुळे रागिणीला आईची उणीव तिच्या सासुने कधीही भासु दिली नाही रागिणीला पहिल्यावेळी कन्या झाली त्यावेळी तिला खुप वाईट वाटले आपल्या सारखे जीवन आपल्या मुलीच्या वाटयाला येईल या गोष्टीची भिती वाटत होती.

रागिणी आपल्या नंदेवर खुप प्रेम करायची घरातील सर्व कामे जी स्वतः करायची सासुसासरे यांचे सर्व वेळेवर करायची रागिणीला माहेरच्या लोकांचा खुपच त्रास होवु लागला परंतु उमेश सर्व सांभाळुन घेत असे रागिणी त्रास होईल असे कोणतेही काम करत नसे परंतु रागिणीला मिलींदची राहुन राहुन आठवण येत असे रागिणी देवापुढे बसुन प्रार्थना करीत असे देवाचे आभार मानत असे तिच्या जीवनात उमेश प्रकाश रुपाने आला आहे याचे तिला आनंद वाटत असे देवाजवळ जन्मोजन्मी हा नवरा भेटावायाची प्रार्थना करीत असे परंतु स्त्री जन्म तिला नको होता उमेशचा संसार ती चांगली सांभाळत होती उमेश तिला गृहलक्ष्मी मानत होता तिला संपुर्ण स्वातंत्र्य मिळाले होते परंतु रागिणी काटकसरी स्वभावाची होती ति कधी ही पैसा जास्त खर्च करत नव्हती तिने आपल्या नणंदला लेखनाची आवड लावली व तिच्या लेखनातुन अमर झाली होती.

रागिणीचा दुसरा संसार सुरु होतो परंतु तिची लक्ष पुर्ण पहिल्या नव-याकडे असते स्त्रीच्या सहन शक्तीची ताकद असते यांचे चित्रण यामध्ये केलेले आहे.

बा कस्तुरबा : -

या इयत्ता पाचवीच्या पाठयक्रमात शांता बुध्दसागर यांनी हा पाठ लिहिलेला आहे यामध्ये एका कर्तृत्ववान स्त्रीचे त्यागमय जीवन परिचय सांगितलेला आहे. बा कस्तुरबा या महात्मा गांधी यांच्या पत्नी होत्या महात्मा गांधी प्रमाणे त्या आश्रमात सेवा भावी पणे काम करत अत्यंत साधेपणाने राहणा-या प्रेमळ व त्यागमय जीवन जगणा-या कस्तुरबाच्या व्यक्तीमत्व होते बाया शब्दांचा अर्थ माता असा होतो कस्तुरबा यांना सर्वजण आदराने माता म्हणत महात्मा गांधीजीनी साबरमती येथे आश्रम स्थापन केले होते. येथे त्या रहात होत्या सणाला त्या आश्रमातील लोकांना मिठाई वाटत असत सर्वांची आईसारखी काळजी घेत आणि सुतकाताई करत असत आश्रमामध्ये सर्वजण कामे करत असत. कस्तुरबा यांनीही महात्मा गांधीसारखे एकच साडी घालत चैनीच्या वस्तुचा त्याग केला होता. आपल्या शरीराची पर्वा न करता देशासाठी स्वतंत्र्य महत्वाचे आहे अशा स्थित त्यास त्या गृहात सहभागी झाल्या कस्तुरबा यानिश्चयी होत्या त्यांनी आपला आदर्श सर्वांसमोर मांडला कस्तुरबा गांधी यांनी आश्रमामध्ये इंग्रजी शिकल्या होत्या त्यांच्या मध्ये सर्वधर्म समभाव हा गुण होता.

भारताला स्वातंत्र्य नसतांनादेखील काही स्त्रिया अतिशय निर्भीडपणे खंबीरपणे कामे करत होत्या त्यांचा आदर्श आजच्या स्त्रीला घेण्यासारखा आहे.

गरिबांची आई :-

या पाठामध्ये लेखिका आशा कर्दळे यांनी एका अतिशय समजदार, प्रेमळ, आशा व गरिबाची तळमळ असलेल्या स्त्रीचे वर्णन केलेले आहे. या स्त्रीचे नाव मदर तेरेसा आहे. या विनम्र वृत्तीने त्या जगात शांतता प्रस्थापित करण्याचा मानवतेची सेवा हाच राजमार्ग असतो. हे त्यांनी सिध्द केले आहे त्यांची निवड निर्विवाद आणि पारितोषीकाची शान वाढवणारी ठरली कारण गेल्या काही वर्षात अनेक नेत्यांना, पुढा-यांना पुरस्कार मिळत असे. समाजातील गरीब, अनाथ, अपंग व रुग्णांची मानवतेच्या विशाल भावनेतुन यांनी सेवा केली. शाळा, अपंग, संस्था उपचार केंद्र अशा अनेक संस्था त्यांच्या सेवा कार्यातुन निर्माण झाल्या मदर तेरेसा हया अत्यंत साध्या प्रेमळ व वळवळीच्या होत्या त्यामुळे त्यांच्यावर लोकांचाही विश्वास होता. झोपडपट्टीमध्ये राहणा-या रुग्णांची सेवा त्यांनी केली आपण या जगात प्रेम करायला आलो आहोत एकवेळ पोटची भुक भागवता येईल पण प्रेमाची भुक भागण फार कठीण आहे.

या पाठातुन प्रेमाचा संदेश दिलेला आहे. आजारी माणसांची सेवाही देवाची सेवा आहे सर्वात मोठे कार्य व समाजसेवा आहे त्यामुळे हे कार्य करण्यासाठी सर्वांनी हातभार लावला पाहिजे.

१.३ समारोप :-

आज भारतीय स्त्री कितीही समोर गेली असली तरी तिला हवा असलेला मानसन्मान मिळतो का आज जरी पुरुषाच्या खांदयाला खांदा लावुन चालत असली तरी कित्येक घरांमध्ये स्त्रियांना कोंबल्या जात असुन तिच्यावर अन्याय अत्याचार केला जात आहे. खर पाहिल तर आपल्या देशमध्ये स्त्री पुरुष समतेचा नारा दिला जातो मग पुरुष आपल्या पुरुषी अहंकाराने स्त्रीयां समोर उपस्थित होत आहे. आजच्या स्त्रीने अंतराळ यात्रा केली प्रत्येक श्रेयामध्ये ती पुरुषाशी बरोबरी करीत असली तरी तिला पाहिजे तो मानसन्मान मिळत नाही.

आज स्त्रीला रस्त्यावर चालणे कठीण झाले आहे कारण एखादया निर्जन रस्त्यावरुन स्त्री एकटयाने जातांना दिसली की आपल्या समाजातील काही विकृत मनावृत्तीचे पुरुष तिची छेड काढत असतात त्यांना हे कळत नाही को स्त्री ही आपल्यामधीलच कुणाची तरी आईबहीण पत्नी असेल समाज आजही हेच समजतो की स्त्री ही फक्त वासना तृप्तीचे साधन आहे. पण हा चुकीचा समज आहे. खर तर स्त्री ही वात्सल्याची मुर्ती आहे ती मायाळु असते सर्वांना ती आपल्यात सामावुन घेत असते आपल्याबरोबर सर्वांचे हित जोपासणारी असते. वेळ आल्यास स्वत: त्या झोकुन घेण्यास ती मागेपुढे पाहत नाही पण खरच या स्त्रीला मान मिळतो का याचा विचार करावा लागतो. मिळतो तो फक्त अनौपचारिक मान मिळतो त्यापेक्षाही आजच्या स्थितीत समाजात मोठया प्रमाणात क्रुर घटना घडत आहे. अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याच्या घटना आता रोजच घडतात. स्त्रीही आपले पोट भरण्यासाठी विविध प्रकारची कामे करते काही बदनाम वस्तीतील स्त्रिया तर आपले शरीर विकुन पोट भरतात कारण असे धंदे करायला पुरुषच स्त्रीला परावृत्त करतात. त्यामुळे वाईट धंदे तिला करावे लागतात आपल्या समाज व्यवस्थेची रचना तशा प्रकारची करण्यात आली आहे. मग अशा समाज रचनेत स्त्रीलाच दोषी का धरण्यात यावे पुराणामध्ये पवित्रता सिध्द करण्यासाठी अग्नी परिक्षा देण्याची उदाहरणे आहेत परंतु आपल्या शीलाची पवित्रा सिध्द करण्यासाठी पुरुषाने अशी परीक्षा दिल्याने एखादे उदाहरण आढळत नाही.

शेवटी स्त्रीचा जन्म केवळ पुरुषांच्या वासनापुर्तीचे साधन म्हणुनच झाला तरीही स्त्रीनेसुध्दा आपल्या सामाजिक मर्यादांचे पालन करणे जरुरीचे आहे. कारणआजच्या स्थितीमध्ये भारतीय स्त्रियांवर पश्चीमात्य संस्कृतीचा प्रभाव पडलेला

दिसत आहे कामात अनेक अडचणी येतील तरी ही वाटचाल कायम ठेवायला हवी वा-यावर नियंत्रण ठेवता येत नाही म्हणुन कोणी जहाज सोडुन जात नाही. काहीही न करता यशस्वी होण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा काहीतरी करण्यासाठी प्रयत्नशील राहुन अयशस्वी होणे अधिक चांगले परिस्थीती सुधारण्यास बराच काळ जावा लागतो.

संदर्भ सुची :

१) विनया खडपेकर, **ज्ञात**, **अज्ञात अहिल्याबाई होळकर**, राजहंस प्रकाशन पुणे

२) सुनिता आरळीकर, **हिरकणीच बि-हाड**

३) मंगला आठलेकर, **महर्षी ते गौरी**,राजहंस प्रकाशन पुणे, प्रकाशन वर्ष - १९९९

४) अरणा श्रीखंडे, **रागिणी तु जिकलीस**, शितल प्रकाश कोल्हापुर - २००९

५) धडा – **बा कस्तुरबा**, लेखक – शांता बुध्दसागर

६) घटकाचे नाव – **गरिबांची आई**, लेखिका – आशा कर्दळे

मराठी दलित साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

श्री. अभिजीत भगवान सारंग
श्री. एम. ए. शेख
सहशिक्षक, अजीम कनिष्ठ महाविद्यालय, औसा जि. लातूर

विद्ये विना मती गेली |
मती विना निती गेली ||
निती विना गती गेली |
गती विना वित्त गेले ||
वित्त विना शुद्र खचले |
इतके अनर्थ एका अविद्येने केले ||

जेंव्हा समाजजीवनाचा तोल ढळतो, तत्वांना ग्लानी येते, नीतीचा विपर्यास होतो. आणि माणसांचा पशू होतो, तेंव्हा समाजाला सावरणारा कोणी तरी महात्मा प्रकट होतो. तो बुध्द असले किंवा ख्रिस्त असेल, सॉक्रेटीस असेल किंवा गांधी असेल; फुले असेल किंवा आंबेडकर असेल हा समाजपुरूष वेदनांच्या वाटेने चालत राहतो. अशा थोर महापुरूषांच्या विचाराने प्रेरित होऊन मराठी साहित्यविश्वात दलित साहित्याची भर पडली व चौफेर लिखानाला सुरूवात झाली.

भारतीय स्वातंत्र्याची प्राप्ती ही भारतीयांच्या इतिहासांतील एक अत्यंत महत्वाची घटना आहे. दीडशे वर्षाची ब्रिटीशांची गुलामगिरी संपून भारत राजकीय दृष्टिने स्वतंत्र आणि सार्वभौम म्हणून जगाच्या नकाशात झळकू लागला. मराठी साहित्य विश्वात अनेक स्थित्यंतरे घडून आले. १९६० नंतर ग्रामीण साहित्याबरोंबर दलित साहित्यांची चळवळ सु डिग्री झाली. साहित्यिक जाणीवेच्या मुळाशी होते. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे अनेक समाजघटक जागृत झाले आणि आपल्या प्रश्नासाठी चळवळी सु डिग्री केल्या. ह्या उपेक्षित घटकांनी चळवळी बरोबरच आपले प्रश्न आपल्या साहित्यातून मांडले. साहित्य केवळ मनोरंजनाचे साधन न राहता ते सामाजिक प्रश्नाचेव्यासपीठ बनले. दलित साहित्यातून स्त्रियांच्या प्रश्नांचा उहापोह केला जाऊ लागला, म्हणून दलित साहित्याची पार्श्वभूमी समजून घेणे महत्वाचे ठरते.

आज आपण ऐहिक जीवनावरील पारलौकिकाचे नियंत्रण अमान्य केले आहे. ऐहिक जीवन म्हणजे माणसाचे त्याच्या जन्मापासून मृत्युपर्यंतचे जीवन. ह्या जीवनाताचा हेतू मोक्ष मिळविणे, जन्म मरणाचा फेरा चुकविणे, इत्यादी असे समजले जात असे. त्यासाठी पाप टाळावे, पुण्य मिळवावे असे सांगितले जाई. हा अधिकार धर्मशास्त्रांना होता. धर्माचा आधार देव आहे. आणि देवाचा आधार श्रद्धा आहे. देव, धर्म, श्रद्धा ह्या गोष्टीचे आमच्या जीवनावर नियंत्रण होते. स्वातंत्र्यानंतर ह्या गोष्टी व्यक्तीच्या व्यक्तिगत उपासणेपुरत्या पाळण्याचे स्वातंत्र्य व्यक्तिला देण्यात आले आहे. पण आपले ऐहिक जीवन समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता ह्या आधारे उभारले जाते असा नवा दृष्टिकोन आम्ही स्वीकारला.

कोणतीही व्यक्ती जन्माने श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते. व्यक्तिला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य सर्व बाबतीत असावे. शिक्षण व व्यवसायाचे स्वातंत्र्य असावे; असे मानणारी नवी विचारसरणी आम्ही स्वीकारली पण हे एकाएकी घडले नाही. गेल्या शे-दीडशे वर्षात आमच्याकडे ज्या निरनिराळ्या चळवळी झाल्या त्यांचे फलित म्हणजे आजचे आमचे जीवन. त्यासाठी आपल्याकडे कोण-कोणते संघर्ष झाले, हे मागे वळून पाहणे रंजक ठरेल आणि ते दलित साहित्य समजून घेण्यासाठी उपयुक्त देखील ठरेल.

ब्रिटीश राजवटीत इंग्रजांनी शाळा काढल्या, लोकांना व्यवसाय मिळाले. अडाणी लोकांवर राज्य करण्यापेक्षा थोड्याबहुत शिकलेल्या लोकांवर राज्य करणे अधिक सोयिस्कर असते. असाही एक उद्देश ह्या शाळा काढण्यामागे होता. शाळेत प्रवेश, लष्करात भरती, गोदीत अथवा रेल्वेत नोकरी, व्यवसाय स्वांतत्र्य यामुळे व्यक्तीचा सामाजिक दर्जा उंचावला व परंपरागत भारतीय समाजव्यवस्थेला हादरा बसला.

इंग्रजी राजवटीचा एकाचवेळी आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेवर परिणाम झाला. समान शिक्षण, व्यवसायात सगळयांना समान संधी ह्यामुळे भारतीय माणूस एका बाजूला इंग्रजनिष्ठ होऊ लागला, तर दुस-या बाजूला वर्णव्यवस्थेला धक्का पोहचल्यामुळे इथल्या वर्णव्यवस्था आणि जातिप्रधान समाजात फुटिरतेलाही आरंभ झाला.

थोडक्यात इंग्रजी राजवटीचे परिणाम आपल्याला पुढीलप्रमाणे दिसून येतात.

1. गरीब माणसाला नवे व्यवसाय उपलब्ध झाले.
2. ह्या व्यवसायासाठी हवे असणारे शिक्षण सगळयांना खुले झाले.
3. वतने खालसा झाली. ऐपतीप्रमाणे शेतकरी जमिनीची खरेदी क डिग्री लागला. नगदी पीक म्हणून कापसाचे उत्पादन घेऊ लागला.
4. सामान्य माणसाचा आर्थिक स्तर उंचावण्याला पोषक वातावरण निर्माण झाले.
5. नव्या न्यायव्यवस्थेमुळे व्यक्तीवरील जातीचे नियंत्रण कमी होऊ लागले.
6. व्यवसाय स्वातंत्र्यामुळे प्रचलित वर्णव्यवस्थेला हादरा बसला.
7. धर्मप्रसाराची लाट थोपून धरण्यासाठी आणि सामाजिक सुधारणांकडे लोकमत अनुकुल करूण घेण्यासाठी धर्म, शास्त्र, तत्वज्ञान, रूढी ह्या सगळयाच बाबींचा नव्याने अभ्यास सुरु झाला.
8. भारतीय माणसाचा जीवनविषयक दृष्टीकोन बदलला. ऐहिक जीवनाचे महत्व त्याने मान्य केले.व्यक्तीस्वातंत्र्याचे तत्व स्वीकारले. व्यक्तीस्वातंत्र्याला सुसंगत असणारी समतेची आणि न्यायाचीकल्पना त्याने स्वीकारली.

साहित्य निर्मितीच्या दृष्टीने सगळयात अधिक महत्वाचा परिणाम शेवटचा होय. मराठी भाषेत आधुनिक वाङ्मयाचा प्रवाह निर्माण झाला. त्याची परिणती म्हणजेच दलित साहित्य होय.

महात्मा फुले यांनी बहुजन समाजाच्या स्वातंत्र्यासाठी उच्चवर्णियांविरूध्द संघर्ष उभा केला. हा लढा केवळ सामाजिक गुलामगिरी विरुध्द नव्हता. सत्तांतर होणे अगर न होणे, स्वातंत्र्य, समतेवर उभा असणारा समाज इथे निर्माण व्हावा हेच उद्दिष्ट्ये होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ख-या अर्थाने दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहेत. डॉ. आंबेडकरांनी 14 ऑक्टोंबर 1956 रोजी आपल्या लाखो अनुयायांसह धर्मांतर केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काळातच त्यांच्या अनुयायांनाही कंठ फुटला. बाबासाहेबांना अभिप्रेत असणा-या समाजाची स्वप्ने त्या काळातील कवींनी पाहिली. कवी वामन कर्डक यांच्या कवितेवर तो प्रभाव दिसून येतो.

व्हा रे सारे डोंगरलाटा
कर्मठांचा जिरवा ताठा
व्हा तुफान प्राण पिसाळून
सारा सागर काढा खणून

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या शब्दांत सांगायचे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे हिंदू समाजाच्या प्रत्येक जुलमाविरूध्द पुकारलेल्या बंडाचे प्रतीक होय. एकंदरीत व्यक्तीच्या स्वातंत्र्यला न्याय मिळू लागले.

दलित साहित्याचे स्वरूप :

परिवर्तनाच्या चळवळीमुळे दलितांना जे आत्मभान प्राप्त झाले. त्याचा परिणाम म्हणजे दलित लेखक. आपल्या सभोवतीचं वास्तव न्याहाळू लागला. त्या वास्तवाशी आपले नातेसंबंध शोधू लागला. इतिहासात आपले स्थान पाहू लागला. जी संस्कृती आली आहे; असे हजारोवर्षे तो मानत आला. त्या संस्कृतीशी असलेले आपले नातेसंबंध न्याहाळू लागला. हा शोध म्हणजे 'आत्मशोध'. ह्या आत्मशोधाची विविध पातळीवरील रूपं आपणाला दलित साहित्यात दिसून येतात. दलित साहित्याच्या निर्मितीचे आदिकारण आत्मभान आहे, तर दलित साहित्याच्या आविष्काराला निरनिराळी रूपं देणारा आत्मशोध हा दलित साहित्यातील अत्यंत महत्वाचा घटक आहे. ह्याच आत्मशोधातून नकार आणि विद्रोहाची भाषा जन्माला येते.

शरणकुमार लिंबाळे म्हणतात –

'बा तू त्यांच्या वाटेवर दिवे लावलेस

पण त्यानी तुझी वाट अंधारीच ठेवली रे!' (येसू)

तर 'मीठ है तर पीठ नाही पीठ है तर मीठ नाही' (दु. मो. लोणे) असं दरिद्री जीवन जगता जगता ज्योती लांजेवर ह्यांची माय –

'देऊ केलेलं उष्ट अन्न स्वाभिमानानं नाकारताना

ते शिकून आंबेडकरावानी होजो बाप !'

असा आशावाद प्रकट करते. कुटुंबातलं अठराविश्व दारिद्र्य आणि ह्या दारिद्र्यातही स्वत:च्या सामर्थ्यावर आंबेडकरासारखे मोठे व्हावे असे संस्कार करणारी माय, बाप, बंधू-भगिनी आपणाला दलित साहित्यात सर्वत्र पाहावयास मिळतात.

महात्मा ज्योतीराव फुले ह्यांनी 'गुलामगिरी' ग्रंथात 'दशावतार' कथेचे केलेले विश्लेषण किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शूद्र पूर्वी कोण होते? ह्या ग्रंथात शूद्रांचा घेतलेला ऐतिहासिक मागोवा ह्या आत्मशोधाचीच उदाहरणे होत. जे वैचारिक वाङ्मयात प्रथम प्रकट झाले तेच नंतरच्या काळात मग ललित वाङ्मयात अवतरले आहे.

सुरूवातीच्या काळात लेखन करणा-या स्त्रियांच्या लेखनावर पुरूषसत्ताक मूलव्यवस्थेचा पगडा असलेला जाणवतो. आपले शरीर आणि सौंदर्य हे पुरूषासाठीच आहे अशा भावना काही लेखकांनी आपल्या कथा-कवितांतून मांडलेल्या आहेत. पुरूषाच्या प्रेमासाठी त्याची आराधना करणे. त्या अनुरोधाने होणारी आपली दैहिक तडफड आणि प्रणभ भावना व्यक्त करणे. अशा स्वरूपाचं रंजकप्रधान लेखनही काही लेखकांनी केलेले मिळते.

विवाहसंस्थेमुळे स्त्रियांचे होणारे शोषण आणि समाजातील तिचे दुय्यम स्थान ह्याविषयी समाजमनात हालचाल सुडिग्री झाली. पुरूषांनी स्त्रीरूपाचे गोडवे गाणा-या त्या कथित उदात्त प्रतिमा निर्माण केलेल्या होत्या. देवता, सती, पतिव्रत्ता, माता, अबला, अर्धांगी, सौभाग्यवती अशा तथाकथित रूपांना तडे जाऊ लागले. जोडीदार, मैत्रिण, सहकारी आणि कार्यकर्ती अशा नव्या रूपात जीवनाच्या अनेक क्षेत्रांत स्त्री अग्रेसर होऊ लागली. तिने अर्धांगी होण्यापेक्षा पूर्णांगी होणे पसंत केले. चूल आणि मूल हे कार्यक्षेत्र मागे पडले आणि तिचे पारंपारिक रूपही पालटले. स्त्रीमुक्ती चळवळीमुळे स्त्रियांमध्ये नवी चेतना निर्माण झाली.

सामान्यपणे जीवनात परिवर्तन झाले की, त्याचे पडसाद वाङ्मयातही दिसून येतात. दलित साहित्याच्या प्रवाहाने स्वत:चे निराळेपण तर सिध्द केले आहेच, शिवाय ह्या प्रवाहामुळे मराठी वाङ्मयही समृध्द झाले आहे आणि मराठी वाङ्मयाच्या कक्षा व्यापक झाल्या आहेत. म्हणून दलित साहित्य हा मराठी वाङ्मयातील एक महत्वाचा प्रवाह आहे.

बाबुराव बागुळ यांच्या मते, "माणसांच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे; माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण, जाती, श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य होय." तर केशव मेश्राम यांच्या मते, "हजारो वर्ष ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्यांना, दलित म्हटले व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य असे सांगता येईल."

नामदेव ढसाळ यांनी दलित साहित्यात परिवर्तन घडवणा-या कविता रचल्या ते बौध्द-दलित चळवळीतील अग्रगण्य नेते होते. त्यांच्या कवितांचे विषय महानगरीय जीवन, स्त्री हे होते. नामदेव ढसाळ ह्यांनी त्यांच्या साहित्यातनू दलित बांधवांच्या वेदना आणि व्यथा मांडल्या. त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव होता.

1973 साली त्यांचा पहिला काव्यसंग्रह "गोलपिन" प्रसिध्द झाला. "मूर्ख म्हाता-याने डोंगर हलवले," "प्रियदर्शनी", "खेळ", "तुही इयत्ता कंची", "या सत्तेत जीव रमत नाही", "मी मारले सूर्याच्या रथांचे सात घोडे", "मी भंयकराच्या दरवाज्यात उभा आहे". निर्वाणाअगोदरची पीडा हे प्रसिध्द आहेत. तर "उजेडाची काळी दुनिया", "निगेटिव्ह स्पेस", "हाडकी हाडवळा" ह्या कादंब-या सुध्दा लिहिल्या. त्यांनी नाटक व क्रांती करणा-या कविता लिहून विद्रोहाच्या मशाली पेटवल्या.

गोलपिठातून नामदेव ढसाळयांनी शोषित, पिडीत स्त्रियांची व्यथा जगापुढे मांडली. जिथे सभ्य, व्हाईट कॉलरवाली माणसे दिवसाढवळया जायला धजावत नाहीत. ह्या जगात जुगार, दा डिग्री आणि शरीराचा व्यवसाय दिवसाढवळया होतो. तिथल्या स्त्रियांच्या नरक यातना, त्यांचे आयुष्य, त्यांचा संघर्ष ढसाळांनी कवितेतून मांडला आहे.

हा भाकरीचा जाहीरनामा
हा संसारेचा रंडीखाना
ही देश नावाची आई....

सामान्य माणसाला काहिही किंमत नाही आणि विद्रोह केल्याशिवाय ती मिळणारही नाही. हे त्यांच्या कवितेतून पदोपदी जाणवत राहते.

बौध्द 'स्त्री' साहित्यिकांमध्ये विशेष उल्लेख असलेली कवयित्री म्हणजेच हिरा बनसोडे. त्या मराठी कवयित्र व समाजसेविका आहेत. त्यांचे 'पोर्णिमा', 'फिर्याद', 'फिनिक्स' हे कविता संग्रह प्रकाशित आहेत.

स्त्रियांच्या आत्मभान जागृतीसाठी स्त्रीकेंद्रित काव्याची निर्मिती हिरा बनसोडे यांनी केली. त्या म्हणतात. माझ्या कवितेने स्वप्नाळू कवितेकडून स्त्रीकेंद्रित कवितेकडे कूस बदलली असे प्रतिपादन "आरशातील स्त्री" या कवितेतून कवयित्री हिरा बनसोडे यांनी केले. स्वातंत्र्याआधीचा माझा जन्म असल्याने स्त्रीयांवरील अत्याचार मी पाहिले आणि ऐकले आहे. स्त्रीयांना आपल्या साहित्यातून न्याय मिळवून देण्यासाठी स्वप्नाळू कवितांकडून स्त्रीकेंद्रित कविता अशी माझ्या कवितेची वाटचाल झाली. त्यांनी फिर्याद या काव्यातून स्त्रीयांच्या व्यथा आणि वेदना मांडल्या.

फुले-आंबेडकरी साहित्य चळवळीतील पहिल्या पिढीच्या महत्वाच्या कवयित्री, 'अस्मितीदर्श', 'निकाल', 'सुगावा', 'भुगवाणी', 'समुचित' इत्यादी नियतकालिकातून सातत्याने काव्यलेखन केले. आपल्या काव्यलेखनातून आणि काव्यवाचनातून 'आंबेडकरी विचारधारा' महाराष्ट्राच्या कानाकोप-यात प्रवाही करण्यात हिरा बनसोडे यांची कविता अग्रणी ठरली. त्यांचे 'पोर्णिमा', 'फिनिक्स' हे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत.

प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंड करणारी, व्यवस्थेला जाब विचारून न्यायहक्कांची, अधिकाराची भाषा उच्चारणारी कविता त्यांनी मुख्यत: लिहिली. समताधिष्ठीत समाजरचनेला जन्म देणारी 'दलित स्त्री'ही त्यांची नायिका आहे. तिचे भावविश्व त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी असल्याने त्यांची कविता सामाजिक वास्तव तसेच सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनेही आपल्या कवितेत घेते. 'डॉक्टर्स ऑफ महाराष्ट्र' या ग्रंथात हिरा बनसोडे यांचा समावेश आहे.

सहज आरशात पाहिले नि डोळे भरून आले
आरशातील स्त्रीने मला विचारले, 'तूच ना गं ती!'
माझेच रूप ल्यालेली, तरीही मी नसलेली
किती बदललीस गं तू अंतर्बाह्य....!
तुला सांगू तुझ्या अंतरीचे सुंदर पूर्वरंग
ऐक हे...! तू कशी होतीस ते!

1960 नंतरच्या मराठी कवितेतील लक्षणीय कवी म्हणजे नारायण गंगाराम सुर्वे. 'ऐसा गा मी ब्रह्म!', 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा', 'नव्या माणसाचे आगमन' हे कवितासंग्रह प्रकाशित. 'दलित काव्यदर्शन', 'कविता श्रमाची', 'गाणी चळवळीची' इत्यादी संपादित ग्रंथ. 'विचार' या कवितेतून कामगार जीवनाशी एकरून झालेल्या सुर्वे यांनी 'स्त्री' चा सन्मान, तिची अस्मिता, तिचा सहवास व आत्मियता व्यक्त केलेली आहे.

कधी विचार असे येतात
जसे थकून यावेत तिस-या पाळीचे कामगार घरात
कुदळ घालून रस्ता खोदणारे शत्रू
चिंब भिजून निथळून सावलीत दमून बसतात.
अशावेळी मला तुझे भारलेले हात हवेत.

माझे विचार व शब्द जेंव्हा थकून जातात त्यावेळी मला तुझे (सहचरणी) ओथंबलेले हात पाहिजेत. तुझी अपार माया मला हवी. तू मला सावरायला हवेस.

म्हणूनच

केशवसूत आपल्या कवितेतून म्हणतात –

"ब्राह्मण नाही, हिंदूही नाही
न मी एक पंथाचा
तेच पतीत की जे आखंडिती
प्रदेश साकल्याचा."

संदर्भग्रंथ:

1. डॉ. कर्वे स्वाती सुहास : जून 2000, स्त्री विकासाच्या पाऊ लखुणा, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे. 411030. पृ.क्र. 258.
2. डॉ. भागवत विद्युत : स्त्री –प्रश्नाची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे. 411030. पृ.क्र. 366.
3. स्वातंत्र्योत्तर वाङमयीन प्रवाह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, मार्च 2011.
4. डॉ. किरवले कृष्णा : दलित चळवळ आणि साहित्य, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे. 411030. पृ.क्र. 324.
5. डॉ. नंदपुरे ईश्वर : दलित नाटक आणि रंगभूमी, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर 440002. पृ.क्र. 179.
6. मराठी युवकभारती इयत्ता बारावी : 2020, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे 4.

प्राचीन मराठी साहित्यातील आधुनिक विचार संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातून व्यक्त होणारे आधुनिक विचार एक समीक्षा

डॉ. सुनीता यादवराव पाटील

सहाय्यक प्राध्यापक शिक्षणशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

प्रस्तावना :

कथा कादंबरी कविता इत्यादी कलाकृतींना साहित्य असे म्हणतात. साहित्य शब्द माध्यमातून साकार होणाऱ्या कल्पनाप्रधान कलाकृतीसाठी साहित्य ही संकल्पना वापरतात. प्रत्येक साहित्यकृती कल्पना प्रधान असली तरी त्याचे मूळ हे वास्तवामध्ये खोलवर रुजलेली असतात. साहित्य हे वास्तवातील घटना प्रसंग इत्यादीची निवड करून त्यांची पुनर्रचना कवी लेखक करत असतो. त्या वास्तवातील घटना आणि प्रसंग यामध्ये साहित्यकार स्वतःच्या ज्ञानाची अनुभवाची त्यात भर घालत असतो आणि एक वास्तव समांतर अशी एक नवनिर्मिती लेखक करत असतो. त्या साहित्य असे म्हणता येईल साहित्य हे समाज हितासाठी लोकहितासाठी असते या साहित्यातून समाजप्रबोधनाचे कार्य केले जाते. साहित्यातून जनजागृती केली जाते. बोलणेही व्यक्तीची अभिव्यक्ती आहे. तर साहित्यातून समाज अभिव्यक्त होत असतो साहित्याची निर्मिती करणारा लेखक समाजाच्या भावभावनांना आशा आकांक्षांना आणि सुख दुखाना शब्दरूपी पंखांचे बळ देत असतो. लेखक समाजाचे चित्र मांडणारा माध्यम आहे, जो पॉल सत्रा विचारवंताच्या मध्ये वाचक आहे, म्हणून लेखक आहे आणि लेखक आहे म्हणून वाचक आहे ते एकमेकांसाठी आहेत. साहित्याबद्दल असं म्हटलं जातं की जे वाचलं जात नाही ते लिहिणं म्हणजे मूर्खपणाची आहे. याही पुढचा विचार असा मानला जातो की लिहिलं जातं ते साहित्य नव्हे, तर वाचलं जातं ते साहित्य होय. लिहिलं तर खूप जातं, परंतु ते सगळच वाचल्या जाते असे नाही. एक व्यक्ती त्याच्या अभिरुची नुसार आवडीनुसार जेवढं वाचावसं वाटतं तेवढं वाचत असतो, म्हणून लेखन आणि वाचन हि लेखक आणि वाचक यांची सहनिर्मिती ठरते.

संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातून व्यक्त होणारी आधुनिक विचार

1) अभंग 1

चित्त मिळेल त्याचा संग |
शोभविता दूर तोची भले || १ ||
ऐसी परंपरा अलीसे चालत |
भलत्याची नीत त्यागावरी || २ ||
हो का पिता पुत्र बंधू कोणी तरी |
विजाती संग्रही धरू नये || ३ ||
तुका म्हणे सत्य पाळावे वचन |
अन्यथा आपण करू नये |

संत तुकाराम महाराज यांनी आपल्या अभंगांमध्ये सामाजिक व्यवहाराचे सूक्ष्मपणे विश्लेषण केले आहे. प्रस्तुत अभंगांमध्ये तुकाराम महाराज यांनी संगती विषयी विचार आपल्या अभंगात मांडले आहेत ते म्हणतात ज्याचं मन आपल्याशी त्याचीच संगत करावी अशा संगतीमुळे एकमेकांना आनंद मिळतो, समाधान मिळते. तसे ज्याच्या संगतीमुळे आपल्या मनात निर्माण होतो .आपलं मन अशा लोकांच्या संगतीमुळे अस्वस्थ होतं, अशा व्यक्तीसोबत दूर अंतर ठेवणे चांगले आहे .अशा व्यक्तीच्या सहवासाचा त्याग करावा हीच खरी नीती होय. मग अशी व्यक्ती असो किंवा बंधू असो किंवा आणखी दुसरा कोणीही

असो आपल्या मुलांवर विपरित परिणाम होत असतो. तर अशा व्यक्तींचा सहवास करू नये .आपण सत्य वचनांचे माणुसकीचे पालन करावे. यापेक्षा वेगळे असे वागू नये. याचाच अर्थ आपल्या सदाचाराला जी व्यक्ती बाधा आणतात, त्यांच्यापासून दूर अंतराने रहावे असे संत तुकाराम महाराज आपल्या अभंगात द्वारे विचार अभिव्यक्त करतात.

या अभंगातून मधून चांगल्या संगतीला महत्त्व दिले आहे चांगल्या व्यक्तीच्या संगती मध्ये चांगले होत असते. जसे चंदनाच्या झाडाच्या जवळपास चंदनाचा सुगंध हा इतर झाडांच्या फांद्यांना सुद्धा येत असतो, तसे सद्गुणी व्यक्तीच्या संगतीत सद्गुण प्राप्त होत असतात.

अभंग क्रमांक 2

अवघा तो शकुन । हृदयी देवाचे चिंतन ।
येथे नसतो वियोग । लाभा उणे काय मग ।
छंद हरिच्या नामाचा । शुचिर्भूत सदा वाचा |
तुका म्हणे हरीच्या दासा | शुभकाळ अवघ्या दिशा |

संत तुकारामांच्या या अभंगा नुसार ईश्वराचे हृदयापासून चिंतन करणे हा संकेत आहे. याखेरीज दुसरा शुभशकुन असत नाही. येथे देव आणि भक्त यामध्ये कोणतेच वेगळेपण नाही. अशा या ईश्वर भक्ताची वाणी नेहमीच शुभ समजल्या जाते .ज्या ईश्वर भक्तांना हरिनाम जपण्याची आवड निर्माण झाली छंद निर्माण झाला. अशा ईश्वर भक्तांसाठी सदासर्वकाळ सर्व दिशा या कल्याणकारक असणार आहेत. आजच्या या आधुनिक युगात सुद्धा संत तुकाराम महाराज यांचे विचार प्रेरक ठरतात. आध्यात्मिक जीवनाला आजच्या काळात सुद्धा खूप महत्त्व आहे. परमेश्वराचे हृदयापासून चिंतन करणे परमेश्वरावर विश्वास ठेवणे परमेश्वरावर श्रद्धा ठेवली तर व्यक्तीला काहीच कमी पडणार नाही. त्याची प्रगती होत राहील असे संत तुकाराम महाराज आपल्या अभंगातून म्हणतात. संतांच्या सहवासात भक्त हा विहीन होतो. त्याच्या मनात असलेले सर्व भ्रम व्यर्थ विचार चुकीच्या समजुती दृश्यात या वस्तू विषयीच्या इच्छा दोघांच्या इच्छा या सर्वापासून अलिप्त होतो. वरील सर्व गोष्टीचा त्याच्यावर काहीही परिणाम होत नाही. त्याचे मन परमेश्वरावर स्थिर होते निश्चल तत्वावर स्थिर होते व यामुळेच भक्ताला देहामध्ये असताना मुक्ती मिळते असे संत तुकाराम महाराज आपल्या अभंगातून विचार व्यक्त करतात.

तुकारामांच्या प्रत्येका अभंगातून त्यांचा जीवन विषयक विचार प्रकट झाला आहे. प्रत्येक अभंगांमध्ये त्यांचे व्यक्तित्व स्पष्टपणाने उमटला आहे.

तुका म्हणे होय मनासी संवाद || आपुलाची वाद सु संवाद करणारे ||

तुकोबा तुकाराम महाराजांच्या मते, जेव्हा व्यक्ती स्वतःची स्वतःशी संवाद साधते तेव्हा त्या व्यक्तीला त्यांच्या मनामध्ये असणाऱ्या प्रश्नाची उत्तरे मिळवून जातात, तेव्हा त्याला स्वतःच्या प्रश्नांची उत्तरं मिळत नाहीत, तेव्हा तो स्वतःच स्वतःच्या संभ्रमात पडतो, असे संत तुकाराम महाराज आपल्या अभंगातून मत व्यक्त करतात.

अभंग क्रमांक 3

नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥१॥
नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल । येइल तैसा बोल रामकृष्ण ॥ध्रु.॥
देवापाशीं मागें आवडीची भक्ति । विश्वासेंशीं प्रीति भावबळें ॥२॥
तुका म्हणे मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ॥३॥

देवाने भक्ताला मधुर स्वर दिला नाही किंवा गोड गळ्याने गाण्यासाठी मधुर स्वर त्याला येत नसला तरी विठ्ठल त्यावाचून भुकेला नाही. परंतु जसा ईश्वराने आवाज दिला आहे. त्याच आवाजामध्ये त्याने रामकृष्ण मंत्र म्हणणे अपेक्षित आहे. भक्ताने पूर्ण श्रद्धेने निष्ठेने देवाची आळवणी करावी. तुकाराम महाराज म्हणतात ईश्वराविषयी दृढ विश्वास ठेवावा.

अभंग क्रमांक 4

अवगुणांचे हाती । आहे अवघी फजीती॥
नाही पात्रासवे चाड । प्रमाण ते फिके गोड॥
विष तांब्या वाटी । भरली लावू नये होटी॥
तुका म्हणे भाव । शुद्ध बरा सोंग वाव॥

संत तुकाराम महाराज म्हणतात, अवगुणी लोकांबाबत अवगुणी, लोकांची या जगामध्ये फजिती होत असते धातूचे भांडे चांगले किंवा वाईट हे पाहण्यापेक्षा, कोणत्या धातूच्या भांड्यातून कोणता रस प्राशन करणे योग्य आहे.तुकाराम महाराज म्हणतात, जर तांब्याच्या वाटीत वीज भरले तर ते विषय असणार आहे त्यामध्ये त्या भांड्याचा काही दोष नाही तशाच प्रकारे अवगुनी व्यक्तीला किती चांगल्या स्थितीत ठेवले तरी तो अवगुणी असणार आहे. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात

अभंग क्रमांक 5

करवितां व्रत अर्धे पुण्य लाभे । मोडवितां दोघे नरका जाती ॥१॥
शुद्धबुद्धि होय दोघां एक मान । चोरासवें कोण जिवें राखे ॥ध्रु.॥
आपुलें देऊनी आपुला चि घात । न करावा थीत जाणोनियां ॥२॥
देऊनियां वेच धाडी वाराणसी । नेदावें चोरासि चंद्रबळ ॥३॥
तुका म्हणे तप तीर्थ व्रत याग । भक्ति हे मारग मोडूं नये ॥४॥

तुकाराम महाराज म्हणतात एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला एखादे वृत्त करायला लावले तर ते त्या व्यक्तीला पुण्य मिळेल परंतु जर चुकले तर दोघांनाही नरकामध्ये जावे लागेल तुकाराम महाराज आपल्या जवळची संपूर्ण संपत्ती दुसऱ्यांना देऊन आपलेच हीच करून घेऊ नये असे म्हणतात तुकाराम महाराजांच्या मते वृत्त, यज्ञयाग हे सर्व भक्ती मार्ग आहेत हे भक्ती मार्ग कधीही सोडू नयेत.

अभंग क्रमांक 6

काय कळे बाळा सदैव दुबळा आहे| नाही हे न कळे हाती काय कोण यावेळी देखिले || ते दृष्टी घालून मिठी |तुका म्हणे भावे माझ्या मज समजावे ||

तुकाराम महाराज म्हणतात, लहान मुलाला जसे आपला बाप श्रीमंत आहे किंवा गरीब आहे हे समजत नाही, आपल्या पित्याकडे काय आहे किंवा काय नाही हे सुद्धा त्या लहान बाळाला समजत नाही तशीच म्हणजे लहान बाळासारखी स्थिती ही माझी आहे माझ्या विठ्ठलाने मला समजून घ्यावे एवढीच अपेक्षा तुकाराम महाराज आपल्या विठ्ठलाच्या प्रति करतात .

अभंग7

एक तटस्थ मानसी एकस हस जची आळसी |दोन्ही दिसती सारखी जाणतो|
पारखी ध्यानी करती जप एक बैसुनी घेती झोप||
एका सर्वस्वाचा त्याग एका पोटासाठी पोटासाठी जोग|
एका भक्ती पोटासाठी एका देवा संगे गाठी ||

तुकाराम महाराज वरील अभंगाद्वारे म्हणतात, एक व्यक्ती ईश्वराची भक्ती करत ते आणि दुसरी व्यक्ती आळसामुळे तटस्थ बसली आहे. दोन्ही व्यक्ती दिसायला सारखीच बसलेली वाटत असले तरी परंतु त्यांच्या मनामध्ये भाव हा वेगवेगळा आहे. एक व्यक्ती सर्वस्वाचा त्याग करून साधू होतो तर दुसरा व्यक्ती पोट भरण्यासाठी साधू होतो. अशा प्रकारे तुकाराम महाराज म्हणतात दोन्ही व्यक्ती शारीरिकदृष्ट्या सारखेच आचरण करत असले, तरी त्यांच्या मनामधील मनोभाव हा खूप वेगळा आहे. त्यामुळे त्यांच्या मनोभावाने नुसार त्यांना फळे ही वेगवेगळी मिळणार.

अभंग 8

बोलविसी तैसें आणीं अनुभवा । नाहीं तरी देवा विटंबना ॥१॥
मिठेंविण काय करावें मिष्टान्न । शव जीवेंविण शृंगारिले ॥ध्रु.॥
संपादणीविण विटंबिले सोंग । गुणेंविण चांग रूप हीन ॥२॥
कन्यापुत्रेंविण मंगळदायकें । वेचिलें हें फिके द्रव्य तरी ॥३॥
तुका म्हणे तैसी होते मज परी । न देखे अंतरीं प्रेमभाव ॥४॥

हे विठ्ठला तू मला जसे बोलण्यास शिकवतो अनुभव देतो तसे चांगले माझ्याकडून लिहिले जाऊदे अन्यथा या जगात माझी नामुष्की होईल. भोजनाला मिठाशिवाय नाही तसेच शरीरात प्राण नाही. त्या शरीराला शृंगाराचा काही उपयोग नाही कन्या पुत्रा शिवाय मंगलमय काही नाही

सर्व उदाहरणावरून तुकाराम महाराज म्हणतात ज्या व्यक्तीच्या मनात भाव नाही त्या व्यक्तीची भक्ती कोणत्याच कामाची नाही.

अभंग 9

हरीच्या जागरणा । जातां कां रे नये मना ॥१॥
कोठें पाहासील तुटी । आयुष्य वेचे फुकासाटीं ॥२॥
ज्यांची तुज गुंती । ते तों मोकलिती अंतीं ॥२॥
तुका म्हणे बरा । लाभ काय तो विचारा ॥३॥

देवाचे नामस्मरण देवाची भक्ती करण्याचा विचार तुझ्या मनात येत नाही का? असा प्रश्न केला आहे जर असा विचार तुझ्या मनात येत नसेल, तर तुझे जीवन व्यर्थ जात आहे, असे तुकाराम महाराज म्हणतात ज्याच्यासाठी तु सर्व जीवन खर्च करीत आहेस ते तुला शेवट पर्यंत साथ देणार आहेत का? असा प्रश्न तुकाराम महाराजांनी विचारला आहे म्हणून तुझ्या जीवनाचे सार्थक कशामध्ये आहे? याचा विचार प्रथम तू कर असं तुकाराम महाराज आपल्याभक्तांना म्हणतात .

संदर्भ ग्रंथ सूची

1) डॉ.सदानंद मोरे - तुकाराम दर्शन सकाळ प्रकाशन पुणे
2)डॉ. साळुंखे साळुंखे विद्रोही तुकाराम सदाशिव बागाईतकर स्मृती म|ला पुणे .
3) विष्णू बुवा जोग महाराज ,1909 सार्थ श्रीतुकारामाची गाथा केशव भिकाजी ढवळे प्रकाशन मुंबई

"ग्रामीण कवितेतील स्त्री चित्रणाचे बदलते स्वरूप"

प्रा. विक्रम उ. मोरे

मराठी विभाग, गो.से.विज्ञान, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, खामगाव, जिल्हा -बुलढाणा .४४४३०३.

उद्दिष्टे: ग्रामीण कवितेतील स्त्री जीवनाचे बदलते संदर्भाने, स्वरूप अभ्यासणे.

जागतिकीकरण आणि स्त्री जीवनाचे चित्रण समजून घेणे.

प्रस्तावना:-

ग्रामीण साहित्याचा प्रवाह १९६० नंतर जोरकसपणे मराठी साहित्य उदयास आला. कथा, कादंबरी, नाटक अशा नानाविध स्वरूपाचं ग्रामीण साहित्य लिहिल्या गेले. कथा, कादंबरी यापेक्षा ग्रामीण कविता तुलनेने खूपच कमी लिहिल्या गेली आहे. ग्रामीण कवितेचा विशेष म्हणजे ग्रामीण "संवेदनशीलता" ग्रामीण जीवनाचे आणि जाणिवांचे स्वरूप अभ्यासले असता, ग्रामीण कवितेतील स्त्री विविध स्वरूपात ग्रामीण कवितेतून चित्रित झाली आहे. ती कधी कोणाची पत्नी आहे. आई, बहीण, नणंद, भावजय सासू,या नात्यागोत्यातील तिचे विविध रूपे अनेक ग्रामीण कवींना भावलेली ग्रामीण स्त्री. ग्रामीण कवितेतून चित्रिण होताना दिसतात. ती परंपरागत मानसिकतेने जगणारी आहे. कष्टाळू तसेच मायाळू, हा तिचा स्वभाव. ग्रामीण कवितेतून अनेक कवींनी रेखाटला आहे. देव आणि दैववादी ग्रामीण भागातील स्त्री आहे. दुःखाची संकटे घेऊन जगत, घरसंसार ला आधार देणारी, घराला घरपण देणारी अशी स्त्रीची प्रतिमा ग्रामीण कवितेतून चित्रित करण्यात आली आहे. संसाराला धरून राहणारी अन् कुटुंबाची काळजी घेणारी व घरसंसारातच रमणारी परंपरागत मानसिकतेची स्त्री ग्रामीण कवितेतून चित्रीत होताना दिसते. प्रामुख्याने "ग्रामीण स्त्री" ग्रामीण कवितेतून विविध रूपातून चित्रित झाल्याचे दिसते. स्त्री जीवनाचे, सुखदुःखाचे 'स्त्री' म्हणून येणाऱ्या समस्याचे चित्रणही ग्रामीण कवितेत आढळते.. विशेषता ग्रामीण जीवन कृषिप्रधान आहे. खेड्यातील अभावग्रस्त जगणे. कष्टकरी शेतीआधारित जीवन जगणाऱ्या स्त्रियांचे जीवन अत्यंत कष्टाचे यातनामय आहे. पुरुषी वर्चस्वाखाली दडपले आहे. भारतातील अख्खा स्त्रीजीवन कौटुंबिक आणि सामाजिक बंधनांनी बांधलेला आहे. त्यातही खेड्यातील स्त्री अत्यंत बंधनात जगताना दिसते. खेड्यातील स्त्रीच जीवन हे नागरी जीवनातील स्त्रियांपेक्षा भिन्न स्वरूपाची आहे.या ग्रामीण म्हणून कवितेतून स्त्रियांची विविध रूपे अभिव्यक्त होताना दिसतात. कष्टाळू, प्रेमळ, धार्मिक स्वभावाची स्त्री दिसून येते. पती हाच परमेश्वर मानणारी आणि कुटुंबाचा सांभाळ करणारी, देवावर विसंबून राहणारीआणि घर संसारासाठी अख्या जीवनाची राखरांगोळी करून घेणारी ग्रामीण भागातील स्त्री अत्यंत सहनशील आणि सोशिक आहे. स्त्री जीवनाचे विविध कंगोरे स्त्री म्हणून समाजात असलेली तीची प्रतिमा अनेकांना हळव्या मनाची वाटते. नवऱ्याचा जाच सहन करून कुटुंबाला जीव लावणारं स्त्रीचं रूप अनेक कवितेतूनही, चित्रण झाल्याची दिसते. ग्रामीण समाजाच्या सुखदुःखाचे, प्रथा, परंपरा, कुटुंब व्यवस्था समाज जीवन, नैतिक मूल्य, कृषी संस्कृती त्यातील जगणे. एकूनच ग्रामीण तत्वाच्या अंगाने ग्रामीण कविता आणि स्त्री जीवन जागतिकीकरणाच्या प्रभावात कशा पद्धतीने चित्रित करण्यात आले आहे.याचा प्रस्तुत शोधनिबंधात विचार केला आहे. ग्रामीण संवेदनशीलतेने केलेले चित्रण, यात प्रामुख्याने कृषी जीवनाशी निगडित, जीवन जाणिवा अभिव्यक्त करणारं साहित्य म्हणजे "ग्रामीण साहित्य" असे म्हटले जाते. ग्रामीण साहित्याची विपुल स्वरूपात निर्मिती होताना दिसते. परंतु ग्रामीण कविता ही थोड्या प्रमाणात लिहिलेली आहे. ग्रामीण संवेदनशीलतेची कविता स्थूलमानाने 'ग्रामीण कविता' म्हटले पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ग्रामीण कविता लिहिणारे अनेक कवी होते. त्यापैकी उल्लेखनीय कवी यशवंत, गिरीश, ग. ल. ठोकळ, ग .ह .पाटील, के. नारखेडे वा. .गो मायदेव, भा रा तांबे, अशा अनेक कवींनी मराठी ग्रामीण कवितेत स्त्रीजीवनाचे परंपरागत मानसिकतेतून चित्रण आलेले आहे. स्त्रियांची विविध रूपे अधोरेखित केले आहे. परंपरागत जीवन जगणारी स्त्री, विविध नातेगोते सांभाळत राहणारी स्त्री, देवावर विसंबून असणारी स्त्री, शेतात राबणारी स्त्री ही प्रामुख्याने

उपरोक्त कवींच्या कवितेतून चित्रित झाली आहे. ग्रामीण कवितेचे स्वातंत्रपूर्व कालखंडातील दालन वैशिष्ट्यपूर्णच आहे. असा उल्लेख करावा लागेल. ज्योतीबा फुले यांच्या अखंड मध्येही स्त्रीचे कष्टकरी, कुळंबीन स्त्री जीवनाचे चित्रण आढळून येते. भटा बामणांच्या स्त्री आणि कुळंबीन स्त्री यांच्या जगण्याची पद्धती भिन्नता त्यामध्ये चित्रित झाली आहे. स्त्रीजीवनकडे पाहण्याचा महात्मा फुले यांचा दृष्टीकोण वेगळा आहे. स्त्रीला मानव म्हणून स्त्री म्हणून सन्मान मिळावा. तिचा दर्जा वाढावा. तीही समाजातील अत्यंत महत्वाचा, पुरुषा इतकाच महत्त्वाचा घटक आहे असे मानावे. अर्थातच स्त्री-पुरुष समानतेचा दृष्टिकोन महात्माफुल यांनी व्यक्त केला. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रिया शिकलेल्या नव्हत्या किंबहुना त्यांच्यावर बंदी होती म्हणून स्त्री कवियत्री आढळून येत नाही. असे असले तरी अनेक कवींनी ग्रामीण भागातील खेडूत जीवन जगणाऱ्या स्त्रीची विविध रूपे आपल्या कवितेतून रेखाटली आहेत. त्यामध्ये उल्लेखनीय नाव बहिणाबाई चौधरी यांचे आहे. ग्रामीण कवितेतील अस्सल लेणी म्हणजे बहिणाबाईंची गाणी हे आहे. स्त्रियांना शिक्षणाची बंदी असल्यामुळे प्रामुख्याने स्त्री म्हणून ज्या भावना आहेत त्या ग्रामीण कवितेतून फारशा अभिव्यक्त झाल्या नाहीत. त्याला इथली रूढीग्रस्त समाज व्यवस्था जबाबदार आहे. म्हणूनच स्वातंत्र्यपूर्व कालखंडात फारश्या स्त्री कवियत्री दिसत नाहीत.आज शिक्षण गाव खेड्यापर्यंत वस्ती वाड्यापर्यंत पोहोचले आहे. आत्मभानाची लढाई लढण्याची भाषा आजची स्त्री करताना दिसते. शिक्षण, स्वातंत्र्य, आधुनिकीकरण यामुळे स्त्रियांच्या जगण्याचे संदर्भ बदलले. बदलत्या जाणीवेच्या दृष्टिकोनातून अलीकडच्या काळातील नाव घेण्यासारखे काही मोजके कवी स्त्रियांचे जीवन कवितेतुन चित्रित करतात. त्यामध्ये आनंद यादव यांचा 'हिरवे जग' नावाचा कवितासंग्रह राजा महाजन यांचा 'डहाळी' कवितासंग्रह, सरोजनी बाबर यांचा 'पाळणा' कवितासंग्रह. सदाशिव माळी यांचा 'फुल माळा' विठ्ठल वाघ यांची 'तिफण' शंकर बडे, राजा मुकुंद, अशा अनेक कवींनी ग्रामीण स्त्रीची विविध रूपे चित्रीत केली आहेत. अलीकडच्या काळातील स्त्रीची प्रतिमा आणि स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोण जागतिकीकरणाच्या प्रभावाने बदलून गेला आहे. नात्यातील बदलत्या वास्तवाचे चित्रण आणि स्त्रीकडे उपभोगाची वस्तू म्हणून भोगवादी संस्कृतीचा विकसित झालेला दृष्टीकोण. आजच्या कवींनी रेखाटला आहे त्यामध्ये अरुण काळे, कल्पना दुधाळ, उत्तम कांबळे, वसंत आबाजी डहाके, मीनाक्षी पाटील, असावरी काकडे, प्रज्ञा लोखंडे, मलिका अमर शेख, कवित्री नीरजा, अशा अनेक स्त्री कवयित्रींनी -स्त्री म्हणून जीवन जगण्याचे संदर्भ बदलत्या काळातील समाज जीवन, कुटुंब व्यवस्था, राजकीय दृष्टिकोन, कायदे, महागाई, आर्थिक जीवन, नोकरी, घर, व्यापार, सिनेमा, मार्केट, यातील स्त्री जीवन संमकाळातील स्त्री कवींनी अतिशय संवेदनशीलतेने चित्रित केल्याचे दिसून येते. आज भांडवलवादी दृष्टिकोनातून उपभोगाची वस्तू म्हणूनच स्त्री कडे पाहिल्याचे आढळते. शिक्षण आणि स्वातंत्र्य यामुळे स्त्री परंपरागत राहिली नाही असे, जरी वाटत असले, तरी; स्त्रियांचे विविध स्तरीय शोषण थांबले नाही याचे उल्लेख अनेक कवींच्या कवितेत येतात. मानसिक, लैंगिक, भावनिक, आर्थिक, कार्पोरेट जगातील स्त्रियांचे जगणे, हक्क आणि अधिकारासाठी निर्माण झालेली जाणीव. विविध स्तरीय शोषण. भांडवलशाही आणि वर्चस्ववादी समाज व्यवस्थेत स्त्रियांचे शोषण प्रचंड स्वरूपात होताना दिसते. काळाच्या बदलत्या समकालीन स्त्री जीवनाचे चित्रण या कवींच्या कवितेतून आले आहे. खेड्यातील स्त्रीच संलग्न असलेलं कृषी जीवन, खेड्यातील माणसाची सुखदुःख, दारिद्र्य, रूढी-परंपरा, संस्कृती, परिसर, एकंदर ग्रामीण संवेदनशीलतेची अनुभूती आणि अभिव्यक्ती ग्रामीण कवितेतून होताना दिसते. ग्रामजीवन हे अभावग्रस्त जीवन आहे .खेड्यातील ग्रामीण समाजजीवनातील स्त्रिया त्यांचे जगणे दुहेरी कष्टाचे आहे. एकंदर स्त्रीकडे पाहण्याचा ग्रामीण समाजाचा दृष्टिकोन, भारतीय समाजाच्या परिप्रेक्षात स्त्रीला दुय्यम समजले आहे. तिचे समाजजीवनातील विविध स्वरूपाचे जगणे, त्याचे समकालीन काळातील प्रश्न, आधुनिक काळाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन कवितेतून कसे अधोरेखित झाले याविषयीचा विचार प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे. स्त्रीचे परंपरागत जगणे तिच्या जीवनातील भोग तिच्या वाट्याला आलेले दुःख आणि सतत कष्ट करणारी स्त्री हीच प्रामुख्याने स्त्री प्रतिमा ग्रामीण कवितेत अधोरेखित झालेली आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मराठी ग्रामीण कवितेतील स्त्री चित्रण आणि त्याचे स्वरूप या विषयाच्या अनुषंगाने मांडणी केली आहे.

ग्रामीण कवितेतील स्त्री चित्रण:-

ग्रामीण संवेदनशीलता असलेली कविता "ग्रामीण कविता" आहे या कवितेतून स्त्रियांची विविध रूपे चित्रित झाली आहेत. जसे आई, पत्नी, बहीण, भावजय, ननद, सासू त्यांचे नाते संबंध याविषयी प्रमुख्याने ग्रामीण जीवन जगणारी स्त्री तिचे सुखदुःख याचे उल्लेख अनेक ग्रामीण कवितेत येतात. बहिणाबाईंनी स्त्रियांचे नातेसंबंध स्पष्ट करताना, आई आणि सासू यामध्ये कसं अंतर असते याविषयी बहिणाबाई म्हणतात.

"माय म्हणता म्हणता
ओठ होटाले भिडे
आत्या म्हणता म्हणता
केवढं अंतर पडले"

सासुरवाशीन या कवितेत सासूचा जाच कसा असतो सासूचे एक वेगळे रूप बहिणाबाई सांगतात.

उठ सासुरवाशीन बाई
सुरु झाली वटवट
कातवली सासू,
बाई पुस, डोळयांमधले आसू.

असं परंपरागत स्त्रीचे चित्र ग्रामीण कवितेतून येते.

परंपरागत जीवन जगणारी स्त्री नवऱ्याचा किती आदर करते याचे चित्रण 'शेतावर जाण्यापूर्वी' या कवितेत ग. ल. ठोकळ करताना म्हणतात.

"पाणी गरम काढलं दिल भरून गंगाळ
धोडी धोतराची देते धनी करावी अंघोळ
तवा तापला तापला, धनी बसा पिढ्यावर"

पारंपारिक स्त्री या कवितेतून दिसते. पतीला परमेश्वर समजून तो मेला तरी त्याच्या नावानं कुंकू लावणाऱ्या आणि मुला-बाळांना पोसणारी स्त्रीचं वेगळं रूप, बहिणाबाईंनी चित्रित केलेले स्त्री मनाला विशेष भावते.

"कुंकू पुसलं पुसलं
आता उरलं गोंधन
तेच देईन देईन
नशीब अवतन"

नशिबाला दोष देऊन कुंकवाची इज्जत राखणारी परंपरागत स्त्रीचे हे रूप वेगळेच आहे. स्त्रीचं मन हळवं असतं, लग्न होणे अत्यंत महत्त्वाची गोष्ट असते ते स्त्रीसुलभ भावना ही अभिव्यक्त होतात. मैत्रिणी, मैत्रिणी कशा चिडवतात याचं वर्णन "बिल्लोरी" या कवितेत कवीविठ्ठल वाघ करतात. स्त्रीच लाजणं हे मोहक असतं असी वेगळ्या स्वरूपाची कविता. स्त्रीचे वेगळे रूप दर्शविते. स्त्रीच्या लाजाळू पणाचे वर्णन करते.

"अशी लाजू नको बाई धरु पदरात हात
किती लपिस सरम आपल्या पदरात
काढ डोईचा पदर, कर नजर वरती
नको मरू मरू जाऊ, पाहून खालती".

शेतकरी जीवन जगणाऱ्या गरीब स्त्रीचं चित्रण ग्रामीण कवितेतून चित्रित करण्यात आले आहे.

कष्टकरी स्त्रीचे ही वेगळे रूप कवी विठ्ठल वाघ रेखाटतात.

"फुलवल्य कापसाले, चंद्र चोरून चोरून पाहे
तरी माय मावली ची मांडी, उघडीच राहे".

कष्टकरी स्त्रीची अशी कष्ट राबूनही मांडी उघडीच राहते खेड्यातील अभावग्रस्त जगणे साधं अंगावर कपडे मिळत नाही. फाटके कपडे, मोडक घरात जगणारी स्त्री, हे विदारक सत्य कवी सांगतात. शेतकऱ्यांच्या गरीब स्त्रीचे चित्रण केले आहे. ग्रामीण कवितेतून चित्रित होणारी स्त्रीची परंपरागत रूप अनेक कवींनी चित्रित केली आहे अशी ग्रामीण कवितेतील स्त्रियांची परंपरागत जीवन चित्रित करणारी ग्रामीण कविता आहे. आता मात्र स्त्री जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या बदलत्या काळात विषय, आशयाच्या रुपान स्त्री जीवनाचे जागतिकीकरणातील प्रभावित झालेले जीवन बदलून गेल्याचे दिसून येते. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने या काळातील स्त्री चित्रण विशेष लक्षात घेण्यासारखे आहे.

जागतिकीकरण आणि स्त्री जीवनाचे चित्रण:-

१९९० नंतर जागतिकीकरणाची सुरुवात झाली. भांडवलशाहीने संपूर्ण समाजाला प्रभावित केले यामध्ये स्त्री जीवन सुद्धा प्रभावित झाले .स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा वस्तू गत दृष्टीकोण, स्त्रियांना वस्तू म्हणून पाहणे, स्त्रियांच्या सौंदर्याचा बाजार भरवणे अशा काही विकार बुद्धीच्या कल्पना अलीकडच्या काळात विकसित झाल्या. हा जागतिकीकरणाचा परिपाक म्हणावा लागेल. अंग प्रदर्शनातून कंपन्यांनी पैसा कमावला. परंतु; स्त्रियांची इज्जत धुळीस मिळवली. स्त्रियांना आत्मभान आले. शिक्षण नोकरी कार्पोरेट क्षेत्रात स्त्रिया मानाच्या पदावरी आहेत स्त्रियांच्या अस्मितेची लढाई लढणाऱ्या अनेक स्त्रीवादी लेखिका स्त्रियांची माणूस म्हणून भूमिका स्पष्ट करतात. भोगवादी संस्कृतीने चंगळवादाच्या नावाखाली स्त्रियांचे माणूस पण कसे नाकारले तिला जाहीरतीतून तिच्या सौंदर्याचा बाजार भरवला आणि पैसा कमवाला.कसे पेस्ट केले. जागतिकीकरणाच्या प्रभावाने स्त्रियांकडे पाहण्याचा परंपरागत दृष्टीकोण वस्तू बाजाराकडे गेला याचे वर्णन करताना अश्विनी धोंगडे "स्त्री सूक्त" मध्ये लिहितात.

"इथे फॅशन शो होतात
मॉडेल साम्राज्ञी चे मुकुट
मी वरच्या जाहिरातीतून
सौंदर्या बरोबर माल खपवतात
सौंदर्य प्रसाधने वापरावीत म्हणून,
स्त्रीत्व सुद्धा विक्रीला ठेवतात".

अशा शब्दात कवित्री स्त्रीत्वाचे कसे वाभाडे काढले यावर टीका केली आहे. परंपरागत नाती जपणारी कुटुंबाला आपला जीव की प्राण मांनणारी स्त्री वस्तू वादाकडे नेली गेली. स्त्रीत्वाच्या अस्तित्वावरच घाला घातला. पैशा वाल्यांनी तिला सरोगसी मदर बनवलं यात गरीब बायांची पिळवणूक आहे. बारबाला अर्ध्या कपड्यातील नग्न स्त्रिया मार्केट करून देतात अशा प्रकारची मानसिकता भांडवलवादने विकसित केली. आणि स्त्रिया त्या गोष्टीला अदाकारी कला समजून किळसवाणे चित्रण प्रामुख्यानं सिनेमा क्षेत्रात हे मांडलं जातंआहे. या सिनेमातील स्त्रीचे चित्रण दृष्टीआड करता येणार नाही. कारण सिनेमातही साहित्य असतं. आजपरंपरेच्या जोखडातून ती काही अंशी बाहेर पडली, पण; जागतिकीकरणाच्या कैचीत सापडली असे अनेक कवितेतून लक्ष्या येते. याचे करण जागतिकीकरण. हे होय.

स्त्री जीवनाचे संदर्भ जागतिकीकरणाने कसे बदलून टाकले याविषयी वसंत आबाजी डहाके 'चित्रलिपी' मध्ये म्हणतात.

त्या बोलताना दिसत नाहीत
पण बोलत आहेत

एकमेकींशी अंधारून आलेल्या आभाळा विषयी

आपला हात दाबलेल्या स्तब्धतेविषयी.

शेतकरी जीवन जगणाऱ्या स्त्रीची व्यथा कवी सांगतात परंतु व्यवस्थेत याविषयी बोलता येत नाही. अशी स्तब्धता या काळाने स्त्रियांच्या वाट्याला आणली आहे. हा जागतिकीकरणाचा स्त्री जीवनावर झालेला दूरगामी परिणाम आहे. ही समाज मानसिकता स्त्री जीवनाचे अनुरोधाने कवी चित्रित करतात.

जागतिकीकरण आणि स्त्री जीवनातील नातेसंबंध कसे बदलून गेले नात्यात कसा कोरडेपणा आणि नुसतेच पण आला. नुसतं दिसण्याच्या स्पर्धा वाढल्या, सुंदर दिसण्याची स्पर्धा वाढू लागली. यामुळे स्त्रीच्या वाट्याला असे भयंकर जीवन आले याचे चित्रण अरुण काळे एका कवितेत करतात.

"आज विश्वसुंदरी ही रडू लागल्या आहेत,
खेड्यापाड्यातल्या मुलीही, बक्षीस मिळाल्यावरही पडद्यावर दिसणार नाही,
काय कमी होते आमच्यात.नसेल कोमलता.
रखरखलेली त्वचा कोणत्या साबणाने
नितळ होईल सांगाल काय?
शाम्पू लावू केस लांब होतील, कदाचित.
का, आम्हालाच लांबवतील इकडे तिकडे.

वासना विकाराला बळी पडलेली आजची स्त्री हतबल झाली आहे. सिनेमा तर रोल मिळवण्याच्या भानगडीत काय काय करावं लागतं हे किती भयानक आहे. कितीही आयटीचे दुकान लावले तरी स्त्रियांचे शोषण कमी होत नाही. अरुण काळे लिहितात

"काय ग बाय, काय हाय म्हणती, कशी दिली आहे?

कंचबी, कोणतही क्रेडिट कार्ड चालतं,
काय भाव आहे तिचा,
आम्ही इंद्राच्या बारच्या वारांगना,
सहजीवनाच्या वेगवेगळया जोड्या पाहतोय.
आम्ही आय आय टी च्या गोलपिठा राहतोय.
आणि मथुरेचा झाला शॉपिंग मॉल.

आयआयटीचा गोलपिठा झाले आहे. हा, कवीला स्त्री देहाचा बाजार वाटतो. अशा प्रकारची जागतिकीकरणातील स्त्री प्रतिमा सम काळातील बदलते स्त्रीजीवन जाणीवा चे संदर्भ जागतिकीकरणाच्या प्रभावाने आजच्या कवितेत चित्रित झाली आहे. जीवन-मरणाच्या प्रश्नामध्ये स्त्रियांची होणारी ससेहोलपट भांडवलशाहीने आणखीनच वाढवली. प्रसार माध्यमांनी तिचे भडक चित्रण केले. तिला शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या छळले, गरीब कष्टकरी, शेतकरी, कामगार महिला, भांडे घासणारी मोलकरीण महिला, नोकरी करणारी स्त्रियाचे शोषण त्यांच्याविषयी असणारी वासनांध नजर, एकंदर स्त्रियांच्या शोषणाचा बाजार आजच्या काळात विकसित झाला हे विदारक सत्य आजची कविता माडते. स्त्रियांच्या जीवनातील बदलते प्रश्न, ती कोणत्याही जातीधर्मातील असो तिचे शोषण प्रकर्षाने वाढले आहे. असे स्पष्ट होते. जागतिकीकरणाच्या सपाट्यात स्त्री जीवन अत्यंत दयनीय झाल्याचे दिसते. मुठभर स्त्रियांचे जीवन ही सुधारली असेल परंतु; बहुसंख्य उपेक्षित वंचित समाजजीवनातील स्त्री अजूनही उपेक्षित आहे. परुषी दडपशाहीला राहणारी आणि भोगवादचा बळी ठरलेली आहे. अडाणी अशिक्षित असल्याने तीचं शोषण होते. एवढे मात्र खरे स्त्रीवादी यांनी कितीही स्त्रीमुक्तीचा दिंडोरा पिटला, तरी ती स्वतंत्र माणूस म्हणून तिच्याकडे

पाहिले जात नाही. स्त्रियांचे शोषण कमी होईल. पण, थांबणार नाही हे सत्य आहे. मराठी ग्रामीण कविता जागतिकीकरणाच्या संदर्भात स्त्री जीवनाचे बदलते संदर्भाने येत आहे. समकाळाच्या दृष्टीने आजची कविता विषय व आशय दृष्टीने महत्त्वाची आहे. वास्तवाच्या पातळीवर जागतिकीकरणाच्या प्रभावाने आलेलं बदलते स्त्री जीवन रेखाटणारी स्त्रियांची कविता विशेष आहे.

संदर्भ ग्रंथ:-

1. डा.अनिता काळे, ग्रामीण साहित्यातील स्त्री दर्शन, निनाद प्रकाशन.पुणे,२०१४, पुष्ठ क्रमांक २९२,९४,३०३.
2. डॉ. वसुदेव वाले, जागतिकीकरणाचा मराठी भाषा व साहित्य वरील प्रभाव, संपा. प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१४. पुष्ट क्रमांक २५६,५०१,२.
3. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, मराठी कविता आकलन आणि आस्वाद, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००५, पुष्ट क्रमांक-७१,१३७.
4. डॉ. जयद्रथ जाधव, १९८० नंतर चे मराठी साहित्य स्वरूप आणि समीक्षा,संपा, अरुणा प्रकाशन लातूर,२००५.पुष्ठ.६१.६२,६५.
5. उत्तम कांबळे, जागतिकीकरणात मराठी कविता, संपा. परचुरे प्रकाशन मंदिर, २००९. पुस्तक क्रमांक १०-१७,
6. डॉ. रामकली पावसकर, मराठी कविता :प्रवृत्ती आणि प्रवाह., स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, २०१५, पुस्तक क्रमांक ७७, ७८,९०.

१९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेतील स्त्री प्रतिमा

प्रा. कदम सखाराम बाबाराव

संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, कै. रमेश वरपूडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनपेठ जि. परभणी

प्रा. डॉ. शिंदे दत्ता रुस्तुमराव

संशोधक मार्गदर्शक व मराठी विभागप्रमुख, संत तुकाराम कला व वाणिज्य महाविद्यालय, परभणी

प्रतिमा म्हणजे काय:-

मराठी काव्यातील प्रतिमेच्या स्वरूपाबद्दल विचार करताना आपणास मानसशास्त्रीय प्रतिमेपासून ते आजच्या काव्यांतर्गत प्रतीमेपर्यंत सर्वांचा विचार आपणास करावा लागेल. प्रतिमेसंबंधी मराठी काव्यात जितका विचार झाला त्यापेक्षा अधिक विचार पाश्चात्त्यांनी केल्याचे दिसून येते. प्रतिभावंत नेहमी प्रतिमांच्या भाषेतच बोलत असतो. अशा प्रतिमांचा वापर प्राचीन काळापासून मराठी कवितेत झाल्याचे दिसून येते. कवीच्या अंतःकरणातील उत्कट भावनाविष्कार प्रतिमेच्या माध्यमातून काव्यात येत असतो. कवीच्या मनातील निराकार भावना प्रतिमेच्या रूपातून साकार होत असते. प्रतिमेसाठी इंग्रजीत Image हा शब्द वापरला जातो. ज्यासाठी मराठीत प्रतिमा, कल्पनाचित्र, अनुभवचित्र, उपमान इत्यादी पर्यायी शब्द वापरले जातात. काही अभ्यासक प्रतिमे साठी 'प्रतिबिंब', 'नक्कल' किंवा 'मूर्ती' असे पर्यायी शब्द सुचवतात. प्रतिमेचा अर्थच मूळ व्यक्तीचे सादृश्य दाखवणारी प्रतिकृती असा होतो. कवी बा सी मर्ढेकर मात्र प्रतिमेसाठी प्रतिमाछाया हा शब्द सुचवतात व काव्य जन्य संवेदना ह्या प्रत्यक्ष संवेदना नसून त्या केवळ प्रतिमाछाया असतात असे मत मांडतात.

पाश्चात्य विचारवंतांनी प्रतिमेलाच अलंकार मानले. संस्कृत मराठी साहित्यकार यांनी मात्र प्रतिमा निर्मितीचे साधन म्हणजे अलंकार असा विचार मांडला. प्रतिमा कधी दृष्य असते तर कधी एखाद्या संवेदनेची अनुकृती म्हणून येते. 'शब्दांनी रेखाटलेले चित्र म्हणजेच प्रतिमा' होय. संवेदना हा प्रतिमांचा मूलभूत गुण आहे. शब्द स्पर्श रूप रस गंध या पाच संवेदनातून प्रतिमा मिळतात. सी. डी. लेवीस प्रतिमेची व्याख्या करताना म्हणतात, "कमी अधिक प्रमाणात संवेदना गुणांनी युक्त असणारे, काही विशिष्ट मर्यादेपर्यंत रूपकात्मक असणारे, स्व संदर्भात एक प्रकारचा मानवी भावनावेग अंतर्भूत असणारे,तसेच एका वैशिष्ट्यपूर्ण काव्यात्मक भावनेने, वासनेने युक्त असून, कि काव्यात्मक भावना व वासना वाचकांमध्ये संपादित करणारे चित्र म्हणजे प्रतिमा". होय.

मराठी ग्रामीण कवितेचे स्वरूप :-

ग्रामीण कविता म्हणजे ग्रामजीवनातील संवेदनशीलतेने युक्त, ग्रामीण भाषाशैलीने अविष्कृत अशा अनुभवांनी परिपूर्ण कविता होय. अनेक वेगवेगळ्या वैशिष्ट्यांनी तिची जडणघडण झालेली आहे. खेड्यापाड्यातील जीवनाशी तिचे अविभाज्य नाते आहे. कुठल्याही झाडाच्या वाढीसाठी जसे विशिष्ट हवा पाणी आवश्यक असते त्याचप्रमाणे ग्रामीण कविता कृषी संस्कृतीशी निगडित असते. भूमीच्या ठिकाणी असलेल्या दिव्यात्म सर्जनशीलतेमुळे बाल्यावस्थेतील मानव अचंबित झाला. जंगलात राहून शिकार करण्याची अवस्था संपल्यानंतर तो पशुपालना कडे वळला असताना स्त्रियांनी बी-बियाणे जमिनीत टोचून कृषिसंस्कृतीचा श्रीगणेशा करून हळूहळू कृषी संस्कृतीची पायाभरणी केली. पुढे कृषी व्यवस्था हाच भारतीय जीवनाचा मूलाधार बनला. स्त्री आणि सृष्टी यांच्यातील हे नाते कोणतेही एका पोकळीत निर्माण झालेले नाही. या नात्यामागे त्या काळातल्या उपयुक्त जीवन प्रेरणा आहेत. भवतालाशी म्हणजेच सृष्टीशी एकरूप तर होण्याची भूमिका आहे. स्त्री आणि निसर्ग या दोन्हीच्या निर्माण शक्तीमुळे थक्क झालेल्या आदिम मनाला त्यांच्याविषयी वाटणारी कृतज्ञता ही आहे. जमिनीतील कंदमुळे, तिच्यातून उगवणाऱ्या वनस्पती, धान्य यामुळे भूक भागते व श्रम करण्यासाठी ताकद मिळते हे लक्षात आल्या पासून आदिम समूहांनी पृथ्वीला आदिमातेच्या स्वरूपात पाहिले. तिच्या सुफलन शक्तीविषयी त्यांच्या मनात आकर्षण होते, काहीसे

भय होते आणि त्यामागचा कार्यकारणभाव माहिती नसल्यामुळे कुतूहलही होते. स्त्री मुळे होणारी अपत्यप्राप्ती ही त्यांना मायावी घटना वाटली. भूमी आणि स्त्री या दोघांमध्ये असलेल्या या शक्तीला जागून ईष्ट प्राप्ती करून घेण्यासाठी सामूहिक आराधना आणि सामूहिक विधीचा त्याने आधार घेतला. त्यातूनच अनेक विधी व विधीगीते जन्मास आली.

नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कवितेची पार्श्वभूमी:-

मराठी काव्य समीक्षेत समकालीन कविता नव्वदोत्तर कविता म्हणून संबोधली जात आहे. 'साठोत्तर कविता' या संकल्पने प्रमाणेच 'नव्वदोत्तर कविता' ही संकल्पनाही आपणाला विशिष्ट कालदर्शक अर्थाने जशी विचारात घ्यावी लागते तशीच ती विशिष्ट मूल्यव्यूव्हदर्शक अर्थानेही विचारात घ्यावी लागते. १९९० ते २०१० या दोन दशकांच्या काळातजागतिक स्तरावरील व्यापार, अर्थकारण, राजकारण आणि दहशतवाद या सारख्या घटकांशी ग्रामीण माणसाचे जगणे, मरणे, विचार करणे वा गप्प राहणे, प्रतिक्रिया देणे वा काहीच न करता निष्क्रिय होणे असा या कालखंडाचा प्रभाव जीवनाच्या सर्वच क्षेत्रावर पडलेला जाणवतो.

ग्रामीण भागात एकीकडे पावसाचे प्रमाण कमी होत असताना भ्रष्टाचारामुळे नागरी सुविधांचाही बोजवारा उडालेला दिसतो. अन्नधान्य, दूध, फळे, भाजीपाला जरी ग्रामीण भागात पिकत असला तरी उत्पादकांना तो आवश्यक तेवढा मिळत नसल्याचे विपरीत वास्तव नजरेत भरल्याचे दिसते. राज्यकारभार करणारी मंडळी भ्रष्टाचाराने वेढली गेली, शासकीय अधिकारी कर्मचारी यांची नीतिमत्ता ढासळली आणि त्यामुळे शेतकऱ्याचे अधिकच पतन झाले. एकीकडे अन्नधान्याची साठेबाजी, रासायनिक खतांचे व बी बियाणे यांचे वाढत जाणारे भाव, त्यांची अनुपलब्धता यामुळे हवालदिल शेतकऱ्यांनी अनेक बँका व सोसायटी यांकडून तसेच खाजगी सावकाराकडून कर्जे घेतले. त्यातच निसर्गाची अवकृपा व सतत नापिकी, कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ, कधी गारपीट या सर्व कारणाने शेतीवरच ज्यांचे जगणे अवलंबून आहे तो शेतकरी पुरता खंगला.एकही आशादायक चित्र नसल्यामुळे निराशेच्या खोल गर्तेत अडकला. शेतकऱ्यांच्या घरातील मोठ्यांची दुखणी, उपवर होत चाललेल्या लेकीबाळी, हुंड्याची वाईट व जीवघेणी स्पर्धा यामुळे शेतकऱ्याची पार कंबरडे मोडले. 'मरण सोपे पण जगणे अवघड बनले'.

या सगळ्या पार्श्वभूमीवर या वीस वर्षाच्या कालखंडातील कवीच्या काव्यातील स्त्रीप्रतिमा शोधणे हे सोपे काम नाही. याचे कारण 'स्त्री प्रतिमा' म्हणजे कवीने चितारलेल्या स्त्री व्यक्तिरेखा नव्हेत. किंवा स्त्रीविषयक कवितांचे समग्र चित्रही नव्हे. प्रत्येक कवी काही वेळा स्त्री मनाने अनुभव घेऊन कविता लिहीत असतो. काही वेळा स्वतःच्या वैयक्तिक जीवनाचा स्पर्श असलेल्या नात्यांचे चित्रण करणाऱ्या कविता लिहित असतो; तर कधी स्त्रीत्वाचा सनातन अर्थ शोधण्याचा सर्वसाधारण प्रयत्नही करीत असतो. अशा वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक कविता आपणास नव्वद नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेतून सापडतील. डॉ. नीलिमा गुंडी यांनी बोरकरांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमा शोधतांना मांडलेले मत येथे मुळातून विचारात घेण्यासारखे आहे. त्या म्हणतात,"स्त्री प्रतिमा याचा अर्थ कवीच्या मनात केवळ जाणिवेतच नव्हे तर नेणिवेतही ठसलेले स्त्रीरूप; असा घ्यायला हवा. या प्रतिमेच्या प्रकाशात त्याचे स्त्रीविषयक संवेदन आकार घेत असते." (१)

प्रकाश किनगावकर यांच्या 'गावाच्या आकाभोवती' या कवितासंग्रहात 'आजीची गोष्ट' सांगताना माय व आजीची गोष्ट एकच असल्याचे निरीक्षण कवी नोंदवतो. शेतकऱ्यांच्या जीवनात पात्रांची नाव बदलतात मात्र जीवन संघर्षात्मक नाट्य एकच राहते. आजीच्या गोष्टीत आजोबांच्या वाट्याला येणारे वावर तनाळ निघते, बाप पीक कोळपून कोळपून थकून जातो, आजीची बोटं नींदून निंदून दुखरी बनतात, बापाची टाळू तणकटाचे भारे वाहून दबून जाते, खांदे झुकतात, व्यसनांनी घर खचते, तरी ही निसर्गाने दान दिलं नाही अशी अनेक कारणं कवीला दिसत राहतात. याच कवितेत मायीने सांगितलेली 'लाकूडतोड्याची गोष्ट' मुलाला पटायची. पण नातवांना ती पटत नाही. माय गोष्ट मात्र बदलत नाही पुन्हा पुन्हा तीच सांगते यातून शेतकऱ्यांच्या जीवनातील कष्टाचे चक्र तसेच आवर्त होताना दिसते.

'गावाच्या आकाभोवती' या संग्रहातील 'वडांग' ह्या कवितेतील प्रतिमा स्त्री चित्रणाचा अनोखा नमुना ठरते. कृषी जीवनातील संदर्भही प्रतीकात्मक रीतीने मांडणारी 'वडांग' म्हणजे शेताभोवती चे काटेरी कुंपण.

आता वाटा दाबून दाबून थकून गेला बाप
अन वडांग ही विरत गेली दिवसेंदिवस
मायच्या लुगड्यासारखी. (२)

शेता भोवतीच्या काटेरी कुंपणासाठी वापरलेली आईच्या लुगड्याची प्रतिमा ही तिचे शेतातील राबत असणे, शेतातील पिकाची डोळ्यात तेल घालून राखण करणे, तरीही स्वतः मात्र दुर्लक्षित होऊन झिजून झिजून संपणे हा सारा आशय समोर घेऊन येते. म्हणजेच शेतकऱ्याच्या परिस्थितीचे प्रतीक रूप हे वडांग ठरते. थकलेला बाप आणि विरलेल्या लुगड्याची माय यांची दुरावस्था मात्र थोपवता येत नाही हा आशय ही कविता सांगते.

याच संग्रहातील 'कुणब्याच्या घरात' या कवितेत बाप, माय, पोरगा, पोरगी हे सारेच अभावग्रस्त परिस्थितीने होरपळून निघतात. शेतीला व पीकपाण्याला दैवत मानणारा बाप कुटुंबातील व्यक्तीच्या सुखाला महत्त्व देत नाही पण..

बायकोच्या अंगावर
मांस नसल तरी चालेल
पण वावरात तीन जोड्याचं
औत लावून मातीचा गागर
चांगला हातभर पडला पाहिजे (३)

ही येथील शेतकरी बापाची मानसिकता असते. पोरीच्या हातची लेखणी हिसकावून तिच्या हाती चूल पेटवण्याची फुंकणी दिली जाते. शेत शिवारात राब राब राबणाऱ्या माय माऊलींची शारीरिक हेळसांड व त्याकडे बघण्याचा कुणब्याचा दृष्टिकोन एकाच वेळी प्रतिमेतून सहजपणे नजरेस येतो.

कैलास दौंड यांच्या 'भोग सरू दे उन्हाचा' या कविता संग्रहातून आलेल्या सर्व कवितेतून शेती मातीतल्या माणसांच्या व्यथा-वेदना छंदासह मुक्तछंदात कवी प्रकट करतो. सुगी ने केलेला भ्रमनिरास व्यक्त करताना

माझ्या सुगीचे जगणे लेक सासरी नांदणे
बाजारात गाय माय कसाबाने ओढू नेणे (४)

येथील कसाबाच्या गाईची प्रतिमा ही मुलीला सासरी होणारा जाच पाहून कवि मनाला होणाऱ्या दुःख वेदनांचे प्रतीक ठरते. तिची पाठवणी करताना माय-बापाला मन घट्ट करावे लागते. तिला घेऊन जाणारा म्हणजे तिचा 'तो' आपोआप 'कसाब' ठरतो.

जागतिकीकरणाच्या स्वीकारानंतर गाव बदलाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. याचा प्रत्यय प्रदीप पाटील यांच्या 'आत्मसंवाद' संग्रहातील पुढील कवितेतल्या प्रतिमेतून येते.

स्त्रियांना दिवसाढवळ्या चौकात खेचले जाते
बघतात फक्त डोळ्यांनी पुरुषांची इथल्या प्रेते
दुर्भाग्यच हे देशाचे वाली ही भ्रष्ट असावा
आणि कौशल्य च्या पोटी रामाला जन्म असावा (५)

येथील वाली, राम, कौशल्या ही मिथके विलक्षण अर्थ चिंतनात्मक रीतीने कवी प्रकट करतो. स्त्रियांच्या अब्रूची होणारी हेळसांड, मुर्दाड बनलेले पुरुषी मन, राज्यकर्ते व शासन दरबारातील उदासीनता, कायद्याचा वचक नसल्यामुळे उन्मत्त होत जाणारी गुंडगिरी ही 'कौशल्येच्या पोटी रामाला जन्म नसावा' या प्रतिमेतून आतापर्यंत स्त्रीकडे सनातन सर्जनाचे केंद्र

म्हणून पाहणे व सौंदर्य आणि सर्जनशीलता स्त्रीकडेच वास करतात हे गृहीतक धाडकन कोसळून पडतात. येथे लेकराचा जन्म नाकारणारी माय उभी राहते व विरोधाभासात्मक शब्दचित्र प्रतिमा अधिक अर्थवाही ठरते.

प्रदीप पाटील यांच्या 'अंतरीचा भेद' ह्या काव्यसंग्रहातील गृहिणीची आपल्या घराविषयीची आस्था प्रकट करताना कवी पाणी जसे उताराच्या दिशेने वाहत जातं तशी ती सारं निमूट स्वीकारते, आपल्या मनातील थांग लागू न देता ती मूक सोशिक बनते. ही आई रानातल्या घरातल्या सर्वांशी बांधलेली आहे. घर आणि शेत एवढीच तिची वारी आहे. ती धरित्रीशी नाते सांगणारी आहे.

माती जशी सोसे नांगराचा फाळ
तसे तिला बळ झिजताना
झीजवून देह फुलवते मळा
चिंध्यांचा सोहळा अंगावर (६)

येथे नांगराचा फाळ सहन करणारी माती, देह झिजवुन मळा फुलवण्यातील तिचे कृतार्थ समाधान, जगाला वस्त्र पुरवणाऱ्या माय माऊली ने स्वतः अर्धनग्न किंवा उघडे राहणे हे चिंध्यांचा सोहळा या प्रतिमेतून वाचकासमोर येते. येथील तीनही प्रतिमा अर्थवाही बनतात व स्त्रीच्या सूचक व्यथांना मुखरित करतात. दुःख सोसल्याशिवाय टिपता येत नाही हे लेखनातील वास्तव आहे. येथील स्त्री शेतात आणि घरात पंढरपूर पाहणारी असली तरी भोवतालच्या वास्तवात होरपळणारी आहे. सोसणे हा तिचा श्वास आहे. असे जगणे महाग /करणारा आला काळ/ तरी नाही दुभंगले/ तिचे धरणीचे बळ..ही जाणीवच तिच्या अंगी मुरलेली असल्यामुळे माहेरी येणारी लेक आपल्या आईला सासू, नणंद व जावेने मारलेल्या टोमण्यांचे वर्णन करून सांगते तरी ही आई आपल्या लेकीची समजूत काढताना..

माय म्हणाली लेकीला, तुला कसं हे कळावं
चुलीमधलं लाकूड चुलीमध्येचं जळावं
असं बाईच्या जातीनं जन्मभर सोसायचं
जशी पोसते धरणी तसं घर पोसायचं (७)

येथील चुलीमधलं लाकूड चुलीमध्ये जळाव ही प्रतिमा एकूण स्त्रीजीवनाच्या भोगवट्याची व्यथा व तिचा वस्तुपाठ स्वतःच्या आई कडून पुढच्या पिढीकडे हस्तांतरीत होत असताना दिसतो. या संग्रहातीलतापलेल्या दुधावरची साय अशी प्रतिमा, 'रान रांडमुंड बघवेना' अशा प्रतिमा मूळ कवितेतल्या अर्थवाही पणाला अधिक उठाव देतात व ग्रामीण स्त्रीचे जगणे, भोगणे व सहनशीलपणे परिस्थितीला तोंड देणे आपल्यासमोर आणतात.

कवी जयराम खेडेकर यांच्या मेघवृष्टी संग्रहातील आजीचे शब्दचित्र हे आजीची आठवण कवि मनात आजही लख्ख असल्याचे निदर्शक प्रतिमा चित्र आहे. लेकीचं लग्न होऊन दहा वर्ष गर्भ राहत नाही तेव्हा तिला पाठीपोटी चाचपून पाहणारी व दिवस गेल्याचे कळताच गूळ कानोल्याच्या शिदोरीत कच्चा चिंचेचे आकडे बांधून देणारी ही आजी नातवांच्या टाळू माखण्याचे मनोमन सुख अनुभवताना दिसते. तेव्हा कवी

आजी नितळ निर्मळ जशी पेरणीची ओल
तिची दही-दूध माया जाई काळजात खोल..
..घरादारात एकटी गणगोत तिचे जाते
बाई अभागी कपाळ सांगे तुळशीचे नाते (८)

येथील पेरणीची ओल, दही-दूध माया, अभागी कपाळ व तुळशीचे नाते या साऱ्या प्रतिमा अर्थवाही स्त्री-प्रतिमा चित्रणाला उठाव देणाऱ्या असून अभागी कपाळ प्रतिमेतून दुर्दैव, तुळशीचे पावित्र्य, पेरणीची ओल प्रतिमेतून मुलांसोबतच नातवंडांना, पतवंडांना भरवणारी आजी ही अक्षय ऊर्जेचा स्त्रोत ठरते.

सारांश:

शोध निबंधाच्या विस्तारभयास्तव वरील प्रातिनिधिक कविते व्यतिरिक्त सशक्त मराठी ग्रामीण स्त्री प्रतिमा रेखाटणाऱ्या १९९० ते २०१० या दोन दशकाच्या कालखंडातील मराठी ग्रामीण कवितेत एकनाथ पाटील यांच्या 'खुंट्यावर टांगलेली दुःख', संतोष पद्माकर पवार यांच्या 'पिढीपेस्तर प्यादेमात', अजय कांडर यांच्या 'आवानओल', प्रकाश होळकर यांच्या 'कोरडे नक्षत्र', शशिकांत शिंदे यांच्या 'शरणागताचे स्तोत्र', सदानंद देशमुख यांच्या 'गावकळा', रमेश चिल्ले यांच्या 'नांगरून पडलेलं शतक', उत्तम कोळगावकर यांच्या 'जंगलझडी' व 'तळपाणी', ललित अधाने यांच्या 'कुणबी बाप', नारायण सुमंत यांच्या 'सातबारा', श्रीराम गोविंद गव्हाणे यांच्या 'होऊ दे रे आबादानी', केशव खटिंग यांच्या 'सालोसाल' आदी कवितासंग्रहांचा उल्लेख करणे अपरिहार्य ठरते. परंतु हा विषय शोधनिबंधाचा नसून एका मोठ्या संशोधनाचा आवाका कवेत घेणारा ठरतो.

निष्कर्ष:

१९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेतील स्त्री प्रतिमा म्हणजे कवीच्या जाणिवेतूनच नव्हे तर नेणिवेतही ठसलेले स्त्रीरूप मानावे. स्त्री प्रतिमा म्हणजे कवीने चितारलेल्या स्त्री व्यक्तिरेखा नव्हेत किंवा स्त्री विषयक कवितांचे समग्र चित्रही नव्हे. या ग्रामीण स्त्रीप्रतिमा शेती मातीशी, गाव खेड्यासी एकरूप होतानाच स्त्री जीवनातील व्यथा वेदनांचे कल्पनाचित्र आपल्यासमोर उभ्या करतात. या स्त्री प्रतिमेतून येणारा गावगाडा, लोकसमज, जुन्या प्रथा परंपरा यांचा पगडा मनावर बाळगणारी ही स्त्रीप्रतिमा तरीही उद्याच्या मांगल्याचे स्वप्न पाहणारी आहे.

संदर्भ ग्रंथ सूची:-

1)गुंडी, नीलिमा: कवितारती, कविवर्य बोरकर विशेषांक, दिवाळी 2010, पृष्ठ १०४.

2)किनगावकर, प्रकाश : गावाच्या आकाभोवती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती 2006 पृष्ठ 11.

3)ऊ.नि. पृष्ठ 14.

4)दौंड, कैलास: 'भोग सरू दे उन्हाचा', शब्दालय प्रकाशन, नगर, प्रथमावृत्ती, मे 2007, पृष्ठ 36.

5)पाटील, प्रदीप: 'आत्मसंवाद', संस्कृती प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती पृष्ठ 52.

6)पाटील, प्रदीप: 'अंतरीचा भेद', अभिधानंतर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती 2002 पृष्ठ 13.

7)ऊ.नि. पृष्ठ 23.

8)खेडेकर, जयराम: 'मेघवृष्टी', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती 2005, पृष्ठ 27.

मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

प्रा. हिरा वाघ

संशोधक विद्यार्थी के. टी. एच. एम. महाविद्यालय,नाशिक

प्रस्तावना :

महाराष्ट्राला संतपरंपरेची मोठी देणगी लाभलेली आहे व त्या परंपरेमध्ये पुरूष संतांचे जितके स्थान व मोलाची साहित्यिकदृष्ट्या भर आहे तितक्या प्रमाणात नसली तरी बऱ्यापैकी मोलाची अशी भर स्त्री संतांनी साहित्यात अभंग, ओव्या, गौळणीच्या माध्यमातून घातली आहे. मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त होणाऱ्या स्त्री प्रतिमा ह्या विषयाच्या अनुषंगाने विचार केला असता आपल्याला स्त्री प्रतिमांच्या माध्यमातून मराठी स्त्रीच्या अस्मितेचा, तिच्या स्वशोधाचा तसेच त्या त्या कालखंडात तिने दिलेल्या लढ्याचा, तिने मुक्तीसाठी केलेल्या धडपडीचा शोध तिच्य साहित्याच्या माध्यमातून याठिकाणी घेतला जाणार आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वत:ची अशी काही मते असतात, स्वतं:ला व्यक्त होण्यासाठीची एक पद्धत असते. त्या शोधनिबंधातून संत परीवारातील तत्कालीन समाजाला अभिप्रेत असणारी स्त्री प्रतिमा कशा स्वरूपाची होती हे देखील समजून घेतले जाणार आहे.

प्रत्येक व्यक्तीला समाजात जगताना व्यक्त होता येणे ही खूप मोठी गोष्ट आहे आणि ते व्यक्त होण्यासाठी आपला आत्मविष्कार घडवून आणण्यासाठी साहित्य हे एक प्रभावी माध्यम आहे. व्यक्तीची मूळ उपजत आत्मजाणीव तिच्या भोवतालच्या परीसर परिस्थितीचे तिच्यावरचे संस्कार, तिच्यासमोर परंपरेने ठेवण्यात आलेली मूल्ये व आदर्श आणि तिच्या प्रत्यक्ष जीवनातील समस्या व अनुभव या साऱ्यांतून तिचे मनोविश्व व तिची अस्मिता घडत असते व ती तिच्या साहित्यातून नकळत व्यक्त होत असते.

स्त्री संत साहित्याच्या माध्यमातून स्त्री प्रतिभेचा आत्मविष्कार कशा प्रकारे झाला याचा शोध घेतला असता आपल्या असे लक्षात येते की साहित्य निर्मितीच्या सुरूवातीला महानुभव पंथातील महादाइसा आपल्या डोळयासमोर येते. तिच्यानंतर त्याच पंथातील बाईसा, आऊसा, हिराइसा इ. अनेक विख्यात स्त्रीयांनी ह्या पंथात लेखन केले. पण स्त्री लिखान साहित्याला महादाईसा यांच्या धवळयांनी झाली हे ह्या ठिकाणी महत्वाचे आहे. त्यानंतर वारकरी संप्रदायाची सुरूवात झाली त्यात प्रामुख्याने संत मुक्ताबाई, संत जनाबाई, सोयरा, निर्मळा, भागू, संत कान्होपात्रा यांची नावे डोळयासमोर येतातच. पण पुढे जाऊन संत बहिणाबाई, वेणाबाई, सखुबाई, प्रेमाबाई ह्या स्त्री संतांचाही मोलाचा वाटा आहे. सदर शोध निबंधात काही निवडक स्त्री प्रतिमांचा वेध घेत लिखान केले आहे.

संत महादाईसा :

मराठी साहित्यातील आद्य कवयित्री म्हणून जीची ओळख आहे अशा महादाईसा ह्या संतकवयित्री पहिल्या स्त्री लेखिका होय. धवळे कर्त्या म्हणून त्या नावारूपाला आल्या.

महादाईसा किंवा महदंबा उर्फ रुपाइसा नावाने महानुभाव पंथात ह्या ओळखल्या जातात. त्यांच्या आयुष्याचा मार्ग हा अतिशय खडतर अशा स्वरूपाचा होता. त्यात त्यांनी निवडलेला महानुभव पंत, निवडलेले गुरू चक्रधर स्वामी व त्यांच्याशी असलेले नाते तसेच वैविध्यपूर्ण असे त्यांचे व्यक्तिमत्व ह्यामुळे त्या पंथातील आगळया वेगळया ठरल्या.

महादाईसा यांनी मराठी स्त्री साहित्याची मुहुर्त मेढ रोवून ते दालन जणू स्त्रीयांसाठी खुले करून दिले. चरित्र लेखन करणाऱ्या चरित्रकार व धवळयांच्या माध्यमातून काव्य लेखन करणाऱ्या कवयित्री ह्या दोन रूपाने त्या समोर येतात व ह्या दोन्हींमध्ये त्यांचे व्यक्तिमत्व हे वेगवेगळया स्वरूपाचे असलेले आपल्याला आढळते. धवळयांचे लेखन करताना त्या आत्ममग्न मुक्या वाटतात तर चरित्र लेखन करताना त्यांच्या वैविध्य पूर्ण व्यक्तिमत्वाची छटा उमटताना दिसते.

13 व्या शतकात महाराष्ट्रात श्री. चक्रधर स्वामी व त्यांच्या अनुयायांनी जे धार्मिक सामाजिक परिवर्तनाची चळवळ सुरू केली होती त्यामध्ये महादाईसा यांचा मोलाचा वाटा आहे. तसेच तत्कालीन समाजातील स्त्रीयांच्या समस्या, व्यथा, वेदना, बाल विधवांचे प्रमाण जास्त होते व त्यांना सोसाव्या लागणाऱ्या यातना त्यांच्या साहित्यातून व्यक्त होतात.

वायोनायक व कामाइसा यांची मुलगी महादाईसा होय व माधवाचार्य हा वायोनायक यांचा भाऊ व माधवाचार्य यांच्या पत्नी आबाईसा त्यांना चार मुले असतात. माधवाचार्य वारल्यानंतर आबाईसा आपल्या मुलांना घेऊन वायोनायक यांच्या घरी येऊन राहतात. त्यानंतर आबाईसांच्या मुलांची लग्न होतात. वायोनायक यांची मुलगी महाईसा व आबाईसा यांची मुलगी उमाईसा या दोघींचे लग्न होऊन त्या संसाराला लागतात पण खूप कमी वेळात त्या दोघींचेही बालवयात लग्न झाल्याने बालविधवा होण्याची वेळ त्यांच्यावर येते. त्यानंतर उमाइसा व महादाईसा व उमाइसाचा भाऊ नागदेव हे तिघेही महानुभव पंथात येतात व प्रसिद्धीस पावतात. नागदेवांचेही लग्न होते मुलं होतात पण त्यांचे संसारत मन रमत नाही. वेगवेगळ्या व्यसनांच्या अधीन तो जातो. त्यानंतर रामदेव वडनेरकर उर्फ दादोस ह्या चक्रधर स्वामींच्या शिष्यांशी त्यांची ओळख होते व त्यानंतर महादाइसा व नागदेवाचार्य दोघेही महानुभव पंथाचे अनुयायी बणून काम करतात व त्यांच्या मार्फत त्यांना मोक्षमार्गाची सिद्धी लाभते. महादाईसाच्या पुढच्या आयुष्याची वाटचाल चक्रधरांच्या आयुष्यातून जाते.

महानुभावांच्या लिळाचरित्र, श्रीप्रभुचरित्र व स्मृतिस्थळ या ग्रंथातून आपल्याला महादाइसा भेटते. लिळा चरित्रातली पूर्वाश्रमीची व नंतर चक्रधराची शिष्या, मग श्री प्रभुचरित्र अशा वेगवेगळ्या ठिकाणी वैविध्यपूर्ण बदलत गेलेल्या अस्मितेची चित्रे त्यांच्या बाबतीत आपल्याला पहावयास मिळतात."1

दादोस हे महादाईसा यांचे प्रथम गुरू होते त्यांनी तिला विद्यादान केले. परमार्थाच्या ओढीने त्यांनी स्विकारलेले गुरूपद फळाला येते व त्यांच्या सानिध्यामुळे चक्रधर स्वामींशी त्यांची ओळख होते. परमार्थाची आवड असल्याने व्रतवैकल्य, देवपुजा, तीर्थयात्रा या सर्व गोष्टी त्या करतात. एकंदरीत धार्मिक संस्कार दादोस यांच्या समवेत असतानाच तिच्यावर होतात. तसेच महादाइसाकडे उपजत काव्य प्रतिभा होती व त्या प्रतिभेला चक्रधर स्वामींच्या सहवासाने आणखीनच पालवी फुटली. म्हणजेच थोडक्यात संसारीक जीवनाचा अनुभव घेऊन पारमार्थिक मार्गावर आल्यावर तिने आपल्या व्यक्तिमत्वाला वेगळी कलाटणी दिली. पण तिने आपले लौकिक आयुष्याचे भोग हे भोगलेले दिसतात व त्यानंतर ती पारमार्थिक मार्गाला लागते. चक्रधर स्वामींच्या भेटीनंतर तिच्या आयुष्याला खरा मार्ग मिळतो व ती मोक्षमार्गापर्यंतचा प्रवास हा ती त्यांच्या बरोबर करते असे म्हणता येईल.

संत जनाबाई :

संत प्रभावळीतील 'जाईची वेल' म्हणून ज्यांचा नामोल्लेख केला जातो अशा संत जनाबाई. संत जनाबाई यांचे संत परंपरेतील स्थान अत्यंत महत्वाचे अशा स्वरूपाचे आहे. 'नामयाची दासी जनी' असे स्वत:चा नामोल्लेख करणाऱ्या जनाबाई ह्या अत्यंत सोशीक अशा स्वरूपाच्या होत्या.

दमा आणि कुरूंड ह्या शुद्र दाम्पत्यांच्या पोटी विठ्ठलाच्या कृपा-आशिर्वादाने जन्मास आल्या. पोटी खुप दिवस मूल नाही म्हणून विठ्ठलाला साकडे घालणाऱ्या दमाच्या पोटी 'तुला कन्या होईल' असा आशिर्वाद लाभून जनाबाई चा जन्म होतो. नंतर तिला पंढरपुरला दामाशेटींच्या घरी नेऊन सोड अशी ही आज्ञा पांडुरंगाकडून होते व त्यानंतर ४ ते ५ वर्षाच्या जनाबाई झाल्यानंतर त्यांचे आईवडील त्यांना दामाशेट्टीच्या घरी सोडतात व तेही देवाची आज्ञा म्हणून तिचे संगोपन करतात. त्यानंतर नामदेवांचा जन्म झाल्यावर जनाबाई नामदेवांना सांभाळतात असे त्यांच्या चरित्र वाचनातून पुढे येते.

सत्वशील वागणे तसेच विविध अभंगाचे लेखन आणि वारकरी संप्रदायातील मानाचे स्थान व ह्या संप्रदायाच्या जडण-घडणात मोलाचे योगदान यामुळे जनाबाईंना संत म्हणून मान्यता मिळाली. त्याचबरोबर जनाबाईंनी ज्यांना आपली दासी म्हणून संबोधले अशा संत नामदेवांच्या कार्यातही त्यांचा मोलाचा वाटा आहे. संत नामदेव तीर्थ यात्रेसाठी उत्तर व दक्षिण

भारतात गेलेले असताना वारकरी संप्रदायाची धूरा सक्षमपणे सांभाळण्याचे काम जनाबाईंनी केले. संत कवयित्री म्हणून त्या जनमाणसात प्रसिद्ध आहे. त्यांनी विविध विषयाच्या अनुषंगाने विपुल प्रमाणात अभंगरचना केली आहे.

वयाने लहान असणाऱ्या संत नामदेवांना त्यांच्या विठ्ठलभक्तीच्या प्रभावामुळे त्या गुरू मानतात व त्यांनी उभारलेल्या वारकरी भक्ती चळवळीत सहभागी होतात. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांच्या समकालीन सर्वच संतांच्या बरोबर राहत असतांनाच त्यांच्यातील काव्यप्रतिभेला सुर सापडतो व त्या अभंग रचना करतात. संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांच्या काव्यप्रतिभेचा प्रभाव जनाबाईवर सतत राहिला व त्यामुळेच त्या संत पदापर्यंत पोहचू शकल्या असे म्हटले तर ते वावगे ठरू शकणार नाही.

संत जनाबईच्या 350 अभंगातून त्यांचे वैविध्यपूर्ण व्यक्तिमत्व खुलताना आपल्याला दिसते. तसेच त्यांच्या नावावर हरिश्चंद्राख्यान, प्रल्हाद चरित्र, कृष्णजन्म, बाळक्रीडा, थालीपाक, द्रौपदीस्वयंवर इ. स्फुट काव्यग्रंथही आहेत. संत जनाबाईंचे अभंग वाचतांना त्यांचे विठ्ठलाप्रती असणारे अपार प्रेम, श्रद्धा पहावयास मिळते. ओतप्रोत प्रेमाने भरलेली अशी भावकविता पूर्ण निष्काम होऊन लौकिक, देहिक भावना विसरून या विठ्ठलाला शरण जातात. आत्मज्ञानाचा साक्षात्कार त्यांना होतो. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर व त्यांची भांवडे याविषयीचा उत्कट भाव त्यांच्या काव्यातून व्यक्त होतो. तसे संत चोखामेळा व त्यांचे कुटुंब याविषयी असणाऱ्या भावना तसेच तत्कालीन सर्व संत मंडळींविषयी वाटणारे प्रेम त्यांनी अभंगातून प्रगट केले. विठ्ठलाविषयी असणारे, वाटणारे प्रेम त्यांनी विविध अभंग व गवळणींच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. वात्सल्य, सहनशिलता, त्यागीवृत्ती, समर्पणवृत्ती, स्त्रीविषयीच्या भावना त्यांच्या काव्यातून व्यक्त होतात. स्त्रियांच्या जीवनविषयक भावना व्यक्त करताना-

"स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास ।
साधुसंता ऐसे केले मज ।।"2

स्त्रीचा जन्म लाभल म्हणून उदास न होता आपण त्या जीवनाचा सन्मान करावा व आपले जीवन भक्तीत समर्पित करावे. आपण कुठल्या कुळात कुठल्या जातीत जन्माला आलो याचा विचार न करता आपल्या मनी असणाऱ्या भक्तीवर विश्वास ठेवून आनंदी आयुष्य जगावे.

जनाबाईंनी आपले लौकिक आयुष्य जगताना अनेक यातना मानहानी सहन केल्या. हिन जातीत जन्माला आल्यास सल त्यांच्या मनात होतीच. समाजाने त्यांना त्यांच्या जातीमुळे खूप छळले. विठ्ठलाच्या मंदीरात प्रवेश करता येत नव्हता. जनाबाई ज्यांच्या घरात राहायची त्यांच्या घरातील सर्व सदस्यांना मंदीरात प्रवेश होता पण त्यांना तो नव्हता. त्याची खंत त्यांना वाटते व त्या म्हणतात-

"राजाई गोनाई । अखंडीत तुझे पायी ।
मज ठेवियले द्वारी । नीच म्हणोनि बाहेरी
नारा गोंदा । महादा विठा । ठेवियले अग्रभागी
देवा केव्हा क्षम देसी । आपुली म्हणोनि जनी दासी ।।"3

अशा प्रकारे घरातील सर्व व्यक्तींना तुझ्या पायाचे दर्शन नित्य घेता येते फक्त मीच नीच जातीत जन्माला आल्याने मला ते मिळत नाही. देवा कधी माझ्यावर कृपा करशील? मला कधी आपलं मानशील अशी खंत त्या व्यक्त करताना दिसतात आणि ह्या अशा भरल्या घरात मला मग एकटे-एकटे वाटते. म्हणून किमान तु तरी मला जवळ कर असे त्यांना वाटते आणि त्या म्हणतात-

"माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ।।
मी तुझे गा लेकरू । नको मजशी अव्हेरू ।।"४

जातीयतेची झळ त्यांच्या मनाला कशी बसते हे ही त्या अप्रत्यक्षरित्या व्यक्त करतात. तसेच स्वत:च्या आई-बापाशिवाय जगणे कसे अवघड असते व हे वास्तव ही समाजाला दाखवून देतात. अतिशय अर्थपूर्ण अशा अभंगाची रचना जनाबाईंनी केली आहे.

वारकरी संप्रदायाच्या चळवळीत सक्रिय मोलाची कामगीरी त्यांची आहे. तत्कालीन समाजजीवन, धार्मिक, राजकीय, कौटुंबिक इ. सर्वच बाबींवर लक्ष त्यांनी दिल्याचे त्यांच्या अभंगातून जाणवते. त्याचबरोबर तत्कालीन सर्वच संतांच्या जीवनाचा आढावा घेणाऱ्या अभंगाची निर्मिती त्यांनी केली.

जनाबाईं आपल्या अभंगाची रचना करतात. सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत त्यांच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत. उपदेश, भावकाव्य, चरित्र, आख्यान, भारूड, ओवी, पाळणा, आरती अशा अनेक काव्यप्रकारात त्यांनी लेखन केल्याचे आढळते.

अशा मराठी संत साहित्यात मोलाची भर घालण्याचे कार्य केले व वारकरी संप्रदायात मोलाचे उच्चतम स्थान पटकावले. "कवयित्री श्री संत जनाबाई ह्या श्री क्षेत्र पंढरपूर येथे महाव्दारी आषाढ कृष्ण त्रयोदशी शके १२७२ रोजी विठ्ठलचरणी समाधीस्त झाल्या"5

संत सोयराबाई :

१३ व्या शतकाच्या सरतेशेवटी संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांनी सांस्कृतीक चळवळ उभी केली. ज्या समाजात हीन, पतीत, स्त्रीया यांना मानाचे स्थान समाजाने नाकारले होते अशा समाजातील ह्या लोकांना मानाचे स्थान मिळवून देण्यासाठीचा लढा ह्या संतांनी दिला. समाजातल्या सर्व स्तरातील लोकांना एका झेंड्याखाली जमा करण्याचे काम यांनी केले. ही समता समाजात प्रस्तापित करताना प्रसंगी त्यांना धर्ममार्तंडांच्या छळालाही सामोरे जावे लागले. तरीही त्यांनी सगळ्यांची पर्वा न करता ही समतेची मुहुर्त मेढ पंढरपुरला चंद्रभागेच्या तीरी रोवली व अध्यात्मिक लोकशाहीची स्थापना केली पण तरीही ह्या सगळ्या घडामोडीत विविध संतांच्या मांदियाळीत चोखोबा व त्यांचे कुटुंब हे वेगळे राहिले. चोखोबा व त्यांचे कुटुंब तसेच त्यांची बहिण निर्मळा, मेहुणा बंका व मुलगा कर्ममेळा गावकुसाबाहेरच स्थिरावली. हे अख्खं कुटुंब जातीव्यवस्थेला प्रश्न विचारणार, पददलितांचे जगणं वेशीला टांगणारं पहिलं कुटुंब ठरले. सगळ्यांसोबत राहून सगळ्यांपासून वेगळे ठरले आणि त्याचीच फलश्रुती आजही माऊलीची पालखी पंढरीकडे प्रस्थान करताना चोखोबांची पालखीही त्यांच्या सोबत मिरवली जाते.

सोयरा आधीच महार जातीत जन्माला आलेली व त्यात बाईपण आणि म्हणजे आणखीन एक पायरी खालची नवऱ्याबरोबर मेलेली ढोरं ओढायची, मिळालेलं उष्ट, खरखटं खायचं आणि आपलं जीवन जगायचे हे असे जीवन जगताना त्यांनी विठ्ठल भक्तीत स्वत:ला झोकून दिले व जीवनाचे तत्वज्ञान मांडले.

"अवघा रंग एक झाला । रंगी रंगला श्रीरंग
मी तू पण गेले वाया । पाहता पंढरी राया ।"6

अशा प्रकारचे जीवनाचे मर्म सांगणारा सुंदर अभंग लिहिणाऱ्या सोयराबाईंचे स्थान तत्कालीन संतापेक्षा कमी नाही हे ही तितकेच खरे. स्वत:ला 'चोखियाची महारी' म्हणत त्यांनी 92 अभंग लिहिले. त्यांनी चोखोबांनाच गुरू मानलेले असते. त्यांच्या अभंगातून त्यांनी स्वत:चे वेगळेपण सिद्ध केले आहे. साधी सोपी सरळ भाषा, अतिशय रसाळ असे त्यांचे अभंग त्यांचे वाचावयास मिळतात. त्यांचे अभंग आधी स्वत:साठी आणि मग जनांसाठी म्हणजेच प्रथम आत्मशुद्धी ते परमात्मा असा प्रवास करत लिखानाची शैली असल्याचे दिसते. तत्कालीन समाजात एक शुद्र स्त्री ज्ञानाची आस बाळगुणी स्वत:चा शोध घेत होते. समाजाशी झगडून, देवाशी झगडून वाद घालून तत्वज्ञान मांडते व भागवत धर्मातील वारकरी संप्रदायाच्या संतांच्या मांदियाळीत मानाचे स्थान पटकवते. सोवळ्या ओवळ्यांच्या दिसतात व जगण्यातले वास्तव त्या मांडतात.

समारोप :

13 व्या शतकात व त्याच्या सरतेशेवटी अनेक स्त्री संतांची महत्ती आपल्यापुढे येते. पण ह्या ठिकाणी काही निवडक स्त्री संतांच्या प्रतिमांचा विचार आपण केला. त्यातून तत्कालीन स्त्री जीवनाचा मागोवा आपल्याला घेतला आला. महादाइसाचे जीवन कसे गेले व त्यानंतर जातीयतेच्या विळख्यात अडकलेल्या संत जनाबाई व संत सोयराबाई यांचे जीवन कसे गेले याचा मागोवा यातून घेत त्यांची वैशिष्ट्यपूर्ण अभिव्यक्ति जाणता आली. शेवटी कालखंड कोणताही असो स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोन कसा आहे हे ही त्या ठिकाणी लक्षात घेणे महत्वाचे आहे. ह्या तीघींच्या ही जीवन चरित्राचा आढावा घेतला तर आपल्या लक्षात येईल की त्यांना समाजात कशा प्रकारचे दुय्यम स्थान होते ते स्त्रीला आजही आहे. त्यांनी विशिष्ट अभंगरचना केल्या म्हणून त्या भिन्न दिसतात पण लौकिक पातळीवरील जीवन त्यांचे काही वेगळे नव्हते हे ही समजते.

संदर्भ सूची :

1) इंदुमती शेवडे, संत कवयित्री, पॉप्युलर प्रकाशन, प्र. आ., पृ. क्र. 19
2) संपा. हे. वि. इनामदार, भक्तीगंगेच्या वाटेवर, संजय प्रकाशन पुणे, प्र. आ. 1988, पृ. क्र. 71
3) तत्रैव, पृ. क्र. 59
4) तत्रैव, पृ. क्र. 58
5) इंदुमती शेवडे, संत कवयित्री, पॉप्युलर प्रकाशन, प्र. आ., पृ. क्र. 107
6) तत्रैव, पृ. क्र. 108

"काव्यफुलेतून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा"

अंगद श्रीपती भुरे
दयानंद कला महाविद्यालय,लातूर

आधुनिक भारताच्या युगणाईका म्हणून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य उल्लेखनीय आहे. भारतीय इतिहासात शिक्षणाची ज्योत खऱ्या अर्थाने सावित्रीबाईने पेटवली आणि स्त्री जीवनातील अज्ञानरूपी बंदिस्त जीवनाचा अंधार दूर केला, म्हणूनच भारतातील स्त्रीमुक्तीच्या आद्य स्त्री प्रणेत्या, पहिल्या स्त्री शिक्षिका अशी सावित्रीबाई फुले यांची ओळख आज जगभर आहे. आजच्या आधुनिक काळात आजची स्त्री ही पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात कार्य करत आहे. स्त्री शिक्षणाने आजची स्त्री सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये कार्यरत असल्याचे दिसून येत आहे.

'चूल आणि मूल' एवढ्या मर्यादित चार भिंतीच्या आत बंदिस्त जीवन जगणारी स्त्री, केवळ जणू एक शोभेची वस्तू होती. पितृसत्ताक पुरुषप्रधान संस्कृतीच्या आधीन राहून गुलामाचे जीवन जगणारी, 'अबला'समजली जाणारी, 'स्त्री' ही आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या प्रेरणेतूनच 'सबला' झाली असेम्हणणे चुकीचे ठरणार नाही. आजची स्त्री त्याचचार भिंतीच्या आत राहूनकधी आई, कधी बहीण, कधी मुलगी, कधी पत्नी, कधी मैत्रीण, कधी शिक्षिका, कधी डॉक्टर, कधी सेविका तर कधी उत्तम गृहिणी म्हणून अशा विविध स्त्रीप्रतिमामधून ती कार्य करत असलेली दिसून येत आहे. आजच्या बदलत्या विकासाच्या दिशेने झेप घेणाऱ्या स्त्री प्रतिमांचा विचार करता विकासाला मार्गदर्शक व प्रेरणादायी आधार हा क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांच्यामुळे मिळाला हे मात्र निश्चित सांगता येईल.

भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका, पहिल्या स्त्री मुक्ती चळवळीच्या नेत्या, शोषित, पीडित, पददलितांच्या कैवारी आणि प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या म्हणून सावित्रीबाई फुले यांचे नाव सर्वप्रथम घ्यावे लागते. एका अशिक्षित स्त्रीने शिक्षण घेऊन शिक्षिका बनावे आणि अनेक वर्षानुवर्षे अज्ञानाच्या अंधकारात हरवलेल्या, चाचपडणाऱ्या स्त्री-शूद्रांना ज्ञानरूपी प्रकाश सावित्रीबाई फुले यांनी दाखवला. ही गोष्ट भारताच्या इतिहासात अपूर्व अशी आहे. अशिक्षित असलेली सावित्रीबाई फुले ही निर्भीडपणे शिक्षण घेऊन शिक्षणाच्या क्षेत्रातून, सामाजिक क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रातून, आर्थिक, राजकीय अशा विविध क्षेत्रात पदार्पण करते आणि स्त्रीमुक्तीसाठी, शोषित वर्गासाठी, पती महात्मा फुले यांच्या सोबत सतत कार्यरत राहते, यातून त्यांची स्त्री प्रतिमा किती महान आहे हे लक्षात येते. स्वतःचा विचार न करता दुष्काळातल्या अन्नासाठी तडफडणाऱ्या हजारो जीवांच्या मुखात त्यांनी घास भरवला. शेतकरी, कामगारवर्ग तसेच सामाजिक सुधारणांसाठी वाङ्मयाचे साधन हाती घेऊन कवयित्री व लेखिका च्या प्रतिमेतून समाज प्रबोधन त्यांनी केलेले दिसून येते. जनावरांप्रमाणे जीवन जगणाऱ्या स्त्री- शूद्रांना त्यांना माणसात आणण्याचे कार्य केले. स्वतःपासून सुरुवात करून सर्व समाज, सर्वगाव सुशिक्षित व्हावा, सुसंस्कृत व्हावा यासाठी अनेक सनातनी लोकांच्या विरोधाला सामोरे जाऊन सावित्रीबाईंनी शिक्षणाची ज्योत तेवत ठेवली. यातून सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री प्रतिमेची विविध रूपंलक्षात येतात.

ज्ञानज्योती, क्रांतीज्योती, स्त्रीमुक्तीच्या पहिल्या शिक्षिका असणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचा जन्म पुरातन कर्मठ विचारधाराने चिकटून बसलेल्या समाजात, सातारा जिल्ह्यातील, खंडाळा तालुक्यातील 'नायगाव' या एका चिमुकल्या खेड्यात ३ जानेवारी १८३१ रोजी झाला. आंब्याच्या वनात वसलेले, किर्रदाटझाडीत असलेले आणि विहिरीच्या पाण्याने तुडुंब भरलेले 'नायगाव' हे सुपीक, सुसंपन्न असेगाव होते. अशा या नायगावच्या खंडोजी नेवसे पाटील आणि लक्ष्मीबाई या दाम्पत्याची मुलगी म्हणजे सावित्रीबाई. सावित्रीबाई ह्या खंडोजी नेवसे पाटील यांच्या ज्येष्ठ कन्या होत्या. सावित्री, सिदुजी, सखाराम आणि श्रीपती अशी चार अपत्ये खंडोजी नेवसे पाटील यांना होती. नेवसे पाटील हे नायगाव परिसरातील गोरगरीब

अडल्यानडल्यांचे श्रद्धास्थान होते. त्यांच्या घराण्याला पाटीलकीआणि इनामदारीचाही मान होता. वडिलांचा करारीपणा, परोपकाराची वृत्ती आणि आई लक्ष्मीबाईचे सौंदर्य हे सावित्रीमध्ये दिसून येते. बालपणी सावित्री आईवडिलांना शेतात मदत करीत असे, घरकामातही आईला मदत करीत असे.वडीलाकडे पाटीलकी व इनामदारकी असल्याने गोरगरिबांच्या प्रश्नांची, समस्यांची जाणीव, वडिलांची निरपेक्ष व्यवहारवृत्ती, समतादृष्टी, कष्टाळू नीती, प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा आणि आईकडून सोशिकपणाची वृत्ती, सेवावृत्ती, गोरगरिबांना, गरजूंना अन्नदान करणे हे गुण सावित्रीबाईमध्ये अवतरले होते. सावित्रीबाईची बालपणापासूनची निरीक्षणशक्ती, सामाजिकसमज, स्वतःची जिज्ञासू वृत्ती, करारीपणा, सोशिक स्वभाव, सेवाभाव, दया, क्षमा, करुणा या गुणांमुळेच पुढील आयुष्यात त्यांची स्त्री प्रतिमा सर्व स्त्रीच नव्हे तर पुरुष समाजाला ही प्रेरणादायी ठरलेली दिसून येते.

सावित्रीबाई चा विवाह इ. स. १८४० रोजी ज्योतिरावांशी झाला. तेव्हा सावित्रीचेवय केवळ दहा वर्षे तर ज्योतिरावांचे वय तेरा वर्षे असे होते. बालविवाह झाल्यापासूनच म्हणजेच १८४० पासून शेवटच्या क्षणापर्यंत सतत ज्योतिरावांना सावलीप्रमाणे साथ देणारी, दीनांची माऊली सावित्रीबाई आदर्श वैवाहिक जीवनाचे श्रेष्ठतम प्रतीक ठरली. शिक्षणाची आवड असणाऱ्या ज्योतिबाशी सावित्रीचा विवाह झाला होता. शिक्षण हाच मानवी कल्याणाचा व प्रगतीचा पाया आहे, विकासाचा मार्ग आहे, हे ओळखून असलेल्या ज्योतिरावांनी प्रथम सावित्रीबाईंना शिक्षणाचे अमृत दिले पाहिजे हे मनोमन ओळखले होते व त्यातूनच त्यांनी सावित्रीला शिक्षण देण्याचा संकल्प केला. आणि सावित्रीबाई ला शिक्षणासाठी प्रेरित केले. सावित्रीबाई त्या काळातील स्त्रियांचे प्रतिनिधित्व करणारी एक साधी, भोळी अशी एक अशिक्षित स्त्री होती, त्याचबरोबर ती पती, सासर घर मानणारी एक सुग्रहिनीही होती. अशा स्त्रीची मनोवृत्ती शिक्षण घेण्यासाठी अनुकूल बनवणे खरंच एक मोठे आव्हान होते. कारण तो काळ स्त्री शिक्षण देण्यासाठी पुढाकार घेणारा नसून विरोध करणारा होता. अशा स्थितीमध्येही सावित्रीबाईंनी आपल्या पतीला सोबत दिली. ज्योतिरावांचे उदात्त विचार आणि भावना समजून घेतल्या आणि त्या शिक्षणासाठी तयार झाल्या. अनेक प्रश्नांना सामोरे जाऊन समाजातील लोकांच्या विरोधाचा विचार न करता सावित्रीबाईंनी शिक्षणाची कास सोडली नाही. त्यांनी स्वतः शिक्षण घेऊन नंतर समाजातल्या स्त्रीमुक्तीसाठी, स्त्रियांना शिकवण्यासाठी घराच्या उंबरठ्याबाहेर टाकलेले पहिले पाऊल हेच आधुनिक भारतीय स्त्रीच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात होती. स्त्री ही वर्षानुवर्षे पुरुषी गुलामगिरीत अडकलेली होती, 'चूल आणि मूल' हेच स्त्रीचे विश्व होते. सावित्रीबाईनी उंबरठा ओलांडून समस्त स्त्रीजातीला एक सुटकेचा श्वास आणि एक ज्ञानाचा तेजोमयरूपी प्रगतीचा प्रकाश मिळवून दिला.

स्त्री-मुक्ती चळवळीच्या प्रणेत्या, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या हक्काबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी महिला सेवा मंडळाची स्थापना केली. महिलांसाठी निवासस्थान उघडले, बालविवाह विरुद्ध मोहीम चालवली, विधवा-पुनर्विवाहाचे समर्थन केले. अशा विविध समाजप्रबोधनाच्या व स्त्रीमुक्तीच्या कार्यासाठी त्यांनी सर्वशक्तीनिशी सनातन्यांचा विरोध केला. सावित्रीबाईनी जोतीरावांच्या प्रेरणेने शिक्षण घेऊन 'काव्यफुले', 'बावनकशी' नावाचे काव्यसंग्रह लिखाण केले. त्याचबरोबर सावित्रीबाईची गाणी, जोतिबाची भाषणे, पत्रे अशा साहित्य रचना निर्माण त्यांनी केल्या. यावरून सावित्रीबाई फुले या एक लेखिका व कवयित्री सुद्धा होत्या हे लक्षात येते. 'काव्य फुले' हा १८५४ मध्ये प्रकाशित झालेला सावित्रीबाईंचा काव्यसंग्रह म्हणजे त्यांची पहिलीच साहित्यिक रचना. 'काव्य फुले' या संग्रहात एकूण ४१ कविता समाविष्ट आहेत. त्यामध्ये निसर्गविषयक, सामाजिक, प्रार्थनापर, आत्मपर, काव्यविषयक, बोधपर, इतिहासविषयक आणि स्फुट कविता अशा कवितांचे वर्णन आलेले आहे. 'काव्य फुले' मधील प्रत्येक कवितेतून सावित्रीबाई फुले यांची एक आदर्श स्त्रीमुक्तीची उदगाती, पतीप्रेम, शूद्रादीचा विकास, सहकार्य, कुप्रथांना विरोध, सेवाभाव अशी विविधांगी स्त्री प्रतिमा चित्रीत झालेली दिसून येते.

'पिवळा चाफा', 'जाईचे फूल', 'जाईची कळी', 'गुलाबाचे फुल', 'फुलपाखरू आणि फुलाची कळी', 'मानव सृष्टी', 'मातीची ओवी', या निसर्ग कवितेतून सावित्रीबाई फुले यांचे निसर्गप्रेम आणि त्यांच्याशीझालेली समरस्तास्पष्ट होते. निसर्गातल्या फुले, पानांच्या प्रतिमातून त्यांनी मानव समाजात एकात्मतेची भावना निर्माण व्हावी म्हणून लेखन केलेले दिसून येते.

"मानवप्राणी निसर्गसृष्टी।
द्व**धुळे** शिक्क्यांचे **नाणे**॥
एक असे ते म्हणू**नी सृष्टीला।**
शोभवू**मानव ले**णें॥**"**

'शिकणेसाठी जागे व्हा', 'मणू म्हणे', 'ब्रह्मवंती' शेती', 'शूद्रांचे दुखणे', 'इंग्रजी माऊली', 'शुद्र शब्दाचा अर्थ', 'बळीस्तोत्र', 'शूद्रांचे परावलंबन', 'तयास मानव म्हणावेका?', 'अज्ञान', 'सावित्री व ज्योतिबा संवाद' या सामाजिक कवितेतून शूद्र अतिशूद्र समाजाच्या जागृतीसाठी चे विचार सावित्रीबाईंनी मांडलेले आहेत. 'शिकणेसाठी जागे व्हा, या कवितेत त्या म्हणतात-

"उठा बंधुंनो अतिशूद्रानो**,**
जागे होऊनि **उठा,**
परंपरेची गुलामगिरी ही
तोडणेसाठी **उठा,**
बंधूनो**शिकणेसाठी उठा**॥**"**

तर 'तयास मानव म्हणावे का?', या कवितेत त्या म्हणतात-

"ज्ञान नाही विद्या नाही
ते घेणेचि **गोडी नाही,**
बुद्धी असुनि **चालत नाही,**
तयास मानव म्हणावे का?"

असे विविध प्रश्न उभे करून माणसाला माणसाची ओळख करून देण्यासाठीचा उपदेश त्यांनी कवितेतून केला आहे. 'सावित्री व जोतिबा संवाद', या कवितेत शेवटपर्यंत सावित्रीने आपल्या पतीच्या कार्याचे महत्त्व चित्रित केले आहे, त्या म्हणतात -

"काळरात्र गेली अज्ञान पळाले। सर्व जागे केले सूर्याने या।
शूद्र या क्षितिजीजो**तिबा हा सूर्य। तेजस्वी अपूर्व उगवला॥**
जाऊ चला गाठू **मानवता केंद्र। ' मनुष्यत्व ' इंद्र पदी जाऊ॥"**

यावरून सावित्रीबाईंचे प्रेमभाव, सहकार्य, ध्येयधारणा आणि त्यातील व्यापकता स्पष्ट होते.

सावित्रीबाई फुले यांच्या 'काव्य फुले' या काव्यसंग्रहातील कवितांचे वाचन करता हे लक्षात येते की, सावित्रीबाईची स्त्री प्रतिमा ही विविधांगाने, विविध विषयाला अनुसरून चित्रीत झालेली आहे. त्यांनी 'काव्यफुले' मधून समाजातल्या शूद्रादीशूद्रांना जागे करण्यासाठी, त्याचे अज्ञान दूर करण्याचे विचार मांडले आहेत. तर काही कवितांमधून जोतीरावांची महती गायिलेली आहे. त्यांच्याबद्दलचा आदरभाव वर्णन केला आहे. त्याच बरोबर थोरांच्या विचारांची थोरवी गायिलेली आहे. 'काव्यफुले'मधल्या विविध कवितांतून समाजातल्या पुरुष वृत्तीचा, स्त्रियांच्या अज्ञानाचा, शूद्रादीशूद्रांचा विचार शिक्षणातून विकासाच्या मार्गाकडे नेण्याचे विचार व्यक्त केलेले आहेत. त्यांच्या कवितेतून सामाजिक जाणिवा, लोकाभिमुखता, शैक्षणिक

विकास, गरीब स्त्री शूद्रादीशूद्रांची कणव स्पष्ट होते. त्यांच्या कवितेतून आधुनिक व प्राचीन अशा दोन्ही साहित्याची पायाभरणी झाल्याचे स्पष्ट दिसून येते.

सारांश :क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा 'काव्य फुले' हा काव्यसंग्रह म्हणजे माणसाला माणसाची ओळख करून देणारा काव्यसंग्रह आहे. एक स्त्री म्हणून समाजात जीवन जगताना माणसाला माणूस म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य आहे, असे त्यांनी स्त्रीशिक्षणाच्या माध्यमातून सांगितले. आणि मानवाचे वास्तव जीवनानुभव 'काव्य फुला'तून मांडले आहेत. अज्ञान, जुन्या रूढी परंपरा, चालीरीती नष्ट करण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे आहे, हे ओळखून त्यांनी स्त्रीमुक्ती चळवळीची निर्मिती केली. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांमध्ये आणि एक स्त्री म्हणून, पत्नी म्हणून, गृहिणी म्हणून, शिक्षिका म्हणून, समाजसुधारक म्हणून, समाजसेविका म्हणून, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या म्हणून, सजीव सृष्टीतील प्रेम बंधनाचे भावबंधनम्हणून त्यांची स्त्री प्रतिमा वंदनीय आहे.

"स्त्री शिक्षणाचा पाया रचला
महात्मा फुले नि सावित्रीने**,**
एकात्मता निर्माण करावी
देशातल्या सर्व स्त्री पुरुषाने."

संदर्भसूची **:**

१) डॉ.मा.गो.माळी (संपा.), सावित्रीबाई फुले समग्र वांग्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

२) प्रा.सौ.विजया मधुकर इंगोले, ज्ञानज्योतिमाईसावित्री फुले, आयुष्य प्रकाशक, आंबेजोगाई.

४) डॉ.अनिल कठारे, भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स अँड डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद.

५) डॉ.मा.गो.माळी व इतर (संपा.), सावित्रीबाई फुले (काल आणि कर्तृत्व) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीमंडळ , मुंबई.

६) सावित्रीबाई फुले - विकिपीडिया.

स्त्रीत्व, स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती आणि मराठी कविता

श्रीमती अनिता तुकाराम यलमटे

लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालय, उदगीर जि. लातूर -४१३५१७

डॉ. विलास पाटील

प्रोफेसर, संशोधन मार्गदर्शक आणि मराठी विभागप्रमुख, ज्ञानोपासक महाविद्यालय , जिंतूर - 431509 जि परभणी

स्त्रीत्व आणि स्त्रीवादी समीक्षा या संदर्भात वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोशकार म्हणतात, "स्वतःच्या वेगळेपणाची 'स्वःत्वाची' जाणीव ही आजच्या काळातल्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातली महत्त्वाची व केंद्रिय संकल्पना आहे. ही स्वत्वाची जाणीव दुहेरी असते. स्वतःचे इतरांशी असणारे सारखेपण आणि इतरांहून असणारे वेगळेपण त्या दोन्हींचाही तीत समावेश होतो. स्त्रियांना ही 'स्व' त्वाची जाणीव फारशी नसते किंवा जी असते ती गमावण्यासाठीच असते. किंबहुना, कॅरोलिन जी. हिलब्रान म्हणते, त्याप्रमाणे पत्नीत्वासाठी स्वचा त्याग ही किंमत द्यावी लागते. जेव्हा स्त्रिया लिखाणातून स्वतःचे हे 'स्व'त्व शोधण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांचे साहित्य पुरुषांच्या साहित्यातून वेगळे ठरते. स्त्रियांच्या साहित्यातील हा वेगळेपणा शोधून त्याची चिकित्सा करण्याचे कार्य गेल्या काही वर्षात स्त्री-समीक्षकांनी केले आहे. स्त्रियांच्या कादंबऱ्यातून, कथांतून कवितांतून त्यांच्या 'स्व' त्वाचा शोध त्यांनी कसा घेतला आहे. त्याची जाणीव त्यांना कशी झाली आहे. वर्षानुवर्षे आपण दडपले गेलो असल्याचे भान त्यांनी कसे व्यक्त केले आहे याचा शोध घेणारी समीक्षा म्हणजे स्त्रीवादी समीक्षा असे म्हणता येईल."[१]

स्त्रीवाद ही एक साचेबंद विचारप्रणाली नसून स्त्रीमुक्तीच्या संदर्भातील खुल्या विचारांचा संच आहे. यात मार्क्सवादी स्त्रीवाद, कृष्णवर्णीय स्त्रीवाद, पर्यावरणवादी स्त्रीवाद, उदारमतवादी स्त्रीवाद, अस्तित्ववादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, मवाळ स्त्रीवाद, अमेरिकन स्त्रीवाद, फ्रेंच स्त्रीवाद, भारतीय स्त्रीवाद; अशी वैचारिक आणि देशकालानुसार विचारांची वर्गवारी आहे. स्त्रीचा आत्मशोध आणि स्त्रीत्वाची अस्मिता तसेच स्त्रीकेंद्री समीक्षा यासंदर्भात डॉ.मंगला वरखेडे म्हणतात, "स्त्रीवादी साहित्याविचारातील या पंथोपंथातून स्त्रीच्या आत्मशोधाचा आणि स्त्रीत्वाच्या अस्मिता प्रस्थापनेचा प्रवास स्पष्ट होतो. हा समीक्षा विचार स्त्रीत्वाच्या सर्जकतेचा विचार करणारा आहे. ही समीक्षा रूपे स्त्रीचे कनिष्ठत्व नाकारतात. स्त्री केंद्री वाचन करत असावे आणि संहितेतील चिन्ह व्यवस्थेत स्त्री वाचक अर्थर पट करणे; या विचारातूनच अर्थ विशदी करणाची एक पद्धती म्हणून स्त्री केंद्रीसमीक्षा आकार घेऊ लागली."[2]

भारत स्वतंत्र होवून ६४ वर्ष झाली. स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला तरीही पुरुष प्रधान मानसिकता आणि सरंजामीवृत्ती, हातात हात घालून वावरताना दिसून येत आहे. आज ही भारतीय 'स्त्री' सुरुवातीला वडिलांच्या, नंतर पतीच्या आणि शेवटी मुलाच्या ताब्यात राहते. महानगरातली स्त्री नोकरी करत असली तरी, घरी जावून तिला पुन्हा घरकाम करावे लागते. अशाच प्रकारे ग्रामीण भागातील स्त्रीला, शेतात काम करूनही तिला पुन्हा घरकाम चुकत नाही.

स्त्री मुक्ती चा लढा हा पुरुषप्रधान मानसिकता आणि विषम श्रम विभागणी या विरोधात आहे. स्त्रीमुक्तीचा अर्थ विशद करताना डॉ. गेल ऑमव्हेट म्हणतात, लिंगभेदावर आधारलेली श्रम विभागणी पूर्णपणे नष्ट करणे, हा स्त्रीमुक्तीचा अर्थ आहे. या प्रश्नाच्या दोन बाजू आहेत. पहिली म्हणजे, उत्पादन व राजकीय जीवन या क्षेत्रात स्त्रीचा संपूर्ण प्रवेश: कम्युनिस्ट चळवळीने अगदी सुरुवातीपासून, आणि योग्य असा; ह्या मुद्यावर भर दिला आहे. पण हे शक्य होण्यासाठी म्हणजे घराबाहेरील कार्यात स्त्रीची मुक्तपणे व संपूर्ण भागीदारी होण्यासाठी दुसऱ्या ही बाजूवर भर दिला पाहिजे. ती बाजू म्हणजे, गृहकृत्य व शिशुसंगोपन यांच्या ओझ्यापासून स्त्रियांची मुक्तता झाली पाहिजे. याचा अर्थ असा की (कमीअधिक प्रमाणात)

गृहकृत्याचे सामाजीकरण केले पाहिजे. पाळणा घरे, शिशुसंगोपन केंद्रे, अन्नगृहे, संघटित झाली पाहिजेत. विविध प्रकारच्या घरकामांचे यांत्रिकी करण झाले पाहिजे. आणि घरगड्यांच्या कामात पुरुषांनी भाग घेतला पाहिजे."[3]

डॉ. गेल स्त्रीमुक्तीचा भारतीय देशी स्त्रीत्वाच्या अंगाने आपले विचार मांडतात; आणि ते इथे महत्त्वाचे आहे. भारतात सरंजामदारी आणि राजेशाही तसेच संस्थानिकांचे राज्य होते. इंग्रजामुळे भारतात सार्वत्रिक शिक्षण आणि आधुनिक शिक्षाणाचा पाया रचला गेला. यामुळेच फ्रेंच राज्यक्रांतीतून उदयाला आलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांचा परिचय झाला. यातून भारतीय स्त्रीदास्याचा प्रश्न चर्चिला जाऊ लागला. राजा राममोहन रॉय आणि महात्मा जोतिबा फुले यांनी स्त्रीत्वाच्या, स्त्री मुक्तीच्या अंगाने कार्य केले. यामुळे देशी स्त्रीत्वाला चालना मिळाली आणि देशी स्त्री स्वातंत्र्याला पोषक वातावरण निर्माण झाले. स्त्रीवाद म्हणजे काय? याबद्दल आपले मत व्यक्त करताना माया पंडित म्हणतात, "कोणत्याही समाजामध्ये काही विशिष्ट संरचना- संकल्पनांमुळे, काही विशिष्ट कल्पनाप्रणाली- व्यवहारांमुळे अन्याय होत असतो, आणि ह्या अन्यायाविरुद्ध झगडण्याची भूमिका घेऊन उभं राहणं म्हणजे स्त्रीवाद. मग ती वेगवेगळ्या सिद्धांता- प्रणालीमधून आलेली असली तरी समान भूमिका, गृहितके सर्वांच्याजवळ आहेत असं मला वाटतं. स्त्रियांवर अन्याय होतो; तो मग लैंगिक असेल, आर्थिक असेल, सामाजिक असेल, सांस्कृतिक असेल; तो मान्य करून, म्हणजे तो आहे; हे मान्य करुन, त्याविरुद्ध झगडणे, जग बदलणे अधिक निरोगी करण्यासाठी धडपडणे, समानतेवर आधारित समाज रचनेचा आग्रह धरणे म्हणजेच स्त्रीवाद".[४] अशी आपली भूमिका, माया पंडित स्त्री वादासबंधी मांडतात तर स्त्री वाद चळवळीसंबंधी आपले मत सांगून; स्त्री आणि पुरुषांमधील स्त्री तत्त्व आणि पुरुष तत्त्वासबंधी सहमती आणि समानता आवश्यक आहे असे मत मांडताना शारदा साठे म्हणतात, स्त्री वादी चळवळ म्हणजे स्त्रियांनी स्त्रियांसाठी चालविलेली चळवळ नव्हे, ती मानवमुक्ती चळवळीतील एक प्रवाह आहे; पण तो बाजूला करता येत नाही. शरीरात जसे रक्त, तशी "स्त्रीवादी चळवळ. स्त्रियांमध्ये स्वावलंबनाची ताकद निर्माण झाली की स्त्रियांच्या म्हणून वेगळ्या- स्वायत्त संघटनांची गरज भासणार नाही. सध्यस्थितीत स्त्रियांच्या संघटना असणे क्रमप्राप्त आहे; पण तो सवतासुभा नव्हे. आणि या संघटनांनाही स्त्रीवादी विचार मानणाऱ्या पुरुषांचे पाठबळ असतेच, पण ते केवळ पाठबळ न राहता पुरुषांनी ही स्त्रीवादी दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे; आणि पुरुषप्रधान रचनेविरुद्धच्या लढ्यात सामील झाले पाहिजे. पुरुष प्रधानतेचे आजचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे, लिंग भेदावर आधारित श्रम विभागणी. स्त्रिया मोठ्या प्रमाणात सार्वजनिक उत्पादन क्षेत्रात काम करीत असल्या तरी चूल आणि मूलही त्यांच्या माथी मारलेली कामे आहेत. मुलाला जन्म देणे आणि अंगावर दूध पाजणे या व्यतिरिक्त सर्व कामे स्त्रियां प्रमाणेच पुरुषही करू शकतात, नव्हे करतात. हॉटेल, धुलाई, दळण, शिवणकाम इ. व्यवसायात पुरुष असतातच. खरे म्हणजे अर्धनारी नटेश्वराप्रमाणे प्रत्येक पुरुषात स्त्री तत्त्व, आणि प्रत्येक स्त्रीत पुरुषतत्त्व असते. तेव्हा दोघांनी परस्परपूरक पद्धतीने सहकारी म्हणून जगले पाहिजे. पुरुषांचा चळवळीतील सहभाग, त्यादृष्टीने फार महत्त्वाचा आहे. तो सर्वपातळयांवर जसा वाढेल, तशी चळवळीची गरज कमी होत जाईल. आणि समानता हा मानवी जीवनाचा सहज सुंदर व स्वाभाविक घटक बनेल."[५]

स्त्री मुक्ती तसेच स्त्री स्वातंत्र्याचा हा लढा स्त्रीपुरुष समानता येईपर्यंत लढवला जाणार आहे. याचाच अर्थ; सद्या जी विषमता आहे ती नष्ट व्हायला हवी. यासाठी हा लढा देशी स्त्रीत्व कसीत करत लढत राहणे आवश्यक आहे. महानगरातील स्त्रीमुक्ती आजस्त्री स्वातंत्र्याच्या चळवळी, ग्रामीण भागातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांच्या सहभागाने समृद्ध होत जातील. तसेच बहुजन समाजातील स्त्रियांचा सहभाग जसा वाढेल तशी सर्व देशी स्त्रीवादाला बळकटी येईल. भारतीय समाजात लग्न आणि कुटुंब व्यवस्था तसेच मातृत्वाला महत्त्व आहे. या सर्वालाच नकार दिल्यास अराजकता माजेल. मातृत्वाला नकार दिल्यास पुनरुत्पादन थांबेल. यापेक्षा त्यातील दोष नष्ट करुन स्त्री-पुरुषांनी सहमतीने आनंदी-जीवन जगत राहणे आवश्यक आहे. स्त्रियांनी आपल्या जीवनात घर, लग्न आणि आईपणाबरोबरच स्वतःच्या करिअरला महत्त्व द्यावे , हे सांगत स्त्री चळवळीच्या संदर्भात आपली भूमिका मांडताना कवयित्री अश्विनी धोंगडे म्हणतात, "केवळ चूल आणि मूल एवढेच स्त्री चे

कार्यक्षेत्र नाही. घर, लग्न, आईपण बायको या भूमिकां इतकेच स्वतःचे करिअर महत्त्वाचे आहे; आणि घर सांभाळूनही ते करता येते. समाजाने स्त्रीकडे दिलेली दुय्यम भूमिका अन्यायी आहे. स्त्री-पुरुष हे दोघे समान पातळीवर आहेत. निर्मिती हा स्त्रीच्या आयुष्याचा एक भाग सोडला तर; स्त्री आणि पुरुष हे सारख्याच कार्यक्षमतेचेआहेत. शारीरिक दुबळेपणा, सौंदर्य इत्यादी गोष्टी लिंगाबरोबर येणाऱ्या नसून त्या केवळ संस्कृतीने आरोपीत केलेल्या; म्हणून वरवरच्या आहेत. स्वतःच्या शारीरिक व बौद्धिक क्षमतांचा वापर करण्याची कुवत पुरुषांइतकीच स्त्रीमध्ये आहे. शारीरिक गरजांपलीकडे माणसाच्या म्हणून ज्या काही भूका असतात, त्या स्त्रीलाही आहेत. स्वाभिमान, आत्मगौरव, यशाची इच्छा नैपुण्य मिळविण्याची महत्त्वाकांक्षा, आत्मविश्वास, स्वातंत्र्य, स्वावलंबन; या स्त्रीच्या ही नैसर्गिक प्रेरणा आहेत. आणि त्या मार्गाने जाण्यात जे अडथळे येतील; ते दूर करणे हा स्त्री चळवळीचाच एक भाग आहे."[६]

पुरुषांनी स्त्रियांकडे एक वस्तू म्हणून न पाहता, एकव्यक्ती म्हणून त्यांना आदराने वागवणे आवश्यक आहे. प्रत्येक पुरुषाने आपल्यातील स्त्रीत्वात स्वतःला विलीन करणे आणि स्त्रियांमधील पुरुष तत्त्वाला प्रोत्साहित – विकसित करणे आणि स्वतः बरोबरच स्त्रियांना ही समाधान मिळवून देणे आवश्यक आहे. स्त्रियांची एक वेगळी संस्कृती आणि भाषा असते. यांच्या स्वीकारामुळे देशी स्त्रीत्व- स्त्री वादाला बळकटी येईल. या संदर्भात वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोशकार म्हणतात, "स्त्रीची एक विशिष्ट संस्कृती असते व प्रत्येक काळासह येणाऱ्या काही सामाजिक संदर्भात स्वतःचे शरीर, मन व भाषा यांच्या सहजगत असताना; तिची ही संस्कृती प्रकट होतअसते. स्त्रियांच्या लेखना-विषयातून, त्या स्वीकारीत असलेल्या वाङ्मयबंधातून, अनुभवातून, शैली व भाषेतून; ती संस्कृती व्यक्त होत असते. स्त्रीवादी समीक्षा स्त्रियांच्या साहित्याचा जी शास्त्रीय, भाषिक मानसशास्त्रीय व सांस्कृतिक अशा दृष्टिकोनातून विचार करते; व या लेखनातील वेगळेपणाचा शोध घेते. स्त्रियांच्या लेखनाला 'गायनोसेंट्रिक' फेमिनिस्ट क्रिटिसिझम' असे नाव दिले आहे. व समीक्षकालाती 'गायनोक्रिटिक' असे संबोधते."[७]

भारतीय दर्शनांपैकी कोण कोणती दर्शने स्त्रियांच्या बाजूने होती? तसेच कोणकोणत्या मराठी कवी कवयित्रींच्या काव्यात स्त्रीवादाच्या अंगाने चित्रण करण्यात आले आहे ? यासंदर्भात आपल्या लेखात अरुणा दुभाषी म्हणतात, "भारतीय दर्शनांपैकी शाक्तदर्शन आणि तंत्र मार्गात स्त्री ही प्रधान मानली गेली आहे. शिवाला शक्तीचे रूप मानले गेले आहे. गौतमबुद्धाने स्त्रियांना दीक्षेचा आणि भिक्षूवृत्तीचा अधिकार दिला आहे. थेरीगाथेमध्ये स्त्रियांनी लिहिलेले वाङ्मय समाविष्ट केलेआहे. आणि स्मृतीग्रंथांनी जरी स्त्रीवर कडक निर्बंध लादले असले, तरी त्या विरुद्ध विचार मांडणाऱ्या तांत्रिक, चार्वाक, वराह मिहिर, वात्स्यायन या काही विचार परंपरा भारतात आढळतात."[८]

नंतरच्या काळात महानुभाव, वारकरी, लिंगायत इ. पंथांनी स्त्रीला स्थान दिले आहे. ज्ञानेश्वरांच्या अनुभवामृतात शिव आणि शक्ती दोन्ही समान स्थानी आहेत. वारकरी आणि महानुभाव पंथात अनेक स्त्रिया सहभागी होऊन अधिकार पदाला पोहचलेल्या दिसतात. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत भारतीय स्त्रियांनी आपल्या अस्तित्वाला अर्थ देण्याचा प्रयत्न केला आहे. मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात महदंबा, हिराइसा, बाइसाया महानुभाव; तर मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, कान्होपात्रा, बहिणाबाई आणि वेणाबाई अशा संतकवयित्री वारकरी पंथात आढळतात. या स्त्रियांनी त्या त्या पंथात आपले स्थान निर्माण केलेले दिसते. तसेच त्यांनी वाङ्मय परंपरेत अमूल्य भरही टाकली आहे. या स्त्रियांपैकी (संत) बहिणाबाईने स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडली आहे. आपण स्त्री असल्याचे भान विशेषत्वाने व्यक्त केले आहे. बहिणाबाईच्या काव्यात प्रकर्षाने येणारे हे भान इतर कवयित्रींच्या काव्यात अप्रत्यक्षपणे येते. बहिणाबाई, वेणाबाई यांना तत्कालीन समाजाच्या निंदेला तोंड द्यावे लागले आहे. या समर्थ स्त्रियांनी स्त्रीवादी विचार सरणीची छोटीशी पाऊलवाट निर्माण केलेली दिसते. देशी स्त्रीवादात भाषेला खूप महत्त्व आहे. स्त्रिया या मराठी कवितेच्या जननी आहेत – असे म्हटल्यास वावगे ठरु नये. कारण श्रमपरिहारासाठी स्त्रियांनी जात्यावरील ओवीला जन्म दिला. अर्थात स्त्रिया या लोकगीताच्या निर्मात्या आहेत असे म्हटले तर चालेल. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीवर ओवी गीतांचा प्रभाव आहे. एवढी एकमेव गोष्ट बरेच काही सांगून जाते. नंतर ओवीच्या

अक्षरांबाबत अपभ्रंश होवून, अभंग हा काव्यप्रकार (संत साहित्यात) मराठीत लोकप्रिय झाला. स्त्रियांची एक खास भाषा असते. त्या भाषेतील म्हणी, वाक्प्रचार, विविध लोकगीते, संस्कृती, नैतिक दृष्टिकोन या बाबींची नोंद घेणे; देशी स्त्री वादाला आवश्यक वाटते. बौद्ध तत्त्वज्ञानातील करुणा आणि अहिंसा या बाबींचा स्त्री-पुरुष या दोघांनी ही विसर पडू देता कामा नये. महदंबा आणि बहिणाबाई चौधरी यांची कविता देशी स्त्रीवादाच्या अंगाने भाषेस हित परिपूर्ण वाटते. तर गद्यलेखनात लक्ष्मीबाई टिळक यांच्या 'स्मृतिचित्रे' चा उल्लेख प्रस्तुत निबंधकारास महत्त्वाचा वाटतो. स्वातंत्र्योत्तर काळात १९८० नंतर मराठी कवितेत अरुण कोलटकर (भिजकी वही), श्रीधर तिळवे (स्त्री वाहिनी) आणि सुचिन्हा भागवत (टोपणनाव) यांच्या कविता स्त्रीवादाच्या अंगाने जाणाऱ्या आहेत. तर रेखाआठल्ये, मलिका अमर शेख, प्रज्ञा दया पवार, अनुराधा पाटील, रजनी परुळेकर, कविता मुरुमकर, नीरजा, रेषा अकोटकर, कविता महाजन, डॉ.उर्मिला चाकूरकर, रंजन कंधारकर, आणि तृप्ती अंधारे यांच्या कविता देशी स्त्रीवादाचा आविष्कार करणाऱ्या आहेत. सांख्य, चार्वाक, जैन, बौद्धसिद्ध, नाथ, लिंगायत, महानुभाव, वारकरी आणि सुफी तत्त्वज्ञान, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आणि सर्वोदयी तत्त्वज्ञान यांच्या शीना ते सांगत देशी स्त्रीत्व जो माने सशक्त होत जईल.

संदर्भ :

१) वसंत आबाजी डहाके (संपा) ,'वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश', २००१,जी.आर.भटकळ फाऊंडेशन, मुंबई , पृ. ४११

२) (संपा-) डॉ.मनोहर जाधव 'समीक्षेतील नव्या संकल्पना', २००१, स्वरूप प्रकाशन , औरंगाबाद , पृ. १३६

३) (संपा) सुमती लांडे/श्रुती तांबे , २००७ 'स्त्रीवाद' शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर , पृ. २३

४) माया पंडित यांची मुलाखत, तत्रैव , पृ. ८३

५) तत्रैव- (शारदा साठे, पृष्ठे-५२, ५३०)

६) (संपा-) सुमती लांडे 'वाङ्मयीन चळवळी आणि दृष्टिकोन ', २००८ , शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर ,पृष्ठे९५,९६

७) (संपा) वसंत आबाजी डहाके 'वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश २००१, तत्रैव , पृ. ४१३

८) (संपा) डॉ.मनोहर जाधव-'समीक्षेतील नव्या संकल्पना ' , तत्रैव , पृ. १५०

साहेब खंदारे यांच्या एकांकिकांतील अभिव्यक्त स्त्री प्रतिमा

प्रा. डॉ. कांत वसंतराव जाधव

मराठी विभागप्रमुख, पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी जि.लातूर

प्रस्तावना:

आंतरविद्याशाखीय संशोधनाची भारतीय पातळीवर मांडणी करणारा एक संशोधक तसेच भारतीय लोकसाहित्याचा अभ्यासक म्हणून साहेब खंदारे यांची ओळख निर्माण झाली आहे. साहेब खंदारे एक कवी, प्रयोगशील नाटककार, व्यासंगी अभ्यासक, संशोधक, उत्तम वक्ता, दूरदर्शी समाजचिंतक म्हणून गेल्या तीन-चार दशकांपासून मराठी साहित्याच्या प्रांतात संशोधनात्मक मौलिक लेखन करीत आहेत. त्यांचे एकूणच लेखन मराठी साहित्यात मोलाची भर घालणारे आहे. 'आता उजाडेल चार एकांकिका' हा त्यांचा एकांकिका संग्रह आहे. 'कथा अंधारातल्या अंधाराची', 'सूत्रधार', 'आता उजाडेल' आणि 'ब्रेनकॅन्सर' या चार एकांकिका या संग्रहात आहेत. हा संग्रह २००३ मध्ये प्रकाशित झाला; असला तरी यात १९८० च्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, ऐतिहासिक आणि स्त्रीविषयक वास्तवाचे दर्शन ह्या एकांकिका घडवतातआणि 'समकालीनत्वाचे मूल्य' त्या वहन करतात म्हणूनच आजही त्यांची प्रासंगिकता कायम आहे. त्यातही डॉ.साहेब खंदारे यांची सामाजिक बांधिलकी, वैचारिक दृष्टिकोन आणि सांस्कृतिक पिंड दडलेला आहे. समकालीन वास्तवाची चिरफाड करीत समाज मनाला जागृत करण्याचा प्रयत्न त्यांच्या एकांकिकातून जाणवतो. डॉ.साहेब खंदारे यांची भूमिका, वैचारिक बैठक, नाट्य माध्यमातून व्यक्त करताना नाट्य माध्यमावरची पकड ते शेवटपर्यंत सुटू देत नाहीत ही या एकांकिकेची जमेची बाजू आहे.

अभ्यासाचे महत्त्व:

डॉ. साहेब खंदारे यांच्या एकांकिकामध्ये स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भाने विश्लेषण आलेले आहे. त्याचा अभ्यास करता येणे शक्य आहे. 'आता उजाडेल चार एकांकिका' मधून स्त्री प्रतिमाच्या दृष्टिकोनातून अभ्यास करताना स्त्रियांची सामाजिक स्थिती आणि तिच्या अस्तित्वावर पडलेला प्रभाव, स्त्री स्वातंत्र्य, स्त्री शिक्षण, राजसत्ता आणि धर्मग्रंथांनी स्त्रीला दिलेले स्थान याबद्दल अभ्यास होणे महत्त्वाचे वाटते.

संशोधन पद्धती:

'डॉ. साहेब खंदारे यांच्या एका एकांकिकातील अभिव्यक्त स्त्री प्रतिमा' या संशोधन विषयासाठी सैद्धांतिक संशोधन पद्धती, अन्वयार्थक संशोधन पद्धती, संदर्भान्वयी संशोधन पद्धती, चरित्रात्मक संशोधन पद्धती आणि वर्णनात्मक संशोधन पद्धती अशा विविध संशोधन पद्धतींचा अवलंब केला गेला आहे.

डॉ. साहेब खंदारे यांच्या चारही एकांकिकांमधून स्त्रियांच्या प्रश्नावर महत्त्वपूर्ण भाष्य केलेले आहे. 'ब्रेनकॅन्सर' आणि 'कथा अंधारातल्या अंधाराची' या दोन एकांकिकांमध्ये स्त्रीविषयक जाणिवांचे चित्रण जसे आले आहे तसेच वर्तमान व्यवस्थेने स्त्रियांना दुय्यम लेखून त्यांना एखाद्या वस्तूसारखे समजले असल्याचे सात्त्विक सत्य मांडले आहे. 'समाजव्यवस्थेतील पुरुषप्रधान विचारप्रवाह' या एकांकिकांमधून स्त्रीवादी चळवळीच्या अंगाने उपहासाने मांडला आहे. तसेच 'आता उजाडेल' आणि 'सूत्रधार' या एकांकिकांमधून स्त्रीवादी चळवळीच्या जाणिवेतून लिहिलेल्या स्त्रीवादी एकांकिका आहेत. 'आता उजाडेल' या एकांकिकेत स्त्रियांच्या अनेक प्रश्नांना हात घातलेला असून 'सूत्रधार' मध्ये स्त्री-पुरुष समानतेचा आदिम प्रवाह समजून सांगणारी भारतीय स्त्रीवादाची विचारसरणी मांडलेली आहे. या चारही एकांकिकांमधून येणाऱ्या स्त्रियांच्या प्रश्नांचे स्वरूप स्पष्ट करताना सौ.रेखा बैजल म्हणतात, "स्त्रीच्या बाबतीतल्या नैतिक मूल्यांची घसरण स्त्री शिक्षणाची अनास्था हे आज अगदी ऐरणीवर आलेले आणि आपल्या जीवनाशी निगडित असलेले विषय डॉ. साहेब खंदारे यांनी आपल्या परिणामकारक लेखणीचा,

भावनांच्या स्पंदनाचा विषय बनविलेले आहेत. जे समाजात घडतंय ते वाचकाला माहिती असतं, पण तो विषय वाचताना आपणच आपल्यार आसूड मारून घेणाऱ्या भुत्यासारखी वाचकांची अवस्था होते. त्या विषयांची कचरापट्टी आपल्या मनात असली, तर मनात ओशाळून जातो. तर त्या विषयांना आपणही कोणत्या ना कोणत्या पद्धतीने योग्य तऱ्हेनं हाताळलं आहे हे जाणवून मन समाधान होतं. तरीही समाजात ही कीड वाढते आहे हे जाणवून मन सुन्नही होतं. असे सर्वसमावेशक विषय डॉ.साहेब खंदारे यांच्या एकांकिकांमध्ये आलेले आहेत."[1] याहीपुढे जाऊन स्त्रियांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा वेध घेताना एकांकिकेतील स्त्री चित्रणासंबंधाने रेखा बैजल म्हणतात, "या स्वतंत्र देशातच स्त्रीची अशी बोली लागते, तिला जिवंत जाळलं जातं, सामूहिक बलात्कारासारख्या घटनांना सामोरं जावं लागतं, सती जावं लागतं."[2] भारताला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला तरीही या देशात स्त्री-पुरुष विषमता दूर झालेली नाही. या कारणांचा शोधही या एकांकिकांमधून घेतलेला आहे.

स्त्री उन्नतीचे प्रयत्न करणारी परंपरा स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा जोतीराव फुल्यांपासून सुरू झालेली आहे. स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे जेणेकरून त्यांची सर्वांगीण उन्नती होईल या अपेक्षेने महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दाम्पत्याने आयुष्यभर कार्य केले. परिणामी स्त्री शिक्षणाची सुरुवात झाली. तरीही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळाले नाहीत. शिकलेल्या स्त्रियांनी आंदोलन उभे केले नाही. उलट स्त्री अधिकच गर्तेत सापडली. अशा स्त्रियांच्या मनोवस्थेचे दाहक चित्रण डॉ. साहेब खंदारे यांच्या एकांकिकांमधून आलेले आहे. या एकांकिकांमधील स्त्रीवादी भूमिकेवर भाष्य करताना डॉ. वीणा नाखले म्हणतात, "जोतीराव फुल्यांनी स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळवून दिला. 'मुली शिकल्या पाहिजेत' म्हणून सावित्रीबाईंनी स्वत: अनन्यसाधारण योगदान दिले. शिकली तरच स्त्री सर्व क्षेत्रात लीलया संचार करू लागेल म्हणून अनेक समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाचा मूलमंत्र समाजव्यवस्थेत रूजवला."[3] असे असले तरी स्वातंत्र्यानंतर स्त्रिया शिकून नोकरी करू लागल्या असल्या तरी शिक्षणाला आलेले बाजारीकरणाचे स्वरूप स्त्रियांच्या शोषणासाठी कारणीभूत ठरू लागले.

शारीरिक, मानसिक, गुलामगिरीत अडकलेल्या स्त्रियांना स्वातंत्र्योत्तर काळात राबवलेले स्त्री आरक्षण ही एक महत्त्वाची योजना होती. तरीही राजसत्तेचे पाठबळ मिळालेल्या पुरुषप्रधान मानसिकतेने स्त्रियांच्या शोषणाचा मार्ग काढला. अशा पुरुषप्रधान संस्कृतीतील अत्यंत वाईट प्रकाराचे चित्रण स्त्रीवादी भूमिकेतून आलेले आहे. यासंदर्भाने डॉ. वीणा नाखले म्हणतात, "स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण क्षेत्राचा अगदी बाजारच झाला; आणि काही मस्तवाल लोकांच्या हातात हे क्षेत्र गेले. यामुळे सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्या पुरुषप्रधानतेला आणखीनच बळ मिळाले. 'स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तू आहे' अशीच ज्यांची पारंपरिक धारणा होती त्यांनी स्त्रियांच्या शारीरिक शोषाणसाठी सत्तेच्या जोरावर प्रत्येक क्षेत्रात धुमाकूळ घातला. शिक्षण क्षेत्र तरी याला अपवाद कसे ठरणार? राजकीय सत्तेचे पाठबळ असलेली काही किरकोळ आणि असंस्कृत माणसं सुद्धा जेव्हा शिक्षणसंस्था काढून, दुकानदारी करू लागली. तेव्हा ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारे हे क्षेत्र डागाळले गेले. शिक्षक पदासाठी आलेली तरुण स्त्री अशा संस्था चालकांना भोगवस्तू दिसू लागली. नोकरीचे आमिष दाखवून तिचे शारीरिक शोषण अनेकदा शक्य असल्याने ही मंडळी या मार्गाने जाऊ लागली. या बीभत्स आणि किळसवाण्या प्रकाराचे चित्रण करून डॉ. साहेब खंदारे यांनी वर्तमान व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगली आहेत."[4] भारतीय स्त्रीवाद हा मुळातच स्त्री-पुरुष समानतेवर आधारलेला असून त्याचे चित्रण एकांकिकांमधून आले आहे. भारतीय संस्कृती, स्त्री जीवन आणि सातत्याने स्त्रीचा लिलाव करू पाहणारी पुरुषप्रधानता यांचा संघर्ष ही डॉ. साहेब खंदारे यांनी चित्रित केलेला आहे.

या परिवर्तनाच्या प्रवाहात सत्ताधीश स्त्रीला दुय्यम बनवत गेले आणि धर्मग्रंथांनीही तिच्या गुलामगिरीचा पाढा लिहून ठेवला आहे. स्त्रीची समृद्ध संस्कृती कालबाह्य होऊन तिच्या संस्कृतीचे अवशेष तिलाच गुन्हेगार सिद्ध करण्याचे साधन म्हणून धर्मग्रंथांद्वारे पुढे आणले आहे. संस्कृती आणि धर्मग्रंथ यांना पुरुषी राजसत्तेचे पाठबळ मिळाल्यामुळे स्त्रियांच्या स्वत्वावर

आणि अस्मितेवर घाला घालण्याचा कुटील डाव ही व्यवस्था निर्माण करू शकली. या ऐतिहासिक सत्याला उजागर करताना डॉ. साहेब खंदारे यांनी एकांकिकेत अत्यंत महत्त्वाचे दृश्य चितारले आहे. ते असे-

"राजा : प्रधानजी !

प्रधान : जी महाराज !

राजा : ती बाई का रडत होती आमच्या दरबारात?

प्रधान : ती बाई ना... पण महाराज तुम्ही कुठं परदेशाला गेले होते का हो?

राजा : हो! पण ते तुम्हाला कसं कळलं?

प्रधान : हेच त् आमचं आपलं खालच्या लोकांह्याचं लॉजिक है. आता बरेच दिवसात आपल्या मंत्रिमंडळात फारसा बदला झाला नाही; तेव्हा आम्ही ओळखलं की महाराज कुठं तरी बाहेर देशाला गेले असतील.

राजा : त्यात तुम्ही तोंड खुपसू नका. सांगा ती बाई का रडत होती?

प्रधान : ती बाई व्हय. अवो तिला सती जावं लागतयं महाराज.

राजा : कुणी सक्ती केली तिच्यावर? त्याला देहांताची सजा द्या.

प्रधान : आपल्या संस्कृतीनचं तसा आदेश दिलाय महाराज.

राजा : मग बोलवा बरं संस्कृती आणि शिष्टाचार मंत्र्यांना.

प्रधान : कशाला? अहो, तेही तिथच होते की, त्यांनीच सांगितलं 'आपल्या धर्मग्रंथात तसं लिहलंय' म्हणून.

राजा : मग काढून टाका ते कलम धर्मग्रंथातून.

प्रधान : काढून टाका? (सहजतेने) महाराज ! रिडल्स इन हिंदुइझम एवढं सोपं वाटलं का ते अहो इथले सगळे हिंदू जर आपल्या विरोधात गेले तर या हिंदुस्थानचं व्हायचं कसं?

पुतळा-1 : हिंदुस्तानच्या संस्कृतीलाच ब्रेन कॅन्सर झालाय."[5]

या वरील संवादातून हिंदू धर्मग्रंथ आणि हिंदू संस्कृतीतील स्त्रीविषयक धारणा आणि जाणिवा किती भयावह आहेत. याचे अत्यंत मार्मिक आणि वास्तव चित्रण करून संस्कृतीलाच 'ब्रेनकॅन्सर' झालाय असे डॉ. साहेब खंदारे यांनी अधोरेखित केले आहे. भारतीय स्त्रियांच्या संदर्भाने संस्कृती आणि धर्मग्रंथांचा धांडोळा घेऊन सामाजिक स्थितीचे चित्रण करणारा स्त्रीवाद एकांकिकातून मांडला आहे आणि भारतीय स्त्री प्रतिमा चित्रित केली आहे.

'आता उजाडेल' हे एकांकिकेचे नावच नव्या जीवनाच्या सुरुवातीचे दर्शक आहे. भारतीय स्त्री सतत संघर्षशील असून स्वत:पेक्षाही अधिक महत्त्व ती आपल्या कुटुंबाला आणि समाजाला देते त्यामुळे सर्व सामाजिक संदर्भ हे तिच्याशीच जाऊन मिळतात. सर्व प्रश्नांना तिच सामोरे जाते आणि तशातही जीवनाला उन्नत करण्याचा प्रयत्न करते. कारण ती पुन्हा आपल्या पारंपरिक जीवनधारणा मजबूत करू इच्छिते आहे. या आशावादातून एकांकिकेबद्दल डॉ.वीणा नाखले लिहितात, "नव्या सूर्याला घेऊन येणारी नवी पहाट उजाडण्याचे स्वप्न पाहत असताना दररोज सर्व अंगाला होरपळणाऱ्या ठिणग्या राखेखाली गाडून टाकायची तयारी केवळ स्त्रियाच दाखवू शकतात. या वास्तवाला उजागर करताना स्त्रियांच्या सामाजिक व्यवस्थेतील जीवनाची कहाणी डॉ.साहेब खंदारे यांनी चितारली आहे."[6]

स्त्रीला समाजव्यवस्थेत आणि कुटुंबात कितीही दुय्यम स्थान असले तरी वर्तमानात घडणाऱ्या बऱ्यावाईट अशा सगळयाच गोष्टीची झळ आधी स्त्रीला बसते. मग ती बेरोजगारी, भ्रष्टाचार, महागाई, नव्या पिढीच्या सुखवस्तू असो की भेसळ याशिवाय मुलीचे प्रश्न वेगळे आहेत, मोलमजुरी करणाऱ्या स्त्रीचे प्रश्न वेगळे आहेत, श्रीमंत स्त्रियांचे प्रश्न वेगळे आहेत, नोकरदार

स्त्रियांचे प्रश्न वेगळे आहेत, एकूणच स्त्री ही असंख्य प्रश्नांनी घेरलेली आहे; आणि तिच्या वाट्याला आलेला पुरुषी अहंकार हा देखील सर्वत्र सारखाच. या सर्वच परिस्थितीवर भाष्य करणारे दृश्य या एकांकिकेतून आलेले आहे.

जागतिक पातळीवर स्त्रीवादाची सुरुवातही स्त्रियांना मतदानाचा राजकीय अधिकार मिळावा या मागणीतून झालेला आहे. तर भारतीय स्त्रीवादाची भूमिका ही स्त्री-पुरुषांच्या समान अधिकाराच्या सुत्रावर आधारित आहे. याचाच ऊहापोह लेखकाने 'आता उजाडेल' या एकांकिकेच्या आरंभीच केला आहे. ते असे-

"एक : उपस्थित बंधु भगिनींनो, आपण इथे एकत्र का जमलो हे जाणताहातच.
तुम्हाला हे ही माहित आहे की, आपला लढा कशासाठी आहे; आणि आपणास काय मिळवायचे आहे?

दोन : हा, हा, आम्ही स्त्रियांसाठी सर्व निवडणुकीत तीस टक्के जागा राखीव
मिळाव्यात. म्हणजे निवडणूक ग्रामपंचायतीची असो, सोसायटीची असो, पतसंस्थेची असो की लोकसभेची असो...

तीन : अन् हो बायकांना टी.व्ही. वर बरोबर अर्धा वेळ मिळायला पाहिजे हो ऽऽ

चार : आता माय! तुम्हाले एवढंबी ठावं नाय की, मव्हा नवरा मुन्सीपालटीत
पाण्याच्या टॅन्करावर डरावर हाय, मनून मला रोज टॅन्कर आल्यावर पहिल्यांदा पाणी मिळाय पाह्यजे."[7]

याप्रकारे स्त्रियांच्या चळवळीची मागणी राजकीय आणि सामाजिक हक्काची असली तरी ती पुरुषांच्या बरोबरीची आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. कारण स्त्रीला जोपर्यंत पुरुषांच्या बरोबरीचे हक्क मिळत नाहीत तोपर्यंत तिच्या छळाची करूण कहाणी सुरूच राहणार आहे.

स्त्रीमुक्ती चळवळीला स्त्रीवाद समजला नव्हता तोपर्यंत ही चळवळ चुकीच्या कार्याने कार्यरत होती. स्त्रीमुक्ती म्हणजे पुरुषी सत्तेपासून किंवा पुरुषांपासून वेगळे होणे या पुरुष म्हणून त्यांना विरोध करणे हे बरोबर नाही. यासंदर्भाने डॉ. साहेब खंदारे यांनी लिहिले आहे की, 'आता उजाडेल' ही एकांकिका १९९० मध्ये लिहिली. तोपर्यंत, शेतकरी स्त्रियांपर्यंत, खेड्यापर्यंत स्त्रीमुक्तीचे लोण पोहचले नव्हते. भारत हा खेड्यांचा देश आहे. खेड्यातील स्त्रियांचे प्रश्न, त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि त्या सोडविण्यासाठीचे प्रयत्न करण्याचे काम स्त्रीमुक्ती चळवळीचे महत्त्वाचे काम आहे. असा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न एकांकिकेत उपस्थित केला आहे. 'आता उजाडेल' ही एकांकिका पूर्णत: स्त्रियांच्या प्रश्नावर आधारित असून चळवळीद्वारे स्त्रिया पुन्हा एकदा आपले स्वत्व सिद्ध करू शकतील. या आशावादातून लेखकाने नवी मांडणी केली आहे. जे प्रश्न सत्ताधारी, प्रशासन यांच्यापर्यंत ज्या माध्यमातून जावयास पाहिजेत ते गेले नाही तर रंगभूमीच्या माध्यमातून लोकमानसात पोहचविण्याचे काम रंगभूमीद्वारे केले जात असते, तेच काम डॉ.साहेब खंदारे यांनी आपल्या एकांकिकाद्वारे केले आहे.

थोडक्यात, स्त्रियांच्या अनेक प्रश्नांना या एकांकिकांतून वाचा फोडण्यात आली आहे. ज्या प्रश्नांचे चित्रण लेखकांनी केले आहे ते केवळ प्रश्नांचे विश्लेषण करण्याच्या उद्देशाने नाही तर प्रश्नामुळे हतबल होणाऱ्या चळवळींना ऊर्जा देण्यासाठी या प्रश्नांचे सामाजिक भान या एकांकिकांनी चित्रित केले आहे. नाटकाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाची चळवळ स्त्रीवादी भूमिकेला गती देऊ शकते हेच या एकांकिकांतून सिद्ध होते. डॉ.साहेब खंदारे यांनी भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीच्या माध्यमातून भारतीय स्त्रियांची प्रतिमा या संदर्भाने अत्यंत महत्वपूर्ण मांडणी केली आहे.

निष्कर्ष:

- साहेब खंदारे यांनी समाज व्यवस्थेतील पुरुष प्रधान विचार प्रवाह स्त्रीवादी चळवळीच्या अंगाने मांडला आहे.
- स्त्रियांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा वेध एकांकिकातील विविध दृश्यांतून घेतला आहे.
- शिक्षणातील बाजारीकरणाचे स्वरूप स्त्रियांच्या शोषणासाठी कारणीभूत ठरत आहे.
- हिंदूधर्म ग्रंथ आणि संस्कृतीतील स्त्री विषयक धारणांचे वास्तव चित्रण एकांकिकांतून आले आहे.

- भारतीय स्त्रीवादाची भूमिका ही स्त्री-पुरुष समानतेवर आधारलेली आहे.
- नाटकाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाची चळवळ स्त्रीवादी भूमिकेला गती देऊ शकते.

संदर्भ टीपा:

1) सौ.रेखा बैजल, लोकविद्या पत्रिका, 'एकांकिका विशेषांक', जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर 2011, पृ.क्र.16
2) रेखा बैजल, उ.नि., पृ.17
3) वीणा नाखले, दोन एकांकिका, लोकविद्या पत्रिका, एप्रिल-मे-जून 1999, पृ.21
4) वीणा नाखले, उ.नि., पृ.22
5) डॉ.साहेब खंदारे, 'आता उजाडेल चार एकांकिका', लोकविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती 2003, पृ.36
6) वीणा नाखले, डॉ.कांत जाधव, डॉ.नवनाथ गोरे (संपा.), 'डॉ.साहेब खंदारे साहित्य, समीक्षा आणि संशोधन' या ग्रंथातील 'दोन स्त्रीवादी एकांकिका'
7) डॉ.साहेब खंदारे, 'आता उजाडेल चार एकांकिका', लोकविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती 2003, पृ.39

मराठी स्त्री गीतांतून अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा

साईप्रसाद मधुकर पंडित

संशोधक विद्यार्थी, मु.पो.उस्मानाबाद ता.जि.उस्मानाबाद. पिन–४१३५०१

सारांश :

मराठी मध्ये गीताच्या माध्यमातून जी स्त्री प्रतिमा आपणास पहावयास मिळते ती जास्त प्रमाणात तर ग्रामीण जीवनाला अभिव्यक्त करणारी अशीच ही स्त्री प्रतिमा आहे. या अभिव्यक्ती हया अनेक विविध प्रकारच्या भरगच्च भावनांचा आविष्कार करणाऱ्या आहेत. गीतामधून व्यक्त झालेली स्त्री प्रतिमा ही स्त्रीच्या जीवनात येणाऱ्या अनेक पैलूवर आधारित आहे तिच्या जन्मापासून जन्माची काही सांगणाऱ्या प्रतिमा, जन्माचे स्वागत कसे होते यापासून या प्रतिमा पहावयास मिळतात, या स्त्रीच्या आयुष्यात येणारे अनेक आव्हानं तिच्या जन्मापासूनच सुरु होतात म्हणजे पाचविला पूजलेलीच असतात. स्त्री जन्माचे होनारे नाराजीचे स्वागत या गीताच्या माध्यमातून आपनास अनुभवता येतात. तिच्या अस्तीतवाची ही कहानी जन्मापासून सुरु होते तर त्या स्त्रीचे बालपन, संगोपन, वळण, शिस्त, दुय्यम स्थान, चुल आणि मूल याला धरून चालण्याची शिकवन, रूढी, स्वयंपाक, पुरूष प्रधान संस्कृतीचा मान यासारख्या अनेक भावनांचा धांडोळा या गीताच्या माध्यमातून घेतला आहे. दैनंदिन जीवनातील कामे, संस्कार, व्रत वैकल्ये, स्वभाव वैशिष्टे, सासरवास, माहेरची ओढ, भावावरचे प्रेम, माहेरची आपुलकी अशा अनेक पैलूंचा भावना आविष्कारच या गीताच्या माध्यमातून अभ्यासता आला. कुटूंब व्यवस्थेत स्त्रीचे स्थान, राबणारी आणि सतत कामात असलेली ती स्त्री जीच्याविना सर्व कामे अडतील पण त्याच स्त्रीचे दुय्यम स्थान याची प्रचिती येते. निमूटपणे सहन करणारी ती स्त्री यातून स्त्रीची सहनशक्ती अनुभवता येते. अनेक प्रकारची नाती ती कशी प्रेमाणे निभावते कधी ती आई तर कधी पत्नी, कधी सून तर कधी मुलगी, बहीन, मावशी, आत्या, आजी, मामी, जाऊ आणि गृहलक्ष्मी ही तीच असते.

स्त्री होनारा छळ, हाल, अपेष्टा, अवहेलना आणि क्लेश या सर्वच गोष्टींची अभिव्यक्ती ही या गीताच्या माध्यमातून पहावयास मिळाली. या शोधनिबंधाच्या माध्यमातून मराठी गीतातून आलेल्या विविध स्त्री प्रतिमा अभ्यासता आल्या हे या शोधनिबंधाची उपयुक्तता आहे. मराठी गीताच्या माध्यमातून ज्या स्त्री अभिव्यक्ती, स्त्री प्रतिमा आपणास पहावयास मिळतात त्यांचा अभ्यास करता येतो, त्या जाणुन घेता येतात यासाठी हा शोधनिबंध महत्त्वाचा वाटतो. महाराष्ट्रात अनेक प्रकारच्या सामाजिक आणि मौखिक परंपरेने प्रचलित असलेल्या गीतातून या स्त्रीचे वर्णन आलेले आपणास पहावयास मिळते या प्रतिमा आतिशय व्यापक अशा स्वरूपाच्या आहेत. स्त्री जीवनाचे विविध पैलू यातून आपणास अभ्यासता येतात याचसाठी हा धांडोळा महत्त्वपुर्ण वाटतो.

प्रमुख शब्द :

मराठी, स्त्री, गीत, अभिव्यक्ती, प्रतिमा.

प्रस्तावना :

स्त्री–गीते म्हणजे स्त्री जीवनाचा शोध, स्त्री जीवनाची गाथा होय. या गीतांचा अभ्यास म्हणजे ग्रामीण स्त्रीने अभिव्यक्त केलेल्या तीच्या भाव–भावना होय. याच भावना, यातना यांचा सर्व लेखाजोखा याच्या माध्यमातून अभ्यासावयास मिळाली. या स्त्री प्रतिमा म्हणजेच स्त्रीची परिस्थिती, अस्तित्व, आत्मभान, जगण्याची जिद्द यांचा साक्षात्कार होय. पुरूष प्रधान संस्कृतीत जगत असताना केलेल्या कष्ट शब्दात अनुभवता येते. या सर्व गीतातून स्त्रीची प्रतिमा चित्रित झालेली आहे.

परंपरा आणि समाजव्यवस्था यांच्या जात्यात भरडली जाणारी स्त्री आपले दु:ख गीतांतून मांडते. तिचे अस्तीत्व ती या गीतातून सांगते. या सर्व गीतातून ती आई वडीलांविषयीची कृतज्ञता, आनंद, दु:ख, खेद सर्व काही व्यक्त करते. या

शोधनिबंधासाठी काही निवडक गीतातील निवडक पंक्तींचा संदर्भ घेतला आहे हीच या शोध निबंधाच व्याप्ती आणि मर्यादा आहे. या गीतांतून प्रतित होणाऱ्या विविध स्त्री अभिव्यक्तींचा शोध घेणे हाच या शोधनिबंधाचा प्रमूख उद्देश आहे. या मराठी गीताच्या माध्यमातून अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा समजून घेणे व अभ्यासने हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

मराठी स्त्री गीतांतून अभिव्यक्त झालेल्या प्रतिमा :

महाराष्ट्रात ग्रामीण भागात राहणाऱ्या माता–माऊली हया आपले भावना विश्व या गीताच्या माध्यमातून फुलविताना दिसतात. कृषी–प्रधान संस्कृती असलेल्या या भागात जात्यावरच्या ओव्या अनेक प्रकारची गीते ही या भागतल्या स्त्रीया विविध कामे करताना गुणगुणत असतात. ही मौखिक गीतांची मोठी परंपराच इथे लाभलेली आहे. जन्मापासून ते प्रत्येक कार्यक्रम, कामे, घरची कामे, शितीची कामे, लग्न समारंभ, माहेरवास, सासरवास अशा अनेक विषयावर ही स्त्री गीत गाते.

या स्त्रीचे अस्तित्वच इथे कसे आहे, लहान आहे असे म्हणता–म्हणता परक्या घरी जावे लागते जसे झाडाचा पाला आज ओला तर उद्या वाळला वाऱ्याच्या झुळूकी सोबत वाऱ्याबरोबर जाणारा असा या स्त्रीला तीचा जन्म वाटतो.

''लेकीचा जन्म, जसा बाभळीचा पाला ।
वाऱ्या वावटळीन गेला, धनी कोण कुणाचा झाला ।।''

याचमुळे मुलीला तीच्या जन्मापासूनच परके समजले जाते, दुसऱ्याची अनामत मानले जाते. आज इथे तर उद्या दुसरी कडे, कोणाची तरी अनामत असा विचार व्यक्त केला आहे. असे असले तरी मुलीवरही जीव लावणाऱ्या अनेक माय.बहीनी आहेत, बाप आहेत की जे आपल्या लेकीला जीवापाड जपतात, प्रेम करतात त्यांच्यासाठी त्यांची लेकही सर्व लेकरा प्रमाणेच प्रिय असते ही प्रेरणा सुखद वाटणारी आहे. हेच तर त्या माहेर वासीनीला मिळणारे प्रेम आहे.

''जोंधळया परास वाढविते तूरी ।
ल्येका परास, मला ल्येक प्यारी।।''

ही माहेरवासीन लेक सासरी जाते, अमाप कष्ट ती उपसते. सतत कष्टाच्या घामात ती भिजते. त्यातही तीला मान सन्मान दिलाच जातो असे नाही. ती सर्व काही स्विकारते, आनंदाने संसार करते. ती स्त्री सतत कामात व्यस्त असते. त्यातूनही ती सतत माहेरची आठवण काढत असते. माहेरची गोडी गीतातून गात असते, आईची माया गीतातून व्यक्त करत असते. कामाला खचत नसते. सगळे काही धिराने करत असते. याचे बाळकडू ती स्त्री आईकडूनच घेवून आलेली असते.

''जातं वडूवडू माझया बाह्या लोखंडाच्या ।
आईनं दिल्या गुटी जाईफळ येखंडाच्या ।।''

माहेरचे संस्कार आणि आपल्या आई वडिलांची मान या स्त्रीला अतिशय प्रिय आहे. सगळे कष्ट मी करीन, सगळ मी सहन करेन पण तुमचे नाव मी जावू देणार नाही, तुमचे संस्कांर विसरणार नाही अशी कृतज्ञता ती स्त्री गाण्यातून व्यक्त करते.

''चंदनासारखी देह मी झिजवीन ।
लेक तुमची म्हणवीन बाप्पाजी हो ।।''

परंपरा समाज व्यवस्था, या सर्वच गोष्टींची बंधने सांभाळत, कसरत करत ही स्त्री जगत असते. लहानाची मोठी होते. सासरी जाते. नविन नाती, नविन पध्दती या सर्वांना सामावून घेते सासू–सासरे, दिर–जाऊ, भावजय, पती सर्वांचा मान राखते. यात ही ती कामाच्या ओझ्यात सर्वच भूमिका निभावते पण माहेरची ओढ काही सुटताना दिसत नाही. प्रत्येक कामात ती स्वत:ला झोकून देते मात्र माहेरची माणसं तिच्या कायम स्मरणात असतात. माहेरच्या आठवनी ती कामत व्यस्त असतानाही गुणगुणते. सर्वांना या गीतांतून माहेरचे कौतूक सांगते. या गीतांतून ती स्त्री तिच्या विविध प्रतिमाच आपणास प्रकर्षाने जाणवून देते. माहेराची ओढ, धाडलेला निरोप आणि भावना यांची गुंफण ती या गीतात करते.

''रूण झुणत्या पाखरा रे
जा माझ्या माहेरा

कमानी दरवाजा रे
त्यावरी बैस जा
घरच्या आईला रे
सांगावा सांग जा
दादाला सांग जा रे
ने मला माहेराला''

ऐवढं सगळ सहन करत स्त्री संसार करतच राहते. माणसाला हे आलेलं कष्ट कस बर सरावं याचा विचाराच करत राहते. शारीरिक आणि मानसिक क्लेश तिला छळत राहतात तरी ती स्त्री डगमगत नाही. पण या परीस्थितीतही ती काहीच करू शकत नाही. सगळ काही निमूटपणे सहन करते. स्त्री तिच्या भावनेचा उलगडा करताना, त्रस्त मनाने जगताना गीतातून तिचे दु:ख व्यक्त करते.

''दुबळ्यापनाची लाज वाटती मला ।
नरी जल्माच्या काय कराव नशीबाला ।।''

अशी ही व्यथा ती अशा शब्दातून मांडत असते. असे कष्टप्रद जीवन जगत असतानाही ती स्त्री आपल्या पतीशी अतिशय एकनिष्ठ असते, ती पतीच्या दिर्घ आणि सुखी आयुष्यासाठी प्रार्थना करत असते. पतीच्याच आनंदात ती स्वत:चा आनंद आणि सुख पाहते. यातून स्त्रीची समर्पिवृत्ती दिसते. तिची ही प्रतिमा अतिशय अलौकीक वाटते.

''नारायण बाप, मागितलं मला दयावं ।
चोळी चूडा कुंकू, माझ्या जल्माला जावं ।।''

सुर्यनारायन देवाजवळ पतीच्या आयुष्याचं, सुखी आयुष्याच वरदान ही स्त्री मागते, या स्त्रीचा तेवढाच जीव तीच्या लेकरावरही असलेला दिसतो. दुसरीकडे कितीही दु:ख असले तरी ती लेकरासाठी हसुनच राहते. त्याच्या आनंदाचा ठाई–ठाई विचार करते. त्या लेकरातच विश्व ती बघते. तीची माया या प्रतिमेत ओसांडून वाहताना दिसते.

''द्रिष्ट झाली म्हणून, मिर्च्या उतरीते बारा ।
माजा ग बाळराजा, हाई दृष्टी जोगा हिरा ।।''

स्त्री गीतातून व्यक्त झालेल्या प्रतिमा ही प्रामूख्याने ग्रामीन जीवनासी जास्त निगडीत असलेल्या दिसल्या. घराचे, माहेराचे, सासरचे, आई–बाबाचे, लेकराचे आणि पतीचे असे अनेक वेगवेगळे भावविश्व यातून उलगडतात दिसले. या शोधनिबंधातून अनेक स्त्री प्रतिमा अभ्यासता आल्या.

निष्कर्ष :

स्त्री जीवनातील अनेक प्रतिमा या शोधनिबंधाच्या माध्यमातून अभ्यासल्या. या शोध निबंधातून स्त्री जीवनाचया भावना आणि प्रेरणा यांचा शोध घेता आला. स्त्री जीवनाचे वास्तव या गीतांच्या माध्यमातून अभ्यासताले. ही स्त्री किती हाल उपेष्टा सहन करते हे या गीतांच्या माध्यमातून समजले. ग्रामीण स्त्रीचे जीवन किती कष्टांनी भरलेले असे आहे याची प्रचिती घेता आली. त्याच बरोबर मराठी स्त्री गीतातील अनेक प्रकारच्या अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा प्रखरपणे जाणवल्या. स्त्रीयांचे जीवन हे किती वेगवेगळया भूमिका पार पाडते हे स्त्री प्रतिमेतून दिसले. वास्तव समाजाचे वर्णन या स्त्री प्रतिमातून समोर आले. स्त्री यांचे समाजात असलेले स्थानयातून दिसून आले. अशा प्रकारे स्त्री प्रतिमा अभ्यासता आल्या.

संदर्भ सूची :

१) स्त्री–गीतातील स्त्री प्रतिमा – विद्या शरद व्यवहारे
२) संकलित स्त्री–गीत
३) जा.माझ्या माहेरा – डॉ.बाबर सरोजिनी
४) स्त्री गीत – विकिपीडिया
५) मराठी स्त्री गीते – विकिपीडिया

मराठीतील निवडक स्त्रीवादी कवयित्रींच्या काव्यातील प्रतिमाविश्व :एक अभ्यास

संशोधक

सौ सागर गोविंदराव पांचाळ

महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर, नांदेड

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने विचार करत असताना मराठी साहित्यविश्वात अनेक प्रकारची स्थित्यंतर झाली. त्याला मध्ययुगीन मराठी साहित्य सुद्धा अपवाद नाही. मध्ययुगीन मराठी काव्य प्रवाहामध्ये स्त्रीवादाची बीजं संत जनाबाईच्या अभंगांमध्ये पाहायला मिळतात. प्रखर विद्रोही स्वर जनाबाईने तत्कालीन कालखंडात आपल्या अभंगाद्वारे तीव्रतेने व्यक्त केलेला दिसून येतो. हीच तीव्रता कान्होपात्रा, सोयराबाई यांच्या अभंगातही प्रत्ययाला येते. यानंतर आधुनिक काळात म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या क्रांतिकार्याने आधुनिक स्त्रीमुक्ती चळवळीची मुहूर्तमेढ रोवली आणि समतेची चळवळ गतिमान केली. आधुनिक परिवर्तनवादी काव्य आणि साहित्य निर्मितीची सुरुवात निर्विवादपणे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केली. यांच्या प्रभावातून लिहिणाऱ्या मुक्ता साळवे आणि ताराबाई शिंदे यांच्या लेखनात याचे प्रभावी प्रतिबिंब उमटलेले पाहावयास मिळते .तद्वतच तळागाळातल्या सर्वसामान्य स्त्री जीवनातील स्त्रीवादी चळवळीचा प्रारंभ येथूनच झालेला पाहावयास मिळतो .स्त्रीवादाच्या प्रारंभासंदर्भाने वंदना महाजन म्हणतात, 'हिंदू समाजाची शस्त्रे पुरुषप्रधान असून ती स्त्री विरोधी आहेत अशी स्पष्ट मांडणी ताराबाईंनी केलेली आहे. हीच खऱ्या अर्थाने भारतीय स्त्रीवादाची आणि स्त्रीवादी समीक्षाची सुरुवात आहे.'१ खरोखरच स्त्रीवादी भूमिका असलेले ताराबाई शिंदे यांचा स्त्री-पुरुष तुलनासारखा ग्रंथ खऱ्या अर्थाने स्त्रीवादाचा पाया म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

मराठी साहित्यातील स्त्रीवादाची ही पार्श्वभूमी लक्षात घेता मराठी साहित्यातील काही निवडक कवयित्रींच्या काव्यातील प्रतिमांचा शोध घेत असताना मराठीतील काही निवडक कवयित्रींच्या कवितेचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल .मराठी काव्य प्रांतातील इंदिरा संत यांचा रंगबावरी व बाहुल्या, अरुणा ढेरे यांचा मंत्राक्षर तर असावरी काकडे यांचा आरसा तसेच माधवी देसाई यांचे घर माणसाचे, अनुराधा पाटील यांचा दिवसेंदिवस, अश्विनी घोंगडे यांचा अन्वय, सुमती लांडे यांचा काचकमळे, प्रज्ञा लोखंडे यांचा अंतस्थ, रजनी परुळेकर यांचा काही दीर्घ कविता व स्वीकार तसेच नीरजा यांचा वेणा, सुहासिनी इर्लेकर यांचा गाथा, मल्लिका अमर शेख यांचा महानगर, सिसिलिया कार्व्हालो यांचा दारातल्या रांगोळीचे रंग, प्रज्ञा दया पवार यांचा मी भिडवू पाहतेय समग्रासी डोळा व आरपार लयीत प्राणांतिक, उषाकिरण आत्राम यांचा लेखणीच्या तलवारी, संध्या रंगारी यांचा वाताहतिची कैफियत आदी कवयित्रींच्या कवितेचा उल्लेख करता येईल.

प्रस्तुत शोधा अभ्यासाच्या अनुषंगाने मराठीतील काही निवडक कवयित्रींच्या काव्यातील प्रतिमांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रतिमेच्या संदर्भातील डॉ. शिवसांब कापसे यांच्या मराठी कविता आणि प्रतिमा या ग्रंथातील प्रस्तावनेत प्रतिमासंदर्भातील डॉ.भारत कचरे यांचे विवेचन असे 'प्रतिमा ही संथ सागरातील पाण्यावर निर्माण होणाऱ्या तरंगाप्रमाणे असते, शब्दाला गहिरत्व प्राप्त करून देणारी, ध्वनी तरंगाची सूचकता ध्वनित करण्याचे सामर्थ्य त्या प्रतिमेत असते.मूळ रुपाला कल्पनेच्या माध्यमातून मन:चक्षू समोर आणण्याची क्षमता प्रतिमा या संज्ञमध्ये आहे'२ कवितेमध्ये आलेल्या प्रतिमा ह्या मूळ आशयाला अधिक गहिरत्व प्राप्त करून देतात त्यामुळे कवितेमध्ये आलेल्या प्रतिमा महत्त्वाच्या ठरतात.प्रतिमेच्या संदर्भातील मराठीतील प्रसिद्ध समीक्षक निशिकांत मिरजकर यांचे प्रतिमा संदर्भातील विवेचनही महत्त्वाचे वाटते ते म्हणतात, 'प्रतिमा म्हणजे कवीच्या मनातील मूळ काव्यानुभूतिचे भाषिक साधनांच्या साह्याने घडविलेले प्रतिदर्शन असते'३ कवीच्या मनातील

मूळ आशयाचे प्रतिमांच्या माध्यमातून प्रतिदर्शन घडविण्याची ही कलात्मकता असते.मराठी साहित्यातील समीक्षक अ.वा.कुलकर्णी प्रतिमेच्या संदर्भात म्हणतात, 'प्रतिमा हा भाषा आणि साहित्य यातील एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कवीच्या अनुभूतीला फुटलेली एक सहज स्वाभाविक व नैसर्गिक आकार किंवा लाभलेले गोचर रूप म्हणजे प्रतिमा होय'४ खरोखरच कवी हा घेतलेल्या अनुभवांना कलात्मक पातळीवरून मांडत असताना प्रतिमांचा आधार घेऊन त्या अनुभवांना अधिक कलात्मक बनवण्याचा प्रयत्न करत असतो. मराठी साहित्यिक व अभ्यासकांनी प्रतिमेच्या अनेकविध व्याख्या केलेल्या दिसतात; परंतु प्रस्तुत अभ्यासाच्या अनुषंगाने काही निवडक व्याख्या येथे प्रस्तुत केलेल्या आहेत. प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने काही निवडक कवयित्रींच्या काव्यातून आलेल्या प्रतिमाविश्वाचा अभ्यास पुढील प्रमाणे करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मराठी काव्यप्रांतातील इंदिरा संतांनी मराठी भावकवितेचे दालन समृद्ध केले.त्यांच्या कवितेत आलेल्या प्रतिमा ह्या वेगवेगळ्या रूपात येताना दिसतात उदा. मेहंदी, वृत्त, ग्रह, क्षितिज, ज्वाला, स्तंभ, फुलपाखरे, चंद्र, चांदणे, ढग, रात्र अशा कितीतरी प्रतिमा कवयित्रीच्या कवितेत आलेल्या दिसतात. यासंदर्भात त्यांची कविता महत्वाची वाटते ती अशी

'मी कधीच मिटून गेली आहे रात्रीच्या कृष्णकमळात / मिटतामिटता माझ्या डोळ्यातून ओघळलेल्या चंद्राच्या थेंबा / प्रतिमा माझ्या हातातील सोन कांकण ज्याच्यावर चढली आहे'५.

कवयित्री इंदिरा संत यांनी प्रस्तुत कवितेमधून जीवनातील हळुवार क्षणांचा आविष्कार घडवताना 'रात्रीच्या कृष्णकमळात' आणि 'हातातील सोनकांकण' या प्रतिमांच्या साह्याने त्या अनुभवांना अधिक गहिरत्व प्राप्त करून देतात.

इंदिरा संतानंतर मराठी कवितेच्या प्रांतात कवयित्री अनुराधा पाटील यांनी एक वेगळी छाप निर्माण केली आहे.त्यांचे अजून तरीही आणि दिगंत कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत.त्यांच्या कवितेतून येणाऱ्या प्रतिमा ह्या वेगवेगळ्या पातळीवरच्या दिसून येतात. त्यात दुःखाच्या स्पर्शातील छाया, सांद्रसंध्या, व्याकूळ सांज, प्राणात पहाट फुटली,अंधारबनाची जाग, दचकनारी पानं, डोळयांच्या ओल्या कड्या, रडून कोरडे डोळयांचे दिवस, वाळूवर सांडणाऱ्या पाण्यासारखं आयुष्य अशा अनेकविध प्रतिमा अनुराधा पाटलांच्या कवितेत येतात. तसेच त्यांच्या काव्यसंग्रहातून या प्रतिमा स्त्रीला - स्त्रीत्वाला स्व सामर्थ्याचा पडलेला विसर आणि निर्माण झालेल्या पराधीन व अगतिक आत्मा आणि समूह प्रतिमेवर कवयित्री या प्रतिमेच्या माध्यमातून भाष्य करताना दिसतात. कवयित्री म्हणतात

'मी देईन / आपल्या लसलसत्या इच्छांचे /अंकुर उगवणारी भूमी / उरलेल्या दिवसांना

आणि चालेल या धूळभरल्या रस्त्यावर / पुन्हा एकदा / भरकत्या ढगांच्या सावल्या शोधत'६

विनाशकारी पुरुषप्रधान मानसिकतेच्या विरोधात कवयित्री स्त्रीत्वातील सर्जनशीलता या लढ्यासाठी शास्त्र म्हणून कवयित्री त्याचा स्वीकार करताना दिसते.

मराठीतील जेष्ठ कवयित्री अरुणा ढेरे यांच्या काव्यातून स्त्रीत्वातील स्व ची जाणीव करून देणाऱ्या प्रतिमांच्या माध्यमातून आविष्कृत होताना त्या चंद्रभागा, लालजर्द कुंकू, टाळ, अंधार, सूर्य, वाळवंट अशा अनेकविध प्रतिमा मूळ अशयाला अधिक उत्कट रंग प्राप्त करून देतात. कवयित्री अरुणा ढेरे यांच्या कवितेतून स्त्री जीवनातील दुःखाला व्यक्त करत असताना त्यांच्या कवितेत पौराणिक संदर्भाच्या माध्यमातून त्या प्रतिमेचा आधार घेऊन त्या स्त्रीत्वाचे दुःख पौराणिक प्रतिमांच्या माध्यमातून मांडताना त्या म्हणतात.

'सीतेला का दुःख दिले रावणाने / याहूनही मोठी आग दिली रामाने /बायो तिला धरत्रीचा ठाव तरी होता / काय सांगू तुला साता जन्माची ही कथा '७

कवयित्री अरुणा ढेरे यांनी पौराणिक संदर्भाच्या माध्यमातून वर्तमानकालीन स्त्री जीवनाचे दुःख पौराणिक प्रतिमांच्या माध्यमातून व्यक्त केलेले दिसते.

मराठी काव्यप्रांतातील प्रतिमा इंगोले या कवयित्रीच्या काव्यातून स्त्री जीवनासह स्त्रियांच्या मनातील आशा-आकांक्षा त्याबरोबरच पौराणिक कथांच्या माध्यमातून स्त्री जीवनाचे चित्र त्या रेखाटताना दिसतात . त्यांच्या कवितेतून अनेक पौराणिक संदर्भ येताना दिसतात. त्यांच्या कवितेत येणाऱ्या प्रतिमा अगदी बोलक्या आहेत .यमाच्या दारात, चंद्रकोरी, भिंगरीवानी, कर्जाचा डोंगर, सोन्यासारख्या जीवाचं, कारल्याचे वेल, हाताचा पायना, मनाचा आईना, दुःखाचे डोंगर, दूध पिकाच मुख, अशा कितीतरी प्रतिमा येताना दिसतात.कवयित्री प्रतिमा इंगोले सावित्रीबाई फुले यांचा त्याग आणि सीतेचा त्याग किंबहुना सीतेपेक्षाही सावित्रीचा त्याग हा श्रेष्ठ आहे असे सांगताना त्या म्हणतात.

'सावित्री म्हटलं / करावं तुझंही कौतुक थोडंसं /

तु ही सितेप्रमाणे नेसत्या वस्त्रानिशी /पतीमागोमाग घरातून पडलीस'८

कवयित्री प्रतिमा इंगोले यांनी सावित्री आणि सीता या प्रतिमांतून त्याग आणि सचोटी यांची मूर्तीप्रतिमेच्या माध्यमातून उभी केलेली आहे. कवयित्रीच्या काव्यातून येणाऱ्या प्रतिमा ह्या बहुविध स्वरुपात पाहायला मिळतात परंतु प्रस्तुत अभ्यासाच्या सोयीसाठीकाही निवडक कवित्री च्या काव्यातून आलेल्या प्रतिमांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.कवयित्रीच्या काव्यातून येणाऱ्या प्रतिमा वैशिष्ट्यपूर्ण आणि नाविन्यपूर्ण अशा आहेत. काही प्रतिमांचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल, पाऊलवाट,चांदणी, अंधार, चंद्र, मेहंदी, माती, वृत्त, तारा, क्षितीज, अंधार बनाची जाग, व्याकुळ, जातं, संसार, धुतलेल्या कपड्यांसारखी, रंगीत खेळणे, व्याकूळ सांज, प्राणात पहाट फुटली अशा अनेकविध प्रतिमा कवयित्रीच्या काव्यांमधून स्त्रीसुलभभाव तसेच त्यांच्या जगण्यातील सोशिकता यांचे प्रतिबिंब या प्रतिमांच्या माध्यमातून कवयित्रीने रेखाटलेले दिसतात. बदलत्या काळानुसार काव्याची भाषा नि त्यातून येणाऱ्या प्रतिमांचे रूपही बदललेले दिसते. स्त्री जीवनातील दुःख जसे व्यक्त होते तसेच प्रेम, शृंगार या जाणिवाही व्यक्त होताना दिसतात.

मराठी साहित्यातील निवडक स्त्रीवादी कवयित्रींच्या काव्यातील प्रतिमाविश्वाचा अभ्यास करत असताना हाती आलेले काही निष्कर्ष खालीलप्रमाणे

निष्कर्ष :

१) मराठी साहित्यातील निवडक कवयित्रींच्या काव्याचा अभ्यास करत असताना त्यांच्या कवितेतून आलेले विविध प्रतीकं आणि प्रतिमा स्त्री जीवनातील प्रतिमा स्त्रीविश्वाचा उलगडा करतात.

२) मराठी साहित्यातील स्त्रीवादी कवयित्रीच्या काव्यातून आलेल्या प्रतिमा वैशिष्ट्यपूर्ण आणि नावीन्यपूर्ण दिसतात.

३) मराठी कवयित्री यांच्या कवितेचा अभ्यास करत असताना इंदिरा संतांची कविता ही भावकविता आहे. त्यांची कविता जीवनातील क्षणांना अतिशय हळुवारपणे प्रतिमांच्या माध्यमातून आविष्कृत करते.

४) कवयित्री अनुराधा पाटील यांची कविता हात न भान तर प्रकट करतेच परंतु त्यांच्या कवितेतून येणाऱ्या वेदनामय व्याकूळ प्रतिमा सहज लक्षवेधताना दिसतात.

५) मराठी साहित्यातील स्त्रीवादी कवयित्रींच्या काव्यातून पौराणिक संदर्भ प्रतिमांच्या साह्याने त्या प्रभावीपणे मांडताना दिसतात.

संदर्भ ग्रंथ :

१) डॉ नागनाथ कोत्तापल्ले व प्रा दत्ता भगत - जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य - सायन पब्लिकेशन पुणे - पृष्ट -३६५

२) डॉ. शिवसांब कापसे - मराठी कविता आणि प्रतिमा इसाप प्रकाशन, नांदेड -पृष्ठ- ५ व ६

३) तत्रैव उनी -पृष्ठ- १२ तत्रैव उनी - पृष्ट - १३

५) मोकाशी दि बा -माझे समीक्षालेखन - पृष्ट -९६

६) अनुराधा पाटील - दिवसेंदिवस - पृष्ट - ६५

७) कुलकर्णी तु शं - (संपा) स्वातंत्र्योत्तर मराठी कविता साहित्य अकादमी पृष्ठ -७६

एकोणिसाव्या शतकात स्त्रीयांच्या उन्नतीसाठी महाराष्ट्रामध्ये झालेल्या कार्याचा आढावा- एक अभ्यास

डॉ. गोपाळ रामराव पवार

प्राचार्य स्वामी विवेकानंद अध्यापक, महाविद्यालय,उदगीर जि. लातूर.

भगवान रामकृष्ण केंद्रे

संशोधक विद्यार्थी, शिक्षणशास्त्र संकुल,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रास्ताविक:

स्त्री वाचून मानवी जीवन हे अधुरे आहे. स्त्री आणि पुरुष हे एकाच संसाररुपी गाडीची दोन चाके आहेत. जर मानवाची प्रगती व्हावी असे आपल्याला वाटत असेल तर ही दोन्ही चाके समान गतीने व समान कक्षेत चालली तरच समाज प्रगती करू शकतो अन्यथा नाही. संख्येने 50% असणारा हा स्त्री वर्ग जर विकासापासून वंचित राहिला तर समाज प्रगती करू शकणार नाही. त्यासाठी स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करून त्यांना शिक्षित करणे; समाजातील अनिष्ट चालीरीती, रूढी-परंपरा, अंधश्रद्धा, इत्यादि जोखडातून त्यांना मुक्त केले पाहिजे. अगदी प्राचीन, मध्युगीन काळातील साधुसंतांनी स्त्रियांच्या बाबतीत सुधारणा करण्याचे अनेक प्रयत्न केलेले आपल्याला त्यांच्या साहित्यातून दिसून येते. त्याच बरोबर इतिहासाच्या आधुनिक कालखंडात बंगालमध्येआद्य समाज सुधारक राजा राममोहन राय तसेच महाराष्ट्रात महात्मा ज्योतिराव फुले यांचे ही योगदान महत्त्वपूर्ण आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्त्री शिक्षणाच्या बाबतीत देशाच्या अनेक भागात प्रयत्न सुरु झाले. अनेक समाज सुधारक, प्रबोधनकारांनी यासाठी प्रयत्न केलेले आपल्याला दिसून येतात. तशाच प्रकारचे महत्त्व पूर्ण कार्य महाराष्ट्रातील समाजसुधारकांनीही केलेले आहे याचा इथे आपण आढावा घेणार आहोत.

जगन्नाथ शंकर शेठ:

मुंबईचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे जगन्नाथ शंकर शेठ (नाना) हे सर्वांगीण सुधारणेचे प्रवर्तक म्हणूनही ओळखले जातात. नानांनी स्त्रीशिक्षण, सतीप्रथा बंदी साठी कार्य केले. त्याचबरोबर स्त्री उद्धारासाठी कार्य करणाऱ्या समाज सुधारकांना प्रोत्साहन देऊन त्यांना मदत केली. मुलींना शिक्षण दिल्यास तिच्या नवऱ्याचे आयुष्य कमी होते हा लोकांच्या मनात असलेले गैरसमज दूर करण्यासाठी त्यांनी स्वतःच्या मुलीला शिक्षण दिले. समाजाकडून होणाऱ्या विरोधाला न जुमानता नानांनी हे स्त्री शिक्षणाचे आपले कार्य चालू ठेवले.

बाळशास्त्री जांभेकर :

मराठी वृत्तपत्राचे जनक म्हणून ओळखले जाणारे बाळशास्त्री जांभेकर हे त्यांच्या दर्पण व दिग्दर्शन या नियतकालिकातमुळे आपल्या नेहमी स्मरणात राहतात. ज्ञानप्रसार आणि समाज प्रबोधनाच्या बाबतीत त्यांनी बंगालमधील समाज सुधारकांचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवून स्त्री सुधारणेचे महत्त्वाचे कार्य केले आहे. स्त्री शिक्षणाबरोबरच विधवा विवाह, पुनर्विवाह या बाबतीत ही त्यांनी आग्रहाची भूमिका घेतली आहे. विधवा विवाहाला आधार शोधून काढण्याची कामगिरी त्यांनी गंगाधर शास्त्री फडके यांच्याकडून ग्रंथ लिहून घेऊन पूर्ण केली होती.

गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) :

एकोणिसाव्या शतकात मुलींच्या शिक्षणाला समाज मान्यता मिळालेली नव्हती. अशावेळी इंग्रजांचा स्त्री शिक्षणाचा विचार लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांना चांगलाच आवडला. शिक्षणामुळे स्त्रियांच्या मनामध्ये जागृती निर्माण होईल असे त्यांचे मत होते. त्यामुळे त्यांना स्त्री शिक्षणाचे खंदे पुरस्कर्ते म्हणून ओळखले जाते. आपल्या तीस क्रमांकाच्या पत्रांमध्ये स्त्रियांची स्थिती लिहिताना ते म्हणतात, "सांप्रत काळी हिंदू लोकांच्या स्त्रियांची अवस्था व दुर्दशा फार आहे. स्त्रिया पुरुषांच्यावर अंमल करत असतात व त्यांच्या स्वभावाप्रमाणे बहुत लोकांस वागावे लागते. त्यांचे गुण लहान मुलांना प्राप्त होतात. त्यामुळे स्त्रिया शहाण्या असणे जरुरीचे आहे. लहान मुले आपल्या आयुष्यातील जास्तीत जास्त वेळ आईच्या

सानिध्यात घालवतात. त्यामुळे प्रत्येकाची आई शिक्षित असणे समाजाच्या दृष्टीने हिताचे असते. शतपत्रांच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची पायाभरणी करण्याचा प्रयत्न केला.

डॉ. भाऊ दाजी लाड :

डॉ. भाऊ दाजी लाड हे स्वतः एक निष्णात डॉक्टर होते. त्यामुळे बाल विवाह केल्यास निर्माण होणाऱ्या समस्या, बाल वयात आलेले वैधव्य यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर विधवा विवाहास मान्यता मिळावी यासाठी त्यांनी समाजजागृती केली. स्त्री सुधारणेच्या बाबतीतही ते आग्रही होते. तत्कालीन समाजात लग्नमुंजीसारखा समारंभात कलावंतीणीचा नाच करण्याची प्रथा होती. त्यावर त्यांनी सडकून टीका केली. आपल्या स्वतःच्या मुलाच्या मुंजीत ती पद्धत त्यांनी बंद केली.

विष्णूशास्त्री पंडित :

प्राचीन काळी स्त्रियांना समाज मानाचे स्थान देत असे. मात्र कालओघामध्ये समाजाने त्यांना दुय्यम व हीन स्थान देऊन त्यांची अवहेलना चालवली. स्त्रियांचा सामाजिक आणि कौटुंबिक दर्जा सुधारण्यासाठी त्यांनी समाजप्रबोधन केले. इ. स. 1864 पासून त्यांनी विधवा-पुनर्विवाहाचे कार्य हाती घेतले. समाजाच्या विरोधाला न जुमानता त्यावर लेख लिहिणे, व्याख्यान देणे, वादविवाद करणे, इत्यादी कामे चालू ठेवली. समाजातील काही लोकांच्या सहकार्याने त्यांनी 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळाची' 1965 मध्ये स्थापना केली. त्यातून त्यांनी बालविवाहाचे दुष्परिणाम समाजाला दाखवून दिले. विधवाविवाहोत्तेजक मंडळाला विरोध करून लोकांनी त्यांच्या कार्यात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या पहिल्या पत्नीचे निधन झाल्यानंतर त्यांनी 1874 मध्ये 'कुसाबाई' या विधवेशी विवाह करुन समाजापुढे एक आदर्श घालून दिला होता. 'इंदूप्रकाश' या वृत्तपत्राचे उपसंपादक बनल्यास त्यांनी त्यामार्फत स्त्री जातीचा उद्धार, त्यांच्यावरील होणारे अन्याय, बालविवाह, पुनर्विवाह, केशवपन, जरठकुमारी विवाह, प्रौढविवाह यासारख्या समाजातील ज्वलंत प्रश्नावर आपले निर्भीड विचार मांडले आहेत.

महात्मा ज्योतिराव फुले :

समाजातील स्त्रीदास्य, अज्ञान, जातीभेद, यासारख्या अनिष्ट प्रथांच्या गुलामगिरीतून स्त्रियांना मुक्त करण्याचे पवित्र कार्य ज्योतिरावांनी केले आहे. स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे भ्रष्टाचार करणे असे त्यावेळी मानले जाई. म्हणून समता व शिक्षणापासून वंचित असलेल्या स्त्रियांच्या उद्धारासाठी कार्य करणे हे त्यांचे ब्रीद होते. स्त्रियांनी शिक्षण घेतले तर त्यांना अकाली वैधव्य येईल. स्त्रियांनी चपला व छत्री वापरू नये.घराबाहेर पडू नये. त्याचबरोबर बालविवाह, जरठ-कुमारी विवाह यामुळे समाजात स्त्रियांची अवस्था अतिशय दयनीय बनली होती. स्त्रियांना धार्मिक विधी व उत्सव यापासून दूर ठेवणे, एखाद्या विधवेच्या हातून कुकर्म घडले तर तिला कठोर शासन करणे, अशी अन्यायाची व पक्षपाती वागणूक त्या काळी स्त्रियांना दिली जात असे. अशा परिस्थितीत स्त्रियांच्या उद्धाराचे पवित्र कार्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी हाती घेतले. स्त्रियांचे शिक्षण, विधवाविवाह, बालहत्या, स्त्रियांच्या बाबतीत केला जाणारा भेदभाव, इत्यादी महत्त्वाच्या विषयावर ज्योतिरावांनी कार्य केले.

सावित्रीबाई फुले :

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या खांद्याला खांदा लावून सावित्रीबाईंनी आयुष्यभर त्यांना शिक्षणाच्या पवित्र कार्यामध्ये साथ दिली. स्त्रियांच्या शिक्षण म्हणजे सावित्रीबाई फुले हे समीकरणच त्या काळी रूढ झाले होते. आपल्या देशात खऱ्या अर्थाने शिक्षणाची सुरुवात इ. स. 1848 साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा चालू करून सावित्रीबाई फुले यांनी महात्मा फुले यांच्या सहकार्याने केली. म्हणूनच त्यांना देशातील आद्य शिक्षिका व पहिल्या मुख्याध्यापिका म्हणून ओळखले जाते. एखाद्या चांगल्या कार्याची सुरुवात ही माणसाने स्वतःपासून केली पाहिजे. त्याप्रमाणे सर्वप्रथम ज्योतीबांनी सावित्रीबाई यांच्या शिक्षणाला सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी यशवंतराव परांजपे व केशवराव भवाळकर यांची नेमणूक केली होती.त्यानंतर सावित्रीबाईनी अहमदनगर येथे नॉर्मल स्कूलमध्ये अध्यापनाचे प्रशिक्षणही घेतले होते. त्यानंतर त्यांनी स्त्रियांना व अस्पृश्यांच्या शिक्षणाला सुरुवात केली. त्याकाळी स्त्रियांना शिक्षण देणे हे समाजाला मान्य नव्हते. त्यामुळे सावित्रीबाईंना समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागले. त्यांच्यावर चिखलफेकणे, दगड मारणे, शिव्या देणे, इत्यादी प्रयत्न झाले. पण त्याला न जुमानता सावित्रीबाईंनी आपला घेतलेला वसा चालूच ठेवला. सावित्रीबाईची जिद्द, समर्पण वृत्ती, व कार्यनिष्ठा यामुळे त्यांच्या शाळेतील मुलींची संख्या वाढत गेली. अशा रीतीने सावित्रीबाईंनी महाराष्ट्रामध्ये स्त्री शिक्षणाचे अनमोल कार्य केले.

ताराबाई शिंदे :

ताराबाईचे लग्न हे त्यांना न आवडणाऱ्या मुलाशी त्यांच्या वडिलांनी लावून दिले. लवकरच त्या विधवा झाल्या. त्या काळी विधवांना पुनर्विवाह करण्यास मनाई होती. त्यामुळे ताराबाईंना पुनर्विवाह करू दिला नाही. त्यामुळे वैधव्याचे जीवन त्यांच्या नशिबी आले. ताराबाईंनी इ. स. 1882 साली 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहून समाजातील स्त्रियांवर होणाऱ्या

अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. त्यांचे हे कार्य समाजाला न पचल्यामुळे त्यांची ही पुस्तिका दडपून टाकण्याचा प्रयत्न झाला. ताराबाईंनी या पुस्तकांमध्ये स्त्रियांना होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली तसेच पुरुषी वर्चस्वामुळे व स्त्रियांमध्ये असलेल्या अज्ञानामुळे त्या कशा दुर्लक्षित राहिल्या हे सांगितले आहे. त्यांच्या मते जोपर्यंत विधवेच्या पुनर्विवाहास मान्यता मिळणार नाही तोपर्यंत समाज सुधारणार नाही. स्त्रियांनाही वैधव्याची भयंकर शिक्षा भोगावी लागते. अतिशय दुःखामध्ये त्या आपले जीवन जगत असतात. यातून त्यांची मुक्तता झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही. समाजामध्ये जसा पुरुषांना बहुपत्नीत्वाचा हक्क आहे तसा स्त्रियांना पुनर्विवाहाचा हक्क मिळाला पाहिजे यासाठी त्यांनी जोरदार प्रयत्न केले.

महर्षी धोंडो केशव कर्वे :

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री शिक्षण व सामाजिक सुधारणेसाठी आपलेजीवन समर्पित केले होते. त्यांच्या विचारांवर आगरकर यांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे त्यांनी स्त्रियांच्या सुधारणेचे कार्य हाती घेतले. स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा मिळाल्याशिवाय समाजाची प्रगती होऊ शकत नाही. त्यासाठी स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे, तिला सुशिक्षित केले पाहिजे. जर एक पुरुष शिकला तर तो एकटा शिकतो मात्र एक स्त्री शिकली तर पूर्ण कुटुंब शिकते हा विचार त्यांच्या मनाला पटल्यामुळे स्त्रियांना शिक्षण देणे या विचाराने प्रेरित होऊन त्यांनी स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले. समाजातील स्त्रियांवर होणारा अन्याय, अत्याचार, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, यासारख्या ज्वलंत प्रश्नावर त्यांनी कार्य केले. जर स्त्रियांना शिक्षण देऊन स्वावलंबी केले तर त्यांचीही दुःखे दूर होतीलअसा त्यांना विश्वास होता. विधवा विवाहास चालना मिळावी म्हणून सन 1893 साली विधवा 'विवाहोत्तेजक मंडळाची' स्थापना केली. एवढेच करून ते थांबले नाहीत तर स्वतःची पहिली पत्नी वारल्यानंतर 'गोदावरी' या विधवेशी विवाह करून समाजापुढे एक आदर्श घालून दिला.

समारोप :

अशा रीतीने एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्रियांच्या बाबतीत खूप मोठे कार्य झाल्याचे आपल्याला दिसून येते. जरी इंग्रजांनी आपल्या देशात स्त्री शिक्षणाला सुरुवात केली असली तरी त्यामागे आपल्या धर्माचा प्रचार व प्रसार करणे, तसेच व्यापार करणे, हा त्यांचा मुख्य उद्देश होता. अशातच समाजातील स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार कमी करून त्यांना योग्य न्याय मिळवून द्यायचा असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे. त्याचबरोबर समाजामध्ये असलेल्या काही वाईट चालीरिती, रुढी परंपरा बंद झाल्या पाहिजेत यासाठी प्रयत्न झाले. बालविवाह, सतीप्रथा, केशवपन, मुलींचे शिक्षण, मुलींसाठी स्वतंत्र शाळा, बहुपत्नीत्व, स्त्रियांचे समाजातील कनिष्ठ स्थान, स्त्रीदास्य, अज्ञान, अंधश्रद्धा, जातीभेद, इत्यादी समस्यांना वाचा फोडण्याचे पवित्र कार्य वरील समाजसुधारकांनी केले ते अतिशय उल्लेखनीय आहे.

संदर्भ :

1) https://hi.wikipedia.org/wiki/जगन्नाथ_शंकरशेठ_मुरकुटे
2) https://mr.wikipedia.org/wiki/बाळ_शास्त्री_जांभेकर
3) https://hi.wikipedia.org/wiki/गोपाळ_हरि_देशमुख
4) https://gom.wikipedia.org/wiki/भाऊ_दाजी_लाड
5) https://mr.phondia.com/vishnushastri-pandit-information-in-marathi/
6) https://hi.wikipedia.org/wiki/ज्योतिराव_गोविंदराव_फुले
7) https://hi.wikipedia.org/wiki/ताराबाई_शिंदे
8) https://hi.wikipedia.org/wiki/धोंडो_केशव_कर्वे

संतमन्मथ स्वामी यांच्या अभंगातील स्त्रीविषयक विचार

डॉ. विजयकुमार शिवदास ढोले

मराठी विभागप्रमुख, संजीवनी महाविद्यालय, चापोली

प्रस्तावना:-

महाराष्ट्र ही संतांची वीराची भूमी आहे. भारतीय संतांनी समाजाला घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. ज्या काळात देशातील जनता अनिष्टरुढी-परंपरा व अंधश्रध्दा यामध्ये गुरफटलेली होती, त्यावेळी या समाजाला लोकजागृती करून एकसंघ भारत निर्माण करण्यासाठी संतांनी खूप महत्वपूर्ण कार्य केले आहे. मध्ययुगीन महाराष्ट्रात भक्तिमार्गाचे अनेक संप्रदाय निर्माण झाले. सर्वच संप्रदायाने धर्मप्रसार, लोकजागृती, भक्ती व लोकांना संस्काराची शिकवण दिली. महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, नाथसंप्रदाय. दत्तसंप्रदाय, सूफीसंप्रदाय, समर्थ संप्रदाय व वीरशैव लिंगायत संप्रदाय हे मोठ्या प्रमाणामध्ये लोकजागृती व धर्मजागृतीचे काम करत होते. लिंगायत संप्रदायामध्ये संत शांती लिंगस्वामी, संतमन्मथ स्वामी, संत शिवदास माऊली, संत महादेव प्रभू, संत लिंगेश्वर, संत लक्ष्मण महाराज, संत जीवन महाराज व संत बसवलिंग इत्यादी संतानी अभंग व ग्रंथरचना केली आहे. लिंगायत संप्रदायामध्ये संत मन्मथस्वामी यांचे कार्य खूप महत्त्वपूर्ण आहे. त्यांची ग्रंथरचना व अभंग रचना पाहिली तर सुरुवातीच्या काळामध्ये लिंगायत संप्रदायाला विकासाच्या मार्गावर आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संत मन्मथस्वामी यांच्या कीर्तन- प्रवचनाने व लिखाणाने केलेले आहे. लिंगायत संप्रदायातील सर्वच संतांनी कीर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून समाजाला जागृत केले. समाजाला संस्काराचे धडे दिले. भक्ती, ज्ञान, वैराग्य आणि नीतीसंस्कार यांची शिकवण प्रवचन व कीर्तनाच्या माध्यमातून देऊन वीरशै व लिंगायत संप्रदायातील सर्वच संतांनी स्त्री-पुरुष समानतेला ही खूप महत्त्व दिले आहे. या ठिकाणी आपण वीरशैव लिंगायत संप्रदायातील महत्वपूर्ण संतमन्मथ स्वामी यांच्या अभंगातील स्त्री विषयक विचार पाहणार आहोत.

संत मन्मथ स्वामी यांचा जन्म इ.स.१५६० साली बीड जिल्ह्यातील नेकनूर येथे झालेला आहे. संत मन्मथ स्वामी यांचे गुरु नागेश्वर हे होते. संत मन्मथस्वामी यांनी मुठभर प्रस्थापित लोकांची संस्कृत भाषेला डावलून मराठी या बहुजन समाजातील लोकभाषेत भाषेमध्ये अभंग व ग्रंथरचना केली आहे. त्यामुळे बहुजन समाजाला अध्यात्म व संस्काराचे ज्ञान मिळू लागले. बहुजन समाज शहाणा होऊ लागला. अंधश्रद्धेतून तो श्रद्धेकडे वळला व चांगल्या पद्धतीने जीवन जगू लागला. संत मन्मथ स्वामी यांनी गुरु गीता, स्वंयप्रकाश, अनुभवानंद, ज्ञानबोध, विभूती व परमरहस्य इत्यादी ग्रंथ रचना केली आहे. त्या सोबतचत्यांनी विपूल अशी अभंगरचना ही केलेली आहे. त्यांची अभंगरचना अनेक वैशिष्ट्यांनी संपन्न आहे. त्यांच्या ग्रंथरचनेवर व अभंग रचनेवर महात्मा बसवेश्वर, वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर व संत एकनाथ यांच्या विचारांचा प्रभाव पाहायला मिळतो. संत मनमत स्वामी यांनी आपल्या लेखनातून स्त्रियांना खूप महत्त्व दिलेला आहे. मध्ययुगीन काळामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान होते. तरी सुद्धा संत मन्मथ स्वामी यांनी स्त्रियांचा सन्मान केला व आपल्या साहित्यातून त्यांनी स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिलेले आहे.

प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत स्त्रीला खूप मानाचे स्थान होते. त्यावेळी भारतीय समाजव्यवस्था मातृसत्ताक होती. कुटुंबातील स्त्रीला प्रमुख स्थान होते. वैदिक काळातील स्त्रियांची स्थिती चांगली होती पण सूत्र व स्मृती काळात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले. मनु संस्कृतीने ही स्त्रीला खालचा दर्जा दिला महात्मा गौतमबुद्ध व जैनमुनी यांनीही स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने दर्जा दिला. ऐतिहासिक काळात स्त्रियांची अवस्था खूपच दयनीय झाली. बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी स्त्रियांना शिक्षण व पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार दिले. वेश्यांची लग्न लावून दिली. त्यांना संसारात रमविले. आंतरजातीय विवाह लावून दिले. स्त्री-पुरुष समानतेचे राज्य आणण्याचा प्रयत्न महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकामध्ये केला.

महाराष्ट्रात ही सर्व संप्रदायातील संतांनी स्त्रियांना खूप मानाचे आणि पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिले. छत्रपती शिवाजी महाराजानीही स्त्रियांना खूप मानाचे व पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिले. संत मन्मथ स्वामी स्त्रीला पुरुषाबरोबर समानता देण्याच्या संदर्भात असे म्हणतात की, "यारे मोठे लहान थोर । भलते याती नारी नर।" यातून आपणाला स्त्रीकडे पाहण्याची समानतेची दृष्टी दिसून येते. परमरहस्य या ग्रंथामध्ये मन्मथ स्वामी स्त्रीबद्दल असे म्हणतात की, "नारी नरा

सकळिका। येथे समान अधिकार असे देखा।" या वरून आपणास स्त्रियांना समान अधिकार दिला पाहिजे ही त्यांची भूमिका दिसून येते.

भारतीय संस्कृतीमध्ये कुटुंबाला व संसाराला खूप महत्त्व आहे. संसार करून परमार्थ करावा असे संत मन्मथ स्वामी स्वामी सांगतात. कुटुंबाच्या विकासात व धन साठवण्यामध्ये पुरुषाबरोबर स्त्रियांचे कार्य खूप महत्त्वपूर्ण आहे. हा संसार स्त्री व पुरुष या शिवाय चालत नाही. स्त्री व पुरुष हे संसाररुपी नाण्याच्या दोन महत्त्व पूर्ण बाजू आहेत. म्हणून संत मन्मथस्वामी आपल्या अभंगांमध्ये म्हणतात की,

"जोडोनिया हात करितो विनंती । वेळोवेळी गीती गायी नाम।।
सुखे हा संसार करा स्त्रीसंगती । वेळोवेळी गीती गायी नाम।।
कवडी कवडी द्रव्य जोडा लक्षशती । वेळो वेळी गीती गायी नाम।।
करा शास्त्रपाठ पहा धर्मनीती । वेळोवेळी गीती गायी नाम।।"[1]

संसार सुखाचा करायचा असेल तर स्त्री संगतीची म्हणजेच पत्नीची साथ असणे गरजेचे आहे. स्त्रीला त्यामुळे खूप महत्त्व आहे. संसारात जगताना दोघानी ही इमानदारीने कष्टाने कमविले पाहिजे. धर्मनीती व सदाचाराने वागले पाहिजे. स्त्रीचे महत्त्व सांगताना स्त्री ही कुटुंबाचा आधारस्तंभ असते. तीच कुटुंबात सर्वांना प्रेम देऊ शकते. तीच दुःखामध्ये सर्वांना सावरू शकते व आधार देते. कुटुंबाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. कुटुंबाच्या विकासासाठी रात्रंदिवस ती धडपड करते म्हणून स्त्री संगतीने म्हणजे आपल्या पत्नीच्या सोबत सुखाचा संसार करुन सुखी झाले पाहिजे असे संत मन्मथ स्वामी या ठिकाणी सांगतात. स्त्री शिवाय पुरुषांच्या संसाराचा गाडा चालत नाही तरी पण आजही स्त्रीला खूप छळले जाते, तिच्यावर अन्याय केला जातो. तिच्या कडे वाईट नजरेने पाहिले, बलात्कार केला जातो. ही मात्र चिंतेची व चिंतनाची गोष्ट आहे. सर्व समाज सुधारक महापुरुषांनी संत-महंतांनी यांनी स्त्रियांना आत्मसन्मानाचे स्थान दिले पण आजही स्त्रीला स्वातंत्र्य मिळत नाही. आजही ती तितकी सुरक्षित नाही, त्यामुळे आज आपण सर्वांनी स्त्रीला समानतेने वागविले पाहिजे. सन्मान दिला पाहिजे. हेच संत मन्मथस्वामी अभंगातून सांगतात.

आपल्या पत्नी सोबत सुखाचा संसार केला पाहिजे पण पर धन व परस्त्री कडे वाईट नजरेने बघू नये. त्याकडे दुर्लक्ष करावे. त्यामुळे जगातील कोणत्याही स्त्रीवर अन्याय व अत्याचार होणार नाहीत हे नक्की आहे. त्याबद्दल मनमत स्वामी असे म्हणतात की,

"साधन ते हेची दोन्ही । साधा तरी भक्तजनी ।।
परद्रव्य परनारी । याचा विटाळ तू धरी।।"[2]

या ठिकाणी परस्त्री व परधनापासून माणसाने दूर असावे. माणसांची दृष्टी दिव्य व विवेकी असावी. सर्व लोकांनी एकपत्नीचा स्वीकार करून सुखाचा संसार करावा. दुसऱ्या स्त्रीकडे वाईट नजरेने पाहू नये. असे संत मन्मथ स्वामी सांगतात. 'संत मन्मथदर्शन" या ग्रंथामध्ये लेखक रवींद्र बेंम्बरे याबद्दल असे म्हणतात की," अन्य कोणत्या साधना नाही झाल्या तरी परद्रव्य आणि परनारीच्या मोहापासून कटाक्षाने लांब राहणे म्हणजे एक दिव्य साधनाच आहे. प्रत्येक साधकाने ही साधना केलीच पाहिजे, अशी मन्मथस्वामींची आग्रही भूमिका आहे"[3] तरच स्त्री सुरक्षित व सन्मानाने राहिल असे त्यांचे मत आहे.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात ही स्त्रीयांवर अनेक बलात्कार होतात. दिल्ली व हैदराबाद येथील घटना आज ताजी आहे. भारताची स्त्री आजही सुरक्षित आहे का नाही याचे उत्तर मिळत नाही. स्त्रियांना सुरक्षित करायचे असेल तर माणसाने सदाचारी व विवेकाने वागले पाहिजे व कामवासनेवर विजय मिळवला पाहिजे नाही तर संसाराची व त्या माणसाची राखरांगोळी झाल्याशिवाय राहत नाही. या बद्दल संत मन्मथ स्वामी पुढील अभंगात सांगतात की,

"कामे ब्रम्हा चेवविला । कन्येपोटी तो लागला ।।
काम ऐसा आनीवार । नागविले ऋषीश्वर ।।"[4]

कामवासना अनीवार झाल्याने ऋषी सुद्धा बरबाद झाले आहेत. प्रत्येक व्यक्तीने परस्त्रीविषयीची कामवासना सोडून दिली पाहिजे. परस्त्रीला मातेसमान मानले पाहिजे. कामवासनेने व्याकुळ झालेला ब्रह्मा कन्येपाठी लागला त्यामुळे त्याचे जीवन उध्वस्त झाले. नीतिसंस्काराने व धर्मसंस्काराने सदाचारी वागून कामावासने वर विजय मिळवला पाहिजे. शुक्र मुनी, जनक व भीष्माने कामवासनेवर विजय मिळवला म्हणुन ते लौकिकास पात्र झाले आहेत. स्त्रीचा सन्मान केला पाहिजे. पत्नी सोडून इतर स्त्रियांच्या नादी लागू नये. त्याबद्दल मन्मथस्वामी म्हणतात की,

"काम जिंकला कवणे । ऐका त्याची महिमाने।।
रंभा आली शुकापासी । माय म्हणूनी वंदी तिशी ।।
काम षणमुखे ग्रासिला । जनक विदेही तो झाला ।।
काम त्रासि ला भीष्माने । मन्मथ म्हणेवर दाने ।।"[5]

प्रत्येक व्यक्तीने शुक्र मुनी, भीष्म व जनक राजाप्रमाणे कामवासनेवर विजय मिळवला पाहिजे. स्त्रीला सन्मान दिला पाहिजे. प्रत्येकाने जर स्त्रीला सन्मान दिला तर स्त्री सुरक्षित राहील आणि सन्मानाने जगेल. हा भाव या अभंगांमध्ये संत मन्मथस्वामी यांनी व्यक्त केला आहे. कामवासना माणसाला आंधळी बनवते, त्यापासून सावध राहून माणसाने सदाचारी, एक वचनी व एकपत्नी बनले पाहिजे. मुलगी, बहिण, पत्नी, माता व परस्त्रियांचा सन्मान केला पाहिजे. भारतीय संस्कृतीत स्त्रियांचा खूप सन्मान केला जातो. तेच संतांनी आपल्या वाणीतून व्यक्त केले आहे. संतवचनाचे आचरण प्रत्येक भारतीय पुरूषांनी केले तर भारतीय संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ राहील. भारतीय स्त्री ही खूप शोषक व प्रेमळ आहे. सदाचारी व कुटुंबाचा उद्धार करणारी आहे. भारतीय स्त्री ही पती, मूल या कुटुंबातील सर्वांवर प्रेम करते, सर्वांना मायेने वागविते. मुलाने आपराध केला तरी त्याला पोटात घेते. मन्मथ माऊली एका अभंगात म्हणतात की,

"लाड केले करू करी अपराध ।
माता त्याचा खेद काय मानी ।।"[6]

ज्याप्रमाणे माता आपल्या लेकराचा अपराध पोटात घेते, प्रेम देते, मुलाची चूक सुधारते त्याप्रमाणे प्रत्येक माणसाने चुका सुधारून सदाचारी! विवेकी व संस्काराने जगले पाहिजे तरच या जगातील व देशातील स्त्रीस्वावलंबी बनेल व सुरक्षित राहिल.

आज आपण विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात जगत आहोत. स्वातंत्र्यानंतर घटनेने स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचे समान अधिकार दिले. महात्मा फुले यांनी आधुनिक स्त्री ही शिक्षण घेऊन प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत राहावे म्हणून मुलींची पहिली शाळा पुण्यात काढली. सर्वच क्षेत्रात आज स्त्रीला समान अधिकार आहेत. हे सर्व महापुरुषांच्या वसंतांच्या कार्यामुळे सफल झाले आहे. आजच्या स्त्रीबद्दल कुंदा दाभोळकर असे म्हणतात की, "एकवेळ दास्यात खितपत असलेली, अज्ञान, अंधकारात चाचपडणारी, घर हेच एक कार्यक्षेत्र मानणारी स्त्री आज बहुविध भूमिका घेण्यास पुढे आलेली आहे. स्त्रियांचे प्रश्न स्त्रियांच हाताळत आहेत. स्त्रिया कोणत्याही क्षेत्रात कमी नाहीत. हे संधी मिळताच त्यांनी दाखवून दिले."[7]

या वरून असे दिसते की, समाजाचा, देशाचा विकास व्हायचा असेल तर आज स्त्रियांचा उद्धार होणे अत्यंत गरजेचे आहे. आजची स्त्री सबलापर्यंत येऊन पोहोचली पण तिच्यावर अन्याय व अत्याचार अजूनही कमी झालेले नाहीत. हे देशावरचे नव्हे तर जगावरचे खूप मोठे संकट आहे. सर्व संतांनी स्त्रीला समान सन्मान दिला, माय म्हणून वंदन केले. स्त्रिला समानतेची वागणूक व सुरक्षितता मिळण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. आपण ही संतांच्या वाणीच्या विचार करून स्त्रीला सन्मान देण्यासाठी समानतेचे आचरण केले पाहिजे. भारत व महाराष्ट्र ही संतांची व योग्याची भूमी आहे. संतांनी व योग्यांनी भारतीय स्त्रीला खूप सन्मान दिला. त्या पद्धतीचे आचरण आजच्या आधुनिक पुरुषाने केले तर निश्चितच स्त्रियांच्या समस्यांचा विचार होऊ शकतो आणि स्त्री सबला होऊ शकते. हेच संत मन्मथ स्वामी यांनी आपल्या अभंगाच्या द्वारे स्पष्ट केले आहे.

संत मन्मथ स्वामी यांनी स्त्रियांना सन्मान दिला. तिला माय म्हणून वंदन केले. कामवासनेवर विजय मिळवला. शेवटी संत मन्मथ माऊली ईश्वराकडे एक मागणे मागतात ते मागणे आपण सर्व आजच्या आधुनिक पुरुषाने मागितले तर नक्कीच आजची भारतीय स्त्री सुरक्षित राहू शकेल असा विश्वास आहे. संत मन्मथ स्वामी ईश्वराला खालील मागणे मागतात की,

"तुजलागी हेंची मागो । तुझे नामे छंद लागो ।।
सुखी संसाराशी घाली । देई आवडी पाऊली ।।
नको निचांचा सहवास । नको साधूजनी त्रास ।।
मोह पुत्र कलत्राचा । नको लोभ शरीराचा ।।
नको एकांती लोकांती । नको परनारी संगती ।।
म्हणे मन्मथ शिवलिंग । देई चरणापाशी जागा ।।"[8]

माणसांचा खऱ्या अर्थाने उद्धार व्हायचा असेल तर हा अभंग जीवनाच्या प्रत्येक पावलावर महत्त्व पूर्ण आहे. त्याचा अंगीकार प्रत्येक माणसाने केला पाहिजे. या ठिकाणी परनारीची संगती नको, दुष्टांचा सहवास नको, साधू व सज्जन माणसाला त्रास नको, शरीराचा मोह नको असे मन्मथ स्वामी या अभंगांमध्ये सांगतात. हे तत्व प्रत्येक माणसांनी अंगीकारावे. माणसांची प्रगती व्हायची असेल किंवा माणसाला ध्येयाची प्राप्ती व्हायची असेल तर वरील गोष्टीचा विचार प्रत्येक माणसाने केला पाहिजे. असे संत मन्मथ स्वामी यांनी या ठिकाणी स्पष्ट केले आहे.

सारांश:

संत मन्मथ स्वामी यांनी आपल्या अभंगातून स्त्रीजीवनाचा व्यापक व वैचारिक आढावा घेऊन स्त्रियांना समतेचा अधिकार मिळावायासाठी अनेक अभंगातून खूप प्रयत्न केले आहेत. परनारीची संगती पुरुषांनी करू नये, असे सांगून स्त्रीजातीचा उद्धारच संत मन्मथस्वामी यांनी केलेला आहे. स्त्रीला पवित्र मानून तिची पूजा करावी असे ही त्यांनी आपल्या अभंगातून सांगितलेले आहे. स्त्री हे प्रेमाचे, समानतेचे व सहनशीलतेचे प्रतीक आहे. देशातील स्त्री सुरक्षित व स्वतंत्र राहील तरच या देशाचा विकास होऊ शकतो. जी स्त्री नऊ महिने पोटात बाळाला बाळगते, नाना प्रकारच्या कळा सहन करते, त्या स्त्रीला जर सन्मान मिळत नसेल व तिच्यावर बलात्कार व अन्याय होत असेल तर या देशाचा विकास होऊ शकत नाही. म्हणून संत मन्मथ स्वामी यांनी सांगितलेले' परनारी व परद्रव्य यापासून माणसाने दूर राहावे' हे सूत्र प्रत्येक माणसाने अंगीकारले पाहिजे, तेव्हाच तेव्हाच सर्व स्त्रियांचा सन्मान व संरक्षण होईल व देशाची संस्कृतीही टिकेल तसेच या देशाच्या संस्कृतीचा विकास होईल. असे मन्मथ स्वामी यांनी सांगितले आहे. डॉ. रवींद्र बेम्बरे सर संत मन्मथस्वामी बद्दल असे म्हणतात की, "मन्मथस्वामी हे सोळाव्या शतकातील महत्त्वपूर्ण संतकवी आहेत. महाराष्ट्रातले बसवेश्वर म्हणून संत साहित्याच्या अभ्यासकांनी त्यांचा गौरव केला."[9] अशा या महान संतांनी शके१५३५मध्ये कपिलधार येथे संजीवन समाधी घेतली.

निष्कर्ष :-

१) संत मन्मथस्वामी यांनी मातापासून पत्नीपर्यंत सर्व भारतीय स्त्रियांचा सन्मान करावा असे सांगितले आहे.

२) संत मन्मथ स्वामी यांनी आपल्या अभंगातून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समानतेचा अधिकार देण्याचे महत्त्वपूर्ण चिंतन मांडलेले आहे.

३) परनारी व परद्रव्य यांच्या मोहापासून प्रत्येक पुरुषाने दूर राहून स्त्रियांना सन्मान देण्याचे संत मन्मथ स्वामी यांनी आपल्या अभंगातून सुचविले आहे.

४) स्त्रियांच्या संगतीने सुखाचा संसार करावा. स्त्री ही प्रत्येक पुरुषांच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. कुटुंबाचा विकास करते. ही भूमिका त्यांच्या अभंगातून पाहायला मिळते.

५) स्त्रियांचा सन्मान हा देशाचा व संस्कृतीचा विकास आहे, हीच भूमिका त्यांनी आपल्या अभंगातून मांडलेली आहे.

संदर्भग्रंथ : -

१) श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी व्यक्तिरेखा आणि ग्रंथ संपदा- डाॅ. शिवलिंग शिवाचार्य महाराज – संस्कृती प्रकाशन राजूर- प्रथमावृत्ती – शके 1909 - पृष्ठ166

२) श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी : श्री सांप्रदायिक सप्तरत्न गाथा- संपादक डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज- संस्कृती प्रकाशन राजूर- अभंग क्र - 35

३) संतमन्मथ दर्शन - डॉ.रवींद्र बेंम्बरे- महाराष्ट्र बसव परिषद हिरे मठसंस्थान भालकी – प्रथमावृत्ती 22 जानेवारी 2019 - पृष्ठ-95

४) श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी: श्री सांप्रदायिक सप्तरत्न गाथा- संपादक डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज- संस्कृती प्रकाशन राजूर- अभंग क्र-100 – पृष्ठ - 29

५) तत्रैव – अभंग क्रमांक – 99 –पृष्ठ -28

६) तत्रैव – अभंग क्रमांक - 99-पृष्ठ-28

७) भारतीय स्त्री:शिक्षण, विकास आणि वाटचाल- कुंदा दाभोळकर-जोशी आणि लोखंडे प्रकाशन पुणे - प्रथमावृत्ती-26 जानेवारी 19 73 – पृष्ठ -114 \

८) संत मन्मथ दर्शन - डॉ.रवींद्र बेंम्बरे- महाराष्ट्र बसव परिषद हिरे मठ संस्थान भालकी – प्रथमावृत्ती 22 जानेवारी 2019- पृष्ठ-104

९) तत्रैव- पृष्ठ - मनोगत

मराठी 'स्त्रीवादी' कादंबरीतून व्यक्त झालेली 'स्त्री' प्रतिमा

प्रा. डॉ. कल्पना गावडे

स.भू.बा उर्फ आप्पासाहेब जेधे महाविद्यालय पुणे 2

स्त्रीवादी कादंबऱ्यांचा प्रवाह हा १९७० नंतरच्या कालखंडातच निर्माण झालेला प्रवाह आहे. भारतामध्ये सर्वसामान्यपणे परिचित असलेल्या स्त्रीवादी समीक्षेचे प्रवाह ब्रिटिश व अमेरिकेन आहेत. तर स्त्रिया या लेखनपरंपरेचा नव्याने शोध घेण्याची कल्पना एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उदयाला आली असून ती प्रामुख्याने अमेरिकन आहे. अशा तऱ्हेची कल्पना निर्माण होण्याचे कारण म्हणजे आज वरच्या बहुतांश साहित्यात चित्रित केलेली स्त्रीप्रतिमा ही साचेबंद पद्धतीची असल्याची झालेली जाणीव. त्यामुळे स्त्रियांनी लिहिलेल्या वांड़मयात तरी काही वेगळी प्रतिमा दिसते का हे जाणून घ्या विषयी वाटू लागले. वाचकप्रिय वाड्:मय जाहिराती, मुलांसाठी लिहीले गेलेले वांड्:मय यातून दिसणारी स्त्रीची प्रतिमा ही तिच्या स्त्री असण्यावर आधारलेली प्रतिमा होती. माणूस असण्यावर नव्हे. प्रेमळ आई, कास्ट सावत्र आई, नवऱ्याच्या सुखासाठी जीवन वेचणारी सुशील पत्नी किंवा त्याला जीवन नकोसे करून सोडणारी कजाग पत्नी याचबरोबर वहिनी, बहीण, नंदा, सासू-सून अशा प्रकारच्या रूपान मधूनच ती पुढे येत गेली. पुरुषांना मोहात पाडणारी, त्यांचा विश्वासघात करून आयुष्य उध्वस्त करणारी म्हणून तिचे नकारात्मक चित्रण केले गेले तर कधी कलाकाराची स्फूर्तिदेवता म्हणून उदात्तीकरण केले गेले. मेरी फर्ग्युसनसारख्या टीकाकारांच्या मते या कृतक प्रतिमा होत्या. तिला असे वाटते की स्त्रीयांच्या लेखनातून त्यांच्या विश्वासाचे त्यांच्या खऱ्या अनुभवाचे दर्शन घडेल व सुरवातीच्या स्त्रीवादी समीक्षेचा हाच पाया होता. स्त्रियांच्या लेखनाचे पुनर्मूल्यांकन करण्यामागे आणखी एक हेतू होता. तो म्हणजे तोपर्यंतच्या स्त्री साहित्याचे रसग्रहण करणारी समीक्षा पद्धती ही देखील पुरुषप्रधान संस्कृतीमधील समीक्षेच्या निकषांवर आधारलेली होती. मेरी एलमन हिने Phallic criticism लिंग विशिष्ट समीक्षा असे समर्पक वर्णन केले आहे. या समीक्षापद्धतीने स्त्रियांचे लेखक म्हणून, वाचक म्हणून असणारे प्रश्न व साहित्यातून तिचे केले जाणारे चित्रण यावर पुरेसा प्रकाश टाकला नव्हता. वास्तविक पाहता ज्या परिस्थितीत ही साहित्यनिर्मिती होत होती व ज्या परिस्थितीतील वाचक त्याचा आस्वाद घेत होती त्याचा विचार स्त्रियांचे समजण्याच्या दृष्टीने आवश्यक होते. परंतु त्याच्याकडे या समीक्षापद्धतीने दुर्लक्ष केले होते. या जाणिवेतून निर्माण झालेली स्त्रीवादी समीक्षा पद्धती सत्तर ते ऐंशी या दशकाच्या उत्तरार्धात दृढमूल झाली. अशा प्रकारच्या लिंगभेदावर वेगळ्या साहित्य परंपरेची उभारणी करणे काही अंशी कृत्रिम आहे याचीही जाणीव होती. पण तू असे करण्याची तीन कारणे एरन मुरसंन दिली आहेत.

१) आपल्या नकळत अशा तऱ्हेचा निकष आपण वापरत असतो.उदा. लिहिणारी स्त्री आहे याचा विचार करता-----(जनाबाई, ताराबाई शिंदे इत्यादी)

२) या दृष्टिकोनातून स्त्री साहित्यावर पडणारा प्रकाश नवीन दृष्टी देतो.

३) या पद्धतीने स्त्रियांचे साहित्य व ते ज्याच्यातून निर्माण होते ते त्यांचे जीवन अधिक चांगल्या प्रकारे समजू शकते.

भारतीय संदर्भात विचार केल्यानंतर असे दिसून येते की सत्तर ते ऐंशी या दशकाच्या सुरुवातीला स्त्री चळवळीने जोर धरला. हा काळ एक वेगळ्या प्रकारे राष्ट्राच्या पुनर्बांधणीचा काळ होता. राजकारण धर्मकारण, प्रशासन, वृत्तपत्र, जाहिरातील, दूरदर्शन यासारखी प्रसारमाध्यमे चित्रपट व साहित्यिक या सगळ्याचाच हातभार त्याला लागला होता.

स्त्रीसाहित्यिकांचा या नवनिर्मिती मध्ये महत्त्वाचा हातभार होता. याच काळात अनेक स्त्री संघटनांची स्थापना झाली. मुंबई येथील Forum against the opression of women, बंगलोर येथील विमोचाना, हैदराबादमधील

'स्त्रीशक्तीसंघटना', व दिल्लीची 'सहेली'त्यात प्रमुख होत्या.१९७४ मध्ये Towards equality या शीर्षकाचा Committee on the status of women India चा अहवाल प्रसिद्ध झाला व 'मानुषी' हे स्त्रीवादी नियतकालिके निघू लागली.

पुरुष प्रधान संस्कृती असलेल्या समाजामध्ये कोणत्याही काळात स्त्रीचे असलेले स्थान त्या त्या काळातील समाजाच्या सामाजिक, आर्थिक रचनेवर अवलंबून असते. त्याचेच प्रतिबिंब साहित्यातही पडते. भारतातील अभिजात साहित्यात चित्रित केली गेलेली स्त्रीप्रतिमा व काळानुसार त्यात होत गेलेले बदल यातून याचेच प्रत्यंतर येते. त्यातील विविध स्त्रियांच्या व्यक्तिरेखा पाहिल्या तर पती-पत्नी नात्यातील स्त्रीची भूमिका यावर विशेष भर दिलेला दिसतो. त्यामुळे भारतीय संदर्भात "चांगली स्त्री"हा शब्द "चांगली पत्नी"या अर्थानेच वापरला जाई. सावित्री, दमयंती सीता,इत्यादी याचीच उदाहरणे आहेत. वाल्मिकी रामायणात स्त्रीही त्यागमुर्ती, सद्गुगुण, इमान व पावित्र्य याची मूर्ती असावी असा आदेश निर्माण केला गला. महत्त्वाकांक्षा असणे किंवा प्रेमसंबंधात स्त्रीने पुढाकार घेणे हे तिचे अवगुण आहेत व त्याचे परिणाम तिला भोगावे लागतात हे कैकयी, शुर्पनखा यांच्या चित्र नावरून दाखवली गेले. ही प्रतिमा आर्य समाजातील आदर्शांना अनुसरणारी होती. त्याच काळातील राक्षस किंवा वानर समाजातील स्त्रिया मात्र वेगळे दिसतात. ते समाज आर्थिक संस्कृतीच्या दृष्टीने आर्याइतके पुढारलेले नसले तरी त्यातील स्त्रिया मात्र स्वतंत्र व्यक्तीचे प्रतिनिधित्व करतात. आर्य स्त्रीप्रमाणे पावित्र्याच्या कल्पनांचे दडपण त्यांच्यावर व पुरुषांवर ही नाही हे अंजिनी, वाल्मिकी पत्नी तारा यांच्या उदाहरणांवरून दिसून येते. रामाने सीतेला अग्निदिव्य करायला लावण्याची घटना ही तर स्त्रियांच्या पावित्र्या बद्दलच्या अधिकाधिक कठोर जाचक होणाऱ्या बंधनाची निदर्शकच आहे. म्हणजे आर्थिक प्रगतीच्या प्रमाणात स्त्रियांचे समाजातील स्थान मात्र कमीच होत जाते. लक्ष्मणरेषेची कल्पना सुरुवातीच्या रामायणात नाही. ती मध्ययुगामध्ये अस्तित्वात आली. सोळाव्या शतकात ज्या संघर्षाला हिंदू समाज सामोरा जात होता त्यादृष्टीने लेखकाला ती आवश्यक वाटली असावी. सीतेचा भुमीप्रवेश इतर अतिशय बोलकी घटना आहे. स्त्रीवरील अन्याय, तिची अवहेलना तिला असह्य झाली तर तिने सन्मानाचे मरण पत्करावे, सन्मानाचे जीवन मिळण्याचा मात्र प्रश्नच उद्भवत नाही.

महाभारतातील स्त्रियांच्या चित्रणातही विवाह हे स्त्रि च्या जीवनाचे अंतिम ध्येय आहे हेच ठरवले जाते. कुपीगर्गाच्या मुलीने मोक्षप्राप्तीसाठी कठोर तप केले तेव्हा तिला विवाह केल्याशिवाय स्त्रीला मोक्ष मिळत नाही असे सांगितले गेले. म्हणून अखेर तिने विवाह करुन देह ठेवला. भीष्म व युधीष्ठिर यांच्या तोंडी ही स्त्रियांविषयी अनुदार उद्गार आहेत. तपोभंग करण्यासाठी पाठविण्यात आलेल्या स्त्रियांमधून पुरुषाला मोहन पाडून त्याच्या ध्येयापासून विचलित करणारी असे चित्र आहे. तर स्त्रीचा एखाद्या निर्जीव गोष्टीप्रमाणे विनिमय केला जाऊ शकतो याला ययाती कन्या माधवीची कथा साक्ष आहे. सुरुवातीच्या काळात अपत्यप्राप्ती बद्दल स्त्रियांना स्वातंत्र्य होते कारण ती समाजाची गरज होती. नंतरच्या काळात मात्र विवाहाचे आठ प्रकार व मुलांचे बारा प्रकार (नियोग, औरस,कनिन, इत्यादी) यांना असलेली मान्यता जाऊन स्त्रियां वरची बंधने अधिक वाढवण्यात आली. महाकाव्यांमध्ये स्त्री साठी वापरले गेलेले भार्या रमणी, कामिनी, शांता, जया इत्यादी शब्दही स्त्री ची पत्नी व माता ही भूमिका स्पष्ट करतात.

आधुनिक काळातील स्त्रियांनी शिक्षणाचा फायदा मिळाल्यानंतर लेखनाला सुरुवात केली तरी त्यांच्या समोर असलेले आदर्श हे पुरुषप्रधान संस्कृतीत निर्माण झालेल्या साहित्यातच होते. त्यामुळे बहुतांश स्त्रियांच्या लेखनातून येणाऱ्या स्त्रीचित्रणातही फारसा फरक पडला नाही. सुंदर, बांधेसूद, कमनिया पुरुषाला जीचा मोह पडावा अशी होती. आपल्या पुरुषासाठी वाटेल तो त्या करण्याची सर्वस्व पणाला लावण्याची तिची तयारी होती. नव्हे त्यातच तिच्या जीवनाचे साफल्य होते. घर, संसार, नवरा मुले, बाळे सासू-सासरे हेच तिचे विश्व होते. परपुरुषाविषयी आकर्षण वाटणे हे महापाप होते व तिच्या पतीच्या कक्षेत कोणी स्त्री आली तर या समस्येवर त्याला न दुखवता कशी मात करावी यात तिचे बुद्धिचातुर्य पणाला लागत होते. बदलत्या काळानुसार तिच्या पुढील समस्या बदलत होत्या. तिची मनोभूमिका मात्र तीच कायम होती. या

ठिकाणी या साहित्याच्या वाचक वर्गाचाही विचार करावा लागेल. आर्थिक सुबत्ता, कुटुंब नियोजनामुळे मुलांची मोजकी संख्या, अनेक यंत्राच्या साह्याने हलके झालेले घरकामाचे श्रम यामुळे ज्यांच्या वाट्याला मोकळा वेळ आला होता अशा स्त्रिया हा या साहित्याच्या वाचक वर्गाचा फार मोठा भाग होता, आणि त्यांची जडणघडण याच संस्कृतीत झालेली असल्यामुळे अशा प्रकारच्या कादंबऱ्यांना मिळणारा त्यांचा प्रतिसाद फार मोठा होता. त्यामुळे त्या कादंबऱ्या लोकप्रियही झाल्या. यापेक्षा वेगळे चित्रण काही स्त्रियांच्या लेखनातून आढळतेही परंतु त्यांच्या मूल्यमापनासाठी आवश्यक ती समीक्षा पद्धती उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे रास्त मूल्यमापन झालेले नाही.

या गोष्टीची जाणीव होत गेली तसतसा असंतोष वाढीला लागला व या विचारमंथनातूनच जाणीवपूर्वक केलेल्या स्त्रीवादी लेखनाचा, स्त्रीवादी समीक्षेचा जन्म झाला. स्त्रीच्या बदलणाऱ्या, अधिकाधिक व्यामिश्र, गुंतागुंतीच्या मनो रचनांचा वेध घेण्यास समकालीन समीक्षा पुरेशी नाही याबद्दलचे असमाधान या लेखनाच्या मुळाशी होते. गौरी देशपांडे कमल देसाई व सानिया या लेखिकांच्या कादंबऱ्या या प्रवाहातील प्रमुखत: लक्षात घेण्यासारख्या कादंबऱ्या आहेत. यापैकी गौरी देशपांडे व कमल देसाई यांच्या लेखनाचा मी विशेष विचार केला आहे. रजिया पटेल सारख्या काही लेखिकांनी स्त्रीवादी लेखन केले असले तरी ते कादंबरी या सदरात येत नसल्यामुळे त्याचा विचार केलेला नाही. तीच गोष्ट आत्मकथनाची आहे.

स्त्रीवादी कादंबऱ्यांमध्ये निवेदन बरेचदा प्रथमपुरुषी असते, हे त्यांचे चटकन लक्षात येणारे वैशिष्ट्य आहे. कारण आत्मचरित्र, दैनंदिनी, कविता इत्यादी आत्मनिष्ठ स्वरूपाचे लेखन आपल्या अनुभवांच्या अभिव्यक्तीसाठी तिला आजवर जवळचे वाटले आहे. अशा तऱ्हेच्या प्रथमपुरुषी निवेदनातून व्यक्त होणारे नायिकेचे अनुभव लेखिकेचे स्वतःचे असतील किंवा नसतील परंतु ते बहुसंख्य स्त्रियांचे प्रतिनिधित्व करणारे असतात. स्त्री पुरुष शारीरिक संबंधाचा येणारा अनुभव व त्यातून होणाऱ्या मानसिक प्रतिक्रिया, काही वेळा त्यातील अन्यायामुळे येणारी दु: सहय्यता हा व्हर्जिनिया वूल्फच्या अशा प्रकारची आत्मकथनात्मक पद्धतीही लेखिका, नायिका व वाचक यांच्यातील तादात्म्य साधण्यास मदत करते. गौरी देशपांडे यांनी कारावासातून पत्रे, "एकेक पान गळावया', "तेरुओ", "निरगाठी", "थांग', "मुक्काम" इत्यादी अनेक कादंबऱ्यांमधून तर कमल देसाई यांनी "काळा सूर्य" या कादंबरीतून या शैलीचा उपयोग केला आहे.

स्त्रीच्या पारंपरिक प्रतिमेच्या अनेक पैलूंपैकी पुरुषाला आपल्या देहसौंदर्याने आकर्षून घेणारी या पैलूला फार महत्त्व दिले गेले. रमणी, कामिनी इत्यादी शब्द याचेच निदर्शक आहेत. नृत्यातील अष्टनायिका सादर करणारी नर्तिका स्त्री असली तरी तिच्या आजूबाजूची चौकट पुरुषप्रधान होती व तिच्या भूमिका पुरुषांच्या संदर्भातच निश्चित केल्या होत्या. पुरुषांचे लक्ष वेधून घेण्याचा मनोवेधक साजसजावट करणे व आपल्या देहाचे माध्यम बनवणे हा एकच मार्ग तिला उपलब्ध होता. गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील नायिका याच्या विरोधी आहे. आपल्या सामान्य रूपाचे, आहे त्या रूपाला सजवण्याच्या व्यर्थ तेचे उल्लेख वारंवार नायिकेच्या तोंडी येतात. त्यादृष्टीने त्यांनी नायिकेचे de-glamourization करून तिची आकर्षक, कमनीय, पुरुषांच्या अपेक्षांच्या दृष्टिकोनातून चित्रित केलेली पारंपारिक प्रतिमा पुसून टाकली आहे. परंतु त्याच्याबरोबर तिला स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातील सामर्थ्यस्थळांचीही पूर्ण जाणीव आहे. हे सामर्थ्य तिला तिच्या वैचारिक सखोलतेतून, स्वतंत्र वृत्तीतून लाभले आहे. म्हणूनच "थांग" मधील कालिंदी नि:संकोचपणे, कुठलाही न्यूनगंड न बाळगता अप्रतिम रूप लाभलेल्या आंगेलिकी शेजारी उभी राहू शकते. एवढेच नाही तर या सामर्थ्याची जाणीव असलेल्या दिमित्री व इयनची नजर खेचून घेऊ शकते. माणसाच्या सौंदर्याविषयीचे तिचे विचार तिने फार समर्पकतेने व्यक्त केली आहेत."लोक मला दिसायला चांगली म्हणतात. मला याचं आश्चर्य वाटतं. म्हणजे फुकट विनय नव्हे हा. खरोखरच वाटतं कारण आरशात पाहिलं तर चेहऱ्यामोहऱ्यात सौंदर्याचा नाहीतरी बरोबर सुंदर बायका घेऊन जाणारेही वळून माझ्याकडे बघतात. कारण माझ्या मते एकच माझ्या एकंदर अविर्भावात जी संपूर्ण बेपर्वाई असते ती लोकांना शब्दांचा तुटवडा म्हणून याला ते सौंदर्य म्हणतात. वास्तविक हा आहे स्वतंत्रतेचा एक पैलू."

कमल देसाई यांच्या "काळा सूर्य" व "हॅट घालणारी बाई" या कादंबऱ्यामधील नायिएकेला वर्णन केलेली शरीरा आकृतीच नाही. फार काय ज्याच्या आधाराने वाचक कदाचित तिची काल्पनिक आकृती उभी करू शकेल त्या नावाला येथे अस्तित्व नाही. "हॅट घालणारी बाई" मध्ये अगदी शेवटी तिच्या नावाचा उल्लेख येतो तेवढाच.

आत्तापर्यंतच्या बहुसंख्य कादंबऱ्यांमध्ये स्त्रीला पुरुषाविना येणारी अपूर्णता, तिची असहाय्यता, तिचे पुरुषाच्या तुलनेत दुय्यम असलेले स्थान हे जणू काही स्त्रीत्वाचे आवश्यक पैलूच आहेत, अशा पद्धतीने त्यांचे चित्रण केले गेले. किंबहुना त्यांचे उदात्तीकरण केले गेले. गौरी देशपांडे व कमल देसाई यांच्या कादंबऱ्यांमधून याचे उदात्तीकरण तर केले नाहीच. उलट त्यांच्या नायिका त्याविरुद्ध निकराने लढताना दिसतात. "कारावासातून पत्रे"मधील नायिका हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. तिचा लढा अवघड आहे पण तिच्या म्हणण्याप्रमाणे "त्याच्या शेवटी काही एक असे साध्य माझ्या हाती लागेल की ज्यायोग्ये मला मी पुरेशी ठरेल". असा तिला विश्वास आहे. आता एवढ तरी कळलं की माझ्या प्रत्येक चढावर मला हात द्यायला कुणी कुणी होतच आणि जोपर्यंत मी अगदी एकटी जिंकत नाही तोवर ही चढाई मला पुन: पुन्हा चढावीच लागेल. "याची तिला जाणीव आहे. प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यात पुरुषी एक गोष्ट दिलेली असते व या जुलमातून तिची धडपड आहे. आपल्याला सोडून दूर गेलेल्या मनूला" तुझ्या हटटान आणि परिस्थितीनं आयती चांगली तुझ्या खुद्द, शारीरिक कैदेतून सुटले आहे, तर आता भावनिक परावलंबनातून सुटता यावं म्हणून निकरांन मी केले ती धडपड काय अशी पटकन पुसून टाकता येणार आहे तुला? नावच काढू नकोस. जरा कुठं आकाश दिसायला लागलंय तो परत आत ढकलेन म्हणशील तर मी तटीन लढेल समजून एस". हे झालो तरच तिच्या सुटकेच्या हट्टाला खरा अर्थ आहे. नाहीतर नुसते जेलर बदलले तुरुंग तोच.

कमल देसाई यांच्या कादंबऱ्यांमध्ये हा feminine protest चार सूर अधिक तीव्र आहे. "हॅट घालणारी बाई" शीर्षकातच स्वयंपूर्ण व निर्मितीक्षम स्त्री सूचित केले आहे. हॅट हे फ्रॉइडच्या मते पुरुष लिंगाचे प्रतिक आहे वर त्या हॅटमधील फुले नवनिर्मितीचे प्रतीक आहे. अशाप्रकारे हॅट घालणाऱ्या बाई मध्ये स्त्री-पुरुष तत्वाचा संयोग सूचित झाला आहे. नयिकेला चित्रपट काढायचा आहे. डिस्ने लँडसारखी अद्भुत नगरी तिला निर्माण करायची आहे. कैलास शेटने त्यासाठी तिला काही अटींवर आपला स्टुडिओ व इतर मदत देऊ केली आहे. असे असताना तो चित्रपट पूर्ण तिच्या मार्गावर असतानाच नायिका स्टुडिओला आग लावून देते. या कृतीची संगती लावताना रा.भा. पाटणकर यांनी केलेले विश्लेषण अतिशय अर्थपूर्ण समर्पक आहे म्हणून ते विस्ताराने देत आहे. ते लिहितात "प्रकल्पसिध्यीतून व्यक्तित्व प्रस्थापना होत असली तरी स्त्रीच्या व्यक्तित्वप्राप्तीत काही खास विघ्ने आहेत असे लेखिकेचे मत आहे. पुरूषांप्रमाणे स्त्री स्वतंत्र स्वयंपूर्ण नाही. कसलीही निर्मिती ती एकटी करू शकत नाही. पुरुषांची मदत घेतली नाही तर तिला निर्मितीक्षमता प्राप्त होत नाही. परंतु पुरुषांची मदत घ्यायची म्हणजे स्वत:चा कमीपणा मान्य करायचा. प्रकल्पाची सिद्धी नाहीतर व्यक्तिमत्त्व प्राप्ति नाही पण पुरुषाच्या मदतीशिवाय प्रकल्पसिद्धी नाही. म्हणजे स्त्रीला व्यक्तित्वप्राप्ती व्हायची असेल तर तिने स्वत:ची न्यूनता स्वीकारली पाहिजे. पण या अटीवर व्यक्तित्वप्राप्ती व्हायची असेल तर ती न झाली तरी काय हरकत आहे? पुरुषास्पर्शाने डागाळलेली मुक्ती सुद्धा तिला नको आहे." काळा सूर्य "मधील नायिकेलाही आपण स्त्री आहोत, स्वभावत:असहाय दुबळे आहोत ही जाणीव जाळते आहे. ती तिला नाकारायची आहे. पुरुषांनाही जे जमत नाही असे काहीतरी केले तरच तिच्या अस्तित्वाचा ठसा ती उमटू शकेल अशी तिची मनोमन खात्री पटली आहे. जगाचे सर्व उद्धारकर्ते पुरुष होते. आता एका स्त्रीने प्रा ॅमिथिअस का बनवू नये यातूनच अश्व रथाचे कार्य पूर्ण करण्याचा विचार तिच्या मनात निर्माण झाला आहे. लेखिकांनी पारंपरिक स्त्री प्रतिमा रंगल्या नाहीत. उलटअशारीतीने जगणाऱ्या बद्दलच्या त्यांच्या मनातील उपहास त्यांच्या लेखनातून व्यक्त होतो. "कारावासातून पत्रे" ची नायिका मारियाला नवरा सोडून द्यायला प्रवृत्त करण्याचा विचार करते. ऑफिस मध्ये परत आल्यावर तिला कळते की मारिया चा नवरा तिला सोडून गेला यावर ती लिहिते "या सगळ्या भानगडीत आमचं मर्यादित ध्येय खतम. आता केस कापणं किंवा फ्रेंच शिकणं असं काही करावं लागेल" कमल देसाईंच्या कथेतील वहिनी म्हणते "माणसाने तडजोड करावी, नऊवारी नेसून

सडा घालावा. (सुलोचना नेहमी सिनेमात घालते तसा) आणि सर्वांना चहा करून द्यावा. मगआपण घ्यावा. असं केल्याने काय होतं? संसार सुखाचा होतो. लेकी- सुना नातवंडे पतवंडे यांनी फळतो."

पतिनिष्ठा, पातिव्रत्य हा पूर्वापार स्त्रीचा सद्‌गुण म्हणून मान्य झाला. रामायणकाळामध्ये भार्या-भर्ता व पतिव्रता या कल्पनांचा उदय झाला. रामाने सीतेला करायला लावलेल्या अग्निदिव्यामधे याची परिसीमा दिसली. स्त्रीने आपल्या पतीशिय इतर पुरुषांची अभिलाषा धरणे, त्याच्या सहवासात आनंद मांनणे, त्याच्याशी शारीरिक संबंध ठेवणे हे सर्वात नींध्य पाप ठरले. आधुनिक काळातील कादंबरी वांड़:मयातील अनेक नायिका विवाहबाह्य संबंधामध्ये गुंताना दिसतात. परंतु लेखिका त्यासाठी नवरा बदफैली असणे, षंढ असणे, त्याचे नायिकेकडे दुर्लक्ष होणे अशा प्रकारची परिस्थिती निर्माण करून आधीच त्यांच्या बचावाची सिद्धता करून ठेवतात. गौरी देशपांडे व कमल देसाई यांच्या या प्रकारच्या शरीर पवित्रकडे बघण्याचा दृष्टिकोनच मुळातून वेगळा आहे. प्रणय क्रिया हा इतर व्यवहारांसारखाच एक व्यवहार आहे. त्याला नैतिकतेचे अस्तर जोडण्याची आवश्यकता नाही. आपला हा दृष्टीकोण "तेरूओ"ला समजावून सांगताना त्याची नायिका म्हणते "तो एकमेकांबद्दलचा भाव इतका संपूर्ण असतो की मग खुद्द प्रणयक्रीडाही त्याचा एक भाग बनते. ती करणं न करणं याला फारसे महत्त्व उरत नाही. एकमेकांबरोबर घ्यायचा आणखी एक अनुभव एकमेकांना द्यायचं आणखी एक सुख. अरे, तू माझ्याकडे टाकलेल प्रत्येक कटाक्ष, तुझा प्रत्येक ओझरता स्पर्श मला तितकाच सुखावून जातो. "तिचं जनकशी लग्न झाला असूनही तोही चालवून घेतो याबद्दल तेरुओ आश्चर्य व्यक्त करतो. त्यावर तिची प्रतिक्रिया-"जनकचा काय संबंध आहे याच्याशी? लग्न झालं म्हणून काय माझी कामुक भावना, अमुक अवयव, अमुक कृत्य त्याच्या मालकीची झाली की काय? अशी आहे.

कमल देसाई यांच्या "हॅट घालणारी बाई" च्या नायिकेला चित्रपट निर्मितीचे ध्येय साध्य करायचे आहे. कैलास शेट एका अटीवर तिला स्टुडीओ द्यायला कबूल होतो. ती आठ म्हणजे"एक वर्ष तू माझ्याकडे राहायचं, माझी रखेली म्हणून, जाहीर पणे हिंडवीन मी तुला". ही अट ती क्षणभरही न थांबता कबूल करते. राम तिच्या या कृतीने घायाळ होतो. त्यावर ती सरळपणे त्याला म्हणते "असे काय बघता माझ्याकडे? मी कबूल झाले नसते तर स्टुडिओ मिळाला नसता मग?" तिला आपल्या सूचितेपेक्षा आपले ध्येय अधिक महत्त्वाची वाटते. "काळा सूर्य" च्या नायिकेनेही कन्या गमनी बेंद्रे कडे राहायला जाऊन प्रतिईश्वरवादी व्यूहाची धीटपणाने निवड केली आहे.

आपल्या देहविशिष्ट अनुभवांची धीटपणे केलेली अभिव्यक्ती हे स्त्रीवादी लेखनाचे एक व्यवच्छेदक वैशिष्ट्य बनून राहिले आहे. मात्र याचा अर्थ असा नाही की केवळ त्यामुळे आपण आधुनिक स्त्रीवादी असल्याचा दावा लेखिका करतात. अश्लील वांड़:मयात स्त्रीच्या या देहविशिष्ट अनुभवांना दिले गेलेले प्राधान्य ही स्त्रीवादी विचारवंतांच्या टीकेचेच लक्ष ठरले आहे. स्त्रियांच्या दृष्टिकोनातून देहविशिष्टतेचे संदर्भ बदललेले आहेत. त्यातील नीती बाह्यता किंवा घृणा यांना महत्त्व राहिलेले नाही. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे प्रणयक्रीडेच्या आनंदाचा मातृत्वाची जोडला जाणारा संबंध अपरिहार्य राहिलेला नाही. स्त्रियांच्या रतिक्रीडाविषयक दृष्टीकोनामध्ये स्त्री वादाने घडवलेले हे अत्यंत महत्त्वाचे परिवर्तन आहे.

जन्मंगल मातृत्वाचे गोडवे साहित्याने युगानयुगे गायले मातृत्व म्हणजे जीवनाचे सार्थक मानले गेले व त्याचे बंधन स्त्रीच्या दृष्टीने अनुल्लंध्य झाले. स्त्रीवादी साहित्याला हे मान्य नाही. "वुमन ऑन द एज ऑफ टाईम" मध्ये मार्गो पियसीने मांडलेला दृष्टिकोन यासंदर्भात लक्षात घेण्याजोगा आहे. स्त्रीच्या अंगी असणारी मूलभूत अनन्यसाधारण शक्ती म्हणजे अपत्याला जन्म देण्याची तिच्या शरीराची क्षमता. परंतु ही क्षमता म्हणजे जीवशास्त्रीय दृष्टीने तिच्या अस्तित्वावरची शृंखलाच होय. जोपर्यंत ह्या जीवशास्त्रीय शृंखलेने ती बद्द आहे, तोपर्यंत ती पुरुषांची बरोबरी करू शकणार नाही. पुरुष हा पूर्णतः दयाळू व प्रेमळ होण्याची शक्यता दुरापास्त आहे. म्हणून स्त्रीला माता होण्याच्या आपल्या वैशिष्ट्याचा त्याग करावा लागेल. यामुळे तिने कल्पिलेल्या जगात मुलांचा जन्म कृत्रिम पद्धतीने होतो. सहाजिकच या समाजा स्त्रिया व पुरुष यांच्या पारंपारिक भूमिकांनिही स्थान उरत नाही.

गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यांमधून ही आई या प्रतिमेकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टीकोन मिळतो. त्यांची "निरगाठी" ही कादंबरी आई व मुलांमधील नाट्याची इतके विविध पदर उलगडून दाखवते की ती त्यांच्या वांड:त्यातील एक उत्कृष्ट कादंबरी ठरावी. मुलींच्या बरोबर सतत चाललेल्या चकमकींनी रंजीस आलेली त्यातील आई म्हणते, "वाटतं असं तरी खरंखुरं कुठे तरी सांगून टाकावं. आई पण हे किती कंटाळवाणं, रिपिटिटिव्ह, जखडून टाकणारं मन-शरीराचा फडशा पाडणारा असतो तेही सांगावं. नुसतीच कौतुक नकोत. की हे सर्व सर्वांना छान ठाऊक असतं म्हणूनच त्यावर कौतुकाचं गुणगानाचं, प्रेमादराचं पांघरूण घालतात?" मुलांचा आई-वडिलांकडे बघण्याचा दृष्टिकोण काय असतो? जन्मदात्या आई बापांना आपला जन्म, रंगरूप या खेरीज कशा कशाबद्दल जबाबदार धरायचं ? आपले दोषदुर्गुण हे "असले आईबाप होते म्हणून" असतात तर आपली थोरवी "असले आई पाप होते तरीसुद्धा" असतो. आत्मपरिक्षण करताना ती म्हणते "आईबापांना काय वाटतं मुलांबद्दल ?" म्हणून "की" "तरीसुद्धा" ? कुणास ठाऊक "इतर" आयांना काय वाटतं? पण मला तरी "तरीसुद्धा" च वाटतं. हा प्रांजळपणाविशेष आहे. त्याच प्रांजळपणे मृत्यूपूर्वी मुलींना ती पत्रात लिहिते, "आमच्या आयुष्यात तुम्ही दोघींनी निव्वळ आनंद निर्माण केला असे जर आम्ही म्हणालो तर तो भोंदूपणा होईल. कारण हे खरे नाही हे आपण तूपण जाणतोच."कमल देसाई यांच्या "भूलावण" या कथेतील उषा ही अपत्य जन्मानंतर आपल्या स्त्रीविषयक साचेबंद आकलनाला धक्का बसेल अशी वागते. गौरी देशपांडे यांच्या "एकेक पान गळावया"या कवितेतील राधा व तिची मुले यांच्यातील संबंधही सलोख्याचे, प्रेमाचे नाहीत. आई व मुले व्यक्ती म्हणून एकमेकांच्या विरुद्ध ध्रुवावर असू शकतात याचाच अनुभव या कथेतून येतो.

वरील सर्व कादंबऱ्या मधील स्त्रियांना स्वत:ची करियर आहे व ती त्यांच्या बुद्धिमत्तेशी, कर्तबगारीशी संबंधित आहे. "एकेक पान गळावया" मधील राधा, "कारावास आतून पत्रे"ची नायिका, "दुस्तर हा घाट" मधील नमू वर्तमानपत्र स्तंभलेखन करतात, त्यांना त्या क्षेत्रात इतरांनी दखल घ्यावी असा मान आहे. "काही दूरपर्यंत" मधील जसू आणि "चंद्रिके ग" मधील सुहास आपापल्या क्षेत्रात आघाडीवर आहेत."काळा सूर्य' ची नायिका प्राॅमीथिअस होण्याची महत्वाकांक्षा बाळगणारी आहे आणि हॅट घालणारी बाई च्या नायिकेला आत्तापर्यंत कोणीही उभारली नाही स्वप्ननगरी उभारण्याचा ध्यास आहे. भारतीय परंपरेतील भहुतांश साहित्यात स्त्रियांची चित्रे घराच्या, कुटुंबाच्या चौकटीत रंगवली जातात. त्यापेक्षा हे वेगळे आहे."फिमेल मॅन मध्ये जुना रसने अगदी मोजक्या शब्दात स्त्री-पुरुषांच्या भूमिकेतील भेद रंगवला आहे.

पुरुष यशस्वी होतात
स्त्रिया लग्न करतात
पुरुष पराभूत होतात
स्त्रिया लग्न करता
पुरुष युद्धे आरंभतात
स्त्रिया लग्न करतात

यश-अपयश, वैराग्य, युद्ध, शांतता ही सगळी क्षेत्रे पुरुषांना दिलेली आहेत. स्त्रियांना दिलेले एकमेव क्षेत म्हणजे लग्न.

रचनेच्या दृष्टीने मात्र इतर वाचकप्रिय कादंबऱ्यां पेक्षा मूलभूत असा काही वेगळेपणा या कादंबऱ्यांमध्ये नाही. आपल्या साहित्याची भाषा ही पुरुषप्रधान आहे. भाषेचे हे पुरुषप्रधान स्वरूप प्रथमत: १९७१ मध्ये जर्मन ग्रिअरने मांडले. भाषेच्या मूळ घडलणीतच पुरुषाला महत्व वअग्रस्थान दिले गेले. त्यामुळे एकूणच समाजातली स्त्रीचे गौण स्थान भाषेच्या माध्यमातून लोक माणसामध्ये दृढ झाले. प्रतिगामी समीक्षकांनी स्त्रियांची भाषा पुरुषांच्या भाषेपेक्षा वेगळी दाखवली आहे. त्यांच्या मते स्त्रियांची भाषा भावनावश, व्यक्तिगत स्वत:ला केंद्रस्थानी कल्पीनारी असते. तर पुरुषांची भाषा मात्र बुद्धिवादी गंभीर विषय मांडण्यास योग्य अशी असते. या कादंबऱ्यांमधून दिसून येणारी भाषा अनावश्यक अलंकार पासून मुक्त आहे. लांबलचक निवेदनाचा किंवा वर्णनाचा पसारा त्यात नाही.

या दोन्हीही लेखिकांच्या कादंबऱ्या विविध संदर्भांनी समृद्ध झाल्या तरी गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील अनेक संदर्भ पाश्चात्त्य जीवनातील आहेत."तेरुओ"ख्रिसमसच्या दिवशी नायिकेला भेटताना, "खिशात मिसल्टो आणायला विसरलो". म्हणने किंवा नकुल ने नमूला दिलेल्या प्रेझेंट ची चेष्टा करताना वनमाळीने "उद्या चांदीच्या चावीच चॉकलेट देईल तो". म्हणने हे त्यापैकी काही त्यांच्या कथांचे क्षेत्र ही स्वदेशाबरोबरच अनेक परदेशांमध्ये विस्तारले आहे. कमल देसाई यांच्या लेखनात येणाऱ्या भारतीय पाश्चिमात्य पौराणिक साहित्य, संत काव्य बायबल मराठी लोकजीवन इत्यादींमधील अनेकविध संदर्भांनी त्यांची भाषा अर्थ समृद्ध झाले आहे.

या कादंबऱ्यांमध्ये काही उणिवाही आहेत. गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्या मध्ये येणारी सर्वच पुरुष अपात्र अत्यंत समजदार आश्वासक वृत्तीची आहेत. कथानक नायिकेच्या अंतर्गत विचारमंथनातून व तिच्या बाह्य जीवनात घडणाऱ्या प्रसंगांमधून घडत असली तरी या पुरुष व्यक्तिरेखांचा त्याला महत्त्वाचा हातभार लागलेला आहे. त्यांच्या व्यक्तिरेखा मात्र पुरेशा स्पष्ट होत नाहीत. नायिकेच्या मध्यमवर्गीय खरेतर कनिष्ठ मध्यमवर्गीय पार्श्वभूमीचे अनेक उल्लेख येतात परंतु अशा परिस्थितीत वाढलेल्या नायिकेचे जडणघडण इतक्या स्वतंत्र व्यक्ती महत्त्वाची कशी झाली हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. कमल देसाई यांच्या कादंबऱ्यांमधून एखाद्या विशिष्ट समाजाचा निर्देश होतो असे नाही, व्यामिश्र अनुभवांचे चित्रण करताना त्यांची भाषा अनेक वेळा दुर्बोध होते.

हेलन सिस्कसने म्हटल्याप्रमाणे स्त्रीवादी संहिता अबोध मनाचे, दबले.ल्या अन्य व्यक्तीमत्त्वाचे प्रकटीकरण करते. हे दबलेले दुसरे अंतरंग शब्दातून प्रकट होण्याची मोकळी संधी ही स्त्रीवादी लेखनाचा पाया आहे. मराठी साहित्य मध्ये ही मोकळी व संधी प्राप्त झाली आहे. भविष्यकाळात या नव्याने बहरू लागलेल्या साहित्य शाखेचा मनोवेधक विस्तार होईल यात शंका नाही.

संदर्भ ग्रंथ:-

१) 'स्त्री लखित मराठी कादंबरी '(१९५० ते २०१०) संपादक- अरुणा, ढेरे पद्मगंधा प्रकाशन पुणे

२) 'स्त्री विषयक कादंबरी' , प्रा. किरण आगतराव जगदाळे, गोदावरी प्रकाशन अहमदनगर

३) 'अर्धे अवकाश' डॉ .अश्विनी धोंगडे दिलिपराज प्रकाशन.

संत जनाबाईचे भावविश्व

डॉ. रवींद्र बेम्बरे

प्रमुख, मराठी विभाग, वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर

'संत वाटिकेतील जाईची वेल' म्हणून मराठी संत परंपरेत संतकवयित्री जनाबाईंचा गौरव करण्यात आला. मध्ययुगीन मराठी संत कवयित्रीमध्ये सर्वाधिक लोकप्रियता संत जनाबाईला लाभली. संत जनाबाईचे अभंग म्हणजे उत्कट अशा भावकविताच आहेत. जनाबाईचे भावजीवन इतर कोणत्याही संत कवयित्रींच्या तुलनेत अधिक उत्कट आणि संपन्न आहे. एक आश्रित स्त्री म्हणून जनाबाईच्या वाट्याला आलेल्या पोरकेपणाचे दुःख, दासी म्हणून राबत असताना करावे लागलेले कष्ट, संत नामदेवांच्या सहवासातून विठ्ठलभक्तीचा जडलेला छंद, विठ्ठलासोबत प्रस्थापित झालेले विविधांगी भावसंबंध संत जनाबाईच्या अभंगातून उत्कटतेने साकारले आहेत. विठ्ठल भक्तीपोटी प्रस्थापित परंपरेची पर्वा न करता पुरुषप्रधान व्यवस्थेविरुद्ध बंड करत स्त्री स्वातंत्र्याचा केलेला पुरस्कार संत जनाबाईच्या अभंगातून साकारलेला आहे. एक स्त्री म्हणून संत जनाबाईच्या अभंगातून साकारलेल्या भावविश्वाचा शोध प्रस्तुत शोधनिबंधात घ्यायचा आहे.

संत नामदेवांच्या घरी दासी असलेली पोरकी जनाबाई आपला पोरकेपणाचा अभाव भरून काढण्यासाठी विठ्ठलास आपल्या जीवनाचे सारसर्वस्व मानते. जनाबाईच्या साडे तीनशे अभंगांपैकी जवळपास दीडशे अभंगात विठ्ठल केंद्रस्थानी आहे. तिचे अवघे भावजीवन विठ्ठलानेच व्यापल्याचे दिसते. "माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ।। मी तुझे गा लेकरु । नको मजशी अव्हेरु ।।"[०१] अशी हृदयस्पर्शी याचना ती करते. माय बाप नसल्यामुळे आपला कैवार विठ्ठलानेच घ्यावा अशी आर्त हाक ती देते. तुझ्याशिवाय इथे मला कोणीच नाही असा पोरकेपणाचा आर्तभाव विलक्षण व्याकुळतेणे प्रकट करते. अवघ्या जगाचा पिता असलेल्या विठ्ठलाचे कृपाछत्र लाभले तर आपले पोरकेपण संपायला वेळ लागणार नाही, ही तिची श्रद्धा आहे. म्हणून विठ्ठलाकडे ती पुन्हा पुन्हा विनवणी करते. स्वतःच्या पोरकेपणाचा आधार घेऊन विठ्ठलाचे प्रेम मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न करते. जनाबाईला आठवावा असा भूतकाळ नाही, रमावे असे वर्तमान नाही, आत्मसमर्पण करावे असा भविष्यकाळ मात्र आहे. "देवाला आळविताना जनाबाईच्या वाणीत असाधारण आर्तता आणि कमालीची अधीरता प्रकट झालेली आहे."[०२] विठ्ठल म्हणजे हरिणी आपण तिचे पाडस असा भावप्रकट करत परमेश्वर भेटीची उत्कंठा जनाबाईनी व्यक्त केली आहे. "माझि ये जननी हरिणी । गुंतलीस कवणे वनी । मुके तुझे मी पाडस । चुकले माये पाहे त्यास । चुकली माझि ये हरिणी । फिरतसे रानोरानी । आता भेटवा जननी । विनवितसे दासी जनी ।।"[०३] विठ्ठलाबद्दलची ओढ व्यक्त करत असताना संतजनाबाई येथे वात्सल्य भावाचा आधार घेते. "वत्सल रस हा भक्तीच्या आविष्कारास पोषक असून त्याचे दर्शन जनाबाईच्या कवितेत ठाईठाई घडते."[०४] जनाबाईचे वात्सल्य वंचित जीवन तिच्या अनेक अभंगातून प्रतिबिंबित झाले आहे. उत्तम भावकाव्याला आवश्यक असलेली भावनेची उत्कटता, आविष्कारातील सहजता आणि भाषेतील प्रासादिकता हे विशेष जनाबाईच्या अभंगात पदोपदी आढळतात.

पोरकी जनाबाई विठ्ठलामध्येच आपले माहेर पाहते. वडील, आई, छोटा भाऊ, पोटचा मुलगा, बाल सवंगडी, प्रियकर अशा विविध नात्यातून ती विठ्ठलाकडे पाहते. त्याच्याशी वेगवेगळा संवाद प्रस्थापित करते. त्यातून शाश्वत नात्याचा अखंडितपणे शोध घेते. विठ्ठलास मानवी पातळीवर उतरण्यास भाग पाडून त्याचे मानवीकरण केल्यामुळे जनाबाईचा विठ्ठल लौकिकातील सामान्य माणसासारखा दिसतो. वास्तव सत्याचा धागा न सोडता मानवी रूपातील विठ्ठला सोबत ती संवाद साधते. देवाला आळविताना जनाबाईच्या वाणीत कमालीची आर्तता आणि अधीरता प्रकट झालेली आहे. "ये गं ये गं विठाबाई । माझे पंढरीचे आई ।।"[०५] अशी मातृत्वाची हाक देते. विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी आपलेकाम सोडून त्याच्या मंदिरात न जाता त्यालाच आपल्याकडे बोलावते. "दळीता कांडीता । तुज गाईन अनंता ।। मायबाप बंधुबहिणी । तूं बा सखा चक्रपाणी ।।"[०६]असेतीम्हणते. विठ्ठलाशिवाय तिला क्षणभरही जगणे शक्य नाही. जनाबाईच्या ध्यानी, मनी आणि स्वप्नी विठ्ठलाचा ध्यास

आहे. विठ्ठल हाच जनाबाईच्या मानाचा विसावा आहे." जनाबाईची काव्यरचना अतिशय आत्मनिष्ठ असल्यामुळे त्यामध्ये आपले अंतरीचे उमाळे त्यांनी शब्दांकित केले आहेत."[०७] जनाबाई मनाने पूर्णतः विठ्ठलाशी तादात्म्य पावलेली आहे. म्हणून "देव खाते देव पिते । देवावरी मी निजते ।।"[०८] अशी कबुली ती देते. तिचेआवघे भावजीवन विठ्ठलाने व्यापलेले आहे. विठ्ठल हाच जनाबाईचा श्वास आणि ध्यास असल्याचे पाहायला मिळते.

जनाबाई ज्या विठ्ठलाच्या भेटीसाठी व्याकुळ होऊन वाट पाहते, अखेर तो आपल्या हृदयातच सापडल्याची अनुभूती उत्कटतेने व्यक्त करते. ही अनुभूती म्हणजे तिचे देहपालटच आहे. या अपूर्व अनुभूतीने जनाबाईचे मन चैतन्याने न्हावून निघते. "देहाचा पालट विठोबाचे भेटी। जळ लवणा गाठी पडोन ठेली ।।"[०९]जळात अखंड लवण व लवणात जळ अशी ही विठ्ठल जनाबाईची ऐक्यावस्था आहे. दोघांनाही आता एकमेकांपासून सुटका नाही. भक्तांना मोहिनी घालून आपल्या प्रेमपाशात गुंतवणारा देव, अशी ख्याती असलेल्या विठ्ठलास जनाबाई भक्तीच्याबळावरआपल्यात गुंतवते. आपल्या हृदयाच्या बंदिखान्यात भक्तांचे हृदय चोरणाऱ्या विठ्ठलाला बंदीस्थ करते. "धरिला पंढरीचा चोर । गळां बांधोनिया दोर ।। हृदय बंदिखाना केला । आंत विठ्ठल कोंडीला ।। शब्दें केली जवाजुडी । विठ्ठल पायीं घातली बेडी ।। सोहं शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुळतीस आला ।। जनीं म्हणे बा विठ्ठला । जीवें न सोडी मी तुला ।।"[१०] आपल्याहृदयात बंदिस्तकेलेल्याविठ्ठलास जिवंत बाहेर न सोडण्याचा निर्धार ती बोलून दाखवते. विठ्ठलाच्या हृदयात स्थान मिळवण्यासाठी आजपर्यंत सर्व संताची धडपड होती. पण जनाबाईचे मात्र नेमके उलटे आहे. ती आपल्याच हृदयात विठ्ठलाला बंदिस्त करते. जनाईच्या हृदयात राहण्यात विठ्ठलासही धन्यता वाटते. यातून जनाबाईचा पारमार्थिक अधिकार लक्षात येतो. चिंतन परताव अंतर्मुख वृत्तीमुळे त्यांच्या अभंगात आर्तता व उत्कटता सहजपणे प्रकट झाली आहे." जनाबाईच्या भावसंपन्न व्यक्तिमत्त्वाची वाङ्मयीन मूर्ती म्हणजेच त्यांची भाव सुंदर अभंग वाणी होय."[११] हे डॉ.रा. चिं. ढेरे यांचे विधान जनाबाईच्या अभंगा संदर्भात अर्थपूर्ण ठरते.

संत जनाबाईच्या प्रेमपाशात गुंतलेला विठ्ठल तिच्या सोबत सावलीसारखा वावरत असल्याचे ती सांगते. हृदयस्त विठ्ठल तिच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेलाआहे. आपल्या दासी कामात मदतनीस म्हणून विठ्ठल काम करीत असल्याची अनुभूती ती प्रकट करते. "झाडलोट करी जनीं । केर भरी चक्रपाणी ।। पाटी घेऊनि डोईवरी । नेऊनिया टाकी दुरी ।।"[१२] जनाबाईच्या प्रेमापोटी तो हलकी सुलकी कामे करू लागतो. आपला जिवाभावाचा मित्र म्हणूनही जनाबाई विठ्ठलाकडे पाहते. देव म्हणून त्याचा कोणताही दुरावा किंवा दडपण तिच्या मनावर नाही. "दळूं कांडुं खेळूं । सर्व पाप ताप जाळू ।। सर्व जीवमध्ये पाहूं । एक आम्ही होऊनी राहूं ।। जनी म्हणे ब्रह्म होऊ । ऐसें सर्वाघटी पाहू ।।"[१३] असे ती विठ्ठलास म्हणते. खेळता खेळता जगातील पाप ताप जाळू, आपण एक होऊन जगात अद्वैत्त प्रस्थापित करू, ब्रम्हरुप होऊन ब्रम्हानंदाच्या आनंदात न्हाऊन निघू, असे ती स्वप्न रंगवते. यातून विठ्ठलासोबतच्या मैत्रीचे प्रयोजनच ती सांगते. अखंडित सानिध्यातून तिला विठ्ठलाचा अंत लागला आहे. म्हणून ती विठ्ठलास भीत नाही. विठ्ठलाच्या अंगणात थांबून त्याला जनाबाई शिव्याची लाखोली वाहते. मायेचा भुकेला असणाऱ्या विठ्ठलास माय बाप नाहीत. तो अविनाशी असल्याने त्याची पत्नीही जन्म सावित्री चुडे धारण करणारी आहे. काळाचे प्रतीक असणारा मृत्यूही त्याच्यासमोर हतबल होऊन रडतो. म्हणून त्याला अपशकुनी ठरवूनती शिव्या देते. जनाबाईच्या शिव्या वस्तुस्थितीला धरून असल्याने विठ्ठल निमूटपणे ऐकतो. "अरे विठ्या विठ्या। मूळ मायेच्या कारट्या ।। तुझी रांड रंडकी जाली । जन्मसावित्री चुडा ल्याली ।। तुझे गेले मढे । तुला पाहून काळ रडे ।। उभी राहुनी अंगणी । शिव्या देत असे दासी जनीं ।।"[१४]या शिव्यामध्ये तिरस्कार नसून प्रेम आणि जिव्हाळा आहे. येथे जनाबाई विठ्ठलाकडे अपत्यभावाने पाहते.

तारुण्यात पदार्पण केल्यानंतर जनाबाईला स्त्रीत्वाची चाहूल लागते. मनात तारुण्यसुलभ प्रेमभाव अंकुरतात. जनाबाई निसर्गदत्त भावनांना दाबून न ठेवता विठ्ठला सोबत संवाद साधून मोकळी होते. आपल्या तरुण मनातील प्रणयभावाच्या पूर्तीसाठी श्रीकृष्णरूप विठ्ठलास ती प्रियकराच्या रूपात पाहते. "विठोबा चला मंदिरात । गस्त हिंडती बाजारात।। रांगोळी घातली गुलालाची । शेज म्या केली पुष्पाची।।"[१५] अशी आळवणी ती करते. या अभंगातील शृंगारिक प्रतिमातून जनाबाईच्या

मनातील उत्कट प्रणयभाव विलक्षण बेधडकपणे प्रकटले आहेत. स्त्रीच्या भावविश्वातील विविध टप्पे अगदी सहजपणे जनाबाईच्या अभंगातून साकारले. जनाबाईच्या अभंगात स्त्रीत्वाची जाणीव ही ओझे बनून येत नाही, तर ते अभंगलेणे म्हणून मिरवीत येते. स्त्रीसुलभ भावनांचा उत्कट आणि रम्य आविष्कार म्हणजे जनाबाईची अभंगवाणी आहे. या अभंगाचे आत्मतत्व मात्र विठ्ठलच आहे.

विठ्ठल भेटीच्या अधीर ते पोटी जनाबाईनी सुसंस्कृत पणाचे सभ्यतेचे शिष्टाचाराचे सगळे संकेत धुडकावून दिले आहेत. पंढरीच्या बाजारात तिने आपली पाल मांडली आणि निर्लज्जपणे केशवाच्या घरी जायला निघालेली आपण एक वेश्या आहे, असे ती बेधडकपणे सांगते. "डोईचा पदर आला खांद्यावरी ।भरल्या बाजारी जाईन मी।"[१६] या अभंगातून जनाबाईंनी स्त्री स्वातंत्र्याचा पहिला उद्घोष केला आहे. स्त्रीच्या गुलामगिरीची परंपरा मोडीत काढून स्त्री स्वातंत्र्याच्या दृष्टीने वाटचाल करण्याच्या भूमिकेतून भरल्या बाजारात जाणार असल्याचा निर्धार ती व्यक्त करते. कोणालाच घाबरणार नाही. विठ्ठलापुढे मला जनरीतीची पर्वा किंवा भीती नाही. हातात टाळ घेईन, खांद्यावर वीणा घेईन मग मला मनाई करणार ?, तेव्हा माझी ही कृती आणि माझे स्वातंत्र्य ज्यांना सहन होत नाही, त्यांनी खुशाल मनगटावर तेल घालून बोंबला किंवा ओरडा मला त्याची अजिबात पर्वा नाही, असे जनाबाई म्हणते. या संदर्भात डॉ. अ. मी पंढरीच्या पेठेत पाल मांडलेली दिसेल, तेव्हा माझी ही कृती आणि माझे स्वातंत्र्य ज्यांना सहन होत नाही, त्यांनी खुशाल मनगटावर तेल घालून बोंबला किंवा ओरडा मला त्याची अजिबात पर्वा नाही, असे जनाबाई म्हणते. या संदर्भात डॉ.अ. ना. देशपांडे लिहितात, "सर्वकृत्रिमव निरर्थक स्वरूपाच्या सामाजिक संकेताच्या पलीकडे असलेली अशी जी धुंद बेभान तल्लीन अवस्था, तिच्या अनुभवात रंगल्या शिवाय ईश्वरी साक्षात्कार होणे अशक्य आहे. या अलौकिक अवस्थेचा जनाबाईला आलेला अनुभव हा तिचे ईश्वर विषयक प्रेमाचे नाणे अस्सल असल्याचा निदर्शक आहे."[१७] तेराव्या शतकात जनाबाईंनी आपल्या अभंगातून अशा रीतीने मांडलेले चिंतन म्हणजे स्त्री स्वातंत्र्याची वारकरी साहित्यातील ही घोषणा आहे.

स्त्रीकडे पाहण्याची जी सनातन मानसिकता आहे, त्याला जनाबाई धुडकावून लावते. स्त्रीजन्माबद्दल खंत का करायची ? असा प्रश्न ती उपस्थित करते. "स्त्रीजन्म म्हणुनी का व्हावे उदास । साधुसंता ऐसे केले जनी ।।"[१८] आपल्या वाट्याला स्त्रीचा जन्म आला म्हणून आपण उदास आणि निराश होऊ नये. असेच साधुसंतांनी सांगितले असल्याचे प्रमाण जनाबाई देते. स्त्रीजातीचे मनोधैर्य उंचावून तिच्या मनातला आशावाद जागवण्याचा प्रयत्न जनाबाई करते. अशाप्रकारे जनाबाईची अभंगवाणी म्हणजे तिच्या समृद्धभाव विश्वाची नितांत सुंदर लेणीच आहे. या दृष्टीने डॉ. ल.रा. नसिराबादकर यांचे पुढील विचार महत्त्वाचे ठरतात. "स्त्री मनाचा हळुवारपणा आणि भक्तीची उत्कटता त्यांच्या सर्व अभंगांमध्ये ओथंबलेली दिसते. परमेश्वर प्राप्तीची तळमळ आणि आर्तता यांतून त्यांच्या बऱ्याचशा अभंगांचे लेखन झालेले आहे. त्यामुळे त्यांचे अभंग म्हणजे उत्कट भावगीतांची मालिका वाटते."[१९] स्त्री मनाचा हळुवारपणा आणि भक्तीची उत्कटता जनाबाईच्या अभंगांमध्ये ओथंबलेली दिसते. त्यांचे अभंग म्हणजे उत्कट भावगीते ठरतात.

निष्कर्षात्मक समारोप:

संतजनाबाईच्या अभंगातून निर्भय, धाडसी, कणखर आणि कनवाळू मनाचा सहजाविष्कार झालेला आहे. विविध पातळीवर तिचे विठ्ठलाशी प्रस्थापित झालेले नाते अभंगातून उत्कटतेने व्यक्त झाले. संत जनाबाई आपल्या पोरकेपणाची उणीव भरून काढण्यासाठी विठ्ठलामध्ये आई-वडील पाहते. विविध नाते ती विठ्ठलामध्येच शोधते. आपले दु:ख ती विठ्ठलासउद्देशूनच व्यक्त करते.विठ्ठल हाच जनाबाईच्या जीवनाचा विसावा आहे. आपल्या मनातील विठ्ठलाबद्दल तीव्र ओढ प्रकट करत असताना विठ्ठलहरिणअसून आपण तिचे पाडस आहोत असा भाव ती प्रकट करते. माहेर हा स्त्रीच्या भावजीवनातला जिव्हाळ्याचा विषय असतो पण जनाबाई पोरकी असल्यामुळे तिला माहेर नाही. म्हणून ती विठ्ठलामध्येच आपला माहेर शोधते. विठ्ठलास मानवी पातळीवर आणत वडील, आई, छोटाभाऊ, मुलगा, बाल सवंगडी, प्रियकर अशा विविध नात्यातून ती विठ्ठलाकडे पाहते.

जनाबाईच्या ध्यानी, मनी आणि स्वप्नी विठ्ठलच आहे. यामुळे विठ्ठल मंदिरात वेगळे जायचे तिला गरज वाटत नाही दळण कांडण करत असताना अविरतपणे विठ्ठलाचे नामस्मरण करत असल्याचे ती सांगते. विठ्ठलाच्या ध्यानात एकरूप झाल्याने विठ्ठलासोबत तादात्म्य पावल्याचा भाव जनाबाईच्या अभंगातून प्रकटला आहे. भक्ताचे हृदय चोरणाऱ्या विठ्ठलासच जनाबाई आपल्या हृदयात जेरबंद केल्याची ग्वाही देते. आपल्या प्रेमात गुंतलेला विठ्ठल स्वतःचा मोठेपणा विसरून आपल्या दासी कामात पदोपदी मदत करत असल्याचे जनाबाई सांगते.विठ्ठला सोबत तादात्म्य पावल्यामुळे विठ्ठलाचे कोणतेही दडपण किंवा दुरावा जनाबाईच्या मनात नाही. मनाने सदैव विठ्ठलाच्या निकट असल्यामुळे त्याचा पूर्ण अंत आपल्यालालागल्याचीग्वाहीती देते. विठ्ठला सोबतचे निकटत्व आणि त्याच्यावरील अधिकारामुळे त्याच्या अंगणात उभी राहून शिव्या देण्याचे धाडस जनाबाई करते. तारुण्यात पदार्पण केलेली जनाबाई विठ्ठला मध्येच प्रियकर पाहून आपल्या मनातील प्रेमभाव त्याला उद्देशून सरळपणे प्रकट करते. विठ्ठल भेटीच्या अधीरते पोटी जनाबाईनी रूढ पुरुषप्रधान संस्कृती आणि शिष्टाचाराचे सगळे संकेत धुडकावून देत विठ्ठलापर्यंत पोहोचण्याचा निर्धार प्रकट करते. विठ्ठल भक्तीसाठी पुरुषप्रधान परंपरेस छेद देत स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करते. स्त्रीचा जन्म मिळाला म्हणून उदास न होता आत्मविश्वासाने आपली पारमार्थिक वाटचाल केली पाहिजे हा संदेश जनाबाई तमाम स्त्री जातीला देते. संत जनाबाईच्या अभंगातून स्त्रीचे समग्र भावविश्व साकारले आहे. उत्कंठा, उत्कटता, आर्तता, अनुताप व तृप्ती हे उत्तम भावकाव्याचे विशेष जनाबाईच्या काव्यात पदोपदी आढळतात.

संदर्भ सूची :-

१) संत जनाबाई : उदधृत, संत नामदेवांची अभंगगाथा, संपादन प्राचार्य निवृत्तिनाथ रेळेकर, ह. भ. प. श्री.धो.ए.गोंदकर, इचलकरंजी, प्रथमावृत्ती १९९९अ. क्र.५२ पृष्ठ७७२.

२) अ.ना. देशपांडे : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे. द्वितीय आवृत्ती १९९६.पृ.१५०.

३) संत जनाबाई : उदधृत, संत नामदेवांची अभंगगाथा,उनी,अ. क्र.६५पृ.७७५.

४) हेमंत ईनामदार : संत जनाबाई : एक भावसंपन्न व्यक्तिमत्व, संत जनाबाई चरित्र व काव्य, चिटणीस, संत जनाबाई शिक्षण संस्था, गंगाखेड. अमोल प्रकाशन,पुणे. प्रथमावृत्ती १९७६. पृ.१४

५) संत जनाबाई : उदधृत, संत नामदेवांची अभंगगाथा,उनी, अ. क्र. ३०,पृ.७६९.

६) तत्रैव, अ. क्र२०७,पृ.८०१

७) हेमंत ईनामदार : संत जनाबाई : एक भावसंपन्न व्यक्तिमत्व, उनी, पृ.०८.

८) तत्रैव, अ. क्र१९३,पृ.७९९.

९) तत्रैव, अ. क्र.१०६,पृ.७८२.

१०) तत्रैव, अ. क्र१९६,पृ.७९९.

११) रा.चिं. ढेरे : जनाबाईची कविता , संत जनाबाई चरित्र व काव्य, उनी, पृ.२१.

१२) तत्रैव, अ. क्र. ७५,पृ.७७७.

१३) तत्रैव, अ. क्र. .१८१,पृ.७९६.

१४) तत्रैव, अ. क्र.१०१, पृ.७८१.

१५) तत्रैव, अ. क्र. १५३,पृ.७९१.

१६) तत्रैव, अ. क्र. २२७,पृ.८०४.

१७) अ.ना. देशपांडे : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग दुसरा,उनीपृ.१५१

१८) संत जनाबाई : उदधृत, संत नामदेवांची अभंगगाथा,उनीअ. क्र.१७८ पृ.७९६.

१९) ल.रा. नसिरा बादकर : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर,अकरावी आवृत्ती२०१६.पृ.१०१.

सानिया यांचे कथनपर साहित्य : स्त्रीच्या आत्मभानाचा प्रगल्भ प्रवास

डॉ. माधुरी पाथरकर

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे

१९८० नंतरच्या दोन दशकांमध्ये भारतातील समाजजीवन आमूलाग्र बदलले. झपाट्याने पसरणारी शहरीकरणावर आधारित जीवनपद्धती आणि माणसांचे परस्परांशी आणि समाजव्यवस्थेशी असणारे नाते यातील द्वंद्व हा या बदलाचा मूलभूत घटक म्हणता येईल. या सर्व बदलांच्या पार्श्वभूमीवर भारतीय समाजव्यवस्थेतील विविध घटकांमध्ये स्थूल आणि सूक्ष्म पातळीवर घडणाऱ्या स्थित्यंतराचा वेध अनेक स्त्री-लेखकांच्या साहित्यामध्ये घेतलेला दिसतो. याच काळातील महत्त्वाची स्त्री-लेखक सानिया आहेत. सानियाच्या कथा-कादंबऱ्यांमध्ये व्यक्ति-व्यक्तींमधील नात्यांचा शोध, कुटुंबसंस्था, लग्नसंस्थेइतकेच परस्पर मैत्र-संबंध पुनरावृत्त झालेले आहेत. किंबहुना हे त्यांच्या कथा-कादंबऱ्यांचे बलस्थान आहे. सानियाच्या मते, 'मानवी नाती हा तर मनुष्यजीवनाचा गाभा आहे. त्यामुळे मर्यादा ही जगण्याची नसते. विचारांची व आकलनाची असते... मी अनेक नात्यांचा शोध घेत आले. त्यांच्या आधारेच बऱ्याचदा स्त्रीप्रतिमा स्वत्त्वाचा शोध घेतात.' या शोधनिबंधात सानिया यांच्या निवडक कथा आणि कादंबऱ्यांच्या संदर्भात त्यांच्या स्त्रीप्रतिमांच्या सामान्यातील असामान्यतेचा विचार करणार आहे.

एकोणिसशे ऐंशीनंतर समाजात सर्वच पातळ्यांवर झपाट्याने बदल होत होते. स्त्रीजीवनही बदलत होते. स्त्रीया शिक्षणक्षेत्रात, तंत्रज्ञान क्षेत्रात तसेच जीवनाच्या अनेक क्षेत्रात उच्चपदे भूषवित होत्या, उच्चशिक्षण घेत होत्या. वैद्यकीय, संशोधन क्षेत्रातही त्या सक्रीय होत होत्या. त्यांच्या सर्वांगीण विकासाला पोषक असे वातावरण त्यांना दिसत होते. आपल्या क्षमता आजमावण्याची नवी क्षितीजे त्यांना दिसत होती. सत्तरच्या दशकापासून स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ महाराष्ट्रात चालू होती. त्याचे अनेक पैलू स्त्रीमनाला कळत होते. त्याचा प्रभाव सानियाच्या काही स्त्रीपात्रांवर दिसून येतो. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतील स्त्रीपात्रे ही बुद्धिमान, सारासार विचार करणारी, निर्णयक्षमता असलेली, उच्चविद्याविभूषित आहेत. त्यामुळे अनेकदा चौकटीबाहेरचे निर्णय ही पात्रे सहज घेताना दिसतात आणि इतकेच नाही तर पेलवतानाही दिसतात. *आमंत्रण* कथेमधील सरिता आपल्या मुलीला नवरा जयतीर्थकडे उच्चशिक्षणासाठी जसे पाठवते, तसेच सुरुवातीला त्याच्याशिवाय एकटीने तिला सांभाळण्याचाही निर्णय घेते. हे करत असताना तिच्या मनात वडिलांविषयी कोणतीही कटुता निर्माण होणार नाही अशा पद्धतीने अतिशय सहजभावाने मुलीला वाढवते. *प्रवास* कथेमधील सावित्री पारंपरिक साच्यातील आई होणं विचारपूर्वक नाकारते. वास्तविक तिला मूल नको असणं हा निर्णयही ती बोलून दाखवते. म्हणजे सर्वसाधारणपणे स्त्रीला मातृत्वामध्ये जी जीवनाची फलश्रुती दिसते ती या स्त्रीपात्रांना वाटत नाही. हे परंपरागत स्त्रीप्रतिमेला छेद देणारे आहे. याच्याउलट *स्थलांतर* कादंबरीतील मिनाक्षीला वैवाहिक जीवनात येणारा शारीरिक प्रणयसुद्धा गर्भाशयात रूजवायला जीव हवा म्हणून हवा असतो. लग्नाचा हाच हेतू तिला दिसतो. मातृत्वाचा सर्जनाच्या पातळीवरचा अनुभव घेण्यापेक्षा वेळ चांगला जाईल म्हणून मिनाक्षीला मूल हवे आहे. हा अपारंपरिक विचार निवेदक सांगते. परंपरागत विचारमूल्यांचा दबाव, ताण या स्त्रीप्रतिमा स्वतःवर घेत नाहीत. त्या आपल्या मनाला आणि विवेकबुद्धीला पटतील त्या निर्णयांवर ठाम राहतात. तर *स्थलांतर* कादंबरीतील नंदिता स्वतः सोडलेल्या नवऱ्याचा, शंतनूच्या मुलाचा गर्भ त्याला न सांगता पाडण्याचा निर्णय घेते. *आवर्तन* कादंबरीतील सुरुची श्रीरंगबरोबर लग्न न करता राहण्याचा निर्णय घेते, तो श्रीरंग सुचवतो म्हणून नाही तर तिला स्वतःला पटल्यावरच. पण मनात खोल प्रश्नचिन्ह ठेवून. तसेच जगदीशचा कौल घेऊन *स्थलांतर*मधील नंदिता विश्वंभरशी दुसरं लग्न करण्याचा निर्णय घेते. आणि *अवकाश* कादंबरीतील जान्हवीही आपल्या पहिल्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर अनेक वर्षांनी पहिल्या नवऱ्याच्या मुलाच्या-कार्तिकच्या इच्छेखातर सदाशिवशी दुसरे लग्न करण्याचा निर्णय घेते.

या सगळ्या नायिका आजच्या काळातील वाटतात. त्या सभान आहेत, विचारी आहेत, सुशिक्षित आहेत. त्या समाजव्यवस्था नाकारत नाहीत पण समाजव्यवस्थेच्या चौकटीत राहून त्या आपल्या आयुष्याचे निर्णय पूर्ण विचारांती घेतात. *आवर्तन*मधील सुरुची श्रीरंगशी लग्न न करता एकत्र राहण्याचा निर्णय घेते पण तिच्या मनात असंख्य ताण आहेत. ती तिच्या आजीला – नीनीला याबद्दल काहीही कळवत नाही. कारण तिच्याशी असलेले रक्ताचे बंध तिला तोडायचे नसतात. पण श्रीरंगच्या अपघाती मृत्यूनंतर ती परत तिच्याच कुशीत जाते. *अवकाश* मधील जान्हवी राघवनबरोबर असलेले कोरडे वैवाहिक जीवन निभावतच असते. भावनिक ओलावा नसलेले वैवाहिक जीवन तिने प्रगल्भतेने स्वीकारलेले असते. वास्तविक तिचे सुदर्शनवर प्रेम असते व त्या दोघांना लग्न करायचे असते. पण कौटुंबिक कारणामुळे ते शक्य होत नाही तेव्हा ती व्यवस्थाशरण होऊन चाकोरीतला संसार करण्याचा निर्णय घेते. कारण तिच्यासमोर दुसरा पर्याय नसतो आणि सर्वच नाकारून तिला स्वतंत्र वाट चोखाळायची नसते. आजूबाजूला अशा स्त्रिया आपल्याला दिसतात. त्या व्यवस्थेच्या विरोधात जाऊन चौकटीबाहेरची वाट निवडत नाहीत. याचा अर्थ त्या कमकुवत असतात असे नाही. त्यांच्यात विचारक्षमता आणि निर्णयक्षमता असते, पण

त्याची जाणीव त्यांना झालेली नसते. एका निर्णायक क्षणी त्या व्यवस्थेच्या विरोधात निर्णय घेतात, मात्र त्यांच्या मनातील 'स्व'ची ओळख ही त्यांना करून द्यावी लागते. कारण त्या समाजाचा, नात्याचा उभा आडवा विचार करतात. त्या फक्त स्वतःचाच विचार करत नाहीत तर एकंदर मानवी नातेसंबंधाचाही तितक्याच सखोल विचार करतात. त्यामुळे ठाम निर्णयापर्यंत पोहोचण्याच्या त्यांच्या प्रवासात त्या जास्त प्रगल्भ होत जातात. सानियाच्या कादंबऱ्यातील स्त्रीयांचा विकास एक व्यक्ती म्हणून होतच असतो. त्यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन त्यांच्या प्रत्येक कृती-उक्तीतून वहात असतो. *चार दिवस* कथेतील वसुंधरा आपली सून केतकीची क्षमता ओळखून संपूर्ण कुटुंबाच्या विरोधात जाऊन तिच्या पाठीशी उभी राहते. *स्थलांतर* कादंबरीमधील नंदिता भाची, मुलगी म्हणून जशी दिसते, तसाच तिचा व्यक्ती म्हणून होणारा विकास निवेदक सूक्ष्मतेने दाखवते. सावित्री ही बहीण, आई या भूमिकांबरोबरच एक सक्षम, सुजाण स्त्री म्हणून दाखवण्यात निवेदकाला यश आले आहे. तसेच *आवर्तन* कादंबरीतील सुरुची तटस्थपणे कमला, प्रदीप यांचा आई-वडील या भूमिकांच्या पलिकडे जाऊन विचार करण्याचा प्रयत्न करते. *स्त्रोत* कथेतील किशोरी तिचा नवरा आपल्या कार्यक्षेत्रात मश्गुल आहे हे लक्षात येताच रडत न बसता स्वतःचे जग निर्माण करते. तसेच गुरूस्थानी असलेल्या भगत सरांमध्ये झालेला बदल लक्षात येताच त्यांच्यावरील एकेकाळी असलेल्या भक्तीचा बुद्धिप्रामाण्यवादी विचार करण्याचे नुसतेच धाडस दाखवत नाही, तर त्यांना ती कटुताही निदर्शनास आणून देते. ही पात्रे जगताना थोडे तटस्थपणे सभोवतालच्या गोष्टींचा, नात्यांचा विचार करताना दिसतात. *प्रवास* या कथेतील सावित्री आई असूनही नंदिताकडे मोकळ्या भूमिकेतून पाहते व ती मोठी, जाणती होण्याची धीराने, संयमाने वाट पाहते. *चार दिवस* कथेतील वसुंधरा केतकी आणि रजनी दोघींचाही स्वतंत्रपणे सम्यक विचार करू शकते. *दुसरं घर* कथेतील साधना माईचा, दादांचा आणि मुक्ताचा पुन्हा नव्याने विचार करत उत्तराच्या दिशेने प्रवास सुरू करते. *खिडक्या* कथेतील सुमा एका वेगळ्या पद्धतीने आपल्या वडिलांच्या पद्मनाभच्या प्रत्येक शब्दावर, साहित्यावर हक्क सांगते आणि जयंतीला तिच्यातील वेगळीच चमक दिसते. या साऱ्यांतूनच चिंतनात्मकता हा सानियांच्या कथा-कादंबऱ्यांचा आत्मा असलेला दिसतो.

सानियांच्या कथा-कादंबऱ्यांमध्ये नातेसंबंधाची अ-पारंपरिक रूपे ठळकपणे दिसतात. *प्रवास* कथेतील सावित्री-नंदिता यांच्यातील आई-मुलीचे नाते हे प्रस्थापित समाजचौकटीच्या विरूद्ध आहे. त्यांच्यात टिपिकल नात्याऐवजी कायम वादच होत असतात. या मायलेकींचे भावबंध कधीच जुळत नाहीत कारण सावित्रीला आईच्या भूमिकेमध्ये थांबायचं नसतं. पण शेवट समोर दिसू लागल्यावर मात्र ती नंदिताच्या जवळ जाण्याचा अटोकाट प्रयत्न करते. अशावेळी जगदीश त्या दोघींमधील हे अंतर मिटवून टाकण्याचा प्रयत्न करतो. एक व्यक्ती म्हणून सावित्रीकडे पाहणं कसं आवश्यक आहे हे नंदिताला पटवून देतो. याच कथेचे विकसीत रूप *स्थलांतर* कादंबरीत पाहायला मिळते. नंदिता-सावित्री या दोघींचे नाते प्रारंभी विसंवादी पण रूढ नाही. निवेदकाच्या म्हणण्यानुसार, आईची सर्व कामे बाबाच करायचे. (पृ.५७) आईच्या अलिप्त वाटण्यामुळे प्रारंभी आईबद्दल असुया वाटते पण नंतर मात्र ती आई कळली आहे असे म्हणत आईशी जोडली जाते. जे नाते जगदीश-सावित्रीचे असते तेच कादंबरीच्या अखेरच्या टप्प्यावर नंदिता-सावित्रीचे निर्माण झालेले दिसते. *दुसरं घर* मधील साधना माईचा आई म्हणून विचार करते तर माई साधनाला स्वतःच्या वैवाहिक जीवनाविषयी मौन ठेवायला सांगते. कारण तिने ते वैवाहिक जीवन स्वीकारलेलं असतं. *अवकाश* कादंबरीतही प्रारंभी जान्हवी-अम्माच्या नात्यात पारंपरिक विसंवादी सूर मुलीच्या काळजीपोटीच असतो आणि जान्हवीलाही त्याचा स्वाभाविक राग येतो. पण स्वतःच्या आयुष्याच्या उत्तरार्धात जान्हवी आपल्या आईला समजणाऱ्या 'तामिळ' भाषेत कादंबरी लिहिते आणि सर्जनाच्या पातळीवर आईची भूमिका समजून घेण्याचा प्रयत्न करते. सानियांच्या साहित्यात नात्यांचे अनेक आकृतिबंध नव्याने दिसतात त्यापैकी आई-मुलगी यांच्यातील नाते ती विविध अंगाने चितारते. त्यांच्या कथनपर साहित्यांतील सरिता आणि निशी, जान्हवी-अम्मा, नंदिता-सावित्री अशा अनेक जोड्या आपल्याला तपासता येतील.

त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतील स्त्रीपात्रे अपारंपरिक जगताना दिसतात. *स्त्रोत* कथेतील किशोरी, तिचा नवरा काय करतो, कुठे जातो हे माहीत असण्याचं काही कारण नाही हे ती सहजपणे भगत सरांना सांगते. हे सांगताना कोणतीही कटुता किंवा पत्नी म्हणून काही खिन्नता नसते. नवरा राजकारणात व्यग्र असल्याने ती मनापासून हे मान्य करते की, "फक्त माझं मी निराळं वैभव, नवीन जग उभं करायला शिकले." हा बदल स्वतःत घडवून आणताना कदाचित तिला प्रयास पडले असतील पण आता ती 'तिच्या' जगात मजा घेत जगते. त्याची तिला नशा आलेली आहे. सानियांच्या कथेतील नायिका या दृष्टीने विशेष आहेत. प्रारंभी त्या चाकोरीतलं जीवन जगत असतात, पण ती चाकोरीबद्ध वाट सोडून स्वतःची वाट निर्माण करून त्यावरून चालण्याची प्रगल्भता आणि धारिष्ट्य त्यांच्या ठायी त्या विकसीत करतात. हा प्रवासच त्यांना वेगळं करतो. *चार दिवस* कथेतील वसुंधराला जेव्हा आपल्या मुलाच्या कुवतीपेक्षा सुनेच्या बुद्धिमत्तेची साक्ष पटते तेव्हा संपूर्ण कुटुंबाच्या विरोधात जाते आणि केतकीला, "तू पुढं जा, मिळून नाही जमलं. तर एकटीनंच जा. माझा तुला पाठिंबा आहे..." हे सुनेला सांगताना ही शक्ती तिच्यामुळंच मिळाली याचीही वसुंधरा प्रांजळपणे कबुली देते. *प्रवास* मधील सावित्री, आदी स्त्रीप्रतिमा बायको आणि आई

म्हणून रूढ प्रवास नाकारतात आणि स्वतःची वेगळी वाट चोखाळतात. स्वतंत्र व्यक्ती आणि आई या दोन भूमिकांमध्ये त्या जगताना संघर्ष करतात पण त्यांच्यातील मातृत्व भावना पूर्णपणे नाकारत नाहीत. त्यामुळे त्यांच्या कथांतील मातृप्रतिमा ही अपारंपरिक होते.

कुटुंबसंस्थेतील आई-मुलगी, पती-पत्नी, मामा-भाची, बहीण-भाऊ, आई-वडील, सासू-सून अशा विविध नातेसंबंधांचा गोफ सानियांच्या कथा-कादंबऱ्यांमध्ये विणलेला दिसतो. कधी विभक्त कुटुंबसंस्था तर कधी एकध्रुवीय कुटुंब त्यांच्या साहित्यात दिसते. त्यांच्या कुटुंबामध्ये एका मर्यादेपलिकडे दूर गेलेले पण भावनिक ओलावा जपलेले पात्र-पात्रसंबंधही दिसतात. उदा. *आमंत्रण* कथेतील जयतीर्थ, सरिता आणि निशी. यांचे कुटुंब पारंपरिक नाही. पण तरीही त्यांच्यातील नात्याची वीण तुटलेली नाही. तसेच *चार दिवस* कथेतील सासू-सून असलेल्या वसुंधरा-केतकी यांच्यातील भावबंध दूर जाऊनही जपलेला आहे. सासू-सुनेच्या नात्याला दिलेला मैत्रीचा पदर खूप विलोभनीय आणि तरीही लक्षणीय आहे. नात्यांना मर्यादा नसतात याचा प्रत्यय सानियाच्या कथेत पुन्हा पुन्हा येतो. लग्न आणि कुटुंबसंस्थेतील दृश्य-अदृश्य ताण विविध पातळ्यांवर सानिया टिपतात. मानवी नात्यांविषयी मांडणी करताना अपरिहार्यपणे या संस्था त्यांच्या कथांचा अविभाज्य भाग होतात. जेव्हा नाती निर्माण होतात तेव्हा त्यात ताणतणाव, तिढे, भावनिक गुंतागुंत त्यातील व्यामिश्रता असणं हे ओघाने आलंच त्यामुळे त्यांच्या कथा-कादंबऱ्यांमध्ये अनेक नात्यांचे गोफ विणलेले दिसतात. त्यातूनच लग्नसंस्थेची विविध रूपं त्यांच्या साहित्यात अपिरहार्यपणे येतात. जसे, *स्थलांतर*मधील जगदीश आणि मीनाक्षी या दोघांचा पती-पत्नी म्हणून संवादच होऊ शकत नाही. लग्नामुळे अपेक्षित आत्मियता, ओढ, आस्था त्यांच्या नातेसंबंधात नाही. आहेत ते फक्त समाजमान्य सोपस्कार! उदाहरणार्थ, *वाटा* कथेतील मिनू आणि अनिरूद्ध, *स्त्रोत* कथेतील किशोरी आणि चारू, *आमंत्रण* कथेतील जयतीर्थ आणि सरिता.

प्रत्येक नात्याला स्वतःचा एक चेहरा आणि ओळख असते. आणि त्यातूनच त्या पात्रांचाही विकास होत असतो. आधुनिक जीवनात बदलत्या सामाजिक परिप्रेक्ष्यामध्ये कुटुंबाची बदलती रूपे त्यांच्या कथांचा एक महत्त्वाचा विशेष आहे. किंबहुना मराठी कथेमध्ये त्यांनी केलेले असे चित्रण वैशिष्ट्यपूर्ण आहे. पात्र-पात्रसंबंध विकसीत होण्यास कुटुंबाचा अवकाश साहाय्यभूत ठरतो. पण पात्रांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व अधिक ठसठशीतपणे व्यक्त होते. पती-पत्नी नात्यांतील सौहार्द एकमेकांपासून दूर राहूनही काही कथांमध्ये जाणिवपूर्वक जपलेले दिसते. *आमंत्रण* मधील सरिता आणि जयतीर्थ स्वतःच्या व्यावसायिक विकासासाठी सामंजस्याने परस्परांपासून दूर जाण्याचा निर्णय घेतात. तसेच मुलीला सुद्धा तिच्या इच्छेप्रमाणे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य सहजपणे असते. आणि आयुष्याच्या एका टप्प्यावर त्याच आपलेपणाने पुन्हा भेटतात. अशा प्रकारे नात्यातील प्रगल्भ रूप चित्रित केलेले आहे. हक्क, नात्यांमध्ये आक्रस्तळेपणा, ओरबाडणं हे सानियांच्या कथा-कादंबऱ्यांमध्ये येत नाही. अतिशय समजून-उमजून, नात्यांचा मान राखून, त्याहीपेक्षा व्यक्तीचा मान राखून नातेप्रवाह असलेले दिसतात. पती-पत्नी नातेसंबंध चितारताना एकच एक आकृतिबंध स्वीकारलेला नाही. जगण्याच्या आणि नात्यांच्या अनेक शक्यता लेखिका दाखवते. त्यामुळे एकसुरीपणा आलेला नाही.

या नातेसंबंधाबरोबरच त्यांच्या कथां-कादंबऱ्यांमध्ये 'मैत्रभाव' विशेष रुप घेताना दिसतो. हा मैत्रभाव फक्त दोन स्त्रिया किंवा पुरुषांमध्येच असतो असं नाही. तो विविध नातेसंबंधातून, तसेच भिन्न देशांतील व्यक्तींमध्येही साकार झालेला दिसतो आणि तो त्यांच्यातील नात्याला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवतो. इतकेच नव्हे तर व्यक्ती म्हणूनही त्यांचा प्रगल्भ प्रवास झालेला दिसतो. उदा. *स्त्रोत, चार दिवस, प्रवास, परिमाण* कथा तर *स्थलांतर, अवकाश* कादंबरी. *स्त्रोत* मधील किशोरी आणि भगत सर यांच्यातील, शिक्षक-विद्यार्थ्याचे नाते, *प्रवास* आणि *स्थलांतर* मधील सावित्री-जगदीश, जगदीश – नंदिता, *चार दिवस* मधील वसुंधरा-केतकी.

त्यानंतर कथेतील राधिका या पात्राचा पत्नी ते एक स्वतंत्र व्यक्ती हा प्रवास वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण २०-२२ वर्षांच्या सहजीवनानंतर नवरा ललित अचानक सोडून जाणार हे कळताच तथाकथित सुरक्षित कौटुंबिक वातावरणातून ती अचानक वेगळ्या आयुष्यात ढकलली जाते. पण प्राप्त परिस्थितीत ती समजून उमजून अतिशय संयतपणे वाटा धुंडाळत प्रवास सूरू करते. तो तिचा स्वत्वाचा शोध घेणारा प्रवास खूप महत्त्वाचा आहे. विविध नात्यांच्या पलिकडे ती नवरा म्हणून ललितला समजून घेण्याचा प्रयत्न करते. त्याच्या सोडण्याने तिला दुःख होते पण ती आक्रस्तळेपणा करत नाही. त्या दुःखातून ती बाहेर पडते आणि अतिशय अपारंपरिक पद्धतीने समग्र विचार करून परिस्थितीला सामोरं जाते.

जाग कथेमधील यशोदा लग्नानंतर विवाहसंस्थेमुळे मिळालेली सर्व सुखे अनुभवते. एक समाजव्यवस्थेच्या चौकटीतील पत्नीची भूमिका अगदी मनापासून जगते. पण जेव्हा तिला कळते की आपल्या पतीची एक प्रेयसी आहे आणि त्यांच्यातही असेच सर्व प्रकारचे संबंध आहेत तेव्हा ती प्रथम कष्टी, हतबल होते. पण एका निर्णायक क्षणी ती नवऱ्याला शारीर संबंध ठेवण्यास नकार देते कारण तो एकाच वेळी दोघींशीही असे संबंध ठेवतो हे तिला पटत नाही आणि म्हणून पत्नी म्हणून ती त्याला ठामपणे नकार देते. हे धारिष्ट्य ती दाखवते हे लक्षणीय आहे. हे करताना ती कोणताही बंडाचा झेंडा हाती घेत नाही. पण तिने

दिलेला नकार तिला वैशिष्ट्यपूर्ण ठरवतो. तसेच *आमंत्रण* कादंबरीमधील सरिता ही जयतीर्थ परदेशी गेल्यावर स्वतःच्या वैद्यकीय क्षेत्रातील आपला प्रवास नेटाने आणि मनापासून करते. आपल्या मुलीचाही सांभाळ करते. पण त्याचबरोबर तिच्या मनातील पितृप्रतिमा कुठेही डागाळू देत नाही. किंबहुना त्यांच्यातील नाते ती सहजपणे फुलवते. इथे या स्त्रीप्रतिमा रूढ प्रतिमांपेक्षा वेगळ्या होतात. या नायिका सामान्यातील असामान्य ठरतात. या स्त्रीप्रतिमांचा स्वतःचं एक जग आहे आणि ते असण्यात त्यांना काहीच गैर वाटत नाही. काहींचं कुटुंब हेच जग आहे तर काहींचं त्यांचं कार्यक्षेत्र हे महत्त्वाचं आहे. पण त्या दोन्ही जगातील स्त्रीपात्रे त्या जगात जगताना त्यांचा जो स्वत्वाचा शोध घेतात तो महत्त्वाचा आहे. त्यांचा व्यक्ती म्हणून होणारा प्रवास महत्त्वाचा आहे आणि तोच लेखिका अधोरेखित करते. त्यामुळे त्या स्त्रीप्रतिमा जरी सामान्य स्त्रियांसारख्या भासत असल्या तरी त्यांचा जगण्याकडे, कुटुंबाकडे, त्यांच्या नातेसंबंधांकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यांना जीवनाच्या एका टप्प्यावर असामान्य ठरवतो. म्हणूनच *आमंत्रण* कथेतील भगिनीभावाने सरितासोबत असणारी मालन तिच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका निभावते. कौटुंबिक रचनेत राहूनही स्त्रीच्या स्वत्वाचा शोध घेणारी यशोधरा लक्षात राहते. कारण ती आत्मसन्मान जपताना दिसते. आत्मसन्मान ही प्रत्येक माणसाच्या आयुष्यातील मूलभूत गोष्ट आहे. आणि तीच त्यांच्या कथा-कादंबऱ्यातील स्त्रीप्रतिमा त्यांच्या परीने जपतात पण तो जपताना कोणताही आविर्भाव नसतो. अतिशय सहजपणे ते त्यांच्या जगण्यातून येतं त्यासाठी त्या काहीही सिद्ध करण्याची अहमहमिका नसते. त्या संवेदनशील असतात, आयुष्याच्या एखाद्या टप्प्यावर त्या तडजोड करतात पण सहज हार मानत नाहीत. स्त्रीस्वातंत्र्यापेक्षाही त्यांना व्यक्तीस्वातंत्र्याचा प्रवास जास्त महत्त्वाचा वाटतो. पारंपरिक चौकटीत राहून त्या स्वतःचे स्वतंत्र विचार जपतात त्यानुसार वागतात त्यासाठी त्या लग्नसंस्थेचा त्याग सहसा करत नाहीत.

जगण्याचे, आयुष्याचे, विचारांचे, मनाचे गुंतागुंतीचे धागे सानियाच्या कथा-कादंबऱ्यांमध्ये विणलेले आहेत. मानवी नात्यांच्या समाजमान्य व्याख्या केलेल्या नाहीत किंबहुना ठरीव साचे सोडून त्यांनी नात्यांच्या अनेक परी कल्पिलेल्या आहेत. परंपरागत समाजमान्य चौकटीत राहूनही 'स्व'ला सांभाळत स्वतंत्रपणे जगणारी स्त्री आहे. या स्त्रीप्रतिमा समाजात, कुटुंबात राहून स्वतःचा मूल्यभाव जपणाऱ्या, आपल्या परीने निर्णयाचं स्वातंत्र्य घेणाऱ्या, त्या निर्णयाला संपूर्णपणे न्याय देण्याचा विचारपूर्वक प्रयत्न करणाऱ्या आहेत. एकोणिसशे ऐंशीनंतरच्या स्त्री-लेखक साहित्यनिर्मितीचा विचार करताना सानियाच्या कथनपर साहित्याचा आणि त्यांच्या स्त्रीप्रतिमांचा विचार अपरिहार्य ठरतो.

संदर्भ :

१) गोखले, करुणा.अनु. (२०१०) *द सेकंड सेक्स सिमोन द बोव्हा*, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

२) ढेरे. अरुणा.संपा. (२०१४) *स्त्री-लिखित मराठी कथा (१९५० ते २०१०)*, पद्मगंधा प्रकाशन, भारती विद्यापीठ, पुणे.

३) मालशे, मिलिंद वजोशी, अशोक. (२००७) *आधुनिकसमीक्षा सिद्धांत*, मौज प्रकाशन, मुंबई.

४) राजापुरे-तापस, पुष्पलता.संपा. (२०१०) *१९८० नंतरचे स्त्री-निर्मित कथनपर साहित्य*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर आणि मुंबई विद्यापीठ, मुंबई.

५) सानिया, (२००४) *खिडक्या*, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई.

६) सानिया, (१९९७) *प्रयाण*, ज्ञानदा पब्लिकेशन्स, पुणे

७) सानिया, (२००२) *त्यानंतर*, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई.

८) सानिया, (१९९४) *स्थलांतर*, मौज प्रकाशन, मुंबई.

९) सानिया, (१९९६) *आवर्तन*, मौज प्रकाशन, मुंबई.

१०) सानिया, (२००१) *अवकाश*, मौज प्रकाशन, मुंबई.

मराठी साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

श्री. शिंदे चंद्रशेखर उत्तमराव

संशोधक, स्वा. रा. ती. वि. नांदेड शि.शास्त्र विभाग

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. मधुकर आं. पुंडगे

एस. एस. गा. मा. अ. महा. हिंगोली.

प्रस्तावना :

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय समाज आणि माणसाच्या मनात राजकीय आकांक्षा वाढल्या प्रत्येक पंचवार्षिक योजना, निवडणूका, सत्तेचं विकेंद्रीकरण, लोककल्याणकारी योजना, शिक्षणाचा प्रसार यामुळे भारतीय जनमाणसात आमुलाग्र बदल झाला. लोकशाही शासन पध्दतीमुळे सर्वसामान्य माणसाला हक्क अधिकारांची भाषा कळू लागली तळागाळात प्रचंड जागृती निर्माण झाली. स्वांतत्र्य प्राप्तीमुळे आपले सर्वच प्रश्न सुटतील अशी आशा पल्लवित झाली होती. पण काळाबरोबर अनेक समस्या वाढत गेल्या. बेकारी दारिद्रय, वाढती लोकसंख्या भ्रष्टाचार जातीय दंगली, जातीयवादी राजकारण, पुनरुज्जीवनवादी शक्तीचं थैमान, दलितांवर वाढलेले अत्याचार आणि दुष्काळ यामुळे माणसांचा स्वातंत्र्य आणि लोकशाहीवरील विश्वास डगमळीत झाला. आपल्या प्रश्नच्या सोडवणूकीसाठी लोकांच्या चळवळी संघटीत होऊ लागल्या.

शिक्षण आणि लोकशाहीचा विचार अनेक सामाजिक घटकापर्यंत पोहचला होता निरनिराळ्या प्रदेशातील लोक खेडी, खेडयाबाहेरील दलित, भटके विमुक्त आणि आदिवासी शिक्षणामुळे जागे होऊ लागले. शेतकरी स्त्रिया आणि कामगार वर्गातही शिक्षणाच लोण पसरलं. शिक्षणाचं लोकशाहीकरण सुरू झाले. समता, स्वातंत्र्य, न्याय आणि स्वाभिमान' हया मानवी मुल्याची जाण झाल्यामुळे राष्ट्र समाज आणि व्यक्तिच्या जीवनात क्रांतीकारक बदल घडून येऊ लागला. विषम व्यवस्था आणि त्याविरूध्दचे असमाधान हयामुळे समाजमनात वेदना आणि विद्रोहाने पेट घेतला. याचेच वाङ्मयीन रूप म्हणजे 'दलित साहित्य' होय.

इंग्रजी आणि संस्कृतची प्रभुसत्ता संपल्यानंतर सामान्य माणूस त्याची बोली, त्याचा परिसर आणि त्याचे प्रश्न हे साहित्याच्या केंद्रस्थानी येऊ लागले. अनेक समाज घटकातून नविन लेखक उदयाला आले. हया लेखकांनी आपली भाषा, आपला प्रदेशआपली परिस्थिती आणि आपले प्रश्न आपल्या साहित्यातून मांडले. मनोरंजनासाठी साहित्य वाचण वाचकाला हया नव्या साहित्याने हादरे दिले. शेतकरी, दलित, आदिवासी, भटके विमुक्त आणि कामगार वर्गातून नवा लेखकवर्ग उदयाला आला. त्याची भाषा, त्याचे अनुभवन व्यक्त करण्याची पध्दत ही रूढ वाङ्मयापेक्षा वेगळी होती. खिस्ती. मुस्लिम धर्मातील लेखकानीही आपल्या अनुभवांना शब्दांत वाट करून दिली. स्त्रियाही मोठ्या संख्येने लिहू लागल्या.आपल्या व्यथा, वेदना धीटपणे मांडू लागल्या. शिक्षणाचा प्रसार व प्रचार झाल्यामुळे नवा वाचक वर्ग वाढला. हा वाचक वर्गनिरनिराळ्या सामाजिक स्तरातला होता. त्याची अभिरूची भिन्न स्वरूपाची होती. रूढ वाङ्मयात त्याला त्याची प्रतिमा दिसतनव्हती. साहित्यातील अनुभव त्याला स्वतःचे वाटत नव्हते. हया सगळयांचा परिणाम तत्कालिन वाङ्मय निर्मितीवर झाला. कुठल्याही वाङ्मय प्रवाहाची निकोप वाढ होण्यासाठी टिका प्रतिटिका महत्त्वाची भूमिका बजावत असते वेगळे अनुभव हे पारंपारिक चौकटीत बसत नाही त्याची चर्चा व चिकित्सा करायची असेल तर ती वेगळीच झाली पाहिजे. त्यामुळे वाङ्मयीन समीक्षेची वर्तुळे विस्तारणी गेली. नव्या प्रवाहामुळे मराठी भाषेत मोलाची भर पडली.

मराठी वाङ्मयात निर्माण झालेले दलित साहित्य, ग्रामीण, स्त्रीवादी साहित्य आदिवासी, खिस्ती, मुस्लिम साहित्य, जनसाहित्य या विविध प्रवाहामुळे मराठी वाङ्मय सकस आणि समृध्द झाले आहे. नव्हे तर मराठीचा वाङ्मयाचा अभूतपूर्व कायापालट झालेला आहे. हे साहित्य समृध्द आणि जीवनाच्या विविध स्तरांना स्पर्श करणारे आहे. अनेक सामाजिक स्तरामधून उदयाला आलेल्या लेखकाचे हे साहित्य आहे आजवरच्या साहित्यात आमच्या विषयी लिहिले नाही जे लिहिले ते विकत आणि चुकीचे होते म्हणून आम्हीच आमचे साहित्य लिहित आहोत. आमचं साहित्य हे आमच्या प्रश्नचे साहित्य आहे. आम्ही जे जगलो, भोगलो त्याची ही अभिव्यक्ती आहे. त्यामुळे आमचे साहित्य आम्हीच लिहू शकतो घेऊन हे लेखन केलेले आहे. हया साहित्याचा भाषा साहजिकच अधिक आहे. लोकशाही व्यवस्था आणि यामुळे मराठी वाङ्मयाने कस बदललेली आहे. फुले, शाहू महाराज आंबेडकर यांचा विचारांचा प्रभाव पडलेला आहे.मराठी वाङ्मयावर पडलेल्या इतर प्रवाहांचा प्रभाव आपण सविस्तर रूपाने पाहू

1) ग्रामीण साहित्य :

कृषिनिष्ठ संस्कृती, निसर्गसन्मुखता, त्यातून निर्माण झालेले लोकमानस हे ग्रामीण जीवनाचे महत्त्वाचे घटक आहे. त्यातून जगण्याची एक रीत साकारत जाते. या रीतीचे चित्रण ज्या साहित्यात आढळते ते ग्रामीण साहित्य' होय.

ग्रामीण जीवनाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष चित्रण साहित्यातून झाले असे साहित्य प्राचीन वाङ्मयातीही पाहायला मिळते, 'दृष्टांतपाठा' मधून आले काही कथा शेती, शेतकरी आणि ग्रामीण जीवनाचे चित्रण करतात याचे उदाहरण म्हणजे 'आधारिथे परिसाचा दृष्टांत घेता येईल. त्याचप्रमाणे नामदेव, तुकाराम, एकनाथ आदि संताच्या अभंगामधून ग्रामीण जीवनाच्या काही छटा व्यक्त होतात.

आधुनिक कालखंडात हरीभाऊ आपटे यांचा काळ तर मोठा कठीण आला' ही दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली कथा ग्रामीण साहित्यात समाविष्ट होईल. ग्रामीण जीवनाची प्रखर जाणीव ही म. फुलांच्या वाङ्मयात पाहावयास सापडते. 'गुलामगिरी शेतक-यांचा आसूड' तृतीय रत्न' हे नाटक शेतक-यांसबंधी मूलगामी विचार मांडणारे आहेत.फुल्यांच्या अखंडामधून शेतक-यांची पत्नी किंवा शेतीत राबणारी स्त्री अपरिमित कष्ट करते याचे त्यांनी रेखाटलेलेचित्र परिणामकारक आहे. उदा.पाभरीचे मार्ग मोधीता तुरीसा मदत पतीस पैरीताना वान्याचा सोसाट भर पाऊसात करी ती मदत । पसीराय । महात्मा फुल्यांनी जी जीवनदृष्टी दिली त्याचे परिणाम कृष्णराव भालेराव, महर्षि शिंदे, मुकुंदराव पाटील यांच्या साहित्यातून आढळून येतात.

जाणीवपूर्वक ग्रामीण जीवन दर्शन घडवणा-या साहित्याचा सलग प्रवाह 1920 नंतर दिसतो. कारण फुले, आंबेडकरांच्या संपर्कामुळे जागृत झालेली तरुण पिढी वाचू-बोलू लागली. ही तरूण पिढी बहुजन समाजाच्या तळागळातून आलेली होती. या नवशिक्षितांना प्रकर्षाने जाणवले की अभ्यासाच्या निमित्त्याने आपण जे वाचले ते आपल्या जीवनानुभवांपेक्षावेगळे आहे. गैरसमज पसरविणारे आहे. मग मी माझा समाज हा साहित्याचा विजय का होऊ नये? असा नविन विचार या पिढीला समावू लागला. ग्रामीण जीवनातील विषमता, अज्ञान, दारिद्रय, अनिष्ठ रूढी, परंपराभिमान इ. नष्ट करून त्यांची अस्मिता जागृत करण्याचे प्रयत्न मार्क्सवादी मंडळी शाहू महाराज, भाऊराव पाटील यांनी केले. या स्थितंतराचा परिणाम साहित्यावर झाला. खेडे खेडयांचा परिसर निसर्ग जीवनातील समस्या यांचे दर्शन घडवणारा लेखकवर्ग निर्माण झाला.

१) 1925-1940 या काळात निर्माण झालेले सर्वकीकरण मंडळाचे ग्रामीण जीवे ग.ल. ठोकळ यांचा 'सुगी' ग.ह. पाटील यांचा 'रानजाई' हा काव्यसंग्रह 'मीठ-भाकर' हा कथासंग्रह इत्यादी साहित्य म्हणजे माहितीवाजा व तपशिल पुरविणारे होते.

२) 1940-45 च्या काळात के नारखेडे यांच्या विवार हा कवितासंग्रह प्रसिध्द झाला परंतू त्यातील कविता हया सामान्य दर्जाच्या वाटतात. त्यानंतर श्री. म. माटे यांनी माणूसकीच्या नात्याने दिन-दलितांची सेवा केली आणि स्थानुभवातून 'माणूसकीचा गहिवर' उपेक्षितांचे अंतरंग यासारखे कथा लेखन केले.

३) 1946 च्या आसपास एकूण मराठी साहित्यात परिवर्तन झालेले आढळते. ग्रामीण माणसाचे मन त्याचे वागणे यांचे चित्रण साहित्यात होऊ लागले. व्यंकटेश माडगुळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार रणजित देसाई, अण्णाभाऊ साठे इ. नी ग्रामीण कथा लिहिल्या. त्यांच्या कथेत ग्रामीण जीवनाशी जुळलेले अनेक पदर आढळतात.

४) 1960-70 च्या काळात करकरी ग्रामीण समाजातून आलेले आनंद यादव, शंकरराव खरात, बाबा पाटील, बाबुराव बाबुल सखा कुलाल, चंद्रकुमार नलगे इ. अनेक लेखक त्यांच्या कादंबऱ्यातून ग्रामीण वास्तव चित्रित करू लागले. 'करिरा' 'धन', 'टारफला', 'माणूस' या कादंबऱ्यातून ग्रामव्यवस्थेची एकूण रचना, ताण-तणाव, बदललेल्या अर्थव्यवस्थेमुळे विस्कटलेले ग्रामीण जीवन समर्थपणे प्रकट झालेले दिसते.

५) 1970 नंतरच्या कालखंडात ग्रामीण साहित्यात महाराष्ट्र चळवळीचे पडसाद उमटू लागले. स्वातंत्र्यानंतर झालेला भ्रमनिरास, बेकारी इ. मुळे नवी पिढ्ी दिशाहीन अवस्थेत फिरत होती. याचे पडसाद उखडलेली झाले. 'झोंबी', 'हाल्या हाल्या दुदु दे, गांधारचे डोळे, 'विषवृक्षाच्या मुळया', 'मरण कळा, अंत्रारमाती' इ. साहित्यातून ग्रामीण भागातील राजकारण, अपेक्षाभंगाचे दुःख, तरूण ग्रामीण मनाचा उद्रेक चित्रित झाला आहे. खेडयातील माणूस अखेर शोषिताचे जीवन जगतो अशा शोषितांचे चित्रण करणा-या ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली.

2) स्त्रीवादी साहित्य :

स्त्रीचे स्थान समाजात दुय्यम मानले जाते. तिच्याकडे एक व्यक्ती म्हणून पाहण्यापेक्षा बाई म्हणून पाहिले जाते. स्त्री म्हणजे कोणाची तरी आई, बहीण, प्रेयसी किंवा पत्नी म्हणूनच तीची समाजात ओळख असते. सिमॉन द बोव्हा म्हणते, बाई म्हणून कोणी जन्माला येत नाही. नंतर तिला बाई बनवलं जातं.'

इथंच सामाजिक बंधनामधून स्वतःची सुटका करून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करण्याचे प्रयत्न स्त्रिया करीत आल्या आहेत. हयाचे पडसाद साहित्यातून उमटत आहेत. स्त्रियांनी पुरुषांचे लेखन नाकारून स्वतःच आपले अनुभव साहित्यातून मांडायला सुरुवात केली. पाश्चिमात्य देशातील स्त्रियांचा लढा आणि त्यांचे साहित्य यापासून प्रेरणा घेऊन स्त्रिमुक्तीची चळवळ सुरू केली. आपले प्रश्न स्त्रियांनी आपल्या साहित्यातून मांडणे सुरू केले. स्त्रीवादी साहित्य हे स्त्री स्वातंत्र्यांचा पुरस्कार करते आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेला नाकारते. स्त्रीला तिच्या हक्क अधिकारांची जाणीव करून देते. आणि तिच्यावर लादलेल्या बंधनांना झुंगारून देते.

3) दलित साहित्य :

आंबेडकरी विचारधारा आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवन विषयक दृष्टिकोनाद्वारे स्वतःला आणि स्वतः भोवतीच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्तर इच्छाशक्तीचा शब्दरूप अविष्कार म्हणजे दलित साहित्य होय. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचा मराठी साहित्याच्या निर्मितीवर जोरकस परिणाम झाला 1960 नंतर तेंव्हापासून दलितसाहित्य हा ठळक जसा पाय प्रमाह मराठी साहित्यात वाटू लागला. त्यामुळे मराठी साहित्यातुन वादावल्या गेल्या.

भारतीय राज्यघटनेची निर्मिती आणि प्रजासत्ताचा स्वीकार केल्यानंतर घटनेत अंतर्भूत असलेली समता जीवनातही अवतरेल अशी बहुजन वर्गाची अपेक्षा होती. परंतू शाळेतील अभ्यासक आणि सभोवतालचे टणक वास्तव यातील तफावत त्याला जाणवू लागलीआंबेडकरविचारांमुळे तरुणवर्ग संवेदनशील डोऊ लागली भारतीय गुलामगिरीचा इतिहास वाचू लागलापूर्वी कोण होते? त्या ग्रंथाच्या वाचनाने त्यांच्या अस्मितेची साक्ष पटत होती. स्मृती ग्रंथातील गुलामगिरी भावनाआणि मंदिरप्रवेशाच्याचळवळीतपुर्वजांनी सोसलेले हाल याचा इतिहास त्याच्या समोर होता परंतु त्याच्या उत्सुकतेपुढे वास्तवाची जाणीव त्याला संतप्त करीत होती. हा संताप तो शब्दातून व्यक्त करू लागला 'नागनाथ जन्माला आली आणि इथही नागवला गेला असे भेदक वास्तव तो शब्दात मांडू लागला

ज्यांनी चूक केली ऐथे जन्म घेण्याची
त्यांनीच ती सुधारली पाहिजे।
देश सोडून अनवा भीषण युध्द करून ॥

अशा शब्दात हा दलित संघर्ष सिद्ध होऊ लागला स्वातंत्रलयाने दिलेला जीवन विषय दृष्टिकोन रुजविण्यासाठी राज्यघटनेने आश्वासन दिले. ज्याचा लाभ ज्या बहुजन वर्गाला होणार त्या संवेदनक्षम प्रभाव वाङ्मय निर्मितीवर झाला.

4) जनवादी साहित्य :

जनवादी साहित्य धारा ही मार्क्सवादी दर्शनाच्या आधारे विकसित झालेला एक फ़रोगामी साहित्य धारा ही मार्क्सवादीविचारधारा आहे विस्थापिताच्या जीवन जाणीवांची मार्क्सवादी दृष्टीतून सादर करणे व त्याद्वारे इष्ट समाज परिवर्तन घडवून आणणे हा तिचा हेतू आहे. मराठी साहित्यात तिसऱ्या दशकापासून मार्क्सवादी साहित्य म्हणून जी विचारधारा रुजू होत आहे. तिच्या प्रेरणावतोंडवळा 'जनवादी' साहित्याशी थोडाफार मिळता-जुळता आहे. जे साहित्यशोषित-पिडित वर्गाशीसंबंधित असलेले प्रश्न वास्तवतेच्या पृष्ठभूमीवर उभे करूनशोषणआणि मुक्तीच्यामार्गाचे दिग्दर्शनकरीलव ते मार्ग अनुसरण्याची भूमिका पार पाडील ते साहित्य जनवादी साहित्य होय"

वरील भूमिकेनुसार वरेरकर गोदावरी परुळेकर, अनंत कोणकर, अण्णाभाऊ साठे, शरदचंद्र मुक्तिबोध लक्ष्मण माने यशवंत मनोहर वी. स. जोग इत्यादी लेखक कवीहे जनवादी साहित्य प्रवाहात समाविष्ट होतात. या प्रवाहातून तुरळकपण सकस असे साहित्य मराठी वाङ्मयाच्या दालनात दाखल होत आहे. त्या'जनवादी' साहित्य प्रवाहामुळे काही विधायक स्वरूपाचे बदलही मराठी साहित्यात झालेले आढळतात. साहित्याचे स्वातंत्र्यापूर्वकालीन प्रारंभ रद्द होवून आकृतिनिष्ठ साहित्याऐवजी जिवंत उत्स्फुर्त आनिष्ठ साहित्य पुढे येऊ लागले सधळ रसिक रंजनी वृत्ती हळूहळू मावळत जाऊन जनअनुभववजनमानस तेअभिव्यक्तकरण्याची रित तसेच या साऱ्यामागचे सामाजिक, नैतिकअधिष्ठानयांच्याअनुरोधाने अस्सल साहित्यबीज विकसित करण्याचे नवे भाव 'जनवादी' प्रवाहाने मराठी साहित्यात आणले आहे.

5) मुस्लिम साहित्य :

मराठी प्रदेशत जन्म घेतलेल्या मराठी असणाऱ्या धर्मान इस्लाम असणारा मराठी माणूस आणि मुसलमानम्हणून जगत असतांना जे ताण-तनाव निर्माण होत आहेत ते व्यक्त करणारे साहित्य म्हणजे मुस्लिमसाहित्य होय.

मुस्लिम मराठी साहित्याला 14व्या शतकापासूनचा प्रदीर्घ इतिहास आहे परंतू 1990 मध्ये सोलापूरमध्ये मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची स्थापना करून पहिले अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन घेण्यात आले आणि मुस्लिममराठी साहित्याची सुरूवातझाली.

14 व्या शतकापासून महाराष्ट्रातला मुसलमान मराठीतून लिहित आलेला होता. मुस्लिम धर्मात अनेक संतकवीरियासतकार भेदिक, काव्य करणारे लावणीकार आणि शाहिर होऊन गेले. मुस्लिम मराठी साहित्याचा विकास पुढीलपाचटप्पे पड़तात.

१) 14-15 व्या शतकापासून उदयास आलेले मुस्लिम मराठी संतकवी साहित्य यामध्ये 42 मुस्लिम संताचा समावेश केला जातो. या काळातील प्रसिद्ध संत म्हणजे शेख महमद

२) संत साहित्यानंतर 18 व्या शतकापासून निर्माण झालेले शाहिरी आले. लावणी साहित्य यामध्ये मुस्लिम मराठी शहराच्या लावण्या भेदिक लावण्या, पोवाडा अभंग, कूटगीते रियासती ई. वाङ्मयीन प्रकारांचा समावेश आहे.

३) तिस़ऱ्या टप्प्यात 1920 से 1948-49 पर्यतच्या स्वातंत्र्य चळवळीच्या काळातील कवी लेखकाचा समावेश होतो. याकाळातील वाङ्मयावर स्वातंत्र्य लढयातील आंदोलनात भाग घेणाऱ्या क्रांतिकारकाचाही समावेश आहे. भारताच्या फाळणीमुळे होणाऱ्या दंगली आणि नागरिकांच्या कत्तली याचा एकूण परिणाम त्या काळातील साहित्यावर करता येईल.

४) चौथ्या टप्यात स्वातंत्र्योत्तर काळातील 1950 ते 1980 या काळातील साहित्य येते. 1970 नंतर महाराष्ट्रात उर्दूमाध्यमातून सुरू झालीडॉ अजीज नदाफ मुबारक शेख यांनी मुसलमानाच्या व्यथा सुखदु:खे समाजातील अडचणी व्यक्त करणारे साहित्य रचले आहे.

५) पाचव्या टप्यात 1985-86 पासून उदयास आलेले मुस्लिम मराठी साहित्य येते हे साहित्य म्हणजे मुसलमानांच्या सामासंस्कृतिक इतिहासातील महत्वपूर्ण योगदान आहे. या काळातील मुस्लिम साहित्यीक ग्रामीण आणि तालुका परिसरातील आहेत. फाळणीमुळे भारत-पाकिस्तान युध्दाने वाढत गेलेले दुभंलेपण विरोधी लिखाण नाकारल्या जाणाऱ्या संधी यांची अस्वस्थता या पिढीतील फ.म. शहशिदे अजीज नदाफ जावेद कुरेशी मुबारक शेख ऐहतोशोम देशमुख या लेखकांनी मोठया प्रमाणावर साहित्यातूनमांडलेली आहे.

6) खिस्ती साहित्य:

"मराठी साहित्यावर ख्रिस्ति साहित्याचे फार मोठे ऋणआहे. कारण आधुनिक मराठी साहित्याचा उदय आणि उगम ख्रिस्ति साहित्यातून झाला आहे. मराठी साहित्याच्या आज दिसणान्या वटवृक्षाचे बीजारोपण महाराष्ट्रात आलेल्या ख्रिस्ती बांधवानीकेलेले आहे." असे उद्गार कवी कुसुमाग्रजांनी 1988 साली काढले होते. मराठी भाषेतील खिस्ती लेखकाचे पहिले पुस्तक मॅथिवचेशुभवर्तमान हेकलकत्ता जवळील श्रीरामपूर येथे 1905 मध्ये प्रकाशित झाले आहे. त्यानंतर महाराष्ट्रातील पहिले मराठी मुद्रण 1817 मध्ये बार्डवेल या मिशनरीने केले आहे. मिशनरीनी खिस्ती धर्माखेरीज मराठी संताच्या चरित्र तत्वज्ञानाविषयी ग्रंथ निर्मिती केलेली आहे. विल्यम कॅरे, मोलसवर्ध जे स्टीव्हन्सून, जॉन विळसने मरे मिचेल, निकळ मॉक्रिकल, जस्टीन अँबटजे.एफ.एडवर्डसआदी धर्मज्ञविद्वानांनीमराठी साहित्याची सेवा केलेली आहे. संत भारुदास, एकनाथ, तुकाराम आणि रामदास यांची चारित्रे आणि लेखन मिशिनरी इंग्रजीत लिहिले आहे. इतकेच तर ज्ञानेश्वरतुकारामबाबाचेधर्मविचार आणि तुकाराम बाबांचा सोतू असे मराठी ग्रंथही प्रकाशित केले आहेत.

ख्रिस्ति धर्माचा आशय विषय असलेले ख्रिस्ति पुराण हे दहा हजार श्लोकांचे महाकाव्य फादर टॉमस स्टीफन्स या पोर्तुगीजमहाकवीने लिहिले आहे. हे पुस्कर ज्ञानेश्वरी इतके सरस आहे वउच्च दर्जाचे आहे. फादर कुवा यांचे सेंट पीटरचपुरणातूनही हिंदू धर्माची बौद्धिक चिकित्सा केलेली आहे.

ख्रिस्ति धर्मांतराची साहित्य वैशिष्टये:-

गेल्या शतकामध्ये सुरुवातीच्या दोन दशकात मराठी मुद्रणाची सुरुवात झाल्यानंतर मराठी भाषिकांच्या धर्मातराची एकप्रचंड छाट निर्माण झाली. हिंदु धर्मातील विविध स्तरातील अनेकांनी खिस्ती धर्माचा स्वीकार केला. भागोबापवार,

कृष्णाली सांगळे, बाबापद्माजी, या पंडीता रमाबाईनी, नीलकंठ शास्त्री गोरे, नारायण योष्यद्री गणपतराव नवलकर न. वा. टिळक आदिंनी स्विीकार केला. तथा पि के वळ धर्मांतर केले नाही तर, ख्रिस्ती साहित्याची व मराठी साहित्याची निर्मिती देखील केली मराठीतील पहिली कादंबरी 'यमुना पर्यटन' ही बाबा पदमनजीनी लिहिली अरुणोदय ही मराठीतील पहिले आत्मकथनही त्यांचे आहे.

7) आदिवासी साहित्य:

आदिवासी साहित्य हा भारतातील मूळ निवासी असून आर्यांच्या आक्रमणांमुळे डोगर-द-या, नदी-नाले, जंगले यांचाआश्रय घ्यावा लागला महाराष्ट्रात गोंडवून सहयादी सातपूडा या पर्वतरागाच्या परिसरात आदिवासींच्या वस्त्या आहेत.

आदिवासी समाज हा शहरी व ग्रामीण समुदायापासून अंतरलेला आहे. गावाबाहेरही समाजापेक्षा या जमातीअवस्था फार बीकट आहे. आदिवासी समाजाची जमीनदार, व्यापारी श्रीमंत शेतक़्याकडून त्यांचे शोषण व पिळवणूक केली. तर लाचारवभटकंतीचे उपेक्षीत जीवन आदिवासींच्या वाट्याला आले आदिवासी समाज निर्धन निरक्षरअसला तरी त्याची स्वतंत्र आणि अर्थपूर्ण संस्कृती आहे.रूढीवपरंपरा सण-समारंभवसाहित्य कला आहेत. त्याच्या लक्षवेधकसमाजजीवनामुळे ब्रिटीशाच्या काळात काही जागृतीचे कार्य सुरु झाले.

आदिवासी समाजात शिक्षण, चळवळ व जागृतीचे प्रमाण अधिक वाढल्याने माणूस लिहू, वाचू, बोलू लागला. त्याच्या साहित्यिक जाणिवा व्यापक बनल्या असून मराठी साहित्याचे व चळवळीचे भान त्याला आले. त्याने स्वतःचे साहित्य निर्माण करण्यासाठी 1979 पासून आदिवासी साहित्य संमेलने भरविली गेली. तेव्हापासून लिखित स्वरूपाचे मराठी साहित्य निर्माण झाले. 'भोहोळ', 'वनवासी', 'वर्णसूर्य' इ. कविता संग्रह 'आदोर', 'तृष्णा', 'झेलझपाट' यासारख्या कादंबऱ्या निर्माण झाल्यात. आदिवासी कथा वाङ्मयाची निर्मिती ही त्यांच्या जीवनातील घटना, प्रसंग, प्रवृत्ती यांच्या अनुषंगाने झाल्या तो एक आदर्श नवोदित कथाकारापूढे आहे.

संदर्भसूची:

1. वरखेडे मंगला: स्त्रियांची नवकथा वाटा-आणि वळणे
2. साने गीता: भारतीय स्त्रीजीवन
3. फळके भालचंद्र: दलित साहित्याची प्रकाशयात्रा
4. कुलकर्णी गो.म. :साहित्य दलित आणि ललित
5.कोत्तापल्ले नागनाथ: ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध
6. यादव आनंद: ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या

मराठी साहित्यातील ग्रामीण स्त्री

सुनिल रामराव काकडे

मु.पो.धोंडराई ता.गेवराई जि.बीड- ४३११२७

स्त्रीविषयक सामाजिक, सांस्कृतिक जाणिवा आधुनिक मराठी साहित्याच्या आरंभापासूनच मराठी साहित्यिकांना आणि विचारवताना झालेल्या दिसतात. म.फुले यांच्या शिक्षणविषयक व स्त्रीविषयक कार्यातून, बाबा पदमजी यांच्या यमुनापर्यटन या कादंबरीतून, आगरकरांच्या स्त्रीविषयक विचारातून मराठी स्त्रीविषयक जाणिवा प्रथम प्रगट झाल्या. नंतर त्या केशवसुतांची कविता, हरिभाऊ आपटे – वा.म.जोशी यांच्या कादंबऱ्या, देवलांचे शारदा हे नाटक, त्यानंतरच्या काळात डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या कादंबऱ्या, म.धोंडो केशव कर्वे यांच्या शिक्षणविषयक संस्था व सामाजिक कार्य यातून त्या प्रगट झालेल्या आहेत. या काळात स्त्रीयांनी लिहिलेली आत्मचरित्रे आणि मालतीबाई बेडेकर यांनी विभावरी शिरुरकर या टोपण नावाने लिहिलेल्या कथा-कादंबऱ्या, कुसुमावती देशपांडे यांच्या काही कथा यांतूनही स्त्रीविषयक जाणिवा प्रगट झालेल्या दिसून येतात. अशा रीतीने साधारणपणे १८७० ते १९४० या साठ- सत्तर वर्षाच्या काळात आधुनिक मराठी स्त्रीची सुख-दु:खे आणि तीच्या विषयीच्या सामाजिक, सांस्कृतिक जाणिवा मराठी साहित्यात प्रगट झाल्या आहेत.

पण ही स्त्री मध्यमवर्गीय, पांढरपेशी, शहरी जीवनातील आहे. तिच्या जोडीने सर्वसाधारणपणे ग्रामीण स्त्रीची सुख-दु:खे, तिच्याविषयीच्या सामाजिक सांस्कृतिक जाणिवा प्रगट व्हायला हरकत नव्हती. पण त्या प्रगट झाल्या नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्याला सामाजिक, सांस्कृतिक, पारंपरिक, रूढीविषयक अनेक कारणे आहेत.

१९२५ नंतरच्या काळात मराठी साहित्यात ग्रामीण स्त्री लक्षणीय स्वरुपात प्रगट होऊ लागली. इंग्रजीतील pyastoral poytri च्या प्रेरणेने आणि म. गाधींच्या खेड्याकडे चला या चळवळीच्या प्रेरणेने काही कवी व कथाकार-कादंबरीकार यांनी तिचे रेखाटन केले आहे. कविवर्य चंद्रशेखर, गिरीश, यशवंत, ग.ल.ठोकळ आणि सुगी या ग.ल. ठोकळानी संपादित केलेल्या प्रातिनिधिक ग्रामीण कविता संग्रहातील सर्व कवीच्या काव्यातून, तसेच र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ यांच्या १९४० च्या आसपास लिहिल्या जाऊ लागलेल्या ग्रामीण-प्रादेशिक कथा-कादंबऱ्यातून ते दिसते. बा.भ.बोरकर [भावीण] किंवा भा.वि.वरेरकर [चिमणी] यांच्यासारखे साहित्यिक ही अधूनमधून आपल्या कादंबऱ्यातून ग्रामीण स्त्री रेखाटताना दिसतात. पण या सर्व साहित्यातील ग्रामीण स्त्री रोमांटिक वृत्तीची आहे. ती प्रियकर किंवा पती यांची आतुरतेने, व्याकुळतेने वाट पाहणारी, त्यांच्याबरोबर प्रेमक्रीडा करणारी, निसर्गाच्या मांडीवर मुक्त वृत्तीने उमाड्णारी आहे. जणू ती निसर्गाचे नैसर्गिक भाव-भावनांशी वागणारे तरूण लेकरू आहे.

या साहित्यातील ग्रामीण स्त्री अशी स्वच्छंदवादी असली तरी याच काळातील श्री.म.माटे यांच्या कथातून किंवा र.वा.दिघे यांच्या कादंबऱ्यातून येणारी ग्रामीण स्त्री ही ग्रामीण जीवनाच्या एकदम खालच्या स्तरातील असून, ती दलित किंवा आदिवासी समाजातील आहे. कुटुंबात तिचे असलेले दुय्यम स्थान, नवरा, मुले-बाळे यांना मानसिकदृष्ट्या जोपासणारी, स्वतःची सुख-दु;खे बाजूला ठेवून, प्रसंगी उपाशी राहून कुटुंबाचे भरण-पोषण करणारी आहे. पोटासाठी दिवसभर शेतावर किंवा श्रीमंताच्या घरीदारी राबराब राबणारी, रात्री जागून आणि पहाटे लवकर उठून घरच्यांच्या साठी, स्वयंपाक-पाणी करण्यासाठी सतत कामाला जुंपलेली अशी ही स्त्री आहे. समाजात तिचे स्थान घरच्यांहून दुय्यम किंवा नगण्य स्वरूपाचे आहे. घरच्यांच्या पोटात चार घास पडावेत म्हणून ढोरकष्ट करूनही ती स्वतः मात्र उपाशी राहते आहे आणि स्वतः च्या भावभावना, स्वप्ने, सुखाच्या कल्पना हे सर्व घरातील केरकचरा बाजूला सारावा तसे सारून पुरुषासाठी म्हणजे पती, मुले, वडील, भाऊ, दीर यांच्यासाठी जनावरांसारखी राबते आहे. तिच्या सुख-दु;खाकडे, भावभावनाकडे, मानसिकतेकडे या पुरुषप्रधान संस्कृतीत घरच्यांचे आणि बाहेरच्यांचेही लक्ष नाही, अशी तिची अवस्था आहे. अशी स्त्री कुसुमावती देशपांडे यांच्या काही कथांतून, श्री.म.माटे यांच्या काही कथांतून, र.वा. दिघे यांच्या काही कादंबऱ्यातील प्रादेशिक जीवनातून भेटताना दिसते. पण तिचे हे ग्रामीण-प्रादेशिक साहित्यातील दर्शन फारच तुरळक प्रमाणात आलेले आहे. जाणीवपूर्वक ते शोधावे लागते.

१९५०च्या आसपासच्या काळात आणखी दोन-तीन प्रादेशिक कादंबरीकार साहित्यिक नात्याने लक्ष वेधून घेतात; ते म्हणजे श्री.ना.पेंडसे, गो.नी.दांडेकर आणि अण्णाभाऊ साठे होत. पण काही न काही कारणांनी या साहित्यिकांनी वास्तववादी किंवा प्रातिनिधिक स्वरुपात आपापल्या प्रदेशातील स्त्रीकडे पहिले नाही. त्यामुळे यथार्थ स्त्रीदर्शन याही कादंबऱ्यात होऊ शकले नाही. या कादंबऱ्यातील काही स्त्रीया लक्षवेधी असल्या तरी त्या आपापल्या अपवादात्मक व्यक्ती- वैशिष्ट्यामुळे वाचकांचे आपल्याकडे लक्ष वेधून घेतात. उदाहरणार्थ पेंडशांच्या कादंबऱ्यातील स्त्रीया नाट्यपूर्ण घटनांमुळे, संघर्षामुळे, स्वभावातील विशिष्ट पण प्रदेशनिरपेक्ष गुणधर्मामुळे, लैंगिक संबंधामुळे, रोमांटिक वृत्तीमुळे लक्षवेधक ठरतात. गो.नी.दांडेकरांच्या स्त्रीया स्वतः दांडेकरांच्या मनातील आदर्श मुल्ये, परंपराविषयीचे भावूक प्रेम, उदात्ततेची अनावर ओढ, निसर्ग, अध्यात्म यांचे

आकर्षण यांमुळे लक्षवेधक ठरल्या आहेत; तर अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील स्त्रीया मुक्त प्रेमसंबधामुळे, त्यांच्या गावरान रोमांटिक, धाडसी, बेफिकीर वृत्तीमुळे आकर्षक वाटतात. पण जेव्हा आपण स्त्रीदर्शन असा शब्दप्रयोग करतो, तेव्हा आपली अपेक्षा अशी असते की, साहित्यिक ज्या ग्रामीण विभागावर किंवा प्रदेशावर साहित्यनिर्मिती करतो त्या ग्रामीण विभागातील अथवा प्रदेशातील ती स्त्री वास्तववादी किंवा त्या विशिष्ट प्रदेशातील सामाजिक, सांस्कृतिक, पारंपरिक मूल्यांचे प्रतिनिधित्व करणारी अशी स्त्री असावी. पण दुर्दैवाने असे झाले नाही.व्यंकटेश माडगुळकरांनी बनगरवाडी, रणजित देसाई यांच्या बारी आणि माझा गाव या ग्रामीण – प्रादेशिक कादंबऱ्यातही – जरी त्या कादंबऱ्या वास्तववादी असल्या तरी- त्या कादंबऱ्या मागे ग्रामीण स्त्रीदर्शन घडवण्याची प्रेरणा दिसत नाही. त्यामुळे त्यांच्या साहित्यकृतीत स्त्रीया असल्या तरी त्यांना स्वतंत्र आणि लक्षणीय ग्रामीण किंवा प्रादेशिक व्यक्तिमत्वे प्राप्त झालेली नाहीत. या दोघा ग्रामीण साहित्यिकांच्या कथांतूनही ग्रामीण स्त्रीया आलेल्या आहेत; पण त्याही आपल्या वैयक्तिक स्वभाव वैशिष्ट्यामुळे लक्षात राहतात.

१९२५ ते ६० या काळातील ग्रामीण साहित्यातील स्त्रीदर्शन अशा रीतीने काही ना काही कारणाने असमाधानकारक राहिलेले आहे. याची कारणमीमांसा खुप खोलात जाऊन करणे आवश्यक असले, तरी जागेअभावी फक्त काही ठळक कारणाची यादी देऊन पुढे जात आहे. हा जो पस्तीसएक वर्षाचा काळ आहे, या काळावर romantisizam चा म्हणजे स्वच्छंदतावादाचा प्रभाव मराठी साहित्यावर फार मोठ्या प्रमाणात होता. वास्तववादाचा प्रभाव प्रभाव १९२० नंतर हळूहळू कमी होत गेलेला दिसतो. ना.सी. फडके यांच्या वाड.मयीन दृष्टीचा आणि वाड.मयीन निर्मितीचा फार मोठा प्रभाव १९५० पर्यंत मराठी साहित्यावर होता. त्यामुळे स्वप्नरंजन, प्रेम प्रकरणे, वैयक्तिक स्वभाववैशिष्ट्यांनी युक्त अशी पात्रे उभी करणे, साहित्यिकांच्या जीवनदृष्टीचा किंवा जीवनमूल्यांचा साहित्यकृतीतील पात्रांवर प्रभाव ठेवणे, गांधीवादाचा व मार्क्सवादाचा प्रभाव ठेवून साहित्यनिर्मिती करणे, कादंबरीचे कथानक अटळपणे प्रेमप्रकरणाने प्रभावित ठेवणे इत्यादी कारणांमुळे ग्रामीण व प्रादेशिक साहित्यातील ग्रामीण स्त्रीचे दर्शन वास्तवापासून दूर राहिले. दुसरे असे की, व्यंकटेश माडगुळकर यांची करुणाष्टक ही आत्मचरीत्रात्मक कादंबरी सोडली, तर त्यांनी ग्रामीण स्त्रीची मर्मस्थळे जाणून, तिची सामाजिक स्थितीगती जाणून तिचे दर्शन घडवावे अशी त्यांना कधी प्रेरणा झालेली दिसत नाही. रणजित देसाई यांच्या बाबतीतही हेच विधान करता येण्यासारखे आहे.

१९६० नंतर मात्र स्त्रीदर्शनाच्या दृष्टीने ग्रामीण साहित्यात परिवर्तन झालेले दिसून येते. त्याचे श्रेय शंकर पाटील यांच्या पहिल्या दोन कथासंग्रहानंतरच्या ऊन, आभाळ यासारख्या कथासंग्रहाना द्यावे लागते. विशेषत: ऊन या कथासंग्रहातील ग्रामीण स्त्रीमनाचे अनेक पापुद्रे उकलून दाखविण्यात ते यशस्वी झाले. स्त्रीमनाला पुरुषमन समजूनच कसे घेऊ शकत नाही, स्त्रीशिवाय पुरुष कसा पोरका होऊन जीवनातील उत्साहच गमावून बसतो, आई नसेल तर पुरुषाला म्हणजे बापाला मुले सांभाळणे आणि त्यांचे नीट पालनपोषण करणे कसे अशक्य असते, घरातील स्त्रीचे केवळ अस्तित्वच पुरुषाला आणि संबंध कुटुंबालाच किती मोठा मानसिक आधार असते, लग्न होऊन सासरी गेलेली स्त्री कशी दोन्हीही घरांना मानसिक दृष्ट्या [आणि पुरुषप्रधान संस्कृतीमुळे] गमावून बसते, लग्न झालेला भाऊ कसा एका पत्नींमुळे म्हणजे स्त्रीसहवासामुळे सख्ख्या बहिणीलाही दूर करतो, बहिणीचे माहेरी येणे त्याला कसे अडचणीचे होते, सासरी गेलेल्या मुलीविषयी आईचे काळीज कसे तुटत राहते, स्त्री ही फक्त श्रमाची धनीणच कशी शेवटी ठरते, याचे अत्यंत मर्मस्पर्शी मानसशास्त्रीय, कौटुंबिक स्त्री- दर्शन शंकर पाटील यांनी आपल्या कथातून घडविले आहे. टारफुला सारख्या कादंबरीतील जगावेगळी स्त्री मराठी वाचकाला अपरिचित वाटत असली तरी तिच्यातून एका ग्रामीण स्त्रीमानसिकतेचे प्रभावी दर्शन घडते, हे विसरता येत नाही.

वास्तविक शंकर पाटील हे कलावादी प्रेरणेने प्रभावित झालेले लेखक आहेत. आपल्या परीने त्यांनी आपल्या साहित्यात प्रयोगशीलतेला सतत अग्रक्रम दिला. मानवी जीवनातील आणि मनातील ताण पकडण्याची धडपड त्यांनी सतत केली. त्यात ग्रामीण स्त्रीमनाचे आणि जीवनाचे ताण मराठी कथेत अजून अस्पष्टच राहिले आहेत. याच कलावादी प्रेरणेने त्यांनी ऊन आणि आभाळ मधील स्त्रीयांविषयीच्या कथा लिहिल्या. त्यांच्या या धडपडीत स्त्रीदर्शन योगायोगाने पण अतिशय प्रभावीपणे घडून गेले.

याच काळात रणजित देसाई यांचे अनेक ग्रामीण कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. रणजित देसाई यांची लेखनप्रकृती कणव, कारुण्य, सहानुभूती यांनी प्रभावित झालेली आहे. त्यांच्या ग्रामीण कथा वाचताना याचा प्रत्यय येतो. ते पश्चिम महाराष्ट्राच्या दक्षिण टोकाला कोवाड सारख्या देश- कोकण यांच्या सीमेवरील खेड्यात अनेक वर्ष राहत होते. तेथील जनसामान्य ग्रामीणांचे जीवन त्यांनी आपल्या छोटेखानी कथांत रेखाटले आहे. सामान्य स्त्रीच्या जीवनातील दारिद्र्य, कष्ट, अन्याय, सोशिकता, उपेक्षा इत्यादी वैशिष्ट्ये तन्मयतेने, नाट्यात्मतेने आणि कलात्मकतेने रेखाटलेली आहेत. त्या भागातील सर्वसामान्य कष्टाळू स्त्रीचे वास्तव चित्रण त्या कथांतून प्रतिबिंबित झालेले दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण साहित्यिकांची दुसरी पिढी १९६० च्या आसपास लेखन करू लागली. या पिढीत पहिल्या पिढीच्या तुलनेने ग्रामीण लेखकांची संख्या जास्त होती. शिवाय सामाजिक दृष्ट्या अधिक खालच्या स्तरातून हे ग्रामीण लेखक पुढे आलेले दिसतात. त्यांची सामाजिक जाणीव पहिल्या पिढीच्या तुलनेने अधिक दृढ स्वरुपाची, आपापल्या ग्रामीण समाजाला अधिक चिकटलेली, त्या समाजाची सुखदु;खे मांडण्यात अधिक रमणारी, विशेषतः सुखापेक्षा आपले कष्ट,

अज्ञान, दु;ख, उपेक्षा, वरच्या स्तराने केलेले अनेक जुलूम, जबरदस्ती, शोषण यांच्यावर आपल्या कथांतून विशेष भर देणारी ही पिढी होती. या पिढीत कविता, कथा, कादंबरी, ललितगदय इत्यादी विविध साहित्यप्रकारात लेखन करणारे अनेक साहित्यिक होते. या साहित्यिकांनी आपल्या या ग्रामीण साहित्यातून जे ग्रामीण स्त्रीदर्शन घडविले आहे, ते पहिल्या पिढीच्या तुलनेत वाचकाचे अधिक लक्ष वेधून घेते. याचे कारण स्वतः लेखकवर्गच त्या सामाजिक स्तरातून आलेला आहे.

ग्रामीण स्त्रीदर्शन प्रभावीपणे घडविणाऱ्या या पिढीतील निवडक लेखक म्हणून उद्धव शेळके, रा.र.बोराडे, आनंद यादव, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे यांची नावे घेता येण्यासारखी आहेत. समग्रतेने ग्रामीण स्त्रीदर्शन घडविण्यासाठी कथा, कविता, ललितगद्य यासारखे साहित्यप्रकार अवकाश मर्यादेमुळे सामान्यतः कमी पडतात. एखाद्या व्यक्तीची पूर्ण जीवनरेखा काढण्यासाठी तुलनेने कादंबरी हा साहित्यप्रकार समर्थ वाटतो. त्यामुळे वरील पाचही ग्रामीण लेखकांनी कादंबरी- प्रकार हाताळून ग्रामीण स्त्रीदर्शन प्रभावीपणे घडविल्याचे दिसून येते. या लेखकांनी कादंबरीशिवाय इतरही आपल्या साहित्यप्रकारात स्त्रीदर्शन घडविले आहे; नाही असे नाही. पण त्यांच्या कादंबऱ्यातील स्त्रीदर्शन हे प्रभावी आणि संस्मरणीय झालेले आहे. शेळके यांच्या धग मधील कौतिक, बोराडे यांच्या पाचोळा मधील पारबती किंवा यादवांच्या झोंबी- घरभिंती मधील तर या स्त्री व्यक्तिरेखा ग्रामीण विभागातील स्त्रीचे वास्तव आणि प्रातिनिधिक चित्रण घडवणाऱ्या स्त्रीया आहेत. दारिद्र्य, अज्ञान, कष्ट, उपासमार आणि पोरवडा यांनी पिचलेल्या आणि शेवटी निष्क्रिय झालेल्या नवऱ्याचे संसार स्वतःच्या हातावर तोलताना या स्त्रीया आपल्या एकाकी हातांनी जीवनसंघर्षाला, नियतीला, येईल त्या परिस्थितीला सामोऱ्या जाताना दिसतात.

चंद्रकुमार नलगे यांच्या कथा-कादंबऱ्यातील स्त्री ही पारंपरिक ग्रामीण स्त्रीचे भावगर्भ वास्तवदर्शन घडवणारी आहे. ही वाङमय जीवनात रूढीने चालत आलेली आदर्श मुल्ये मानणारी, सर्वस्व वेचून स्त्री मुल्यांची जोपासना करणारी, कुटुंबाला एकत्र ठेवण्याचा प्रयत्न करणारी, प्रतिकूल परिस्थितीतही घरकूल विस्कटू न देणारी आहे. नलगे यांचे साहित्य स्त्री-व्यक्तिरेखा-प्रधान आहे. त्यांच्या साहित्यात विविध रूपांत स्त्री भेटते. त्यांच्या आगीनफुल कादंबरीतील सावित्री याच कारणामुळे लक्षात राहून जाते.

महादेव मोरे यांनीही आपल्या अनेक कथा-कादंबऱ्यातून ग्रामीण समाजाच्या अगदी खालच्या स्तरांचे चित्रण केलेले आहे. त्यातूनच त्या समाजातील स्त्रीदर्शन घडते. तंबाखूच्या वखारीत काम करणाऱ्या, शेतावर रोजगाराला जाणार्या, परिस्थितीचा बळी ठरल्याने वेश्याव्यवसाय पत्करावा लागलेल्या, देवदाशी, डोंबारी, मंग, गारुडी या समाजातील विविध स्तरातील स्त्रीयांची चित्रे त्यांनी रेखाटलेली आहेत. त्या दृष्टीने त्यांच्या आडगार, वर आभाळ खाली धरती यासारख्या कादंबऱ्या पाहण्यासारख्या आहेत.

ग्रामीण साहित्यिकांची तिसरी पिढी १९८० च्या आसपासच्या काळापासून लेखन करत आहे. ही पिढीही जनसामान्यांच्या खालच्या सामाजिक स्तरातुंनच पुढे आलेली आहे. बदलत्या स्त्रीजीवनाचा मागोवा घेण्याचा ती प्रयत्न करीत आहे. तिच्याविषयी आताच लिहिणे योग्य नसले, तरी या पिढीतील अनुराधा गुरव आणि विदर्भातील प्रतिमा इंगोले या दोन साहित्यिक स्त्रीयांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे, इतक्या योग्यतेचे आधुनिक ग्रामीण स्त्रीचे दर्शन त्यांनी आपल्या साहित्यातून घडविले आहे. विरल स्वरुपात असली तरी साहित्यिक स्त्रीयांची एक परंपरा ग्रामीण साहित्याला लाभलेली आहे. बहिणाबाई चौधरी, सरोजिनी बाबर, अनुराधा गुरव, प्रतिमा इंगोले अशी ती सांगावी लागेल. बहिणाबाईनी आणि बाबरबाईनी आपल्या कवितेतून लोक संस्कृतीतील ग्रामीण स्त्रीचा आत्मा पकडलेला आहे. परंपरागत उदात्त जीवनमूल्ये, कुटुंबमूल्ये आणि स्त्रीमूल्ये आत्मसात केलेली स्त्री त्यांच्या कवितेतून आणि गद्य साहित्यातून व्यक्त झालेली दिसते. गुरव- इंगोले यांच्या सर्वच साहित्यकृतीत आधुनिकतेची जाणीव झालेली, स्वतः च्या स्त्री- अस्तित्वाचे भान आलेली, पुरुषाला त्या भानाची स्पष्टपणे जाणीव देणारी, स्वतःवर होणार्या अन्यायाला वाचा फोडणारी, स्त्रीजीवनाच्या सामाजिक दुय्यम स्थानाची आपआपसात चर्चा करणारी अशी मनस्वी आधुनिक ग्रामीण स्त्री त्यांच्या साहित्यातून प्रगट होऊ लागलेली आहे. नव्या ग्रामीण स्त्रीचे दर्शन घडविणारे त्यांचे साहित्य अधिक समृद्ध आणि सखोल होण्याची गरज आहे. असे झाले, तर उद्याची ग्रामीण सुशिक्षित स्त्री कोणत्या दिशेने वाटचाल करील याच्या पाऊलखुणा त्यांच्या साहित्यात अधिक स्पष्टपणे उमटतील असे वाटते.

१९२५ ते १९९५ या सत्तर वर्षाच्या काळातील ग्रामीण साहित्यातील ग्रामीण स्त्रीचे दर्शन विविध प्रकारचे आहे. ग्रामीण समाजाच्या गाभ्यातील स्त्रीची विविध रूपे पकडण्याचा प्रयत्न अनेक लेखकांनी आपापल्या परीनी केलेला आहे. ग्रामीण साहित्याच्या निर्मितीमागे विविध प्रेरणा असल्या तरी ग्रामीण समाज जीवनाचे वास्तव दर्शन घडविण्याची प्रमुख प्रेरणा या साहित्याने सतत जोपासली आहे. त्याचेच फलित म्हणून ग्रामीण स्त्रीदर्शनाकडे पाहावे लागते.

विभावरी शिरुरकर यांच्या 'हिंदोळयावर' कादंबरीतील स्त्री प्रतिमा

प्रा. डॉ. विजय गणपतराव वारकड

मराठी विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड ता. मुखेड जि. नांदेड

ज्या नावाने मराठी साहित्यात प्रचंड खळबळ माजली होती या लेखिकेचे 'कळयांचे नि:श्वास' हा कथासंग्रह व 'हिंदोळयावर' ही कादंबरी प्रसिद्ध होताच तत्कालीन समाजात प्रतिकूल टिकेची झोड उठली. 'अशी गलिच्छ व अश्लील पुस्तके लिहिणाऱ्या लेखिकेला ठार मारले पाहिजे, हे समाजविघातक कृत्ये चालू देता कामा नये' अशी ओरड झाली. लेखिकेवर मृत्युलेख लिहिले गेले. एवढेच नव्हे तर या पुण्यनगरातितची जीवंतपणी प्रेतयात्राही काढली. लेखिकेने टोपणनावाने लेखन केले असल्याने विभावरी शिरुरकर म्हणजे बाळुताई खरे यांना प्रत्यक्षात त्याची झळ लागली नाही.

विभावरी शिरूरकर यांची 'हिंदोळयावर' ही कादंबरी महाराष्ट्रीय स्त्रीच्या विचारक्रांतीच्या दृष्टीने प्रातिनिधिक आहे. कादंबरीची नायिका 'अचला'चा झगडा हा दुहेरी आहे. तिच्यावर समाजाने एकाकी जीवन लादलेले आहे. अशाप्रकारे नायिकेचे मन मुक दाखवून जरी लेखिकेने तिच्या दीन स्थितीचे चित्रण केलेले असले तरी ते आकर्षक झाले असते. पण ह्या ठिकाणी नायिकेच्या मनातील विविध विचार चित्रित केले आहेत. ती चांगलीच सुसंस्कृत आणि बरीच बहुश्रुत आहे. कोणाही चांगल्या पुरुषाशी तिने अगदी एकनिष्ठेने संसार केला असता,इतके तिचे भावजीवन उदात्त आहे. पण अशा अत्यंत सच्छिल, सतप्रवृत्त, सुबुद्ध स्त्रीच्या वाट्याला परीत्यक्तेचे जीवन आले आहे, ही अर्थातच सामाजिक जीवनावर कठोर अशी टीका आहे. नायिकेच्या मनात वात्सल्य भावनांचा जो सागर उचंबळून येतो, समाजाने चिरडलेल्या मानवी मनाचा हा आक्रोश फारच परिणामकारक आहे.

'हिंदोळयावर' ही कादंबरी म्हणजे विशिष्ट परिस्थितीतील व्यक्तींच्या जीवनक्रमाचे चित्र रेखाटून त्या परिस्थितीतील प्रश्नांचे स्वरूप प्रत्यक्षपणे वाचकांच्या पुढे ठेवून त्यांना प्रवृत्त करण्याच्या हेतूने लिहिलेल्या सहेतुक ललितकृतीच्या वर्गात या कलाकृतींचा अंतर्भाव होतो. स्त्री मुक्तीचा सामाजिक आशय स्त्रीच्या मानसिक जाणिवांशी जोडून देणारी मराठीतील ही पहिलीच स्त्रीवादी कादंबरी ठरते. या कादंबरीची नायिका 'अचला' हिचा विविध प्रतिमेच्या आधारे शोध घ्यावयाचा आहे.

हिंदोळयावर या कादंबरीतील प्रतिमा

कथानकामध्ये घटनांना नुसता कालक्रमच नसतो तर त्यांना काही विशिष्ट अर्थअसतो. निसर्गात घटना घडत असतात. त्यांचा अत्यंत महत्वाचा एक घटक म्हणजेमनुष्यप्राणी आहे. या घटनांचा बरावाईट परिणाम व्यक्तीच्या जीवनावर होत असतो.प्रत्यक्षाप्रत्यक्ष तो घटनामध्ये गुंतला जातो. याचाच अर्थ असा की, व्यक्तीच्याजीवनात अनेक घटना घडतात. त्यामुळेच त्या घटनांना मूल्य प्राप्त होते. घटनेला एकवेगळे परिमाण देण्यासाठी व्यक्ती आणि व्यक्तींचा किंवा पात्रांचा स्वभाव कारणीभूतठरतो. म्हणूनच उच्च दर्जाचे कादंबरीकार आपल्या प्रतिभेच्या आधाराने कादंबरीतीलपात्रांचे अंत:करण उघडे करून दाखवितात. बाह्य जगातील इतर गोष्टीला दर्शनापेक्षामानवी अंत:करणाचा तळ शोधून, त्यातील असंख्य घडामोडींचे दर्शन वाचकासघडविले जाते. हिंदोळयावर' कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा 'अचला' आहे. हे पात्र विभावरी शिरुरकर यांनी विविध प्रतिमांच्या माध्यमातून रेखाटले आहे..

कथेची नायिका-अचला

'अचला' ही कादंबरीची मुख्य नायिका आहे अचला परित्यक्ता असून तिचापती व्यसनी, दुराचारी आणि तिच्या भावनांची कदर न करणारा. एका वेश्येच्या खुनाच्या भानगडीत तो गजाआड गेलेला आहे. कालांतराने अचला शिक्षण घेऊनस्वतंत्र होते. शिक्षिकेची नोकरी करते. आपल्या पायावर उभी राहते पण एकलेपणाचीव्यथा आणि मातृत्वाच्या अनिवार ओढीने तिच्यामनात आंदोलने निर्माण होतात.दरम्यान विराग तिच्या आयुष्यात येतो. त्याच्यावर ती अनुरक्त होते. सर्व वैवाहिकसंबंध झुगारून देवून ती विरागजवळ राहू लागते. मातृत्वाची चाहूल लागताचसमाजाची प्रखर नजर तिला अस्वस्थ करते. तिचे मन हिंदोळयावर हेलकावे खातराहते. परंपरेची जाचक बंधनं, स्त्रीचा होणारा कोंडमारा तिला होणारा मन:स्ताप स्त्रीजीवनाची शोकांतिका होण्यास कारणीभूत आहे.

मातृत्वाची अनिवार ओढ

जेंव्हा माणिक छोटया कुंदेला मांडीवर घेऊन बसते तेंव्हा माणिकचा हेवावाटतो. आपल्याच हाडामांसाचा, आपल्याच भावना-प्रवृत्तींचा तो गोळा मांडीवरघेऊन त्याच्या सुखात आपल्या जीवनाचा कस ओतणाऱ्या माणिकचा तिला हेवावाटणे स्वाभाविक आहे. तिला वात्सल्याची भूक लागते. ती आई होण्यासाठीतळमळते. मी जगलं पाहिजे. माझं असं मनात ठेवलं

पाहिजे. नुसती अचला जगातजगून गेली असे नाही, अचलेची जात जगून गेली पाहिजे. 'माझ्या हाडामासांची,माझ्या प्रवृत्तीची प्रतिष्ठापना जगात झाली पाहिजे. असे तिला वाटत राहते. अचलाही अशी 'स्व'निष्ठ आहे. स्वैराचारी, दुर्व्यसनी विनायकरावापासून आपल्यालाअपत्यप्राप्ती होण्याची कल्पना मनातून ती खूडून टाकते. इथेच अचला एखाद्या स्त्रीवादी नायिकेसारखी आत्मजाणिवेने फुलून येते. म्हणूनच ती स्वावलंबी होण्याचा निर्धार करते.

मायलेकराच्या वात्सल्याचा कोणताही देखावा पाहिला तरी हृदयावर काहीदडपण पडल्यासारखे तिला होई. हळूवार अंगाईगीते ऐकून, माय लेकरांचे प्रेम पाहूनती स्वत:शीच विचार करी व चोरून कोणाला ऐकू जाणार नाही असा निश्वासटाकी जवळ कोणी नाही हे पाहून रडून मन मोकळे करी. हताश होई. 'मातेचा पान्हायायला' फार मोठी किंमत द्यावी लागते. आपल्याच देहात्म्याची एवढीसी प्रतिमाअंगाला बिलगली असता, निर्माण होणारी आत्मियता, कृत्रिमतेने जोडून उत्पन्न होतनाही. ती सधवा असूनही, विधवेत आणि तिच्यात काही अंतर नव्हते. नवरा जिवंतअसूनही पतीच्या दृष्टीने ती कधीच मेलेली होती. ती मात्र स्वत:चा पत्नीधर्म पाळतहोती. अंतरंगांच्या कुविचारांनी ठिक-या उडवून मेलेलं जीणं जगण्यापेक्षा स्वत:लाओळखणे व ध्येर्याने ते कबूल करणे यातच शीलाची सत्यता तिला दिसते. विधवास्त्रीने दुस-या पुरूषावर प्रेम करणे ही शीलभ्रष्टता आहे. ज्याचे दर्शन कित्येक वर्षातनाही अशा शीलभ्रष्ट माणसाला पती मानण्याची कल्पनाच फक्त समाज मानतो.स्त्रीमनाचा मात्र त्यात विचार नसतो. अचला भडकते. मनाच्या हिंदोळ्यावर राहूनतिची तिलाच भोवंड येते. निसर्गाने मनुष्यप्राणी हा एकटा राहण्याठी निर्माण केलानाही असे तिला वाटत राहाते. या एकलेपणाची भयानकता दुस-याची सोबत घेऊन शमविली नाही, तर तो मनुष्य जगावर द्वेषाचे फुत्कारच टाकेल, हे तिला उपजते.

सधवेचे दु:ख सहन करणारी अचला

स्वावलंबी होण्याचा निर्णय घेतल्यावर ती नागपूरास येऊन एका शाळेतशिक्षिकेची नोकरी मिळवते. त्यात रममाण होते. शाळेतील नोकरीच्या मर्यादितविश्वात अचला रममाण होते. तेथे अचलाबाई मुलींचे दैवतच झाली. आपल्याआस्तित्वाला अर्थपूर्णता देण्यासाठी या निरागस विश्वात ती आपला आत्मपत्ययशोधत होती. बाईशी बोलायला मिळावे, बाईनी आपल्या घरी यावे, आपल्यातखेळावे असे मुलींना वाटे. चेत्र महिना, संक्रांत किंवा असेच तिचे सौभाग्य मात्र निस्तेज झाल्याने तिला अशा समारंभाना जावेसे वाटत नसे.

बंडखोर विचाराची अचला

लग्न झाले असूनही पतीच्या बंधनाने अचला तळमळते. आपल्या स्वीत्वाचेसार्थक करण्यासाठी ती उत्सुक असून समाजाच्या कृतिम फोल संकेताविरूद तीझगडते. अचला ही 'वृक्षाच्या आधारावर जगणारी वेल नव्हती' तर ती स्वत:च्यापायावर उभी होती. पतीने टाकलेल्या नातेवाईकांच्या घरी अन्नवस्त्रासाठी केविलवाणेजीणे जगणा-या स्त्रियांत ती बसत नव्हती. स्वत:चे पोट स्वत:च्याच बळावरभरणा-या, पण मन मारून मेलेले जीणे कंठणा-या स्त्रीयांपैकीही ती नव्हती.' क्रत्रीम मानवी संकेतांच्या अन्यायाविरूद्ध लपूनछपून बंड न करता तो अन्याय वेशीवरटांगून उघडपणे न्यायासाठी स्वत:चे मोल देऊन बंड करू पहाणारी ही नायिका होती.स्त्रीत्वाच्या पूर्ण विकासासाठी तिला वैवाहिक आयुष्याची न्याय गरज होती, म्हणूनअनेटची कृती समोर ठेवून समाजाला न घाबरता ती पाऊल उचलते. परंतु देहकोशातमुरलेले पिढ्यानपिढयांचे संस्कार तिला गुदमरून टाकतात. तिच्या विचारांचा हिंदोळाजोराने हालू लागतो, तिला कोणतीही कृती करण्यात हा हिंदोळा अडसर आणतो.

सारांश,

मराठी वाड:मयाचा इतिहासात सुशिक्षित स्त्रियांच्या नवोदित आकांक्षा व भावना यांचे इतके हृदयंगम चित्र दुस-या कुणीच काढले नव्हते; ते काढण्यास एक प्रतिभासंपन्न लेखिका पुढे आली. स्त्रीयांस शिक्षण देवून त्यांचे व्यक्तिमत्त्व जागृत केले गेले. त्यांच्यात नवीन ध्येय व आकांक्षा निर्माण झाल्यात, पण त्यांच्या परीपूर्तीची मात्र समाजाने काहीच सोय ठेवली नसल्याने त्यांची कोमल मने कशी मारली जातात. याचे हृदयस्पर्शी चित्रण विभावरी शिरूरकर यांनी आपल्या कादंबरीत केले आहे. एकंदरीत 'हिंदोळ्यावर' ही कादंबरी एका परीत्यक्तेच्या जीवनातील समस्या आपल्या कादंबरीचा विषय घेवून, आपली समर्थ भाषाशैली, मनुष्य स्वभावाचं सूक्ष्म निरीक्षण, वास्तवाचं समतोल ज्ञान यांच्या आधारे लिहिली असून स्त्री जीवनातील घटस्फोटाच्या आवश्यकतेचा पुरस्कार करणारी आहे. एवढेच नव्हे तर स्त्री-पुरुष समता, विवाह एक बंधन, स्त्रीशिलाविषयक धारणा या बरोबरच मानवी हक्क इत्यादी मूल्यांची पेरणी हिंदोळ्यावर या कादंबरीतून झालेली आहे. समाजातील एका ज्वलंत समस्यांना वाचा फोडणारी ही कादंबरी आहे, आणि तीही मोठ्या धाडसानं! खंबीरपणानं!! निर्भीडपणानं!!!

संदर्भग्रंथ

१) स्त्रीलिखित कादंबऱ्या : प्रेरणा आणि प्रवृत्ती, विद्या देवधर, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्र.आ. १९९२.

२) मराठी कादंबरी तंत्र आणि विकास, बापट-गोडबोले, व्हीनस प्रकाशन पुणे,तृ.आ. १९७३.

३) मराठी कादंबरी : स्त्रियांचे योगदान,प्रमिला भिरूड, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्र.आ. २००३.

४) स्त्री साहित्याचा मागोवा, संपा. मंदा खांडगे व इतर, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे, प्र. आ. २००२.

५) स्त्री-स्वातंत्र्यवादीनी, विसाव्या शतकातील परिवर्तन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वि. आ. २००५.

मध्ययुगीन भारतातील स्त्री शिक्षणाची स्थिती

संशोधक

कदम गणेश पुंडलिकराव

शिक्षणशास्त्र संकुल, स्वा रा ती म विद्यापीठ,नांदेड.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. वैजयंता ना.पाटील

शिक्षणशास्त्र संकुल, स्वा रा ती म विद्यापीठ,नांदेड.

सारांश :

मध्ययुगीन भारतातील शिक्षणावर मुख्यतः परकीय आक्रमणांचा प्रभाव होता. मध्ययुगीन काळात विविध व्यापारी आणि राज्यकर्ते भारतात आले आणि त्यांनी स्वतःची संस्कृती आणि परंपरा तसेच शिकण्याची प्रक्रिया आणली. भारतीय समाजाने ते ज्ञान आत्मसात करून देशातील लोकांमध्ये रुजवले. तथापि, या परकीय विजयांमुळे मध्ययुगीन काळात स्त्रियांच्या स्थितीत घट झाली. भारतातील महिला साक्षरता दर पुरुष साक्षरता दरापेक्षा कमी होता. मध्ययुगीन भारतात स्त्रीशिक्षणाचे खूप नुकसान झाले. स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व परिपोषण करणारे महत्त्वाचे साधन म्हणजे स्त्रीशिक्षण होय. मुलगी शिकली, प्रगती झाली अश्या घोषवाक्याने स्त्री शिक्षणावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे पण हि स्थिती स्वतः मानवाने तत्कालीन परिस्तितीने आणली आहे. स्त्रीशिक्षण हा कोणत्याही समाजजीवनाच्या समृद्धीचा आणि प्रगतीचा मापदंड आहे. घरातील सौन्दर्य हे स्त्री मुले खुलून राहते, पण त्यातही अभागी जीव असतात जे स्त्री विना घराची देखभाल करावी लागते. कोणत्याही समाजाची सांस्कृतिक पातळी ही त्या समाजातील स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, त्यावरून ठरते. त्यामुळे मध्ययुगीन काळात स्त्रिया या अबला होत्या पण सद्यस्थितीचा विचार केला तर ती सबला बनली आहे.

मुख्य संज्ञा: मध्ययुगीन, स्त्री शिक्षण, दुर्बल.

प्रस्तावना:

प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये स्त्रियांचे वर्णन समाजातील दुर्बल घटक म्हणून केले गेले आहे. महिलांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. महिलांना पुरुषापेक्षा कमकुवत समजून स्त्री ला काही येत नाही किंवा कष्टाचे कामे हि स्त्रिया करू शकत नाही असे गणले गेले आहे. ते शारीरिक आणि सामाजिक दोन्ही दृष्ट्या कमकुवत मानले जात होतेपरंतु वास्तविक परिस्थिती वेगळीच होती. त्यामुळे वैदिक काळात स्त्रियांना समान अधिकार दिले गेले असले तरी काळाबरोबर त्यांची परिस्थिती बिघडत गेलीमहिलांना मिळालेला मानसन्मान हा पुन्हा आपोआप कमी झाला.मध्ययुगीन समाजांमध्ये असमानता होती आणि त्यांच्यावर अत्याचारही झाले. समाजविघातक लोकांनी ते करण्याचा प्रयत्न केला आहे.ऐतिहासिकदृष्ट्या, मध्ययुगीन काळ हा भारतातील महिलांसाठी 'अंधारयुग' म्हणून ओळखला जातोकारण याच काळात महिलांना प्रगती करण्यासाठी जास्त संधी असताना प्राचीन युगापेक्षा मध्ययुगीन काळात स्त्री मागे राहिली असल्याचे अभ्यासाअंती दिसून आले. मध्ययुगीन भारतात, स्त्रियांना 'पर्दा', (एक बुरखा) पद्धतीची ओळख झाली. शिवाय समाजात अनेक दुष्कृत्ये सुरू झाली. मध्ययुगीन भारतात बालविवाह, सती, जौहर यांसारख्या सामाजिक वाईट प्रथा त्याचबरोबर स्त्री शिक्षणावर निर्बंध होते. असे असले तरी दक्षिण भारतातील महिलांची स्थिती उत्तर भारतापेक्षा खूपच चांगली होती कारण याठिकाणी भारतीय लोक स्त्री ला लक्ष्मी मनात असत व तिचे संगोपन करत असताना जास्त प्रमाणात काळजी घेत. भारतात वेदकाळी स्त्रियांना मान होता त्यांना मुलांच्या बरोबरीने आवश्यक असे शिक्षण मिळत असे व उपनयनाचा अधिकार होता. उपनयनानंतर त्यांच्या अध्ययनास सुरुवात होई. ब्रह्मवादिनी व सद्योद्वाहा असे विद्यार्थिनींचे दोन प्रकार होते. ब्रह्मवादिनी मुली आजन्म ब्रह्मचर्य पाळून वेदविद्येचा व ब्रह्मविद्येचा अभ्यास करीत. पठणाशिवाय स्वतंत्र लेखनही त्या करीत. त्यामुळे या काळात वेगवेगळी ग्रंथ निर्मिती झालेली आपण अभ्यासतो. मध्ययुगीन भारतातील स्त्री शिक्षण दक्षिण भारतात दिसून आले. त्या वेळी अनेक विचारवंत उदयास आले. जसे: प्रियकेतलादेवी, चालुक्य विक्रमादित्यची राणी आणि जक्कीअब्बे इत्यादि. शिवाय समाजातील वाईट प्रथा व वाईट चालीरीती या फक्त हिंदू धर्मातच/ समाजातच होत्या. इतर धर्म जसे की मुस्लिम, जैन आणि बौद्ध धर्माने स्त्रियांना स्वातंत्र्य दिले. त्यांना शिक्षणाचे स्वातंत्र्य देण्यात आले आणि त्यांना अधिक उदारमतवादी दृष्टिकोन देण्यात आला. त्यांना हवे ते शिक्षण

देण्यात आले व पाहिजे त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. मध्ययुगात भारतीय स्त्रियांची दुर्दशा खूप तीव्र होती. मुस्लिमांच्या येण्याने मध्ययुगीन काळात भारतातील स्त्रियांच्या त्रासात भर पडली. महिलांना 'झेनाना' प्रॅक्टिस करायला लावली. याशिवाय मुस्लिम महिलांना समान शिक्षण मिळण्यापासून रोखले जात होते व त्यांच्यावर वेगवेगळे निर्बंध घालण्यात आले होते. मध्ययुगीन भारतातील स्त्रीशिक्षण मुस्लिम स्त्रियांमध्ये धर्मामुळे मर्यादित होते कारण मुस्लिम धर्मात महिलावर जास्त प्रमाणात बंधने होती. मुस्लिम महिला निरक्षर होत्या; तथापि, स्त्रियांच्या काही वर्गांची स्थिती अधिक चांगली होती आणि त्यांना उच्च स्तरावरील शिक्षण दिले गेले.मुस्लिम राजवटीत, मध्ययुगीन भारतात स्त्री शिक्षण मर्यादित होते कारण मुस्लिम पुरुषांना देखील सामान्यतः कमी शैक्षणिक प्राप्ती होती व तेदेखील जास्त शिक्षित नव्हते. याउलट मध्ययुगीन काळात अनेक महिलांनी कला, साहित्य, संगीत या क्षेत्रांत प्रावीण्य मिळवले त्याचबरोबर लेखन कार्यात भर घातली. मध्ययुगीन काळातही स्त्रिया शासक म्हणून कार्यरत होत्या व त्यांनी स्वतः शासक बनून काही राज्य स्वतंत्रपणे चालवले. मध्ययुगात दिल्लीच्या तख्तावर राज्य करणारी रजिया सुलतान ही एकमेव महिला सम्राट होती. गोंड राणी दुर्गावती हिने पंधरा वर्षे राज्य केले, ती मुघल सम्राट अकबराचा सेनापती असफ अली यांच्याशी लढाईत हरण्यापूर्वी ती सम्राट अकबराला आपल्या राज्यात सत्ता स्थापित करू दिली नाही.

मुसलमानी अंमलात (अकरावे ते सतरावे शतक) म्हणजेच मध्ययययुगात स्त्री- शिक्षणाची पीछेहाट ही भारतीय समाजाचे अर्धे अंग विकल करून गेली व भारतीय महिलांना मागे ठेवली.मध्ययुगीन काळात शिक्षणाचा मुख्य उद्देश ज्ञानाचा प्रसार आणि इस्लामचा प्रसार हा होता. शिक्षणाच्या या युगामागील उद्देश इस्लामी शिक्षणाची तत्त्वे आणि सामाजिक परंपरांचा प्रसार करणे हा होता. लोकांना धार्मिक वृत्तीचे बनवणे हा शिक्षण पद्धतीचा उद्देश होता. साधारणपणे लग्नानंतर त्यांचा सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांशी संपर्क तुटला. समाजातील खालच्या स्तरातील महिलांना व्यावहारिकदृष्ट्या शिक्षण नव्हते. तरीही असे म्हणता येणार नाही की मध्ययुगीन काळात स्त्री शिक्षण भारतात पूर्णपणे अस्तित्वात नव्हते. या काळात स्त्रियांच्या शिक्षणाबाबतीत विशेष प्रयत्न झाले नाहीत मात्र बाबर बादशाहाची कन्या गुलबदन बेगम हिने हुमायूननामा हा ग्रंथ लिहिला. तो एक ऐतिहासिक दस्तऐवज ठरला. असे ग्रंथ ही अपवादात्मक सापडले. औरंगजेबाची मुलगी झीबुन्निसा हिने 'मुखफी' (दडलेली) या नावाने उर्दू कविता केल्या. शाहजहानची मुलगी जहांआरा, हिने तत्कालीन मुस्लिम साधूंची माहिती 'मुस्लिम अल्-अर्वाह' या शीर्षकार्थाने संग्रहित केली. या शाही घराण्या-तील काही उच्चभ्रू स्त्रिया सोडल्या, तर एकूण या काळात स्त्रिया शिक्षणापासून वंचितच राहिल्या. या काळी मात्र राजपूत महिलांत काही विधवा राण्यांनी उत्तम प्रकारे प्रशासन करून मुस्लिम शत्रूबरोबर लढाया केल्याची उदाहरणे आढळतात. त्यांपैकी कुमारदेवी (मेवाड), कर्णवती (चितोड) व जवाहिराबाई या कुशल प्रशासक असून त्यांनी लष्करी प्रशिक्षण घेतले होते व त्यांनी राज्य चालवले आहे. मराठ्यांच्या राजघराण्यांतील स्त्रियांनीही युद्धकला आणि राज्यकारभार यांतील रीतसर शिक्षण घेतल्याचे दिसून येते. यामध्ये झांशीची राणी लक्ष्मीबाई, कोल्हापूरच्या महाराणी ताराबाई, इंदूरच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची उदाहरणे प्रसिद्ध आहेत. १८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाल्यावर आणि इंग्रजांची राजवट प्रस्थापित झाल्यानंतर वैचारिक क्रांती होऊन या सर्वांत बदल झाला. इतिहासकालीन भारतामध्ये राजपूत स्त्रियांनी युद्धकलेचे शिक्षण घेतल्याचे पुरावे आहेत. राजेशाही पद्धत याला जबाबदार मानली जाते कारण शिक्षण किंवा इतर प्रकारच्या कला जर त्या काळात स्त्रीयांना दिली गेले असते तर बाकीच्या महिला देखील शिखू शकले असते. सुरुवातीच्या मध्ययुगीन काळात चर्चने शिक्षण दिले आणि दुर्लक्ष केले. फ्रँकिश राजा शार्लेमेन हे मध्ययुगीन युरोपमधील औपचारिक शिक्षणाचे समर्थन करणारे पहिले होते. मध्ययुगीन शिक्षण संस्था तीन प्रकारच्या होत्या:

1. व्याकरण शाळा,
2. मठ शाळा आणि
3. विद्यापीठे.

मध्ययुगीन भारताने अनेक महत्त्वाच्या शिक्षण केंद्रांचे अस्तित्व पाहिले. यामध्ये दिल्ली, आग्रा, जौनपूर, लाहोर, बिदर, गौर, पाटणा, ढाक्का, मुर्शिदाबाद, गुलकोंडा, हैदराबाद, अहमदाबाद, मुलतान, काश्मीर, लाहोर, अजमेर आणि इतरांचा समावेश होता. मध्ययुगीन काळात दिल्ली हे शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र होते. शाळा म्हणून ज्याचे वर्णन करता येईल, त्यामध्ये फार कमी मुली जाऊन शिक्षणाचा आस्वाद घेऊ शकल्या. थोर कुटुंबातील मुलींना घरी किंवा दुसऱ्या कुलीन व्यक्तीच्या घरी शिकवले जात असे (जसे आज Home Tuition). श्रीमंत घराण्यातील काही मुली शिक्षणासाठी परदेशात गेल्या. शेतकरी

महिलांवर मुलांची काळजी घेणे, गुरांना चारा पानी करणे, अन्न तयार करणे आणि पशुधन सांभाळणे यासह अनेक घरगुती जबाबदाऱ्या होत्या. वर्षातील शेतीकामातील सर्वात व्यस्त काळात, जसे की कापणी, पेरणी, खुरपणी, खुडणी अशावेळी स्त्रिया अनेकदा त्यांच्या पतीसोबत शेतात पीक शेतात राबताना दिसत. ज्या हिंदू धर्माच्या शाळांमध्ये संस्कृत हे शिक्षणाचे माध्यम होते आणि मुस्लिम धर्माच्या मकतबांची उपस्थिती, जिथे फारसी हे शिक्षणाचे माध्यम होते, त्यामुळे उर्दू या नवीन भाषेची निर्मिती झाली.लॅटिन भाषा आणि व्याकरण, वक्तृत्व, तर्कशास्त्र आणि गणित आणि विज्ञानाच्या मूलभूत गोष्टी हे सर्वात महत्त्वाचे विषय होते. ते ज्योतिष आणि तत्वज्ञान देखील शिकले. सर्व धडे रोमन आणि जर्मनिक स्त्रोतांच्या आधारे तयार केले गेले तसेच पुराव्याच्या अनुपस्थितीमुळे शिक्षण अंधश्रद्धा आणि विश्वासांवर केंद्रित केले गेले. कारण एखादी गोष्ट विस्तृतपणे पटवून सांगायची असेल तर त्याच्याकडे पुरावे नव्हते. त्यांना वाचन, लेखन आणि प्राथमिक अंकगणित शिकवण्यात आले कारण त्यांचा फक्त व्यवहार चालला पाहिजे हाच त्यामागचा दृष्टिकोण होता. याशिवाय त्यांना अरबी लिपी, फारसी भाषा आणि लिपी यांचे शिक्षण देण्यात आले त्यामुळे ते इतर भाषेचा अभ्यास करून उपलब्ध असलेले साहित्य वचन करू लागले. पैगंबर आणि मुस्लिम 'फकीर'च्या कथाही मुलांना सांगितल्या. मुलांना लेखन आणि संभाषण कलेचेही ज्ञान देण्यात आले. मुली मातांना घरगुती कौशल्ये, साध्या वैद्यकीय कला शिकवल्या आणि जेव्हा ते करू शकले तेव्हा प्राथमिक वाचन आणि लेखन याची ओळख करून देण्यात आली. आईची मर्यादित शिक्षणाची पातळी तिच्या मुलीमध्ये टिकून राहते. शेतकरी साक्षर होणे अत्यंत दुर्मिळ होते. मनोरच्या काही अधिपतींनी दासांना शिक्षित करण्यावर बंदी घालणारे कायदे केले होते कारण दास जर शिक्षण घेतले तर ते आपली कामे करणार नाहित या भीतीने त्यांच्यावर विवध बंधन व कायदे कारण्यात आले. सहसा श्रीमंत कुटुंबातील मुलेच शाळेत जात असत व शिक्षण घेत असत. १४ व्या शतकात तीन मुख्य प्रकारच्या शाळा होत्या: प्राथमिक गाण्याची शाळा, मठ शाळा आणि व्याकरण शाळा.स्त्रियांसाठी मध्ययुगीन शिक्षण सामान्यत: कॉन्व्हेंटशी जोडलेले होते. संशोधनातून असे दिसून आले आहे की अनेक सुरुवातीच्या महिला शिक्षिका मुलींच्या शाळांच्या प्रभारी होत्या. इंग्लंडमधील मध्ययुगाच्या उत्तरार्धात, मुलीला घरात, घरगुती सेवेत, शाही किंवा कुलीन घराण्यात किंवा कॉन्व्हेंटमध्ये आयोजित केलेल्या वर्गात शिक्षण मिळू शकत होते. मध्ययुगीन शहरांच्या उत्तरार्धात अनौपचारिक प्राथमिक शाळांचे काही पुरावे आहेत, जिथे मुलींना पॅरिश धर्मगुरू किंवा कारकूनांकडून काही शालेय शिक्षण मिळाले होते. मध्ययुगाच्या अखेरीस, काही फ्रेंच आणि इंग्रजी नोंदींमध्ये महिलांचा शालेय शिक्षक म्हणून उल्लेख आढळतो. मुलींना दिलेली सूचना सहसा तोंडी असायची.मुलीं स्वतःहून वाचू शकत नाहीत तोपर्यंत मजकूरशिक्षक काही वेळा मोठ्याने वाचतात. आर्थिक स्थिती आणि आर्थिक परिस्थिती असलेली कुटुंबे मुलींना घराबाहेर शिक्षणासाठी ननरीकडे पाठवू शकतात. तेथे, त्यांना अध्यात्मिक ग्रंथ, धर्मशास्त्रीय अभ्यास, पूर्वजांचे जीवन, इतिहास आणि इतर पुस्तके यासह वाचन सामग्रीची विस्तृत श्रेणी अभासाअंती भेटू शकते.

मध्ययुगीन काळ भारतात मुस्लिम आक्रमकांच्या प्रवेशाने सुरू होतो. हा काळ दिल्ली सल्तनतच्या कालखंडापासून मुघल काळापर्यंत सुमारे 500 वर्षांचा होता. भारतीय इतिहासात, मध्ययुगीन काळ हा स्त्रियांसाठी "अंधारयुग" मानला जातो.अनेक परकीय आक्रमण, ज्यामुळे स्त्रियांच्या स्थितीत घट झाली. खूप कमी या काळातील स्त्रियांची नावे आढळतात ज्यांनी राज्यकर्ते बनले आणि त्यांचे प्रदर्शन केले. एक म्हणजे दिल्लीच्या तख्तावर बसलेली रझिया सुलतान, गुलबदन बेगम, नूरजहाँ, जहाँ आरा, मुमताज महल इतर महिला. गुलबदन बेगम यांनी काव्यात्मक प्रतिभा उत्तीर्ण केली, नूरजहाँ ही प्रसिद्ध मुस्लिम राणी होती, शहाजहानची राणी जी सौंदर्य आणि मेंदूचे दुर्मिळ उदाहरण होती, हुमायून-नामा, जे तिने लिहिले, दुसरी मुमताज सौंदर्य आणि शौर्य यांचा मिलाफ होती. त्यांच्या बौद्धिक प्रतिभा, विविध क्षेत्रातील प्रतिभा, सौंदर्य मूल्ये आणि सक्रिय सहभागामुळे प्रसिद्ध बनल्या.मध्ययुगीन भारताच्या इतिहासात वीर कर्तृत्व असलेल्या काही महिला आहेत. तारणहार म्हणून चांदबीबी, औरंगजेबाच्या हल्ल्याचा प्रतिकार करणारी ताराबाई, दक्षिण भारताची हिरवी स्मृती म्हणून ओळखली जाणारी अहिल्याबाई होळकर या हुशार प्रशासक आहेत. जहाँराह सारख्या मुघल राजकन्या, रोशनारा, झेबुन्निसा या कवयित्री होत्या, त्यांनी त्यांच्या समर्थनासाठी सक्रिय भूमिका बजावली हि त्यांच्या शौर्याची काही उदाहरणे.बहुतेक राजकन्या किंवा उच्च अधिकाऱ्यांच्या मुली या कला, चित्रकला आणि कला यांमध्ये निपुण होत्या, इतिहास सांगतो की राजपूत राजकन्यांना योग्य ज्ञान दिले गेले. (प्रशासन, कला, धनुर्विद्या, कविता, राजकारण इ.) राणी पद्मावती, जोधाबाई, काही या संदर्भात प्रसिद्ध नावे

आहेत ज्यानी वरील कला हस्तगत करून स्वतःची धमक दाखवली. शाहजहानची कन्या जहाँआरा ही कविता मध्ये उत्कृष्ट होती. मुघल काळात इतरही काही स्त्रिया प्रसिद्ध होत्या. त्यापैकी राष्ट्रमाता जिजाबाई (छत्रपती शिवाजी महाराजांची आई) एक मजबूत डोक्याची स्त्री होती. ज्यांनी आपल्या मुलाला तयार करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली.मुघल राजवटीविरुद्ध योद्धा तयार करण्याचे महत्वपूर्ण कार्य या मातेने केले. स्वराज्य निर्माण करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या आईसाठी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोऊन मातेला आपल्या पुत्रांबद्दल अभिमान वाटावा असे कार्य करणारे छत्रपती शिवाजी महाराज ही देखील तत्कालीन परिस्थितीत आदर्श होते. मुघल काळात स्त्रियांच्या जीवनात अनेक बदल घडवून आणले आणि तिला पुरुषांपेक्षा कनिष्ठ व अधीनस्थ बनवले. मुस्लिमांच्या आगमनाने स्त्रियांचा दर्जा घसरला, समाज हा पुरुषप्रधान होता जो पुरुषी वर्चस्वाला स्वायत्तता देतो. सती प्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाह विविध चालीरीती इत्यादी स्त्रियांवर लादण्यात आले.या काळात महिलांना केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिकदृष्ट्या देखील पुरुषांपेक्षा कनिष्ठ मानले जात होते. त्यांना वेदांचा अभ्यास करण्यास नकार देण्यात आला आणि ते उच्च शिक्षणासाठी जाऊ शकले नाहीत. तरी अशी काही उदाहरणे आहेत की दरबारातील स्त्रिया आणि राणीच्या दासी याबाबतीत सक्षम होत्या,खूप चांगले संस्कृत आणि प्राकृत श्लोक तयार करत होत्या.प्रसिद्ध भारतीय तत्वज्ञानी 'वात्स्यायन' यांच्या मते, स्त्रीने स्वयंपाक करणे, सुत कातणे, दळणे यात पारंगत असावे असे सांगितले. भारतीयांना त्यांच्या स्त्रियांचे रानटी मुस्लिम आक्रमकांपासून संरक्षण करायचे होते. स्त्रियांचा दर्जा आणि स्वातंत्र्य कमी होण्याचे आणखी एक कारण ते मूळ होते. प्रेम आणि आंतरजातीय विवाहांना परवानगी नव्हती.आपल्या मुलीसाठी योग्य वर सापडला नाही तर मग तिला लग्न करण्याची परवानगी देण्यात आली. पतीच्या मृत्यूनंतर सती बंधनकारक होती. स्त्रिया पुरुष सदस्यांवर अवलंबून होत्या. जर पती सोडून गेला, पतीने जरी दोषी पत्नीचा त्याग केला,नपुंसक झाला किंवा मरण पावला, तर स्त्रियांना पुनर्विवाह करण्याची परवानगी होती. काही अभ्यासकांच्या मते स्त्रियांना संपत्तीचे अधिकार होते आणि महिलेलात्याची मालमत्ता मिळण्याचा अधिकार होता. विधवा, विशेषत: हिंदू विधवांचे जीवन फारच कठीण आणि दयनीय होते. विधवांनी त्यांच्या नावाने धार्मिक जीवन जगायचे होते. कोणतेही स्वातंत्र्य, सामाजिक संपर्क आणि सांसारिक सुख हि विधवा स्त्री उपभोगू शकत नव्हती. विधवेवर बंधने जास्त प्रमाणात आली होती, त्यांची अवस्था अत्यंत दयनीय होती. पुनर्विवाह हि संकल्पना हिंदू धर्मामध्ये नव्हती पण मुस्लिम धर्मात ती प्रचलित होती. हिंदूंमध्ये पुनर्विवाह करणारी स्त्री पापी समजली जायची. महिलांच्या मोठ्या संख्येने सती जाण्याची कारणे समाजाला याबद्दल चांगली कल्पना नव्हती, विधवांवरची ही क्रूरता मुख्य होती. विधवांना वेगळी खोली, वस्त्र, अन्न-पाणी हे वेगळं दिल जायचं.शत्रूंपासून वैभव आणि सन्मान वाचवण्यासाठी जौहरप्रथा पाठोपाठ सुरू झाली. उच्चवर्णीय स्त्रिया, विशेषतः राजपूतांमध्ये राणी पद्मावती हे या प्रथाचे उदाहरण आहेजे महिला आणि संपूर्ण कुळाच्या पावित्र्याचे रक्षण करण्यासाठी सन्मानावर उच्च पारितोषिक ठेवण्यासाठी ओळखले जातात. सतीप्रथा हे देखील त्या काळात स्त्रियांवर झालेल्या अन्यायाच्या उदाहरणांपैकी एक होते. हिंदूंमध्ये विधवांची दुर्दशा होती, विधवा म्हणून जगण्यापेक्षा सती जाणे चांगले मानले गेले. समाज जरी 'मेधातीती'चे मत मानत असला तरी बाकीचे मत भिन्न होते कारण समाजातील या अनिष्ट चालीरीती व अंधश्रद्धा याना कंटाळून सती जीवन जगण्यापेक्षा आत्महत्या करत असत.काही संशोधकांचे म्हणणे आहे की हिंदूंनी त्यांच्या कपड्यांमध्ये, अन्नामध्ये काही बदल स्वीकारले. मुस्लिमांच्या प्रभावातील सवयीमुळे काही प्रमाणात मुस्लीम महिलांनी आनंद लुटला होता, सामाजिक चालीरीती लोकसंख्या पर्दा, घटस्फोट इत्यादी काही सामाजिक वाईटांपासून मुक्त राहिली. स्त्रिया पुनर्विवाह करण्यास स्वतंत्र होत्या. घटस्फोट आणि पुनर्विवाहाच्या संदर्भात अधिक स्वातंत्र्य हे त्यांना असू शकते. पतीच्या निधनानंतर पत्नीला त्याच्या संपत्तीमध्ये वाटा मागण्याचा अधिकार नव्हता.प्रदीर्घ अंतरानंतर भक्ती चळवळीच्या उदारमतवादी प्रवाहाने स्त्रियांची दारे उघडली. संतांच्या मदतीने मध्ययुगीन भारतातील स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी त्यांनी मदत केली. महिलांना पुरुषप्रधान समाजात स्वीकारण्यासाठी विविध सामाजिक कार्य केले. कर्नाटकच्या दक्षिणेकडील प्रदेशातील अक्का किंवा महादेवी म्हणून ओळखले जाणारे अक्कमहादेवी मीराबाई त्यांचे भक्त होते. गायन, भजन, वादन, कीर्तन या माध्यमातून समाजामध्ये बदल घडून आला.

समारोप:

मध्ययुगीन कालखंड हा महिलांसाठी अंधारयुग होता. जास्त जुलूम, अन्याय, अत्याचार, अतिशय वाईट जाचाला कंटाळून या काळातील महिला स्वतः जीवन संपवत होत्या. पुरुषाच्या बरोबरीचे स्थान महिलांना नव्हते. महिलांना या काळात दुय्यम स्थान दिले गेले त्यामुळे स्त्री हि मध्ययुगात विकास साधू शकली नाही व स्वतःचा दर्ज राखू शकली नाही.

शिक्षणाची ओढ व याविषयी जाणीव नव्हती किंबहुना ती त्यांना होऊ दिली गेली नाही.संत वाङ्मय जसे बहरत गेले तसे समाजात विविध चांगल्या गोष्टी घडत गेल्या. भजन, कीर्तन, संगीत,भक्ति, आराधना, इत्यादि मध्ये स्त्री गुंतून राहिली व हळूहळू याच्या माध्यमातून ती विचार करू लागली. महाराष्ट्र राज्य हे स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रातील प्रागतिक राज्य असून सावित्रीबाई फुले दत्तक योजनेची अभिनव कल्पना महाराष्ट्रात कार्य-वाहीत आणली गेली. त्यामुळे बारावीपर्यंतच्या मुलींना मोफत शिक्षण देण्याचा पायंडा महाराष्ट्रात प्रथम पाडला गेला. मुलींसाठी प्रत्येक तालुक्याच्या गावी वसतिगृहे बांधण्याचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्याने हाती घेतला आहे. शाळेतील मुलीसाठी मोफत पास दिल जातो जेणेकरून मुली या शिक्षणापासून वंचित राहू नयेत. पुढील काळात शिक्षणाने हे मुख्य कार्य केले व पुढे सर्वोच पदावर स्त्री विराजमान होताना आपण पाहतो हे केवळ याचेच द्योतक आहे. धन्यवाद!

संदर्भसूची :

1. मध्ययुगीन भारताचा इतिहास,
2. स्त्री चळवळ,
3. नारी अबला कि सबला.
4. मध्ययुगीन कालखंड
5. प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहास
6. स्त्री शिक्षणाची वाटचाल, मुंबई (१९६८)
7. Women's Education in India -Agrawal s.p.(2001)

मराठी लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

प्रा. बबन अण्णासाहेब गित्ते

कै.सौ. शेषाबाई सीताराम मुंढेकला महाविद्यालय, गंगाखेड. जि. परभणी. पिन-४३१५१४.

मराठी लोकसाहित्यातील स्त्री ओवी गीते ही संख्येच्या दृष्टीने व वाड्.मयीन मूल्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असा भाग आहे. आपण स्त्री ओवी गीतातील कौटुंबिक ओव्यातील प्रतिमा पाहणार आहोत. स्त्रियांनी देवादिकांबद्दल, देवांची भक्ती करण्यासाठी अंतिम सुखाची अशी ईश्वर प्राप्ती करुन घेण्यासाठी अनेक ओवीगीते लिहिली आहेत. त्यातील प्रतिमांचा आपण विचार करु.

भारतीय संस्कृतीला धर्माचे अधिष्ठान आहे. महाराष्ट्रात ज्ञानेश्वरादी संतांनी स्थापित केलेल्या भागवत धर्माचा खोल ठसा उमटलेला आहे. सहिष्णुता, माणुसकी, क्षमाशिल वृत्ती, दुसऱ्याच्या दु:खाने विव्हल होणारे मन हे सर्व भागवत धर्मात दिसते. अध्यात्मिक क्षेत्रात भागवत धर्माने लोकशाही प्रस्थापित केली होती. कोणत्याही जातीच्या माणसाला परमेश्वरावर भक्ती करण्याचा अधिकार आहे. फक्त त्याचे चित्त शुद्ध पाहिजे. 'भाव तेथे देव' हा भक्तीमार्गाचा साधा सरळ उपाय संतांनी सांगितला व समाजाच्या तळागाळापर्यंत, सर्व थरांत या उपदेशाचा प्रचार या भागवत धर्मीय संतांनी केल्यामुळे संपूर्ण समाजावर संतांच्या शिकवणीचा परिणाम झाला. त्यामुळे बहूजन समाजाचे मन पराकोटीचे श्रद्धाळू व परंपरा प्रिय बनले. दुराचार व सदाराच्या झगड्यात नेहमी सदाचाराचाच विजय होतो. हे या श्रद्धाळू पापभिरु मनाने पक्के ध्यानात ठेवले. जिवनातील उदात्त मूल्ये, सदाचार वगैरेची इतकी विलक्षण पक्कड या मराठी मनावर होती की, ओवी गीतातून हा विचार स्पष्टपणे प्रगट झाला आहे. देवादिकांविषयीच्या ओव्यांत स्पष्टपणे दोन भाग आढळतात.

१) देवाची अनन्य भक्ती करुन संसारातून पार पाडण्यासाठी व्यक्त केलेल्या भावना.

२) देवादिकांचे मानुषी करण करणे म्हणजे देवा दिकांच्या निमित्ताने स्वत:च्या भावनांचे प्रगटीकरण करणे.

आता आपण अनुक्रमाणे देवदेवतांसाठी वापरलेल्या प्रतिमांचा विचार करु.

'उगवला नारायण'

स्त्री ओवी गीतांतून भगवती उषेला आळवून तिच्याकडून घर धन्याला व मुलाबाळाला उदंड आयुष्य मागितले आहे. सूर्यदेवाचा रथ आल्याची चाहूल लागल्यामुळे कोंबडा बाग देतो, तुळशी बनात कृष्णगोपी संगे खेळायला जातो राऊळात काकड आरती होते. हरिनामाचा गजर होतो, वाजंत्री तुताऱ्यांच्या गजरात देवांची आंघोळ होते वगैरे सुंदर कल्पना स्त्रियांच्या ओवीगीतांत सापडतात.

उगवला नारायण | उजेड पडला धरणी |

देवाच्या रथाला | कशा नाजूक हरिणी ||

उवगतीचा सोनेरी प्रकाश आणणाऱ्या सूर्यदेवाच्या रथाला नाजूक हरिणी जोडल्या आहेत. कारण सकाळची कोवळी, मुलायम किरणे हरिणीशी साम्य दाखविता ता. जसा सूर्यवर चढेल तया सूर्याच्या रथाला सात घोडे जुंपले आहेत अशी कल्पना केली जाते. पण सूर्योदयकाळी सूर्याच्या रथला हरिणी जोडल्या आहेत ही प्रतिमा सूर्योदयाचे सोज्वळ सौंदर्य व्यक्त करणारी आहे.

उगवला सूर्य | उगवता मी देखिला |

कुंकवाचा पुडा माझ्या पदरी फोडिला ||

सतत संसार व परमार्थ यांची सांगड घालण्याचा प्रयत्न मराठी माणसाने केला आहे. एकीकडे हे श्रद्धाळू मन सूर्याच्या तेजाने दिपून नतमस्तक झाले आहे व दुसरीकडे हे संसारी मन अक्षय सौभाग्याच्या अपेक्षेने सूर्याची करुणा भाकत आहे. 'कुंकवाचा पुडा' यात अक्षय सौभाग्याचा भाव व्यक्त झाला आहे.

पतिविरहाचे दु:ख सोसताना ज्या वेदना स्त्रियांना भोगाव्या लागतात त्या सीतेला ही झाल्या असे कल्पुन राम विरहाने सीतेसारखी नाजूक, सुंदर स्त्री सुकली आहे असे वर्णन करुन सीतेचे नाजूक सौंदर्य व सुकण्याची क्रिया जाई या दृक प्रतिमेतून व्यक्त केली आहे. लोकजीवनातील स्त्री जीवन कष्ट, अपमान व श्रमाचे द्योतक आहे म्हणून सीतेचे जीवन व सामान्य स्त्री जीवन यात पुष्कळ साम्य असल्यामुळे सीतेबद्दल आपुलकी वाटून अनेक ओव्या रचल्या गेल्या ओहत. भूमिकन्या सीता व सर्वच भूमिकन्या – शेतकऱ्यांच्या स्त्रिया-एकरुपच आहेत. कारण या सामान्य स्त्रियांसारखे रामायणातील सीता सासू व पतीचा छळ मूकपणे सहन करते. तिला काही कळत नाही म्हणून नव्हेतर परिस्थितीने माणसाची पारख शिकवली आहे म्हणून ती निमूट राहते. तिच्या सहनशीलतेमुळे व सौजन्यामुळे ती काही बोलत नाही. म्हणून स्त्रियांनी ओवी गीतांत सीतेच्या भावनांचे वर्णन अतिशय उत्कटपणे केले आहे. कारण स्वानुभवातून आलेला तो खळाळता प्रवाह आहे हे खालील उदाहरणावरुन स्पष्ट होईल.

रामासारखा आदर्श पती मिळूनही केवळ कैकयीच्या सासुरवासामुळे सीतेला पती सुख मिळाले नाही असे त्यांना स्वानुभवावरुन वाटते. तसेच सर्वच स्त्रियांना सासुरवास भोगावा लागतो हे 'वाटून दिला गहू' या प्रतिमेतून उत्तमपणे व्यक्त केले आहे.

म्हणून रामाचा धिक्कार करीत त्या म्हणतात -

राम म्हणून राम | नाही सीतेच्या तोलाचा |
हिरकनी सीताबाई | राम हलक्या दिलाचा ||

हलक्या कानाचा, हलक्या दिलाचा रामसीतेच्या तोलाचा नाही हे त्या सीतेच्या ठिकाणी स्वत:ला कल्पून सांगतात.

राम लक्षुमण | दोघे दक्षिणेचे दिवे |
सावळी सीताबाई | उत्तरी वीज लवे ||

या ओवीत रामलक्ष्मणाने दक्षिणेकडील रावणादी राक्षसांचा संहार करुन विजयाचे दीपप्रज्वलित केले व दुराचाराचा, अन्यायाचा अंधार नाहीसा केला असा अर्थ राम लक्ष्मणाला 'दक्षिणेचे दिवे' ही प्रतिमा वापरुन व्यक्त केला आहे. सीतेचे पातिव्रत्याचे तेज लखलखत्या विजेच्या प्रतिमेतून दाखवले आहे. रावणाच्या घरी अनेक दिवस राहून, त्याच्या कोणत्याही आमिषाला बळी न पडता सीतेने आमरण आपले पातिव्रत्य टिकवले हा भावार्थ यातून व्यक्त झाला आहे. 'दक्षिणेचे दिवे' व उत्तरेची वीजयांचा अर्थाअर्थी काही संबंध दिसत नाही. पण राम लक्ष्मण यांचा पराक्रम व सीतेचे उज्वल पावित्र्य हे गुण या दोन्ही प्रतिमांतून फारच उत्कृष्ट पणे व्यक्त झाले आहे. ही ओवी सुंदर प्रतिमांचे उदाहरण म्हणून सांगता येईल.

जेव्हा रामाने सीतेचा त्याग केला व तिला एकटीला वनात आणून सोडले त्यावेळी सीतेचा शोका वेग म्हणजे अरण्यरुदन असून ही बोरी बाभळीसारख्या काटेरी झाडांनासुद्धा पाझर फुटला व ती झाडे सीतेचे सांत्वन करु लागली. कारण अरण्यात वृक्षाशिवाय कोण सगा सोयरा असणार? बोरी बाभळी ही प्रतिमा वापरुन सीतेच्या दु:खाची तीव्रता वर्णिली आहे. तसेच प्रजाहित दक्ष राम हा पती कर्तव्यापासून ढळलाव 'बोरीबाभळी'पेक्षा काटेरी व पाषाणापेक्षा कठोर बनला हा भावही यातून व्यक्त झाला आहे. 'बोरी बाभळी' बऱ्या पण राम नको ही स्थिती यातून वर्णिली आहे.

सक्रान्तीचा सण | सीताबाचा झाला वनी |
तिनं ववसिल्या | बोरीबाभळी माया भैनी ||

अयोध्येची राणी सीता सक्रान्तीचा सण एकटीचा वनात करताना तिच्या आजूबाजूला असणाऱ्या बोरीबा भळींना आया बहिणी समजून वाणवसा करते ही कल्पना ऱ्हदय हेलावणारी आहे. कितीही संकटात व प्रतिकूल परिस्थितीत स्त्रिया असल्या तरी सुवासिनिंनी करावयाची व्रतवैकल्ये व विधी त्यांना चुकविता येत नाहीत. म्हणून सीतेने निबिड वनात वाण वसा

केला हे सांगून पारंपरिक विधीवरील आपली निष्ठा व्यक्त केली आहे. परस्त्रीचे हरण म्हणजे दु:खाचे कारण असून लंकेचा विनाश आहे हे मंदोदरी चांगले जाणते.

मंदोदरी म्हणे | रामनवतीच्या भरात |
आगीची पेटी | सीता घातली घरात |

सीतेचे हरण लंका दहनाला कारणीभूत होते म्हणून ती सीतेला आगीची पेटी असे म्हणते. राम हा तरुण असून पराक्रमी आहे म्हणून आपल्या पत्नीचे हरण करणाऱ्याचा विनाश केल्याशिवाय तो राहणार नाही हा भाव वरील ओवीतून व्यक्त झाला आहे. रामाबरोबर त्याचा दूत मारुतीचे पण वर्णन स्त्री ओव्यातून आले आहे.

वेशीमध्ये उभा | वेशीबाई तुझा पती |
अंशी शेंदराची उटी | नाव त्याचे मारवती ||

प्रत्येक गावाच्या वेशीवर मारुतीचे सुंदर मंदिर असते. या वास्तवाचा आधार घेऊन वेशीवर उभा असणारा मारुती म्हणजे वेशीबाईचा पतीच होय ही कल्पना मोठी मजेशीर आहे. आजन्म ब्रह्मचारी असणाऱ्या मारुतीला वेशीबाईचा पती म्हणणे वस्तुस्थितीचा अतिशय विपर्यास करणे होय. वेशीचे व मारुतीचे 'सान्निध्य' या एकाच सादृश्यावरुन मारुतीला वेशीचे पती म्हणणे म्हणजे येथे सारासार बुद्धी वापरली नाही हे सिद्ध करणे होय. 'जे सूचलं ते रचलं असेच ओवी गीताचे स्वरुप असल्यामुळे अशाप्रकारचे अनेक दोष ओवी गीतांत दिसतात हे अमान्य करता येणार नाही.

महाराष्ट्राचे दैवत-विठोबा रखुमाई –

ही तर मराठी माणसांची प्राणप्रिय दैवते होत. विठोबा हा सर्वांचा स्वीकार करणारा, सर्वांना तारणारा वत्सल मातेचे प्रेम देणरा विठोबा माऊली आहे. श्री. रा. चि. ढेरे विठ्ठलाबद्दल बोलतांना म्हणता ता, वैदिक परंपरेशी स्थूल संबंध राखणारा व अवैदिक परंपराशी आपले काही नाते नाही असे भासविणारा संतांचा विठ्ठल अंतरंगदृष्ट्या बुद्धाच्या करुणेने भारला आहे. बुद्धाच्या ऱ्हदय धर्माशी जवळीक साधणारे त्याचे हे अंतरंग वत्सल मातृत्वाशी समरुप असल्यामुळे तो पुरुष असूनही संतांनी त्याला 'माऊली' मानले आणि स्त्रीपुरुष भिन्नतेच्या पलिकडे असणारे आदि मातृत्व त्याच्या ठिकाणी उत्कटतेने अनुभवले.

श्री. रा.चि. ढेरेनी विठोबाचे स्वरुप जे वर्णिले आहे त्याचा देवदेवता विषयक ओव्या वाचतांना अनेकदा प्रत्यय येतो. दर आषाढी, कार्तिकी एकादशीला वर्षानुवर्षे भक्तिभावाने पंढरपुरची वारी करणारी असंख्य माणसे महाराष्ट्रात आहेत. भक्ती भावना व कौटुंबिक भावना यांचे मोठे मनोहर मिश्रण खालील ओवीत झालेले दिसते.

माझ्या चुड्याचं सोनं | नाजूक त्येच्या धारा |
पांडुरंगाच्या सावलीत | मला लागना ऊनवारा ||

आपल्या पतीचे तब्येत 'तोळा मासा' असल्याचे ती 'चुड्याच्या सोनाच्या धारा नाजूक आहेत असे म्हणून ध्वनीत करते. चुडा हे सौभाग्याचे प्रतीक, स्त्रीचे सर्वस्व आहे. म्हणून परमेश्वराची कृपादृष्टी असल्यावर कोणत्याही दु:खाची झळ आपल्या पर्यंत पोहचत नसल्याचे वरील ओवीतून व्यक्त केले आहे.

विठ्ठलाला पिताच काय पण माता, वासरु, लेकरु, सखा असे पण म्हटले आहे. लिंग, वचन, कालविपर्यास इत्यादी कडे लक्ष न देता जे मनापासून वाटले ते म्हटले आहे. कधी विठ्ठलाला आपले आई-बाप म्हणायचे तर कधी आपणच विठ्ठलाचे आई-बाप होऊन त्याला वासरु म्हणायचे, असा हा विठ्ठल, अध्यात्मज्ञानाने भरलेली पोथी वाचयला देतो, म्हणजे अंतबार्ह्य आपण विठ्ठलमय होतो. याचे श्रेय विठ्ठलाला दिले आहे.

पांडुरंगाच्या राऊळात | मी का होईन पार ईवा |
हरीच्या नामयाचा | तितंयेची न सर ईवा ||

'पारईवा' वसरईवा' या दोन प्रतिमा भक्त व देव यातील निकटचे संबंध फारच परिणाम कारकपणे दाखवतात. आकाशात स्वैर उडणारा, आकाशचा ठाव घेत दाण्याचा शोध घेणारा पारवा व पांडुरंगाच्या मंदिरात सदैव रुंजी घालणारे भक्तसारखेच आतूर व क्षुधित आहेत. पक्षी धान्य वेचतात व हे भक्त हरिनाम वेचून भक्तीची भूक भागवतात. येथे 'सरईवा' या प्रतिमेचा संदर्भ लक्षात घेण्यासारखा आहे. शेतातील धान्याचे खळे संपल्यावर खाली गळलेले दाणे, न भरलेले बारीक दाणे वगैरे गावातील महार, मांग वगैरे लोक गोळा करुन नेतात त्यास सरवा वेचणे असे म्हणतात. हरिच्या श्रेष्ठ भक्तांना कसदार दाने घेण्याचा अधिकार आहे पण आपल्यासारख्या अतिसामान्य माणसाने निदान सरवा वेचण्यातील आनंद मिळवावा असे स्वत:कडे कमीपणा घेऊन विनम्रपणे म्हटले आहे. 'पांडुरंगाच्या दर्शनाला पंढरीला प्रापंचिक अडचणीमुळे जाणे जमले नाही म्हणून ही स्त्री म्हणते -

आखाडी एकादशीला | जानं नाही झालं |

देवा सावयानं | कार्तिकी बोलविलं ||

आषाढी एकादशीला पंढरपूरला जाणे झाले नाही याची खंत या ओवीत व्यक्त झाली आहे. पण एक प्रकारचे परावलंबित्व, असहाय्यता व तडजोडीची वृत्ती या स्त्रियांच्या अंगी इतकी बांधली आहे की, आपल्या इच्छा त्या सहजतेने दाबू शकतात. म्हणून ही स्त्री म्हणते की, आषाढी एकादशीला नाही तर कार्तिकी एकादशीला आपण जावे अशी विठोबाची इच्छा आहे असे समजून त्या दैनंदिन जीवन जगू लागतात. 'आपल्या इच्छा, आकांक्षा पूर्ण होत नाहीत त्याची खंत करायला दैनंदिन रामरगाड्यात त्यांना वेळही होत नाही व त्यांच्या मनाची, भावनेची, इच्छेची कोणी पर्वा करणार नाही, दखल घेणार नाही हे ही या स्त्रिया चांगल्या जाणून आहेत. 'म्हणून स्वत:ची समजूत घालण्याइतक्या त्या समजुतदार ही आहेत असे म्हणावेसे वाटते. जेव्हा विठोबाने राधिकेला प्रेमाने जवळ घेतले तेव्हा रुक्मिणी आगीसारखी तापून रागाने लाल झाली व रागाने विठोबाला सोडून दुसरीकडे राहायला गेली. म्हणूनच पंढरपुरात विठोबा व रुक्मिणीची मंदिरे वेगवेगळी आहेत. याच कारणामुळे विठोबाच्या मुर्तीजवळ रुक्मिणीची मूर्ती नाही असे समजले जाते. हीच भावना रुक्मिणीच्या बाबतीत अपेक्षून रुक्मिणीसारखे सगळ्या देवदेवतांचे मानुषी करण केलेले दिसते. देवदेवतांचे मानुषी करण ओवी गीतांचे एक आकर्षक वैशिष्ट्य आहे. ही देव देवतांची केलेली सलगी मन मोहून टाकते.

'पांडुरंग पिता | रुक्मिण माझी बया |

आषाढ वारीयेला | पुंडलिक आला न्याया ||

पंढरी माहेर, विठोबा रुक्मिणी आई-वडील व माहेरी आषाढ वारीसाठी बहिणीला न्यायला येणारा पुंडलिक भाऊही जी जिवाभावाची नाती या स्त्रियांनी ओवी गाताना निर्माण केली आहेत. त्यामुळे संसार करताना कितीही दु:खे सोसावी लागली तरीही दु:खे सोसण्याचे सामर्थ्य या दुबळ्या स्त्रियांत निर्माण झाले आहेत व एक प्रकारचे आंतरिक समाधान त्यांना या ईश्वरभक्तीमुळेच लाभते.

'विठोबा म्हणजे प्राण प्रिय सगा सोयरा, ज्याप्रमाणे आपल्या प्रिय माणसांची गैरसोय होऊ नये म्हणून लहान लहान गोष्टींची सुद्धा काळजी घेतली जाते. तशा प्रकारची विठ्ठला बद्दल घेतलेली काळजी मोठी रमणीय वाटते.

'सकाळच्या पारी | किती ताकीद गवळ्याला |

देवा माझ्या इट्टलाला | दूध लागतं सावळ्याला ||

विठोबाला दूध लागते तेव्हा सकाळी लवकर दूध आणून दे अशी ताकीद आपण गवळ्याला केल्याचे ही स्त्री सांगते. अगदी सहज सुलभ शब्दातून आपली भावना व्यक्त करण्याचे सामर्थ्य फारच विलोभनीय आहे. या स्त्रियांचे अनुभव विश्व फारच मर्यादित असल्यामुळे त्यांच्या छोट्याशा अनुभव विश्वात जे काही अनुभवले ते त्या आपल्या ओवीत आणतात.

याच्यातून विठोबा वरचे निर्व्याज प्रेम ही व्यक्त होते. पुढील ओवी सुंदर अशा दृक संवेदनाचे उदाहरण असून निसर्ग शब्दचित्र यातून रेखाटले गेले आहे.

तुळसबाईची माझ्या | मस्करी कोणी केली |
वा रात्या सजणानं | तिची मंजुळा हलवली ||

वाऱ्याने तुळशीच्या मंजुळा हालतात हे बघून मुद्दामच खोडकर वाऱ्याने मुग्ध अशा तुळशीची मस्करी केली. हा मुग्ध शृंगार फारच रमणीय आहे. येथे आठवण येते 'शाकुंतल' नाटकातील एका प्रसंगाची जेव्हा शकुंतलेचा पदर काटेरी झुडपात अडकतो तेव्हा रसिक दुष्यंतराजा उद्गार तो की माझ्या पेक्षा हे काटेरी झुडुप जास्त भाग्यवान आहे. कारण शकुंतलेच्या पदराची जवळीक त्याला लाभली. निसर्गाच्या लहानसहान घटनांचा सुद्धा उपयोग आपल्या भावनांच्या अभिव्यक्तीसाठी करुन प्रतिमा बनविण्याची हातोटी व कौशल्य या स्त्रियांत होते हे यावरुन दिसते. 'स्त्रियांनी व्रतवैकल्य, सणवार, उपास तापास यात स्वत:ला इतके गुरफटून घेतले होते की या सर्व गोष्टींना सोडून त्यांना जीवन जगताच येत नव्हते कारण मनोभावाने पिढ्यान्पिढ्या त्या सर्व गोष्टी करीत आल्या होत्या.

आतापर्यंत आपण स्त्रियांच्या देव देवता विषयक ओव्यांचा विचार केला. हातात काम मुखात हरिनाम या पद्धतीने या स्त्रियांनी देवाची भक्ती केली. ही देवाविषयीची ओवी गीते रचताना आपल्या आजूबाजूला दिसणाऱ्या सामान्य वस्तूंचा उपयोग प्रतिमेकरीता केला आहे. जसे परीसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते तसे या सामान्य वस्तूंना अलौकिक अशा कल्पना शक्तीचा स्पर्श झाल्यावर तिच्यातील अर्थाची झळाळी बघून आपले डोळे दिपतात, अलौकिक प्रतिभा शक्तीचे व कल्पना शक्तीचे सामर्थ्य या स्त्रियांत होते हे पटते. स्त्रीच्या बुद्धिवैभवाची खुणगाठ वयातून जुळवलेले व सांभाळलेले वडिलोपार्जित ऋणानुबंध फार मोलाचे आहेत.

संदर्भ ग्रंथ :

१) स्त्री-जीवन – साने गुरुजी
२) कविता आणि प्रतिमा - डॉ. सुधीर रसाळ
३) मराठीतील स्त्री धन -डॉ. सरोजिनी बाबर
४) जा माझ्या माहेरा - डॉ. सरोजिनी बाबर

मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

वैशाली सुभाष पारधे

मु.तामशी, पो.कुरणखेड, ता.जि.अकोला.

सारांश:

महाराष्ट्र ही संताची भूमी आहे. अनेक संतांनी येथे समाजप्रबोधनाचे महत्वपूर्ण कार्य केले. या कार्यातील महिला संताचादेखील तितकाच मोलाचा वाटा आहे. यात संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत सोयराबाई, संत निर्मळा, वेणाबाई, भागुबाई, कान्होपात्रा यांनी रचलेल्या अभंग रचना, पदे, ओवी, गौळणी इ. काव्यप्रकारातून कणखर, सोशिक अशा स्त्री प्रतिमा आपल्याला अधोरेखीत होताना दिसतात.

८ मार्च या दिवशी जागतिक महिला दिन मोठया आनंदाने स्त्री मुक्ती दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. स्त्री-शक्तीचा गौरव म्हणून वेगवेगळे कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. स्त्री-मुक्ती चळवळीतून स्त्रीवादी साहित्य आणि स्त्रीवादी समीक्षा हे प्रकार उदयास आले. सिमॉन द बोव्हा` या फ्रेंच लेखिका यांच्या `द सेकंड सेक्स` (१९४९) या ग्रंथापासून स्त्री मुक्ती चळवळीचा पाया घातला गेला. या ग्रंथामध्ये `बाई म्हणून कोणी जन्म घेत नसतो तर तिला बाई बनवले जाते` हा विचार प्रथमच त्यांनी मांडला. हे विधान म्हणजे स्त्रीवादी जाणिवेचे महत्वाचे प्रमेयआहे.

स्त्रीवादी जाणीव म्हणजे काय? तर जगभर प्रदीर्घकाळ जी प्रदीर्घ पितृसत्ताक समाजव्यवस्था अस्तित्वात आहे, त्या अवस्थेने जैविक लिंगभेदाला (Sex) सांस्कृतिक लिंगभेदाचे (Gender) रूप दिले. आपले हितसंबंध जोपासण्यासाठी स्त्री-पुरुष यात विशिष्ट सत्तासंबंध रचला. या सत्तासंबंधात स्त्रीला गौण व दुय्यम ठरविले गेले. स्त्रीचा स्वभाव, लक्षणे, कार्यक्षेत्रे, कर्तव्ये या समाजव्यवस्थेने निश्चित केली व ती स्त्री जाती वर लादली. या सर्व गोष्टीची जाणीव होणे म्हणजे स्त्रीवादी जाणीव होणे होय. स्त्री-पुरुष समानतेच्या तत्वावर आधारलेल्या नवसमाजाची आदर्श व्यवस्था निर्माण करणे, हे स्त्रीवादाचे उद्दिष्ट आहे.

या स्त्रीवादी जाणीवेचा आविष्कार आपल्याला मराठी वांङ्मयामध्ये वेगवेगळ्या कालखंडात, वेगवेगळ्या टप्यावर घडून गेलेल्या साहित्यामध्ये पहायला मिळतो. संत साहित्यातून ही वेगवेगळ्या स्त्री संतांनी स्वचा शोध कसा घेतला, पितृसत्ताक समाज व्यवस्थेला न जुमानता स्वतःची जाणीव कशी व्यक्त केली हे आपल्याला दिसून येते.

प्रस्तावना : -

जाणीव म्हणजे समज, जागृतावस्था किंवा स्वतःसह सभोवतालला समाजव्यवस्थे विरुद्ध जाणून घेण्याची क्षमता. स्त्रीही पुरुषाप्रमाणे माणूस असूनही तिचे नैसर्गिक अधिकार पुरुषसत्ताक व्यवस्था नाकारते, हे समजणे म्हणजे स्त्रीवादी जाणीव. स्त्रीला नेहमीच दुय्यम स्थानी मानणाऱ्या पितृसत्ताक समाजव्यवस्थेविरुद्ध आजपर्यंत कित्येक लेखिका, समाज सुधारक, कवयित्रींनी आपल्या साहित्यातून आवाज उठविला आहे. मराठीमध्ये स्त्री जाणिवेच्या अंगाने लिहिलेले साहित्य क्वचितच आढळते. समाजाने लादलेल्या बंधनाच्या, रूढींच्या बेडीतून निघून स्त्री मुक्तीचा निर्धार करून या पुरुषसत्ताक व्यवस्थेने लादलेल्या बंधनातून ती मुक्त होऊ पाहते. स्त्री-पुरुष समानता, स्त्रीचा माणूस म्हणून विचार, मानवी हक्काची प्राप्ती या विचारांनी प्रेरित होऊन तिचा मानसिक विकास, स्पंदने, स्वभाव, स्वत्व संपादन, स्व-जाणीव इ. चा आविष्कार कित्येक संत कवयित्री लेखिका, सर्वसामान्य स्त्रिया साहित्यातून करताना आपण अनुभवत आलो आहेत. साहित्यातून कणखर, खंबीर अशा स्त्रीप्रतिमा अभिव्यक्त करत त्यांनी समग्र पुरुषांचा दुटप्पी वृत्तीचा व धर्मग्रंथात अस्तित्वात असलेल्या सामाजिक, कौटुंबिक स्त्री-पुरुष विषमतेचा समाचार घेतला आहे.

स्त्रीला नेहमीच दुय्यमस्थानी मानणाऱ्या पुरुषा विषयी सावित्रीबाई फुले म्हणतात, `

बाईल काम करीत राही|

ऐतोबा हा खात राही|

पशु-पक्षात ऐसे नाही **|**

*तयासी मानव म्हणावे का***?**

कित्येक धर्मग्रंथातही स्त्रीला, दुय्यमच लेखले आहे. स्त्री-पुरुष तुलना (१९८२) ह्या ग्रंथात ताराबाई शिंदे यांनी समाजातील स्त्री-पुरुष विषमतेचा चांगलाच समाचार घेतला आहे. म. फुले यांनी याकरिताच मनुवचने जाळण्याचा निर्धार केला होता. त्यानंतर हिंदू संहिता विधेयक म्हणजे हिंदूकोड बिल घटना समितीमध्ये सादर करण्यात आले. त्यात वडिलांच्या मालमत्ते मध्ये मुलाप्रमाणे मुलीला ही समान वारसा हक्क मिळावा, असा विचार मांडण्यात आला. स्त्रीला कायद्याने मिळालेल्या हक्क हा तिच्या विकासासाठी सहाय्यभुत ठरला. राजर्षी शाहू महाराज, धोंडो केशव कर्वे, ईश्वरचंद विद्यासागर, महात्मा फुले इ. समाजसुधारकांनी स्त्रियांच्या विकासासाठी केलेले कार्य याबाबत उल्लेखनीय आहे. स्त्रीवादी जाणीवेचा विकास व प्रसार कार्यासाठी मराठी साहित्यात स्त्रीवादी लेखन होत आहे. यासर्व प्रेरणेची बीजे आपल्याला मध्ययुगातील महानुभाव साहित्य, संत साहित्यातून दिसून येतात. मराठी साहित्यात आदिवासी साहित्य, ग्रामीण साहित्य, विज्ञान साहित्य, संत साहित्य, महानुभाव साहित्य, स्त्रीवादी साहित्य अशा अनेक साहित्य प्रवाहातून स्त्री प्रतिमा व स्त्री जाणिवा विकसित होताना दिसतात.

सामाजिक विषमता, अंधश्रद्धा, भोंदूगिरी, स्त्री-क्षुद्र दास्य या प्रथेविरुद्ध तेराव्या शतकात वारकरी संत व महिला संतांनी पहिली आरोळी पंढपूरच्या वाळवंटात ठोकली. ज्ञानदेव- नामदेवापासून तर वारकरी पंथाचे कळस म्हणून ओळखले जाणारे संत तुकाराम त्याच प्रमाणे संत जनाबाई ते संत बहिणाबाईपर्यंत सर्व संतांनी या कुप्रथेविरुद्ध साहित्यातून आवाज उठविला. अभंग, ओवी, पदरचना, गौळणी, भारूड इ. काव्यरचनेतून अभिव्यक्त होणाऱ्या स्त्रीप्रतिमा ह्या निर्णायक, खंबीर, सहनशील असलेल्या दिसून येतात.

महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने सर्वसामान्य स्त्रियांमध्ये स्वजाणीव, जागृतीची सुरवात १९७५ पासून झाली. अर्थात स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा सुर प्राचीन कालखंडापासून ते वसाहत काळापर्यंत अधूनमधून प्रकट होतच होता पण या सुरांना सामाजिक मान्यता नव्हती. प्राचीन कालखंडातील गार्गी, मैत्रेयी असेल किंवा मध्ययुगीन काळातील जनाबाई, मुक्ताबाई, झाशीची राणी इ. स्त्रियांनी आपल्या स्वतंत्र बाण्याचा परिचय करून दिला. भारतातील सर्व सामान्य स्त्री जीवन संस्कृती, धर्म, जात, वर्ण व्यवस्थेच्या चक्रात पिळले गेले होते. ब्राह्मणांपासून पददलितांपर्यंत सर्वच स्त्रिया वंचित जीवन जगत असताना दिसतात. संत साहित्यातून तत्कालीन सांस्कृतिक जीवनाची स्पष्ट कल्पना येते. यातून स्त्री जाणिवेचे, प्रतिमेचे चित्रण आपणास प्रकर्षाने जाणवते. स्त्रियांच्या धार्मिक, सांस्कृतिक, कौटुंबिक, भावनिक विश्वातील स्थित्यंतरे ही यातून प्रकट होतात. माता, भगिनी, सखी, दासी, पत्नी, प्रेयसी, विधवा, परितक्त्या इ. सर्व स्त्री प्रतिमेचे दुःख, वेदना या साहित्यातून दिसून येते.

संत जनाबाई : -

मराठी संत साहित्यातील बंडखोर कवयित्री म्हणजे संत जनाबाई. महाराष्ट्रातील स्त्री मुक्तीच्या पाऊलखुणा शोधण्यासाठी संत जनाबाईच्या अभंगाचा उपयोग होतो.

डोईचा पदर आला खांद्यावरी **|** भरल्या बाजारी जाईन मी **||**

हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा **|** आता मज मना कोण करी **||**

संत नामदेवाच्या घरी अनाथ म्हणून वाढलेल्या, नामदेवांना अंगाखांद्यावर खेळणाऱ्या जनाबाई त्याकाळात संताकडूनही उपेक्षितच राहिल्या. नामदेवांनी संतांची चरित्रे लिहिली पण संत जनाबाई बद्दल फारसे सांगितले नाहीं. मात्र जनाबाईने स्वतःला ओळखले होते. त्यामुळे ती परंपरेचे कोणतेही बंधन न पाळता व्यक्त होते. स्त्रीच्या डोक्यावरचा पदर म्हणजे समाजव्यवस्थेने लादलेल्या बंधनाचे आणि भासमय घरंदाजपणाचे प्रतीक. तो पदर जनाबाई खांद्यावर घेऊन सामाजिक संकेतांना धक्का देते. घरात न बसता ती भरल्या बाजारात जाते. हातात टाळ व खांद्यावर वीणा घेण्यासाठी मला आता कुणी अडवणार नाही, असा निर्धार व्यक्त करते. हा निर्धार भक्तीसाठीचा असला तरी ती पुरुषप्रधान समाज व्यवस्थेने लादलेल्या बंधनातून मुक्त होऊ पाहते. पंढरपुरात वारकरी चळवळीचे नेतृत्व जनाबाईने केले. खरे तर त्या काळात स्त्रियांनी नेतृत्व करणे परंपरावाद्यांना सहन होणारे नव्हते. परंतु जनाबाई ह्या विरोधाला न जुमानता सर्व कारभार अचूक पाहत होत्या. स्त्री जन्माविषयी दुःख व्यक्त करणाऱ्या स्त्रियांनां संत जनाबाई म्हणतात, "स्त्रीजन्म म्हणुनी न व्हावे उदास". जनाबाईच्या या जाणिवेतून कित्येक सांसारिक स्त्रिया प्रेरित झाल्या व साहित्यातून आपले विचार मांडू लागल्या. त्यांना आत्मभान प्राप्त झाले.

संत मुक्ताई : -

"मुंगी उडाली आकाशी ||
तिने गिळीले सूर्याशी ||

मराठी स्त्री संतांपैकी ज्यांनी समाज कार्यात बहुमूल्य वाटा उचलला, ज्यांनी मराठी सारस्वतात भक्तीचा मळा फुलविला आणि मराठी साहित्याचे दालन भावसंपन्न केले, अलौकिक भावंडांच्या वलयात वाढल्या, ज्यांना असामान्य बुद्धिमत्ता लाभली अशा भक्तीयोग मार्गात पारंगत असलेल्या संत मुक्ताई म्हणजे विरक्ती, ज्ञान, भक्ती, आणि मुक्ताई यांचे मूर्तीमंत रूपच होय. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताई ही चार दिव्यत्वाची साक्षात रूपे विठ्ठलपंत व रुख्मिणी यांचे मातृपितृत्व धन्य करणारी. पण हे दिव्यत्व जगाला समर्पित करून त्यांना जगाचा निरोप घ्यावा लागला. पोरवयातच समाजाने ह्या चार भावंडाना सन्यासाची पोरं म्हणून वाळीत टाकले. पण हे सारे भोगत बहीण भावंडानी ब्राह्म विद्देची अखंड उपासना केली. मातापिताच्या मृत्यूनंतर मुक्ताई खंबीरपणे उभ्या राहिल्या. या अनन्य साधारण कुटुंबाच्या गृहिणी पदाची नाजूक जबाबदारी मुक्ताई वर बालवयातच पडली व ती तितक्याच समर्थपणे त्यांनी उचलली व पेलली. आपल्या भावंडाची जणू ती माऊलीच झाली. त्यांच्या तील कणखर पणा, सोशिकता यांचे दर्शन त्यांच्या ताटीच्या अभंगातून घडते. त्यांनी ज्ञानेश्वरांना आदिनाथाकडून गहिनीनाथाकडे, गहिनी नाथांकडून निवृत्तीनाथाकडे व निवृत्तीनाथाकडून ज्ञानदेवाकडे आलेल्या नाथसंप्रदायाची आठवण करून दिली. जो जणांचे अपराध सहन करतो तो योगी. मुक्ताई ज्ञानदेवांची समजूत घालते.

योगी पावन मनाचा | सा हे अपराध जणांचा ||
विश्वा गेझाले वन्ही | संती सुखे व्हावे पाणी ||
शब्द शस्त्रे झाले क्लेश | संती मानावा उपदेश ||
विश्वपट ब्रम्होदरा| ताटी उघडता ज्ञानेश्वरा ||

अवघे विश्व जरी आपल्या वर रागावले तरी जलाप्रमाणे थंड पण घेऊन त्या क्रोधाग्नीला विझवायचे, लोकांच्या शब्धरुपी शस्त्राने जरी त्रास झाला तरी चांगला उपदेश मान्य करायचा अशी समज जेव्हा मुक्ताई थोर भावंडांना देते, तेव्हा तिच्या मधील उदात्त, सोशिक, सहनशील अशी स्त्री प्रतिमा डोळ्यासमोर उभी राहते.

ज्ञानदेवांच्या अलौकिक कार्यामागे श्रीनिवृत्तीनाथाची कृपा व मुक्ताबाईची ध्येय स्वप्नांची जाणीव होती. ज्ञानदेव महाराजांची समजूत मुक्ताईने काढली नसती तर कदाचित ज्ञानेश्वरीसारखा अलौकिक ग्रंथ निर्माण झाला नसता. अशी ही मुक्ताईची तेजस्वी प्रतिमा अभंगातून दिसून येते.

चांगदेव : -

योगी चांगदेव खूप मोठे तपस्वी होते. त्यांनी गुरु केला नसल्याने त्यांना ईश्वरप्राप्ती झाली नव्हती. मुक्ताबाईने चांगदेवांना पासष्टी चा अर्थ उलघडून दाखविला. मुक्ताबाईच्या अनुग्रहाने चांगदेवांना आत्मरुपाची प्राप्ती झाली, त्यांचे आयुष्य धन्य झाले. तेव्हा कृतार्थतेने चांगदेव म्हणतात,

`मुक्ताई करेले इले अंजन` ||
चांगदेव म्हणेआज जन्मा आलो ||
गुरुपुत्र झालो मुक्ताईचा ||

संत ज्ञानेश्वर : -

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी नावाचा अलौकिक ग्रंथ मराठी भाषेत लिहून सर्वसामान्य जनतेला गीतेचे ज्ञान सुलभ करून दिले. संत ज्ञानेश्वर म्हणतात,

आता अभिनव वाग् विलासिनी
जे चातुर्यार्थ कला का मिनी
ते शारदा विश्वमोहीनी
नमविली मिया ||
म्हणुनी माझी वैखरी
मौनाची ही मौन करी
पाणि यावरी मखरी

रेखिली जैसी ||

असे सांगून त्यांनी फार महान तत्वज्ञानाची, वेदांतात असलेली वाणी अधिक स्पष्ट केली आहे. गीतेला आदर्श मानले आहे. या भक्तिरंगामध्ये सर्वथरातील स्त्री-पुरुष, बालक, प्रौढ न्हाऊन निघाले. ज्ञानोबा तुकाराम नामाचा जयघोष आसमंतात दुमदुमला. व नामसंकिर्तनाने वारकरी संप्रदाय समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचला. जाती धर्मापलीकडील लोकांना एकत्र आणण्याची ताकद सर्व संताच्या वाणीमध्ये दिसते. म्हणूनच सर्व सांसारिक महिला संत आपल्या आपल्या परीने वारकरी संप्रदायाचा वसा पुढे नेताना दिसतात. अशीच आव्हानात्मक पवित्रा घेवून आलेली मुक्ताई म्हणते,

निर्गुणाचे डहाळी बांधिये ला पाळणा
यात सुत पहुडला मुक्ताईचा
नीज़ नीज रे बाळा करी हाळी
अनुहात हाती देइ टाळी |

हा अनुहात ध्वनी जेव्हा मनामध्ये जागृत होतो तो एवढा चित्तवेधक असतो की सर्व मोह, माया, सर्व चक्र भेदन करून खरी स्थिती दाखवितो. त्या खऱ्या स्थितीला वास्तविकतेला सर्व महिला संतानी वंदन केले. या सर्व संतसाहित्याच्या केंद्रस्थानी माणूस होता, यात सर्व क्षुद्र, नाकारलेले घटक, स्त्रिया, समाजात दुर्लक्षित झालेले पद दलित यांना समानतेचे स्थान या वारकरी पंथात मिळाले व आपल्या भावना महिला संतांनी व्यक्त केल्या. त्यांनी स्वतःला ओळखले व परखडपणे स्वतःची वेदना, विद्रोह व्यक्त केला. याच घराण्यातून संत निर्मळा, संत सोयराबाई, संत जनाबाई, मुक्ताईसारख्या स्त्रिया बाहेर पडल्या. त्यांना स्फूर्ती मिळाली. अरुपाचे रूप दावताना सर्व संत स्त्रिया कनिष्ठ-श्रेष्ठ, गरीब-श्रीमंत भेदभाव विसरल्या. विठ्ठलाच्या नामस्मरणात, कीर्तनात दंग झाल्या.

संत बहिणाबाई : -

संत बहिणाबाई ह्या वारकरी संप्रदायातील मराठी स्त्री संत कवयित्री आणि संत तुकारामांच्या शिष्या होत्या. त्यांना लहानपणापासूनच परमार्थाची व भक्तीची ओढ होती. वडगावकरांच्या कीर्तनात संत तुकारामांचे अभंग ऐकून त्या प्रभावित झाल्या. त्यांनी पुढे संत तुकारामांचे शिष्यत्व पत्करले. एका ब्राम्हण स्त्रीने तुकारामांचे शिष्य व्हावे, ही गोष्ट सनातन्यांना पटणारी नव्हती. तरीही रात्रंदिवस ध्यान करून संत तुकारामांचे अभंग त्या गाऊ लागल्या. बहिणाबाई यांनी अभंगातून स्वतः ब्राम्हण असूनही ब्राह्मणी, सनातनी वृत्तीवर सडेतोड टीका केली. समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान होते. वयाच्या ५ व्या वर्षी बहिणाबाईंचा विवाह ३० वर्षाच्या बिजरावाशी झाला. त्यांचे मन हरीकथेत गुंतले. यासाठी त्यांना कौटुंबिक छळ सहन करावा लागला. आपल्या अभंगात त्यांनी जीवनातील सुखदुःखाचे प्रसंग मोठया उत्कटने चित्रित केले आहे. समाजातील कित्येक स्त्रियांचे जीवन कष्ट, दुःख, उपेक्षानी ग्रासलेले होते. अशा नाकारलेल्या स्त्रियांच गाणं या संतसाहित्यातील स्त्रियांनी मानव समाजाला दिले. नाम महात्म असेल, नामसंकिर्तन असेल, नामघोष असेल किंवा पीडा व्यक्त करणारे रडगाणं असेल या सर्वातून ती स्वातंत्र्यासाठी लढताना दिसते. भारतीय समाज मनावर वर्ण व्यवस्थेचा, स्त्री-पुरुष विषमतेचा, पितृसत्ताक पद्धतीचा पगडा असतानाही संत बहिणाबाईनी त्याकाळी केलेले धाडस अतिशय क्रांतिकारी म्हणावं लागेल. तमाम पीडित महिलांच्या मनात खदखदणाऱ्या असंतोषाला, वेदनेला त्यांनी आपल्या कृतीतून वाट करून दिली. जाती-पतीचे बंधन तोडून वारकरी पंथाची ध्वजा फडकविण्याचे महान कार्य बहिणाबाईंनी केले.

जनाबाईचा काव्यरचनेतून परिवर्तनाचा हुंकार, कृतीचा जोश प्राप्त होतो, त्यांच्या रचनेमध्ये आत्मनिष्ठेचे, भावभक्तीचे बळ उभे राहते. जनाबाईच्या अभंगातून उपेक्षेतून येणारा सूरही दिसतो. उपेक्षेचे दुलक्षित जीवनत्यांना जगावे लागले तरी त्या डगमगत नाही.

राजाई गोणाई | अखंडित तुझे पायी |
मज ठेवियले दवारी| नीच म्हणोनि बाहेरी |
नारा गोंदा महादा विठा | ठेवियले अग्रवाटा |
देवा केव्हा क्षेम दासी | आपली म्हणोनी जनी दासी |

संत नामदेव व त्यांच्या कुटुंबियांच्या सत्संगाने व सद्वर्तनाने, सदाचरणाने तिचे अवघे व्यक्तिमत्व उजळून निघाले.अतिसामान्य दासी असूनही त्यांना वारकरी चळवळीत मनाचे स्थान मिळाले. यावरून वारकरी पंथातील संत

ज्ञानेश्वर,संत तुकाराम नामदेव, एकनाथ, संत रामदास यांनी समाजात नीतीमूल्याचा ऱ्हास होत असताना, सामाजिक विकृती, कर्मकांड, व्रतवैकल्ये, रूढी-परंपरा इ. स्तोम माजले असतानाही स्त्रियांबद्दल दाखविलेला उदारमतवादी दृष्टीकोन लक्षणीय ठरतो. स्त्री-क्षुद्र यांच्या बद्दल असलेला कळवळा त्यांच्या अभंगातून दिसून येतो.

कान्होपात्रा :-

परमेश्वराची भक्ती करताना कुठलाही वर्ण, स्त्री-पुरुष भेद आड येत नाही, हे कान्होपात्रा याच्या रचनेवरून लक्षात येते. मंगळवेढ्यातल्या शामा नामक नायकिणीची ती मुलगी. तरी ही समाजाच्या रूढी, परंपरा, बंधने याना न जुमानता, आईचा व्यवसाय पुढे न चालवता कान्होपात्रा भक्तिपंथात शिरल्या.

ज्याचे घेता मुखी नाम | धाकी पडे काळ यम ||
ऐशी नामाची थोरी | उद्धरिले दुराचारी ||
नष्ट गणिका अजामेळ | वाल्मिकी झाला तो सोज्वळ ||
ऐसी नाम माळा| कान्होपात्रा ल्याली गळा ||

कान्होपात्रा यांचे जीवन निष्ठा, निर्धार, विश्वास यांचे मूर्तिमत उदाहरण आहे.

दिन पतित अन्यायी | शरण आल्ये विठाबाई ||
मी तो आहे यातिहीन | न काळे काही आचरण ||
मज अधिकार नाही | भेटी देई विठाबाई ||
ठाव देई चरणापाशी | तुझी कान्होपात्रा दासी ||

त्यांच्या ऐहिक जीवनातील काव्य त्यात स्फुरले आहे. त्यांच्या करुणरम्य भावनांचे प्रतिबिंब यात दिसते.

संत सोयराबाई :-

संत चोखोबा यांची पत्नी सोयराबाई यांनी संसाराप्रमाणेच पारमार्थिक जीवनात ही चोखोबा सोबत वाटचाल केली. ती सुद्धा हरिभक्तीत रममाण झाली. समाजकंटक जेव्हा संत चोखोबा व संत सोयराबाई यांचे जगणे असह्य करून सोडतात, हीन-दीन म्हणून सतत अवहेलना करतात, तेव्हा संत सोयराबाई ना डगमगता आपल्या पतीबरोबर परमार्थिक जीवनात वाटचाल करू लागतात. आपल्या वेदनेचा हुंकार अभंगातून व्यक्त करतात. सोशिक, सहनशील, सोयराबाई यांची प्रतिमा व्यक्त होते. त्यासाठी स्त्री-पुरुष, जात, गोत्र असे पहावे लागत नाही.असे नाममाहात्म्य सांगताना समानतेच्या तत्वाची गुंफण अधोरेखित होते. देहाचा विटाळ मानणाऱ्यांची ती कानउघाडणी करते. भक्तिभावनेच्या वेळी हळवी व कोमल असणारी त्यांची भाषाशैली अधून-मधून परखड होते.

देहासी विटाळ म्हणती सकाळ | आत्मा तो निर्मळ | शुद्धबुद्ध ||
देहीचा विटाळ देहीच जन्मला | सोवळा तो झाला | कवण धर्म ||
विटाळावाचोनि उत्पत्तीचे स्थान | कोण देह निर्माण | नाही जगी ||
म्हणुनी पांडुरंग वानितसे थोरी | विटाळ देहांतरी | वसतसे ||
देहाचा विटाळ देहीच निर्धारी | म्हणतसे महारी चोखियाची ||

तत्कालीन समाजव्यवस्थेविरुद्ध त्याचा आक्रोश यातून दिसतो.

संतसाहित्यात ही स्त्रीया तत्कालीन समाजव्यवस्थेविरुद्ध कशा प्रखरतेने लढा देत असत, हे या अभंगातून दिसून येते. त्यांच्या मुक्ततेचा सूर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे इतरांना प्रेरणा देतो. संत सोयराबाई यांची अभंगवाणी प्रेमळ, ओघवती, रसाळ आहे. अशी प्रासादिक व भावार्थ असणारी भाषाशैली प्रसंगी कठोर व तात्विक पातळीवर युक्तिवाद करणारी होते हे विशेष.

संत निर्मळा :-

संत निर्मळा ह्या संत चोखामेळा यांची धाकटी बहीण व संत सोयराबाई यांचे भाऊ संत बंका यांची पत्नी. ती देखील विठ्ठलाची भक्त होती.

चहूकडे देवा दाटला वणवा | का न ये कनवा | तुजलागी ||
सापडले संधी संसाराचे अंगी | सोडवी लगबगी | मायबाप ||

बहू मज उबग आला असे देवा | धावे तु केशवा | लवलाही ||
तुजविण मज कोण गणगोत | तूची माझा हितकर्ता | देवा ||
निर्मळा म्हणोनि पायी घाली मिठी | परते न लोटी | मायबाप ||

या अभंगातून निर्मळाचा भक्तिभाव, मनाची आर्तताआपल्या मनाला भिडते. तिला संसारात अणुमात्र सुख वाटत नाही. परमेश्वरचरणी धावा घेऊन ती आर्ततेने पांडुरंगाला आळविते आहे. संसारात भोगलेले दुःख, काम, क्रोध यामुळे उतावीळ झालेली मनाची अवस्था, त्यांचे ओढाळ मन या अभंगातून चित्रित होते. पंढरपूरच्या विठ्ठलाचे नाम घेण्याच्या छंदापायी त्यांनी संसार देशोधडीला लावला. चित्त, मन शुद्ध करून हरी-हरी जप सतत करणे हा उपदेश त्या देतात. अस्पृश्य समाजात असल्याने त्यांचे जीवन उपेक्षित राहिले. या सर्वांचे ओझरते संदर्भ त्यांच्या अभंगातून येतात. वैष्णवांच्या कीर्तनांत भेदभाव विसरून नाचतांना निर्मळा सुखाच्या राशीवर लोळते.अशा वास्तविक जीवनाशी, परंपरेशी झुंज देत, सांसारिक त्रास सहन करीत नामस्मरण व कीर्तनात तल्लीन झालेल्या स्त्री प्रतिमा दिसून येतात.

संत बंका :-

संत बंका हे सोयराबाईंचे भाऊ व निर्मळेचे पती होते. चोखोबा व संत बंका यांचे गुरुशिष्याचे नाते होते. संत सोयराबाई यांच्या उच्च विचारांची महती सांगताना संत बंका म्हणतात, पंढरीनाथ जेव्हा वृद्ध ब्राम्हणाचे रूप घेऊन सोयराबाईंच्या दाराशी येतात तेव्हा त्यांना भिक्षा द्यायला प्रथम त्या संकोचतात पण आदरातिथ्य या धर्मामुळे जाती धर्म व भेदभाव न पाळता त्या `अतिथी देवो भव` या म्हणी प्रमाणे ब्राम्हणास दहीभात देतात.

दही आणि भात घेतला वाटिभरी | आणोनिया करी | दिला तिने |
बंका म्हणे हरी खावोनी तुष्टला | म्हणे माग मला | देतो तुज |

ब्राम्हणाने दहीभात खाल्ला व सोयराबाईंना आशीर्वाद दिला | या अभंगातून त्यांची उदार व दयाळू स्त्री प्रतिमा दिसून येते.

संत भागुबाई :-

संत भागू ही तेराव्या शतकातील स्त्री संत होती. जन्माने ती महारीण होती. साहजिक उपेक्षेचा सामाजिक संदर्भ त्यांच्या अभंगातून व्यक्त होतो.

आलो तुझ्या दर्शनासी | भेट द्यावी बा आम्हांसी
सर्व संत हो राउळी | मी रे एकटी तळमळी |
करुणा ऐक विठाई | मज बाळा भेटी देई |
देव आले हो बाहेरी | मज नेसे खांद्यावरी ||
भागू म्हणे भेट झाली | माझी चिंता ही हारली |

संत भागू यांना जीवन जगताना सोसाव्या लागणाऱ्या यातना, हीनयातित्वामुळे विठ्ठल मंदिरात नाकारलेला प्रवेश या बद्दलची खंत त्यांच्या अभंगातून व्यक्त होते. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध अभंगातून त्या बंड करून उठतात. तुला आमची करुणा का येत नाही असा सवाल टाकतात. उपेक्षित जीवन जगताना मनात निर्माण होणारी चीड, संताप याचा उद्रेक होतो. यातून त्यांची कणखर स्त्री प्रतिमा दिसून येते. संत साहित्यामध्ये १२ व्य शतकातही मोजक्या का असेना पण महिला संत आपल्या काव्यातून अभंग. ओवी गौळणी पदे इ. रचनेतून पितृसत्ताक कुटुंबसंस्थेला छेद देताना दिसतात. नाममहिमा असो, कर्ममहिमा असो, जात्यावरच्या ओवी, अभंग, गौळणी, पदरचना असो, या सर्वांमधून आपल्याला जनाई, मुक्ताई, सोयराबाई, निर्मळा ह्या आपापल्या परीने जीवनाचा संघर्ष कसा असतो, आव्हाने कशी पेलायची याची शिकवण देतात.

स्वप्रतिभेच्या बळावर त्यांनी कित्येक अभंग रचले. नाममहिमा, कर्ममहिमा सांगितला. स्त्री-पुरुष भेदभाव न मानता पुरुषांच्याबरोबरीने संत मंडळीत सामील झाल्या. भक्तिमार्गाकरिता का होईना, त्यांनी समाजव्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला. जीवनाचे गहनतम तत्वज्ञान घेऊन कित्येक संत महिला आत्मोन्नतेसाठी वारकरी धर्माचा प्रसार करू लागल्या. एक आत्मिक, अध्यात्मिक लोकशाही स्वातंत्र्याची प्रज्ञा त्यांनी जनमानसाला दिली. या महान महिला संत आज आदर्शवत बनल्या आहेत. या महान संतांनी ज्ञानदेवांना आदर्शवत मानून तळागाळातील सर्व लोकांना जाती धर्माच्या पलीकडे जाऊन समतेच्या झेंड्याखाली

एकत्र आणले व आत्मोद्धाराचा मार्ग मोकळा करून दिला. समाज स्वास्थ टिकवण्यासाठी, बुद्धीवरची अंधश्रद्धेची झडप उतरून टाकण्यासाठी, गुलामीची बंधने झिडकारून टाकण्यासाठी माणूस हा प्रयत्नवादी असावा, `यत्न चि तो देव जाणावा` असे म्हणत अखंड मानवतेला, बंधुभावाला केंद्रस्थानी ठेवले. समाजातील प्रत्येक दुर्लक्षित घटकाला आत्मसन्मानाने जगता यावे, यासाठी उमेद देण्याचे कार्य महिला संतांनी केले आहे.

आपल्या जाणिवा, भावना, व्यथा-वेदना सर्व संत महिलांनी अभंग, पदे, गवळणी, विरहिणी इत्यादीसाहित्यातून शब्धबद्ध केल्या. अशा या मध्ययुगात वारकरी संप्रदायाने समानतेचा, अधिकाराचा प्रथम मान स्त्रीशक्तीला दिला. जनाबाई एक दासी, स्त्री असूनही वारकरी आंदोलनाची धुरा त्यांच्यावर सोपवली. वारक-यांचे हे आंदोलन स्त्री मुक्तीचेच आंदोलन म्हणावे लागेल.

निष्कर्ष :-

१) सामाजिक असमता, अंधश्रद्धा, भोंदूगिरी स्त्रीदास्य या विरुद्ध १३ व्या शतकात वारकरी संत व कवयित्रींनी पहिली आरोळी पंढरपूरचा वाळवंटात ठोकली .

२) संत साहित्यातून अभिव्यक्त होणा-या स्त्री प्रतिमा कणखर, सोशिक, निर्णायक दिसून येतात.`स्त्रीला माणूस म्हणून जगू द्या` हा विचार यात प्रकर्षाने आढळतो. वास्तव परिस्थितीचे भान ठेवत समाजाने आखून दिलेली चौकट सांभाळूनभारतीय समाजव्यवस्थेशी तादात्म्य पावून स्वतःच्या भूमिका वठविणा-या अशा या स्त्री प्रतिमा आहेत.

३) समाज जीवनात मिळणारे दुय्यम स्थान, त्यांना जाणवणारे प्रश्न, त्यांची उपेक्षित जीवनाबद्दलची खंत आणि यातूनही एक आशावाद संत साहित्यातून उमटलेला दिसतो.

४) संत परंपरेच्या वाटचालीमध्ये ज्यांना सामाजिक विषमतेचे चटके बसले होते, स्त्री म्हणून अवहेलना केली गेली अशा महिला संतांची भूमिका अधिक धीट दिसते.

५) स्वतःच्या अस्तिव्यासाठी संघर्ष करताना जागृत होत असलेली स्त्री, तिच्या नव्या जाणिवा, तिची बदलती मानसिकता, तिची स्पंदने, एकूणच समाजव्यवस्थेतील कुप्रथेने बद्ध केलेल्या अवस्थेपासून मुक्तेतेकडे होणारा स्त्रीचा प्रवास स्त्रीसंतांनी आपल्या साहित्यात मांडला आहे.

समारोप :-

संत साहित्यातील स्त्री प्रतिमेचा विचार करतांना आपल्याला आढळते कि स्त्रीसंतांनी आपल्या अभंगात समाजव्यवस्थने तिची केलेली अवहेलना, मानसिक आंदोलने मांडली आहे. सांसारिक हालअपेष्ठांचे चटके भोगत असताना तिला स्वची जाणीव होते. समाजात कोणतेही स्वातंत्र्य नसताना, उपेक्षित जीवन जगताना भोगाव्या लागणा-या वेदना त्यांनी साहित्यातून मांडल्या आहेत व परमेश्वराकडे दर्शनासाठी, न्यायासाठी आळवणी केली. सामाजिक, शारीरिक, कौटुंबिक त्रास सहन करताना त्यांची भाषाशैली प्रसंगी परखड होते. समाज व्यवस्थेने आवळलेले पाश आणि समोर असलेले विविध प्रश्न, समस्या यातूनत्या खंबीरपणे बाहेर पडताना दिसते. स्वतःच्या भावना त्यांनी जात्यावरच्या गाणी, पदे, उखाणे, अभंग, विरहिणी यातून शब्दबद्ध केल्या. या जाणिवेच्या दिशेने झालेले हे लेखन परिवर्तनाचे दिशा सूचित करतात.

प्रत्येक स्त्रीला जगण्याचा अधिकार आहे, यावर तिचा विश्वास आहे परंतु कोणतेही बंड न करता त्या आपल्या साहित्यातून अभिव्यक्त होतात. त्यांना स्वविषयी जाणीव आहे. मानवनिर्मित रूढी, परंपरा, संकेत यांना प्रयत्नाने बदलता येते, असा त्यांचा विश्वास आहे. ज्या प्रमाणे संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, चोखोबा इत्यादी संतांनी अभंगातून भक्तिमार्गाचा प्रसार केला त्याप्रमाणेच स्त्री संतांनीही साक्षर नसतानाही परमार्थिक क्षेत्रात वाटचाल करून भक्तीचे महत्व पटवून दिले. समाज जागृतीचे कार्य केले. ज्ञानदेव-नामदेव यांची भाष्य सौम्य व हळवी दिसते तर संत तुकाराम, एकनाथ, चोखोबा यांची भाषाशैली विद्रोहात्मक सूर व्यक्त करतांना दिसते तसेच संत मुक्ताई, बहिणाबाई यांच्या साहित्यातील स्त्री प्रतिमा सोशिक, मृदू, सहनशील दिसतात तर संत निर्मळा, जनाबाई, सोयराबाई यांनी विद्रोहात्मक, परखड भाषेत तत्कालीन कुप्रथेवर टीका केलेली दिसून येते. संत कान्होपात्रा भागुबाई यांच्या भाषेत कारुण्य,अगतिकता दिसते. सामाजिक समता व अंधश्रध्दामुक्त समाज हे वारकरी संप्रदायाचे प्रथम उद्दिष्ट होते, हे संतसाहित्यातून आपल्याला समजते.

संदर्भ सूची :-

१) पठाण यु.म, मध्ययुगीन संत साहित्य: काही आयाम, स्वरूपप्रकाशन, मुंबई.

२) इनामदार हेमंत, नसिराबादकर ल.रा, महाद्वाराच्या पायरीशी, श्री वैभव प्रकाशन, नागपूर २०११.

३) अलगावकर डॉ. रमेश, मध्ययुगीन वाङ्मय प्रवाह, २००२. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक.

मराठी लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

डॉ. वीणा सुभाष नारायणे (डॉ. लाडे)

प्राध्यापक, शासकीय अध्यापक महाविद्यालय,भंडारा

प्रस्तावना :

इंग्रजी भाषेतील फोक लोअर Folklore या शब्दांसाठी मराठी भाषेत लोकसाहित्य हा शब्द रूढ झाला आहे. लोकसाहित्य या शब्दाची व्याख्या 'समुहमनाच्या प्रेरणेने निर्माण होणारे व पंरपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येणारे साहित्य ते लोकसाहित्य' अशी केली जाते.

डॉ. सरोजिनी बाबर हयांनी लोकसाहित्याच्या संकलनाला आपले आयुष्य वाहिले दुर्गाबाई भागवत यांनी लोकसाहित्याच्या सैद्धांतिक अभ्यासाचा पाया घातला. 'लोकसाहित्य' ही Folklore साठी पर्यायी संज्ञा प्रथम सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ व लोकसाहित्याविशारद दुर्गाबाई भागवत आणि वापरली व ती पुढे ही रूळली. 'लोकसंस्कृतीचे शब्दरूप लोकवाङ्मयात (Folk literature) असते, तर लोकसंस्कृतीचे कृतिरूप हे लोकाचार, लोकरूढी, लोकभ्रम इत्यादीत असते लोकसंस्कृती हे लोकसाहित्याचे व्यक्त रूप असते' – डॉ. ढेरे यांचे मत प्रतिपादिले. लोकसाहित्याचा क्षेत्रात दुर्गाबाई भागवतांची तपश्चर्या, डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे यांचा अखंड ज्ञानयज्ञ, व्यांसग आहे.

लोकसाहित्याचा इतिहास :

लोकसाहित्याचा इतिहासाबाबत महाराष्ट्राचा विचार केला असता आजही कोकणातील नमन, दशावतार, खेळे, कर्नाटक व महाराष्ट्राच्या सीमेकडील आटा किंवा यक्षगान खेळ, विदर्भातील दंडार, तमाशा, मराठवाडयातील खडीगम्मत, संपूर्ण महाराष्ट्रात प्रचलित असलेला, जागरण, गोंधळ, भारूड, बोहाडा, भारूड असे कितीतरी लोकनाटयप्रकार अजूनही प्रचलित आहेत. हे लोकसाहित्य म्हणजे परंपरेने आपोआप चालत आलेले जीवनच आहे. मौखिकरित्या समूहगानाच्या अबोध प्रेरणेतून आलेल्या रूढी, चालीरीती, धर्मकल्पना, सण, यात्रा उत्सव यांच्याशी संबंधित विविध कला, गाणी या सर्वचा एक मेळ आहे. लोकसाहित्याभ्यास हा केवळ भूतकाळातील संस्कृतिघटकांचा अभ्यास नसून मानवी संस्कृतीचा आरंभापासून माणसाने अबोधपणे जतन केलेल्या सांस्कृतिक जीवनाचा शोध घेणे होय.

लोकसाहित्यात लोककथा, लोकगीते, म्हणी व उखाणे वगैरे शब्दांचा विचार अनेकदा होतो. परंतु भारतभरच्या असंख्य जातीजमातीची त्यांच्या त्यांच्या बोलीभाषे मधून 'जातिपुराणे' आहेत. अभिजात संस्कृत पुराणकथा, संवादी अशी लोकभाषेतील पुराणे आहेत. मांग जमातीत 'बसवपुराण' आहे.

लोकगीताचे वेगळेपण :

प्रत्येक प्रगत संस्कृतीची मुळे लोकसंस्कृतीत असतात. लोक परंपरेचे अनेक अवशेष प्रगत अवस्थेतही विद्यमान असते. मानवी जीवनात लोकसंस्कृतीला अनन्यसाधारण महत्व आहे. अनादिकाळापासून सर्वसामान्य लोकांचे मनोरंजन करण्याचे महत्कार्य लोकनाटय, लोकगीते, लोकनृत्य, लोककथा हे साहित्य करीत आली आहेत. आज मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध असली तरी लोकगीतांनी, लोकनृत्यांनी, व लोकनाटयांनी ग्रामीण जीवनावर अशी छाप टाकली आहे की आजही त्यांच्या ग्रामीण जनमानसावरील प्रभाव किंचितही कमी झालेला दिसत नाही. या लोकगीतांचे रचनाकार साधारणत: स्त्रियाच आहेत म्हणूनच त्यांना अपौरूषेय गीते म्हणतात. कारण स्त्री ही पुरूषापेक्षा अधिक भावनाप्रधान व परंपरेशी निगडीत असते. हा लोकसंस्कृतीचा ठेवा ग्रामीण भागातील स्त्रियांनी अजूनही जपून ठेवला आहे.

लोकगीतातून स्त्रीयांची विविध रूपे, प्रतिभा त्यातून अविष्कृत झालेली दिसून येतात. नववधू, सासू-सून, आई, बहिण, नणंद, भावजय, जाऊ अशी स्त्रीची विविध रूपे, प्रतिमा दिसून येतात. 'आई-बहिण' यांचे नाते प्रेमळ व उदात्त दिसते तर सासू-सून, नणंद-भावजय- यांचे नाते विरोधात्मक दिसते.

लोकगीतावर स्त्रीयांची मक्तेदारी आहे. ही लोकगीत बहुधा स्त्रीयांनीच जतन केले आहे विविध प्रसंगी मौखिकरित्या प्रसंगाला अनुरूप असे गाणे म्हणून पार पाडण्याची प्रथा होती. परंपराशील पद्धती जगत असतांना सण-उत्सव, प्रसंगीची प्रसन्नता, सौंदर्य, स्नेहीसंबधीयांनी एक. जमून घेतलेला आनंदानुभव याचा ठसा, तसेच जीवनातील निर्बंध, दंडक (नियम), कधी कधी अकारण जाचणी विशेषत: मुलगी म्हणून अनुभवाचे ठसे उमटल्यामुळे लोकजीवनाचे, लोक संस्कृतीचे स्वरूप समजून घेणे सोपे होते. आजवर प्रतिष्ठित साहित्यात स्त्रीविषयी जे बोलले, लिहिले गेले आहे. त्या सर्वांचे आभार पुरूष लेखकांच्या लेखनातील आहे. यात स्त्रीला स्वत:बद्दल काय म्हणावयाचे आहे? याचा मागमूसही नाही. या सर्वात स्वत:विषयीचे मन आणि मत कोठे भेटत असेत तर ते स्त्री रचित, परंपराशील देशी भाषेतील लोकसाहित्यात, लोकगीतात, लोककथात वा लोकनाटयात. कथा, गीते, ओव्या, म्हणी, उखाणे अगदी शिव्यादेखील स्त्री ही अभिव्यक्ती होत गेली. त्यातूनच पुरूषप्रधान व्यवस्थेचा पगडा असलेल्या, सासर-माहेरच्या कौतुकाने ओथंबलेल्या स्त्रियांच्या ओव्या, कथा, गीते यांचे कौतुक भरभ्रून केले आहे. मात्र अशा 'कौतुकाच्या' साहित्यापेक्षा त्यात वेदनेचे, करूणेने ओथंबलेली बाई दिसली आणि त्याहीपेक्षा अधिक विद्रोह करणारीही परंपरेतीलच बाई दिसली. तिला तिच्या पारंपारिक ग्रामीण कृषीनिष्ठ समाजजीवनात कृतीशील विरोध करणे शक्य नव्हते मात्र तिला स्वत:च्या दुय्यमत्वाचे भान येत नव्हते, असे नाही, ती जात्यावरच्या ओव्यातून, म्हणी-उखाण्यातून व्यक्त होत गेली.

'कडू विंद्रावन, डोंगरी त्याचा रहावा
पुरूषाचा कावा, मला यडीला काय ठावा.'

पुरूषाच्या जातीला विंद्रावणाची उपमा देण्यात आली आहे. विंद्रावन म्हणजे, एक डोंगरी कडू फळ असते. दिसायला गोंडस असते पण फसवा असते. स्त्री असं वेड पांघरून आपले शहाणंपण व्यक्त करीत होती. लोकसाहित्यात देवदेवतांचे मानुषीकरण करून सामान्य व्यक्ती लोकमानस बनवल्याचे दिसून येते. सर्वसामान्यांना जी मानवी सुखदु:खे भोगावी लागली आहेत. त्यांच्यात उमटलेले राग, लोभ, मोह, मत्सर ही ओव्यातून गीतातून मांडले आहे.

इठ्ठलाचे पाय रूखमिन मर्जीती लोण्यानं
खरं सांगा मही आण, जना तुमची कोण् ?
इठ्ठल मनितो रूखमिनी, नको पाप धरू
आपल्या आसऱ्याला, जनी सुखाचं पाखरू
रूखमिन मनिती देवा, तुम्हां लाज थोडी
गादी फुलाची सोडून वाकळंची काय गोडी
रूखमिन मनिती देवा, तुमचा येतो राग
तुमच्या धोतराला, जनीच्या काजळाचा डाग

वरील ओव्यात वेगळे नातेशोध आहे. इथे रूक्मिणी फक्त एक पत्नी असते. तिला जनीत विठ्ठलाची प्रेयसी दिसायला लागते. सर्वसामान्य स्त्री ज्या पद्धतीने तक्रार करेल त्या पद्धतीने मांडले आहे. जनी आणि रूक्मिणी दोन्ही स्त्री पण यात वापरलेल्या प्रतिमा वेगळया आहेत रूक्मिणीला 'फुलाची गादी' तर जनाबाई ला 'वाकळ' म्हटले आहे. त्यातील नात्यात राग, भिती तरलतेने व्यक्त झाले आहे. विविध प्रसंगी उदा. जात्यावर बसून दळण दळत असतांना, तसेच झोपाळयावर बसून झोके घेत असतांना स्त्रिया ज्या ओव्या गातात त्यातून त्यांच्या समजूती, चालीरिती वैयक्तिक सुखदु:खे आणि एकूणच स्त्रीजीवनातील

अनेक बारकावे यांचे प्रभावशाली दर्शन होते. ओव्यांचा फार मोठा भाग कौटुंबिक ओव्यांनी सजलेला असून सासर-माहेरचा जिव्हाळा व्यक्त झला आहे.

पिवळा पितांबर, मला पुशितो सारा गाव
पिता दौलत राजस, म्या ग लुटीला बाजीराव
माडीवर ग माडी, सये सासर मामाजीची
उभी राहून पहाते मी लंका तिथून म्हायाराची
काळी चंद्रकला निरी पडलि शंभर
लेक कुणाची तालीवार

अशा हौसेमौजेच्या गोष्टी करणाऱ्या ओव्याबरोबर मातृप्रेम, बंधुप्रेम, सासर-माहेरचा अभिमान इ. भावनांही ओव्यातून अविष्कृत झाल्या आहेत. मराठी लोकसाहित्यात जन्म, विवाह, मृत्यु हयासंबंधीची गीते आहेत. जन्मासंबंधीची गीते डोहाळयापासून अंगाई गीतपर्यंतचा अनेक अवस्थांतराचे चित्रण करतात. स्त्रीगीतात स्त्री-वेदनेचा उद्गार असलेली गीते विशेष लक्षणीय आहेत. स्त्रीच्या वेदनेची कळ किती खोल व त्याचा परिसर किती व्यापक आहे हयाची कल्पना अशी गीतातून येते.

'राम' देव म्हणून चांगला असेल पण लोकमानस एक नवरा म्हणून त्या दृष्टीकोनातून पाहते तेव्हा तो तिला एका गर्भार स्त्रीवर अन्याय करणारा, छळ करणारा वाटतो. रामाबद्दल अनक्षर, ग्रामीण स्त्रीने काढलेले उद्गार उदाहरणादाखल देता येतील.

राम म्हणून राम, नाही सीताच्या तोलाचा |
हिरकनी सीताबाई, राम हालक्या दिलाचा

पुरूषाची जात दिसायला गोंडस पण् फसव्या जीव लावल्यामुळे स्त्री ची अवस्था ओवीतून व्यक्त होते.

जीवाला जीव देऊन पाहिला |
पाण्यातला गोटा अंगी कोरडा राहिला.

तुळस आणि लोकसाहित्य :

तुळस ही सुद्धा लोकसाहित्यासाठी वेगळी तुळस स्त्री म्हणून प्रतिमा अविष्कार केले. या तुळसीचे दु:ख जगण्याचा प्रयत्न या स्त्री प्रतिमांच्या बाहयरूपा सोबत अंर्तमनाचा विचार करते.

तुळशी गं बाई
तुला न्हाई नाक डोळे
अशा सावळया रूपाला
कसे गोविंद भुलले
तुळशी गं बाई
काय हे तुझं जीणं
गोविंदाच्या संगे
वर्सा वर्साला लगीन

लोकसाहित्याने वास्तवातील सर्वसामान्य माणसाचे जगणे जगणाऱ्या स्त्री प्रतिमांचा ही तितक्याच उत्कटतेने विचार केला आहे. भारतातल्या अन्य पारंपारिक स्त्रिया प्रमाणेच मराठी स्त्रियांनाही आपले मन मोकळे करता येईल्, अशी जागा जवळ जवळ नाहीतच. माहेरचे कौतुक सासरी केलेले रूचत नाही आणि सासरचा त्रास माहेरी सांगणे ही मर्यादाभंग ठरतो, अशी स्त्री

मग उखळ, मुसळ, जाते, पाणवठा अशा आपल्या श्रमांशी अभिन्न असलेल्या निर्जिव वस्तूंनाच आपले सखी – सवंगडी बनवून त्यांच्या पाशी आपले मन मोकळे करते.

काही गीतामध्ये जगण्या-मरण्याबद्दलचा तात्विक विचार अगदी सहज येवून जातो.

शेजारणीबाई नको म्हणूस माझं-माझं

नदीच्या पलीकडे जागा साडे तीन गज

स्त्री – वेदना जगण्याचे कार्य, त्यातील आध्यात्म सहजपणे अविष्कारत जाते.

दळण – कांडण, सडा – सारवण, शेतसिवारातली कामे, बाळाला जोजवणे, ही मातृकर्तव्ये, कधी झिम्मा – फुगडी सारख्या निमित्ताने, क्रिडागीते, फेराची गाणी, व्रत वैकल्यांशी संबंधित गीत असा स्त्रीगीताचा पसारा ओव्यांनी व्यापलेला आहे.

महाराष्ट्रातल्या पूज्य दैवतांसंबंधीच्या ओव्या आहेत उदा. पदुबाईची जत्रा, तुळजापूरची जत्रा, जत्रेशी संबंधीत असलेल्या दैवतांना जागृत करण्यासाठी हया ओव्या म्हटल्या जातात.

नाच ग घुमा | कशी मी नाचू

या गावच्या त्या गावच्या | सोनार नाही आला

माझ्या बाळाला | वाळा नाही दिला

कशी मी नाचू.....

या गीतात सोनाराप्रमाणेच इतरही व्यावसायिकांचे उल्लेख येतात. लोकगीतात मानवी मनाचे ऋणानुबंध जिव्हाळयात गुंफलेले आढळतात. स्त्री – वेदनेचा हुंकार त्यांच्या ओव्यामधून प्रकट होतो. ती आपल्या वेदनेला वाट देण्याचे काम करते.

कावळयानं कोटं केलं, बाभूळवनामंदी

पुरूषाला माया थोडी, नारी उमज मनामंदी

सवतीवर मुलगी देणाऱ्या बापाचा तीव्र् निषेध ओव्यातून व्यक्त होते.

लेकीचा जन्म जशी तांदुळांची गोणी

बाप विकून झाले वाणी

पत्नीला विनाकारला पीडा देणाऱ्या पतीचाही स्त्रिया निषेध करतात.

माऊलीच्या पोटी लेक जन्मला तरवड

लोकाच्या लेकराची त्यांन मांडी परवड

जात्यावरच्या ओव्या :

जात्यावर दळण दळणारी स्त्री ही तशी श्रमाचे एक प्रतिकही आहे. स्त्री त्या जात्यालाही ईश्वराचे रूप देते आणि म्हणते.....

जात्या ईसवरा, तुला वडून पाहिलं

मावलीच दूध्, तुझ्या कारनी लावल

जात्या ईसवरा, जडं अशी दाटयीनी

तुझ्या शिनयीची, आणू सौंगड कुठूयीनी

त्या काळतली समाजरचना, रीतभाव, परंपरा, पुरूषी वर्चस्व, वेगवेगळे नाते बंध, निसर्गाची वेगवेगळी रूप हे सगळ जात्यावरचे ओव्यात सामावले आहे. त्या स्त्रीला व्यक्त व्हावेसे वाटते. ती तिची मानसिक गरज असते.

जोवरी माय बाप ; लेक येऊ दया, जाऊ दया

आंब्याची आंबराई, एवढी बाळाला घेऊ दया

जोवरी मायबाप, लेकी माहेराची हवा

भाऊ भावजयाचं राज्य ; मग अम्मल आल नवा.

आई – वडिलानंतर हक्काचे माहेर उरत नाही. ही बाईची वेदना आहे. ओवी ही भावभावनांचा हिंदोळा आहे. मूक वेदना वेगवेगळया प्रतिक आणि प्रतिमातून व्यक्त होत असते.

बंधूजी विचारतो, भैना सासुरवास कसा

सावळया बंधुराया, बरम्या लिहून गेला तसा

बंधूजी विचारतो, भैना सासुरबास कसा

चिताकाचा फासा, गळी रूतला सांगू कसा.

वरील ओवीत जो सासुरवास आहे तो ब्रम्हलिखितच आहे पण नव्याने त्रास दिला तर करायचं काय ? इथं ''चिताकाचा फासा'' ही उपमा नवऱ्यासाठी आहे. अनेक वेगवेगळया भावनाचं प्रकटीकरण अभिव्यक्त होत असते. लोकगीतात यल्लमाच्या जगतीनी वाघ्या - मुरळी यांचे ही वर्णन करणारी गाणीतून व्यक्त होत असते. पूर्ण झाल्यावर देवीला मुलगी सोडली जाते, नवस त्यातूनच देवदासी ही प्रथा निर्माण झाली.

डॉ. रा. चि. ढेरे यांनी लज्जागौरी मध्ये जगतीणीविषयी एक गीत दिलं आहे.

यल्लु मंगळवारा दिशी

यल्लु शुक्रवारा दिशी

आली डोंगर उतरूनीया

भंडार इभूतीचा मळवट भरती

वर कुंकुंवाचा टिळा घेती

माळ, परडी शिक्का घेती

यल्लु जोगवा मागती.

तसेच वाघ्या मुरळीची गाणी पाहिली की बरीचशी रचना लावणी सारखी वाटते. कारण त्यातील ठेका व श्रृंगार परिपोष शब्दरचना कुठतरी लावणीचा पाया असावा, असे वाटते.

लागे नाचाया, लागे नाचाया, लागे नाचाया

पोर बावरी झाली जेजुरीला जाया

मल्हारी मार्तंड, जय मल्हार

अनेक प्रसंगी स्त्री गीतातू, ओव्यातून अभिव्यक्त होत गेली.

हळदीचे गीत :

घाणाजी घातिला खंडीभर

भाताचा घाणा जी घातिला खंडीभर

भाताचा मांडव, गोताचा दणका भारी

घाणा जी घातिला खंडीभर

आधी मान देती कुंकवाला

आधी मान देती हळदीला

महादेव कोळयाच्या लग्नगीत :

तळयातल्या ग कापूरवेळी, तुझ्या तोडील्या तारा

गावदेवाला बोलावणं करा, लग्न लावायला चला

संपूर्ण जीवन ओव्यांतून व्यक्त होते.

कारल्याचं बी पेर ग सुनबाई, मग जा आपल्या माहेरा, माहेरा

कारल्याचं बी पेरल गं सासूबाई,

आतातरी धाडाना धाडाना

कारल्याचे बी पेरणी पासून तर भाजी झाल्यावर भांडी घासण्यापूर्वत संपूण चित्रण सासू-सुनेच विरोधात्मक नाते अविष्कारीत केले. दोन्ही या स्त्री प्रतिमा, जेवढं कौतुक आहे, शहाणपण आहे, समजंसपणा आहे आणि स्त्रीची मूक वेदना ही आहे.

आतातरी धाडाना, धाडाना.... यामध्ये आर्त स्वर आहे.....

लेकीच्या माहेरासाठी

माय सासरी नांदते

स्त्री ची विविध रूपे..... पेरणी, कापणी अशा कृषी कर्माच्या वेळी जो आनंद व उल्हास असतो. तो लोकसंस्कृतीच्या लोकगीतातून प्रगट होतो व ती अभिव्यक्त होत गेली.

सारांश :

लोकसाहित्यात स्त्रियांनी सुंदर असा ठसा उमटविला. पण मौखिक परंपरेने या लोकसंस्कृतीचे जतन करून हे शाबित ठेवले. पण आज लोकगीताचा, लोकसंस्कृतीचा समृद्ध वारसा जपण्याची गरज आहे. नव्हे ते लिखित स्वरूपात उपलब्ध होण्यासाठी यांचे संकलन होते गरजेचे आहे. ज्याप्रमाणे पिठाची गिरणी आल्यानंतर जात्यावरची गाणी गेली, रेकॉर्ड आल्यामुळे विवाह गीते लुप्त होण्याचा मार्गावर आहेत. लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी लोकगीतातून, लोकनाटयातून लोककथातून व्यक्त झालेली स्त्री प्रतिमा विविध रूपातून अभिव्यक्त होते. जीवनातील निर्बंध, दंडक, अकारण जाच, मुलगी म्हणून जन्माल्या आल्यावर अनुभवाचे टक्के – टोणपे, ठसे उमटल्यामुळे लोकजीवनाचे, लोकसंस्कृतीचे स्वरूप समजून घेणे सोपे होते.

संदर्भ :

१) भागवत दुर्गा – लोकसाहित्याची रूपरेखा, मुं. म. ग्रंथ संग्रहालय , मुंबई – 1979

२) मांडे प्रभाकर – लोकसाहित्याचे स्वरूप, सरिता प्रकाशन, औरंगाबाद, 1989

३) http://kavitakosh.org/kk

४) http://www.google.com/url

५) http://mr/vikaspedia.in

मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

संशोधक

मारोती कदम

डायट, मुरूडता. जि. लातूर

मार्गदर्शक

डॉ. सुनंदा गोपिनाथराव रोडगे

प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय परभणी

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. चक्रधर स्वामी, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत गोरोबाकाका, संत तुकाराम, संत एकनाथ, संत गाडगेमहाराज, संत तुकडोजी महाराज तसेच समर्थ रामदास, संत जनाबाई, संत मिराआई, संत कान्होयात्रा यांच्या कार्याचा गौरवाने उल्लेख करावा लागतो. तत्कालीन समाज परिवर्तनात व आजही संताच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो.

संत ज्ञानेश्वरांनी ज्या भागवत धर्माचा पाया रचना त्याचा झगमगता कळस म्हणजे संत तुकाराम महाराज होय. या सर्व संत मंडळीनी आपआपल्या ग्रंथातून स्त्रियांविषयी विचार व्यक्त केलेले आहेत. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी मधून, संत नामदेवांनी नामदेव गाथ्यातून, संत तुकारामांनी तुकाराम गाथ्यातून तर नाथांनी एकनाथी भागवतातून आपले किंवा स्त्रीविषयक विचार मांडले आहे.

संत एकनाथांनी त्यांच्या एकनाथी भागवतातून पुढील विचार स्त्रियांविषयी व्यक्त केलेले आहेत.

नतथाऽस्य भवेत्कल्शोबंन्ध धान्य प्रसङ्गत:
योषित्सङ्गद्यया पुंसोयथातत्स ङ्रिस ङ्गत : ।।30।।

सार्थ श्री एकनाथी भागवतामधील हा श्लोक असून याचा चौदाव्या अध्यायात समावेश करण्यात आलाआहे. याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

अविद्येचे अनंत कोटी समुदाय स्त्रीसंगामध्ये भरलेले असतात. स्त्री नुसत्या डोळयांनी पाहिली तरीसुध्दा अधर्माचा भडका उठतो. जी मोह मायांची रास जे पेटलेल्या कामाग्नीचे सर्पण. जी जीवाला पडलेली मोठी भुरळ, आणि जे अध:पतन तीच स्त्री होय. मदनाचे जे तीक्ष्ण बाण, मायेचे जे यंत्र आणि जे अंधतमनरकाचे पूर्ण भरलेले कुंड, तेच स्त्री होय. अहो, जिच्या संगतीने ज्ञानशक्तीसुध्दा आंधळी होवून जाते. जी अनेक प्रकारच्या आसक्ती वाढवते आणि जीच्या योगाने स्वत:च्या स्वार्थाची ही विस्मृती पडते. जिच्यासाठी नाना प्रकारचा संसार करावा लागतो. जिच्यासाठी असहय गर्भवास सोसावा लागतो. जीवाचा केवळ वज्रपाश असे जे विषय विलास ते जिच्यासाठी भोग लागतात. जी निरंतर दु:ख व शोक सहन करुन सदोदित नरक लोक सहन करते अशी आपली प्रत्यक्ष आई शत्रूप्रमाणे लेखून ती बायको भाऊ लाडकी होऊन असते. जी मातृप्रेमात बिघाड आणते, जी बंधुप्रेमाला बिघडविते, जी निरंतर आपल्या नख-यांत गुंतवून ठेवते जी अधर्म रुपआव्यात नेवून सोडते.

जिचे नेत्रकटाक्ष तर अत्यंत तीक्षण पुरुषाच्या अंतकरणात रुतले की जे जिवाला भुरळच घालतात, आणि त्यांच्याद्वारे तिचे चढलेले विष कधी उतरत म्हणून नाही. एवढा त्रास स्त्रीच्या संगतीने होतो. हयाकरिता जो माझी प्राप्ती इच्छित असेल, त्याने स्त्रीचीआसक्ती सोडून दयावी.-हृदयामध्ये तिचा लाभ ठेवूच नये. मनामध्ये स्त्री आठवताच ती ज्ञान-घ्यावयाच्या स्थितीचा विध्वंस करते. एवढी स्त्रियांच्या संगतीची बाधा आहे, आणि स्त्रीलंपट पुरुषाच्या संगतीची तर त्याहून ही अधिक होते.

वरील विवेचनावरून स्त्री संगतीच्या वाईट परिणामाचे विवेचन करण्यात आले आहे. मात्र स्त्री संगतीने झालेल्या कल्याणाचे ही अनेक दाखले भागवतात देण्यात आलेली आहेत. त्यासंबंधीची माहिती पुढील प्रमाणे.

चुडालास्त्रीच्या संगतीने शिखीध्वज राजा तरुण गेला किंवा मदालसेच्या संगतीने कुवल या श्वराजा तरुण गेला. लीलानामक स्त्रीने भक्ती करून सरस्वतीला प्रसन्न केले आणि त्यामुळे तिच्या पतीचा उध्दार झाला, हे वसिस्फांनी आपल्या ग्रंथात सांगितलेच आहे. अशा प्रकारे स्त्रियांच्या संगतीने पुरूष उध्दरल्याचे ऐक तो.

सतराव्या शतकात संत तुकाराम महाराजांनी स्त्री संगतविषयी आपल्या विविध अभंगातून आपले विचार व्यक्त केले आहेत.

स्त्रियांचा तो संगन को नारायणा ।काष्ठायापाषणा मृन्तिकेच्या।।**1**।।
नाठवे हा देव नघडे भजन।लांचावालें मन आवरेंना।।**2**।।
दृष्टीमुखेमरण इंद्रियांच्या दारे। लावण्य जे खरे दु:खमुळ।।**3**।।
तुका म्हणे जरी अग्नी जाला साधु । परीया वे बांधू संघ हणे।।**4**।।

या अभंगाचा अर्थ असा की, हे नारायणा, स्त्रियांची संगती नको, मग त्या काष्ठाच्या, मातीच्या अगर दगडाच्या का केलेल्या असेनात कारण त्यांच्या संगतीने देव आठवत नाही व त्याचे भजनही होत नाही व ते चेलां चावलेले मन ही आवरत नाही. त्यांना इंद्रियाद्वारा दृष्टीने पाहिलेली मरण येते. जरी स्त्रिया दिसण्याला सुंदर असतात तरी ते त्यांचे सौंदर्य दु:खाला कारण आहे. तुकाराम महाराज म्हणतात, अग्नी हा जरी साधु झाला तरी आलिंगत दिल्याचा बाधाच करील.

आणखी एका अभंगात तुकारामांनी गणगोताविषयी आपले विचार अतिशय परखडपणे मांडले आहेत. ते म्हणतात,

स्त्रिया पुत्रकलत्र हेतष मायावंत ।शेवटीचा अंतन पवे कोणी।।1।।
यमाचि ये हाती बांधोनिया देती।।भुषेणेही घेती काढूनीया ।।2।।
ऐसिया चोरांचा कैसा हा विश्वास ।धरिली तुझी काय, तुका म्हणे।।3।। (3051)

या अभंगाचा अर्थ असा की, स्त्रिया व पुत्र हे सर्व (लोभी, कपटी) आहेत. अखेर कोणीही उपयोगी पडणार नाही. उलट यमाच्या हाती बांधून देतील व अंगावर असलेली वाईट भुषणे काढून देतील. तुकाराम महाराज म्हणतात असल्या हया चोरांच्या वर विश्वास कसला आहे? म्हणून हे देवा, मी तुझी कास धरली आहे.

जो परद्रव्याचा परनारीचा अभिलाष करतो त्याचा त्याच्या सर्व भाग्याचा -हास होतो. एका घटनेच्या अगर एका दिवसाच्या अथवा एका महिन्याच्या अगर तीन वर्षाच्या अवधीत पतनास जाणे. हे तर त्यांच्या पदरी बांधलेलेच आहे. त्याचा पुढे घात होईल असे उघड चिन्ह दिसत आहे.

कारण त्याने जे काही केले त्याचे चूक त्याला पुढे निश्चियाने मिळाले पाहिजे. तुकाराम महाराज म्हणतात, क्षणात एखादयाचा घात होतो व कित्येकां चा नाश होण्यास कालांतर लागते हे खरेपण शेवटी सर्वांचा नारा हा व्हायचाच.

दुस-याच्या स्त्रीस मनात कपट धरून माता म्हणतात काय अर्थ आहे. विषयीचा भाव अभंगात तुकाराम महाराजांनी वर्णन केले आहेत ते म्हणतात,

परस्त्री माते म्हणता। चित्त लाज विणे घेता।।1।।
काय बोलनिया तोंडे ।मना माजी कान कोंडे ।।2।।

याचा अर्थ असा की, दुस-याच्या बायकोस आपली माता म्हणताना ज्याचे चितच चित्तास लाजविते, मनात कपट धरुन तोंडाने परस्त्री माता म्हणाव्यात काय अर्थ आहे ?

संत तुकाराम महाराजांचे चारित्र्य बदनाम करण्यासाठी येथील काही कर्मठांनी एका स्त्रीला हाताशी धरुन महाराजांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला. ही स्त्री जेंव्हा तुकोबारायांकडे गेली तेंव्हा महाराजांनी हा अभंग केला महाराज म्हणतात,

पराविया नारी रखुमाई समान । हे गेले नेसून ठायीचें ची।।1।।
जाई वो तूमातेन करी सायास ।आम्ही विष्णुदास नव्हो तसे।।2।।
नसा हा वे मज तुझे हे पतन ।नको हे वचन दुष्ट वरो।।3।।
तुका म्हणे तुज पाहिजे भ्रतार । तरीका इतर लोक थोडे ।।4।। (3346)

परस्त्रिया आम्हाला रखुमाई समान आहेत. हा नियम आमचा पुज्याच झालेला आहे. हे आई, तु जा, आम्हाला वश करण्याचे सायस करु नकोस. आम्ही विष्णुदास त्या जातीचे नाही. तुझे हे पापकृत्य मला सहन होत नाही, म्हणुन असे वाईट शब्द बोलून कोस, तुकाराम महाराज म्हणतात,

तुला नवरा पाहिजे असेल तर काय गावात माणसे थोडी आहेत?

आई ही सर्वश्रेष्ठ रक्षणकर्ती असते. आपल्या बाळाचे लालन पालन पोषण करण्याची जबाबदारी आईच घेत असते. आईनेच आपल्या बालकाचा गळा कापला तर त्या ठिकाणी त्याचे रक्षण कोणी करावे ? या विषयी तुकाराम महाराज म्हणतात,

माता, कापी गळा। तेथे कोण राखी बाळा।।1।।
हे का नेणां नारायणा ।मज चालविता दो ना ।।2।।

आईची ओर वी गाताना तुकाराम महाराज म्हणतात,

माते चियां चित्ती ।अवघी बाळकाची व्यासी ।।1।।
देह विसरे आपुला ।जवळी घेता सीण गेला।।2।।
दावी प्रेम थाने । आणि अंगावरी चले।।3।।
तुका संता पुढे ।पायी झोंबे लाडे कोडे ।।4।।

आईच्या चितांत बालकाविषयी चा मोह भरलेला असतो. त्या बालकाला जवळ घेतले म्हणजे ती आपल्या देहास विसरते व तिच्या सर्वश्रमाचा परिहार होतो. ती बालकाला प्रेमाने खाऊ घालते. त्या योगाने ते बालक तिच्या अंगावर चढू लागते. तुकाराम महाराज म्हणतात. मी संताच्या पायाला लाडाने व कौतुकाने बालकासारखा मिठी मारत आहे.

तुकाराम महाराजांनी स्त्रियांविषयी आदर करतात त्यांच्यामध्ये असलेल्या प्रचंड प्रेमाचे (निस्वार्थ) वर्णन त्यांनी आपल्या अभंगातून केलेले आहे. आपल्या बाळाच्या हितासाठी ती सर्व स्वपणाला लावून त्याचा सांभाळ करते. यात तिचा कोणता ही स्वार्थ दिसत नाही. या विषयीचे वर्णन तुकाराम महाराजांनी या अभंगातून अतिशय मार्मीकपणे मांडले आहे.

लेकुराचे हित ।जाणे माऊलीचे चित्र।।1।।
ऐसी कळ बळ यांची जाती । करीला भनविणा प्रीती।।2।।
पोटी भार वाहे ।त्याचे सर्वस्वही साहे।।3।।
तुका म्हणजे माझे ।तुम्हासंतावरी ओझे ।।4।।

मुलाचे हित व्हावे हेच आईचे चित्तास वाटत असते. मुलाकडून लाड होण्याची काही इच्छा मनात न धरता आई त्याजवर प्रीती करते. अशा तिच्या कळवळीची वितरून जाती आहे. ज्या मुलांचे नऊ महिने पोटात ओझे बाळगले त्याचा ती सर्वस्वी सांभाळ करते व त्याच्यापासून होणारे कष्ट सोसते. तुकाराम महाराज म्हणतात, त्या बालकाचे सर्वस्वी ओह ते जसे मातेवर असते. त्याचप्रमाणे माझे ओझे तुम्हा संतावर आहे.

अशाप्रकारे संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंग रचनेतून 'स्त्री' या व्यक्तीत्वाविषयी आपले विचार परखडपणे व्यक्त केले आहे. आई म्हणुन तिचे थोरवी किती महान आहे यांचे वर्णन केलेले आहे. तर तासण्यात परस्त्री संगाचे किंती परिणाम होवू शकता तयाचे ही वर्णन केलेले आहे. परस्त्री ही रखुमाई समान मानावी हा संदेश सर्वांना दिला आहे.

गीता- ज्ञानेश्वरीतील स्त्री प्रतिमा अतिशय सुंदर पध्दतीने व्यक्त झाली आहे. स्त्री संकल्पना, स्त्रीचे उदानरुप, पत्नी एक निष्ठतेचे प्रतिक, सती- सर्वस्व समर्पणाचा आदर्श, सवत, सावत्र, आई आणि कन्या, दाई, दासी आणि दु:शील स्त्रिया, स्त्री जीवनातील नाजूक समाचा या बाक्त जाणवलेली स्त्रीची रुपे माऊलीणी स्पष्ट केले आहेत.

एकंदर संत साहित्यामध्ये स्त्रियांविषयी आदरभाव ही संत सनहितातून व्यक्त झालेला दिसून येतो. या निखातील स्त्री आणि पुरूष हे अत्यंत महत्वाचे घटक आहेत हे आपण लक्षात घेतले पाहिजे. स्त्रियांच्या विषयी वक्त केलेल्या आदराविषयी तुकाराम महाराज म्हणतात.

स्त्री पुत्रा दिकी राहिला आदर। विषयी पडीभर अतिशय ।।1।।
आता सोडवणे धावा नारायणा।। मज हे वासना अनावर ।।2।।

संदर्भ ग्रंथ :-

1) रामचंद्र कृष्ण कामत चंदगडकर, सार्थश्री एकनाथी भागवत, ढवळे प्रकाशन
2) विष्णु बुवा जोग महाराज सार्थ तुकारामाची गाथा, केशव भिकाजी, ढवळे प्रकाशन
3) ज्ञानेश्वरीतील स्त्री प्रतिमा, म.रा. कुलकर्णी, स्नेहवर्धन प्रकाशन

मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा : संतश्रेष्ठ कवियित्री जनाबाई :

प्रा. नीता लक्ष्मणराव चौरे

सहाय्यक प्राध्यापिका, शासकीय अध्यापक महाविद्यालय, भंडारा

प्रस्तावना

तेराव्या शतकात संत साहित्य उदयास आहे. ज्ञानेश्वरांनी व नामदेवांनी वारकरी संप्रदायाच्या निमीत्ताने महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळील प्रारंभ केला. या चळवळीत त्यांच्या सोबत अठरापागड जातीतील अनेक संत सामिल झाले. ज्ञानदेव, नामदेव, सेना न्हावी, गोराकुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, चोखामेळा, जनाबाई इत्यादी. यात जनाबाईचे स्थान स्त्री संत म्हणून अत्यंत महत्वाची स्वतंत्र, स्वयंभू व श्रेष्ठ स्वरूपाची ठरली आहे. भक्तिचा मार्ग अत्यंत सोप्या व सरळ भाषेत सांगण्याचा प्रयत्न करणाऱ्या जनाबाईचे अभंग उत्कृष्ट भावकविता ठरली आहे. परमेश्वर प्राप्तीची तळमळ व आर्तता यातून त्यांच्या बऱ्याचशा अभंगांची निर्मीती झाली असली तरी स्वतःचे भावजीवन संतांच्या सहवासातील उत्कट क्ष्ण आणि एक स्त्री व अस्पृश्य समाजातील असल्याकारणाने कष्टी जीवन अत्यंत तरल स्वरूपात वर्णन केले आहे. यामुळे यादवकालीन सर्व संतमंडळीत जनाबाईचे स्थान, त्यांचे जीवन, व्यक्तिमत्व व सामाजिक बांधीलकी, स्वतंत्र व वैशिष्टयपूर्ण आहे.

महाराष्ट्रातील परभणी जिल्हयात गोदावरी नवीच्या काठी 'गंगाखेड' या गावी जनाबाईचा जन्म झाला. बालपणी आईवडील निर्वतल्याने मातृपितृसुखास वंचित झाल्या होत्या. आईवडीलांनी विठ्ठल भक्तीत समरस असणाऱ्या संत नामदेवाचे वडील दामाशेट यांचेकडे अध्यात्मिक संस्कारासाठी जनाबाई पाच-सहा वर्षाची असतांना नेवून ठेवले. काही अल्पशा काळातच आई वडीलांचे निधन झाल्यामुळे दामाशेट यांनी या अनाथ मूलीचे आपल्या कन्येप्रमाणे पालनपोषण केले.

दामाशेटचे पूर्ण कुटूंब विठ्ठलभक्ती करणारे असल्यामुळे त्यांचे संस्कार जनाबाईवर झाले. संत नामदेव हा दामाशेटचा मुलगा जनाबाईपेक्षा पाच वर्षांनी लहान होता. पुढे हाच तिचा गुरू ठरला. नामदेवावाचून जनाबाईंना वेगळे असे स्वत:चे जीवनच नव्हते.

'म्हणे नामयाची जनी'

हया त्यांच्या प्रत्येक अभंगाच्या अखेरीस येणाऱ्या नामावरून त्याचा प्रत्यय येतो.

जनाबाईचे काव्य : स्वरूप व वैशिष्टये -

संत जनाबाईनी आपल्या काव्यरचनेत समकालीन संतकवीची प्रेरणा घेतली असली तरी त्यांनी स्वतंत्र, स्वयंभू वैशिष्टयपूर्ण रचनाही केली आहे. हे त्यांच्या काव्याचे वेगळेपण त्यांना श्रेष्ठत्वाकडे नेणारे ठरले आहे. ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्या कवितेतून जे विचार व भाव मांडले गेले. त्यांचे प्रतिध्वनी जनाबाईच्या काव्यात उमटले असले तरी बऱ्याचशा अभंगातून त्यांच्या व्यक्तीगत अनुभूतीचे आणि आर्ततेचे प्रत्ययकारी चित्रण फार मौलिक आहे. याबाबतीत संत साहित्याचे अभ्यासक अ.ना. देशपांडे यांचे जनाबाईच्या काव्यस्वरूपाविषयीचे मत फार महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, "जनाबाई स्वतंत्र वळणाची व स्वतंत्र स्फूरणारी देशी कविता आहे. समाजाच्या खालच्या समजल्या गेलेल्या स्तरातील लौकीकदृष्टया दीन, दरिद्री, जनसाधारणांची ही कविता आहे."

जनाबाईच्या कवितेचा अध्यात्मिक अभ्यासाचा सगुणभक्तीने प्रारंभ होतो. नामदेवाविषयी कृतज्ञभाव व्यक्त करण्यापासूनचा तर अस्पृष्य स्त्री म्हणून झालेली कोंडी यातले उत्कट सुखदु:ख, जीवघेणे संघर्ष, पदोपदी निर्माण होणारे प्रश्न

याविषयीचे संवेदनशील मनाने उभे केलेले एक अनुभवविश्व जनाबाईच्या अभंगांना भावसमृद्ध बनवते. यामध्ये तिचे उपेक्षित असणारे जीवन, श्रमजीवी, अनुभवसृष्टी, त्यांची सुखदु:खे, घटनाप्रसंग, जीवनातील चढउतार इ. सर्व अनुभूती जनाबाई आपल्या अस्सल वास्तव व दैनंदिन जीवनसरणीच्या भाषेत बोलतात. त्यामुळे त्यांची कविता साक्षात्कारी वाटू लागते.

जनाबाईची नामदेवाप्रती कृतज्ञता व ज्ञानेश्वराबद्दल प्रेमभाव -

संत जनाबाई हया सर्वश्रेष्ठ नामदेवांच्या विठ्ठलभक्तीमय झालेल्या कुटुंबात वावरत होत्या. जनाबाईंना स्वत:चे कुटुंब, घर नव्हते. नामदेवांचे घर हेच त्यांनी आपले घर व कुटुंब मानले होते. त्यामुळे नामदेवाविषयी त्या अनेक ठिकाणी कृतज्ञता व्यक्त करतात.

"धन्य मायबाप नामदेव माझा |
तेणे पंढरीराजा दाखविले |"

असा कृतज्ञतापूर्वक नामदेवांचा उल्लेख करते. तसेच सगुणभक्ती करता करता ज्ञानेश्वरांच्या अनुभवविश्वातही प्रवेश करते. नामदेवाप्रमाणे त्या सगुणांचा आत्यंतिक आग्रह धरीत नाही. तिला ज्ञानेश्वरांचा अद्वैतविचार अत्यंत सहिष्णू, स्वागतशील आणि परिपक्व वाटतो म्हणून ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानाचा स्विकार करून ज्ञानेश्वराविषयी आज्ञार्थी भाव प्रगट करते.

"ज्ञानाचा सागर | सखा माझा ज्ञानेश्वर ||
मरोनिया जावे | बा माझ्या पोटी यावे ||
ऐसे करी माझ्या भावा | सख्या माझ्या ज्ञानोबा ||"

जनाबाईचे पंढरीमाहात्म्य –

जनाबाईचे मूलत: एक अभिजात भक्तीमन होते. त्यामुळे नाम माहात्म्य, पंढरीमाहात्म्य व संतसंगमाहात्म्य यांचे त्या सुंदर वर्णन करतात.

"पुंडलिक भक्तबळी | विठो आणिला भूतळीं ||
अनंत अवतार केवळ | उभा विटेवरी सकळ ||"

वारकरी संप्रदायाने पुंडलिकाचे महत्त्वपूर्ण कार्य पायाभूत ठरविले होते. त्यामुळे जनाबाईंनी पुंडलिकाचे माहात्म्य आपल्या अभंगात अपरिहार्यपणे वर्णन केले आहे.

"अनंत लावण्याची शोभा | तो हा विटेवरी उभा ||"

व

"पाय जोडुनी विटेवरी | कर ठेऊनी कटावरी ||"

या अभंगातून केलेले पांडुरंगाचे वर्णन मौलिक आहे.

याशिवाय "जनाबाईंनी गायिलेले संत माहात्म्यही त्यांच्या अभिजात प्रज्ञेचा व प्रतिभेचा सुजाण आविष्कार आहे." असे डॉ. सुहासिनी इर्लेकर यांचे मत सार्थक वाटते. संत जनाबाईंनी व्यक्त केलेली 'संत' संकल्पना जनाबाई व्यक्त करतात.

"संत हे कोण तरी देवाचे हे डोळे |
पूजेविण आंधळे देवाचियेत
कोण्या नेत्रे देव पाहे तुजकडे |
यासाठी आवडे संत करी ||"

वाङ्.मयीन व्यक्तिमत्त्व -

जनाबाईचे वाङ्.मयीन व्यक्तीमत्त्व अत्यंत समृद्ध, स्वतंत्र व संतश्रेष्ठत्वास पात्र ठरले आहे. जनाबाईंनी कृष्णजन्म, बालक्रिडा यावर अभंग रचना केली आहे. त्यांनी 'नामदेवचरित्र', 'ज्ञानेश्वरचरित्र' यांचे लेखन केले. याशिवाय ज्ञानेश्वरांच्या

भावंडाविषयी चरित्रकाव्य रचली आहेत. तशी काही समकालीन संतांविषयी संक्षिप्त चरित्रकाव्य रचली आहेत. यात चोखामेळा, गोराकुंभार याविषयी मार्मिक लेखन केले आहे. अन्य रचनेत पाळणा, भूपाळी, झोपाळयावरील ओव्या इ. रचना उपलब्ध आहेत.

जनाबाईच्या या कष्टमय जीवनात विठ्ठल तिला सहाय्य करण्याकरिता धावून येतो. याचा साक्षात्कार त्यांना होतो.

" झाडलोट करी जनी | केर भरी चक्रपाणी ||
पाटी घेऊनही डोईवरी | नेऊनिया टाळी दुरी ||
जनी जाय शेणासाठी | उभा आहे तिच्या पाठी ||
जनी जाय पाणीयासी | मागे धावे ऋषिकेशी ||"

जनाबाई आणि चक्रपाणी यांच्यामधील हे नाते थेट अभिजात व स्वतंत्र वाटते.

क्रांतीकारी संतश्रेष्ठ जनाबाई -

अध्यात्मिक प्रवासातील काव्यरचनेत विठ्ठलमहात्म्य, नाममहात्म्य, कृष्णलीला, बालक्रिडा इ. विषय व्यवसायपर रूपके अश्या बाऱ्याच गोष्टी समकालीन संताच्या रचनेत आढळतात. संतजनाबाईचे वेगळेपण म्हणजे, त्यांच्या काव्यातून अभिव्यक्त होणारे त्यांचे व्यक्तिगत भावविश्व होय. वैयक्तिक पातळीवर त्यांना आलेली अध्यात्मिक अनुभूती हे त्यांच्या काव्याचे वेगळेपण होय. एक स्त्री व अस्पृश्य असल्याने त्यांच्या वाटयाला आलेल्या कष्टमय बाबी यांचा काव्यातून झालेला अविष्कार तसेच वैयक्तिक अनुभवविश्व यांची सांगड घालून प्रवास करते तेव्हा त्यांच्या कवितेचे विकसित रूप श्रेष्ठत्वाची अनुभूती देते.

स्त्री पुरूष विषमता हे मानवी उच्च तत्वज्ञान होवूच शकत नाही. सनातनी धर्मात स्त्रीला दिलेले गौण स्थान जनाबाईला मान्य नाही. स्त्री पुरूष समानता ही मानवी जीवनाची अवश्योपाधी असावी. ही अभिलाषा जनाबाईच्या अभंगातून व्यक्त होते व ते फार मार्मिक आहे.

'स्त्री जन्म म्हणूनी न व्हावे उदास |
साधूसंता ऐसे केले मज ||'

अशाप्रकारे जनाबाई विलक्षण सतेज बुद्धी लाभलेली स्वतंत्र बाण्याची कवयित्री होय. तिचे स्त्रीमन भावसंपन्न व सशक्त आहे.

समारोप -

जनाबाईचे जीवन त्यांचे लेखन, त्यातील भावोत्कटता फार महत्त्वाची आहे. नामदेवाची सगुणभक्ती व ज्ञानेश्वरांची निर्गुण साधना यांचे ऐक्य त्यांच्या अध्यात्म साधनेची विशेषता होय. संत साक्षात्कारी जनाबाई फार चमत्कारीक व्यक्तिमत्व ठरल्या आहेत. त्यांनी स्वत:चे एक सामर्थ्यशाली संत कवियत्रीचे व्यक्तिमत्व निर्माण केले. त्यांचे स्वत:चे स्वतंत्र अनुभवविश्व त्यांच्या विविध प्रकारच्या लेखनातून साकार झाले आहे. जनाबाई उपेक्षित समाजाच्या प्रतिनिधी म्हणून लोकभाषेत संवाद साधतात. अस्पृश्य, दलित व स्त्री म्हणून मिळणाऱ्या वेदना व अवहेलना निर्भीडपणे काव्यातून व्यक्त करणाऱ्या पहिल्या संतकवयित्री ठरतात.

तेराव्या शतकातील संत साहित्यातील इतिहासात संत जनाबाईचे लेखन अभिव्यक्तिच्या दृष्टिकोणातून स्वयंभू, स्वतंत्र, श्रेष्ठ व नाविन्यपूर्ण क्रांतीकारी आहे. म्हणून संतमंडळीतच नव्हे. तर एकूण मराठी काव्यविश्वातील त्यांचे स्थान कवयित्री म्हणून मौलिक ठरले आहे.

संदर्भ –

१. देशपांडे अ.ना., प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास, व्हीनस प्रकाशन, पुणे.
२. इर्लेकर सुहासिनी, प्राचीन मराठी कवियत्रीचे वाड्.मयीन कार्य, परिमल प्रकाशन, औरंगाबाद.
३. इर्लेकर सुहासिनी, संत जनाबाई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

ना.धों. महानोर यांच्या कवितेतून येणा-या स्त्रीविषयक प्रतिमा

डॉ. शिवसांब दिनानाथ कापसे

श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय, पूर्णा जि परभणी.

ना. धों. महानोर यांच्या कवितेतून येणा-या प्रतिमाचा विचार करायचा आहे. कवीच्या अनुभवविश्वाला अर्थपूर्णपणे प्रतिमेच्या माध्यमातून व्यक्त करता येते. महानोराच्या निसर्ग कविता, रानातल्या कविता, पावसाळी कविता वेगवेगळ्या प्रतिमांमधून व्यक्त झाल्या आहेत. मानवी भाव, भावना, हर्ष, खेद, सुख, दुःख या सर्वांना ते प्रतिकात्मक पध्दतीनेच व्यक्त करतात, त्यांच्या कवितेतून निसर्ग अतिशय सहजपणे वावरतो, जणू सर्व कविता निसर्गाचे एक प्रतीक म्हणून वाटावी. त्यांचे अनुभवही प्रतिकाच्याच भाषेतून येतात. याविषयी प्रा. प्रसन्नकुमार पाटील म्हणतात, "हे जे विविध अनुभव व्यक्त होतात ते प्रेमजीवनाच्या वेगवेगळ्या छटांचे अनुभव होत आणि हे अनुभव समर्थपणे अंगभूत लय घेऊन विविध प्रतिमांच्या द्वारे व्यक्त होतात, यातच या कवितेचे वेगळेपण दिसून येते.[1]महानोरांच्या कवितेतून स्त्री पुरुषाच्या नात्याला वेगवेगळ्या प्रतिमामधून साकार केले आहे

स्त्रीविषयक प्रतिमा :

महानोर याच्या कवितेतून मोठ्या प्रमाणात स्त्रीविषयक प्रतिमांचा वापर करण्यात आलेला आहे, त्या प्रतिमा अतिशय प्रभावी अर्थवाही आणि काहीशा गूढ आहेत. स्त्रीच्या वेगवेगळ्या रूपाला भावनेला आणि मनःस्थितीला व्यक्त करण्याकरिता कवीने या प्रतिमाची योजना कवितामधून केल्याचे दिसते. शृंगारभावना, प्रीतीभावना विरहावस्था साकारण्यासाठी या प्रतिमा येतात. चवळीची शेंग पिवळी धम्मक (रानातल्या कविता १४) गंधवती (रा.क.१५). केळ कातीव रूपाची (रा.क.१६), फुललेल्या बोंडापरी (रा.क. १९) बावरा पक्षी (रा. क. २९). माल्हन (रा.क.२९). केळ कमळण (रा.क.३२). राजसपाखरू (रा.क.३३) ज्वार उभार (रा.क.४४),मन (वही-५४), लखतब बोट (वही-५५) अशी काही निसर्गप्रतिमांमधून महानोरांच्या कवितेतील स्त्री अधिक स्पष्टपणे व्यक्त होते. कधी निसर्गप्रतिमांमधून रोमँटिक स्त्री उभी केली त रमणान्या कवीने स्त्री आणि निसर्ग यांच्यातील आंतरीक संबंध अचलपणे ओळखलेले दिसतात. निसर्गाशी कवीचे तादात्म्य यामुळे लक्षात येते. स्त्रीच्या भावना कवीने सूचकपणे निसर्गामधून व्यक्त केल्या आहेत. स्त्री-पुरुषांच्या देहधर्म, गारकाव्यातून मांडलेला आहे.

महानोर यांच्या अनेक कवितांमधून स्त्री व निसर्ग यांचे चित्र रेखाटले आहे. स्त्री आणि निसर्ग हा अनेक कवितांचा गाभा आहे. स्त्रीमध्ये ते निसर्गाला शोधतात आणि निसर्गामध्ये स्त्रीला शोधतात, 'राधू' या प्रतिमेतून प्रियशीच्या ओढीने परत येणारा प्रियकर येतो,

"राघू उठून जाताना फांदीहले झुले
पानांतल्या थेंबापाशी नम उतरले
नम उतरले गर्द जागळीचे झाले
झुलणा-या फांदीपाशी पैजण वाजले
गोरे भुरे पाय असे गाण्यात सांडले झुलणा-या
झाडासाठी राघू पुन्हा आले[2] (वही पृ.१४)

या निसर्ग चित्रणातून 'झुलणारे झाड' ही प्रियशीसाठी आलेली प्रतिमा जशी महत्वाची आहे तसेच पुरुषांसाठी आलेली राघू ही प्रतिमा देखील महत्त्वपूर्ण आहे. फांदीवरून राघू उठून गेल्यानंतर या चित्रात बदलणारे रंग दिसतात. राघू उतून जाताना पाऊस नसला तरी आकाश जांभळ्या रंगामुळे व्यापून गेले आहे. राघू उठून गेला असला तरी फांदी हलते-झूलते आहे.

तिथे वाजणा-या पैजणाच्या आवाजामुळे 'राष्ट्र' परत आलेले आहे. हे सर्व चित्र अतिशय मनोवेधक आहे. तर हेच राघू. साळुंकीला डोळे मोडून जातात,

रानातले उनाड राधू, घिरट्या घालीत आले

फांदीवरल्या साळुंकीला डोळे मोडून गेले[3] (वही पृ.२५).

हे राघूचे खोडकर वागणे ही प्रेमाच्या खेळकर रूपातून आले आहे. आपल्या मनातील प्रेम भावनेला साकार करण्यासाठी धडपडणा-या या राघूना आकाशात भरून येणा-या मेघांमुळे चांगलीच संधी प्राप्त होते.

"घन ओथंबून येती

बनात राघू घिरधिरती' [4] (वही पृ.४९)

बनात घिरट्या घालणारे हे राघू पडणा-या पावसाच्या सरीत आपली प्रेम कहाणी पुढे नेतात. ही प्रतिमा जणू अभिलाषेची प्रतिमा बनून या कवितेत आलेली आहे.

निसर्गातील एक उत्कट अशी चित्रप्रतिमा येथे येते. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यात कवी चिव निजून गेला आहे. यामुळेच यातून साकार होणा-या प्रतिमाही उत्कट होतात. रात्रभराच्या झडीमुळे पिकात भरलेला गंध केसर गंध होतो

"नुक्ते आले न्हाण

रानवा-याला उधाण

मला गेले वेटाळून [6](वही १८)

'कसे लपेटून घ्यावे, नवे मेघावी आभाळ (वही ५.३०) आणि हा साजन माय छेनछबिला आहे, तो घन होऊन बिलगला (वही पृ.४९) पौषात हिवाळीरात गळयामधी हात,गच्च गुंफावे (वही-५१) असे तिला होते आपल्या सुकुमार देहाच्या वर्गातून ती आपल्याला म्हणते, देह कोवळी डहाळी, नव्या नवतीची केळी, जरा तंग झाली पोळी (वही पृ.५४) अशा रूपवान स्त्रीच्या सहवासात राहण्याचा तिला जवळ घेण्याचा प्रयत्न काळोख करतो ,तिला काळोखात कवळून घ्यायला काळोख झिंगत येतो. (..रानातल्या कविता,८.) एक राजबंशी पंखाचे पाखरू येते आणि तिच्या अंगाशी लगट करून जाते. (रानातल्या कविता ११) ढगातल्या सावल्यांना उन गच्च बिलगून असते (रा.क..६१), राजस देहाला आभाळ पांघरून येते (रानातल्या कविता,४६) महानोर शृंगारभावना व्यक्त करतात. या प्रतिमांमुळे त्यांच्या प्रेमकवितेला वेगळे रूप प्राप्त झाले आहे. निसर्ग आणि व्यक्ती यांचा शारीरिक पातळीवरील संदर्भ यामागे आहे. कवीने ग्रामीण जीवन, निसर्ग तेथील शृंगार याप्रमाणेच ग्रामीण समाजातील स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुखद वास्तव आणि स्त्रीची आगतिकता घेऊन स्त्रीविश्वाला तिची कहाणी मधून साकारलेले दिसते. पुरूष प्रधान संस्कृतीत स्त्रीच्या जगण्याला आलेले वेदनादायी जीवन, तिचे काबाडकष्ट, तिच्या जीवाची होणारी आबाळ, घरादारासाठी राबणारी, शब्दहीं न काढता सोसत राहणे, तर कधी परिस्थितीशी दोन हात करण्याची क्षमता असलेली स्त्री अशा स्त्रीच्या जगण्याला वागण्याला कवी उत्कटपणे साकारतो. कवीने या ग्रामीण स्त्रीच्या शोकाच्या अभिव्यक्तीची प्रतिमाचित्रे येथे उभे केले. या कविता प्रामुख्याने स्त्रीजीवनाचे सुबोध दर्शन घडवितात. स्त्री म्हणून तिच्या जगण्याला उभे करण्याचा प्रयत्न कवी करतो. स्त्रिच्या भोवती असणारी विविध नाती येथे तिच्या जगण्याला कशी प्रभावित करीत असतात हे ही इथे आढळते तसेच घरात, शेतात राबणा-या स्त्रिच्या कष्टाला कवी शब्दबध्द करतो. "महानोर या स्त्रियांच्या चित्रणाकरवी पुन्हा एकदा त्या लोकजीवनाशी आपले धागे जुळवून घेतात. तारूण्य व वार्धक्य या दोन्ही अवस्था रानातल्या प्रतिमांच्याद्वारेच रेखाटल्या जातात. महानोरांच्या या कवितांमधून त्यांचे गंभीर निरीक्षण लक्षात येते. कवी स्त्री, निसर्ग याची केवळ शृंगारासाठी सांगड घालत नाही. यातील प्रतिमांमधूनही स्त्रीचे वास्तव जीवन तिचे कष्ट घरासाठी त्याग अशा विविध भाव भावना यात आढळतात. म्हणूनच तिची कहाणी भारतीय स्त्री जीवनाचे प्रत्ययकारी भावचित्र बनले आहे असे वाटते.

निसर्ग प्रतिमा :

ना.धों. महानोर यांच्या 'तिची कहाणी' या कवितासंग्रहातून भारतीय स्त्री जीवनाची विविध रूपे साकार करतात. हे करताना निसर्ग प्रतिमांचा ते आधार घेतात. त्यात प्रामुख्याने आभाळ, मेघ या प्रतिमांचे अधिक्य जाणवते. आभाळाला असलेले व्यापकत्व स्त्रीमनाचा, तिच्या दुःखाचा, तिच्या सहनशिलतेचा निर्देश करणारे आहे म्हणून कवी म्हणतो,

"जात्याच्या पाळूत घिरघिरं दाण्याचं
पीठ होताना
प्रत्येक समेला ओवी गातांना
तीच मन भरून येतं ....आभालासारख[८]

स्त्री अहोरात्र काबाडकष्ट करते. घरासाठी कष्टत राहणे, स्वतःच्या सुखापेक्षा इतरांचा विचार करणे आणि म्हणूनच ती घरासाठी प्रकाश मागते. तिच्या दुःखाला वाट करू देण्याचे साधन म्हणून ती जात्यावर ओवी गाते. पण मनात दाटलेला उमाळा याचा तसा येतो. पण कधी कधी तिच्यावर आलेली संकटे इतकी मोठी असतात की, त्यातून बाहेर पडणे तिला शक्य होत नाही. अशा वेळी तिच्या मनास अनंत वेदना होतात. यांच्या जीवनात पतीचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. पण आलेल्या स्त्रिच्या मनाची होणारी होरपळ व्यक्त करताना कवी म्हणतो,

काळयाकुट्ट मेघांनी
भरलेल आभाळया डोळयात
भरल्या ओटीन लदबदलेल्या तिच्या नव्या संसारात"[९]

ग्रामीण भागात स्त्रियांच्या अंगावर घराबरोबरच शेतीचीही जबाबदारी येते. घरकाम करून शेतीवर कामास जाणा-या स्त्रिया पीकपाण्याचीही काळजी वाहतात. पेरणी, मळणी, उफनणी, अशा शेतीकामात त्या स्वतः झिजवात आपल्या पतीला मदत करतात. शेतीत पिकांचीवाढ व्हावी, उत्पन्न चांगले यावे ही भावना स्त्रियांनाही आहे म्हणूनच तिला,

"कित्येक वर्षांनी भरभक्कम आलेला मृगांचा पाऊस
मोती पवळयांचा चिडी मुंग्यानाही चैतन्य देणारा
मातीचा दरवळ शिवारमर उघळणारा मदमस्त पाऊस.... आभाळभर उपळणारा "[१०]

पेरणीपूर्वी मृगाचा झालेला पाऊस ग्रामीण स्त्री मनाला आनंद देणारा वाटतो. जणू या पावसामुळे सृजनाची क्रिया सुरू होते. पिकात ईश्वर जन्म घेतो आहे असा भाव तिला वाटतो. 'पाऊस' हा नवनिर्मिती करणारा आहे. त्याचे आणि मातीचे असलेले नाते अतुट आहे.

कृषीविषयक प्रतिमा

"तिची कहानी मधून स्त्रियाच्या सुखापेक्षा तिच्या आयुष्याचा भोगवटा आलेला आहे. स्त्रियांचं सोशिकपण, कोलमडून पडणे, दुःख पचवणे नव-याच्या मनमानेल अशा वागण्याला विरोध न करणे तर कधी मुकेपणाने गोवरीगत जळत राहणे, अशी स्त्रियांची जगण्याची कहाणी येथे येते म्हणून कवीला

"तिच्या डोळयात
ऊसाच्या पेटविल्या रानाध्या वेणा-[११]

दिसतात. आयुष्यभर तक्रार न करताच जगणारी ही स्त्री आहे. तिचे बाईपण तिला दुःख देते. इतकेच नव्हे निसर्गही तिच्या सहनशिलतेची कसोटी पाहणारा आहे.

'रानातले धस्कट" तिच्या शरीराला वेदना देतात,

"वैशाखवणव्यात भेगाळलेली भूई,
धस्कटांच्या रानात शिवारात थोडाही ओलावा नाही,

तिच्या डोळ्यात विस्तीर्ण अवकाश आणि
अंगावर येणारे धस्कटांचे बाहुपाश[१२] (पृ.३५)

डोळे खुडून नेणार साळीचं शेत, निरभ्र आकाश तिला वैशाख वणव्यात जाळतं दुष्काळात भेगाळलेल्या भुईप्रमाणे तिचे जगणे, अशा विविध कृषी घटकातून स्त्रीचे जीवन व्यक्त होते

संदर्भ :

१ पाटील प्रा. प्रसन्नकुमार अक्षरगंध सन्मित्र प्रका.कोल्हापूर ७०
२ महानोर ना. धों. वही, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९८५ १४
३ महानोर ना. धों. उ.नि. २५
४ महानोर ना. धों. उ .नि. ४९
५ महानोर ना. धों. उ.नि १५
६ महानोर ना. धों. वही पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १८
७ महानोर ना. धों. "तिथी कहाणी प्रस्तावना २४
८ महानोर ना. धों. तिचीकहाणी' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पहिली आवृत्ती २००० १
९ महानोर ना. धों. उ.नि २८
१० महानोर ना. धों. उ.नि ५०
११ महानोर ना. धों. उ.नि ४
१२ महानोर ना. धों. उ.नि ' ३५

संत तुकारामांच्या अभंगातील स्त्री प्रतिमा

डॉ. संभाजी शिवाजीराव जाधव

मराठी विभाग, कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी, ता. उमरी जि. नांदेड

वारकरी संप्रदायातील संतांनी अभंग लेखन करताना वेगवेगळया प्रतिमा, प्रतिकांचा वापर करुन समाजातील अनिष्ठरुढी परंपरांचा विरोध केला आहे. महानुभाव संप्रदाया नंतर सुधारणावादी भूमिका घेणारा वारकरी संप्रदाय आहे. या संप्रदायाच्या सुरुवाती काळात संत नामदेव उदयाला आले तेव्हा पासून ते संत तुकारामा पर्यंत ही सुधारणावादी भुमिका कायम असल्याचे दिसून येते. या सुधारणावादी भूमिकेमुळेच वारकरी संतांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन निकोप असल्याचे दिसून येते. त्यांच्या एकुण अभंग वाङ्मयाकडे पाहिल्यास ही भूमिका भक्कम पणे ते पुढे नेत असल्याचे जाणवते. वारकरी संतांनी स्त्री हा मोक्षमार्गातील अडथळा कधी मानला नाही. पती-पत्नी दोघांनीही मोक्ष प्राप्त करुन घ्यावा, असे ते म्हणतात. पारंपरिक जीवन पध्दतीतील समाज व कुटुंबात स्त्रीला प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्याचे काम संतांनी केले. त्यांच्या अशा प्रेरणेने अनेक स्त्रिया संत म्हणून उदयाला आल्या. त्यामागे वारकरी संतांची निकोप भूमिका कारणीभूत असल्याचे दिसून येते. स्त्री विषयी दृष्टिकोन उदार असल्यामुळे वारकरी संतांनी अपप्रवृत्तींचा धिक्कार करताना दिसतात. संतांनी आपल्या अभंगातून स्त्रीच्या विविध रुपांचे चित्रण केले असून, तत्कालीन स्त्रीजीवनाची कल्पना त्यावरुन सहज येते. कैकेयी, गवळणी, यशोदा या पौराणिक स्त्री पात्रांचा उपयोग करुन अभंगातून मध्ययुगीन स्त्रियांच्या विविध स्वभावाचे प्रातिनिधीक चित्रण संत नामदेवा पासून ते संत तुकारामा पर्यंत सर्वच संतांनी केले आहे.

वारकरी संप्रदायात विविध स्थरातील संत उदयाला आले आहेत. त्यामुळे विविध वर्गातील स्त्रीयांच्या दु:खामध्ये कांही प्रमाणात साम्य तर कांही बाबतीत वेगळेपण असल्याचे दिसून येते. पण स्त्री म्हणून दु:ख मात्र कायम आहे. त्यामुळे विविध जाती-जमातीमधील स्त्री संत अभंगाच्या माध्यमातून ज्या भावभावना प्रगट करतात त्यातून त्यांच्या दु:खाच्या विविध कंगो-याची जाणीव होते. संत जनाबाई, संत सोयराबाई संत कान्होपात्रा या संत स्त्रीयांचे दु:ख त्याची तिव्रता वेगळी आहे. पण स्त्री म्हणून वाट्याला आलेले दु:ख त्याची तीव्रता सारखीच आहे. संत जनाबाईच्या अभंगातून बंड तर संत सोयराबाईच्या अभंगातून करुणा दिसते पण संत कान्होपात्रा यांच्या अभंगातून स्त्री सुलभ मनाची कोमलता व्यक्त होते. तत्कालीन समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा स्वार्थी रुढीपरंपरावादी व स्त्रियांना कमी लेखनारा होता हे या स्त्री संतांच्या अभंगातून जाणवते.

संत तुकारामांच्या समोर वारकरी संप्रदायातील संतांचे अभंग आहेत. त्यांनी घेलेली सुधारणावादी भूमिका आहे. या सर्वांचा प्रभाव त्यांच्या मनावर निश्चितच झाला असेल. त्यामुळे संत तुकारामांच्या अभंगातील स्त्री प्रतिमा अधिक प्रखरपणे दिसून येते. "तुकारामांची कविता ही सतराव्या शतकाच्या संवेदनशीलतेचा एक महत्त्वाचा आविष्कार आहे. परिणामी त्यांच्या कवितेत या काळातील सांस्कृतिक ताणतणाव तसेच या काळातील कौटुंबिक, सामाजिक आणि धार्मिक पेच प्रभाविपणे चित्रित झलेले दिसतात. सतरावे शतक हे मध्ययुगाचा शेवट आणि आधुनिक युगाचा प्रारंभ या संधी काळाच्या सीमारेषेवर उभे असलेले अस्वस्थ शतक आहे. म्हणून तुकारामांच्या कवितेत या संधीकाळाची अस्वस्थता आणि तडफड प्रभावीपणे व्यक्त झाली आहे."[1] संत तुकारामांचा उदय झालेले शतक हे आधुनिक युगाच्या पाऊलखुणा असलेले शतक आहे. तर दुस-या बाजुला सुधारणावादाची परंपरा असलेला वारकरी पंथ आहे. याचा प्रभाव संत तुकारमांच्या अभंग लेखनावर निश्चितच आहे. त्यामुळे त्यांच्या अभंगातील स्त्री विषयक दृष्टिकोन हा सत्यनिष्ठेतून आला आहे.

स्त्रियांना सर्व प्रकारचे अधिकार समानता दिली पाहिजे, असे विचार आपल्या अभंगातून व्यक्त केले आहेत. स्त्री ही विविध नात्याच्या रुपातून कुटुंबाला समर्थपणे पुर्णत्व देत असते त्यामुळे त्या नात्याच्या प्रतिमा संत तुकाराम वापरताना दिसतात. "भीमातीर हे आपले घर, पांडुरंग हा पिता, रखुमाई ही माता, पुंडलिक हा भाऊ आणि चंद्रभागा आमुची बहिणी असे अभिमानाने सांगतात. एका नदीला बहीण म्हणणे हे सर्व नात्यांना पार करुन जाणारे अलौकिक नाते आहे."[2] नदी ही जीवन देणारी, नवनिर्मितीला आवश्यक असणारी आणि नदी अनेक जीवांचे भरण पोषण करणारी आहे. येथे नदीला बहीणीच्या नात्यात पाहणे ही स्त्रीकडे पाहण्याचा उदार आणि संवेदनशील दृष्टिकोन आहे. तर आई विषयीही अभंगातून अत्यंत आदर व्यक्त केला असून, स्त्रीमधील वात्सल्यभाव व्यक्त करताना संत तुकाराम म्हणतात, "मातचिये चित्ती / अवघी बाळकाची व्याप्ति // 1 // देह विसरे आपुला / जवळी घेतां सीण गेला // 2 //"[3] आईचे सर्व चित्त बाळाच्या प्रेमाने व्यापलेले असते. ती स्वत:ला विसरुन बाळाला जवळ घेते, बाळ जवळ येताच तिचा सर्व शिणभाग संपतो ही स्त्रीची प्रतिमा आदर्श असून स्त्रीमुळे मनुष्याची जडणघडण होते. कष्ट करुन ती मुलाला घडवीत असते. त्यामुळे तो आदर्श व्यक्ती घडतो जो समाजाला भविष्यात दिशा देतो.

आदर्श समाजाच्या जडण घडणीच्या मुळात स्त्रीयांची भूमिका महत्त्वपुर्ण आहे हा विचार व्यक्त करणारा अभंग संत तुकारामाच्या गाथेत दिसून येतो. स्त्रीयांविषयी आदर बाळगावा हा संदेश संत तुकाराम आपल्या अभंगातून देतात.

मध्ययुगात मुलींची विक्री होत होती. त्याप्रथेस त्यांनी विरोध केला आहे. मुलींची विक्री योग्य नसून, जो कुणी असे करेल, त्यास भयंकर यातना भोगाव्या लागतील असे तुकाराम म्हणतात, ".....कन्येचा जो नर करिती विकरा / ते जाती अघोरा नरकपाता // 2 //"[4] हा स्त्रीयाप्रती चा निकोप दृष्टिकोन आहे. वेश्या व्यवसाया सारख्या वाईट बाबीचा ते धिक्कार करतात. प्रसंगी त्याच्यावर प्रहारही करताना म्हणतात, ".....वेश्या दासी मुरळी जगाची वोवळी / ते तुज सोवळी वाटे कैशी // 2 //[5] अशी प्रथा जगात वाईट असून, त्यांचा कधीही संपर्क येऊ नये, असे ते म्हणतात. अशा अभंगातून तुकारामांचा स्त्री विषयक दृष्टिकोनाबरोबरच तत्कलीन समाजातील स्त्री प्रतिमा दिसून येते. मुलींना विकण्यासारखे अघोरी प्रकार, शिवाय वेश्या, मुरळी, देवदासी यांसारख्या अनिष्ट पध्दतीही चालत होत्या. या प्रथांना संत तुकारामांचा विरोध होता. त्याबरोबरच स्त्रीविषयी आदर, समतेचा भाव आहे हे त्यांच्या अभंगातून दिसून येत.

अभंगातून स्त्रीभावनेचा रुपकात्मक वापर करुन आध्यात्मिक भावना व्यक्त करताना ते म्हणतात, "कामे नेले चित्त नेदी अवलनोकूं मुख / बहु वाटे दु:ख फुटों पाहे –हदय // 1 // कां गां सासुरवसी मज केले भगवंता / आपुलिया सत्ता स्वाधीनता ते नाहीं प्रभातेसी वाटे तुमच्या भावें दर्शना / येथे न चले चोरी उरली राहे वासना // 3 //[6] संत तुकारामांनी आध्यात्मिक विचार व्यक्त करण्यासाठी वापरलेले रुपकही महत्त्वपूर्ण आहे. यातील भावना सासूरवाशीण स्त्रीची आहे. ती म्हणते, माझी काहीही सत्ता चालत नाही. माहेर तर विठ्ठलाचे घर असून तेथे येण्याची तीव्र इच्छा आहे, पण येता येत नाही. पतीच्या घरी असूनही ती निश्चित नाही. तिला परकेपणा वाटतो. दुस-याच्या स्वाधीन असल्याची तिची भावना आहे. यारुन हे निश्चित होते की, सासुरवाशीण स्त्रीला तिच्या घरी अत्यंत दुय्यम दर्जाचे स्थान होते व ती मूकपणे हे सर्व सहन करीत जीवन कंठीत होती. त्याशिवाय तिच्याकडे दुसरा मार्ग नाही. ती दुर्बल आहे. तरीपण ती मुक्त होण्याची धडपड करते आहे आणि तिने मुक्त व्हावे हा दृष्टिकोन संत तुकारामांचा आहे. अभंगातून रुपकांचा वापर करुन त्यांनी स्त्रीव्यथा धीटपणे मांडली आहे. तत्कालीन सामाजिक संकेत झुगारुन आपल्या भावना ते व्यक्त करतात. आपल्या अभंगातून वेगवेगळ्या स्त्रियांच्या भावभावना प्रातिनिधीक स्वरुपात व्यक्त केल्या आहे. "आज सुध्दा स्त्री-शूद्रांच्या वेदनेला आणि विद्रोहाला, मुक्तीच्या धडपडीला आणि अभिव्यक्तीच्या ईर्ष्येला मराठी वाङ्मयात आपली परंपरा शोधावीशी वाटली तर ती वारकरी भक्तीकाव्यातच सापडेल. या भक्तीकाव्याच्या मुळाशीही स्त्रियांची ओव्या रचून गाण्याची उत्स्फूर्त् मौखिक परंपरा आहे."[7] त्या बरोबरच स्त्रीयांना समता, न्यायासाठी वाकरी संतांनी लढा उभारला. त्याच्या वेदनेला आपल्या अभंगातून वाचा फोडली.

संत तुकाराम ज्या काळात उदयाला आले तो काळ संस्कृत व पंडित यांचा काळ होता या वर्गाचा स्त्री मुक्तीकडे फारसा कल नव्हता. अशा काळात स्त्री मुक्ती, मानव मुक्ती सारखा नवा विचार नव जाणीवा कर्मठ समाजासमोर मांडणे ही बाब कठीण होती. ती वारकरी संत आणि संत तुकारामांनी मोठ्या धैर्याने मांडली पण त्याची मोठी किंमत त्यांना मोजावी लागली. आजही सर्वसामान्य लोक, स्त्रीया संत तुकारामांचे अभंग नैतिक आधार म्हणून वापरतात. यातुन त्यांचा सामाजिक उध्दाराचा दृष्टिकोन दिसून येतो.

निष्कर्ष

1. संत तुकारामांनी स्त्री मुक्तीची भूमिका घेतली होती हे त्यांच्या अभंग लेखनावरुन दिसून येते.
2. सर्वसामान्य लोक, स्त्रीया संत तुकारामांचे अभंग नैतिक आधार म्हणून वापरतात.
3. अभंगातून स्त्रीभावनेचा रुपकात्मक वापर करुन आध्यात्मिक भावना व्यक्त केली आहे.
4. स्त्रियांना सर्व प्रकारचे अधिकार समानता दिली पाहिजे, असे विचार आपल्या अभंगातून संत तुकारामांनी व्यक्त केली आहे.
5. संत तुकारामांच्या अभंगातील स्त्री विषयक दृष्टिकोन हा सत्यनिष्ठेतून आला आहे.

संदर्भ सूची

1. डॉ. देशपांडे केजकर प्रकाश, संत कविता एक दृष्टिकोन, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती सप्टेंबर 2006, पृष्ठ क्र.- 239.
2. उपरोक्त, पृष्ठ क्र.-253.
3. बेणारे गोपाळ गोविंद (संपा.), सार्थ तुकाराम गाथा, शारदा साहित्य, पुणे, पृष्ठ क्र.-435.
4. उपरोक्त, पृष्ठ क्र.-483.
5. उपरोक्त, पृष्ठ क्र.-483.
6. उपरोक्त, पृष्ठ क्र.-472.

मराठी कथा कादंब–यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

डॉ. मंजूषा वि. भटकर
यशवंत महाविालय, नांदेड

प्रस्तावना–

वैदिक काळापासून भारतातील बहुजन समाजाला, अस्पृश्यांना आणि स्त्रियांना ज्ञानार्जनापासून वंचित ठेवण्यासाठी व जन्मापासुन वंचित ठेवण्यासाठी मनुस्मृती सारखे ग्रंथ निर्माण होत गेले. जन्मापासून मृत्यू पर्यंतच्या सर्व अवस्थांमध्ये स्त्रियांना पुरुषांपेक्षा हीन लेखले जाते हे ऐतिहासिक व सांस्कृतिक सत्य आहे. वैदिक संस्कृती जी पुढे हिंदू संस्कृतीमध्ये रुपांतरित झाली. ती पुरुषप्रधान संस्कृती म्हणून ओळखली जाते. त्यामूळे हिंदूसंस्कृती मध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान होते व आजही आहे. इतिहास व पुराणातून स्त्रिया या पुरषांपेक्षा वेगवेगळ्या काढलेल्या दिसतात. स्त्री ही एक न उकलणारे गुढ आहे. अशा प्रकारचे वलय तिच्या भोवती तयार केले जाते. कारण ती एकाच वेळी सबला व अबला, कामुक व विरक्त, शरणागत व अंकुशधारिणी अशी दाखविली जाते. स्त्रीच्या चित्रणात धरित्रीच्या रुपाने शक्तीची स्वरुप प्रति निसर्गाच्या रूपाने सर्जनशिल प्रतिभादेवीच्या रूपाने शक्तिची प्रतिभा येते.

प्रतिमा निर्मिती ही एक अत्यंत सूक्ष्म आणि जटिल प्रक्रिया असते. ऐंद्रिय संवेदना, काल्पनिक भावविश्व, वास्तवाभास, कळतनकळत मनांवर होणारे संस्कार आणि हजारो लहान मोठे पूर्वानुभव यातुन प्रतिमा साकार होत असतात सामाजिक आणि वैयक्तिक भावविश्वात त्या प्रतिमेची पाळेमुळे खोलवर रुजलेली असतात. त्यामूळे स्त्री प्रतिमेचे स्वरुप जाणून घेताना भारतीय इतिहासकानील स्त्रीचे स्थान आणि बदलत्या स्थिती गतीचे आकलन करुन घेणे आवश्यक ठरते

उदिष्टे

1 मराठी कथेतून अभिव्यक्तीतून झालेली स्त्री प्रतिमेचा अभ्यास करणे

2 मराठी कांदब–यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमेचा अभ्यास करणे

सन 1975 ते 2005 ही तीस वर्षे मराठीतील स्त्रियांच्या लेखनाच्या दृष्टीने महत्वाची ठरतात. पाश्चात्य स्त्रीवादी विचार धारेचा हा प्रभावकाळ आहे. सन 1975 नंतरच्या लेखिकांच्या कथा कादंबरी लेखनातील स्त्री चित्रणाचा शोध घेताना पार्श्वभूमी म्हणून सादर मांडणी महत्वाची ठरते. सन 1975 ते 2005 या कालखंडातील कथा आणि कादंबरी या दोन्ही वाडमय प्रकारात सातत्य पूर्ण आणि गुणवत्तात्मक भर घालणा–या निवडक अशा चार लेखिकांच्या लेखनाचा आणि विशेषतः त्यातील स्त्री चित्रणाच्या स्वरूपाचा विचार केलेला आहे.

गौरी देशपांडे लिखित कथा आणि कांदब–या यांच्या केंद्रस्थानी असणा–या सा–या स्त्रिया पारंपरिक मूल्य नाकारून निर्भय आणि स्वयंपूर्ण जीवन जगू पाहतान. गौरी देशपांडे यांच्या प्रकाशित साहित्य संपदेत आहे हे असं आहे. 1986 हा एकमेव कथा संग्रह आहे. या कथा संग्रहातील कावळ्या चिमण्याची गोष्ट या कथे मध्ये पतीनिष्ठेचे भाव आणत संसार करणा–या स्त्रीया आणि निटनिटका संसारकरीन उकीरडे फुंकणारे पती यांचा उपहास लेखिकेने केला आहे. गौरी देशपांडे यांचा सन 1975 ते 2005 पर्यंत एकुण बारा कादंब–या प्रसिध्द झाल्या आहेत. त्यांनी कारावासातून पत्रे 1980 मध्ये लटपटीन एकेक पानगळावया , तेरू ओ, काही दूर पर्यंत, निरगाडी, चंद्रिकेग, सारिकेग, दुरकर हा घाट, यांग, मुक्काम, गोफ, उत्खनन (2022) इ. कांदबरीतून स्त्री व्यक्तीरेखा साकारली आहे. पारंपारिक विचारातून साकार झालेल्या स्त्री जीवनाला झूगारून पाश्चात्य, आधुनिक विचार करणारी स्त्री या कादंबरीतून साकारलेली दिसते. स्त्रीचा स्वतःच्या अस्तित्वाचा शोध हे गौरी देशपांडे यांच्या कथा कादंबरी लेखना मागील एक प्रमुख सूत्र आहे.

आशा बगे यांच्या माटवा बेईमान, घटटं, जन्म, नावं, मैत्रीण, अपूर्ण, पउकान, घरचा रस्ता इत्यादी कथा मधून अविवाहीत स्त्रिया झालेल्या आहेत. अशा स्त्रिया पैकी ब–याच शास्त्रियांचे लग्नाचे वय होवून ही लग्न झालेली नाही यावर लेखिकेने आपल्या लेखनातून प्रकाश टाकला.

तसेच मारयानानी , बेईमान , माधवी , घरटं मदुला , रमेला जन्म , मिसेस , दिक्षिती, नाना, निना, वीणा, रंग, मानसी पारंबा कालंदी आदी कथा कांदबरी लेखनातून पत्नी या स्वरूपात स्त्रीचित्रण आले आहे. या स्त्रिया या स्त्रीया ब–याच प्रमाणात पत्नी म्हणून वाटयास आलेल्या पारंपारिक संसारिक जबाबदा–या पारपाडणा–या आहेत, तर काही नोकरी व अन्य कामकरणा–या आहेत. आईची प्रतिमा आशा बगे यांच्या कथा कांदबरीतून लेखनातून अनेकदा चित्रित झालेली आहे. आशाबगे यांची आपल्या कथेतून सौदंर्य, मुलगी दाखविण्याची प्रथा, हुंडा, वयातील अंतर आंतरजातीय

विवाह प्रेम अशा बाबीमुळे विवाहात होणा–या समस्यांचे चित्रण करून आपल्या कथा कांदब–या तीला स्त्रियांना अधिक परिणामकार पणे साकार केले आहे. आशा बगे यांच्या कथांमधून विवाहीत, कामकरणा–या स्त्रीचे चित्रण आले आहे.

तसेच सानिया यांच्या कथा आणि कांदबरी लेखनातील वातावरण उच्च मध्यमवर्गीय किंवा मध्यमवर्गीय आहे. यांच्या कथामधून येणा–या बहुतांश स्त्रिया विलक्षण मनस्वी आहेत. त्या उत्कट मनोव्रत्तीच्या आणि आत्मकेंद्रित आहेत. या स्त्रियांचा पुष्कळ शास्वतःशीच एक संवाद चालू असतो. कोष या कथेत पौगंडाअवस्थेतून तारूण्यात पदार्पण करणा–या स्त्रीचे चित्रण आहे. आई आणि मुलगा या दोन स्त्रियांचे चित्रण सानिया यांच्या कथा आणि कांदबरी लेखनात सातत्याने आले आहे. बहुतेक कथामध्ये मुली आईकडे व्यक्ती म्हणुन पाहतात. आईच्या जीवन पध्दतीशी फारसे जुळत आहे. दोघींच्या विकासाच्या वादा ही आरंभा पासुन भिन्न राहतात.

सानिया यांच्या कथा आणि कांदबरी यामधील स्त्रिया ब–यादा पुरूषांत गुंततात. पुरूषाच्या स्पर्शाची उत्सुकता त्यांच्या मनात काही काळ टिकते. तारूण्यातील अटळ वस्तुस्थिती म्हणुन अशा गाफील क्षणांना त्यांनी स्वीकारलेले असते. सानिया यांनी साकारकेलेल्या स्त्रिच्या स्वतःचा शोध घेणा–या, स्वातंत्र्याची आस असणा–या अशाच आहेत. स्त्री ही विचार करणारीच असावी असे लेखिकेला मना पासून वाटते.

मेघना पेठे यांच्या बहुतेक कथांचे आणि त्यांच्या एकमेव कादंबरीचे केंद्र स्त्री हेच आहे. स्त्रीच्या स्त्री म्हणुन असलेल्या नैसर्गिक प्रेरणांचा इच्छांचा सहज अविष्कार आणि स्त्रीच्या शारीरिक, मानसिक अनुभवांचे धीट, व मोकळे चित्रण त्यांच्या लेखनातून आलेले आहे.

आधुनिक शहरी जीवनातील स्त्रीच्या जगण्याचे अनेक पैलू मेघना पेठे आपल्या कथेतून व्यक्त करतात. एक स्त्री म्हणून आधुनिक काळात समाजात वावरतांना रूढ स्त्रीत्वाची कल्पना नाकारणारी मी आणि इतर यांच्या दृष्टी मधील विरोधामुळे सतत निर्माण होणारे गुंते अनुत्तरीत राहणारे व कधीच विचारले जाणारे अनेक प्रश्न या सारखे अनेक विविध नवे अनुभव मेघना पेठे यांनी आपल्या तटस्थ निवेदन शैलीत साकारकेले होते. स्त्री पुरुष संबंध हे शरीर धर्म म्हणून विचारात घेतले जावेत शरीराची गरज असेलतर विवाहबाह्य संबंध हा व्यभिचार ठरत नाही असे धाडसी मत मेघना पेठे यांच्या कथा आणि कांदबरीतील ही स्त्रीय निर्भयपणे मांडून लेखिकेच्या कथा कादंबरी लेखनातून येणाऱ्या स्त्रीया सामान्य स्त्रियां प्रमाणे चूल आणि मूल या कक्षेत बंदिस्त नाहीत मेघना पेढे यांनी लैंगिकतेचा सहज स्वीकार करुन त्यापलीकडे जाणारी स्त्री निर्माण केली. आये कुछ अब्रे या कथेत विवाह संस्था आणि लग्न जमविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या रुर्कशी करुन त्या एक आदर्श सहजीवनाचे स्पष्ट सूचन केले जाते. कोल्हयाच लगीन (कथा), नातिचरामि (कादंबरी) हंस अकेला आणि आंधळ्याच्या गायी (2000) असे कथा संग्रह व कांदबरी प्रकाषित झाले आहे.

सन 1975 ते2005 याकालखंडातील चार महत्वाच्या लेखिकांच्या कथा, कादंबरी लेखनातील स्त्री प्रतिमांचे स्वरुप स्पष्टपणे दिसून येते.

निष्कर्ष :

1. सन 1975 नंतरच्या चार प्रतिनिधिक लेखिकांच्या कथा व कांदबरी लेखनातून स्त्री प्रतिमा साकारलेली दिसते.

2. हया लेखिकांच्या कथा कादंबरी लेखनातील स्त्री यांची भूमिका दुःख स्विकाराची आहे. दुःखा समोर शरणागती पत्कारण्याची नाही.

3. स्त्रीचे मानसिक स्वांतत्र्य साकार करणारी, मुक्त जगणारी अशी स्त्री गौरी देशपांडे यांच्या लेखनात आढळले.

4. सानिया यांच्या कथा कादंबऱ्यातून आलेली स्त्री भौतिक जीवनातील पेचा पेक्षा विविध नात्यातील निर्माण झालेल्या पेचांमधील तिव्रतेचा विचार करते.

5. मेघनापेठे यांनी साकारलेल्या स्त्री प्रतिमा लैगिंक जाणिवांचा सर्वकष

संदर्भ ग्रंथ

1 आशुतोष पाटील. शोध स्त्री प्रतिमांचा प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
2 अद्वंत म ना मराठीतील काही कथाकार अनमोल प्रकाशन पुणे 1970
3. अंजली कुलकर्णी स्त्री सत्याचा शोध आकांक्षा प्रकाशन नागपूर 2020

"मराठी लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेली -स्त्री प्रतिमा"

प्रा. डॉ. सुषमा शंकरराव प्रधान- घेवंदे

मराठी विभाग, एमएसएस कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अंबड जिल्हा जालना

प्रस्तावना –

प्रत्येक देशाच्या प्रदेशाच्या लोक जीवनातून आलेले लोकसाहित्य हा अभ्यासाचा विषय ठरू शकतो. लोकजीवनावर लोकसाहित्य अवलंबून असते. खरी लोकशाही त्याची निर्मिती ही लोक जीवनातूनच झालेली असते. हा दर वर्षाची परंपरा असणारे लोक साहित्य आजही चिरंतन आहे लोक साहित्य तून येणारा लोकजीवनाचा अभ्यास हा आगळावेगळा नसून तो आचार-विचार रुढी-परंपरा कला श्रद्धा भक्ती इत्यादीने व्यापलेला असतो. लोकसंस्कृतीचा आरसा म्हणजे लोकसाहित्य होय लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती या दोन्ही शब्दातून येणारा 'लोक 'हा शब्द एक समान अर्थाने येताना दिसतो. मात्र साहित्य आणि संस्कृती या दोन्ही शब्दातील अर्थ जरी भिन्न असले तरी संस्कृतीतून साहित्य निर्माण होताना दिसते म्हणून लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती हे दोन शब्द परस्परांशी निगडित आहेत.

मराठी लोकसाहित्य शब्दाची व्यापकता आपल्या लक्षात येते. लोकशाही त्याची व्याप्ती लक्षात घेता लोकसंस्कृती ला जसा मोठा आवाका प्राप्त झाला आहे अगदी तसेच लोकसाहित्याचे दालन आहे हे स्पष्ट होते- "Folklore या शब्दासाठी लोकविद्या, लोकवार्ता, लोकज्ञान, लोकपरंपरा, लोकप्रतिभा, लोकप्रवाह, लोकायन, लोकविज्ञान व लोकसंस्कृती असे काही शब्द उपयोगात आणण्याचे प्रयत्न झाले. पण श्रीमती दुर्गा भागवत यांनी सुचवलेला लोकसाहित्य हा शब्द Folklore या अर्थाने मात्र मराठीत अधिकच रुढ झाला"१ वेद पूर्व काळातील आदिम अपूर्व लोक हे खऱ्या अर्थाने लोकसाहित्याचे खरे वारसदार आहेत आपल्या समाजाने घालून दिलेल्या रूढी परंपरा चालीरीती त्यानुसार आपले वर्तन ठेवणारे शहरी भागापासून दूर असणारे ग्रामीण भागात राहणारे असे ग्रामीण लोकसुद्धा लोकसाहित्याचे मनापासून जतन करताना दिसतात.

'लोक' या शब्दातून केवळ एकच व्यक्ती असा अर्थ बोध होत नाही तर अनेक लोक हा अर्थ व्यक्त होतो. म्हणून लोक साहित्याची लक्षणे पाहता 'लोक' म्हणजे अनेक व्यक्तींचा समूह, समूहाची मान्यता लोक बंधन, असा अर्थबोध होतो म्हणून" लोक साहित्याला वृक्षांची उपमा दिली तर असे म्हणता येईल की, या वृक्षाची मुळे भूतकाळात जमिनीखाली घट्ट रुजलेली असतात तर त्याचे खोड, पाने, फुले, फांद्या, फळे, वर्तमानात डवरलेली असतात. वर्तमानातील लोक जीवनाचे नाते भूतकालीन जीवनाशी जोडलेली असते आणि हे नाते लोक साहित्यातून प्रकट होत असते"२ लोकसाहित्य व लोकजीवन यांचे अतूट नाते आहे. श्रद्धा- रूढी, प्रथा, चाली-रीती आचार-विचार या सर्वांना समूहातील लोकांची मान्यता असते आणि ती स्वीकारून तो लोकसमूह कार्य करत असतो.

लोकसाहित्याचा एक प्रकार म्हणजे लोकगीत ही लोकगीतं पुरुषांची स्त्रियांचीही असतात. त्यातून त्यांचे जीवन प्रतिबिंबित होत असते लोक जीवनाचा आरसा असणारे लोकगीत विशेष उल्लेखनीय असे आहे. त्यातही विशेष करून स्त्री गीते महत्त्वपूर्ण आहे कारण लोकगीतात स्त्री गीतांची संख्या मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळते. या लोकगीतातून स्त्रियांच्या मनाचा अथांग सागर पहावयास मिळतो अगदी सहजतेने त्या सर्व सुख दुःख आपल्या गीतातून लयबद्ध पद्धतीने व्यक्त करताना दिसतात.

"माझ्या ग माहेराचा: चार चौकी वाडा:
झोपाळ्याचा दांडा: वाजतो कडाकडा:
चिरेबंदी नवा वाडा: शोभतो देखना घोडा:
पायी त्याच्या चांदीचा तोडा: बसाया भाऊराया:

चिरेबंदी वाडा: मोर कोरले दारावरती:

झळके शेला बंधुचा जरतारी:"३

सासरी नांदत असताना श्री चा हवमन माहेरी कसओढ घेतं याच सुंदर चित्रण ती वरील गीतातून करते मन सारखं रुंजी घालतो ते माहेर किती गोड आहे. याचेही वर्णन ती आपल्या गीतातून करते आपल्या माहेरचा चिरेबंदी वाडा तुळस, गाय-वासरू, झोपाळा, आई- वडील, भाऊ -भावजय इत्यादी सर्व तिला आठवते आणि ती गीतातून व्यक्त होते.

लोकसाहित्यातून आलेली लोकगीत हे लोक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. आणि या लोकगीतातून तीन मैत्रिणी जवळ आपले मन मोकळे करते. आपले श्रम हलके करते अथांग पाण्याचा तळ सुद्धा न होऊ देता त्या पाण्याची खोली जशी असते अगदी तसंच स्त्री मन असते तिच्या गाण्यातून विविध स्त्री प्रतिमा लक्षात येतात. सासुरवाशिणी च्या मनाला माहेरची ओढ लागते आपल्याला नेण्यासाठी भाऊराया येईल म्हणून ती वाट पाहते भाऊराया आल्यावर तिला जेवायला काय करू आणि काय नाही असे होते "जीरे साळी गहू खिरीला किती घेऊन: जेवणार राजस माझा भाऊ: सोनसळे गहू रवा येतो दाणेदार: करिते साखर फेण्या वर साजूक तुपाची धार: उजेड पडिला ताटा परीस वाटीचा: राजस बंधू माझा आला पाठीचा: साखरेचा लाडू तूप पुरणाच्या पोळी ला: पंथाच्या पंगतीला चांद माझा बैसला:"४ भाऊरायाला ती आग्रह करून करून वाढते तिचा आनंद ओसंडून वाहतो भावासोबत माहेरी जाण्याची तयारी ती करते इतके भावपूर्ण गीते ती सहज उत्स्फूर्त करताना दिसते.

लोक परंपरेतून स्त्रीची प्रतिमा विविध पद्धतीने येताना दिसते स्त्रियांचे आयुष्य चूल आणि मूल याचं गुरफटलेले दिसते ती चाकोरीबद्ध जीवन जगत असते आणि बंधने असताना सुद्धा ती स्वतःला भाग्यवान समजते प्रत्येक रूढी परंपरेचे पालन करते एक श्री ही अनेक नात्यांच्या बंधात बांधली जाते उदाहरणार्थ ती कुणाची तरी आई, पत्नी, सून, काकू, जाऊ, बहीण, ननंद, भावजय, मुलगी, सवत, सासु, मावशी, आत्या, आजी आणि मैत्रीणही असते. तिच्या विविध प्रतिमा व्यक्त होताना ती अतिशय आनंदाने प्रत्येक नात्याला सामोरे जाताना दिसते मौखिक वाङ्मयाची तील स्त्री गीता ती स्वतःला हरवून रम मान होते.

"स्त्री जन्मभूमी म्हणजे माहेर आणि कर्मभूमी म्हणजे सासर माहेर स्त्रीचे बालपण अत्यंत आनंदात आणि मायेत जात असल्याने माहेरी मायेची नाती असल्याने एक आनंदाचे ठिकाण विसाव्याचे ठिकाण म्हणून स्त्री जीवनात माहेराला मोलाचे स्थान असते सासुरवाशीण स्त्रीला माहेर म्हणजे लवनातील हिरवीगार हरळी, शेवंतीचा ताटवा, मोगऱ्याचा मळा, थंडगार पानमळा, केळीचे हिरवे बन, गाजराचा वाफा, केळीचा लोंगर, दव ण्याची पेंडी, मधाची पोळे, डवरलेला आंबा वाटते तर माहेरी असलेली जिव्हाळ्याची नाती म्हणजे पुरणपोळी निरशा दुधाचा खवा दुधावरची साय ठस पिठाची करंजी सोनसळी गव्हाची सोजी बेसनाचा लाडू खडीसाखरेचा खडा शेवयाची दुरडी भाकरीचा काला उमरावती पिठीसाखर यासारखी गोड मधाळ रवाळ असतात"५ श्रिया आणि माहेर यातील भाव संबंध वर दिलेल्या प्रतिमांतून अतिशय सार्थ होतो. ज्याप्रमाणे ती माहेरची गुणगान करते तसेच सासर जसे असेल त्याप्रमाणे ती सासरचे ही गुणगान किंवा दोषही आपल्या लोकगीतातून सासू नणंद स्त्री प्रतिमा अतिशय हुबेहूब रेखाटते कारण स्त्री जीवनात या दोन्ही ठिकाणाला खूप महत्त्व प्राप्त झालेले असते.

आपले जीवन जगत असताना आलेले अनेक अनुभव तिच्या वाट्याला आलेले सुख दुःख ती आपल्या गीतातून व्यक्त करते चूल आणि मूल सोबत अस तिच्या आयुष्यात येणारी प्रत्येक व्यक्ती मग ती स्त्री असो वा पुरुष त्याचे वर्णन ती आपल्या गीतातून व्यक्त करत असते लोकसाहित्यात स्त्रियांच्या गितांचा भरणा अधिक दिसून येतो." लोक जीवनाचे नाना पैलू ओवी गीतांतून अनुभूती येतात आचार-विचार सुख-दुःख भावना आविष्कार पारंपारिकता संकेत रूढी-परंपरा वहिवाटी धार्मिकता व सर्जनशीलता हे ते होत ओवीचा अर्थ ओवणे किंवा गुंफणे असा आहे मी संबंधितांना डॉ.नांदापूरकर म्हणतात," चालुक्य वंशीय राजा सोमेश्वर याने शके१०५१ मध्ये मानसोल्लास हा ग्रंथ लिहिला. त्यात त्याने महाराष्ट्रीय श्रेया कांडताना ओव्या गातात

असा नामोल्लेख केलेला आहे यावरून ओव्यांचा गीत प्रकार हा अतिप्राचीन आहे हे स्पष्ट होते महाराष्ट्रात जात्यावरील ओव्या विपुल प्रमाणात आढळतात. मराठी लोकसाहित्य प्रमाणे दलितांच्या ही लोकसाहित्यात सुद्धा स्त्री पुरुष मुलं यांची अनेक गीते आढळतात तसेच त्यांचेही सण-उत्सव संबंधीचे गीते संख्येने विपुल प्रमाणात आहे.

जीवनवादी आणि परंपरावादी विचार मांडत श्रीमंत एक एक पदर आपल्या लोकगीतातून उलगडत जाते .कधी कधी तर ती त्यातून हलकाफुलका विनोद साधत मनोरंजनही करते वास्तव दाहक चित्रण एखाद्या सासुरवाशिणी च्या रूपातून गीतात व्यक्त होते लोकगीतातून फेरा वरची म्हणजे सण उत्सव यात्रा विधी इत्यादी प्रसंगी म्हटली जाणारी सर्व गीते अंतर्भूत असतात .ही लोकगीते निसर्गाच्या सानिध्यात तयार होतात प्रादेशिकतेचे महत्त्व लोकगीतातून येताना दिसते या लोकगीतांना तालबद्धता व गेयता असते. अहेव मरण कोण्या भाग्याच्या सईला डोईचा मंदिल कंथ वाळवितो नईला हात जोडी चे उगवत्या बाणा ला आयुष्य मागते माझ्या कंथाला"७ पतीला प्रत्येक स्त्री परमेश्वराचे स्थान तर देतेस ती पती विषयी अतिशय निष्ठावान आहे .ती आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी सतत देवाची प्रार्थना करते लोकगीतातील विविध रंगांनी नटलेले अनुभवविश्व आहे लोकगीतातील स्त्री विविध भाव दर्शवते.

पुराण कथेतील श्री ही पारंपारिक पद्धतीने जीवन जगताना दिसते तिच्या वाट्याला अनेक दुःख येताना दिसते. त्याला ही पुरुषप्रधान संस्कृती च जबाबदार आहे सीता मंदोदरी अहल्या द्रौपदी यासारख्या क्रिया पतिव्रता सत्वशील स्त्रीची प्रतिमा निर्माण करतात तर कौसल्या सुमित्रा कैकयी देवकी यशोदा मातेची प्रतिमा साकारतात "समाजव्यवस्थेने स्त्रीला घालून दिलेल्या पारंपारिक चौकटीतच जीवन जगणाऱ्या स्त्रियांची उदाहरणे अधिक थोडक्यात स्त्री गीतातील पौराणिक स्त्रीची प्रतिमा ही पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने लादलेल्या चार विषयक पारंपारिक चौकटीत जीवन जगणाऱ्या स्वतःचे अस्तित्व आणि आचार विषयक पारंपारिक चौकटीत जीवन जगणाऱ्या स्वतःचे अस्तित्व आणि व्यक्तित्व नसलेल्या स्त्रीची प्रतिमा आहे."८ एकूणच श्री देवता व पौराणिक स्त्रीची प्रतिमा सारख्या असल्या तरी त्यातून स्त्रीचे मन स्त्रियांच्या भावना ह्या मात्र भिन्न भिन्न आहे पारंपारिक समाजव्यवस्थेने निर्माण केलेली स्त्री प्रतिमा ही कृषिप्रधान संस्कृतीतील एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

स्त्री गीतांचा बराचसा भाग जात्यावरच्या ओवी गीतावरील आहे. या ओवी गीतांतून तिसरी सासर-माहेर चे वर्णन करताना दिसते तसेच माहेरवाशिन आणि सासुरवाशीन अशा दोन प्रतिमा तिच्या गीतातून उभ्या राहतात माहेरवाशिणी ची प्रतिमा आनंददायी तर सासुरवाशिणी ची प्रतिमाही दुःखदायी ठरते अनेक श्री गीतात स्त्रियांचे दुःख यातना कष्ट येताना दिसते. या परंपराप्रिय स्त्रीला आपल्या दुय्यम स्थानाची जाणीव आहे म्हणून ती म्हणते "दुबळ्या पणाया ची लाज वाटते मला, नारी जल्माच्या काय करावं नशिबाला."९

स्त्री जन्मा म्हणून ती या मानसिक दुबळेपणा ती अधिकच गुरफटून जाते स्त्री गीतातून व्यक्त झालेल्या भावना अधिक प्रांजळपणे आलेल्या दिसतात स्त्री गीतातून आलेल्या स्त्री प्रतिमा ह्या समाजव्यवस्थेने दुबळ्या करून टाकले आहेत कौटुंबिक नात्यातील भावसंबंधातून अनेक प्रतिमा मानताना विविध भाव-छटा ही लोकगीतातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करत त्यातही त्यात समरस होऊन यशस्वी ठरतात.

मराठी लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा स्त्री जीवनाशी संबंधित आहे स्त्री जीवनातली विविध घटना प्रसंग सण-उत्सव तिचे चाकोरीबद्ध आयुष्य सुखदुःखाचे अनुभव तिचे मन तिच्या भावना या सर्व दृष्टिकोनातून केलेली लोकगीतातील ही स्त्री अथांग पाण्यासारखी आहे लोकसाहित्यात असणाऱ्या स्त्री गीताची संख्याही विपुल प्रमाणात आहे.

मौखिकता कालातीतता, प्रादेशिकता, परिवर्तनशीलता, सामूहिकता इत्यादी सर्व गुणविशेष स्त्री गीतातून स्पष्टपणे जाणवतात. श्री प्रतिमांची रुपे देवता रुपी श्री पौराणिक श्री स्त्री धार्मिक स्त्री कौटुंबिक स्त्री कृषिप्रधान संस्कृतीतील स्त्री पारंपारिक चौकटीतील स्त्री अशा विविध पातळीवर बदलत जातात आदिवासी लोकगीत आतूनही स्त्रीयांच्या भावभावना लोक गीतातून व्यक्त होतात

"घे झोका, घे झोका, पोरी घे झोका तुझ्या बापाचा आंधी चा झोका तुझा मायेचा मधला झोका तुझ्या राजा चा आखरी झोका सरगाचा एक पोरी पातारा चा एक सर नाही नाही कोणाला मायेचा एक घे झोका घे झोका पोरी घे झोका "१०

या गीतातून आनंद व्यक्त होताना दिसतो बाप जन्म देतो. म्हणून पहिला झोका आईचा मधला झोका नवऱ्या शिवाय संसार चालत नाही म्हणून तो शेवटचा झोका सुखदुःखाचा झोका हा अतिशय भावनिक आहे आदिवासी लोकगीते ही संपन्न व समृद्ध अशी आहे लोकगीतातून एखाद्या कथेच्या माध्यमातून त्या आपल्या सुख दुःखाची मांडणी करतात जीवन जगण्याची जिद्द जीवन जगत असताना आलेली अनेक काबाडकष्ट ऊन सावली सारखी येणारी सुखदुःख आदिवासी स्त्रियांनासुद्धा लोकसाहित्यातील लोकगीतातून विशेषतः स्त्री गीतातून अतिशय समर्पकपणे मांडताना दिसतात.

समारोप -

थोडक्यात मराठी श्री गीतात चित्रीत झालेल्या सर्वश्री प्रतिमा ह्या पारंपारिक बंधनात असणाऱ्या आहेत त्या स्वच्छंदि नाही तर त्या बंधनात असल्यामुळे दुबळ्या जाणताना दिसतात स्त्रियांचे चित्रण एक माहेर आतील आणि एक सासर मधील असे लोकसाहित्यातून आलेले दिसते. अनेक नाते या सासर-माहेर दोन ठिकाणातून तिला मिळते म्हणून तिच्या नात्यालाही एक परंपरा मिळते. त्यातून श्री प्रतिमांची वेगवेगळी स्वरूप लक्षात येते माहेर पणाची ओढ भाव-भावना माहेरकडील नातेगोते हे सर्व मनाला हवेहवेसे वाटतात तर सा सरपणाची भीती, धाक तेथील सर्व थोर व्यक्ती यांचे दडपण घेऊन मनाला नकोसे वाटतात. म्हणजे माहेरी आनंददायक तर सासर हे त्रासदायक असे प्रत्येक स्त्रीला वाटते ते त्यांच्या मुखी कवितातून अभिव्यक्त होते. अशा प्रकारे लोकगीत आतूनही स्त्री गीते विपुल प्रमाणात जाणवतात व ही स्त्री गीते प्रचंड अनुभवविश्व घेऊन वेगवेगळ्या नात्यातून येणाऱ्या पारंपारिक स्त्री प्रतिमा हुबेहूब रेखाटताना वाचकांच्या, श्रोत्यांच्या मनाचा अचूक वेध घेत असतात.

निष्कर्ष-

१) लोकसाहित्यातून येणाऱ्या लोकगीतांना हजारो वर्षाची परंपरा आहे.
२) लोकसाहित्यातून येणाऱ्या लोकगीतात ही स्त्री गीतांची संख्या विपुल प्रमाणात आहे.
३) लोकगीतातून येणाऱ्या स्त्री गीतात अर्थपूर्ण अशा विविध स्त्रीप्रतिमा मनाला स्पर्शून जाणाऱ्या आहेत.
४) स्त्री गीतातील स्त्री प्रतिमा हा सहज उत्स्फूर्त तसेच अतिशय भावार्थ पूर्ण आहेत.
५) लोकगीताचे स्वरूप मौखिक असून ते बोलीभाषेतूनच येताना दिसते.
६) शब्द संगीत नृत्य व अभिनय या सर्व घटकांनी युक्त असणारे लोकगीत लोकसाहित्याचा एक अविभाज्य घटक आहे.
७) लोक समूहाने निर्मिलेले हे लोकगीत प्रत्येक वाचकाच्या मनाचा ही वेध घेते.
८) लोकगीत म्हणजे आधी कालीन स्वयंस्फूर्त संगीत होईल व ते विविध भावछटा व्यक्त करत जाते.
९) विविध प्रसंगातून, प्रेरणातून लोकगीतांची निर्मिती होते.
१०) एकंदरीत लोकगीतात ही स्त्री गीतातून व्यक्त होणारे स्त्री जीवनानुभव आचे दालन अतिशय समृद्ध आहे व त्यातील स्त्री प्रतिमा ही खूप व्यापक आहे.

संदर्भ –

१) व्यवहारे विद्या: लोकसाहित्य: लोकसंस्कृती ,प्रतिमा प्रकाशन जळगाव ,पृष्ठ क्रमांक ९
२) तत्रैव : पृष्ठ क्रमांक १५
३) व्यवहारे शरद : लोकसाहित्य रंग आणि रेखा ,विश्वभारती प्रकाशन नागपूर ,क्रमांक ११९
४) तत्रैव : पृष्ठ क्रमांक १२
५) व्यवहारे विद्या:लोकसाहित्य लोकसंस्कृती ,प्रतिमा प्रकाशन जळगाव ,पृष्ठ क्रमांक ९
६) गिमेकर परशुराम :मराठवाड्यातील दलितांचे लोकसाहित्य ,कैलास प्रकाशन ,पृष्ठ क्रमांक ५
७) कुबल रमेश :लोकसाहित्याचे अंतरंग ,शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर ,पृष्ठ क्रमांक ६९
८) व्यवहारे विद्या :लोकसाहित्य लोकसंस्कृती ,प्रतिमा प्रकाशन जळगाव ,पृष्ठ क्रमांक ८
९) बाबर सरोजिनी :'जा माझ्या माहेरा' पृष्ठ क्रमांक २९३
१०) बाबर सरोजिनी :लोकसाहित्यातील लोकसंस्कृती संमेलन ,महाराष्ट्र लोकसाहित्य समिती ,पुणे ,पृष्ठ क्रमांक १९६व पृष्ठ क्रमांक १७२

मराठी कवयित्री अनुराधा पाटील यांच्या कवितांमधून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

डॉ. सुलभा मुळे
शासकीय अध्यापक महाविद्यालय, भंडारा
सुनिता गोविंदराव चात्रे
संशोधक विद्यार्थी पीएच.डी., शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड(महाराष्ट्र)

सारांश :-

जीवनातल्या विविध टप्याच्या वाटचालीत बालिका, किशोरी, युवती, पत्नी, आई या सह स्त्रियांना सोसाव्या लागण्या़ऱ्या भावनिक कुचंबना, हालआपेष्टा, मान हानी, सतत जाणवणारी असुरक्षितेची भावना या स्त्री जीवनातील विविध समस्या व पैलूवर कवयित्री अनुराधा पाटील यांची कविता भाष्य करते. ती विविध पैलू उलगडून दाखवते. त्यांच्या कविता या पारंपारिक चाकोरी मोडणा़ऱ्या आहेत. अत्यंत साध्या व सोप्या अशा सरळ शब्दात स्त्री जीवनाचे यथार्थ दर्शन घडवणा़ऱ्या आहेत. दिगंत, तरीही, दिवसेंदिवस, वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ आणि कदाचित अजूनही हे त्यांचे एकापेक्षा सरस कविता संग्रह प्रसिध्द आहेत. स्त्रियांचे सामाजिक स्थान, भावनिक ताण - तणाव आणि तिच्यावर लादलेल्या जबाबदा़ऱ्या मुळे तिला जगणे नकोसे वाटते. तरीही दुर्दम्य आशावादाच्या बळावर 'स्त्री' संसाराचा गाडा नेटाने पुढे रेटते. ती आई म्हणून मुलांना मोठे करते. आपल्या आवडी निवडी छंदानां बाजूला ठेवत, कुंटुंबातल्या नातेवाईकानां आनंदी ठेवते. हे स्त्री जीवनातल्या हळव्या संवदेशील भावनाचे यथोचित प्रकटीकरण त्यांच्या कवितेत आले आहे.

प्रस्तावना :-

जेष्ठ कवयित्री अनुराधा पाटील यांचा जन्म पाच एप्रिल १९५४ रोजी जळगाव जिल्हातल्या पहुर या गावी झाला प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीत असतानां त्यांनी त्यांची पहिली कविता लिहीली. त्यांच्या कविता ह्या स्वातंत्र्योत्तर काळातील आहेत. तो काळ भारतीय स्वातंत्र्यानंतरचा काळ होता महात्मा जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, विनोबा भावे, साने गुरूजी यांच्या प्रभावाने थेट भारवलेला कालखंड होता. स्त्रीया हळूहळू अभिव्यक्त व्हायला लागल्या होत्या. त्यांचे भावविश्व फुलत होते. सोंम्य प्रमाणात स्त्रियं ाच्या चळवळी सूप्त अवस्थेत सुरू होत्या. स्त्रियांच्या चळवळीत शिकणा़ऱ्या महिलाच्या वाचनात कथा, कादंबऱ्या, कविता, नाटके याचे संदर्भ येऊ घातले होते. पण हे प्रमाण म्हणावे तेवढे नव्हते. ज्या शिकत होत्या, लिहित होत्या, त्या शं ाता शेळके, इंदिरा संत, विभावरी शिरूरकर, स्नेहलता दसुनुरकर, सरोजनी बाबर, सिसिलिया कार्वोलेव्ह, मलीका अमर शेख यांचा तो काळ होता आहे. ग्रामीण भागातील कष्टकरी स्त्रियांचे अनुभव, त्यांचे दुःख, त्यांची होणारी भावनिक कोडी ही अनुराधा पाटील यांनी स्वत: अनुभवली होती. गेली चाळीस वर्षे त्या अखंडपणे कवितेच्या प्रं ातात आपला अढळ, अमीट ठसा उमटवून आहेत. त्यांच्या कवितामधून स्त्रियांच्या भावविश्वाचे वास्तव चित्रण आलेले आहेत. 'कदाचित अजूनही' या काव्यसंग्रहाला साहित्य क्षेत्रातील मानाचा असा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे.

आईची अनेक रूपे / प्रतिमा मराठी कवितेने अनुभवली आहेत. अनुराधा पाटील यांची 'आई'ही कविता अंर्तमुख होण्यास भाग पाडते. 'आई सगळयांचीच मरणार असते एक दिवस' हे जीवनसत्य सांगताना आईच्या आयुष्याचा जो पट अनुराधा पाटील मांडतात तो समस्त स्त्री जीवनाला थोडयाफार फरकाने लागू आहे.

तशी तर
सगळयांचीच मरत असते
एकदिवस आई
पण तिला माहीत नसतो जाताना
आपल्या मनात तसु तसूनं

होत गेलेला तिचा मृत्यू
जन्मापासून

(वाळूच्या **पात्रात मांडलेला खेळ पृ.17)**

आयुष्यभर राबून शरीर गलितगात्रं झालं तरी माणसाची जगण्याची इच्छा संपत नसते. मोह-माया अन आयुष्य भर मांडलेला पसारा मोडून टाकायला मन धजत नाही. पण जाणे तर अपरिहार्यअसते. ते अंतिम सत्य आहे. अनुराधा पाटील यांनी वरील स्त्री विषयक सांगीतलेलं सत्य विदारक आणि मन आतून पोखरणारे आहे.

अनाठायी आयुष्य गेल्याची
बोच त्यांना घेरत नाही
वाळू मधल्या झिऱ्यासारखा
पाझरतो जीवन रस
कितीदा मरुन पुन्हा उठते
कुणी एखादी पारु, कुणी एखादी राही

(...तरीही पृ.23)

वरिल ओळी युवाअवस्थेत उत्कटपणे आयुष्याचा प्रत्येक क्षण जगावा, जगण्यावर प्रेम करायला शिकावं अस वाटत असतं अनाठायी आयुष्य गेल्याची बोच त्यांना घेरत नाही. कारण कष्टकरी सर्वसामान्य स्त्रीच्या आयुष्यात सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत इतक्या समस्या की त्या सोडविता सोडविता त्यांचा दिवस व आयुष्य ही निघून जाते म्हणूनच त्यांना अनाठायी आयुष्य गेल्याची बोच घरेत नाही. वाळूमधल्या झऱ्यासारखा त्यांचा जीवनरस पाझरतो. कितीदा तरी मरुन उठते एखादी पारू, एखादी राही. ही साऱ्या स्त्री जातीच, अखिल जगताचे प्रतिनिधीत्व करते.

कणी कोंडा पाखडून
सत्य उचलण्याची जिवट सवय
आणि एक दीर्घ उसासा उद्यासाठी
दु:ख पुरुन ठेवतात मातीसाठी
आणि स्वत:लाच समाजावतात
तोब्याभर पाण्याचा विसावा
कुणीतरी असावं पाठीपोटी

(...तरीही पृ.23)

उपरोक्त कवितेच्या ओळींमधून कष्ट करणाऱ्या, शेतात राबणाऱ्या स्त्री चे वर्णन अनुराधा पाटील यांनी केले आहे. कणी, कोंडा पाखडून मातऱ्यातून मिळालेलं अन्न वाया न घालवता चिवटपणे ग्रामीण भागातील सुगरण स्त्री हे काम करीत असते. ती आपलं दु:ख उगाळत बसत नाही. त्या दु:खाच प्रदर्शनही करीत नाही तर ते दु:ख मातीखाली पुरुन ठेवते. एक दिर्घ श्वास/उसासा घेऊन पुन्हा उद्याच्या कष्टासाठी नव्यानं सज्ज राहते. हे सगळं कष्ट ती स्वत:ला समजावत करते की तांब्याभर पाण्याच्या विसाव्यासाठी आपल्या पाठीपोटी कुणीतरी उभं राहिल म्हणूनच करते.

माझ्यापेक्षा वेगळी नसते
मायांना पानं बांधुन वाट तुडवणारी
तिथली कोणतीही आई
जाळणारा तिला संसाराचा वणवा
तिचेही हात रिकामे अवकाश कवळून
सुन्या तिच्याही दिशा दाही

(...तरीही पृ.23)

वरील कवितेच्या ओळीतून 'माझ्यापेक्षा वेगळी नसते' यातून माझ्यासारखी बाईची आत्मपरता वैश्विक स्त्रीत्वाचा सवदेनशील अविष्कार होते. कोणत्याही स्त्रीेचे दु:ख हे सारखेच असते. जगातल्या कोणत्याही आईचे दु:ख, कष्ट हे सारखेच असतात. हे अनुराधा पाटील यांच्या कवितेमधून व्यक्त होते.

ललाटावर रंगवलेल्या अदृष्य
नशिबासारखी सतत जमलेली नाती

सगळे शकून नाकारुन वाळूवरही
पावलं रेखण्याची केवठी जिद्द होती

(दिगंत पृ.10)

उपरोक्त कवितेच्या ओळी या स्त्रीच्या जिद्दीची, आशावादाचे वर्णन करणाऱ्या आहेत. एखाद्या स्त्रीला आपल्याच कपाळावर लिहिलेले नशिब माहित नसते अगदी त्याचप्रमाणे तिच्या भोवताली वेगवेगळी अदृष्य नाती निर्माण होतात. आई, बहिण, मुलगी, पत्नी, सुन, सासू अशा कितीतरी भूमिका ती समर्थपणे पार पाडण्याचा प्रयत्न करत असते. त्यामूळेच कवयित्री अनुराधा पाटील म्हणतात, सगळे अपशकून नाकारुन वाळूवरही पावलं रोखून स्त्री ही जिद्दीने उभी राहते.

कधी तरी केंव्हा तरी माझ्यातली 'मी'
सांगते मला 'नको ठोठावूस ती
न उघडणारी बंद दारे
उघडलीत तरी स्वागत कुणी करणार नाही
वणवा कर जतन उरात
आयुष्याचे पुरवीत इंधन

(दिगंत पृ.50)

कधी तरी ती स्वत:च स्वत:ची संवाद साधते, समस्त पुरुष प्रधान व्यवस्थेनं आणि पुरुष जातीनं तिला बंधनात बंदिस्त केलय. वणवाच तीच्या वाटयाला आलेला. त्याचीच जपणूक करायला हवी. स्त्रीवरील पुरुषी बंधनाची ही व्यथा स्त्रीच्या अपरिहार्यतेची भावना अगतिकतेतून कवयित्री अनुराधा पाटील वरील शब्दांत मांडतात. स्त्रीच हे बंधिस्त जीवन यातून सुटका नाही. कुठं तरी मनात बंडखोरी आहे पण ती प्रत्यक्षात येत नाही. या बंडखोरीची चाहूल मात्र काही कवितेत सतत जाणवते.

म्हणून ठरवून टाकलंय
सर्वच दु:खांना फ्रेम करुन टाकावं, आणि
शोधावा आपणच आपल्यासाठी एक स्वतंत्र रस्ता

(दिगंत पृ.53)

मग तीला आपला गाव आठवतो. चार दोन उदास झाडांनी वेढलेला. आणि

माझ्या डोळयांसमोरुन सरकत जातात
चार दोन उदास झाडांनी वेढलेली गावं
आणि भरदुपार डोक्यावर घेत
पाणी वाहणाऱ्या बायांची रांग
सगळे ऋतू घेऊन येतात त्यांच्यासाठी
न संपणाऱ्या कष्टांची माळ
फुपाटा भरलेल्या चाकोऱ्यांतून
चालता चालता वाटते त्यांना
फिटेल अशा जगण्याचाही पांग

(...तरीही पृ. 22)

वरील ओळीतून ग्रामीण भागातील कष्ट करणाऱ्या स्त्रियांच वर्णन आलेल आहे. आजही खेडेगावात पाण्यासाठी भर दूपारी बायकांची रांग लागलेली असते. केवळ उन्हाळाच नाही तर सगळेच ऋतू त्यांच्यासाठी कष्ट घेऊन येतात. तरीही त्या जिद्दिन कष्ट करत असतात. मुकाटपणे कष्ट उपसत असतात.कारण त्यांना आशा वाटते की या ही जगण्याचा पांग फिटेल चांगले दिवस येतील. हा दूर्दम्य आशावाद बहुतांश वेळा प्रत्येक स्त्री मध्ये असतोच तो कवितेतून प्रकटला आहे.

रसरसून तेजाळते त्यांच्या
कोणत्याही दु:खांची ज्योत
असहय ठणका आयुष्याचा
कुठून आणतात तेल हळदीच्या वाटीचे बळ
चुलीतल्या लाकडानं चुलीस जळावं

म्हणताना घुसमटतात जीव
समृद्ध होतो पुन्हा पुन्हा
एखाद्या भरल्या विहिरीचा तळ

(...तरीही पृ.22)

स्त्रीयांच आयुष्य हे दु:खानं भरलेल आहे आणि त्या दु:खातूनच त्या तावून सुलाखून निघतात जसं एखाद्या जखमेला बरे करण्यासाठी हळद लावली जाते तसं त्या दु:खाला पेलण्याच बळ आणतात. चुलीतल्या लाकडाने चुलीतच जळावं हे रुपक समस्त स्त्री वर्गाला लागू होणारे आहे. मग ती स्त्री ग्रामीण भागातील असो कि शहरी भागातली, शिकलेली असो की अशिक्षीत, पुरुष प्रधान व्यवस्थेने स्त्रीयांप्रती घालून दिलेली बंधन या ओळातून व्यक्त होतात. परंतू स्त्री ही आशावादी आहे. तिचा जीव घुसमटून जातो. पण ती पुन्हा पुन्हा नव्या आशेने जगण्यासाठी उभी राहते. म्हणूनच कवयित्री अनुराधा पाटील म्हणतात, समृद्ध होतो पुन्हा पुन्हा एखाद्या भरल्या विहिरीचा तळ.

आईला शोधत सडकेन
रडत चाललेल्या एकटया मुलासारखं
मन भेदरुन जातं
अफाट विस्तार अंतराचा
काहीच कळेनासं होतं
कोण नेऊन सोडतं बोट धरुन
विश्वासाच्या त्याच जुन्या ठिकाणी *?*

(तरीही पृ.37)

जेंव्हा दु:खाना मन भरून येत त्यावेळीची स्त्री ची अवस्था ही आईला शोधत रडत रडत निघालेल्या एखाद्या एकटया, एकाकी मुलाच्या मनाच्या अवस्थेसारखी होती. आई म्हणजे त्या लहानग्या जीवाचा जीव की प्राण असते पण अंतर काही कटत नाही, आई दिसत नाही याच वर्णन 'अफाट विस्तार अंतराचा, काहीच कळेनासं होत' या ओळीतून व्यक्त होतं. पण अचानक कोणीतरी येते व आपलच बोट धरून आईजवळ पोचतं करत याच वर्णन कोण नेऊन सोडतं? बोट धरून विश्वासाच्या त्याच जुन्या ठिकाणी? असं केलेल आहे. यातच पूढे कवयित्री म्हणते.

जेंव्हा जाणवतं कुणाच्याही
दु:खाचा आतला चेहरा एकच असतो

(...तरीही पृ. 37)

याचाच अर्थ दु:ख हे वैश्विक असत, हे यातून सूचित होत. कवयित्री अनुराधा पाटील यांची कविता संस्कृतीच्या विरोधात विद्रोहाचा पवित्रा घेऊन उभी रहात नाही आणि नारी मुक्तीच्या नारेबाजीची शिकारही होत नाही दु:खांना सहन करण्याची ठाम भूमिका आहे. म्हणूनच

अज्ञाताच्या परक्या वाळूवर
पुन्हा नव्याने श्वास घ्यायला
मी शिकणार आहे

(...तरीही पृ.27)

असा चिवट आशावाद या ओळीतून अभिव्यक्त होतो.

पुरुषाच्या कल्पनेत असते
नेहमीच
एक काल्पनिक बाई
जी असते आपल्यापेक्षा
संपूर्ण वेगळी
नवे नवे देह असणारी
जिला करता येतो
वेगवेगळया चवीचा स्वयंपाक

न कंटाळता
सांभाळता येतं घर
त्याच्या बऱ्यावाइट लहरीसह
नेटकेपणानं
ठेवता येतात सगळे दिवस
गजऱ्या सारखे प्रसन्न

(कदाचित अजूनही पृ. 45)

प्रत्येक पुरुषाच्या कल्पनेतील बाई ही कशी असते याच यथार्थ चित्रण वरील 'पुरुषाच्या कल्पनेत असते एक बाई' या कवितेतून अनुराधा पाटील यांनी केल आहे. याच कवितेत पुढे

बाई,
कल्पनेतली असलीस तरी
तू ही शेवटी बाईच
तू ही तर काढतेस
घरभर पांगलेले कागद
गोळा करुन
पाय मोडक्या मोराची चित्रं
वावरतेस
जीव मुठी त धरुन
जगावं लागणारांच्या
या जगात मुकाटयानं

(कदाचित अजूनही पृ. 46)

पुरुषी व्यवस्थेनं खरच बाईला नेहमीच गृहित धरलेल असत. तीनं सतत कुटुंबासाठी झटावं असं त्याला वाटत असते. स्त्री तर हे सगळं करतेच. परंतु हे सगळं करुन ही ती स्वत:च वेगळं अस्तित्व स्वकष्टानं सिद्ध करुन दाखवते हे 'आपल्या कल्पनेपेक्षा अधिक खोल असतं आपण उथळ समजतो ते पाणी' या प्रतिमेतून व्यक्त होताना दिसत.

निष्कर्ष :-

अशाप्रकारे स्वप्न आणि वास्तव हे कवयित्री अनुराधा पाटील यांच्या कवितांचे दोन ध्रुव आहेत त्यांच्या कविता ह्या स्वत:चा आणि स्त्रीत्वाचा आदिम शोध घेणाऱ्या आहेत. स्त्रीविषयीचे अनुभवाला मुलगामी चिंतन त्यांच्या दिगंत,... तरीही, वाळुच्या पात्रत मांडलेला खेळ, कदाचित अजूनही या काव्यासंग्रहातून दिसून येते.स्त्री चे जगणे, तिच्या जाणीवा, भावना आणि संवेदनाविषयी अनुराधा पाटील अत्यंत संयमाने एक एक पदर आपल्यासमोर उलगडतात. त्यांच्या कवितामधून व्यक्त झालेलं स्त्रीजीवनाचं वास्तव वाचकाला अंतर्मुख होण्यास भाग पाडते. त्यांच्या कवितेत कोणताही अभिनिवेश नाही, आकांडतांडव नाही, बडेजाव नाही, बोचकारलेपणा नाही तर त्यात विचारप्रवण करणारा संयम आहे. त्यांच्या कवितेतून स्त्रीदु:खाची संवेदनशील अनुभूती सहज साध्या स्त्रीसुलभ शब्दात व्यक्त झालेली आहे. अनुराधा पाटील यानां जीवन जगतानां जे अनुभव आले, जो भोवताल त्यांच्या वाटयाला आला त्यावर त्यानी जे चिंतन केलं. त्या साधनेतून हे मौलिक काव्य समृद्ध झालं आहे असं मला वाचक म्हणनू वाटतं.

संदर्भ ग्रंथसूची :-

1) 'अनुराधा पाटील यांची कविता' दादा गोरे, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
2) 'दिगंत' व 'दिवसेंदिवस' अनुराधा पाटील, कुशा प्रकाशन, औरंगाबाद.
3) 'वाळूच्या पात्रात मांडलेले खेळ' अनुराधा पाटील, कुशा प्रकाशन, औरंगाबाद.
4) '...तरीही' अनुराधा पाटील, कुशा प्रकाशन, औरंगाबाद.
5) 'कदाचित अजूनही 'अनुराधा पाटील, शब्द प्रकाशन, मुंबई.

मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा

गीतांजली भगवान रहाटे

(गीतांजली शुद्धोधन नागदेवे)

विषय सहायक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, भंडारा.

मानवाच्या जीवनातील पहिली संस्कारशाळा म्हणजे स्त्री होय. स्त्रीवरच मानवी जीवनाची संपूर्ण ईमारत उभी राहावयाची असते. जगातील थोर विचारवंतांनी म्हणून स्त्रीची महती गायली आहे. ग्रंथच्या ग्रंथ रचले आहेत. एका कवीने म्हटले आहे, "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपी गरियशी." स्वर्गापेक्षाहीमहान मानवी जीवनाचा खरा अलंकार असणारी ही स्त्रीच होय. लोकमान्य टिळक म्हणतात, "स्त्री ही सुंदरता आणि कोमलता याचे प्रतिक आहे.""मानव्याचे ओझे घेऊन जगाला फुलविणे, हसविणे, टवटवीत करणे, ही एक आदर्श आईच करू शकते. विनोबा भावे म्हणतात, "आईचे हृदय हे जगातल्या सर्व तत्वज्ञानाचे माहेरघर आहे."माता आणि मातृभूमी स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहेत म्हणूनच त्या वंदनीय आहेत. म्हणूनच साने गुरूजींनी स्त्रीला "परमेश्वराची मूर्ती" म्हटले आहे. मानवी जीवनात सर्वप्रथम स्त्री येते ती आईच्या रूपात. अतिशय कोमल, प्रेमळ, बाळावर प्रेमाचा सतत वर्षाव करणारी, लेकराची सतत काळजी घेणारी, सुसंस्काराचे सिंचन करणारी, घरातील सगळयांसाठी कष्ट करणारी, खस्ता खाणारी, असे आईचे रूप असते. वास्तवास असणारे असे आईचे रूप साहित्यिक आपल्या साहित्यातून रेखाटतो, प्रदर्शित करतो. उदा. साने गुरुजी यांच्या "शामची आई" या पुस्तकातून श्यामच्या आईचे पात्र डोकावते तेवात्सल्यमूर्ती आईची भूमिकेत. "पायाला घाण लागू नये म्हणून जसा जपतोस तसाच मनाला लागू नये म्हणून जप" असे सांगणारी श्यामची आई बाळाला सुसंस्कारांचे सिंचन करणाऱ्या आईच्या भूमिकेत आहे. माहेर श्रीमंत असूनही माहेरी न जाता स्वाभिमानाने आपल्याच लेकरांना, पतीला घेऊन गरिबीत, आनंदानं संसार करणाऱ्या शामच्या आईच्या स्वाभीमानाला वंदन करावेसे वाटते.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रिया शिकत नव्हत्या, त्यांना समाजाने शिकण्यास मनाई केली होती. स्त्रियांवर अनेक अन्याय, अत्याचार होत असत. पण त्यावर ब्र सुद्धा काढायची सोय नव्हती. कालांतराने स्त्री जागी झाली आणि तिच्यावरील अन्याय अत्याचाराला तिने साहित्यातून वाचा फोडली स्त्रीवर होणारा अन्याय अत्याचार हे साहित्याला विषय पुरवितात. सामान्य स्त्रीचे जन्मास येणे, बालपण, त्यातील परिस्थिती, तारूण्यात पदार्पण होणे, तारूण्यातील सुख-दु:ख, तारूण्य सुलभ, कोमल, हळूवार भावनांचे उमलणे, फुलविणे, स्त्रीच्या मनात अंकुरणारी प्रीत, तिच्या तारूण्यातील समस्या, परिस्थिती, हे सर्व काही साहित्याचे विषय ठरतात. त्यातल्या त्यात 'आई' हा साहित्याचा अतिशय जिव्हाळयाच्या विषय आहे. कवीयशवंत यांची 'आई' ही कविता होय."स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी" ही 'आई' या कवितेतील हृदयस्पर्शी ओळ'आई'चे साहित्यातील व मानवी जीवनातील स्थान स्पष्टकरून जाते. काही दिवसांपूर्वी इयत्ता ८ वीच्या पाठयपुस्तकातील"माय" ही कवितासुद्धा अशीच माझ्या मनात घर करून गेली. गरिबीत सकाळपासून जंगलात भोळया आणायलाजाणाऱ्या व त्या विकून आपल्या लेकरांच्या पोटाची खळगी भरणाऱ्या आपल्या आईचे चित्रण 'माय' या कवितेत कवीने केले आहे. त्याच कवितेत कवी म्हणतात की, रोजच्याप्रमाणे माय जंगलात लाकडे तोडायला गेली असता तिला साप चावला व ती मरण पावली. इकडे कवी व त्यांची भावंडे आता माय काहीतरी खायला आणेल या आशेने मायची वाट पाहात बसलेले असतानाच मायच्या मृत्यूची खबर आली. आईविषयीच्या बहुरंगी, बहुआयामीभूमिकेचे पदर उलगडवून सांगणाऱ्या अनेक कथा, काव्यातून, कादंबऱ्यांमधून लघुकथासंग्रहातून वाचायला मिळत असतात. स्त्रीच्या भूमिकेशिवाय कोणतेहीललीत साहित्य रंगत नाही, बहरत नाही.

स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णन, रेखाटन हा सुद्धा साहित्याचा एक महत्त्वपूर्ण पैलू आहे. कथा, कादंबऱ्या, काव्य, आख्यान काव्य, शाहिरी वाङ्मय यात स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णन हे केंद्रस्थानी असते. स्त्रीसौंदर्याचे वर्णन हा लावणी या शाहिरी वाङ्मयाचा प्राण आहे. जवळपास सर्वच लावण्यांमध्ये केंद्रस्थानी स्त्री व तिचे लावण्य असतेच. गवळण या काव्यप्रांतसुद्धा स्त्रियांचाच आहे. यात गोपिका आणिकृष्ण यांच्यावरील कथानक वर्णिलेले असते. भक्तीरस हा गवळणीचा स्थायीभाव असतो.

उदा. कृष्णा अडवू नको तू आडवनी,
कृष्णा अडवू नको तू आडवनी;
अशी करते तुला मी आळवणी,
अशी करते तुला मी आळवणी,

ही आमच्या शाळेतील विद्यार्थिनींनी स्नेहसंमेलनात सादर केलेली गवळण अजुनही मनात घर करून आहे.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या विचारांची व कार्याने प्रकाशात असणाऱ्या स्त्रिया उदा. मलाला युसुफजाई, सायना नेहवाल, (बॅडमिंटन पटू), सानिया मिर्झा (टेनिस पटू), इंदिरा गांधी, आरती शहा, बच्चेंद्री पाल, अरूणिमा,सावित्रीबाई फुले यांचे जीवनकार्य हे इतरांना स्फूर्तीदायकअसते. त्यांचे संपूर्ण जीवनचरित्र लिहून प्रसिद्ध केले जाते. अशा स्त्रियांमुळे, यांच्या जीवन कार्याच्या रूपानेसुद्धा नवनवीन साहित्य (काव्य, कथा, कादंबऱ्या, शाहिरी वाड्.मय) जन्माला येऊन, साहित्यसृष्टी समृद्ध होते. उदा. सावित्रीबाई फुले यांचा "काव्य फुले" हा कविता संग्रह.

तत्कालीन परिस्थिती, समस्यासुद्धा साहित्यातून उमटतात. उदा. जरठ कुमारी विवाह ही काही काळापूर्वीची सामाजिक समस्या होय. या समस्येत वयाने अतिशय लहानमुलीचा विवाहवयोवृद्ध पुरुषासोबत होत असे. याच समस्येचे चित्रण 'शारदा' या नाटकात केलेले आहे व समाजमन जागृत केले आहे. देवदासींच्या समस्येचे चित्रण सुद्धा अनेक कथा कादंबऱ्यांमध्ये दिसून येते. "महाश्वेता" या डॉ. सुमती क्षेत्रमाडे या लेखिकेने तिच्या वैद्यकीय व्यवसायाला धरून"कोड" या रोगाविषयी समाजात जागृती निर्माण केली आहे. या कादंबरीतील स्त्रीला मांडीवर कोडाचे डाग झाल्यावर तिच्या पतीने तिला सोडले. त्यानंतरची तिच्या आयुष्याची कहाणी "महाश्वेता" या कादंबरीत आहे.

स्त्री ही अनेक नात्यांनी समाजातील व्यक्तींशी जोडलेली असते. आई, बहीण, आजी, काकू, मावशी, मामी, आत्या, सासू, जाऊ, नणंद, साळी, मेहुणी, पत्नी, प्रेयसी या आणि अशा अनेक नात्यांच्या भूमिका तिला पार पाडाव्या लागतात. कथा व कादंबऱ्यांमध्ये स्त्रीच्या प्रत्येक नात्याची भूमिका लेखक रेखाटत असलेले दिसतात.

स्त्रीचे हे सकारात्मक रूप जसे दिसून येते, तसेच तिचे नकारात्मक, चंडीकेचेही रूप साहित्यात दिसून येते. उदा. सूनेवर घरात अत्याचार करणारी, हुंडा मागण्यासाठी मुलाला प्रवृत्त करणारी स्वत:च्या व लेकरांच्या रक्षणासाठी आक्रमक होणारी, परिस्थितीला शरण जाऊन देहव्यापार करणारी, पैशासाठी, प्रेमासाठी चुकीच्या मार्गात लागलेली स्त्रीसुद्धा साहित्यात दिसून येते. तसेच स्वत: वाईट मार्गाचे अनुसरण करीत असतांना दुसऱ्या स्त्रियांना वाईट मार्गाला लावणारी तसेच वाईट मार्गातून बाहेर काढणारी अशापरस्परविरोधी भूमिकेतील स्त्री सुद्धा साहित्यात चितारलेली आहे.

आजची स्त्री अर्थार्जनासाठी घराबाहेर पडते. घराचा उंबरठा ओलांडून बाहेर गेल्यानंतर अनेक पुरूषांसोबत काम करीत असताना तिला अनेक समस्या हाताळाव्या लागतात, त्यावर मात करावी लागते. त्यामुळे दैनंदिन जीवनात घराबाहेर पडल्यावर तिला ज्या परिस्थितीला समस्यांना तोंड द्यावे लागते, त्या सर्व संभाव्य परिस्थितीचे वास्तव घटनांचे चित्रण साहित्यात आलेले आहे. "हुंडाबळी"च्या अनेक घटना साहित्यात चितारलेल्या दिसून येतात.

स्त्रीची समाजातील असुरक्षितता, तिला सांभाळण्याचा त्रास, त्याशिवाय जावई शोधण्याचा त्रास, तसेच ती परक्याचे धन आहे हा समज, हुंड्याचा त्रास, या सर्वांचा परिपाक म्हणजे स्त्रीभ्रूणहत्या होय. स्त्रीभ्रूणहत्येचे पडसाद आता साहित्यात उमटू लागले आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर स्त्रीभ्रूणहत्या म्हणजेच समाजाचा नैसर्गिक समतोल ढासळण्याची

प्रक्रिया होय. या 'स्त्री भ्रूण हत्या' या विषयाने सुद्धा कथा, कविता, कादंबऱ्या यांना खाद्य पुरविले आहे आणि स्त्रीभ्रूणहत्येविरूद्ध समाजमन जागृत करण्याचे कार्य मराठी साहित्याने केले आहे.

१९६० साली प्रसिद्ध झालेली उद्धव शेळके यांची 'धग' ही कादंबरी पुरस्कार प्राप्त आहे. १९६० सालचे कादंबरी विभागासाठी महाराष्ट्र शासनाचे दुसरे पारितोषिक या कादंबरीला मिळालेले आहे. 'धग' ही नायिकाप्रधान कादंबरी आहे. 'धग' म्हणजे कौतिकच्या संसारातील धडपड-परवडीची कथा आहे. धग या कादंबरीतील स्त्री पात्र हे संसारासाठी कष्ट उपसणारे त्या काळातील रूढी परंपरा मानणारे, लोकरितीनुसार पंचमी, पोळा, दिवाळी इ. सण उत्साहात साजरे करणारे असे पात्र आहे. कौतिक ही धर्मभेद न करणारी स्त्री आहे. कासम-सकीना या मुस्लीम परिवारासोबत तिच्या परिवाराचे चांगले संबंध असतात. ते परस्परांना अडचणीच्या वेळी मदत करतात. या कादंबरीतील स्त्री ही कष्टाळू, परिस्थितीला खंबीरपणे तोंड देणारी तसेच धर्मश्रद्धाळू व अंधश्रद्धाळू आहे. कौतिकची शादुलबुवावर श्रद्धा आहे त्याला ती नवस करते.

अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यामधून आढळलेली स्त्रीची प्रतिमा ही अतिशय खंबीर कोणत्याही संकटाला प्रतिकूल परिस्थितीला धीराने सामोरे जाणारी अशी आहे.

"वीज म्हणाली धरतीला" हे कुसुमाग्रजांचे नाटक सुधा नायिकाप्रधान आहे. झाशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या जीवनातील झाशी या तिच्या राज्यासाठी राणीने केलेल्या संघर्षाचे चित्रण या नाटकात केलेले आहे. वैधव्याचे दु:ख लपवून राजवाड्यात वावरणारी स्त्री, स्वतःच्या बाळाची काळजी घेणारी, त्याचे रक्षण करणारी स्त्री, आपल्या दासीवर प्रेम करणारी, राणी, स्वतः विधवा असल्यामुळे हळदी कुंकवाचा कार्यक्रम नकरू शकणारी व आपल्या राजवाड्यातील राज्यातील स्त्रियांना हौशीने हळदीकुंकवाचा कार्यक्रम करण्यास प्रोत्साहन देणारी राणी, मैदानावर असामान्य पराक्रम गाजवणारी राणी, आपल्या राज्याला, राज्याच्या स्वातंत्र्याला जीवापाड जपणारी, जनतेवर लेकराप्रमाणे माया करणारी स्त्री राणी कुसुमाग्रजांनी आपल्या नाटकात चितारलेली आहे

लोकगीतेहा असाच एक स्त्रीकेंद्रीत काव्यप्रांत आहे. उदा. भुलाबाईची गाणे

"कारल्याचे बीज लाव ग सूनबाई,
मग जा आपल्या माहेरा ....."

या भुलाबाईच्या गितातदोन स्त्रीया दोन वेगवेगळ्या भूमिकेत आहेत. सासूच्या व सुनेच्या. सुनेला माहेरी जाण्याची परवानगी देण्यास नकार देऊ शकत नाही म्हणून वेगवेगळे निमित्य, बहाणे सांगून ती परवानगी नाकारणारी सासू या भुलाबाईच्या गाण्यात आहे तर माहेरच्या ओढीने माहेरी जाण्यासाठी अधीर झालेली स्त्री म्हणजे सुन सुद्धा या भुलाबाईच्या गाण्यात आहे.

"घाल घाल पिंगा वारा, माझ्या परसात
माहेरी जा सुवासाची कर बरसात"

या ओळींमध्ये सुद्धा माहेरच्या आठवणीने अस्वस्थ झालेली कवितेतील नायिका वाऱ्याला आपल्या माहेरी जाऊन सुगंधाची बरसात करायला सांगत आहे. स्त्रीची माहेराविषयी असलेली प्रचंड ओढ, जिव्हाळा वरील कवितेतून व्यक्त होतो.

दर दोन मैलावर बदलणारी बोलीभाषा ही सुद्धा मराठी साहित्याचे वैशिष्टय ठरते. त्या त्या साहित्यप्रकारानुसार बोलीभाषा स्त्री पात्राच्या तोंडी आलेली दिसून येते. प्रादेशिकता, बोलीभाषा, सामाजिकता, वास्तवता, शोकात्मता, खलपुरूषांची/स्त्रीयांची उपस्थिती/अनुपस्थिती, प्रादेशिक साहित्यप्रकारात आलेले ग्रामीण, शहरी अथवा निमशहरी जनजीवन, विशिष्ट भौगोलिक परिसर, मागासलेपणा, समस्याग्रस्त जीवन, निसर्गाचे अस्तित्व, विशिष्ट लोकसंस्कृती विशिष्ट भूप्रदेश, स्थानिक बोलीभाषा, व्यवसाय, रूढीपरंपरा, सणवार, उत्सव, अंधश्रद्धा, संस्कार रीतीरिवाज यांचा समावेश विविध प्रांतातील प्रदेशातील लोकजीवन आणि संस्कृती यांचा प्रभाव मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमांवर पडत असलेला दिसून येतो.

अशाप्रकारे मराठी साहित्यातील स्त्रीची प्रतिमा ही बहुरंगी व बहुआयामी आहे. ती कधी खंबीर तर कधी लवचिक आहे. कधी परिस्थितीला शरण जाणारी तर कधी परिस्थितीवर मात करणारी आहे. कधी भीत्री तर कधी धाडसी, साहसी आहे. स्त्रीच्या अनेक नात्यांची अनेक रूपे वेगवेगळया छटा ठेऊन मराठी साहित्यात येतात व मराठी साहित्य समृद्ध, मनोरंजक व दिशादर्शक करतात.

संदर्भ ग्रंथ –

१. B Aadhar Multidisciplinary International Research Journal February 2022

२. हुंडाबळीचे राजकारण – लेखक एस.डी. मडामे

इ.स. १९९१ ते २००० च्या दशकातील निवडक मराठी स्त्री आत्मकथनांचा संक्षिप्त परिचय

प्रा. अरुण बळीराम पडघन
संशोधक विद्यार्थी, कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी.
प्रा. डॉ. शत्रुघ्न गिरमाजी जाधव
संशोधन मार्गदर्शक, आदर्श महाविद्यालय, परभणी.

प्रास्ताविक

प्रस्तुत शोधनिबंधात इ.स. १९९१ ते २००० या दहा वर्षाच्या काळातील निवडक मराठी आत्मकथनांचा परिचय करून द्यावयाचा आहे. शिवाय, आत्मकथनांचे स्वरूप आणि विशेषही नोंदवायचे आहेत. या दहा वर्षाच्या काळात विविध प्रकारची स्त्रियांची आत्मकथने आहेत. त्यांची भाषा, निवेदनशैली, समाजाचे आकलन, वास्तवाधिष्ठित जीवनानुभव, परंपरा, कौटुंबिक जीवन अशा सर्व घटकांच्या बाबतीत भिन्नता असल्याने ही सर्व आत्मकथने भिन्न–भिन्न स्वरूपाची असल्याचे दिसून येतात. म्हणूनच एकाच दशकातील या निवडक मराठी स्त्री आत्मकथनांचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात येणार आहे. या आत्मकथनांमध्ये 'मी वनवासी', 'आहे मनोहर तरी', 'अश्रूंचे नाते' आणि 'जगायचंय प्रत्येक सेकंद' इ. स्त्रियांची आत्मकथने आहेत. आपण जे जगलो, जे भोगले, अशा आयुष्यातील बऱ्या–वाईट घटनांच्या पाऊलखुणा म्हणजेच ही आत्मकथने आहेत.

१)इ.स. १९९१ ते २००० च्या दशकातील मराठी आत्मकथने

इ.स. १९९१ ते २००० या दहा वर्षाच्या कालखंडात मराठी आत्मकथनांच्या बाबतीत सुवर्णकाळच म्हणावा लागेल. त्यामध्ये मुख्यत्वे दलित आत्मकथनांची संख्या मोठी आहे. त्याच बरोबर स्त्रीवादी, आदिवासी, ग्रामीण अशाही प्रकारातले आत्मकथन मोठ्या प्रमाणात मराठी आत्मकथनांमध्ये निर्माण झाले, तर काही उच्चवर्णीय लेखकांचे जीवनानुभव कथन करणारी आत्मकथनेही आहेत. मराठी आत्मकथनांचे हे दशक संमिश्र स्वरूपांच्या आत्मकथनांची निर्मिती करणारे दशक म्हणून ओळख निर्माण करून गेले.

अ)स्त्रियांची आत्मकथने

इ.स. १९९१ ते २००० या कालखंडात निर्माण झालेल्या एकूण आत्मकथनांपैकी फक्त स्त्रियांच्याच आत्मकथनांचा विचार प्रस्तुत मुद्यामध्ये करावयाचा आहे. या काळात प्रामुख्याने सिंधुताई सपकाळ यांचे 'मी वनवासी' (१९८८), सुनिता देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी' (१९९०), मीना देशपांडे यांचे 'अश्रूंचे नाते' (१९९५) आणि मंगला केवळे यांचे 'जगायचंय प्रत्येक सेकंद' (१९९६) इत्यादींचा मुख्यत्वे उल्लेख करता येईल. ही आत्मकथने म्हणजे फक्त जीवनातील घडलेल्या घटनांची वर्णने नाहीत, तर जे भोगले, जे जगले, जे दु:ख, वेदना, अवहेलना, उपेक्षा, वाट्याला आली, त्या वेदनेचा हुंकार आहेत. लेखनीच्या माध्यमातून या स्त्रियांनी आपल्या मनातल्या वादळाला शमविण्याचा प्रकार आहे, असे दिसते.

या संदर्भात डॉ. प्रतिभा अहिरे 'समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून स्त्रियांची आत्मकथने' या ग्रंथात म्हणतात की, "स्त्रियांना प्राचीन काळापासून अभिव्यक्ती स्वातंत्र्य नव्हते. आता त्यांना ते स्वातंत्र्य लाभल्याने स्वत:ची कहाणी त्या कथन करू ईच्छित आहेत. स्त्रियांच्या आत्मकथनांच्या शीर्षकातूनही तेच अभिव्यक्त होताना दिसते."[१]

(i)'मी वनवासी'

सौ. सिंधुताई सपकाळ यांनी हे आत्मकथन इ.स. १९८८ मध्ये लिहिलेले असले, तरी इ.स. १९९० ते २००० या कालखंडात आदिवासी जीवनचित्रणाचे आत्मकथन आढळत नाही. म्हणून या आत्मकथनाचा समावेश अभ्यासासाठी केलेला आहे. हे आत्मकथन म्हणजे दुहेरी वेदनेचा हुंकार आहे. आदिवासी म्हणून आणि स्त्री म्हणून अशा दुहेरी वेदनेला आविष्कृत करण्याचा प्रयत्न सिंधुताईनी या आत्मकथनातून केलेला आहे. शिवाय, एक अशिक्षित मुलगी चिंधीपासून प्रगल्भ विचारवंत, समाजसेविका सिंधुताई सपकाळ पर्यंतच्या अनेक टप्प्यांपर्यंतचा प्रवास या आत्मकथनातून आलेला आहे.

सिंधुताईंच्या आयुष्यातील वनवन, ज्या ठिकाणी त्या गेल्या त्या चिखलदरा परिसर, तेथील आदिवासींचे चित्रण आणि या समाजाची सेवा करताना अनवाणी रक्ताळलेल्या पायांनी हिंडणाऱ्या समाजसेविका सिंधुताई सपकाळांच्या आयुष्याचा अनेक टप्यांपर्यंतचा प्रवास 'मी वनवासी' मधून मांडलेला आहे. स्वत:च्या आयुष्यात आलेल्या दु:खानुभवांची

प्रचिती इतर स्त्रियांना येऊ नये म्हणून त्यांनी जीवाचे रान केले आणि समाजात स्त्रियांमध्ये जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्या अनाथांच्या आई बनल्या, तर अन्याय–अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रियांच्या मायी बनल्या. स्वत:चा संसार उद्ध्वस्त झालेल्या या मायीने अनेकांचे संसार सुरळीत केले. त्यांच्या याच कार्याचा आणि त्यातून आलेल्या जीवनानुभवांचा लेखाजोखा म्हणजेच 'मी वनवासी' हे आत्मकथन होय. यातील सिंधुताईंच्या व्यक्तिरेखेविषयी 'मी वनवासी' च्या प्रस्तावनेत जयकृष्ण शिंदे म्हणतात की, "वाघाच्या बच्च्याला बोडल्यानं दूध पाजलं, तरी वयात येताच त्याला आपल्या खऱ्या जातीची जाण व्हावी तद्वतच या वाघिणीनं आपला संसार सिमेंटच्या दलदलीतून चिखलदऱ्याच्या जंगलात मांडला. 'संसार' शब्दाची जाणीव तिला नव्याने उमगली. या वाघिणीला आता खरी जाणीव झाली. मी, माझे मूल व चूल या पलीकडेही फार मोठा संसार आहे, हे तिला उमगलं आणि जगाने लाथाडलेल्या, माणूस म्हणून जगण्याचा अधिकार अव्हेरलेल्या आदिवासी बांधवांच्या सेवेचं 'असिधारा' व्रत तिने स्वत:हून अंगिकारलं. तिच्या चालण्या–बोलण्यात अत्यंत नैसर्गिकपणा, ओघवती भाषा, बरंच काही सोसलंय, भोगलंय हे जाणवू न देणारी सह्याद्रीच्या कडेकपारीची जातकुळी सांगणारी, रांगडी; पण त्याच बरोबर मायेच्या ओलाव्यानं ओथंबलेली वाणी. आवाज भरदार; पण करुणेची झालर असलेली, नऊवारी लुगडं, किंचित झुकून चालण्याची ढब, डोईवर पदर; पण त्यातही झपाटल्याचा आभास वेळोवेळी आपलं अस्तित्व दाखवतोय. असं हे व्यक्तिमत्त्व म्हणजेच सिंधुताई सपकाळ."[२]

या आत्मकथनातून अजून एक महत्त्वाची गोष्ट जाणवते, ती म्हणजे सिंधुताईना राज्यकर्त्यांचे आणि समाजाचे आलेले बरे–वाईट अनुभव ही होय. आदिवासींच्या लढ्यासाठी मंत्रालय, दिल्लीवारी करीत असताना भेटलेले बेगडी पुढारी, नेते मंडळीचा समाचार ज्याप्रमाणे त्यांनी या पुस्तकात घेतला आहे. त्याचप्रमाणे ताईंच्या गाण्याने भारावून जावून प्रसिद्धीच्या झोतात आणणारी पुणेकर मंडळीच प्रभाच्या प्रकरणात कोणताही मागचा–पुढचा विचार न करता कशी बदनामी करते, याचेही वर्णन सिंधुताईनी करून माणसांच्या दोलायमान मानसिकतेचे आणि पशुवृत्तीचे दर्शन घडविले आहे. पुण्याला संस्कृतीचे, विद्येचे माहेर घर समजले जाते; परंतु त्याच पुण्याला कुठेही मायेचा पाझर फुटला नाही, असेही वर्णन त्यांनी 'मी वनवासी' मधून केले आहे.

(ii) 'आहे मनोहर तरी'

सुनिता देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी' हे आत्मकथन दिनांक १२ जून १९९० साली प्रकाशित झाले. दलित, ग्रामीण, आदिवासी अशा समाजातल्या तळागाळातल्या आत्मकथनांत मन, दु:ख, भूक, वेदना, जातिभेदाची दाहकता, स्पृश्य–अस्पृश्यांना मिळणारी हीन वागणूक, वेशीबाहेरील दु:खाचा टाहो, जंगलातील जीवनामध्ये हरवून गेलेला मूळ संस्कृतीचा उपासक आणि आद्य रहिवासी या सर्वांचे चित्रण मराठी आत्मकथनांच्या माध्यमातून येत होते. मात्र, उच्चवर्णीय वर्गातील लेखकांची जी आत्मकथने आली, त्यामध्ये सुनिता देशपांडेंचे आत्मकथन आपली वेगळीच ओळख सांगून जाते. ब्राह्मण वर्गामध्ये असूनही आणि सधन, उच्चशिक्षित आणि प्रसिद्धीस पावलेल्या घराण्यातलीही एखादी व्यक्ती इतकी दु:खी, एकाकी आणि निराश असू शकते, याचा अनुभव मराठी आत्मकथनाला प्रथमच या आत्मकथनाने आणून दिला आहे.

सुनिता देशपांडे यांच्या खडतर जीवनाचा प्रवास म्हणजेच 'आहे मनोहर तरी' हे आत्मकथन आहे. शेवटी दु:ख, वेदना आणि एकाकी जीवनच वाट्याला येते, हीच खरी आयुष्याची शोकांतिका आहे. याच वेदनेचा हुंकार या आत्मकथनातून सर्वत्र आढळून येतो. सुनिता देशापांडे यांच्याच मलपृष्ठावरील मजकुरातून याचा अनुभव येतो. त्या म्हणतात, "सफल संपूर्ण व्हायला ही साठा उत्तरांची कहाणी नाहीच. ही साठा प्रश्नांची कहाणी ही सफल नव्हे आणि निष्फलही नव्हे. अपूर्ण मात्र, नक्कीच."[३]

स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्याचे वृत्तांत व त्यातूच पु.ल. देशपांडेंची ओळख होऊन त्याचे लग्नात झालेले रूपांतर व नंतर लागलेला रंगभूमीचा नाद, मैफिली, कार्यक्रम, मिळालेली प्रसिद्धी. पु.ल. चा स्वभाव व त्यामुळे अनेकदा वाट्याला आलेली सुख, दु:ख. पु.ल. च्या साहित्य क्षेत्रातील प्रसिद्धीमुळे, घराण्यामुळे मिळविलेली प्रसिद्धी, प्रतिष्ठा व त्यांचा जगण्यावर झालेला परिणाम आणि निर्माण झालेली प्रगल्भ विचारसरणी, हाच या आत्मकथनाचा परिपाक आहे. ह्या आत्मकथनातून एक गोष्ट मुख्यत्वे जाणवते, ती म्हणजे सुनिता देशपांडेंनी आपले गुण–दोष ज्या प्रमाणात परखडपणे सांगितले आहेत तसेच पु.ल. च्या चरित्राविषयी लिहितानाही त्यांनी त्यांचे गुण–दोष परखडपणे नोंदवून एक प्रकारे लिखाणाला सत्यता आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

उच्चवर्णीय ब्राह्मण समाजातील काही कर्मठ विचार, रूढी, परंपरा आणि संस्कृतीच्या पोकळ कल्पना व देव, धर्म, श्रद्धा, अंधश्रद्धा, यांविषयी समाजात असलेल्या आचार–विचारांचेही विवेचन या आत्मकथनातून आलेले आढळते. वैचारिक

मतभेद आणि नातेसंबंध, यांच्यातील अंतराचा वेधही या पुस्तकातून घेण्यात आलेला आहे, तर आपल्या समाजाच्या बाहेरच्या समाजाचे दु:ख पाहून गहिवरलेल्या मनाचे दर्शनही पुस्तकाच्या शेवटच्या टप्प्यात आविष्कृत झालेले आहे.

(iii) 'अश्रूंचे नाते'

मीना देशपांडे यांनी हे आत्मकथन इ.स. १९९५ साली लिहिले. महाराष्ट्रातील नामवंत नाटककार, साहित्यिक आणि वक्ते प्रल्हाद केशव अत्रे उर्फ आचार्य अत्रे आणि त्यांच्या पत्नीच्याच चित्रणाने ह्या आत्मकथनाचा मोठा भाग व्यापलेला आहे.

मीना देशपांडे ह्या आचार्य अत्रे यांच्या द्वितीय कन्या आहेत. आपल्या बालपणापासून ते वडिलांच्या, आईच्या मृत्यूपर्यंतची हकिकत त्यांनी 'अश्रूंचे नाते' मधून वर्णन केलेली आहे. साधारणपणे तेवीस प्रकरणांच्या माध्यमातून या आत्मकथनाची मांडणी करून बालपण, शिक्षण, तारुण्यावस्था, वैवाहिक जीवन आणि आई–वडिलांच्या आयुष्याचा शेवट या गोष्टी क्रमाने नोंदविलेल्या आहेत.

अत्रेंच्या जीवनचरित्रावर बऱ्याच प्रमाणात प्रकाश टाकण्याचे काम या आत्मचरित्रामुळे झालेले पाहावयास मिळते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर इंग्रजी संस्कारांनी कसा प्रभाव पाडलेला होता व त्याचा अनुभव त्यांच्या वारंवार व दैनंदिन जीवनात कसा आढळून येई, याचेही वर्णन देशपांडेंनी केलेले आहे. अत्रेंना प्रवास करण्याची, नाटके पाहण्याची, मोठ्या हॉटेलात जेवणाची, साहेबी पेहराव करण्याची आणि इंग्रजीतून संभाषण करण्याची हौस होती. ते मुख्याध्यापक होते. त्यामुळे त्यांचा पगार या चैनीसाठी पुरेसा नव्हता, तरीही ते या सर्व गोष्टी सहजपणे करीत. मात्र, त्यांच्या पत्नीची गोष्ट त्यांच्यापेक्षा वेगळी होती. साधी, सरळ राहणी आणि एका शिक्षिकेला शोभेल असा पेहराव. खान–पान, विचारसरणी आणि कुटुंबवत्सलता या गोष्टींना त्यांनी महत्त्व दिलेले होते. त्यामुळे बऱ्याचदा प्रवासात विनाकारण खर्च नको म्हणून त्या खाण्या–पिण्याचे साहित्य घरूनच करून घेत. अशा या जोडप्याच्या सहजीवनाचा आणि नंतरच्या काळात विस्कटत गेलेल्या संसाराचा आलेख म्हणजेच हे आत्मकथन आहे.

मोठ्या माणसांची मनेही मोठी असतात, असे म्हटले जाते. कधीही न झुकणारा माणूस, नेहमी ताठर असणारा साहेबी पोषाखातला एक लेखक मुलीच्या विवाहावेळी निरोप देताना ओक्साबोक्सी रडतो, तेव्हा त्यातील बाप जागा होतो. याचा हृदयद्रावक अनुभव त्यांनी या आत्मकथनात नोंदवला आहे. एवढेच नव्हे, तर मुलीच्या किंवा पत्नीच्या दु:खाचा कधीही विचार न केलेल्या अत्रेंना मुलीच्या नुकत्याच जन्मलेल्या अर्भकाच्या मृत्यूने किती अनावर दु:ख झाले, यामुळे त्यांच्या ठिकाणचे हळवे मन कसे आपणांस समजले, याचाही उल्लेख त्यांनी केला आहे. शिवाय आयुष्यभर ताठ मानेने पतीच्या सुख–दु:खात साथ देऊन परिस्थितीला कधीही शरण न जाता स्वाभिमानाने पित्याची जबाबदारी पेलून, मुलींची लग्ने स्वत:च्या हिंमतीवर पार पाडलेल्या आईची, आयुष्याच्या शेवटी झालेली दयनीय अवस्थाही वाचकांच्या हृदयाचा ठाव घेते.

याचाच अर्थ असा की, घरामध्ये नांदणारी माणसे ही कधी–कधी खूप मोठी वाटतात, तर कधी–कधी खूप हळवी वाटतात. त्यांचे वर्तन कधी परकेपणाचे वाटते, तर कधी आतड्याला पीळ पाडणाऱ्या वेदनेचे दर्शन घडविते आणि खऱ्या अर्थाने त्यांच्या मनाचा शोध घेणे अवघड होऊन बसते. या पुस्तकाच्या मनोगतात लेखिकेने म्हटले आहे की, "पारंपरिक रूढ कल्पनेप्रमाणे सामान्य आई–वडिलांची अन् त्यांच्या मुलांची नाती असतात की नाही कुणास ठाऊक. मला त्याचा अनुभव नाही; कारण पप्पा आणि आई दोघेही असामान्य होते. त्यांच्या असामान्यत्वामुळेच आमच्यातील नाती अत्यंत गुंतागुतींची होऊन बसली. ती संपूर्ण उलगडून दाखवणे माझ्या आवाक्या पलिकडचं आहे"[४]

(iv) 'जगायचंय प्रत्येक सेकंद'

मंगला केवळे यांचे हे आत्मकथन इ.स. १९९६ साली प्रसिद्ध झाले. मागासवर्गीय समाजातील चांभार या जातीत जन्मलेल्या आणि स्वकर्तृत्त्वाने जनमाणसांत प्रसिद्धीस पावलेल्या पती–पत्नीच्या जीवनाचे चित्रण म्हणजेच 'जगायचंय प्रत्येक सेकंद' हे आत्मकथन होय. मंगला ही मुलगी बालपणापासून आई–वडिलांविना वाढल्याने सोसावे लागलेले दु:ख, महाराष्ट्र बँकेतील नोकरी, डॉ. केवळेंसोबत झालेला विवाह आणि विवाहातून पतीच्या रूपाने मिळालेला एक मित्र, सखा, पतीसोबत केलेला प्रवास, त्यातील गंमती–जमती आणि वैशिष्ट्यपूर्णता, विविध ठिकाणी केलेल्या पर्यटनातून निर्माण झालेली ट्रेकिंगची आवड, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतचा वेगवेगळ्या प्रकारचा प्रवास, धार्मिक पर्यटन, स्थळांना दिलेल्या भेटी, हिमालयातील सर्वोच्च एव्हरेस्ट शिखरावरील यशस्वी मोहीम व हे सर्व करीत असताना साथ देणारा पती. मात्र, पतीच्या अकाली मृत्यूने ओढवलेल्या समस्यांचा डोंगर, त्यातून बाहेर पडून फुलविलेला संसार, या सर्वांची जबाबदारी पेलवताना झालेली ओढाताण आणि समाधानही मंगला केवळेंनी आपल्या आत्मकथनांतून मांडले आहे.

डॉ. यशवंत केवळे हा चर्मकार समाजात जन्मलेला खेड्यातला मुलगा. मुंबईसारख्या महानगरामध्ये शालेय शिक्षण व जगण्यासाठी बूट पॉलीश करण्यापासून रेल्वेमध्ये गोळ्या, बिस्किटे, विविध वस्तू विकण्याचे काम करतो. शिवाय, शाळेचा खर्च भागविण्यासाठी घरातून कोणताही आधार नसल्याने मिळेल ते छोटे–मोठे काम, नोकरी करतो आणि मोठ्या जिद्दीने, चिकाटीने तो मेडिकलचा अभ्यासक्रम पूर्ण करतो व डॉक्टर बनतो आणि एक आदर्श उभा करतो. त्याच्या या परिश्रमपूर्ण जीवनाची व्यथा आणि कथा या आत्मकथनातून अवतरलेली आहे.

परिश्रम, ध्येय, चिकाटी आणि आत्मविश्वास ही मूल्ये माणसाने आत्मसात केली आणि त्यानुसार वर्तन केले, तर त्याला जीवनात काहीही अशक्य नाही, असाच बोध डॉ. यशवंत केवळे आपल्या आत्मकथनातून देतात, असे दिसते. जीवनात नेहमीच सुख–दु:खाचे प्रसंग येत असतात. मात्र, सुखाने हुरळून न जाता आणि दु:खाने कोलमडून न जाता, या दोन्हीही गोष्टींना कवेत घेऊन माणसाने मार्गक्रमण केले व या दोन्हींचा योग्य समन्वय साधता आला, तर माणसाच्या जगण्यातला आनंद वेगळाच अनुभव देऊन जातो आणि निराशाजनक आयुष्यही आनंदी होत जावून शेवट गोड होतो.

म्हणून मिळालेले आयुष्य हे वेदनामय होऊन ते कुरवाळीत बसण्याऐवजी आयुष्याच्या प्रत्येक सेकंदाचा आस्वाद घेतला पाहिजे, तेव्हाच खऱ्या जगण्यातला आनंद मिळेल व आपोआपाच जीवन आनंदी होईल, हाच उपदेश हे आत्मकथन सांगून जाते. या आत्मकथनाच्या बाबतीत पुस्तकाच्या मलपृष्ठावरील मजकूर याचा अनुभव देऊन जातो, "डॉ. यशवंत केवळे चर्मकार समाजातला तरुण बूटपॉलीश करीत रेल्वेमध्ये तऱ्हे–तऱ्हेच्या वस्तू विकत आणि नाना नोकऱ्या पत्करत त्याने शिक्षण पूर्ण केले. तो डॉक्टर झाला; पण तो तेथेच थांबला नाही. त्याने अनेक कला, छंद जोपासले. तो जीवन रसिकतेने जगला. आपल्या परिसराला सभ्यता शिकवण्याचा त्याने प्रयत्न केला आणि एक दिवस छोट्या अपघाताचं निमित्त होऊन तो अकाली मरण पावला."[५]

वरील आशय जीवनाचे तत्त्वज्ञान काही क्षणात सांगून जातो. माणूस जगताना अनेक घटना घडतात. त्यातून राग, लोभ, द्वेष, मत्सर, हेवे–दावे, दुरावा, कटुता अशा गोष्टी उद्‌भवतात आणि हसरे, खेळते जीवन उद्‌ध्वस्त होऊन आयुष्य दु:खमय यातनांनी भरून जाते. त्यामुळे मिळालेल्या जन्माचे सार्थक करावयाचे असेल, तर या सर्व गोष्टी बाजूला सारून जगले पाहिजे. त्यासाठी मनामध्ये नेहमी धनात्मक, सकारात्मक विचार सत्प्रवृत्तीची जोपासना आणि प्राणिमात्रांवर प्रेम व दयाभाव या गोष्टींचा अंगिकार केला पाहिजे. मग तुम्हाला 'हा माझा, तो तुझा' असा दुजाभाव वाटणार नाही, तर 'विश्वची माझे घर' ही विश्वबंधुत्वाची संकल्पना आचरणात येईल. हेच खरे जीवन आहे. डॉ. केवळेंच्या चरित्रातून याच गोष्टींची जाणीव होते; तर मंगला केवळे यांनीही पतीच्या निधनानंतर खचून न जाता जिद्दीने, धडाडीने स्वत:ला सावरून संसार सांभाळला. मुलांना धीर देऊन सन्मार्गाला लावले. शिवाय, आपल्या पतीच्या मागे पतीच्या आवडी–निवडी आणि छंद जोपासून त्यांनी डॉ. केवळेंचे स्वप्न पूर्ण केले. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वातूनही एका धैर्यशील, संयमी आणि कर्तव्यतत्पर स्त्रीचे दर्शन घडून येते.

समारोप

प्रस्तुत शोधनिबंधात संशोधनासाठी निवडलेल्या आत्मकथनांची तोंडओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. ही आत्मकथने इ.स. १९९० ते २००० या दशकातील असून, त्यातील प्रत्येक आत्मकथन हे विशिष्ट वर्गाचे, जातीचे प्रतिनिधित्व करणारे आहे. या आत्मकथनांचा अभ्यास केल्याने एकाच दशकातील समाजप्रवाह, विचारसरणी, चळवळी, राजकारण, धर्म, समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाची संकल्पना इ. गोष्टींचेही आकलन यांतून होण्यास मदत होते. त्यामुळेही आत्मकथने संख्येने कमी किंवा मोजकी असली, तरीही त्या दशकातील प्रातिनिधिक असल्याने महत्त्वाची आहेत, असेच म्हणावे लागते.

निष्कर्ष

१) इ.स. १९९१ ते २००० या दशकामध्ये मराठीत मोठ्या प्रमाणात आत्मकथनांची निर्मिती झाली. तसेच या दशकामध्ये दलित आत्मकथनांची संख्या इतर आत्मकथनांच्या तुलनेत जास्त दिसते.

२) स्त्रियांची आत्मकथने स्वानुभवांची प्रामाणिक मांडणी करताना दिसतात व त्यात 'स्त्री मुक्ती'चा हुंकार दिसतो.

३) आदिवासीं समाज आणि त्या समाजाची स्त्रीकडे पाहण्याची मानसिकता 'मी वनवासी' मधून पहिल्यांदाच आविष्कृत झाली आहे.

४) प्रसिद्ध आणि जगाच्या दृष्टीने उच्च असणाऱ्या व्यक्ती कौटुंबिक जीवनात किती अपयशी असतात, याचा प्रत्यय 'अश्रूंचे नाते' या आत्मकथनामधून दिसून येते.

५) प्रसिद्ध आणि जगाच्या दृष्टीने उच्च असणाऱ्या व्यक्ती कौटुंबिक जीवनात किती अपयशी असतात, याचा प्रत्यय 'आहे मनोहर तरी' आणि 'अश्रूंचे नाते' या दोन आत्मकथनांमधून दिसून येते.

६) 'जगायचंय प्रत्येक सेकंद' मधून चर्मकार समाजाच्या अज्ञानी मानसिकतेवर आणि त्यावर मात करून यशाचे शिखर गाठणाऱ्या दुर्दैवी डॉ. यशवंत केवळेंची कहाणी वाचकांचे मन हेलावून टाकते.

संदर्भसूची

१) डॉ. अहिरे प्रतिभा, 'समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून स्त्रियांची आत्मकथने', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र.आ. २०११, पृ. ९३.

२) सौ. सपकाळ सिंधुताई, 'मी वनवासी', रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्र.आ. १९८८, पृ. प्रस्तावना.

३) देशपांडे सुनिता, 'आहे मनोहर तरी', मौज प्रकाशन गृह, मुंबई, एकोणिसावी आवृत्ती २०१२, मलपृष्ठ.

४) देशपांडे मीना, 'अश्रूंचे नाते', डिम्पल पब्लिकेशन्स, ठाणे, द्वि.आ. २००२, मनोगत, पृ.१.

५) केवळे मंगला, 'जगायचंय प्रत्येक सेकंद', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण २०१०, मलपृष्ठ.

कल्पना दुधाळ यांच्या कवितेतील स्त्री प्रतिमा कवितासंग्रह - सिझर कर म्हणतेय माती

प्रा. डॉ. सौ. मंगल एकनाथ डोंगरे

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, ता.- जुन्नर, जि. – पुणे. ४१०५०४

प्रस्तावना:

सौ. कल्पना दुधाळ यांच्या 'सिझर कर म्हणतेय माती' - २०१४ व 'धग असतेच आसपास' - २०१६ हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आणि समीक्षकांना, अभ्यासकांना त्यातील प्रतिमांनी आश्चर्यचकित केले. ग्रामीण स्त्रीवादाचे नव्याने त्यांना दर्शन झाले. कवयित्रीची शेती करताना आलेल्या भावभावनांची स्पंदने अचूक शब्दात व्यक्त झाली आहेत. ग्रामीण जीवनातील मूल्यांची झालेली पडझड कल्पना दुधाळ यांना प्रकर्षाने जाणवते. त्या प्रगतशील शेतकरी कुटुंबातील असून स्वतः शेतीत राबतात. त्यामुळे शेती जीवनातील स्त्री म्हणून घेतलेले अनुभव व कवयित्री म्हणून झालेली जडणघडण लक्षणीय वाटते.

सामान्य शेतकरी कुटुंबातील बाईकडे घरातील आणि शेत शिवारातील कामे डोळे वटारून बघत असतात. अशात कवितेच वेड जोपासणं म्हणजे भिकेचे डोहाळेच असे कल्पना दुधाळ म्हणतात. असे होते तरी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून १८ पुरस्कार या कवितासंग्रहाला मिळाले. महाराष्ट्र साहित्य अकादमीने मराठी कवितेची प्रतिनिधी म्हणून आमंत्रित केले. ८६ व्या 'अखिल भारतीय साहित्य संमेलनात' मा. शरदचंद्र पवार साहेब यांनी उद्घाटनपर भाषणात त्यांच्या कविता वाचल्या. टेंभुर्णी माहेर व सासर बोरीभडक, ता. दौंड या गावच्या मातीने त्यांच्या शब्दांना वास्तवतेचा स्पर्श झाला आहे.

कल्पना दुधाळ यांची कविता आपले मन वेधून घेते. ती पुन्हा पुन्हा वाचावीशी वाटते. कारण या कवितांमधून नवसर्जन दिसून येते. त्यांची भाषा म्हणजे अनुभवाची उत्स्फूर्त शैली आहे. तीव्र संवेदनक्षमता, शेती अनुभवाची समृद्धी, जीवनाकडे पाहण्याची मूल्यदृष्टी, नव्या प्रतिमा यामुळे त्यांच्या लक्षणीय कवितांनी वाचकाला आकर्षित केले.

सृष्टी आणि स्त्री यांच्या सर्जनाची एकात्मता कवितेत झाली आहे. बदलते सांस्कृतिक पर्यावरण, शेतीतील परिवर्तन, जागतिकीकरण आणि शेती, आधुनिकता, नव्या पिढीची मानसिकता, शेतीवरील नैसर्गिक व मानवनिर्मित आक्रमण याचे भान त्यांच्या कवितेत जाणवते. जिथं 'कुसळ सुद्धा उगवत नव्हतं, तिथे मी स्वप्नांना पाणी घातलं'. 'गाळ' कवितेत कवयित्री म्हणते,

"आमच्या पिढ्यानपिढ्या मातीत खपल्या
तरी अजून चुलीत खोडक्यांचा धूर होतोय
आम्ही भाकरी संग चिमूटभर राख खातोय"

'दूध' - जिथं दुधाला पाण्याची किंमत असते तिथं रक्ताचं पाणी करुन दुधाच्या किटल्या भरण्याला याला काय अर्थ आहे ? साधी, सोपी सरळ बोलीभाषा हा त्यांच्या कवितेचा विशेष आहे.

'शेणाच्या पाट्या उचलून, आईच्या डोक्याला पडलेला खड्डा
जितराबाला वैरण वाहून वाकलेला बाप, हीच आमची कमाई म्हणायची का ? असा सडेतोड सवाल कवयित्री समाजाला विचारते.

'कुसळाचं गाव' - पिकापेक्षा कुसळं पिकणारे गाव असल्यामुळे तेथे अठराविश्व दारिद्र्य होतं.

'जगल्या वाचल्या करडईची, ओटीत बोंडं वेचायची माय'
आंधळी झाली माय आता, काळोख बघवत नाही

असे दारिद्र्य असले तरी कर्जापायी फाशी घेणं गावाला कधीचं ठावं नव्हतं. गावातील पोरांनी आता नवे प्रयोग करून कार्व्हर झालं पाहिजे. असे दूधाळ म्हणतात.

'साहेब' - शेतकऱ्याचा मुलगा 'साहेब' झाला आहे. तो आपल्या कामात मग्न झाला आहे. त्यामुळे त्याला आई-वडील, नाती, शेती याचा विसर पडला आहे. म्हातारी आई त्याला विनवणी करते,

साहेब झालास पोरा तू, खीनभर घरला येवून जा
तुटायला झालय दावं, आता तोंड तरी दावून जा
गरिबीची हौस नव्हती, सालानं गडी राहायचा बाप
बैल दमून बसला की, मानंवर जू घ्यायचा बाप
मोलमजुरी करता करता कित्येक खुरपं झिजून गेली
आठवणी तुझ्या पुसताना पदराची चिंधी भिजून गेली

तू आमच्या पोटचा गोळा असल्यामुळे विसरून जाता येत नाही, आभाळातून पडल्यासारखा आईबाप विसरून गेलास. पण आता आमची तक्रार नाही. आता तू -

'सरणाला अग्नी देऊन जा'
घोंगावतय जगणं आता, काळीज इतकं बेईमान पोरा
शेवटचं हे मागणं आता, जन्माचं देणं देऊन जा
मांडीवर डोकं घेऊन, घोटभर पाणी पाजुन जा

शेतकरी आई आपल्या 'साहेब' झालेल्या मुलाला विनंती करीत आहे. तेव्हा आपल्या डोळ्यात अश्रू येतात. दारिद्र्यातील शेतकऱ्याची मुलगी जेव्हा शाळेत जाते तेव्हा तिला विषमता जाणवते, एकीकडे पांढरे शुभ्र बूट - मोजे घालणारी मुलगी तर दुसरीकडे फुफाट्यातून चालणारी मुलगी फडक्यात बांधलेली भाकर घेऊन शेळ्या चारायला घेऊन जाते.

आधुनिक शेतकरी स्त्री - महानगरीय संवेदनेमुळे आपला शेतमाल मॉलसाठी पाठवून देते. तेव्हा तिचा जीव गुदमरून जातो. तेव्हा आता तिनेही बदलायचे ठरवले आहे.

"आता मी पाठवते लेकरांना कॉन्व्हेंटमध्ये
निदान लेकरं तरी या महानगरीय व्यवस्थेत
उघडी पडू नयेत म्हणून"

पण आपणच रोज उपाशी का राहतो ? असा प्रश्न शाळकरी मुलगी आईला विचारते. माती आणि आकाश सर्वांनाच सारखे असते. पण शाळेत जाणाऱ्या मुलीला आई ऊस तोडायला घेऊन जाते. लहान मुलाला आई पाचटात झोपवते.

नवीन विहीर खणताना पाहताना ती जणू नव्या सृजनाच्या वेणा सहन करीत आहे असे कवयित्रीला वाटते "धरत्रीच्या स्तनातून पान्हावला ग ओघळ" विहिरीला पाणी लागलं म्हणजे विहिरीचा 'गर्भ जसा उदरात' अशी नवी प्रतिमा कवयित्री वापरते.

शेतकरी मुलगी - भोळाभाबडा बाप माझा, माळावर शेळ्या सोडायचा
थाळीभर गुळाच्या चहात पोटाची आग मिटवायचा
अशाच आगीत एक दिवस बाप एकटाच निघून गेला
अडाण्याचं शहाणं सपान माझ्या मनात पेरून गेला.

'गोंदण' या कवितेत कवयित्री म्हणते, हातावर कोरलेला मोराचा पिसारा पाहिल्यावर मनाला विसावा देते. हातावरील गौळणींचा फेरा पाहून जेव्हा कोणी हिणवते, तेव्हा मन रमून जाते. हातभर गोंदलेली तुळस पाहून माझा देह पंढरी आणि मन विठूचा कळस वाटते. संसारात सोसायची उभारी देतात. मरताना हे गोंदणच दागिना म्हणून सोबत येते. असे त्या स्त्रिला वाटते.

'बाया' या कवितेत कवयित्री म्हणते, बाया शेतातील हिरवाई तोडून, खुडून, उपटून, बांधून बाजारात नेतात, आणि तराजूत आपले कष्ट तोलतात. त्या पैशातून तेल, मीठ, साबणाबरोबर मोबाईल रिचार्जसाठी एखादी नोट काढून ठेवतात. पालेभाज्या विकून तंबाखू, तपकिर, मिसरी आणतात. मुलांसाठी वह्या-पुस्तके पेन आनंदाने आणतात.

'डोक्यावर गठुडी घेऊन झपाझप चालताना
मावळत्या दिवसांशी उगवतीच्या पैजा लावतात बाया
हिमतीवर पैजा जिंकतात बाया
या शेतीप्रधान देशाच्या नुसत्या नागरिक नव्हे
जिवंत पुरावेच जगतात बाया'

शेतकरी स्त्री रोज मातीतच नांदते. सरी-वाफ्यात कांदे लावते. झेंडूची फुले तोडते. ऊसाचं बेणं मातीत दाबते. खोल विहिरीचे पाणी शेंदते.

'रोज मातीत' मी ग नांदते,
उन्हातान्हात रोज मरते बाई मरते.

'अंश' कवितेत कवयित्री म्हणते, 'काळाच्या चार - दोन घड्या मी उलगडून पाहिल्या प्रत्येक घडीत बाईला परीक्षाच द्याव्या लागल्या.

पाट्यावरवंट्याचा संसार, बालविवाह, कौटुंबिक अत्याचार, दारिद्र्य, सततची मुलींची बाळंतपण, सहन केले मरणाचे झोंबणं.

बाई ग, एवढं जगणं, भोगणं, सोसणं शिकलीस कुठून ?
तोच सोशिक अंश वाहतोय माझ्या रक्तातून
म्हणूनच हे जगणं, किती सुंदर वाटतयं.

'माय' या कवितेत कवयित्री म्हणते, माय खुरपत होती, वर तळपतं ऊनं
पोटातल्या लेकराचं तळपलं तनमन
बांधलेल्या भाकरीत बोले आईचे गं मन, लेक पोटुशी नाजूक
तिला सोसवेना भूक, बाईच्या ग जगण्याला
काट्याकुट्याचा कुंपण.

'उलटं काळीज' या कवितेत कवयित्री कल्पना दुधाळ म्हणतात, आजच्या जागतिकीकरणात स्त्री-पुरुष समानता झाली असे म्हणत असले तरी समाजात आजही उलट्या काळजाच्या माणसांची शिकार मुलींना व्हावं लागत आहे.

शिवारातल्या देवांना निवद घेऊन निघालेली पोर तिच्याच तालात
खसकन ओढलं तिला टपलेल्या नराधमांनी उसाच्या फडात
तेव्हा नव्हता जागा बांधावरचा शेंदऱ्या म्हसोबा
शिवं वरची लक्ष्मी आई, विहिरीतल्या साती आसरा
तिनं शाळा सोडली खुरपं हातात घेतलं
तिची पात बायांच्या पुढं वावभर
मालक कौतुक करायचा, पोरीला हुरुप यायचा
मालक तिच्याच भोवती मजुरा घरची श्रीमंती न्याहळत.

विहिरीतून रोज पाणी आणणारी ती अशाच एका दुपारी परत आली नाही. मोबाईलवर बोलत मालक आला, आणि सिद्ध केलं पोर बाजिंदी होती. भानगड आसंन, आत्महत्याच केली आसंन.

उलट्या काळजाची माणसं वावरताहेत जिकडं तिकडं दिवसाढवळ्या. समाजातील स्त्री अत्याचाराचे वास्तव या कवितेत मांडले आहे. स्त्रिया लहानपणी जे खेळ खेळतात त्याचा त्यांना जीवनभर उपयोग होतो. हे 'खेळ' या कवितेत सांगताना कवयित्री म्हणते,

'मोडलाय पाय किंवा खुबा तरी चालता यावं लंगडत
म्हणून खेळावी लंगडी, पोरवयात
आंधळ्या कोशिंबिरीत असावं तरबेज
हात बांधून बसायची असावी सवयं
भातुकलीच्या खेळात दाटूमुटीचा चटका बसावा
विसरू नयेत मोहर गळाल्याचा, उतरंड ढासळल्याच्या गोष्टी'

अशा अनेक प्रतिमांच्या माध्यमातून कल्पना दुधाळ यांची कविता शब्दबद्ध होते. 'सिझर कर म्हणतेय माती' या त्यांच्या कविता संग्रहातील कविता मन अस्वस्थ करतात.

सारांश:

कल्पना दुधाळ या भूमीकन्या, राबराब राबणाऱ्या स्त्रीच्या कष्टाची जाणीव या कवितेतून येते. शेती, माती, पिकं यांच्याशी समरस झालेली ही कविता शेतकऱ्याच्या कुटुंबातील आई, मुलगी, बहिण, पत्नी यांची स्थिती व्यक्त करते. पुणे जिल्ह्यातील बोरीभडक हे त्यांचे गाव. अशा अनेक गावांचे प्रातिनिधिक चित्रण त्यांच्या कवितेत आले आहे. वाचकांना अवाहन करण्याचे सामर्थ्य या कवितेत आहे. भूमी आणि तिची कन्या यांचा अनुबंध आपल्याला समजतो. कष्ट करणाऱ्या स्त्रीची ग्रामीण रुपं आपल्याला भेटत जातात. त्यांची कविता मन वेधून घेते. पुन्हा - पुन्हा वाचाविशी वाटते. स्त्री संवेदन त्यांनी जागृत केले आहे. सौंदर्यमूल्य, जीवन मूल्ये या कवितेत आहे. त्यामुळे कवयित्रीने या कवितांमधून विचार आणि तत्व दिले आहे. यामुळे त्यांच्या या पहिल्याच काव्यसंग्रहाला अठरा पुरस्कार प्राप्त झाले आहेत. स्त्री आणि माती या दोघी सर्जन आहेत तसेच स्त्री, भूमी आणि कवयित्री अशी तिची स्त्री रूपं आहेत.

मातीतून चालता मी मातीच होऊनि जाते.
गर्भात हिरवे कोंब खुशाल उगवू देते.

त्यांच्या कवितांना वास्तवतेचा गहिरा रंग प्राप्त झाला आहे. उत्स्फूर्तता, तीव्र संवेदना, अनुभव विश्वाची समृद्धी, जीवनाकडे पाहण्याची मूल्यदृष्टी, नव्या प्रतिमा यामुळे त्यांची कविता वाचकाला आकर्षित करते. 'गाळ', 'दूध', 'कुसळाचं गाव', 'साहेब', 'निर्यात', 'पाचटाच्या मुलखात', 'गोंदण', 'बाया', 'अंश', 'माय', 'उलटं काळीज', 'खेळ' या कवितांमधून स्त्री प्रतिमा व्यक्त झाल्या आहेत. स्त्री संवेदना या वेळी जागृत होतात. एवढ्या भावस्पर्शी या कविता आहेत.

संदर्भ:

१) सिझर कर म्हणतेय माती(कविता संग्रह) – सौ. कल्पना दुधाळ, हर्मिस प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २०१४.
२) बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कविता संपा.- डॉ. धनगर, डॉ. शेवते, प्रकाशक स्वातीधन, नाशिक, प्रथमावृत्ती – २०१९.

मराठवाड्यातील कवयित्रींच्या काव्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

प्रा. डॉ. मीनाक्षी देव (निमकर)

मराठी विभाग प्रमुख सहा. प्राध्यापिका, डॉ. सौ. इं. भा. पा. महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद

प्रस्तावना :

तो आरशात जसा असतो तसा दिसतो
ती आरशात जशी नसते तशी दिसते। (स्त्री सुक्त)

पारंपरिक साहित्यातून व्यक्त होणारी स्त्रीची प्रतिमा या विषयी या काव्यातून मार्मिक वर्णन आले आहे. पुरुष प्रधान संस्कृतीच्या आरशात स्त्रीची खरीखुरी प्रतिमा या संस्कृतीला इष्ट वाटणारी अशीच प्रतिबिंबीत होत होती, स्त्रीचे व्यक्तिमत्त्व मर्यादित आणि एकूणच पुरुषी संस्कृतीला सोईचे असेच साहित्यातून व्यक्त होत होते.

१९८० नंतर झालेली अनेक सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक राजकीय स्थित्यंतरे स्त्रीने आत्मसात केली तसा कवितेचा आशय, विषय आणि अभिव्यक्ती ही बदलू लागली. स्त्री म्हणून अवतरणारी कविता `माणूस` म्हणून अवतरु लागली. स्त्रियांचा दबलेला - दाबलेला श्वास हळूहळू काव्यातून मोकळा होऊ लागला. आशय विषय आणि आविष्कार बदलल्याने स्त्री काव्याचे एक स्वतंत्र्य प्रतिमा विश्व तयार होऊ लागले. घरादाराच्या चौकटीत अडकलेले स्त्रीचे व्यक्तित्व घराबाहेर पसरलेल्या व्यापक पटलावर स्थानांतरीत होऊ लागले, घर, संसार, मुलांचे संगोपन आणि नोकरी व्यवसाय सांभाळून आत्मविश्वासाने उभ्या असलेल्या आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या स्त्रिया, या स्त्रियांचे दु:ख, वेदना, घुसमट, त्याचं जगणं, मराठवाड्यातल्या कवयित्रींनी आपल्या काव्यातून मांडले, स्त्री जाणिवा, स्त्री केंद्री अनुभव, स्त्रीची आई - बाई मुलगी, प्रेयसी, मैत्रिण, गृहिणी, बाहेरच्या जगात कर्तृत्व गाजविणारी स्त्री अशा विविध प्रतिमा, स्त्रीचे व्यक्तित्व या काळातल्या कवयित्रींनी आपल्या काव्यातून अधोरेखित केले.

काव्यानुभुती आणि प्रतिमा :

प्रतिमा हा कवितेला काव्यत्व मिळवून देणारा महत्त्वाचा घटक आहे, कवितेचा प्राणभूत घटक असतो.

आपण जेव्हा एखादी कविता वाचतो तेव्हा तिच्यातील काही शब्दांमुळे मन:चक्षु समोर काही चित्रे तरळतात. अशा चित्रांना प्रतिमा असे म्हटले जाते.

`प्रतिमा` हा संस्कृत शब्द आहे, त्याचा अर्थ साम्य व्यक्त करणारी मूर्ती किंवा चित्र - आकार प्रतिमेमध्ये दोन घटकांमध्ये प्रस्थापित होणारे नाते साधर्म्य - वैधर्म्याधिष्ठित असते. कवीच्या अंतकरणातील उत्कट भावनाविष्कार प्रतिमांच्या रूपातून काव्यात येत असतो. प्रतिमा कविच्या मनातील भावनांना साकारत्व देतात, संवेदनागुणांनी युक्त असलेले शब्दचित्र किंवा संवेदनांचा साक्षात्कार म्हणजे प्रतिमा होय, कवीने काव्यातून साकारलेले भावनासंवेग युक्त शब्दचित्र म्हणजे प्रतिमा, संवेदनांचे केंद्रिकरण प्रतिमांच्याद्वारे होते. ``प्रतिमेशिवाय काव्य होऊच शकत नाही'' असे रा. श्री. जोग यांनी म्हटले आहे, प्रतिमा म्हणजे आपल्या सोयीसाठी समजण्यासाठी मनात निर्माण केलेला अर्थ होय. आशयाची उत्कट आणि प्रभावी अभिव्यक्ती करण्यासाठी प्रतिमा आवश्यक असतात. भावनांची उत्कटता - विचार - संवदेनांची तरलता या दृष्टीने प्रतिमांच्या माध्यमातून निर्मिती होते.

शब्दांनी घडविल्या गेलेल्या प्रतिमांची सेंद्रिय रचना म्हणजे कविता होय'' असे सुधीर रसाळ यांनी म्हटले आहे.

`प्रतिमा` काव्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. प्रतिमेशिवाय सुंदर काव्य निर्माण होणे अशक्य असते.

कविता म्हणजे आपल्या अंतर्मनाशी आपणच केलेला तरल, हळूवार असा मुक्त संवाद, अनुभूती आणि प्रतिभेचा मिलाप झाला की उत्फूर्त प्रतिंमामधून काव्याविष्कार साकार होतो. नितळ स्वच्छ पाण्यात जसे प्रतिबिंब उमटते तसे आपल्या काव्यातून आधुनिक स्त्रीचा चेहरा आणि त्या चेहऱ्याच्या आड दडलेल्या तिच्या भावना - इच्छा आपल्या काव्यातून उत्कटतेने मांडण्याचा प्रयत्न मराठवाड्यातील प्रतिभावान कवयित्रींनी केलेला आहे.

मराठवाड्यातील काही प्रमुख कवयित्रींच्या काव्यातून आलेली स्त्री प्रतिमा :

निखळ स्त्री निष्ठ, स्त्रीविशिष्ट अनुभव विविध प्रतिमांच्या माध्यमातून काव्यातून अभिव्यक्त केलेल्या कविता `स्त्री` केंद्री ठरतात.

मराठवाड्यातल्या अनुराधा पाटील, शैला लोहिया (गजाआडच्या कविता) ललिता गादगे (अग्निजल, फसवी क्षितीजे) संजीवनी तडेगावकर, डॉ. वृषाली किन्हाळकर, डॉ. उर्मिला चाकूरकर, कविता महाजन अशा मराठवाड्यातल्या काही उल्लेखनीय कवयित्रींनी स्त्री केंद्री, स्त्री सक्षक्तीकरणा संबंधी अनुभव आपल्या काव्यातून टिपले आहेत.

१) अनुराधा पाटील : राष्ट्रीय स्तरावर गौरवांकित असणाऱ्या अनुराधा पाटील यांची काव्यानुभूती स्त्री केंद्री भावभावनांचा उत्कट आविष्कार करणारी आहे. त्यांचे दिगंत (१९८१) तरीही (१९८५) दिवसेंदिवस (१९९२), वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ (२००५) आणि `कदाचित अजूनही' (२०१७) हे कविता संग्रह प्रसिद्ध आहेत.

मानवी वेदने बरोबरच स्त्री वेदना त्यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी येते, त्यांच्या कवितेतून स्त्री वेदनेची विविध रूपे व्यक्त झाली आहेत.

त्यांच्या कवितांना सर्वसामान्य स्त्रियांच्या जगण्याचा संदर्भ आहे. स्त्रीच्या दु:खाच्या, एकाकी पणाच्या अनेकविध छटा अनेकानेक प्रतिमा त्यांच्या कवितेत पहायला मिळतात.

नागर आणि ग्रामीण स्त्रीची व्यथा, जगण्यातील कष्ट सर्वात असूनही जाणवणारे एकाकीपण, एकाकी जगण्यातील आर्तता हा स्त्री मनाचा अवकाश त्याच्या कवितेत व्यापून राहतो.

`तरीही` या काव्यसंग्रहात एकाकीपणाची व्याकूळ भावना व्यक्त होते -

``इतरांसाठी करताना अनेक गोष्टी
आपल्यासाठी काय करावं कळतच नाही
साऱ्यांशी बांधलं जाऊनही
आपण एकाकीच उरतो.''

एकाकीपणाची स्त्री वेदना अनुराधा पाटील यांच्या कवितेतून अधिक व्यापक आणि प्रखर जाणीवेतून व्यक्त झाला आहे.

`दिवसेंदिवस` या काव्य संग्रहातून ही स्त्री जाणिवेचा आविष्कार व्यक्त होतो.

``बाई हे पण खरं आहे की आपल्या भोवतीच्या जगात चर्चेत असतात बाईचे प्रश्न बाईच्या व्यथा, आणि गंभीर जबाबदार असतात, समोरचे ही चेहरे पण आपल्या पासून मैलोगणती दूरच राहून जाते आयुष्य नावाच्या जळवांनी पोखरलेली खरीखुरी बाई.''

किंवा

``बाई तसं तर ना बाप घर आपलं ना. आप घर आपलं, पण सुरूवात तर झालेलीच असते, वेशीपर्यंत पोचवून परत फिरलेले असतात सुद्दद''.

किंवा

``खूपदा आपण उमटु देत नाही कोणतीच आतली थरथर त्वचेवर, डोळयांच्या कडेच्या सुरकुत्याही शिकतात, सांभाळून आंकूचन प्रसरण पावायला.''

स्त्रीच्या आंतरिक मनाचा वेध घेत स्त्रीत्वाच्या अस्मितेचा अनुभव अनुराधा पाटील यांनी विविध प्रतिमांच्या माध्यमातून व्यक्त केला आहे.

``वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ'' या काव्यसंग्रहातील कविता निखळ स्त्रीनिष्ठ, स्त्री विशिष्ट अनुभव मांडणाऱ्या आहेत.

`पोरी` या कवितेत त्या म्हणतात,

``पुलाच्या कठड्यावर पाय झुलवत बसलीय मुलगी, मी विचार करते ती मोठी झाल्यावर इकडे उडी घेईल की तिकडे.''

घरामध्ये वावरणाऱ्या वयोवृद्ध आई बद्दल कवयित्री वर्णन करते.

``आई तर सगळयांचीच मरणार असते एक दिवस, पण सरता सरत नाही तिची वाट, इलाज नसलेले अटळ मृत्यूचं सत्य,'' पुरुष प्रधान संस्कृतीने घडविलेल्या स्त्री प्रतिमांचे वेध घेतांना मध्यमवर्गीय रूढी संकेतांची जीवन प्रणाली सुचित करणाऱ्या पारंपरिक प्रस्थापित व्यवस्थेत बंडखोर ``पानवाली बाई' मी पाहिली आहे, भरल्या बाजारात पान लावणारी बाई, जी पाहते जगाकडे निरखून, तुच्छतेने, देते नजरेला नजर न ओशळता'' अशी ही वेगळी स्त्री प्रतिमा त्या रेखाटतात. अनुराधा पाटील यांनी आपल्या कवितांमध्ये स्त्री प्रतिमांचा अतिशय सुरेख वापर केलेला दिसून येतो, सर्वसमावेशक स्त्री अस्तित्वाला स्वीकारणारी प्रतिमा त्यांच्या काव्यातून व्यक्त झाल्यामुळे त्यांची कविता वैश्विक जाणीव निर्माण करणारी ठरते, स्त्रियांची सुख - दु:खे, आशा निराशा, भाव - भावना या एका विशिष्ट पातळीवर एकमेकांशी जुळलेल्या असतात. अनुराधा पाटील यांच्या कवितेत अशा प्रकारचे गुण दिसून येतात. त्यामुळेच केवळ मराठी साहित्यातच नव्हे तर भारतीय साहित्यातही त्यांनी आपले स्वत:चे एक स्थान निर्माण केले आहे.

२) डॉ. वृषाली किन्हाळकर - स्त्री सुशिक्षित असो या अशिक्षित त्यामुळे पुरुषी समाज व्यवस्थेतील तिच्या जगण्यात / लोकांच्या दृष्टीनं फार फरक पडत नाही शिक्षणाने फुललेली प्रतिभा जाणिवेने जगू पाहते, त्यातून आजूबाजूच्या वास्तवात आपल्या अस्तित्वचा शोध सुरू होतो.

डॉ. वृषाली किन्हाळकर नांदेड येथील स्त्री रोग व प्रसुती तज्ञ डॉक्टर आणि संवेदनशील कवयित्री आहेत. त्यांचे काव्य वैद्यकीय अनुभवातून स्त्री प्रश्न जवळून अनुभवते स्त्रियांची जीवनानुभुती त्या शब्दातून प्रसवतात, `बांध फुटु नयेत मनाचे तर काय व्हावे` इतक्या अलगदपणे त्यांचे शब्द काव्यातून अभिव्यक्त होतात बाईची आदिम वेदना अक्षरांकित करणारी त्यांची कविता `वेदन` आणि `तारी` या काव्य संग्रहातून वाचकांच्या मनात रुजली आणि अनेक पुरस्काराने सन्मानित झाली.

डॉ. वृषाली किन्हाळकर आपल्या काव्यातून स्त्री जीवनाचे विविधरंगी पोत सहजपणे उलगडतात. `वेदन` हा त्यांचा काव्यसंग्रह १९९८ मध्ये तर `तारी` हा त्यांचा काव्यसंग्रह २००५ मध्ये प्रकाशित झाला.

या दोन्ही कविता संग्रहातील कवितांमधून स्त्री मनाची वेदना, उलाघाल, घुसमट आविष्कृत होते.

``कुण्या जन्माचे मळभ अंगावर घेत हे जगणे चालू आहे'' असा प्रश्नही त्यांच्या काव्यातून अभिव्यक्त होतो.

``डोळयातले समुद्र ही गोठून जावेत तसे गोठून जाते मन`` हे गारठलेपण ही त्यांच्या कवितेतून व्यक्त होत.

``तुमच्या तमाम इच्छांची ओझी बाळगताना, मी विसरलेच होते, माझ्या पाठीलाही ताठ होता येतं``

असा स्त्रीच्या पाठीचा ताणकणा शोधणारी त्यांची कविता आहे.

स्त्री जखमांशी हळवे नाते असणाऱ्या या कवयित्रींचे काव्य सहज रंगी आणि स्वाभाविकपणे उमलून येते.

स्त्री स्वभावाची वैशिष्ट्ये, स्त्रीयांच्या दु:खाचे सोशिक पणाचे संदर्भ, स्त्रीचे शरीरनिष्ठ अनुभव, स्त्री मनावर होणारे आघात, तिला गृहित धरले जाणे या विषयी डॉ. वृषाली किन्हाळकर संवेदनशीलतेने लेखन करतात म्हणूनच त्यांच्या कवितेतील स्त्री विषयक चिंतन वाचकांना नवी दृष्टी देणारं ठरतं.

३) डॉ. उर्मिला चाकूरकर -

स्त्री जाणिवेची, वेदनांची आणि समाज मनाची वैविध्यपूर्ण अनुभूती डॉ. उर्मिला चाकूरकर यांच्या कवितेतून निसर्ग प्रतिमा मधून प्रकट होते. त्यांचे `चांदण चाफा' `पर्णपाचू` पर्जन्यशास्त्र, पलाश पंख, हिरवी लिपी, विठोबा, माळशेज घाटातील कविता हे त्यांचे कविता संग्रह प्रकाशित आहेत.

निसर्गत: स्त्रीकडे सोशिकता अधिक प्रमाणात असते, गर्भधारणा, नव सृजन यामुळे तिला वेदनेचा अर्थ नीट समजू शकतो, स्त्री जन्म सोहळा या कवयित्री जवळून अनुभवन असल्यामुळे नाते संबंध, ताणतणाव यावर हळूवार फुंकर घालण्याची प्रभावी क्षमता या कवयित्रीकडे आहे.

४) संजीवनी तडेगावकर -

स्त्री वेदनेची अनेक रूपे हळूवारपणे मांडतांना आत्मशोध घेणाऱ्या जालना येथील प्रतिभावान आणि संवेदनशील कवयित्री आहेत. त्यांचे `फुटवे' अरुंद दारातून बाहेर पडतना' आणि `संदर्भासहित' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या कवितेतून वेगळी शब्दकळा, स्त्री अस्तिवाचे मूल्यभान आणि स्त्री जीवनाची चिकित्सा करणारी त्यांची कविता आहे.

''सरसळतं आयुष्य बाईनं नुसतं
जगायचं म्हटलं तरी, हादरून
भेदरतात घरंदाज घरांच्या भिंती,
आणि कुत्सुतपणे कुजबुजतात एकमेकांच्या कानात
चौकाचौकातून''

किंवा

``पुरुषी सत्तेच्या परंपरागत चौकटीत कितीही चतुराईने जागोजागी सुरुंग लावले तरी, उध्वस्त होत नाहीत त्यांच्या हुकमी अधिसत्तेचे कपटी मनसुबे म्हणून कारल्याचा कडूपणा काही केल्या कमी होतंच नसेल तर इमानी मातीने आता बीजाची प्रतवारी तपासून घ्यायला हवी.''

असा सल्लाही त्या आपल्या कवितेतून देतात.

``बाई युगान् युगांच्या मतलबी निगरगट्ट अवघड वाटांनी चाचपडत राहिली, खूपदा ठोकरून ही तुला कधीच सापडत नाही उजेडाचा हमरस्ता.''

असे स्त्री जीवनाचे उत्कट अनुभव संवेदनशीलतेने मांडणाऱ्या आणि स्वत:ची वेगळी वाट निर्माण करणाऱ्या कवियत्री म्हणून संजीवनी तडेगावकर यांच्या कवितेकडे बघता येते.

नसतेच सुंदर बाईपण
जाहिरातीत दाखवतात तसे
रापलेली बोटं, टाचेच्या भेगा
साक्षीलाच असतात तिच्या उन्हाळ्याच्या

माध्यमांमधून दाखवली जाणारी स्त्री प्रतिमा आणि प्रत्यक्षातली स्त्री प्रतिमा यातला फरक दर्शविणारी ही कविता सौंदर्याच्या बेगडी संकल्पनेचा उपहास करून सामाजिक धारणेच्या विसंगतीवर नेमके भाष्य करते.

५) कविता महाजन : आपल्या कवितेत म्हणतात ``मालक नसलेल्या बाईचा, सूक्ष्म हेवा करीत असतात मालक असलेल्या बायका''

स्त्रीची घुसमट प्रतिकात्मकरित्या चित्रीत करताना बंदिवान पक्ष्याला मुक्त आकाशाची ओढ कशी असते ते आपल्या काव्यातून करतात. स्त्रीत्वाचे विविध कंगोरे कविता महाजन यांच्या काव्यातून व्यक्त झाले आहेत.

``कुठल्याही आधाराचे बोट न धरता हा अंधार चिरून पलिकडे जावं, पाहावं एकदा अजमावून अंगभर गुंडाळून ठेवलेलं स्त्रीत्व, खरंच इतकं जाड भरडं असतं का?

स्त्रीकडे `बाई' म्हणून पाहता व्यक्ती म्हणून पाहिलं जावं ही अपेक्षा व्यक्त करते की त्यातून दिसतच नाही, आपलं आतलं ``माणूस'' असणंग!''

स्त्री म्हणून जगताना या कवयित्रींना अनेक प्रश्न पडतात. स्त्री शिक्षण, स्त्री सुधारणा यामुळे आत्मभान आलेली जागृक स्त्रीची बदलती मन:स्थिती वातावरण यातून या कवयित्रीनी पारंपरिक स्त्री प्रतिमेला छेद देत त्यातील विसंगती स्पष्ट करीत वास्तवाभिमुख स्त्री प्रतिमा रेखाटण्याचा प्रयत्न केला मराठवाड्यातल्या या कवयित्रीनी आत्मभान आलेली वास्तवाभिमुख स्त्री प्रतिमा आपल्या काव्यातून चित्रित केली.

सारांश :

१९८० नंतर समाजवास्तव बदलत गेले त्याचा कळत - नकळत परिणाम या काळातल्या कवितेवर ही झाला मराठवाड्यातील कवयित्रीनी आत्मपरतेच्या कोशातून बाहेर पडून समाजाभिमुखतेने आपल्या भावानुभवाशी प्रामाणिक राहून विविध स्त्री प्रतिमा आपल्या काव्यातून आविष्कृत केल्या.

पारंपरिक स्त्री प्रतिमांशी निगडित आदर्श धुडकावून लावले आणि वास्तवामध्ये स्त्रीचे प्रश्न, तिच्या समस्या, तिचे विचार, भाव भावना, प्रतिमा - प्रतिकामधून प्रगट केल्या.

- मराठवाड्यातल्या कवयित्रींची कविता आत्मानुभूतीची, निखळ प्रामाणिक अनुकरण विरहित आणि स्वतंत्र आहे.
- मराठवाड्यातल्या या कवयित्रींनी संयमित वास्तववादी, सकारात्मक आणि अंतर्मुख करायला लावणाऱ्या स्त्री प्रतिमा आपल्या काव्यातून उभ्या केल्या आहेत.
- मध्यमवर्गीय शहरी - ग्रामीण स्त्रीच्या भावविश्वाशी संबंधित काव्यात्म अनुभवांचा आविष्कार करणारी स्त्री प्रतिमा मराठवाड्यातल कवयित्रींनी अधिक प्रभावी व टोकदारपणे अधोरेखित केली आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) कविता आणि प्रतिमा - डॉ. सुधीर रसाळ

२) मराठवाड्यातील साहित्य : संपा. डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. सतीश बडवे

३) स्त्री लिखित मराठी कविता संपा. अरुणा ढेरे

४) मराठवाड्यातील मराठी वाङमयाचा इतिहास, संपा. डॉ. प्रल्हाद लुलेकर

मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा

पदमवार विठ्ठल विश्वनाथराव

कृष्णाई निवास मंजुळानगर भोकर, ता भोकर ज़िल्हा नांदेड

स्त्रियांचे, स्वतःच्या वेगळेपणाची जाणीव प्रकर्षाने व्यक्त करणारे व स्वत्वाचा शोध घेऊ पाहणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. साहजिकच पुरुषी साहित्याहून ते स्वरूपतः वेगळे ठरते; तथापि स्त्रीवादी साहित्य याचा अर्थ केवळ स्त्री निर्मित साहित्य नव्हे, तर पुरुष केंद्री विचार व्यूहातून मुक्त अशा परिप्रेक्ष्यातून कोणीही — स्त्रीवा पुरुषाने — निर्माण केलेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य असेही व्यापक अर्थाने म्हणता येईल. वास्तविक साहित्याच्या आविष्कारातील कोणत्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल, हा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे; परंतु एवढे निश्चित म्हणता येईल, की मानव म्हणजे पुरुष; स्त्री हे त्याचे उपांगह्या विचाराला छेद देणारे, त्याबद्दल प्रश्न उपस्थित करणारे, त्यातील जटिलता, धूसरता यांची जाणीव करून देणारे साहित्य स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल. बाईच्या असण्याचा, होण्याचा — म्हणजेच अस्तित्वाचा, स्वत्वाचा व अस्मितेचा — समग्रतेने वेध घेणारे, तिच्या आत्म शोधाचा प्रवास वाङ्मयीन आविष्कार म्हणून मांडणारे लेखन स्त्रीवादी म्हणता येईल; परंतु स्त्रियांच्या दुःखाच्या करुण कहाण्या पराभूत नियतिवादी दृष्टिकोणातून मांडणारे, त्यांच्या विषयी केवळ दया, सहानुभूती निर्माण करणारे, तसेच उद्धारकाच्या भूमिकेतून केलेले लिखाण हे स्त्रीवादी साहित्य म्हणता येणार नाही. स्त्रीच्या देहात्मते भोवती गूढता उभारून मूळ दडपणुकीचे वास्तव धूसर करणारे साहित्य स्त्रीवादाच्या कसोट्यांना उतरणारे नव्हे.

स्त्रीवाद ही एक समाज परिवर्तन घडवू पाहणारी 'राजकीय' जाणीव आहे. या स्त्रीवादी जाणिवेचा विविध दृष्टिकोणांतून, भिन्नभिन्न पातळयांवरचा आविष्कार स्त्रीवादी साहित्यात आढळून येतो. उदारमतवादी, मार्क्सवादी, समाजवादी, उत्तर – आधुनिक अशा अनेक विचार प्रणालींमध्ये स्वतःची भरघालून, स्त्रीवादी भानस्त्री-पुरुष विषमतेच्या प्रश्नांची मीमांसा करते. म्हणून काळाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीवादाची भिन्नरूपे तर दिसतातच; परंतु त्यांच्यात अनेकदा परस्पर विरोध ही आढळून येतो. ह्याचेच प्रतिबिंब वेगवेगळया काळांत लिहिल्या गेलेल्या स्त्रीवादी साहित्यात दिसते.

ह्या भिन्नभिन्न स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य. पुरुषाच्या आधारा शिवाय स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला परिपूर्णता येऊ शकते आणि प्रेमा इतकीच, माणसा सारखे जगण्याची भूक स्त्रीला ही असते हे दर्शविणारे आणि स्त्री म्हणून घडताना आलेल्या विविध अनुभवांना अभिव्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य. पुरुष प्रधानतेला विरोध करणारे आणि स्त्रीचे माणूस म्हणून चित्रण करणारे साहित्य, मग ते पुरुषाने लिहिले असले तरी स्त्रीवादी ठरेल; कारण तत्त्वतः स्त्रीवादी जाणीव स्त्री व पुरुष दोघांमध्येही विकसित होऊ शकते; परंतु पुरुषी वर्चस्वाचा अनुभव बाई होऊन घेणे स्त्रीला अधिक समर्थपणे करता येते, असे ही मानले जाते. त्यामुळे स्त्रियांचे लेखन अधिक नेमके, धारदार व प्रखर होते. जहाल स्त्रीवाद्यांच्या मते स्त्रियांची बाईपणाच्या भानातून निर्माण झालेली भाषा, प्रतीके, प्रतिमा खऱ्या अर्थाने विकसित होण्यासाठी काही काळ तरी जाणीवपूर्वक अलगतावादी भूमिका घेणे इष्ट ठरेल.

पाश्चात्त्य देशांत स्त्रीवादाचा उदय साधारण पणे १९६० च्या आसपास झाला व भारतात स्त्रीवाद सु.१९७५ नंतर रुजला. असे असले, तरी स्त्रीवादी जाणीव तत्पूर्वी अस्तित्वात नव्हती, असे मात्र नव्हते. व्यक्तिगत पातळीवर स्त्रियांना आपल्या वाट्याला आलेल्या दुय्यमत्वाची, गौण स्थानाची जाणीव होतीच आणि ती त्यांच्या साहित्यातून व्यक्त ही होत होती; पण आपलाहा अनुभव व त्याचा आविष्कार व्यक्तिगत आहे, असे त्यांना वाटत होते. त्याला संघटित चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते. मात्र जे खाजगी आहे, ते राजकीय आहे हे भान स्त्री जातीला आल्यानंतर स्त्रीवादी तत्त्वज्ञानाचा उदय झाला.

स्त्रीवादी जाणीव कशाला म्हणायचे, हे आधी स्पष्ट केले पाहिजे. जगभर प्रदीर्घ काळ जी पितृसत्ताक समाज व्यवस्था अस्तित्वात आहे, त्या व्यवस्थेने जैविक लिंगभेदाला (सेक्स) सांस्कृतिक लिंगभेदाचे (जेंडर) रूप दिले. आपले हितसंबंध जपण्यासाठी स्त्री-पुरुष यांच्यात एक विशिष्ट सत्ता संबंध रचला. या सत्तासंबंधात स्त्रीला गौण व दुय्यम ठरविले गेले. स्त्रीचा स्वभाव, लक्षणे, कार्यक्षेत्रे, कर्तव्ये या सत्तेने निश्चित केली व स्त्रीवर लादली. या गोष्टीची जाणीव म्हणजे स्त्रीवादी जाणीव होय. 'स्त्री ही स्त्री म्हणून जन्मत नाही, तर ती घडवली जाते' (वन इज नॉट बॉर्न अवुमन, रादर वन बिकम्स अवुमन), हे फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सी मॉन द बोव्हार चे विधान म्हणजे स्त्रीवादी जाणिवेचे महत्त्वाचे प्रमेय आहे.

स्त्रीवादी जाणीव ही स्त्री व पुरुष या दोघांत उदित होऊ शकते. पुरुष या जाणिवेचा समर्थक होऊ शकतो; परंतु या जाणिवेचा अनुभव मात्र स्त्रीच घेत असते. स्त्री – पुरुष विषमतेचे भान येणे, ही या जाणिवेची पहिली अवस्था होय. पुरुष रचित स्त्रीत्वाच्या कल्पनेला नकार देणे, ही या जाणिवेची दुसरी अवस्था, तर एक व्यक्ती म्हणून स्वतःचा शोध घेता घेता स्त्रीत्वाचा शोध घेणे, ही स्त्रीवादी जाणिवेची या पुढील व अंतिम अवस्था म्हणता येईल. या अवस्थांमधून जात असताना स्त्री-पुरुष समतेच्या तत्त्वावर आधारलेल्या नव समाजाची निर्मिती करणे, हे स्त्रीवादाचे उद्दिष्ट आहे. स्त्रीवादी जाणिवेच्या या तिन्ही अवस्थांचे आविष्कार वाङ्मयेतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर, वेगवेगळ्या कालखंडांत आढळून येतात.

स्त्रियांच्या साहित्यातील पृथ्गात्म वेगळेपण शोधून त्यांची चिकित्सा करण्याचे कार्य गेल्या काही वर्षांत स्त्रीवादी समीक्षकांनी केले आहे. स्त्रियांच्या कथा, कादंबऱ्या, कविता इ. साहित्यांतून त्यांच्या 'स्व' त्वाचा शोध त्यांनी कसा घेतला आहे, त्याची जाणीव त्यांना कशा प्रकारे झाली आहे, वर्षानुवर्षे पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेमुळे आपण दडपले गेलो आहोत, ह्या दडपशाहीचे भान स्त्रियांनी आपल्या लेखनातून कसे व्यक्त केले आहे, ह्याचा शोध स्त्रीवादी समीक्षा घेते. पुरुषी साहित्या पेक्षा स्त्री-साहित्याचे जे वेगळेपण संभवते, त्यावेगळेपणाची-भिन्नत्वाची कारण-मीमांसा, त्याचे स्वरूप व नेमकेपणा यांचे विवेचन-विश्लेषण स्त्रीवादी समीक्षेत केले जाते.

स्त्री व पुरुषयांचे जगाकडे पाहण्याचे दृष्टिकोणच मुळात भिन्न असतात, असेही समीक्षा मानते. परंपरेने स्त्री व पुरुष यांच्याकडे सोपविलेल्या वेगवेगळ्या विषमतावादी भूमिकांमुळे (उदा. पुरुषसत्ताक समाज व संस्कृतीच्या वर्चस्व भावाने स्त्रियांना बहाल केलेल्या पत्नी – माता – गृहिणी ह्या भूमिका) तसेच भिन्न व्यवसायांमुळे स्त्री-पुरुषांच्या लेखनातला भेद निर्माण होतो, असेही मानले जाते. स्त्रियांचे स्त्रियांनी केलेले चित्रण, स्त्रियांचे खास वेगळे अनुभव व विषययांचे स्त्रीवादी दृष्टिकोणातून दर्शन घडविणारे साहित्य, स्त्रीचे स्वत्वाचा शोध घेऊ पाहणारे, स्वत्वाच्या जाणिवेने केलेले आत्म प्रकटीकरण व आत्म शोध ह्या स्त्रीवादी साहित्याच्या वेगवेगळ्या दिशा आहेत. स्त्रीवादी समीक्षाही अशा अनेक दिशीय, बहुजिनसी स्वरूपाच्या स्त्रीवादी साहित्याचे विवेचन-विश्लेषण करून त्यातील स्वत्वाचा, वेगळेपणाचा शोध घेऊ पाहते.

स्त्रीवादी साहित्य व स्त्रीवादी समीक्षा हे प्रकार स्त्रीमुक्ती चळवळीतून उदयाला आले सीमॉन द बोव्हारने (१९०८—८६) लिहिलेल्या ल द झिअॅम सॅक्स (१९४९; इं. भा. द सेकंड सेक्स,१९५३; म. भा. २०१२) या ग्रंथा पासून स्त्री मुक्ती चळवळीचा प्रारंभ झाला, असे मानले जाते. स्त्रीवादी साहित्यात एक अभिजात ग्रंथ म्हणून तो मान्यता पावला आहे. 'शाश्वत स्त्रीत्व' (इटर्नल फेमिनिन) ही पूर्वग्रह दूषित संकल्पना समाज जीवनातून हद्दपार करण्यासाठी तिने या प्रबंधातून बौद्धिक व भावनिक पातळीवर युक्तिवाद मांडले. पुरुष प्रधान समाजव्यवस्थेत व पुरुषी मूल्यांच्या चौकटीत स्त्री ही पुरुषाशी अनेक नात्यांनी जखडून ठेवली जाते. त्यातही पुरुष हा मुख्य व स्त्री ही 'इतर' (दुय्यम) असा विषम भाव आहे.

स्त्री-पुरुषातील ही विषमता जीवशास्त्रीय वा दैवी नसून ती संस्कृति निर्मित आहे. दोघांत इतर कुठलाही भेद नसताना केवळ नैसर्गिक शारीरिक रचनेतील भेदामुळे स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. तिला स्वतःच्या मूल्यांची निर्मिती करता येत नाही. त्यामुळे आपल्या अस्तित्वाला अर्थ देता येत नाही. या पार्श्वभूमीवर जन्मतःच कोणी 'स्त्री' असत नाही; तर 'स्त्रीत्व' हे समाजाने, संस्कृतीने घडविलेले असते — अशा आशयाचे सीमॉन द बोव्हारचे विधान संस्कृति निर्मित स्त्री-पुरुष भेदावर व

स्त्रीच्या दुय्यम स्थानावर अचूक शरसंधान करणारे आहे. अर्थातच स्त्री-पुरुष शारीरभेद इथे नाकारायचा नाही; परंतु स्त्री-देहा बरोबरच तिचा लाजाळू पणा, विनयशीलता, नाजूकपणा, भावना प्रधानता, मातृभाव, स्वार्थत्याग, समर्पण वगैरे तिला बहाल केले जाणारे गुण हे जन्मजात असतात, हे येथे नाकारावयाचे आहे.

हे गुण समाजाने व संस्कृतीने स्त्रीत्वावर लादलेले असतात. तेव्हा जैविक लिंगभेद म्हणजे सांस्कृतिक लिंगभेद नव्हे, हे या स्त्रीवादी भूमिकेने स्पष्ट केले आहे. आपल्या प्रतिपादनात सीमॉन द बोव्हारने' सनातन / केवल स्त्रीत्व' ही संकल्पना नाकारून टोकाची भूमिका घेतली आहे. ही भूमिका तिच्या अस्तित्ववादी विचारसरणीचाच परिपाक म्हणता येईल. स्त्रियांना उपलब्ध असणारे निवडीचे स्वातंत्र्य आणि स्वतःच्या जीवनातील निर्णयांची जबाबदारी स्त्रियांनी घेण्याची आवश्यकता, या अस्तित्ववादी – स्त्रीवादी विषय सूत्रांची मांडणी बोव्हारने लँव्हिते (१९४३, इं. भा. शीकेम टूस्टे, १९४९) आणि लेमाँदारँ (१९५४, इं. शी. 'द मँडरिन्स') ह्यां सारख्या कादंबऱ्यांतून ही केलेली आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रीवादी चळवळीला एक सखोल तत्त्वज्ञानात्मक परिमाण बोव्हारच्या द सेकंड सेक्स या ग्रंथामुळे लाभले यात शंकाच नाही.

पाश्चात्त्य देशांत एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या कालखंडात स्त्रीवादी साहित्य प्रभावी पणे जोमधरू लागले. याकाळात सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमीवर' घरनावाचे मंदिर आणि त्यातली त्यागी, देवतेसमान असणारी गृहिणी' या सांकेतिक स्त्री प्रतिमेचा उदोउदो चालू होता; तेव्हा एलिझाबेथ गॅस्केल (१८१०—६५) तसेच एमिली ब्रॉंटीव शार्लट ब्रॉंटीया भगिनी आदी स्त्री लेखिकांनी आपल्या लेखनातून विचार आणि कृती करू पाहणाऱ्या स्त्रीचे एकटे अस्तित्व आग्रहाने मांडले. शार्लट गिलमन (१८६०—१९३५) ही स्त्रीवादी लेखिका, व्याख्याती व सिद्धांतकार ह्या काळात जगभर नावाजली गेली. विमेन अँड इकॉनॉमिक्स (१८९८) ह्या तिच्या विख्यात ग्रंथात तिने स्त्रीच्या आर्थिक स्वावलंबनावर व स्वातंत्र्यावर विशेष भर दिला.

स्त्रीच्या लैंगिकतेला व मातृत्वाला जास्त प्राधान्य दिले गेल्याने तिच्या सामाजिक व आर्थिक क्षमतांना हानी पोहोचली आहे आणि आर्थिक स्वावलंबन हेच तिला खरे स्वातंत्र्य मिळवून देईल, असे आग्रही प्रतिपादन त्याकाळात तिने केले. स्त्रीवादी साहित्याच्या संदर्भात तिची उल्लेखनीय कामगिरी म्हणजे 'द यलो वॉल पेपर' (१८९९) ही तिची अत्यंत गाजलेली लघुकथा. तिची ही कथा आणि व्हर्जिनिया वुल्फचा 'एरूम ऑफ वन्स ओन' (१९२९) हा निबंध म्हणजे स्त्रीवादी साहित्यातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. स्त्री वा पुरुष असण्यातील निरर्थकता दाखवून, सांकेतिक व साचेबद्ध व्यक्तित्वाच्या समाज मान्य संकल्पना नाकारणारे हे लेखन बंडखोरीचा आद्य आविष्कार घडविणारे आहे.

इंग्रज कादंबरी कर्त्री व्हर्जिनिया वुल्फ (१८८२ —१९४१) हिने स्त्री मुक्तीच्या संदर्भात दोन निबंध लिहिले: 'एरूम ऑफ वन्स ओन' आणि 'थ्रीगिनीज' (१९३८). 'एरूम ऑफ ...' ह्या निबंधात साहित्यिक स्त्रिया आणि कादंबरी ह्यांच्यातील ऐतिहासिक संबंधाचा आढावा तिने घेतला आहे. पितृसत्ताक व्यवस्थेमुळे स्त्रियांना दीर्घकाळ उच्च शिक्षणा-पासून वंचित ठेवले गेले. त्यामुळे काही क्षेत्रे — उदा. व्यावसायिक लेखन — स्त्रियांना बंद झाली वा प्रवेशास अवघड झाली. आर्थिक पारतंत्र्य, दडपणूक, समाजातला निकृष्ट दर्जा हे ही त्यांच्या वाट्याला आले, तथापि असली बंधने दूर होताच, त्याही सर्जनशीलतेची अत्युच्च शिखरे गाठू शकतील, अशी व्हर्जिनियाची धारणा होती. विविध क्षेत्रांतून स्त्रियांना वगळण्याचा पुरुषी कावा असला, तरी त्यामुळे आपली स्वतंत्र राजकीय-सांस्कृतिक अस्मिता सिद्ध करण्याची संधी स्त्रियांना प्राप्त होईल, असे विचार तिने 'थ्री गिनीज' मध्ये मांडले आहेत. व्हर्जिनियाने पुराण कथांना नव्या स्त्रीवादी दृष्टीने नवे अर्थ देता येतात, हे ही सिद्ध केले. स्त्रियांनी आपल्या लेखनात उपरोध, विनोद, विडंबन ही शस्त्रे वापरून पुरुषी व्यवस्थे विषयीचा आपला संताप व विरोध प्रकट करावा असेही तिने सूचित केले, तसेच स्वतःच्या लेखनात ही उपहासात्मक विडंबनाचा सूर आळवला.

अमेरिकन स्त्रीवादी समीक्षिका ॲलन शो वॉल्टर हिने स्त्रीवादी समीक्षेचे प्रारंभिक अवस्थेतील आद्य प्रारूप विकसित केले. इंग्रजी वाङ्मयातील उपेक्षित स्त्री लेखिका शोधून काढून त्यांना समीक्षेतून न्याय दिला. अठराव्या शतकातील ब्रिटिश स्त्री-

कादंबरीकारांच्या लेखन परंपरेचा अभ्यास करताना तिने समाजशास्त्रातील पोट संस्कृती व वर्चस्ववादी संस्कृतीतील संबंध – रूपाचा आधार घेतला. ब्रिटिश स्त्री-कादंबरीकारांच्या लेखनातून तिला जे तीन प्रवाह दृष्टोत्पत्तीस आले, त्यांचे तिने तीन टप्प्यांत वर्गीकरण केले. केवळ स्त्रियांनी केलेले लेखन (फीमेल); पुरुषसत्ताक समाजात गौणत्व स्वीकारून जगणाऱ्या स्त्रियांनी त्याबद्दल राजकीय भूमिका न घेता केलेले लेखन (फेमिनिन) आणि पुरुषसत्ताक वा लिंगवादी समाज व विचारसरणी यांच्या विरुद्ध ठाम राजकीय दृष्टिकोण स्वीकारून स्त्रियांनी केलेले लेखन (फेमिनिस्ट) असे या तीन टप्प्यांचे स्वरूप तिने विशद केले.

स्त्रीची विशिष्ट अशी संस्कृती असते. स्त्रियांच्या लेखनातून — त्यांच्या आगळ्या वेगळ्या पृथगात्म अनुभव चित्रणातून त्यांचे आशय - विषय, वाङ्मयीन रूपबंध, आविष्कार - रीती, शैली, भाषा इ. वाङ्मयीन घटकांतून — ही स्त्री-संस्कृती वेगवेगळ्या रूपांत प्रकटत असते. स्त्रीवादी समीक्षा स्त्रियांच्या साहित्याचा जीवशास्त्रीय, भाषिक, मानसशास्त्रीय, सांस्कृतिक अशा वेगवेगळ्या दृष्टि-कोणांतून वेध घेऊन त्यातील वेगळेपण अधोरेखित करते. स्त्रियांच्या लेखनाचा असा वेगळा स्वतंत्र विचार करणाऱ्या समीक्षेला ॲलन शो वॉल्टरने' गायनो सेंट्रिक फेमिनिस्ट क्रिटिसिझम' व समीक्षकाला 'गायनो क्रिटिक' (स्त्री-समीक्षक) असे संबोधिले आहे. स्त्रीवादी समीक्षेचा 'वाचक स्त्री' (वुमन ॲजअरीडर) असा वेगळा घटक ही तिने मानला आहे.

स्त्रीवादी भूमिकेतून स्त्रियांच्या लेखन परंपरेचा इतिहास सिद्ध करण्याचे जे प्रयत्न झाले, त्यांतून एक 'स्त्री केंद्री' साहित्य प्रवाह निर्माण झाला. ॲलन मोअर्सचे लिटररी विमेन (१९७६), ॲलन शो वॉल्टरचे अलिटरेचर ऑफ दे अरओन (१९७७) आणि सँड्रा गिल्बर्ट आणि सूसान ग्यूबर यांचे द मॅड-वुमन इन द ॲटिक : द वुमन रायटर अँड दना इन्टीन्थसेंचरी लिटररी इमॅजिनेशन (१९७९) यातीन पुस्तकांतून प्रामुख्याने ह्या स्त्री केंद्री साहित्य प्रवाहाचे दर्शन घडते. स्त्रीवादी लेखन परंपरा निर्माण करून, स्त्रियांमध्ये 'भगिनी भाव' निर्माण करून, पुरुष प्रधान संरचनेला हा दर वून टाकण्याचा हा राजकीय प्रयत्न आहे.

सँड्रा गिल्बर्ट वसूसानग्यूबर यांनी द मॅड वुमन इन द ॲटिक : द वुमन रायटर अँड दनाइन्टीन्थ सेंचरी लिटररी इमॅजिनेशन या ग्रंथात एकोणिसाव्या शतकातील लेखिकांच्या साहित्याचे विश्लेषण करून स्त्रीवादी काव्य-शास्त्राची (फेमिनिस्ट पोएटिक्स) मांडणी करणारे विवेचन केले. पुरुषांनी साहित्याच्या क्षेत्रामध्ये दडपशाही करून स्त्रियांची मुस्कटदाबी केली आहे. या पुरुषी अत्याचाराला स्त्रियांकडून विविध प्रकारच्या प्रतिक्रिया मिळाल्या आहेत. या प्रतिक्रिया व त्यामागची मानसिक प्रक्रिया समजून घेण्यासाठी तार्किक अनुबंध (मॉडेल) तयार करणे, हे स्त्रीवादी काव्य शास्त्राचे प्रमुख उद्दिष्टया लेखिकांनी मानले. गिल्बर्ट वग्यूबर यांना इंग्रजी लेखिकांच्या साहित्य कृतींत दबलेल्या रागाचा स्फोट करणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा बऱ्याच आढळल्या मॅड वुमन 'म्हणजे विद्रोह करणारी, उद्वेगाने सर्व उद्ध्वस्त करायला निघालेली स्त्री. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत उपेक्षित व एकाकी अवस्थेत जगणाऱ्या व शेवटी संतप्त होऊन स्वतःलाच पेटवून घेणाऱ्या स्त्रिया किंवा घरे, प्रार्थना स्थळे मोडून-तोडून टाकायला निघालेल्या स्त्रिया ही' मॅडवुमन ' ची रूपे केवळ स्त्रीवादी साहित्यातच दिसतात, असे गिल्बर्ट—ग्यूबर यांचे प्रतिपादन आहे. लेखिका बनू पाहणाऱ्या स्त्रीला एकोणिसाव्या शतकातील पितृसत्ताक व पुरुषप्रधान समाज चौकटीमध्ये वेडसर मानले जाई, असा त्यांचा दावा होता. त्यादृष्टीने त्यांनी पुस्तकाला दिलेले शीर्षक मॅडवुमन इन द ॲटिक ..... (पोट माळयावरील वेडी) हे पुरुषप्रधान समाज व्यवस्थेतील स्त्रियांचे उपेक्षित दुय्यम स्थान वसंतप्त विद्रोहयांचे प्रतीक ठरते.

पाश्चात्त्य देशांत स्त्रीमुक्ती चळवळ वेगाने फोफावली व तिचाच एक भाग असलेली स्त्रीवादी साहित्य समीक्षा वेगवेगळ्या अंगोपांगांवर भर देत विकास पावली. उदा. इंग्रजी स्त्रीवादी समीक्षेने स्त्रियांच्या शोषणावर भर देऊन मार्क्सवादी दृष्टिकोण स्वीकारला. फ्रेंच स्त्रीवादी समीक्षेने विरचनावादी पद्धती स्वीकारून मुख्यत्वे भाषिक अंगाने स्त्रीवादी साहित्याचा वेध घेतला; तसेच मानस शास्त्रीय भूमिकेतून स्त्रीवादी साहित्यातून प्रकटणाऱ्या स्त्रीच्या मानसिक कोंडमाऱ्याचे, परवशतेचे विश्लेषण केले. अमेरिकन स्त्रीवादी समीक्षेने पाठ चिकित्सक पद्धतीवर भर देऊन स्त्रियांच्या वाङ्मयीन आविष्कारांचा शोध घेतला. हे सर्वप्रकार स्त्री साहित्याचा स्त्रीवादी भूमिकेतून अभ्यास करणारे आहेत. केटमिले, बेट्टीफ्रीडन, जर्मेनग्री अरया

लेखिकांनी समाजातील सांस्कृतिक घटकांचा अन्वयार्थ लावून समकालीन सामाजिक स्थितीतील स्त्रियांच्या सांस्कृतिक कुचंबणेचा व दडपणुकीचा अर्थ स्पष्ट केला, पुरुषप्रधान व पितृसत्ताक व्यवस्थेचे त्या मागचे राजकारण स्पष्ट केले आणि ही पुरुषी सांस्कृतिक दडपशाही नष्ट करण्यासाठी स्त्रीवादी समीक्षेची आवश्यकता प्रतिपादन केली.

इंग्लंडमध्ये मेरी वुलस्टोन क्राफ्ट (१७५९—९७)हिने थॉट्स ऑन द एज्युकेशन ऑफ डॉटर्स (१७८७) आणि अव्हिंडिकेशन ऑफ दराइट्स ऑफविमेन (१७९२) ही पुस्तके तसेच मेरी : अफिक्शन (१७८८) ही कादंबरी लिहून शैक्षणिक व सामाजिक पातळीवर स्त्री-पुरुष समतेचे तत्त्व प्रतिपादन केले. मेरी वुलस्टोन क्राफ्ट-पासून बेट्टी फ्रीडन (१९६०चे दशक)पर्यंतच्या स्त्रीवादी चळवळीच्या मागण्यांना उदारमतवादी बैठक आहे. बेट्टी फ्रीडनचे फेमिनिन मिस्टिक (१९६३; 'स्त्री भावाचे गूढ') हे पुस्तक नव्या स्त्रीवादी चळवळी साठी पायाभूत मानले जाते. १९७० सालापर्यंत ही चळवळ स्थिरावली. केटमिलेटच्या सेक्शुअल पॉलिटिक्स (१९७७ 'लैंगिकतेचे राजकारण') या पुस्तकात मान्यवर पुरुष लेखकांच्या साहित्य कृतींतून स्त्री प्रतिमांचे साचे बद्ध, सांकेतिक चित्रण कसे केले जाते, ह्याचे धारदार विश्लेषण केले आहे. हे पुस्तक जहाल स्त्रीवादी विचारसरणीचा प्रारंभ बिंदू मानले जाते. ज मेंनग्रीअरचे द फीमेलयूनक हे पुस्तक ही सामाजिक-सांस्कृतिक स्त्रीवादी समीक्षेच्या संदर्भात महत्त्वाचे मानले जाते.

स्त्रीवादी फ्रेंच लेखिका जुलिया क्रिस्तेवा (१९४१) हिच्या मते बाई किंवा स्त्रीया शब्दाची रूढ व्याख्या स्वीकारणे आणि आपण बाई किंवा पुरुष आहोत हे मान्य करणे, ह्यातच एक प्रकारची अर्थशून्य विसंगती (अॅब्सर्डिटी) आहे. स्त्रियांचे स्थान परिघावर असते, अशी मांडणी पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेच्या आधारेच केली जाते; म्हणून ही मूल्यव्यवस्था उलथवून टाकण्याचे प्रयत्न करणारे साहित्यच स्त्रीवादी साहित्य मानले पाहिजे, अशी टोकाची आग्रही भूमिका घेतली जाते. क्रिस्तेववादी विचारसरणीनुसार अस्मिता व अस्मितेचे राजकारण हे संशयास्पद आहे. मूलतः बाईपणा व त्यातून लिहिले गेलेले साहित्य असे काही नसतेच. क्रिस्तेवाने मुलाच्या भाषापूर्व अवस्थेत आईवर पूर्णपणे निर्भर असण्याच्या टप्प्याला 'सेमिऑटिक' (अव्यक्त) भाषा आणि नंतरच्या समाजात तो मिसळल्यानंतरच्या टप्प्याला 'सिंबॉलिक' (व्यक्त) भाषा अशा संज्ञा वापरल्या आहेत. या संकल्पना तिने व्यक्तिमत्त्वाशी जोडल्या आहेत. सेमि ऑटिकचा संबंध स्त्री-व्यक्तिमत्त्वाशी व मातृत्वाशी असतो, तर सिंबॉलिकचा संबंध पितृत्वाशी, जाणिवेशी, दमनाशी असतो. क्रिस्तेवाच्या मते स्वतःचे वेगळे अस्तित्व जोपासणाऱ्या स्त्रिया सिंबॉलिक-सेमिऑटिक भाषेचा समन्वय साधतात; पण ज्यांना सेमिऑटिक भाषाच (किंवा अंतर्मनाची साद) महत्त्वाची वाटते, त्यावेगळा मातृसत्ताक समाज निर्माण करण्याचा आग्रह धरतात. साहित्याच्या भाषेचे रूपच सेमिऑटिक प्रेरणांसाठी योग्य ठरत असल्याने त्या व्यक्त करताना पुरुषांपेक्षा स्त्रियाच अधिक भावनोत्कट होण्याची शक्यता असते, असे क्रिस्तेवा म्हणते. 'आंतर-संहितात्मकता' (इंटरटेक्श्चुॲलिटी) ही संज्ञा वापरून क्रिस्तेवा सुचवते, की 'सिंबॉलिक' आणि 'सेमिऑटिक' अशा दोन्ही रचनांचा, भाषांचा वापर स्त्रियांनी तारतम्याने केला पाहिजे.

विशेषतः आत्मटीकेची किंवा उपहासाची भाषा लेखिका त्यासाठी वापरू शकतात. भावना तिरेका-पेक्षा स्त्रियांच्या साहित्यात उपरोध, विडंबन, विषाद गर्भ विनोद(ब्लॅकह्यूम) यावा, असे क्रिस्तेवा सुचवते. थोडक्यात, समाजातील माणसांशी जुळवून घ्यायची, समाजाच्या नीतिनियमांची भाषाही सिंबॉलिक; तर स्त्रीची एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःच्या मनाची, शरीराची भाषा ही सेमिऑटिक; अशा प्रकारचे भाषिक प्रतिमान क्रिस्तेवा नेस्त्री वादी साहित्याच्या संदर्भात सुचवले आहे व या दोन्ही भाषांचा समन्वय स्त्रीवादी साहित्यात साधला जावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

स्त्री जातीवर झालेल्या जुलूमाच्या कारणांची मीमांसा करताना व स्त्रीवरील अन्यायाचा परिहार करण्याचे उपाय सुचविताना स्त्रीवादी विचारवंतांनी विविध दृष्टिकोण स्वीकारले आहेत, त्यामुळे स्त्रीवादी विचारसरणींचे विविध प्रवाह निर्माण झाले. त्यांची मांडणी करून या प्रवाहांचे वर्गीकरण ही गेलयेट्स, ॲलिसन या गरवजॉन शॉर्वेट या स्त्रीवादी विचारवंतांनी केले आहे. यांतील काही प्रमुख प्रवाह असे: उदारमतवादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद,

समाजवादी स्त्रीवाद आणि कृष्णवर्णीय स्त्रीवाद. ह्या विविध स्त्रीवादी प्रवाहांचे प्रतिबिंब स्त्रीवादी साहित्य व समीक्षेत वेळोवेळी उमटले आहे. त्यांपैकी उदारमतवादी व जहाल स्त्रीवादी विचारधारां विषयीचे विवेचन आधी येऊन गेलेच आहे. मार्क्सवादी स्त्रीवाद जगातल्या सर्व कामगारां प्रमाणेच स्त्रियांनी ही एकत्र यावे, असे आवाहन करतो.

'भगिनी-भाव' ही संकल्पना मार्क्सवादी, समाजवादी स्त्रीवादातून आली आहे. भगिनी भावाचा पुरस्कार अनेक स्त्रीवादी साहित्य कृतींत आढळतो. कृष्णवर्णीय स्त्रीवादी जाणीव यूरोप-अमेरिकेत १९७० च्या दशकाखेरीस विकसित होऊ लागली. गौर स्त्रीवादी जाणीव कृष्णवर्णीय स्त्रीला सामावून घेऊ शकत नाही, या अभावात्मक धारणेतून कृष्णवर्णीय स्त्रीवाद विकसित झाला. कृष्णवर्णीय स्त्री ही वंश, वर्ग व लिंग भाव या तिन्हींचा बळी आहे; हे भान ठेवूनलिंग भावा विरुद्ध लढताना वंशवाद निपटून टाकण्यासाठी ही लढले पाहिजे, असे या विचारसरणीचे सार आहे. मराठी साहित्यातील दलित स्त्रीवादी जाणिवेचा प्रवाह ही असाच विविध पातळयांवरील विषमते विरुद्धच्या संघर्षातून विकसित होताना दिसतो आहे. या सैद्धांतिक पार्श्वभूमीवर 'भारतीय स्त्रीवाद' अशी वेगळी संकल्पना विकसित करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

आज पाश्चात्त्य देशांतील स्त्रिया कलावंत म्हणून आपल्या बाईपणातून वेगळे शहाणपण, आत्मशक्ती गवसल्याचा दावा करीत आहेत. त्यात 'कृष्णवंशीय' स्त्रियांच्या लेखनाने फार मोलाची भर घातली आहे.

भारतातील स्त्री-लेखनाची परंपरा जाणीव पूर्वक एकत्र आणून, भारतीय स्त्रियांच्या लेखनाचा इतिहास निर्माण करण्याचा स्त्रीवादी प्रयत्न विमेनराय टिंग इन इंडिया; ६०० बी. सी. टू द प्रेझेंट; खंड१ व२ (१९९२-९३) या ग्रंथाने केला. विविध कालखंडांत स्त्रियांनी लिहिलेले तेरा भारतीय भाषांतील १४० साहित्यिकवेचे त्यात आहेत. त्यातून अगदी बुद्ध कालीन थेरीगाथां पासून भक्ति काळातील स्त्रियांचे लेखन, आधुनिक काळातील स्त्रियांची चरित्रे, आत्मचरित्रे व वर्तमान कालीन बंडखोर लेखन एकत्र सापडते. प्रस्थापित पुरुष प्रधान मूल्य व्यवस्थेचा प्रतिकार करणारे वा ती उलथवून टाकण्याची शक्यता व शक्ती दाखवून देणारे विपुल व वैविध्यपूर्ण स्त्री-साहित्य भारतीय भाषांमध्ये दिसते.

स्त्रीलिखित कथनात्म साहित्यातील स्त्रीप्रतिमा

प्रा. डॉ. शीतल पावसकर-भोसले

सेवा सदनचे आर. के. तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर ३

मराठीतील साहित्यनिर्मितीप्रक्रियेचे भौगोलिक, सामाजिक केंद्र खऱ्या अर्थाने विकेंद्रित होण्याची प्रक्रिया साधारणपणे १९६० च्या आसपास सुरू झालेली दिसते. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीकेंद्री/स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, भटक्या-विमुक्तांचे साहित्य, अल्पसंख्याक गटांचे साहित्य (मुस्लीम, ख्रिस्ती, जैन) इत्यादी साहित्यप्रवाहांची निर्मिती हा याच प्रक्रियेचा अपरिहार्य भाग आहे. या सर्वच साहित्यप्रवाहात पुरुषलेखकांचे अस्तित्व अधिक ठसठशीत आहे. असे असले तरी स्त्रीलेखकांनीही प्रामुख्याने कविता, कथा, आत्मकथन या साहित्यप्रकारांच्या माध्यमातून स्वसमाज, अपवादात्मक प्रसंगी स्वेतर समाज आणि संस्कृतीतील स्त्रीच्या अनुभवविश्वाचे, स्त्रीच्या प्रश्नांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय संदर्भांचे अधोरेखन करण्याचा मौलिक प्रयत्न केला आहे. वास्तविक पाहता, मराठी साहित्याच्या संदर्भातील स्त्रीलिखित साहित्याचे योगदान समजून घेण्यासाठी, या साहित्यातून साकारणाऱ्या अवकाशाचा, आशयसूत्रांचा, स्त्रीलेखकांनी आकृतिबंधाच्या पातळीवर केलेल्या प्रयोगांचा, वापरलेल्या भाषेचा विविध समीक्षादृष्टींच्या आधारे वेध घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत निबंधात इ.स. १९८० नंतरच्या स्त्रीलिखित कथनात्म साहित्यातून साकार झालेल्या स्त्रीप्रतिमा, या प्रतिमांचा सामाजिक, सांस्कृतिक आशय आणि त्यामागील स्त्रीलेखकांची मूल्यदृष्टी ही संदर्भचौकट गृहीत धरून विवेचन केले जाणार आहे. इ.स. १९७०च्या आसपास अमेरिकेत स्त्रीवादी समीक्षाविचारात अग्रक्रमाने अधोरेखित केल्या गेलेल्या 'साहित्यातील स्त्रीप्रतिमेचा अभ्यास' या राजकीय विचारसूत्राचे अधिष्ठान या मांडणीला असणार आहे.

स्त्रीलिखित मराठी कथनात्म साहित्याचाभौगोलिक अवकाश हा प्रामुख्याने महानगराशी संबंधित असलेला दिसतो, तर या साहित्याचा सामाजिक अवकाश मध्यमवर्गीय, (काही वेळा) उच्चमध्यमवर्गीय आणिउच्चजातगटातील कुटुंबलक्ष्यी व स्त्रीकेंद्री अनुभवविश्व यांनी भारलेला दिसतो. पुरुषसत्ताक व्यवस्थेतील विवाह आणि कुटुंबसंस्थेच्या परिघात निर्माण होणारे, घडविले जाणारे स्त्रीपुरुषांचे नाते, त्यानुषंगाने स्त्री-पुरुषांच्या वाट्याला येणाऱ्या समाजनियत कौटुंबिक भूमिका, परिणामी स्त्रीच्या वाट्याला येणारे दुय्यम स्थान (The Other) ही महानगरातील स्त्रीकथाकारांच्या – स्त्रीकादंबरीकारांच्या साहित्यगत अनुभवविश्वाची सामाजिक चौकट असलेली दिसते. स्वाभाविकच, लिंगभेदजन्य राजकारणामुळे स्त्रियांच्या वाट्याला येणारी अवहेलना, वंचितता, साधनात्मक मूल्य अधोरेखित करणाऱ्या स्त्रीप्रतिमांचा रूपबंध हा स्त्रीलिखित साहित्याचा महत्त्वाचा संदर्भबिंदू आहे. उदाहरणार्थ,*निर्णय* (नीरजा), *पावसाळ्यातला चंद्र* (प्रतिभा कणेकर) या कथांमधून आणि *उगम* सारख्या (मोनिका गजेंद्रगडकर) कादंबरीतून मुल होऊ न शकणाऱ्या स्त्रीची विसकटलेली, न्यूनगंडयुक्त मानसिकता त्यामागील विषमभावी सामाजिक धारणांसह साकार झाली आहे. लैंगिक स्वातंत्र्याची पुरुषकेंद्री कल्पना आणि याचा अपरिहार्य भाग म्हणून नवऱ्याच्या विवाहबाह्य संबंधामुळे स्त्रीच्या वाट्याला येणारी अवहेलना, दुःख*भिन्न* (कविता महाजन), *उगम* (मोनिका गजेंद्रगडकर) या कादंबऱ्यांमधून आणि *शरीर* (मोनिका गजेंद्रगडकर), *दोघी* (नीरजा) या कथांमधून अधोरेखित करण्यात आले आहे. पुरुषसत्ताक व्यवस्थेतील लिंगभेदाधिष्ठित श्रमविभागणीमुळेउच्चशिक्षित विवाहित स्त्रीला कुटुंब आणि नोकरी या दोन्ही स्तरांवर स्वतःची ऊर्जा खर्च करावी लागते. यामुळेतिची घुसमट, दमवणूक होते तसेच तिच्या कर्तृत्वाला आपसूक मर्यादा पडतात. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतून स्त्रीला उपलब्ध झालेल्या अधिकच्या संधी पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या मूळ ढाच्यामध्ये मूलभूत बदल घडवून आणू शकल्या नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. स्वाभाविकच, कोणतेही 'विनिमय मूल्य' नसलेल्या, 'अनुत्पादक' मानल्या जाणाऱ्या घराच्या आतील जबाबदाऱ्या आणि स्वतःची क्षमता सिद्ध करण्यासाठी स्वीकाराव्या लागणाऱ्या घराबाहेरील जबाबदाऱ्या यांच्या जीवघेण्या कचाट्यात सापडलेली स्त्री हे समकालीन स्त्रीच्या जगण्यातील धगधगते वास्तव आहे. *भिन्न* कादंबरीतील लोकल ट्रेनमधून प्रवास करणाऱ्या स्त्रीपात्रांचे संवाद आणि त्यासंदर्भातील भाष्ययुक्त निवेदन या दृष्टीने विशेष लक्षणीय आहे. *निर्णय*(नीरजा), *समिधा*(प्रतिमा कणेकर)या कथांमधूनही जबाबदाऱ्यांच्या द्वंद्वात सापडलेल्या स्त्रीपात्रांचा अनेक पातळ्यांवरील कोंडमारा चित्रित करण्यात आला आहे.

पुरुषसत्ताक व्यवस्थेने निर्मिलेल्या आणि रुजविलेल्या 'आईपणा'च्या मिथकाचे पुनर्वाचन करीत कथाविश्वाची उभारणी या काळातील काही स्त्रीकथाकारांनी-स्त्रीकादंबरीकारांनी केली आहे.उदाहरणार्थ,*पाऊस आला मोठा, एकेक पान गळावया* (गौरी देशपांडे) *कोल्ह्याचं लगीन, समुद्री चहूकडे पाणी*(मेघना पेठे), *संक्रमण* (मोनिका गजेन्द्रगडकर),*ओल हरवलेली माती* (नीरजा) या कथांमधून पुरुषसत्ताक व्यवस्थेने 'आईपणा'च्या केलेल्या गौरवीकरणाचा दंभस्फोट केला आहे. 'मातृत्व' संकल्पनेचा, त्याच्याशी जोडल्या गेलेल्या 'जैविक माता' आणि 'संगोपनमाता' या संदर्भांचा, समाजमान्य मातृत्व आणि तथाकथित अनैतिक संबंधांतून प्राप्त झालेलं किंवा बलात्कारासारख्या अपघातातून लादलेलं मातृत्व, स्त्रीच्या व्यक्ती म्हणून असू शकणाऱ्या अस्तित्वाला अस्थिर करण्यासाठी अत्यंत धूर्तपणे वापरण्यात आलेलं मातृत्व (उगम – मोनिका गजेंद्रगडकर) किंवा काही वेळा विशिष्ट हेतूंनी लादलेलं किंवा नाकारलेलं मातृत्व (अनुक्रमे महिषासूरमर्दिनी – नीरजा आणि निर्वाणाची स्वगते- वंदना महाजन) अशा कितीतरी संदर्भांभोवती फिरणाऱ्या स्त्रीप्रतिमा स्त्रीलिखित कथनात्म साहित्यातून साकार झालेल्या दिसतात.

जैविक पातळीवर स्त्रीला लाभलेल्या विशिष्ट देहामुळे तिला येणारे देहविशिष्ट अनुभव अर्थात 'स्त्रीविशिष्ट अनुभव' (Female experience) हा स्त्रीलिखित कथनात्म साहित्याचा एक महत्त्वाचा विशेष आहे. स्वाभाविकच, विविध स्त्रीविशिष्ट अनुभव जगणाऱ्या स्त्रीप्रतिमांची संरचना स्त्रीलिखित कथनात्म साहित्यात अधिक प्रमाणात झालेली दिसते. *देह मृत्याचे भातुकेवैदेही* (विजया राजाध्यक्ष), *ओटी* (सुनीती आफळे) या कथांमधील स्त्रीप्रतिमा या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. १९९०नंतरच्या स्त्रीकथाकरांनीही आपल्या कथाविश्वातून पाळी येणे (हळवं वय- प्रतिभा कणेकर, छाया-माया-काया - मेघना पेठे), पाळी जाणे (सत्यकाम जाबाली - प्रतिमा जोशी, ओल हरवलेली माती - नीरजा), गर्भारपण (सत्यकाम जाबाली - प्रतिमा जोशी, उगवतीची संध्याकाळ - प्रतिभा कणेकर, अभिमन्यू - सिसिलिया कार्व्हालो), गर्भपात (निर्णय - नीरजा, पावसाळ्यातला चंद्र – प्रतिभा कणेकर), बाळंतपण (उगवतीची संध्याकाळ - प्रतिभा कणेकर) आदी स्त्रीविशिष्ट अनुभव साकार केले आहेत. स्त्रीविशिष्ट अनुभव हा विशिष्ट देहचौकटीच्या माध्यमातून घेता येत असला तरी या अनुभवाची संदर्भचौकट पुरुषसत्ताक व्यवस्थेने प्रसृत केलेल्या मूल्यधारणांशी प्रामुख्याने संबंधित असते. *निर्णय*(नीरजा) कथेतील विनिता, *उगम* (मोनिका गजेंद्रगडकर) कादंबरीतील काजलभाभी तसेच दोन महिन्यांच्या मुलाला चर्चसमोर ठेवून गेलेली निनावी स्त्री या आणि अशा काही स्त्रीप्रतिमांचा अपवाद करता,बहुतांश स्त्रीप्रतिमास्त्रीविशिष्ट अनुभवाकडे पारंपरिक मूल्यदृष्टीतून पाहताना दिसतात.

स्त्रीलिखित कथनात्म साहित्यातील आशयसूत्रे आणि विषय यांचा धांडोळा घेतला तर, कुटुंबसंस्थेचा खाजगी अवकाश आणि त्यातील सत्तासंबंधांचे राजकारण हे केंद्रवर्ती सूत्र पुनरावृत्त होताना दिसते. 'वस्तुतः सामाजिक -राजकीय दृष्टिकोणातून स्त्रीवादामध्ये अनेक जहाल गोष्टी आहेत आणि त्यांच्या आस्थेच्या कक्षेत समग्र समाज येऊ शकतो. स्त्रियांनी केलेले मराठीतले कादंबरीलेखन या रीतीने व्यापक होताना दिसत नाही. स्त्री-पुरुष संबंध आणि कुटुंबसंस्था यांच्यापलीकडे ते जाताना दिसत नाही.' (थोरात२०१८ : ७५) हे मत यादृष्टीने अन्वर्थक ठरते. या पार्श्वभूमीवर मध्यमवर्गीय कुटुंबकेंद्री अनुभवविश्वाच्या पलीकडे जाऊन स्त्रीप्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न प्रतिमा जोशी, आशराबी शिकलगार, मथु सावंत आणि उषाकिरण आत्राम या कथाकारांनी केलेला दिसतो. प्रतिमा जोशींनी देहविक्री करणे अपरिहार्य ठरलेल्या स्त्रीला तिच्या भवतालासह कथेच्या केंद्रस्थानी आणल्यामुळे त्यांच्या कथांमधील स्त्रीप्रतिमांना (विविध जात, वर्ग, धर्मातील देहविक्रय करणाऱ्या स्त्रीप्रतिमा, देहविक्रय करणाऱ्या स्त्रीच्या कुटुंबातील स्त्रीप्रतिमा, घरवालीच्या भूमिकेतील स्त्रीप्रतिमा, विविध एन. जी. ओ.च्या माध्यमातून समाजसुधारणा करणाऱ्या/ करण्याचे अवसान आणणाऱ्या स्त्रीप्रतिमा इत्यादी.) केवळ १९९०नंतरच्याच नव्हे तर, एकूण स्त्री-पुरुषलिखित मराठी कथेत समाजशास्त्रीय दृष्टीने महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. प्रतिमा जोशी यांच्या*सत्यकाम जाबाली, तेरावी गल्ली,जहन्नम, नग्न सत्य, दरी*या कथांमधील स्त्रीप्रतिमा या दृष्टीने नोंद घेण्याजोग्या आहेत. कविता महाजन यांच्या *भिन्न* कादंबरीतही देहविक्रय करणाऱ्या स्त्रीप्रतिमांच्या माध्यमातून पुरुषसत्ताक व्यवस्थेची लैंगिकतेच्या संदर्भातील स्वहितसंबंधाच्या रक्षणासाठी खेळली गेलेली द्विध्रुवात्मक खेळी स्पष्टपणे पृष्ठपातळीवर येते. वेश्यावस्तीच्या पलीकडे स्त्रीदेहाचा विविध कारणांसाठी विक्रय करणाऱ्या स्त्रियांचे विश्व *दरी, वितळलेली उन्हे* (प्रतिमा जोशी), *समुद्री चहूकडे पाणी* (मेघना पेठे), *आईच्या नावानं* (प्रज्ञा दया पवार) या कथांमधील स्त्रीपात्रांच्या माध्यमातून साकार झाले आहे.

उपरोक्त विवेचनावरून महानगरीय अवकाश केंद्रस्थानी ठेवून स्त्रीप्रश्न हाताळणारी स्त्रीलिखित कथा आणि कादंबरी प्रामुख्याने कुटुंबांतर्गत पुरुषसत्तेशी संबंधित प्रश्नांना वाचा फोडते, ही बाब स्पष्टपणे पुढे येते. वास्तविक पाहता, आधुनिक भांडवली व्यवस्थेने स्त्रीच्या आर्थिक स्वावलंबनासाठी खुला करून दिलेला सामाजिक अवकाश आर्थिक उदारीकरण स्वीकारल्यानंतरच्या काळात अधिक विस्तृत झाला आहे. असे असताना शिक्षक,प्राध्यापक, डॉक्टर, लिपिकआदी व्यावसायिक भूमिकेतील स्त्रीप्रतिमाच स्त्रीलिखित आणि पुरुषलिखित साहित्यातून सातत्याने रंगविल्या जातात, ही बाब अधोरेखित करणे आवश्यक ठरते. या संदर्भातील दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की,उच्चशिक्षित आणि प्रतिष्ठित व्यवसायांशी संबंधित स्त्रीप्रतिमा असणाऱ्या कथांचे अनुभवविश्वही प्रामुख्याने कुटुंबकेंद्रीच राहिलेले दिसते. घर-नोकरी या दोन स्तरांवर स्वतःला सिद्ध करताना स्त्रीची होणारी कुतरओढ, दमछाक तसेच एक 'स्त्री' म्हणून तिच्या अनुभवाचा भाग होऊ शकणारे व्यवसायांतर्गत पुरुषसत्ताक राजकारण १९९०नंतरच्या स्त्रीकथाकार-कादंबरीकारांच्या अनुक्रमे कथेचे आणि कादंबरीचे केंद्रवर्ती सूत्र म्हणून केवळ अपवादानेच येते. स्त्रीलिखित कथनात्म साहित्यातील स्त्रीच्या'साचेबद्ध प्रतिमे'चे (Stereotyped Image) स्वरूप या पार्श्वभूमीवर तपासून पाहता येणे शक्य आहे.

वि-हार (प्रज्ञा दया पवार), *धर्म* (मोनिका गजेंद्रगडकर), *धानाधिस्पट* (प्रतिमा जोशी) या कथांमधून आंतरधर्मीय विवाह या विषयसूत्राच्या निमित्ताने धर्म आणि स्त्री, समाज आणि स्त्री, धर्माचं मानवी जीवनातील स्थान, धर्माशी संबंधित सांस्कृतिक व लिंगभेदजन्य राजकारण आदी मुद्द्यांना अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. मुस्लीम समाजातील स्त्रीचे मर्यादित आणि व्यापक संदर्भातील प्रश्न अनक्रमे*ओल हरवलेलीमाती* (नीरजा), *श्रद्धा, शरीर* (मोनिका गजेंद्रगडकर) आणि*अलविदा* (सिसिलिया कार्व्हालो) या कथांमधून व्यक्त झाले आहेत.तसेच सिसिलिया कार्व्हालो यांनी आपल्या कथांमधून आणि मोनिका गजेंद्रगडकर यांनी *उगम* कादंबरीच्या माध्यमातून ख्रिस्ती धर्मातील स्त्रियांच्या जगण्याचे विविध संदर्भ, त्यातील आंतरिक ताण्याबाण्यांसह पृष्ठपातळीवर आणले आहेत.

एकूण मानवी नातेसंबंधातील व्यामिश्रता त्यातील सूक्ष्म आंदोलनांसह व्यक्त करणारी कथासूत्रे या काळातील अपवादात्मक स्त्रीलिखित कथेतून आणि कादंबऱ्यांतून साकार झाली आहेत. कलावंताची निर्मितीप्रक्रिया, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण, कलावंतांची श्रेयस-प्रेयसाची कल्पना, कलांतर्गत राजकारण आणि त्यातून निर्माण होणारी नात्याची, भावनांची गुंतागुत आदी विषयांना आणि अनुषंगाने वेगळ्या अनुभवविश्वाला साकार करण्याचे श्रेय*शिल्प, आधार, जन्म* (मोनिका गजेंद्रगडकर) व *मूर्ती, परकाया प्रवेश, गोष्टीची गोष्ट* (मलिका अमरशेख) या कथांकडे जाते. *उगम* (मोनिका गजेंद्रगडकर) कादंबरीतील काजलभाभी, गुरू माँ, अमि या स्त्रीप्रतिमांची त्यांच्या कलेच्या प्रती असलेली अजोड निष्ठा यासंदर्भात विशेष लक्षात घेण्याजोगी आहे.

आशराबी शिकलगार, मथु सावंत, सिसिलिया कार्व्हालो या कथाकारांनी ग्रामीण, निमशहरी भागातील मध्यम, निम्न जातगटातील स्त्रीचे प्रश्न तर उषाकिरण आत्राम यांनी गोंडसमाजातील स्त्रीचे प्रश्न कथेच्या केंद्रस्थानी आणले आहेत. आधुनिक पाणीव्यवस्थापनातील अन्याय व्यक्त करणारी, गर्भार नागम्माचा पाणी भरताना मृत्यू झालेला दाखविणारी*पाणबळी* (मथु सावंत) कथा ग्रामीण जीवनातील वंचिततेचे संदर्भ स्त्रीशोषणाच्या अनेकानेक शक्यतांसह व्यक्त करते. सानिया यांच्या *दुष्काळ* कथेतील स्त्रीप्रतिमांचा पाण्याच्या अपव्ययासंबंधीचा दृष्टिकोन, कंबरेवरून, डोक्यावरून पाण्याचे हंडे वाहून घेऊन जाणाऱ्या स्त्रियांचे चित्र आणि त्यामागील सामाजिक शोषणाचे संदर्भ या दृष्टीने अन्वर्थक आहेत. *पैज* (आशराबी शिकलगार) कथा तमाशात काम करणाऱ्या स्त्रीच्या आयुष्यातील भोगवटा त्यामागील सरंजामी व्यवस्थेसह अधोरेखित करते. स्त्रीलेखकांच्या बदलत्या समाजशास्त्रीय संदर्भांमुळे शेतीमातीत / वंचित समाजात जगणाऱ्या स्त्रीपात्रांची उपस्थिती स्त्रीलिखित कथनात्म साहित्यात दृश्यमान होऊ लागलेली दिसते.

ग्रामीण स्त्रीजीवनातील अन्य प्रश्नांच्या बरोबरीने तिच्या वाट्याला येणारे लैंगिक शोषण हे अनेक कथांचे मध्यवर्ती सूत्र म्हणून साकार झाले आहे. मालकाकडून शेतमजुराच्या पत्नीचे किंवा शेतात मजूर म्हणून काम करणाऱ्या मजूर स्त्रीचे होणारे शोषण *सूड, वैरात रंगली कुऱ्हाड, श्रम* (आशराबी शिकलगार), *पाण्यातील पायवाट, बाईलेक* (मथु सावंत) या कथांमधून साकार झाले आहे. पेशवेकालीन समाजव्यवस्थेतील जमीनदार, देशमुख, महाजन वतनदार मंडळींनी अहेर प्रथेच्या माध्यमातून आदिवासी समाजातील नवविवाहितेशी शारीर संबंध ठेवण्याचा घेतलेला परवाना त्यामागील वर्गीय आणि

पुरुषसत्ताक सांस्कृतिक राजकारणासह उषाकिरण आत्राम यांच्या *अहेर*कथेत व्यक्त झाला आहे. मथु सावंत यांच्या *तिची वाटच वेगळी* या कथासंग्रहातील कथांमध्ये बदलत्या राजकीय संदर्भात ३३ टक्के आरक्षणामुळे राजकारणात आलेल्या महिलांच्या मनातील आणि जगण्यातील आंदोलने टिपण्याचा प्रयत्न झाला आहे. कुटुंबबाह्य पुरुषसत्ताक व्यवस्थेने राजकीय सत्ताकांक्षेच्या प्रेरणेतून स्त्रीचा केलेला साधनात्मक वापर *खेळ मांडियेला* (प्रिया तेंडुलकर) या कथेतील निवेदिता या स्त्रीप्रतिमेच्या माध्यमातून सक्षमपणे मुखर झाला आहे. याचा अर्थ ग्रामीण जीवनावकाश आपल्या कथेतून साकार करणाऱ्या स्त्रीकथाकारांनी जातसत्ता, वर्गसत्ता व पुरुषसत्ता यांच्या एकमेकांत गुतंलेल्या हितसंबंधी राजकारणातून स्त्रीचेकेले जाणारे शोषण अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. परिणामी, ग्रामीण, आदिवासी साहित्यप्रवाहातील स्त्रीकथाकारांच्या कथांमधून महानगरी स्त्रीलेखकांनी रंगविलेल्या स्त्रीप्रतिमांपेक्षा वेगळ्या स्त्रीप्रतिमा साकार झाल्या आहेत, असे म्हणता येते.

पुरुषसत्ताक व्यवस्थेची भेदनीती समजून घेण्यासाठी 'लिंग' (Sex) आणि 'लिंगधर्म' (Gender) या संकल्पना अत्यंत उपयुक्त ठरतात. नैसर्गिक 'भिन्न'तेला (Difference) 'भेदा'च्या (Discrimination) पातळीवर स्थिर करताना निर्माण झालेल्या 'स्त्रीत्व' (Femininity) आणि 'पुरुषत्व' (Muscularity) या मूल्यात्मक संकल्पना याच प्रक्रियेचे परिणत रूप आहे. लैंगिकतेकडे पुरुषसापेक्ष दृष्टिकोनातून पाहणारी पुरुषसत्ताक व्यवस्थेची मानसिकता स्त्रीदेहाकडे 'उपभोग्य वस्तू' म्हणून पाहते आणि पुरुषाला अर्थातच 'उपभोक्ता' म्हणून प्रस्थापित करते. स्त्रीच्या लैंगिकतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या योनिशुचिता आणि पातिव्रत्य या मूल्यचौकटी हे याच समूहमानसिकतेचे आविष्करण आहे. माणसाच्या नैसर्गिक कामप्रेरणेला संस्थात्मक नात्यात बंदिस्त करण्याचे प्रस्थापित व्यवस्थेचेहे डावपेचमेघना पेठे, नीरजा आणि प्रज्ञा पवार यांच्या काही कथांचे केंद्रवर्ती सूत्र आहे. *सत्यकाम जाबाली* (प्रतिमा जोशी), *शरीर*(मोनिका गजेंद्रगडकर), *आस्था आणि गवारीची कथा, समुद्री चहूकडे पाणी, छाया-माया-काया,एक एक दिवस 'स्ट्र'-चा...*, *कोल्हयाचं लगीन* (मेघना पेठे), *ओल हरवलेली माती, विटाळ*, *कन्फेशन*(नीरजा), *तिघाडा* (प्रज्ञा दया पवार) आदी कथांमधून साकार झालेल्या स्त्रीप्रतिमांची मानसिकता आणि त्यातील द्वंद्वात्मक गुंता यादृष्टीने विशेष लक्षणीय आहे. *भिन्न* (कविता महाजन) कादंबरीत लेडीज कंपार्टमेंटच्या अवकाशात मैत्रिणींच्या भूमिकेतील स्त्रीप्रतिमा आपल्या तृप्त- अतृप्त लैंगिक इच्छा आणि त्याच्याशी निगडित तपशिलांचा कधी थेट तर कधी आडूनआडून उच्चार करतात. स्वतःच्या लैंगिक इच्छा पूर्ण करण्यासाठी जीगेलोसारखा पर्याय अवलंबणारी *भिन्न*मधील लेनिना ही स्त्रीप्रतिमा जहाल स्त्रीवादी भूमिकेशी नातं सांगते. अंजली जोशी यांच्या *विरंगी मी! विमुक्त मी!*या कादंबरीत 'विनासंकोच हस्तमैथुन' ही संकल्पना त्याच्या विविध आयामांसह प्रत्यक्षात आणणारी बेटी डॉडसन या प्रत्यक्षातील बंडखोर स्त्रीच्या प्रतिमेचा चरित्रात्मक आधार घेत साकार होते. स्त्रीलैंगिकतेला इतक्या खुलेपणाने भिडण्याचा वास्तवदर्शी अवकाश मिळविण्याचा आग्रह धरणारी ही स्त्रीप्रतिमा स्त्रीलिखित कथनात्म साहित्याचा बंडखोर आवाज व्यक्त करते, याची नोंद होणे आवश्यक आहे.

लैंगिकतेचा आशय व्यक्त करताना स्त्रीच्या भाषिक अभिव्यक्तीचे प्रस्थापित व्यवस्थेने मानलेले प्रमाण रूपही काही स्त्रीकथाकारांनी/स्त्रीकादंबरीकारांनी नाकारलेले दिसते. मेघना पेठे, प्रतिमा जोशी, प्रज्ञा दया पवार, एखाद दुसऱ्या कथेच्या संदर्भात नीरजा व मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील स्त्रीपात्रे, काही वेळा निवेदकही भाषेचा मोकळाढाकळा वापर करतो. *छाया-माया-काया, एक दिवस 'स्ट्र'-चा..., समुद्री चहूकडे पाणी, तिघाडा, नग्न सत्य, जहन्नम, शरीर, आधार*आदी कथांतील आणि *नातिचरामि*, *भिन्न* या कादंबऱ्यांतील स्त्रीप्रतिमांच्या तोंडी असलेल्या मुक्त भाषेचा या दृष्टीने स्वतंत्र अभ्यास करता येणे शक्य आहे. उर्मिला पवार यांच्या *आयदान* स्वकथनातलैंगिक अनुभवाची थेट शब्दांत केलेली मांडणीही यादृष्टीने विचारात घेता येईल. कथा-कादंबरीगत स्त्रीप्रतिमांच्या माध्यमातून आत्यंतिक खाजगी जीवनातील तपशिलाचा उघड्यावाघड्या पद्धतीने झालेला हा आविष्कार, स्त्रियांची लैंगिकतेच्या संदर्भातील मानसिकता समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण भाषिक दस्तऐवज उपलब्धकरून देणारा आहे.

सारांश, १९८० नंतरच्या स्त्रीलिखित कथा-कादंबऱ्यांमधून साकारणाऱ्या स्त्रीप्रतिमा कुटुंबकेंद्री अवकाशात पारंपरिक मूल्यांचे अनुसरण करणाऱ्या आहेत तसेच त्या मूल्यांमुळे स्त्रीच्या होणाऱ्या शोषणाची जाणीव असणाऱ्याही आहेत. स्त्रीलिखित कथा-कादंबऱ्यांमधून प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात बंड करणाऱ्या स्त्रीप्रतिमाही साकार झाल्या आहेत; मात्र त्या बहुतांश वेळा मर्यादित चौकटीत विरोध करताना दिसतात. कुटुंब आणि विवाह या संस्थांची घडी पूर्णपणे विस्कळीत करून स्वतःचा अवकाश शोधण्याचे धैर्य अपवादात्मक स्त्रीपात्रांनीच दाखवलेले दिसते. कुटुंबाच्या बाहेरच्या जगातील स्त्रियांच्या क्षमताधिष्ठित भूमिका आणि त्याच्याशी निगडित श्रेयाच्या संकल्पना व्यक्त करणाऱ्या स्त्रीप्रतिमांची कमतरता जाणवावी इतकी

स्पष्ट आहे. अर्थात,खाजगी आणि सार्वजनिक अवकाशात स्त्रीला 'स्वतंत्र व्यक्ती' म्हणून मान्यता प्राप्त करून देणारी प्रक्रिया गतिमान झाल्याशिवाय साहित्यांतर्गत वास्तवात मूलभूत बदल होण्याची शक्यता नाही. साहित्याने समाजाच्या स्थितिगतीचे अधोरेखन करण्याच्या बरोबरीने स्त्रीपुरुषसमतेचे 'युटोपिआ' वाटणारे जग कलेच्या पातळीवर साकारले तर स्त्रीप्रतिमांचे वेगळे 'दर्शन' साहित्यात घडण्याची शक्यता आहे.

संदर्भसूची

१) आशराबी शिकलगार, *मोगरा*, मायबोली प्रकाशन, १९९१.

२) उषाकिरण आत्राम, *अहेर*,गोंडवाना- गोंडी साहित्य परिषद, १९९६

३) अंजली जोशी, *विरंगी मी! विमुक्त मी*!, शब्द प्रकाशन, २०१६.

४) कविता महाजन,*भिन्न*, राजहंस प्रकाशन, २००६.

५) नीरजा, *जे दर्पणी बिंबले,* मॅजेस्टिक प्रकाशन, २००१

६) नीरजा, *ओल हरवलेली माती,* पॉप्युलर प्रकाशन, २००६

७) नीरजा, *पावसात सूर्य शोधणारी माणस*, पॉप्युलर प्रकाशन, २०१२.

८) प्रतिभा कणेकर, *परिघावर जगताना*,शब्दालय प्रकाशन, २००३.

९) प्रतिमा जोशी, *जहन्नम (निवडक प्रतिमा जोशी)*, लोकवाङ्मय गृह, २००९.

१०) प्रज्ञा दया पवार, *अफवा खरी ठरावी म्हणून*, शब्द प्रकाशन, दुसरी आवृत्ती, २०१०.

११) मथु सावंत, *पाण्यातील पायवाट*,निर्मला प्रकाशन, १९९१.

१२) मथु सावंत, *तिची वाटच वेगळी*, संगत प्रकाशन, २००२.

१३) मथु सावंत, *पाणबळी*, संगत प्रकाशन, २००६.

१४) मलिका अमरशेख, *को ऽहम को ऽहम*, शब्द प्रकाशन, २००६.

१५) मलिका अमरशेख, *एक होता उंदीर*,शब्द प्रकाशन, २००६.

१६) मलिका अमरशेख, *झाडपणाची गोष्ट*, लोकवाङ्मय गृह, २०१३.

१७) मेघना पेठे, *हंस अकेला*, राजहंस प्रकाशन, पाचवी आवृत्ती, २००५.

१८) मेघना पेठे, *आंधळ्याच्या गायी*, राजहंस प्रकाशन, दुसरी आवृत्ती, २००१ .

१९) मोनिका कुवर, *कोसू*,चांदणवेल प्रकाशन, २००१.

२०) मोनिका गजेंद्रगडकर, *भूप*,मौज प्रकाशन, २००४.

२१) मोनिका गजेंद्रगडकर, *आर्त*,मौज प्रकाशन, तिसरी आवृत्ती, २०१२.

२२) मोनिका गजेंद्रगडकर, *शिल्प*,मौज प्रकाशन, दुसरी आवृत्ती, २०१२.

२३) मोनिका गजेंद्रगडकर, *उगम*,मौज प्रकाशन, २०१६.

२४) वंदना महाजन (संपा.), तिचा अवकाश, शब्दालय प्रकाशन, २०२१.

२५) सिसिलिया कार्व्हालो, *काठ*, डिंपल प्रकाशन, १९९५.

२६) सिसिलिया कार्व्हालो, *परीस*, अनघा प्रकाशन, २००४.

२७) हरिश्चंद्र थोरात,*मराठी कादंबरी : त्रेसष्ठ ते तेरा*, शब्द प्रकाशन, २०१८.

नारायण सुर्वे आणि धूमिल यांच्या कवितेतील स्त्री प्रतिमा : काही निरीक्षणे

डॉ. विश्वाधार देशमुख
मराठी विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड.

कोणत्याही लेखकाची संवेदनशीलता समकालीन युगधर्माच्या प्रभावातून संस्कारित होत असते. यामुळे एकाच कालखंडात भिन्न भाषाप्रदेशांत वेगवेगळ्या भाषांमधून लेखन करणाऱ्या लेखकांच्या साहित्यामध्ये आशयसूत्रे आणि आविष्कारशैली याबाबतीत विविधता आढळत असलो तरी युगधर्माच्या प्रभावातून त्यांच्या संवेदनस्वभावात विलक्षण साम्य असल्याचे आढळून येते.

अशा साम्यामुळे एकीकडे त्यांच्या लेखनात सारखेपणा जाणवतो, तर दुसरीकडे भिन्न भाषाप्रदेश आणि त्या-त्या भाषेतील वेगवेगळ्या वाङ्मयीन परंपरा यांच्या संस्कारातून त्यांच्या लेखनात काही भेददेखील उत्पन्न होतात.

१९६० नंतरच्या कालखंडातील भारतीय साहित्याचा विचार करता, हे मन्वंतराचे युग राहिले आहे. जवळपास सर्वच भारतीय भाषांमधील साहित्यामध्ये या कालखंडात आमूलाग्र परिवर्तन घडून आले. हे परिवर्तन आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही स्तरांवरील होते.परिणामी या कालखंडात विविध भारतीय भाषांतून लेखन करणाऱ्या लेखकांच्या संवदेनस्वभावातील साम्य ठळकपणाने लक्षात येणारे आहे.

मराठीमध्ये काव्यलेखन करणारे नारायण सुर्वे आणि हिन्दी भाषेत काव्यलेखन करणारे धूमिल (सुदामा शिवनायक पांडे) या दोघांचा भाषिक प्रदेश, तेथील वाङ्मयीन संस्कृती आणि काव्यविषयक परंपरा यांच्यामध्ये भिन्नता असली तरीही त्यांच्या संवेदनस्वभावातील सारखेपणामुळे त्यांच्या कवितेत विलक्षण साम्य आढळून येते.अर्थात जीवनदृष्टी तसेच काव्यविषयक दृष्टिकोणातील वेगळेपणामुळे त्यांच्या कवितेत काही भेदही उत्पन्न झाले आहेत.

नारायण सुर्वे आणि धूमिल या दोघांच्या कवितेतील स्त्री प्रतिमांचा तौलनिक अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केला आहे.

या तौलनिक अभ्यासाद्वारे भिन्न भारतीय भाषांमधून लिहिल्या गेलेल्या कवितांमधील स्त्री चित्रणाचा आणि त्याद्वारे स्त्री प्रतिमांचा शोध घेऊन काही निवडक निरीक्षणे नोंदविली आहेत.

सुर्व्यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमा :

'संपूर्ण स्त्री वर्गाकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोण पुरोगामी होता नि आहे. संगोपन करणारी कुणीतरी महिला मला माता म्हणून मिळाली. जन्म देणारी माताही मिळाली. चळवळीत पडल्यावर माझा दृष्टिकोण आणखी घडत गेला... मराठी कविता स्त्री वर्गाकडे एक भोगवस्तू या दृष्टिकोणातूनच पाहते. पायाची दासी म्हणून स्त्रीकडे पाहिले जाते. पण हे बरोबर नाही. तिला ही तिचे अस्तित्व आहे, प्रतिष्ठा आहे.'[1] असा हा नारायण सुर्व्यांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण आहे. या दृष्टिकोणातून त्यांनी कवितेत स्त्रीचे चित्रण केले आहे. मुळात मुलाखतीत प्रश्नाचे उत्तर देतांना त्यांनी सांगितलेला दृष्टिकोण आणि कवितेतून चित्रित झालेली स्त्री यांमध्ये विसंगती आढळत नाही. उलट त्यांनी जे कवितेत रेखाटले आहे तेच उपरोक्त उत्तरात आले आहे.

मराठी कवितेत स्त्री ही '.....कधी आदिशक्ती बनलेली आहे, कधी ती निसर्ग आणि प्रेयसी यांच्या अद्वैतातून साकार झालेली आहे, कधी ती निखळ 'स्त्री' म्हणून समोर आलेली आहे. मधल्या ढासळत्या जीवनमूल्यांच्या काळात ती ढासळत्या जीवनाचेच प्रतीक बनून आलेली आहे...नारायण सुर्व्यांच्या कवितेतील 'स्त्री' ही प्रथमतः लक्षात राहते ती एक निर्मितीक्षम जगातील महत्वाची भागीदार म्हणून.'[2]

हे चित्र नेमकेपणाने समजून घेण्यासाठी त्यांच्या कवितेतून चित्रित झालेल्या स्त्रीच्या मुख्यत्वेकरुन तीन रुपांचा विचार करता येईल.

१. आईच्या रुपातील स्त्री,
२. प्रेयसी किंवा पत्नीच्या रुपातील स्त्री आणि
३. वेश्येच्या रुपातील स्त्री

ही तिन्ही रूपे पृथक ठरवून त्यांचा स्वतंत्र अभ्यास करता येणे अवघड आहे, कारण एकाच स्त्रीमध्ये पत्नी आणि आई किंवा वेश्या आणि आई अशी दोन्ही रुपे आढळतात, हेही आपणाला लक्षात घ्यावे लागेल.

१. आईच्या रुपातील स्त्री :

आपली भारतीय संस्कृती मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र गाणारी आहे. सुर्व्यांच्या पूर्वकालीन किंवा समकालीन कर्वीनी मातृत्वाची थोरवी गाणाऱ्या कविता लिहिल्या आहेत. तसे, एकूण मराठी अथवा जागतिक वाङ्मयातील सांस्कृतिक मूलाधार म्हणून आईच्या व्यक्तिमत्वाकडे पाहिले गेले आहे. तसे तर प्रत्येकानेच आपापल्या आईविषयी कविता, कथा, कादंबरी किंवा कोणतेही साहित्य लिहिणे यात वेगळेपणा असणारंच. एका कवीची आईवरील कविता दुसऱ्या कवीच्या आईवरील कवितेसारखी असणार नाही. पण तरीही सुर्व्यांनी आपल्या कवितेतून मातृत्वाचे रूप रेखाटणे, तिचा गौरव करणे याला एका वेगळ्या सांस्कृतिक परिस्थितीचा आधार आहे.

सुर्वे तसे अनाथ.त्यांच्या जन्मदात्या आईने त्यांना टाकून दिलेले. पुढे काशीबाई या मातेने सांभाळले. परंतु असे नाळ कापून फेकून देणाऱ्या जन्मदात्रीविषयी त्यांच्या मनात घृणा नाही तर तिच्या या कृतीला समजून घेणारे समंजस मन त्यांच्याजवळ आहे. नाळ कापून सोडून देणारी जन्मदात्री आणि प्रचंड पृथ्वीगोलाशी नाळ जोडून देणारी पालनकर्ती या दोन्ही रूपांतील आईबद्दल त्यांच्या मनात कृतज्ञभाव आहे. या कृतज्ञभावामुळेच त्यांच्या कवितेतूनच चित्रित झालेल्या स्त्रियांप्रति त्यांची भावना स्नेह आणि आदराची आहे, हे आपल्या लक्षात येते.

सुर्वेपूर्वकाळात 'प्रेमस्वरुप आई। वात्सल्यसिंधु आई' अशा आईचे चित्र मराठी कवितेत आले होते. कौटुंबिक जीवनात अडकलेली, आपल्या मुलाबाळांना सांभळण्यासाठी कौटुंबिक तडजोडी करणारी ही आई होती. 'चूल आणि मूल' यांच्यातच तिचे भावविश्व गुंतून पडले होते.

सुर्व्यांच्या कवितेतील आईला कुटुंबाच्या निर्वाहासाठी उंबरठा ओलांडून बाहेर पडावे लागले आहे. म्हणजे 'चूल आणि मूल' या विश्वाला उल्लंघून ती बाहेर पडली आहे. एकीकडे बाहेरच्या जगातील तडजोडी तर दुसरीकडे कौटुंबिक जगातील लालन-पालन अशा दुष्टचक्रात ती अडकली आहे. पण तरीही तिच्या मातृत्वाच्या कर्तव्यात ती कसूर करत नाही. तारे विझण्याच्या वेळी भल्या पहाटे ती घराबाहेर पडते आणि तारे उगवण्याच्या वेळी घराकडे परतते. एकीकडे वेळेत कामावर पोचण्यासाठीची घाई तर दुसरीकडे आपल्या चिल्यापिल्यांच्या काळजीत तिचा जीव गुंतलेला; म्हणून कारखान्याच्या दिशेने झपाझप पाय उचलीत निघालेली, पण मागे वळून बघत जाणारी आई आपणाला सुर्व्यांच्या कवितेत भेटते.

'झपाझप उचलीत पाय
मागे वळून बघीत जाय
ममतेने जाई सांगत
नका बसू कुणाशी भांडत
वर दोन पैसे मिळत.'[3]

या दोन पैशांपलीकडे आपल्या लेकरांना देण्यासाठी तिच्याकडे अन्य काहींच नाही.

आपल्याला जे सोसावे लागले, जे आयुष्य जगावे लागले, उद्या ते आपल्या लेकरांच्या वाट्याला येऊ नये ही तिची तळमळ आहे.

सुर्व्यांच्या कवितेतील आईचे महत्वाचे वेगळेपण म्हणजे ती आपल्या अश्रूंनी मुलांच्या मनाचे सिंचन करणारी नाही किंवा त्यांच्यावर मायेची सतत पखरण करून त्यांना दुबळे बनवणारी नाही. 'वात्सल्यसिंधू' एवढेच तिचे रूप नाही तर गरिबीतही करारी असणारी, गरज पडली तर विद्रोहाची तयारी ठेवणारी, प्रतिकुलतेशी दोन हात करत राहणारी आणि आपल्या पोरांना सततच्या जीवनसंघर्षासाठी सज्ज करणारी अशी 'लढाऊ आई' त्यांच्या कवितेतून चित्रित झाली आहे.

२. प्रेयसी / पत्नीच्या रुपातील स्त्री :

आपली कवितेविषयीची भूमिका मांडतांना सुर्व्यांनी म्हटले आहे, 'माझ्या प्रेम कवितेविषयी लोक आता लक्ष द्यायला लागले आहेत ही एक बरी गोष्ट आहे कारण लोकांना असे वाटते की, सुर्वे ज्या थरातून आले आहेत त्या थरातले लोक प्रेमच

करीत नाहीत. ते काय सकाळी उठतात, गिरणीत जातात राबतात आणि एके दिवशी कुणाच्या तरी खांद्यावरून निघून जातात.'[4]

प्रेमाबद्दलची आणि प्रेमकवितेबद्दलची विशिष्ट अशी ठोकळेबाज कल्पना साहित्यात रूजली आहे. प्रेम म्हणजे आणाभाका, चोरुन भेटी-गाठी आणि निव्वळ विरहाची गाणी नसते; तर ती जगण्याला शाश्वत आधार देणारी, आयुष्यातील संघर्षासाठी बळ देणारी भावना असते. नुसत्या वैषयिक बाबी घेऊनच त्यावर सगळे प्रेम बेतले जाते असे नाही, ह्या जगण्याच्या संघर्षाची दोन चाके म्हणजे 'स्त्री' आणि 'पुरुष' तेव्हा जीवनात येणारे सगळे प्रसंग, सुख-दुःख ह्या सगळयांना घेऊन त्यांची प्रेमकविता पुढे जाते.

सुर्व्यांची प्रेमकविता ही प्रौढावस्थेतील प्रेमकविता आहे. प्रौढ वयातही प्रेम असू शकते आणि महत्त्वाचे म्हणजे या समजुतदार प्रेमावर कविता लिहिली जाऊ शकते, हे सुर्व्यांनी दाखवून दिले. म्हणून त्यांच्या कवितेत प्रेयसीची चित्रे आपणाला आढळत नाहीत. परंतु तरीही ही प्रेमकविता असल्याने त्यातील नायिकेला आपण प्रेयसी म्हणणार असू तर ती प्रापंचिक जबाबदाऱ्या निभावणारी प्रेयसी आहे. स्वाभाविकच प्रेयसीपेक्षा 'पत्नी' हे तिचे रूप प्रभावी आहे.

सुर्व्यांच्या कवितेतील पत्नीचे चित्र मात्र असे विस्थापित स्त्रीचे नाही, तर ते निर्मितिक्षम जगातील भागीदाराचे, सृजनदायिणीचे आहे. सृजनदायिणी याचा अर्थ केवळ मुलाबाळांना जन्माला घालणारी असे नाही तर जगण्याला, कुटुंबाला आकार देणारी. तिचे हे सृजन दुहेरी आहे. कुटुंबाच्या निर्वाहासाठी तिला कारखान्यात काम करावे लागते, हे एक सृजन आहेच; पण कामगार असणाऱ्या पतीला लढण्याचे,संघर्ष करत राहण्याचे आंतरिक बळही ती पुरवते. म्हणून ती सृजनदायिणी आहे. तिच्या मायेच्या आधारस्पर्शाने पतीमध्ये दहा हत्तींचे बळ येते, 'किती वाळलात तुम्ही' अशा प्रेमळ प्रश्नाने त्याच्या काळजाचे पोलाद होते म्हणून पत्नीच्या या अपरिमित उर्जेबद्दल कृतज्ञता व्यक्त करतांना तो म्हणतो,

'खूप दूरवर नांगरुन पडला आहे उजेड
खुशीत आहे मी; तुझे फूलपण
तुला विसरले नाही.'[5]

'विकल जिण्यात तिने स्वतःचे फूलपण कायम ठेवणे, हा तिच्या सृजनशील व्यक्तिमत्वाचा पहिला विशेष होय. 'स्त्री' म्हणून तिचा विचार करीत असतांना चटकन नजरेत भरावा, असा तिच्या व्यक्तिमत्वाचा हा वैशिष्टयपूर्ण भाग आहे. हे 'फूलपण' तिचे नाजुकपण दाखवण्यासाठी आलेले नाही तर सहवासात येणाऱ्याला चैतन्याने भारून टाकण्याचा विशेष सूचित करण्यासाठी आले आहे.

सुर्वे पत्नीकडे आणखी कोणत्या दृष्टीने पाहतात? हे पडताळून पाहण्यासाठी 'भारतीय जवानाचे पत्र'[6] ही कविता पाहता येईल. हिमालयाच्या रक्षणासाठी सीमेवर तैनात असलेल्या या सैनिकाला आपल्या घराची आठवण येते, तेव्हा

'हवी होतीस तूही इथे पट्टे गोळ्यांचे झरझर सारीत
दोघांनी मिळून आपण शत्रूस केले असते गारद'

शत्रूला दोघांनी मिळून गारद करण्यासाठी त्याला पत्नीची आठवण येते. याचा अर्थ ती अबला, नाजुका नाही तर शस्त्रसज्ज शत्रूला गारद करण्याची ताकद तिच्या अंगी आहे, असा त्याला विश्वास आहे.

'मराठी प्रेमकवितेत किंवा एकूणच मराठी साहित्यात बाळंत न होणारे नारीतत्त्वच फक्त मान्य दिसते आणि अशा प्रेमकवितेत ना धड शाहिरी बाजाचा रांगडा शृंगार असतो, ना निकोप शारीर सुखाचे चित्र असते. संकेत जर्जर आणि काल्पनिक प्रणयाचे सुखद, पळपुटे उदात्तीकरण करणारी सपक कविता मराठीत विपुल आहे.'[7] अशा सपक, साचेबद प्रेमकवितेची कोंडी फोडण्याचे काम सुर्व्यांच्या कवितेने केले आहे. म्हणून त्यांच्या कवितेतील पत्नी प्रणयात सोबत करण्यापुरती मर्यादित नाही तर ती जीवनाची सोबत करणारी जीवनसाथी आहे.

कवीच्या भावजीवनात पत्नीचे स्थान असे मध्यवर्ती असल्याने आपल्या मृत्यूनंतरही तिला दुःख भोगावे लागू नये, याची काळजी तो घेतो. म्हणूनच तिने चिरवेदनेच्या नादी न तिला लागता, खुशाल दुसरा संसार थाटावा एवढे स्वातंत्र्य तो तिला देतो.

'उगीचंच चिरवेदनेच्या नादी लागू नको !
खुशाल ; खुशाल तुला आवडेल असे नवे घर कर
मला स्मरून कर
हवे तर मला विस्मरून कर!'[8]

अशाप्रकारे सुर्व्यांची एकंदर कविता प्रेमाच्या धाग्याने बांधलेली आहे. घर, चाळ, मुले, कारखाना, कामगार, व्यक्ती, समष्टी या सर्वांवरच त्यांचे निरतिशय प्रेम आहे. प्रेमाची बांधिलकी हा त्यांच्या कवितेचा आत्मस्वर आहे. हा आत्मस्वर जिच्या सर्जक सहवासात आकाराला आलेला आहे, तिच्याबद्दल प्रेमाची आदराची आणि त्याहीपेक्षा कृतज्ञतेची भावना त्यांच्या मनामध्ये आहे. सुर्व्यांच्या कवितेमधील स्त्रीचित्रणाचा वेध घेतांना आपल्या हे लक्षात येते की, 'तुकारामाला जितका विश्वास विठोबाच्या संगतीत होता तितकाच कवीला आपल्या पत्नीच्या सहवासात आहे.'[9]

३. वेश्येच्या रुपातील स्त्री :

काळ कोणताही असो,धर्म कोणताही असो,समाज कोणताही असो; 'वेश्या' ही समाजजीवनातील विकृती मानली गेली आहे. 'चर्चच्या म्हणण्यानुसार वेश्या ही कुलीन स्त्रियांची प्रतिष्ठा अबाधित राहावी यासाठी दिलेला बळी असते. राजवाड्याची शोभा टिकायची असेल तर जसे गटारे बांधणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे आपल्या लेकीबाळी सुरक्षित राहायच्या असतील तर काही मुलींना वेश्याव्यवसायात लोटणे गरजेचे होऊन बसते.'[10]

वेश्येकडे पाहण्याची समाजाची नजर ती चरित्रहीन, निर्लज्ज आहे, अशीच असते. खरेतर पुरुषांमधील सर्व विकृती तिला सोसाव्या लागतात. रखेल, गणिका, ठेवलेली बाई, अंगवस्त्र अशा हलक्या संबोधनाने तिला संबोधले गेले आहे. साहित्यात चित्रित झालेले तिचे रुप असेच एकतर तिच्या स्त्रीत्वाचा अपमान करणारे किंवा भाबड्या भावाने तिचे उदात्तीकरण करणारे आहे. परंतु सुर्व्यांच्या कवितेतून चित्रित झालेली वेश्या अशी नाही. भले तिला तिच्या आणि कुटुंबाच्या निर्वाहासाठी हा व्यवसाय पत्कारावा लागला असेल पण तिच्यामध्ये असणाऱ्या माणूसपणाच्या सामर्थ्याला अधोरेखित करणे हा त्यांच्या कवितेमागील उद्देश आहे.

'मनिआडर'[11] या सुर्व्यांच्या कवितेतून चित्रित झालेली वेश्या या दृष्टीने लक्षणीय आहे.

या कवितेतील वेश्या मनिऑर्डर पाठवतांना एक छोटेखानी पत्रही पाठवते. हे पत्र म्हणजे तिचा स्वतःशी चाललेला संवाद आहे. तिच्या रोजच्या जगण्यात तोचतोचपणा आहे, कंटाळा आहे, अगदी वैताग आहे, जो तिने 'सगळंच कटाळल्यागंत' आहे, असं म्हटल्यावर पत्राच्या शेवटी नकळत प्रकट झाला आहे; पण हा कंटाळा, वैताग अन्य कुणाला दिसू नये याची काळजी ती घेते. म्हणून पत्राच्या प्रारंभीच ती सांगून टाकते,

'अन हे बगा,
असंबी लिवा
का मी खुस हाय;
आंग ठनाकतंय पर म्हनावं
गावापेक्षा बरं हाय.'

अशा वेदनेच्या वेदाने तिला खूप काही शिकवले आहे. यातूनच पुरुष जातीच्या स्वभावाचे तिला नेमके आकलन झाले आहे म्हणून 'इथे राहण्यापेक्षा माझी 'बाईल व्हशील का?' असे विचारणाऱ्या पुरुषाला प्रत्युरादाखल ती म्हणते, 'आता हाय की मी शेजंला तुमच्या.' म्हणजे 'बाईल होणं' आणि 'शेजंला असणं' या दोन्हींचे मूल्य तिच्यालेखी सारखेच आहे. पुरुषाच्या नजरेत बायको असेल की बाई तिचे महत्त्व कातड्यापुरतेच, असा तिचा रोकडा अनुभव आहे. म्हणून तर ती म्हणते,

"हे कातडं लई वंगाळ बगा.

माणूस गोचिडावानी चिकाटतं
आन कायबी बोलून जातं
.....
पर ह्या कातड्याची
ढोरावानी वड असती मानसाला.'

यातूनच पुरुषांकडे पाहण्याचे 'एक बॅलेंन्सिंग' तिच्यामध्ये आलेले आहे, यामुळे भावनेच्या भाबड्या प्रवाहात ती वाहून जात नाही तसेच आपल्या कोणत्याही भावनेचे तिला उदात्तीकरण करावेसे वाटत नाही. आदर्श जीवनाविषयी विचार करत बसायला तिला फुरसत नाही. यापेक्षा आपल्या वाट्याला आलेले नरकतुल्य जगणे पोरांच्या वाट्याला येऊ नये म्हणून ती त्यांच्या शिक्षणासाठी मनिऑर्डर पाठवते.

अर्थात या स्त्रियांकडे पाहण्याचा सुर्व्यांचा दृष्टिकोण निव्वळ सहानुभूतीचा नाही. तर याही परिस्थितीत त्या जिद्दीने आपल्या जगण्याला कसा आकार देत आहेत, हे त्यांच्या लेखी जास्त महत्वाचे आहे. म्हणून तर सुर्व्यांच्या कवितेमधील 'देहाचा बाजार मांडणारी स्त्री वास्तव नाकारीत नाही. कुठेही, कोणत्याही संकेतात अडकत नाही. कल्पनात्मक पातळीवरुन उदात्तीकरण करीत नाही, आपल्या समोरील जीवनसंघर्षाला ती सरळ सामोरी जाते. त्या जीवनसंघर्षातून तिला जीवनाचा अर्थ मिळतो. आणि जीवनसंघर्षातून तिचे माणूसपण सहजपणे व्यक्त होते.'[12]

आता हे असे असह्य, नरकयातना सोसायला लावणारे जगणे नाकारुन ती याविरुद्ध बंड करीत नाही. पेटून उठावे, एवढी तिची जाणीव अद्यापही प्रगल्भ झालेली नाही. पुरुषप्रधान परंपरेने तिच्यावर हे जगणे लादले आहे, परंतु ती परंपरा नाकारावी, लाथाडावी एवढे शहाणपण अजून तिच्यात आलेले नाही. म्हणून सुर्व्यांच्या कवितेतील वेश्या ही लेचीपेची आहे, असा आक्षेप त्यांच्या कवितेवर घेतला जातो. या आक्षेपाला उत्तर देतांना सुर्व्यांनी स्वतःच म्हटले आहे. '....ही बंडाची भाषा नाही तर बंडाला प्रेरित करणाऱ्या कमालीच्या असह्य जिण्याची भाषा आहे. वास्तवाची भाषा आहे.'[13] म्हणजे आपले जगणे असह्य होत आहे, इथपर्यंतच्या टप्प्यावर ही स्त्री आली आहे पण हे जगणे कुणी लादले याचा शोध घेऊन त्याला उलथून टाकण्याचा दिशेने तिचा प्रवास अद्यापही सुरु झालेला नाही.

सुर्व्यांच्या सर्व कवितांमधील स्त्रीचित्रणाचा आढावा घेतांना नीलकंठ कदम यांनी नोंदवले आहे की, 'ऐसा गा मी ब्रह्म' आणि 'माझे विद्यापीठ' या दोन संग्रहातील स्त्री जीवनात अधिक गुंतलेली आहे. 'इन्व्हॉल्ड' आहे. परंतु 'जाहीरनामा' आणि पुढच्या कवितासंग्रहात ती अशा अनोख्या वळणावर उभी आहे, जिथे थांबून ती त्रयस्थासारखी आपल्या गतजीवनाकडे पाहते आहे.'[14] म्हणजे आत्मजाणिवेच्या टप्प्यापासून ते आत्मनिरीक्षणाच्या टप्प्यापर्यंत तिची यात्रा झाली आहे. याच्या काही खुणा तिच्या वाटचालीत सापडतात पण ती विद्रोह किंवा बंडाच्या वाटेला जाणारी आहे, असे मात्र जाणवत नाही. ही सुर्व्यांच्या कवितेतील स्त्रीचित्रणाची मर्यादादेखील आपण लक्षात घेतली पाहिजे.

'सुखद अनुभव देणारी सुंदर वस्तू, उदात्त देवता, अमूर्त शक्ती यांसारखे स्त्रीकडे पाहण्याचे दृष्टिकोण टाळून सुर्वे यांचे कविमन स्त्रीकडे केवळ माणूस म्हणून पाहू शकले.'[19] याचे कारण सुर्व्यांवरील 'स्त्रीला साथी मानणाच्या मार्क्सवादी संस्कारात आहे;' परंतु आश्वासक शक्ती म्हणून स्त्रीचे चित्रण करतांना तिच्यातील विद्रोही सामर्थ्याकडे मात्र सुर्व्यांचे दुर्लक्ष झाले आहे.याची नोंद आपणाला घ्यावी लागते.

धूमिलांच्या कवितेतील स्त्री प्रतिमा :

भारतीय भाषांमधील साहित्याचा विचार करता, स्त्रीचे चित्रण तिच्या मानसिक, बौद्धिक क्षमतेपेक्षा तिच्या देहाचे विविध विभ्रम प्रकट करणारे आहे. डॉ.चमनलाल गुप्त म्हणतात त्याप्रमाणे '....कालिदास, विद्यापति, सूरदास, जायसी, बिहारी, केशव, देव, पद्माकरने नारी शरीर तथा कामभावना को अपने साहित्य में कम स्थान नहीं दिया है।'[15] याचा अर्थ असा आहे की, स्त्रीच्या चित्रणामध्ये पारंपरिक पुरुषप्रधान दृष्टिकोणाचेच प्राबल्य राहिलेले आहे.

या पार्श्वभूमीवर जेव्हा आपण धूमिलांच्या कवितेतील विविध स्त्रीरूपांचा विचार करतो तेव्हा आपणाला काय दिसते? तर त्यांच्या कवितेतून स्त्रीदेहाचे, तिच्या गुप्तांगांचे आणि लैंगिक संबंधांचे खुले चित्रण असले तरी हे स्त्रीचे एकमेव रूप

नाही. तर याशिवायही त्यांच्या कवितेतून वेगळ्या रूपातील स्त्री चित्रित झालेली आहे. याचे वर्गीकरण खालील प्रकारे करता येईल :

(अ) औरत एक देह है

(ब) संघर्षरत असलेली स्त्री

(क) प्रेयसी / पत्नीच्या रूपातील स्त्री

(ड) आईच्या रूपातील स्त्री

(अ) औरत एक देह है :

'गृहस्थी: चार आयाम' या कवितेत धूमिलांनी म्हटले आहे.

'औरत: आँचल हे
जैसा कि लोग कहते हैं स्नेह है
किन्तु मुझे लगता है -
इन दोनों से बढकर
औरत एक देह है।'[16]

समीक्षकांचा असा आक्षेप राहिलेला आहे की, धूमिल स्त्रीकडे 'पुरुषी दृष्टिकोणाच्या प्रभावातून' पाहतात; '...यह वस्तुतः स्त्री को देखने का स्त्री-विरोधी या पितृसत्ताक, पुंसवादी दृष्टिकोण है, जो धूमिल की अनेक कविताओं में साफ तौर पर देखा जा सकता है। धूमिल की इस तरह की कविताएं कायदे से पितृसत्ताक व्यवस्था में स्त्री विरोधी पुंसवादी मानसिकता को पुख्ता करती हैं।'[17]

समीक्षकांच्या या मताला सिद्ध करणाऱ्या अनेक प्रतिमा धूमिलांच्या कवितेत सापडतात.

'हर लडकी का तिसरे गर्भपात के बाद धर्मशाला होना', 'गलियों में नंगी घुमती हुई पागल औरत का गाभिन पेट', 'महरी का महाजन के साथ एक रात सोने को तैयार होना, 'बलात्कार के बाद की आत्मियता', 'रंडियों की दलाली', 'जयरामपेशा औरतें', 'अंधी लड़कियों की आँखों में उससे सहवास का सुख तलाशना', 'भाषा का बलात्कार से बालिग होना' अशा अनेक ओळींतून स्त्री देहाचे उल्लेख येतात. या उल्लेखांमध्ये स्त्री म्हणजे निव्वळ देह, त्यापलीकडे काहीच नाही, हा भाव आहे. पण हा भाव समाजामध्ये स्त्रीचे स्थान नेमके कसे आहे, हे सूचित करण्यासाठी आला आहे. यामधील अनेक ठिकाणी व्यवस्थेचे प्रतीक म्हणूनही स्त्रीदेहाचे दाखले आले आहेत.

परंतु धूमिलांच्या काव्यलेखनामागील लक्ष्यार्थ व व्यंगार्थ लक्षात न घेता, समीक्षकांनी धूमिलांना स्त्रीद्वेष्टे ठरवले आहे.परंतु स्त्रीचे हे प्रेमळ, मायाळू, कोमल, मातृहृदयी रूप कवीला अमान्य आहे, असे नाही. 'औरत आँचल है', 'औरत स्नेह है' अशा काव्यपंक्तीतून हे रूप आले आहे. शिवाय 'ट्युशनपर जाने से पहले', 'सत्यभामा' अशा कवितांमधून या रूपाचे चित्रण आले आहे. परंतु समाजातील स्त्रीची एकंदरीत परिस्थिती पाहता अशा रूपात चित्रित केलेली स्त्री हा धूमिलांना दांभिकतेचा मुखवटा वाटतो.

आजच्या यांत्रिकीकरणाच्या युगात स्त्री ही 'कमोडिटी' बनली आहे, हेच सत्य आहे. आणि हे सत्य उघडया नागड्या भाषेत सांगणे कवीला महत्त्वाचे वाटते. 'नारी शरीर का व्यावसायिकरण इस हद तक हो गया है कि हर वस्तू पर नारी का शरीर छापकर उसे बेचा जाता है।'[18] याचा अर्थ असा आहे की स्त्री ही मूल्यांच्या पडझडीचे प्रतीक बनली आहे. परिणामी हे वास्तव चित्रित करत असतांना धूमिलांच्या नजरेत स्त्रीची कोणतीही आदर्शवादी, काल्पनिक प्रतिमा नाही. वास्तव परिस्थितीत स्त्री कशी आहे, हे सांगणे त्यांना जास्त महत्वाचे वाटते.

धूमिल 'हे जग कसे आहे ?' हे स्वच्छपणे आणि स्पष्टपणे दाखविणारे कवी आहेत यामुळे त्यांची भूमिका उपदेशकाची नाही तर वास्तव कथन करणाऱ्या कथनकाराची आहे. म्हणून आपल्या कवितेतून स्त्रीला अपमानित करण्याचा त्यांचा हेतू नाही तर समाजजीवनात तिचे जे 'तिरस्कृत रूप' प्रचलित आहे, आणि मुल्यांचे मुखवटे चढवून त्याला लपवून ठेपण्यांत आले आहे, ते

जसेच्या तसे कवितेत आणणे हा त्यांचा हेतू आहे. म्हणून तर आजपर्यंत साहित्यामध्ये चित्रित झालेल्या स्त्रीच्या रोमँटिक प्रतिमेमागचे राजकारण उघड करून वास्तव रूपातील स्त्री चित्रित करणे त्यांना गरजेचे वाटले आहे.

धूमिलांनी आपल्या कवितांमध्ये चित्रित केलेले स्त्रीचे 'देहरूप' ही अत्यंत विचारपूर्वक, ठरवून केलेली कृती आहे. त्यांच्या या नियोजित कृतीमागील मुख्य कारणे ज्येष्ठ समीक्षक डॉ. चमनलाल गुप्त[19] यांनी उलगडून दाखविलेली आहेत.

'भाषाविरोध, सभ्यता विरोध आणि दांभिकता विरोध' अशी ही तीन मुख्य कारणे आहेत. कवितेला भाषाहीन करणे, हे धूमिलांच्या काव्यलेखनामागील महत्त्वाचे उद्दिष्ट होते. कवितेला भाषाहीन करणे म्हणजे कवितेच्या भाषेचे जे पारंपरिक संकेत ठरून गेले होते, त्यांची जाणीवपूर्वक मोडतोड करणे, जे शब्द, प्रतीक, प्रतिमा काव्यभाषेत स्वीकारले जात नाहीत, त्यांचा अधिकाधिक वापर करणे. धूमिलांच्या कवितेतील अश्लील समजली जाणारी शब्दावली या हेतूने आलेली आहे.

दूसरे कारण आहे सभ्यताविरोध. 'जे करावेसे वाटते, ते न करता येणे म्हणजे सभ्यता' असे उपरोधाने म्हटले जाते. याचा अर्थ असा आहे की, एकीकडे लिंगपूजा करायची, खजुराहोंसारख्या मंदिरांवर मैथुनशिल्पे रेखाटायची आणि व्यवहारात मात्र लैंगिक संबंधांबद्दल अजिबातही बोलायचे नाही. अशा तथाकथित सभ्यतेचा विरोध हे धूमिलांच्या अशा कृतीमागचे दुसरे कारण आहे.

तिसरे कारण आहे दांभिकता विरोध.म्हणजे समाजामध्ये माजलेली अव्यवस्था, अनागोंदी, विकृतींचे वाढते प्रमाण यांची उकल न शोधता, आपला समाज फारच मूल्यनिष्ठ आहे, आपली संस्कृती सर्वश्रेष्ठ आहे, इथे स्त्रियांना देवतासमान मानले जाते, अशा सभ्य संस्कारांचा मुखवटा धारण करायचा. समाजातल्या विचारांत आदर्श आणि व्यवहारात दांभिकता याची धूमिलांना चीड आहे. म्हणून अशा दांभिकतेचा ठरवून केलेला विरोध हे त्यांच्या अशा काव्यलेखनकृतीमागील महत्त्वाचे कारण आहे.

धूमिल हे स्वीकाराचे नाही तर अस्वीकाराचे कवी आहेत.निमुटपणाचे नाही तर विरोधाचे कवी आहेत. म्हणून परंपरेने घडवलेली स्त्रीची प्रतिमा, सभ्यता, संस्कृती अशा गोष्टी त्यांनी ठामपणे नाकारल्या आहेत. जे जे परिवर्तन विरोधी, स्थितिशील आणि जडवादी आहे, त्याविरोधात त्यांनी आपली लेखणी चालविली आहे.

याचा अर्थ असा आहे की, धूमिल जीवन विरोधी नाहीत तर जडताविरोधी आहेत. स्त्री, कविता तसेच व्यवस्था यांकडे ते सामाजिक भूमिकेतूनच पाहतात. आणि यामध्ये जे जे सामाजिकतेच्या विरोधी वाटते, त्याची मोडतोड करण्यासाठी नव्या, नागड्या भाषेचा आग्रह धरतात. 'धूमिल अपने सामाजिक परिवर्तन के प्रति तन्मयता में अपरिवर्तनशील औरतों के प्रति सन्मान का भाव जानबुझकर नहीं दिखाना चाहते। ....वह कविता और नारी को सामाजिक भूमिका में रखकर देखता हैं।'[20]

यामुळे त्यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण समजून घेण्यांत मात्र समीक्षकांची गल्लत झाली आहे. ही गल्लत होण्याचे आणखी एक कारण म्हणजे वक्रोक्ति आणि विडंबना ही धूमिलांच्या आविष्काराची मुख्य पध्दती आहे. यामुळे त्यांच्या कवितेतील मूळ आशय नेहमीच त्यांच्या वक्रोक्तिपूर्ण प्रतिक्रियेच्या मागे लपून राहिलेला असतो. हा लपलेला आशय लक्षात आला म्हणजे धूमिलांना नेमके काय म्हणायचे आहे, हे समजणे सोपे जाते. पण हे समजले नाही को धूमिलांच्या कवितेतील नेमक्या आशयाचे विपरीत वाचन घडते. जसे की स्त्रीचे बाजारकेंद्री व्यवस्थेत वस्तुवत होत जाणे वाईट आहे, हे सांगताना ते म्हणतात,

'मुझे पता है
स्त्री देह के अंधेरे में
बिस्तर की अराजकता है।
स्त्री पूंजी है
बीड़ी से लेकर
बिस्तर तक
विज्ञापन में फैली हुई।'[21]

या पार्श्वभूमीवर सुर्व्यांच्या कवितेचा विचार करता, त्यांच्या कवितेतून चित्रित झालेलो स्त्री 'निर्मितिक्षम जगातील भागीदार' म्हणून आली आहे. पण बाजारकेंद्री व्यवस्थेकडून स्त्रीदेहाचे आणि स्त्रीत्त्वाचे होणारे अवमूल्यन त्यांच्याही कवितेचा विषय झाले आहे.

'माझ्या देशाच्या नोंदबुकात माझा अभिप्राय' या कवितेत ते म्हणतात,

'स्त्री केवळ एक मादक आणि उत्तेजक पदार्थ
हाच आजच्या कुलिनांच्या नजरेतील बघण्याचा अर्थ
ती फुलवाल्याकडील एक पुडी,
एक कुडी, एक गुडिया, ओह....
हे देशा मी शरमेने दबून चाललोय.'[22]

'स्त्री एक मादक आणि उत्तेजक पदार्थ', 'फुलवाल्याकडील एक पुडी', 'एक कुडी किंवा एक गुडिया' म्हणजे स्त्री, अर्थात स्त्री ही केवळ एक शरीर आहे, यापलीकडे अन्य काही नाही, हाच नवा अर्थ बाजारकेंद्री व्यवस्थने रुढ केला आहे. याबद्दलची खंत सुर्व्यांनीही व्यक्त केली आहे.

परंतु वक्रोक्ति ही धूमिलांची शैली आहे तर सरलोक्ती हो सुर्व्यांची पद्धती आहे. म्हणून धूमिलांच्या कवितेचा आशय त्यांच्या प्रतिक्रियेमागे शोधावा लागतो मात्र सुर्व्यांच्या कवितेतील अर्थाचे सहजपणे आकलन होते.मात्र असे असले तरी दोघांनीही स्त्रीचे होणारे अवमूल्यन कवितेतून चित्रित केले आहे.

(ब) संघर्षरत असलेली स्त्री :

'धूमिल औसत के विरोधी कवि रहे हैं। औसत औरत, औसत क्रांति और औसत कविता से उनका विरोध रहा हैं।'[23] स्त्रीला देहाच्या मर्यादेत अडकवून ठेवणाऱ्या वृत्तीचा त्यांनी धिक्कार केला आहे.

'...धूमिल उस युवती को महत्त्व देता है जो की घिसे-पिटे ढंग से नहीं जिना चाहती। जिसमें कुछ कर गुजरने की तमन्ना है। आम शहरी औरत में उसे परजीवी औरत दिखाई देती हैं; जोकि अपने शरीर को अपनी आजिवीका का साधन बनाती है। ...जिस नारी की धूमिल को तलाश है, वह भारतीय समाज में कम होती गई है।'[24]

'जिसमें कुछ कर गुजरने की तमन्ना है', अशा संघर्षात्सुक स्त्रीचे चित्रण कवीने 'आतिश के अनार-सी वह लडकी'[25] या कवितेमधून केले आहे.

आपल्या अस्तित्वाला आकार देणारी व्यक्ती धूमिलांच्या दृष्टीने आदरास पात्र ठरणारी आहे. 'कुमारी रोशनआरा बेगम' ही त्यापैकीच एक.

'आजाद रहना हर वक्त नया अनुभव है' असे कवीला वाटते आणि अशा स्वातंत्र्यासाठी जिने बलिदानाची तयारी दाखविली, त्या कुमारी रोशनआराला तो 'वह प्यारी लडकी' असे संबोधतो.

कवीच्या दृष्टीने ती 'प्यारी' यासाठी ठरेलेली आहे की, 'औसतन गलत जिन्दगी और सही मौत' यांमधला योग्य पर्याय तिने निवडला आहे. तिच्या या निवडीला तो कवितेच्या भाषेत 'जंगल के खिलाफ जनतंत्र का मलाल' असे म्हणतो.ती त्याच्या कौतुकाचा आणि कवितेचा विषय झाली आहे.

'जवानी जब भी फैसले लेती है
गुस्सा जब भी सही जनून से उभडता है
हम साहस के लिए एक नये तेवर से
परिचित होते हैं
तब हमें आग के लिए
दूसरा नाम ढूँढना नहीं पड़ता है।'

अशी अग्नीच्या रुपातील कुमारी रोशनआरा कवीच्या प्रेरणेचा विषय झाली आहे. 'स्त्री केवल देह है' असे सतत पाहणारा कवी देहाला उल्लंघून जाणारा तिचा पराक्रम पाहून अचंबित झाला आहे.

'बीस सेबों की मिठास से भरा हुआ यौवन
जब फटता है तो न सिर्फ टैंक टूटते हैं
बल्कि खून के छिटे जहाँ जहाँ पड़ते हैं
बंजर ओर परती पर आजादी के
कल्ले फुटते हैं।'

'बीस सेबों की मिठास से भरा हुआ यौवन' स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी बलिदान देता यावे म्हणून व्याकुळ आहे. तिला या स्त्रीदेहाच्या शृंगारात रस नाही, तर स्वतःच्या सत्वाला सिद्ध करण्यात रुची आहे. स्त्रीसाठी शृंगारापेक्षा साहस महत्त्वाचे आहे, हा या कवितेचा संदेश आहे. स्त्रीच्या देहापेक्षा तिचे धैर्य महत्त्वाचे आहे हे या कवितेचे मध्यवर्ती सूत्र आहे.

धूमिलांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण कसा निरोगी होता, याचे ही कविता उदाहरण आहे. 'धूमिल नारी के प्रति किसी भी प्रकार का दूषित दृष्टिकोण नही रखता था उसके लिए जीवन में प्रणय की अपेक्षा स्वदेश की स्वाधिनता की रक्षा का प्रयास महत्त्वपूर्ण था।'[26]

अशा संघर्षोत्सुक स्त्रीचे चित्र सुर्व्यांच्याही कवितेमध्ये आहे. पण हा संघर्ष निराळ्या पातळीवरचा आहे. 'तोडू जुलुमाचे काच, हे रावणी फास' अशी जिद्द मनी जोपासणारी स्त्री नशी त्यांच्या कवितेत आहे, तशीच 'गोळयांचे पट्टे झरझर सारित शत्रूला गारद करु शकणारी स्त्रीदेखील त्यांच्या कवितेत आहे.सुर्व्यांच्या काव्य- व्यक्तिमत्वावर मार्क्सवादाचा ठळक संस्कार झाल्याने त्यांनी स्त्रीकडे 'जीवन संघर्षाला सार्थपणे तोंड देणारी लढवय्यी' म्हणून पाहिले आहे.

धूमिलांच्या कवितेत या पातळीवरील स्त्रीची संघर्षचित्रे आलेली नाहीत. आहे त्या परिस्थितीत जगत राहणारी स्त्री त्यांना 'औसत औरत' वाटते आणि ते या 'औसत औरत' च्या विरोधात आहेत.

(क) प्रेयसी / पत्नीच्या रूपातील स्त्री :

धूमिलांच्या कवितेत कौटुंबिक जीवनाचे फारसे चित्रण आढळत नाही, पण तरीही 'सुदामा पाण्डे का प्रजातंत्र' या संग्रहात मात्र कौटुंबिक रूपातील धूमिल पाहायला मिळतात. 'संसद से सड़क तक' तसेच 'कल सुनना मुझे' या संग्रहातही एखाद दुसऱ्या कवितेत त्यांचे हे रूप दिसते; परंतु प्रस्तुत संग्रहात मात्र त्यांनी कौटुंबिक मूल्यांची अधिक चर्चा केली आहे.

प्रस्तुत संग्रहात त्यांनी कौटुंबिक नातेसंबंधांचा शोध घेतला आहे.

पत्नीशी असणारे एकच एक नाते त्यांच्या कवितेत नाही. वयाच्या प्रत्येक टप्प्यावर पत्नीशी असणारे नाते बदलत असते, त्यात चढ-उतार येत असतात, हे धूमिलांच्या कवितेतून चित्रित झाले आहे.

'मुझे लगा है कि हाँफते हुआ
दलदल की बगल में जंगल होना
आदमी की आदत नहीं, अदना लाचारी है।'[27]

इथे पत्नीसाठी वापरलेली प्रतिमा 'दलदलीची' आहे. लैंगिक संबंधात यांत्रिकता आल्यानंतर त्यातले माधुर्य संपून पत्नी 'दलदल' होऊन जाते, असे कवीचे निरीक्षण आहे. यामुळे अशा यांत्रिक संबंधाबद्दल कवीला ओढ नाही तर घृणा आहे.

सुर्व्यांच्या कवितेतही लैंगिक संबंधाचे चित्रण आहे, पण त्यावर रोमँटिकतेची झाक आहे. प्रेमातली व्याकुळता, उत्कटता प्रकट करण्याचे माध्यम म्हणून त्यांच्या कवितेत लैंगिक संबंधांचे चित्रण आले आहे. परंतु एकंदर जीवनव्यवहारात त्याचे स्थान अगदी परिघावरचे आहे. याचे कारण सुर्व्यांच्या कवितेतून चित्रित झालेले जग विशिष्ट विचारधारेने, विशिष्ट ध्येयाने भारलेल्या कार्यकर्त्यांचे आहे. या विचारधारेत स्त्री ही भोग्या किंवा दासी नसून ती साथी आहे यामुळे तिच्या दैहिक व्यवहारांची फारशी चर्चा नाही. वेश्येच्या जगाचे चित्रण आहे पण तिथेही लैंगिक संबंधाचे भडक चित्रण नाही.

याउलट धूमिलांच्या कवितेतून चित्रित झालेले जग अशा कार्यकर्त्यांचे नाही, तर ते विकृतीने पोखरलेल्या, भुकेने हैराण झालेल्या लोकांचे आहे. यामुळे लैंगिक संबंधातील यांत्रिकता जणू त्यांच्या जीवनाचा भाग झाली आहे. म्हणूनच त्यांच्या कवितेतून पत्नीचेही 'भोग्या' हे रुप चित्रित झालेले आहे.

परंतु याचा अर्थ धूमिलांना पत्नीशी असणाऱ्या निरोगी संबंधाची ओढ नाही, असे नाही. त्यांनी म्हटले आहे,

'वह धूमिल नहीं
एक डरा हुआ हिन्दू हैं
उसकी बिवी हैं
बच्चे हैं
घर हैं।'[28]

'कौटुंबिक गृहस्थ' या भूमिकेत जगण्याची त्यांचीही इच्छा आहे. गृहिणी असलेल्या पत्नीच्या आकांक्षा पूर्ण करण्याची ओढ आहे. पण या यांत्रिक जगण्याचा वेगच इतका हिंस्र झाला आहे की त्यांचे पत्नीशी असे नाते स्थापित होणेच अवघड होऊन बसले आहे. याची त्यांना खंत वाटते.

'ऐसी क्या हडबडी कि जल्दी में पत्नी को
चूमना
देखो फिर भुल गया।'[29]

पत्नीच्या प्रति असलेले आपले कर्तव्य आपण निभावू शकत नाही, ही खंत त्यांच्या अनेक कवितांमधून प्रकट झाली आहे. सुर्वे ज्याप्रमाणे पत्नीला 'स्वप्नांचे सहोदर' मानतात तसेच धूमिलही पत्नीला 'हमसफर' मानतात. पण परिस्थितीची प्रतिकूलताच अशी आहे को, दोघांनाही पत्नीसाठीचे आपले कर्तव्य निभावणे अशक्य होऊन जाते. याबद्दलची खंत दोघांच्याही कवितेमधून व्यक्त झाली आहे.

'हारलो कैकदा झुंजीत; तूच पदराचे शीड उभारलेस,
हताश होऊन गोठलो; तूच पाठीवर हात ठेवलेस.'[30]

असे पदराचे शीड उभारणारी, पाठीवर हात ठेवून जिद्दीने लढायला प्रेरित करणारी पत्नी धूमिलांच्या कवितेत नाही. पण त्यांच्यासाठी त्यांच्यासोबत उभी राहणारी अर्धांगिनी मात्र आहे. ते म्हणतात,

'पत्नी को थोड़ा अलग
करते-तू मेरी
हमबिस्तर नहीं मेरी
हमसफर हैं।'[31]

अशा 'हमसफर' बनलेल्या पत्नीची साथ असताना जगणे कठिण वाटणार नाही, याची त्यांना खात्री आहे.

'बीवी पास आओ ओर सुनो
जिन्दगी के सपनों पर
सच्चाई की टट्टर गिरा दो।'[32]

कारण पत्नीशिवाय संघर्षामध्ये साथ कोण देणार? यासाठी कवी पत्नीला जवळ बोलावून आयुष्यातल्या स्वप्नांवर सत्याची चादर ओढायला सांगतो. यावरुन त्याचा पत्नीच्या क्षमतेवर असलेला विश्वासच प्रकट झाला आहे.

धूमिलांच्या कवितेमधून पती-पत्नीच्या लैंगिक संबंधाचे चित्रण आहे, परंतु या संबंधातील विकृतीचेही चित्रण आहे. याशिवाय 'दो: पत्नी के लिए' यासारख्या काही कवितांमधून आपल्या सृजनामध्ये पत्नीची भूमिका किती महत्त्वाची आहे, याचेही चित्रण आहे. म्हणून 'तुम मेरे लिए एक सुंदर और सार्थक कविता हो' अशी भावना कवीने प्रकट केली आहे.

अर्थात सुर्व्यांच्या कवितेमधून जसे पत्नीचे एक संपूर्ण व्यक्तिमत्व उभे राहते तसे धूमिलांच्या कवितेमधून घडत नाही. कारण सुर्व्यांच्या भावजीवनात जसे पत्नीचे स्थान मध्यवर्ती राहिले तसे धूमिलांबाबत घडलेले नाही. याशिवाय 'प्रेम' हा जसा सुर्व्यांच्या कवितेचा आत्मस्वर आहे, तसा 'क्रोध' हा धूमिलांच्या कवितेचा केंद्रीय स्वर राहिलेला आहे. म्हणून सुर्व्यांप्रमाणे त्यांच्या कवितेत स्त्रीबद्दल निव्वळ सहानुभूतीची, आदराची किंवा कृतज्ञतेचो भावना नाही; म्हणजे या भावनांचे चित्रणच नाही, असे नाही पण त्यांना मध्यवर्ती स्थान मिळालेले नाही. याउलट ज्यांनी स्त्रीची 'वात्सल्यमूर्ती' अशी रोमँटिक प्रतिमा घडवली आहे, त्यांच्यावद्दलचा उपरोध आणि उपहास हा मुख्यत्वेकरून त्यांच्या कवितेतून प्रकट झाला आहे.

हे असे का घडले असावे? याचे एक कारण म्हणजे धूमिल ज्या भाषिक प्रदेशातून येतात तिथे स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण फारसा उदात्त आणि उन्नत नाही, उलट सुर्वे ज्या भाषिक प्रदेशाचे प्रतिनिधित्व करतात तिथे स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण तुलनेने उदार आहे.

म्हणजे धूमिलांच्या कवितेतून पत्नीचे केवळ रोमँटिक चित्र नाही तर ते वास्तवाच्या अधिक जवळ जाणारे आहे. परंतु असे वास्तवचित्रच अवास्तव वाटल्याने काही समीक्षकांनी मात्र त्यांना स्त्रीव्देष्टे ठरवले आहे.

(ड) आईच्या रूपातील स्त्री :

पत्नीप्रमाणेच सुर्व्यांच्या कवितेतून आईचे जसे संपूर्ण चित्र उभे राहते, तसे धूमिलांच्या कवितेतून घडत नाही. आर्थिक अभावाने ग्रस्त आणि त्रस्त असलेली स्त्री आपल्या मुला बाळांच्या निर्वाहासाठी कशा क्षुद्र तडजोडी करते, या स्वरुपातील आईचे चित्र त्यांच्या कवितेतून उभे राहते.

आपल्या मुला-बाळांच्या निर्वाहाची व्यवस्था कशी करायची, या विवंचनेत बुडून गेलेली आई जशी धूमिलांच्या कवितेत दिसते, ही निर्वाहाची विवंचना त्याच्या वाट्याला येऊ नये म्हणून त्याचा जन्मच नाकारणारी आईदेखील त्यांच्या कवितेत दिसते.

'लेकिन फुले हुओ पेटवाली औरत का चेहरा
उसकी हथेली की तरह सपाट हे वह जानती है
की बच्चे के साथ
दुनिया में क्या आता है
कल भुखे गर्भाशय की
ओट से एक युद्ध अपराधी की
घोषणा होगी।'[33]

आर्थिक अभावापुढे शरण जाणारी आई धूमिलांच्या कवितेत आहे, परंतु सुर्व्यांच्या कवितेतील आईप्रमाणे प्रतिकूलतेशी चार हात करण्याची जिद्द दाखवतांना ती दिसत नाही. याचे कारण ती आपल्या कुटुंबापुरती, 'चुल आणि मूल' सांभाळण्यापुरती मर्यादित झाली आहे, याउलट सुर्व्यांच्या कवितेतील आई मात्र कुटुंब आणि कुटुंबाबाहेरचे जग या दोन्ही डगरींवर हात ठेवून संघर्ष करण्याची तयारी ठेवते. अशी 'लढाऊ आई' धूमिलांच्या कवितेत आढळत नाही.

सुर्वे आणि धूमिल या दोघांच्या कवितेतून चित्रित झालेल्या स्त्री प्रतिमांचा अभ्यास करत असतांना हे दोन्ही कवी ज्या भाषा प्रदेशातील आहेत. तसेच ते ज्या वाङ्मयपरंपरेत लेखन करणारे आहेत, यांच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रभावातून या प्रतिमांमध्ये साम्य-भेद उत्पन्न झाले आहेत.

निष्कर्ष :

१) सुर्वे-धूमिल यांच्या कवितेतील 'स्त्री चित्रणाचा' विचार करता,दोघांनीही स्त्रीकडे पाहतांना सुखद अनुभव देणारी वस्तू, उदात्त देवता, अमूर्त शक्ती असे रोमँटिक दृष्टिकोण टाळून वास्तवातील स्त्री-रुपाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

२) सुर्व्यांच्या कवितेतील स्त्री ही आजपर्यंत मराठी कवितेतून चित्रित झालेल्या स्त्रीरुपापेक्षा निराळी आहे. 'कामकार-कार्यकर्ता' असणाऱ्या पतीच्या जीवनसंघर्षात त्याची बरोबरीने सोबत करणारी 'साथी', तो हताश झाल्यावर त्याला प्रेरित करणारी 'स्फुर्ती' असे तिचे रुप राहिलेले आहे.

३) अर्थात काही कवितांमधून स्त्रीचे होणारे अवमूल्यनही त्यांनी दाखवून दिले आहे. पण त्यांच्या एकूण कवितांचा विचार करता, याचे प्रमाण अगदी अल्प आहे.

४) धूमिलांच्या कवितेतून 'समाजातील अवमूल्यनाचे प्रतिक' या रुपातील स्त्री चित्रित झाली आहे.

५)'औसत कविता,औसत क्रांति और औसत औरत' यांना ठाम विरोध करण्याचा हेतू ठेवून सभ्यता, संस्कृती आणि तिची संकेत व्यवस्था यांचा तीव्र निषेध करणारी कविता त्यांनी लिहिली आहे.

६) भांडवलशाही व्यवस्थेत 'कमोडिटी' बनलेल्या स्त्रीचे चित्र त्यांच्या कवितेत मध्यवर्ती आहे. यामुळे त्यांना 'सरंजामी मानसिकतेचा स्त्रीद्वेष्टा कवी' अशा शब्दांत हिणवले गेले आहे.

७) परंतु त्याचवेळी याकडे दुर्लक्ष करता कामा नये की त्यांच्या अनेक कवितांमधून 'हमबिस्तर नही, तू हमसफर है' या रुपातील स्त्रीही चित्रित झाली आहे; मात्र एकूण कवितांचा विचार करता अशा कवितांचे प्रमाण खूप कमी आहे. म्हणजे सुर्व्यांच्या कवितेत स्त्रीचे 'सर्जन' तर धूमिलांच्या कवितेत स्त्रीचे 'स्खलन केंद्रवर्ती राहिले आहे.

८) असे असले तरी धूमिलांना स्त्रीबद्दल आस्था आणि आत्मियता आहे. मात्र बाजारकेंद्री व्यवस्थेकडून तिचे दिवसेंदिवस होत जाणारे अवमूल्यन पाहून ते उद्विग्न झाले आहेत.अशा उद्विग्नतेचे प्रतिबिंब (चित्र) त्यांच्या कवितेतील स्त्री प्रतिमांतून पाहायला मिळते.

९) सुर्वे 'हे जग कसे असायला हवे?' यादृष्टीने लेखन करणारे आशावादी कवी आहेत, तर धूमिल 'हे जग आता नेमके कसे आहे? 'हे थेटपणाने चित्रित करणारे वास्तववादी कवी आहेत.दोघांच्या भिन्न वृत्तिविशेषांमुळे त्यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमांमध्ये भेद उत्पन्न झाला आहे.

निवडक संदर्भ :

1. उत्तम कांबळे, *लढणाऱ्यांच्या मुलाखती,*मनोविकास प्रकाशन,पुणे,२००८,पृ.४५
2. संपा.वसंत शिरवाडकर, *सर्व सुर्वे,*डिम्पल पब्लिकेशन,ठाणे,१९८५,पृ.२१८-१९
3. नारायण सुर्वे, *ऐसा गा मी ब्रह्म,*पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,२०००,पृ.१४
4. सर्व सुर्वे,उनि,पृ.४७
5. नारायण सुर्वे, *ऐसा गा मी ब्रह्म,* उनि,पृ.४२
6. तत्रैव,पृ.५६-५७
7. सर्व सुर्वे,उनि,पृ.१८०
8. नारायण सुर्वे, *माझे विद्यापीठ,* पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,स.आ.२००४,पृ.४५
9. सर्व सुर्वे,उनि,पृ.२३६
10. सिमोन-दी-बोव्हुआर,(अनु.करुणा गोखले) *द सेकंड सेक्स,*पद्मगंधा प्रकाशन,मुंबई, २०१०,पृ.३८८
11. नारायण सुर्वे, *नव्या माणसाचे आगमन,*पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,१९९५,पृ.५२-५३
12. दिगंबर पाध्ये, *सुर्वे-नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता,* पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,२०११,पृ.१४
13. नारायण सुर्वे, *कहाणी कवितेची,* डिम्पल पब्लिकेशन,ठाणे,२०१०,पृ.२४
14. सर्व सुर्वे,उनि,पृ.२२८
15. डॉ.चमनलाल गुप्त, *सुदामा पांडे-धूमिल की कविता में यथार्थबोध,*भावना प्रकाशन,दिल्ली,१९९०,पृ.७२
16. धूमिल, *कल सुनना मुझे,*वाणी प्रकाशन,दिल्ली,१९९९,पृ.८१
17. Sarda Banerji,Pravkta.com,Pg.02
18. डॉ.चमनलाल गुप्त, उनि, पृ.८२
19. तत्रैव,पृ.७५
20. डॉ.मंजुल उपाध्याय, *समकालीन कविता और धूमिल,*अनामिका प्रकाशन,इलाहाबाद,१९८६,पृ.८५
21. धूमिल, *कल सुनना मुझे,*उनि,पृ.१३०
22. नारायण सुर्वे, *जाहीरनामा,*पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,दु.आ.१९९५,पृ.२५
23. डॉ.मंजुल उपाध्याय,उनि,पृ.८५
24. डॉ.चमनलाल गुप्त, उनि, पृ.८३-८४
25. धूमिल, *कल सुनना मुझे,*उनि,पृ.५७-५९
26. डॉ.ग.तु.अष्टेकर, *कटघरे का कवि,*पंचशील प्रकाशन,जयपूर,१९७९,पृ.१३८-३९
27. धूमिल, *संसद से सडक तक,*राजकमल प्रकाशन,दिल्ली,२०००,पृ.२८
28. धूमिल, *सुदामा पांडे का प्रजातंत्र,*वाणी प्रकाशन,दिल्ली,१९९८,पृ.२६
29. धूमिल, *कल सुनना मुझे,*उनि,पृ.५३
30. नारायण सुर्वे, *ऐसा गा मी ब्रह्म,* उनि,पृ.५३
31. धूमिल, *सुदामा पांडे का प्रजातंत्र,* उनि,पृ.४७
32. तत्रैव,पृ.५९
33. तत्रैव,पृ.८८

मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

डॉ. भाग्यश्री प्रभाकरराव सुभेदार

शासकीय अध्यापक महाविद्यालय, आय.ए.एस.ई., पदमपुरा, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद, पिन कोड - 431005

सारांश

मराठी साहित्याचा उगम १३ व्या शतकातील संत साहित्यापासून झाला असून हा प्रवाह १७ व्या शतकापर्यंत प्रवाहित होता. या दोन्ही प्रवाहांचा कालखंड पाहिल्यास संत साहित्याला सुमारे ५०० वर्षांचा तर आधुनिक साहित्याचा कालखंड गेली दीडशे वर्षांचा आहे. पुरुष आणि स्त्री संत साहित्य हे लोकजीवनाशी जोडलेले आहे. त्यामुळेच ते आजही जनमनात मनात ठसले आहे.

संत साहित्याचे अनेक पैलू नव्या, सखोल आणि वास्तव अभ्यासातून पुढे येत आहेत. संत साहित्याची प्रेरणा ही सामाजिक परिवर्तनाचा एक महत्वाचा भाग बनून राहिली आहे. मोक्षप्राप्ती ही ऐहिक, लौकिक जीवनात प्राप्त करता येऊ शकते. त्याकरता सन्याशीच होण्याची गरज नाही, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम या पुरुष संतांनी आणि संत जनाबाई,संत मुक्तबाई, संत बहिणाबाई, संत कान्होपात्रा, संत वेणाबाई, संत निर्मळाबाई, संत सोयराबाई आदि स्त्री संतांनी याबाबत लोकांना जागृत केले. त्यांच्या मते, विट्ठल हा केवळ मूर्तीरूपातील, मंदिरातील देव नव्हता. विठ्ठल अनेक संत रचनांमध्ये सत्याची प्रतिमा म्हणून उभा आहे. याहीपुढची पायरी म्हणजे हे सर्व संत विट्ठलाला आपली माऊली मानतात, बाप मानतात, सखा मानतात. संत जनाबाईच्या अभंगांमध्ये हे सर्वाधिक प्रभावीपणे जाणवते. जी अनाथ होती, जिचा कुणी रक्ताचा सगासोयरा नव्हता, त्या जनाबाईला संत सहवासात आणि विट्ठल भक्तीत जीवनाचा खरा अर्थ सापडतो. अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीतून संत चोखामेळा, संत सोयराबाई, संत बंका असे संत पुढे आले. शुद्र जातीतून संत गोरा कुंभार, संत नामदेव, संत तुकाराम, संत सावता माळी तसेच संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत गोराई अशा स्त्रिया यात होत्या.

कलावंतीणची पोर म्हणून हीन मानल्या गेलेल्या कान्होपात्राला संत कुटुंबात मानाचे स्थान मिळाले. स्त्री संतांच्या साहित्यातून स्त्रीयांचे प्रश्न समोर आले. संत चोखामेळाला अस्पृश्य म्हणून सहन करावा लागणारा त्रास, ती स्वतःचा उल्लेख 'नामयाची दासी' असा करते. स्त्री संतांनी आत्मिक उन्नतीच्या मार्गाचा वापर समाजप्रबोधन आणि समाज परिवर्तनासाठी केला.

संत साहित्यातील प्रमुख स्त्री संतांचा जीवनाप्रती असलेला दृष्टीकोण,त्यांच्या आयुष्यातील परवड, पुस्तकी शिक्षणाचा लवलेश नसतानाही त्यांनी केलेल्या अप्रतिम काव्य रचना,अभंग,श्लोक आपल्याला अंतर्मुख करतात. मराठी साहित्यातील प्रमुख स्त्री संतांची प्रतिमा निश्चितच समाजाला मोलाची शिकवण देणारी आणि अंतर्मुख करणारी आहे.

प्रस्तुत लेखात खालील प्रमुख स्त्री संतांचे जीवन कार्य आणि त्यांचा जीवनविषयीचा सकारात्मक दृष्टीकोण मांडण्यात आलेला आहे.

मराठी साहित्याचा उगम १३ व्या शतकातील संत साहित्यापासून झाला असून हा प्रवाह १७ व्या शतकापर्यंत प्रवाहित होता. या दोन्ही प्रवाहांचा कालखंड पाहिल्यास संत साहित्याला सुमारे ५०० वर्षांचा तर आधुनिक साहित्याचा कालखंड गेली दीडशे वर्षांचा आहे. पुरुष आणि स्त्री संत साहित्य हे लोकजीवनाशी जोडलेले आहे. त्यामुळेच ते आजही जनमनात मनात ठसले आहे.

संत मुक्ताबाई : संत साहित्यातील संत मुक्ताबाई या एक प्रमुख संत आहेत .संत ज्ञानेश्वरांची धाकटी बहीण म्हणजे संत मुकताबाई. मुक्ताईच्या नावावर एकूण ४२ अभंग आहेत. याशिवाय नामदेव गाथेतील 'नामदेव-भक्तिगर्वपरिहार' या मथळ्याखालील अभंगांपैकी (१३३४ ते १३६४) दहापंधरा तरी निश्चितपणे मुक्ताईचे आहेत. तसेच गाथेत न मिळणारे 'ताटीचे अभंग' ही तिचेच होत. म्हणजे तिची एकूण अभंगरचना सुमारे पाऊणशेच्या घरात जाईल. ती सर्व रचना काव्यगुणांनी समृद्ध आहे. ती मुख्यतः भक्तिपर असली तरी योगमार्गाच्या खुणांनीही युक्त आहे.

मुक्ताईच्या काव्यात तिच्या जीवनाचे व प्रतिभेचे अनेक पैलू उठून दिसतात. अंधपणामुळे वाया जात असलेल्या या मुक्ताईला निवृत्तिराजाने सावध केले व त्यामुळे **'मुक्तपणे मुक्त । मुक्ताई पैंरत । हरिनाम स्मरत । सर्वकाळ ।'** अशी आपली

अवस्था होऊन गेल्याचे ती सांगते. तिच्या अभंगात योगाच्या खुणा आहेत, अध्यात्माची उंची आहे, साक्षात्काराचे पडसाद आहेत, हे सर्व खरे; पण त्याबरोबरच त्यांत हृदयाचे मार्दव आणि भावनेची हळुवारताही आहे. तसे पाहिल्यास तिचा स्वभाव सोपानदेवाप्रमाणे थोडा परखड दिसतो.

पण ताटीच्या अभंगात तिच्या या स्पष्टवक्तेपणाने थोडे निराळे वळण घेतले आहे. एक दिवस ज्ञानदेवांना पाहून कोणा टवाळाने त्यांना संन्याशाचा पोर म्हणून हिणवले तेव्हा ज्ञानदेव मनात खिन्न होऊन झोपडीत जाऊन बसले व काही केल्या ताटीचे दार उघडीनात. त्या वेळी मुक्ताईने त्यांच्या ज्या विनवण्या केल्या त्या 'ताटीचे अभंग' म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांत जसा वडील भावावर रुसलेल्या धाकट्या बहिणीचा लडिवाळपणा आहे, तसाच परिणत प्रौढत्वाला साजेल असा समंजसपणाही आहे.

मुंगी उडाली आकाशी । तिने गिळिले सूर्यासी । असे तिचे एक वचन आहे. हे तिला स्वतःलाही लागू पडते.

मुक्ताईच्या चरित्रातील दुसरी विशेष गोष्ट म्हणजे तिने ज्ञानदेवांच्या भेटीस आलेल्या अहंमन्य नामदेवांचे उघडे केलेले अज्ञान. तिचे त्या प्रसंगी जाणवलेले प्रभावी व्यक्तिमत्त्व पाहूनच नामदेवांनी तिच्याविषयी 'लहानशी मुक्ताबाई जैसी सणकांडी । केले देशोधडी महान संत' असे उद्‌गार काढले. पुढे नामदेव-चांगदेव ह्या दोघांनी तिचा गौरव केला आहे

संत जनाबाई : मराठी संत साहित्यातील प्रमुख संत म्हणजे संत जनाबाई होत. संत जनाबाई या संत कवयित्री म्हणून जनमानसात लोकप्रिय आहेत. गोदावरीच्या तीरावरील परभणी जिल्ह्यातील गंगाखेड हे जनाबाईंचे गाव होय. जनाबाई ह्या पंढरपूरचे वारकरी 'दमा' आणि भगवद्भक्त स्त्री 'करुंड' या दांपत्याची मुलगी होत. आई व वडील पंढरपूरच्या विठ्ठलाचे परमभक्त होते. तिच्या वडिलांनी जनाबाईंना दामाशेट शिंपी यांच्या पदरात टाकले, तेव्हापासून त्या संत शिरोमणी नामदेव यांच्या कुटुंबातील एक घटक बनल्या. त्या स्वत:ला 'नामयाची दासी' म्हणवून घेत असत.

संत नामदेवांच्या सहवासात जनाबाईंनीही विठ्ठलाच्या भक्तीचा ध्यास घेतला होता. **'दळिता कांडिता तुज गायीन अनंता'** असे त्या म्हणत असत. संत नामदेव हेच त्यांचे पारमार्थिक गुरू होते. श्री संत ज्ञानदेव-विसोबा खेचर-संत नामदेव-संत जनाबाई अशी त्यांची गुरुपरंपरा आहे. **विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा।।**' हा प्रसिद्ध अभंग जनाबाईंचाच आहे. त्यांना संत नामदेवांमुळे सतत संत-संग घडला होता. संत ज्ञानदेवांविषयीही त्यांचा भक्तिभाव अनन्यसाधारण होता. **'परलोकीचे तारू। म्हणे माझा ज्ञानेश्वरु।'** असे त्यांनी ज्ञानेश्वरांविषयी म्हटले आहे. गौऱ्या-शेण्या वेचतांना, घरातील इतर कामे करत असताना त्या सतत देवाचे नामस्मरण करत असत.

संत जनाबाईंच्या नावावर असलेले एकूण सुमारे ३५० अभंग सकल संत गाथेत मुद्रित केले आहेत. ह्या शिवाय कृष्णजन्म, थाळीपाक, प्रल्हादचरित्र, बालक्रीडा, हरिश्चंद्राख्यान अशा आख्यानरचना पण त्यांच्या नावावर आहेत. संत जनाबाईंच्या थाळीपाक व द्रौपदी स्वयंवर या भावमधुर आख्यानांनी महाकवी मुक्तेश्वरांना (संत एकनाथांचे नातू) स्फूर्ती मिळाली. संत जनाबाईंची भावकविता ही भगवंताच्या प्रेमाने ओतप्रेत भरलेली आहे. पूर्ण निष्काम होऊन लौकिक, ऐहिक भावना विसरून त्या विठ्ठलाला शरण गेलेल्या आहेत. आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडण्यापूर्वीच त्या निर्विकार झाल्या आहेत. संत जनाबाईंच्या जीवनातील अनंत अनुभूती त्यांनी त्यांच्या रचनांतून रेखाटल्या आहेत. संत नामदेवांवरील भक्ति-प्रेमभाव, संत ज्ञानदेवांविषयी असलेला उत्कट भाव, संत चोखोबांच्या भावसामर्थ्याचे अनुसरण, तसेच विठ्ठलाविषयीचा भक्तिभाव त्यांच्या काव्यात ओतप्रोत भरलेला दिसून येतो. वेळप्रसंगी देवाशी भांडायला पण त्या कमी करत नाहीत. 'वात्सल्य,कोमल ऋजुता, सहनशीलता, त्यागी वृत्ती, समर्पण वृत्ती, स्त्री विषयीच्या भावना संत जनाबाईंच्या काव्यात प्रकर्षाने दिसून येतात, असे ज्येष्ठ अभ्यासक रा. चिं. ढेरे त्यांच्या काव्याचे रसग्रहण करताना म्हणतात.

तत्कालीन संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत सोपानकाका, संत गोरोबा, संत चोखा मेळा, संत सेना महाराज आदी सत्पुरुषांच्या जीवनाचा, सद्‌गुणांचा आढावा घेणारी पद्यरचना करून संत जनाबाईंनी पुढील पिढ्यांवर एकप्रकारे उपकारच करून ठेवले आहेत. त्यांची भाषा सर्वसामान्य माणसांच्या हृदयाला जाऊन भिडते. संत जनाबाईंचे बरेचसे अभंग नामदेव गाथेमध्ये आहेत.

संत बहिणाबाई : संत साहित्यातील दुसऱ्या संत म्हणजे संत बहिणाबाई (इ.स. १६२८ (शके १५५१) - २ऑक्टोबर, १७००) या एक वारकरी संप्रदायातील मराठी स्त्री संत कवयित्री आणि संत तुकारामांच्या शिष्या होत्या. स्वप्नात तुकारामांनी त्यांना

दृष्टान्त दिला. पुढे प्रत्यक्ष तुकारामांचे त्यांना दर्शन झाल्यावर त्यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. तथापि एका ब्राम्हण स्त्रीने तुकारामांचे शिष्य व्हावे ही गोष्ट सनातन्यांना पटणारी नव्हती. मंबाजीने तर त्यांचा खूप छळ केला पण त्यांनी आपली तुकाभक्ती सोडली नाही. बहिणा आपल्या गुरूंचा उल्लेख पदोपदी आपल्या अभंगात करीत.

बहिणाबाई म्हणतात **'तुका सद्गुरू सदोहर । भेटतो अपार सुख होव ॥ तुकारामा भेटला धन्य जिने माझे कृत्यकृत्य झाले सहजाचि |**

माता-पित्यानी तिचा विवाह वयाच्या पाचव्या वर्षी त्याच गावापासून पाच कोसावर असलेल्या ३० वर्षाच्या रत्नाकर फाटक नावाच्या बिजवरांशी. त्यांना आधीची दोन मुले होती. घरची गरिबी, शिक्षणाचा अभाव, तरीही समाधानी वृत्ती व संतवृत्तीला साजेशी पांडुरंगाची ओढ मनात होतीच. अखंड नामस्मरण चालू असे. शेतात काम करीत असतानाही हा भक्तिभाव अभंगाचे रूपाने तिच्या मुखातून बाहेर पडे.

बहिणाबाईचे सारे जीवन गुरूबोधामुळे बदलून गेले. तिने आपले गुरू संत तुकाराम महाराज व त्यांचीही गुरूपरंपरा आपल्या अभंगांत वर्णन केली आहे. तुकाराम महाराजांविषयीं प्रत्यक्ष माहिती असलेल्या कवयित्रीचे हे अभंग आहेत, त्यामुळे या अभंगांना विशेष महत्त्व आहे. त्यांचे वर्णन करताना गेल्या शतकातील एक श्रेष्ठ संत, संतचरित्रकार आणि 'श्री गजानन विजय'कर्ते संतकवी दासगणू महाराज लिहितात, "पहा केवढा अधिकार .. ऋणी तिचा परमेश्वर ...". त्यांच्या अभंगांपैकी 'संत कृपा झाली। इमारत फळा आली ॥' हा अत्यंत प्रसिद्ध अभंग आणि 'घट फुटलियावरी। नभ नभाचे अंतरी॥' हा शेवटचा अभंग सांगितल्यावर त्या समाधिस्थ झाल्या.

अभंग, ओव्या, श्लोक, आरत्या इत्यादी मिळून ७३२ कविता त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या या कविता भक्तिभावाचा उत्स्फूर्त अविष्कार आहे. वेदान्ताचे प्रतिपादनही त्यात आढळते. त्यांच्या अभंगांतून संत तुकारामांच्या चारित्र्याचे अस्सल दर्शन घडते. **ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस!** या प्रसिद्ध अभंगाची रचना संत बहिणाबाई यांचीच आहे.

संत वेणाबाई : संत वेणाबाई या श्रेष्ठ रामभक्त होत्या. रामदासी मठामध्ये त्यांचे स्थान महत्वपूर्ण आहे.रामदासी पंथाच्या प्रसारासाठी त्यांनी त्यांचे आयुष्य वेचले.

संत कान्होपात्रा : शके १३९० कान्होपात्रांचे अभंग म्हणजे जीवनाचा आरसाच जणू.तिच्या अभंगात आर्तता,आत्मनिष्ठता दिसते.वारकरी संप्रदायातील या श्रेष्ठ स्त्रिया होत.

संत सोयराबाई : संत सोयराबाई या १४व्या शतकातील मराठी कवयित्री असून संत चोखामेळा यांच्या पत्नी होत्या. सोयराबाईंनी बरेच अभंग लिहिले पण केवळ ९२ उपलब्ध आहेत. तिच्या अभंगांमध्ये ती स्वत:ला चोखामेळयाची महारी म्हणते. चोखोबाची बायको असे अभिमानाने म्हणवून घेत असली तरी तिने स्वतःचे वेगळेपण सिद्ध केले आहे. अत्यंत साधी, सोपी आणि रसाळ भाषा हे सोयराबाईंच्या अभंगांचे वैशिष्ट्य होय.

त्या काळी सवर्ण लोक शूद्राच्या सावलीचाही विटाळ मानीत असताना, संत सोयराबाई बंड करून उठतात व देवाशी वाद घालतात आणि देवाला विचारतात, देहात विटाळ वसतो मग देह कोणी निर्माण केला? सोयराबाईंना असा विश्वास होता की "केवळ शरीर अपवित्र किंवा प्रदूषित असू शकते परंतु आत्मा कधीही अशुद्ध नसतो. ज्ञानार्जन हे शुद्धच असते. "त्या म्हणतात,

देहासी विटाळ म्हणती सकळ | आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ||
देहीचा विटाळ देहीच जन्मला | सोवळा तो झाला कवण धर्म ||

त्यांच्या काव्यरचनेत साधेपणा,भक्तीभाव,निर्मळपणा दिसून येतो.

संत साहित्यातील प्रमुख स्त्री संतांचा जीवनाप्रती असलेला दृष्टीकोण, त्यांच्या आयुष्यातील परवड, कष्टकरी जीवन, हालअपेष्टा, शारीरिक, मानसिक त्रासाने ग्रासलेल्या, पुस्तकी शिक्षणाचा लवलेश नसतानाही त्यांनी केलेल्या हृदयस्पर्शी अशा अप्रतिम काव्य रचना, अभंग, श्लोक आपल्याला जीवन जगण्याची उमेद दाखवितात. संत आपल्याला अंतर्मुख करतात. खरा निस्वार्थ भक्तीमार्ग स्वीकारलेल्या मराठी साहित्यातील प्रमुख स्त्री संतांची प्रतिमा निश्चितच समाजाला मोलाची शिकवण देणारी, जीवन जगण्याचा मार्ग दाखविणारी, संघर्षाला वाचा फोडणारी, प्रतिकूल परिस्थितीशी सामोरे कसे जावे, मार्ग कसा

काढावा, आशावादी दृष्टीकोण असणारी श्रेष्ठ आणि अंतर्मुख करणारी आहे. आजच्या आधुनिक स्त्रियांनी या श्रेष्ठ स्त्री संतांकडून निश्चितच त्यांनी अनुसरलेल्या मार्गाचे अनुकरण केले पाहिजे असे वाटते.

संदर्भ:

१. कर्वे ,स्वाती(२०१२),१०१ कर्तुत्ववान स्त्रिया,पुणे : उत्कर्ष प्रकाशन.

२. कुलकर्णी,स्वराली चंद्रकांत,स्त्रीवादी इतिहासलेखन मध्ययुगीन भक्तीचळवळीतील संत स्त्रिया, पुणे : इतिहास विभाग,टी.म.वि.

३. तुळपुळे,शं.गो.,माहिती स्त्रोत ,मराठी विश्वकोश

४. पाटील, तानाजी राऊ (२०२०),संत साहित्यातील सामाजिकता,विश्वकर्मा पब्लिकेशन्स

वारली लोकगीतांतून अभिव्यक्त झालेली स्त्रीप्रतिमा

डॉ. गीता जाधव
श्रीमती पी. एन. दोशी विमेन्स कॉलेज, कामा लेन, घाटकोपर (प.), मुंबई ८६

पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रीला कायमच दुय्यम स्थानी ठेवले असले तरी स्त्री ही निश्चितपणे समाजाचा अविभाज्य घटक आहे. म्हणूनच जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील स्त्रीच्या अस्तित्वाची जाणीव सूज्ञांना नजरेआड करावीशी वाटत नाही. साहित्य हा समाजमनाचा आरसा आहे असे म्हटले जाते. या आरशात स्त्रीचे प्रतिबिंब नेमके कसे पडते हे समजून घेणेही त्यामुळेच महत्त्वाचे ठरते. १९६० नंतर मराठी साहित्यात वेगवेगळे साहित्यप्रवाह निर्माण झाले.आदिवासी साहित्यप्रवाह हा त्यापैकीच एक. वास्तविक इतर लोकसाहित्याप्रमाणेच आदिवासींचे साहित्य मौखिक स्वरूपात फार प्राचीन काळापासून अस्तित्वात होते. परंतु स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक सकारात्मक बदलांमुळे समाजाला या मातीशी घट्ट नाळ जुळलेल्या साहित्य खजिन्याची जाणीव झाली. त्यासाठी देशाची स्वातंत्रप्राप्ती, प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेचा भारताने केलेला स्वीकार, संविधानाने केलेला स्वातंत्र्य, समता आदी लोकशाहीवादी मूल्यांचा पुरस्कार, स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण त्यामुळे आपापल्या हक्कांची जाणीव होऊन त्यासाठी संघर्ष करणारे विविध समाजघटक, त्यातून उभ्या राहिलेल्या वंचितांच्या चळवळी अशा अनेक घडामोडी कारणीभूत ठरल्या. मुख्य प्रवाहातील लोकाना नव्याने ज्ञात झालेल्या आदिवासी साहित्याने प्रस्थापितापेक्षा वेगळ्या लोकजीवनाचे दालनच खुले केले. निसर्गाच्या सानिध्यात जगणाऱ्या, खऱ्या अर्थाने वनवासी असलेल्या आदिवासी समाजातील लोकांचा दैनंदिन जीवनव्यवहार, त्यांच्या ईश्वरकल्पना, श्रद्धा अंधश्रद्धा, सणवार, परंपरा, रीतीरुढी, रोजच्या जगण्यातील प्रश्न, त्यांची सुखदुःखे आणि या सगळ्याचे चित्र रेखाटणारे लोकसाहित्य हे सगळे प्रस्थापितांसाठी खूपच वेगळे होते.

कोणतेही पांढरपेशे हेतू समोर न ठेवता, सहज येता जाता रचलेली, केवळ आनंदासाठी म्हटली गेलेली आणि दैनंदिन जीवनाशी, निसर्गाशी ज्यांचा खूप निकटचा संबंध आहे अशा आदिवासी लोकगीतांतून त्यांच्या जीवनव्यवहाराचे जसे चित्रण केले जाते तसेच समाजमनातील स्त्रीप्रतिमेचे चित्र अतिशय प्रभावीपणे स्पष्ट होत जाते. कविता महाजन यांनी संपादित केलेल्या 'वारली लोकगीते' या पुस्तकाच्या आधारे वारली लोकगीतातून दिसणारी स्त्री प्रतिमा नेमकी कशी आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केला आहे. या पुस्तकात वारली समाजातील विविध लोकगीते संकलित केलेली आहेत. विविध प्रसंगांच्या, सणवारांच्या, दैनंदिन कामकाजाच्या निमित्ताने गायल्या जाणाऱ्या या लोकगीतांतून वारली समाजातील स्त्रीचे स्थान, स्त्रियांकडे पाहण्याचा पुरुषाचा आणि एकूणच समाजाचा दृष्टिकोन, स्त्रीचा स्वतःकडे पाहण्याचा दृष्टिकोन या सगळ्याची माहिती मिळते. त्याशिवाय स्त्रीचे व्यवस्थेच्या अधीन जगणे, तिची अगतिकता, तिचे प्रश्न, त्या प्रश्नांना सामोरे जातानाचा तिचा आत्मविश्वास, निर्भयता, तिची स्वप्ने, तिच्या अपेक्षा अशा अनेक गोष्टी उलगडत जातात. या सगळ्याच वेध घेण्याचा प्रयत्न या निबंधात केला आहे. अर्थात आदिवासी लोकगीतातून दिसणारी ही स्त्री प्रतिमा प्रस्थापित समाजाच्या स्त्री प्रतिमेपेक्षा पूर्णतः वेगळी आहे असे म्हणता येत नाही. तिच्याशी तिचे नाते आहेच परंतु आधुनिकतेचे वारेही न लागलेल्या विशिष्ट जीवन व्यवहाराचे आचरण करणाऱ्या या समाजातील स्त्री निसर्गाच्या, पारंपारिक जगण्याच्या अधिक निकट जाणारी आहे म्हणूनच ती प्रस्थापित समाजातील स्त्री प्रतिमेपेक्षा वेगळी ठरते

आदिवासी समाजाचे अनुभवविश्व अद्याप मर्यादित आहे. शिक्षण, दळणवळणाची साधने, प्रसारमाध्यमे यापासून हा समाज अजूनही दूरच आहे. आधुनिक विचार, स्वातंत्र्य, समता आदी मूल्यजाणीव यांचा पुरेसा परिचय नाही. साहजिकच या सगळ्याचा परिणाम त्यांच्या जीवनव्यवहारावर होतो. म्हणूनच आदिवासी स्त्रीसुद्धा पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रीयांसाठी आखून दिलेल्या चौकटीचा सहज स्वीकार करताना दिसते. कितीही त्रास होत असला तरी निसर्गाने स्त्रीवर सोपवलेली प्रजोत्पादनाची जबाबदारी असो वा समाजाने लादलेल्या तिच्या संदर्भातील अपेक्षा असोत ही स्त्री कटकट करताना दिसत नाही. वंशविस्ताराच्या जबाबदारीला तर ती भूषणच मानताना दिसते. मुलांचे जन्म, त्यांचे संगोपन यात ती रंगून जाते. त्यांच्या समृद्ध भविष्याची स्वप्ने पाहते. सासू-सासरे, मोठा दीर यांनी दिलेला"सूने तू होशील ग सात पोरांची मायू" (पृष्ठ ५) हा आशीर्वाद मनापासून स्वीकारते. इतकेच नव्हे अपत्यप्राप्ती होताना मदत करणाऱ्या सुईणीला तर ही स्त्री देवाचे स्थान देते, म्हणूनच धवलेरीच्या गाण्यात देवांना आमंत्रण देताना, 'सुईणबाईला बोलवा' असे खास आमंत्रण दिले जाते.

विवाहाची, स्वतःच्या संसाराची आस असलेली स्त्री अनेक लोकगीतांमध्ये दिसते.

" बारा वर्ष सरून गेली गं गरसोलीसाठी
जाईन जाईन बाबा जोगीयापाठी" (पृष्ठ -73)

अशाप्रकारे व्यवस्थेने आखून दिलेल्या चौकटीत जगण्याचा ती अट्टाहास करते. पदरी पडले पवित्र झाले इतक्या समजूतदारपणे नवरा, सासर यांचा स्वीकार करते. माहेर सोडणे कितीही त्रासदायक असले तरी त्यास निग्रहाने दूर सारून सासर हेच आपले वर्तमान, भाग्यधेय आहे असे मानते.

" रेखा सावर ग सावर, तुझा उलटा पदर वरचेवर
रेखा आस ग आस, तुझी आस दोन दिसांची
रेखा सासू ग सासू, तुझी आहे जन्माची" (पुष्ट. 50)

किंवा

"रेखा तू सासऱ्याला, सासऱ्याला काय म्हणणार
माझ्या मनाने ग मनाने बाबा म्हणणार!" (पृष्ठ 52)

वारली लोकगीतातील स्त्री अशी मनापासून परंपरेत उतरते आहे. काळाबिळा, बारीक-सारीक, गोरगरीब नवरा कसाही असला तरी 'मला तो पत्करला' अशा शब्दात ती नवऱ्याचा स्वीकार व्यक्त करते.

" तरी माझे धन्याला वाढवीन ..
करीन जन्माचा सोबती, सोबती ग
करीन जन्माचा सोबती!" (पृष्ठ 128)

नवरा कितीही दुर्बल, गरीब असला तरी मी त्याला साथ देईन, त्याची जन्मभर सोबत करीनही निष्ठा आणि आत्मविश्वास तिच्यापाशी आहे. अनेक वारली लोकगीतांतून स्त्रीचे संसारावरचे प्रेम, माया दिसत राहते. तिला सासू-सासऱ्यांच्या गोतावळयाने भरलेले घर, गाई वासरानी भरलेले गोठे, तांदळांनी भरलेली कोठारे हवी आहेत. गरिबी पाचवीला पुजलेली असतानाही ही स्त्री समृद्ध संसाराची स्वप्न पाहते. यातून तिचा जगण्याविषयीचा सकारात्मक दृष्टिकोन दिसतो. शेण आणणे, अंगण सारवणे, अंगणातील तुळस पुजणे, रानातून सरपण आणणे, गाईची धार काढणे, बाळाला दुध पाजणे या सगळयात ती रंगून जाते, धन्यता मानते. आदर्श कुटुंबाचे स्वप्न ती पाहते. उदा. सून उन्हातन्हात दुपटी धुवायला गेली असता सासरा तिची काळजी घेतो, तिच्यासाठी लाल छत्री पाठवतो. अशाप्रकारे वारली लोकगीतांतूनस्त्रीच्या जीवनाबद्दलच्या अपेक्षा आणि त्यातून निर्माण झालेले सुखी, आदर्श जीवनाबद्दलचे स्वप्नरंजन व्यक्त होताना दिसते. तर दुसऱ्या बाजूला ही स्त्री करत असलेला समोर आलेल्या प्रतिकूल वास्तवाचा स्वीकारही दिसतो. तिचे दुःख, तिचे क्लेशही तितक्याच सहजतेने मांडले जातात.

परंपरेच्या चौकटी सांभाळताना दुरावलेल्या माहेराच्या, प्रियजनांच्या आठवणी तिला व्यथित करतात. आई, बाप, भाऊ यांच्या आठवणीने कातर झालेली, मागल्या दारी जाऊन गुपचूप रडणारी स्त्री आपल्याला इथे भेटते. आपल्या दूर जाण्याने दुःखी झालेल्या आई-बापाची तिला जाणीव आहे. सासरच्या गरिबीला, सासूने, नवऱ्याने केलेल्या छळवादाला, मारहाणीला सामोरे जाताना तिला ही आठवण अधिकच विद्ध करते. तरीही जीवाच्या कराराने सासरशी जुळवून घेणारी ही स्त्री वाचकाला अस्वस्थ करते. याबरोबरच दैनंदिन जीवनातील पाण्याचे दुर्भिक्ष,अन्नधान्याची टंचाई या सगळ्या गोष्टी तिची पाठ सोडतच नाहीत. दिवस-रात्र पाणी वाहण्याचे कष्ट रेटणारी ही स्त्री जेव्हा जोग्याने जादू केली आणि पाण्याचा सुकाळ झाला असेल स्वप्नरंजन करते तेव्हा आश्चर्य वाटते तिच्यातील दुःखापासून स्वतःला दूर ठेवण्याच्या वृत्तीला सलाम करावासा वाटतो.

बावडी भरूनीशा आल्या
तली भरूनीशा आल्या
पाण्या निघाल्या नगरच्या नारी
दुडी भरून आणिल्या" (पृष्ठ 107)

या ओळी रचणाऱ्या स्त्रीची निरागसता आणि जीवनप्रियता खरंच वाखाणण्याजोगी आहे. इतके चिवटपणे जगणाऱ्या, आणि नुसतेच जगू नाही तर हौसेने जगू पाहणा-या, जीवनाचा समंजस स्वीकार करणाऱ्या या स्त्रीच्या वाट्याला खरेतर अतिशय खडतर जगणे आलेले आहे. स्त्री म्हणून असलेले तिचे परावलंबी जगणे या गाण्यांतून पुन्हा पुन्हा व्यक्त होते. आई-बाबांनी दूर कुठेतरी हिरव्या पोपटी जंगलात लग्न करून पाठवणे, तिथे तिला भोगावा लागणारा वनवास याबद्दल ती बोलते. 'लोकांच्या मुली हुंबाजांबाची, कोकरा टेंबराची फळे खातात मी काय इथे वांदराची विषारी फळे खाऊ?'अशा शब्दांत ती आपला उद्वेग व्यक्त करते. उपासमारीला कंटाळून माहेरी निघून जाण्याविषयी ती बोलते तेव्हा "शेंडी नवऱ्याला बांधायची, तरी तुजला नांदवायची." ही सासूने दिलेली धमकी असो किंवा तिला माहेरी जाण्यासाठी सासू, सासरा, दीर या सगळ्यांनी नाकारलेली आणि नवऱ्याने दीड दिवसांसाठी दिलेली परवानगी असो यातून स्त्रीचे परावलंबित्व अधोरेखित होत

जाते.'गौरीची कथाव्यथा' या गाण्यात गौरीच्या निमित्ताने ती स्वतःचीच अगतिक परिस्थिती मांडते आहे असे दिसते.वांझोटी ठरवून शेवाळागत निसरड्या मनाच्या नवऱ्याने दुसरी बायको आणणे, आणि या वांझोटीच्या पोटी नवससायासाने जन्माला आलेल्या मुलानेच तिला मारहाण करणे या अपमानास्पद जगण्यातले दुःख विषण्ण करून टाकणारे आहे.

या स्त्रीच्या वाट्याला आलेली ही अगतिकता टोकाची असली तरी तीही जिवंत माणूस आहे. त्यामुळे तिचा वैताग, राग, संतापही काहीवेळा लोकगीतांतून व्यक्त होतो. सासऱ्याला जेवणात माशाचे काटे वाढणारी, सासूला, नणंद, दीर यांना नावे ठेवणारी स्त्रीही इथे भेटते. भावाच्या अंगणात नारळीची बाग डोलत असताना स्वतःच्या चोळीच्या वाती झाल्या म्हणून नवऱ्याला नव्या चोळीसाठी मागणे मागणारी स्त्री एका अर्थाने माहेर आणि सासर यांच्यातील आर्थिक तफावतीचे वैषम्यच व्यक्त करते. पैसा असूनही गरीब बहिणीला मदत न करणाऱ्या स्वार्थी भावाला तो पाहुणा आला असता विषाच्या वड्या वाढून मारून टाकणारी क्रूर बहीणही याच लोकगीतात भेटते. तिची कृती कितीही दुष्ट वाटली तरी तिला भोगावे लागलेले दुःख किती टोकाचे आहे आहे हेही समजून येते.

लोकगीतांतून चित्रीत होणाऱ्या स्त्रीच्या प्रतिमेमागे उभे असते ते स्त्रीचे त्या समाजात रुळलेले सामाजिकीकरण. समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, तिच्याशी असलेले व्यवहारिक लागेबांधे या सगळ्या गोष्टींच्या आधारे बालपणापासून स्त्रीचे सामाजिकीकरण होत असते. यातूनच स्त्रीही घडत असते. तिची स्वप्रतिमा आकाराला येत असते. गरिबीमुळे मुलींना पोसणे जमत नाही म्हणून बापाने त्यांना पेटीत घालून समुद्रात लोटून दिल्याच्या कथांचे संदर्भ अनेकदा लोकगीतांमध्ये सापडतात. येथे स्त्री कुटुंबासाठी ओझे असते, तर मुलीच्या लग्नानंतर तिचा माहेरघरचा कष्टाचा वाटा कमी होतो. त्याबदल्यात नवऱ्याकडून मुलीच्या माहेरी देज (हुंडा) देण्याची प्रथा आदिवासी समाजात आहे . तांदूळ, नारळ, हळद , सुपारी अशा वस्तू देज म्हणून दिल्या जातात. देज म्हणजे वधूमूल्य असते. अशा प्रथांतून स्त्रीकडे एक उपयोगाची वस्तू म्हणून पाहिले जाते असे लक्षात येते. केवळ वचनाला जागण्यासाठी मुलीचे गरीब घरात लग्न लावून देणारा पिताही तिच्या भावनांचा, गरजांचा, मतांचा विचार करीत नाही. स्वतःचा मान राखण्यासाठी मुलीला गरिबाघरी सून म्हणून ढकलतो. तर कधी स्त्रीच्या शारीरिक सौंदर्यावर भाळलेला पुरूष तिच्याशी लग्न करून तिला आपलीशी करतो. 'मंडपात गुलाबाचा फुल' या लोकगीतातून स्त्रीला गुलाबाच्या फुलाची दिलेली उपमा आणि जगनबाळ म्हणजे नवऱ्या मुलाने ते फूल खडून मंडपी उभे करण्याचा उल्लेखयातून तिच्याकडे पाहण्याची पुरुषाची उपभोगवादी दृष्टीच अधोरेखित होते.

स्त्रीला पुरुषांच्या या वृतीची नेमकी कल्पना आहे. त्यामुळे आपला नवरा दुसऱ्या स्त्रीच्या नादाला लागू नये यासाठी ती काहीवेळा खबरदारी घेताना दिसते. म्हणूनच भाऊ घरी आल्यावर त्याचे पाय धुणारी, त्याला पुरणावरणाचा स्वयंपाक करून जेवू घालणारी स्त्री बहिणीच्या येण्याने मात्र अस्वस्थ होते.पाहुण्या आलेल्या बहिणीला ती पाणीही देऊ इच्छित नाही की तिला बसायला पाटही देत नाही. बहिणीचे स्वागत करायला ती अजिबात तयार नाही.त्यासाठी ती वेगवेगळी कारणे सांगते. खरेतर त्यामागे आपल्या नवऱ्याचे बहिणीवर मन जडेल याची तिला भीती आहे. या भीतीमागे या समाजातील काही वहिवाटी असाव्यात.पुरुषांनी लिहिलेल्या लोकगीतांतून अनेकदा भावोजी आणि मेव्हणी यांच्यातील आकर्षणाचे अनेक संदर्भ उघडपणे येतात. तसेच नवऱ्याने तिची बहीणच सवत म्हणून आणण्याचे उल्लेख पुन्हापुन्हा येतात असे दिसतेयामागेही वरील कारण असावे.

आदिवासी स्त्री ही स्वतःच्या घरातशोषित आहेच पण गरीबीमुळे तिला घराबाहेरच्या समाजातही लैंगिक शोषणाच्या, छेडछाडीच्या अनुभवांना सामोरे जावे लागते. अशा प्रसंगांना आपल्या कुवतीनुसार ती विरोध करते. आगळीक करणाऱ्या पुरुषाला आईबापाचा, प्रसंगी पाटलाचा धाक दाखवते.

हलकट मेल्या, पापी चांडाळा
नाय होत अंगाची अस्तुरी रं
नको देव सुपारी गवसूनी रं
जावून सांगन आयेला, आयला रं
जाऊन सांगन बापाला, बापाला रं
नेईन पाटलाचे ओटीला,ओटीला रं
सांगन तुला मी कुटाया,कुटाया रं (पृष्ठ 131)

तर कधी भारा उचलताना छेडछाड करू पाहणाऱ्या पुरुषाला ती

छेडछाडी नाही बरी रे दाजीबा
फुकट पैसे भरशील रे दाजीबा (पृ. 134) अशा शब्दात दटावतें

लोकगीतातील या स्त्रीची लैंगिक आगळीक करू पाहणारे हे पुरुषही काही फार श्रीमंत तालेवार नाहीत. गाई म्हशी राखणारे, शेळ्या हाकणारे, ढोल वाजवणारे हे पुरुष तसे पाहता यथातथाच आहेत पण त्यांच्याही समोर या स्त्रीला "असा नको धरू रे ढोलकेदादा, घरी आहे तानुला बाला रे "अशी विनवणी करावी लागते यावरून आदिवासी स्त्रीच्या शोषणाची कमाल पातळी लक्षात येते.

मात्र वारली लोकगीतातून भेटणारी ही स्त्री काहीवेळा खोडसाळपणाही करते. स्वतःच्या लैंगिक प्रेरणांचा मुक्त उच्चारही करते. त्यावेळी ती कमालीची आधुनिक वाटते.

"एकच पाय हलवीते ग हलवीते
आपलशी नवऱ्याला बोलवते" (पृष्ठ 21)

जोग्यावर मन जडले म्हणून त्याच्यासोबत जाणाऱ्या लेकीसुना या लोकगीतात सापडतात. तर काहीवेळा प्रियकरावर भाळलेली, त्याच्यासाठी नवऱ्याचाही काटा काढू पाहणारी स्त्री इथे भेटते. तिच्या मनातील नवऱ्याबद्दलच्या रागाचे काही कारण असू शकते किंवा त्याच्या संदर्भातील नापसंती. काहीही असो स्वतःच्या इच्छा आणि भावनांना प्रमाण मानून जगणारी, प्रसंगी दुष्टावा करणारी, स्वकेंद्री स्त्री या लोकगीतांतून दिसते. पण ती खूप तुरळक आहे. वस्तुतः अभावग्रस्त आयुष्य जगणाऱ्या, घरीदारी हालअपेष्टा, उपेक्षा सोसणाऱ्या, स्वतःच्या आयुष्याच्या नाड्या दुसऱ्यांच्या हातात असलेल्या या स्त्रिया कल्पनेत का होईना सुखी समृद्ध, कोडकौतुकाने भरलेल्या आयुष्याची अपेक्षा करतात. सरळ साध्या शेतकरी नवऱ्याची इच्छा करतात. मास्तर नवरा मिळाला तर धडे गिरवता येतील असेही त्यांना वाटते. पण अर्थात ही कल्पनाच असते याचे त्यांना भानही आहे. जीवनाचे खरेखुरे वास्तव त्यांना स्पष्टपणे कळलेले आहे.आपण स्त्री आहोत. कितीही मन मारून जगले तरी आपल्या पदरी आलेले दुःखाचे दान सुटणार नाही याची त्यांना जाणीव आहे. ही वास्तवाची लख्ख जाणीव "कंबल दूरी दूरी जाय" या लोकगीतातून नेमकेपणाने व्यक्त होते. संसाररूपी तळयाच्या पाण्यात पाऊलभर, गुडघाभर, कंबरभर, गळाभर पुढे गेलो तरी सुखाचे कमळ मात्र दूर दूरच जाते. ते हाताला येतच नाही याचा विषाद ही स्त्री अभिव्यक्त करते.

एकूणच वारली लोकगीतांतून चित्रित होणारी स्त्रीची प्रतिमा अशी विविधांगी आहे. कधी ती स्त्रीचे वास्तवदर्शी रुप मांडते तर कधी प्रतिकूल वास्तवावर शिंपण करू पाहणाऱ्या स्त्रीच्या स्वप्नरंजनातून साकारते. घरादारासाठी, आपल्या माणसांसाठी संघर्ष करणारी, सामाजिक अन्यायापुढे अनेकदा मान तुकवणारी आणि तरीही जगण्याचे बळ गोळा करून स्वतःला आणि परिवाराला जगवू पाहणारी ही स्त्री सामाजिकदृष्ट्या दुर्बळ असली तरी मनाने मात्र कणखर, सबळ आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

संदर्भ –

वारली लोकगीते, संपादक – कविता महाजन, साहित्य अकादमी, दिल्ली, प्र.आ. 2000

राजकवी भा.रा.तांबे यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमा

डॉ. महालक्ष्मी मोराळे

स.भू.बा.उर्फ अप्पासाहेब जेधे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे

प्रास्ताविक

आधुनिक कवितेचे जनक केशवसुत यांनी अर्वाचिन मराठी काव्यात, काव्याचे बाह्यांग आणि अंतरंग या दोन्ही बाजूंनी आमूलाग्र बदल घडवून आणला. धर्म, श्रद्धा, संस्कृती, राजकारणपद्धती, शिक्षणपद्धती, समाजजीवन, स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन या सर्वच जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या गोष्टींविषयी आपल्या काव्यातून क्रांतिकारक विचार मांडले. महाराष्ट्रातील सुधारणांना एकोणिसाव्या शतकात विशेष महत्त्वाचे स्वरूप प्राप्त झाले होते. स्त्रियांचे बहुतेक प्रश्न कौटुंबिक प्रश्न म्हणून दुर्लक्षिले जात. बालविवाहामुळे बालविधवांचा निर्माण झालेला प्रश्न हा कौटुंबिक नसून त्याचे सामाजिक स्वरूप किती गंभीर होते त्यासाठी स्त्रीशिक्षणाला व पुनर्विवाहाला साहित्यातून प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे काम अनेक विचारवंतांनी केले. स्त्रीविषयक जाणीवांना महत्त्व आले. महाराष्ट्रात रुढी, परंपरा, मूढधर्मश्रद्धा, अन्याच्य परंपरा अशा सर्वच बाजूंनी सर्वकष अशा परिवर्तन प्रक्रियेने वेग घेतला. या सामाजिक अवस्थेशी सुसंगत अशी साहित्यक्षेत्रातही सर्वकष स्वरूपाची क्रांती अपरिहार्य होती. या काळात मराठी साहित्याला नवा आकार येऊ लागला. प्रेम व प्रेमाची सफलता तसेच प्रेमाच्या विफलतेतून येणारे नैराश्य, निसर्गप्रेम, अनंताची ओढ ही कवीची व्यक्तिगत अनुभूती काव्यातून व्यक्त होऊ लागली. भारतीय संस्कृतीत त्या आधी राधा–मीरा–रूक्मिणी– द्रौपदी यांच्याच प्रेमानुभूती वा विरहानुभूती काव्यातून व्यक्त होत असत. सामाजिक, सांस्कृतिक समस्यांनाही साहित्यात प्रवेश मिळाला. केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज, भा.रा.तांबे व पुढे कवी यशवंत यांनीही आत्मानुभूती व्यक्त करणारा काव्यप्रकार स्वीकारला.

भा. रा. तांबे यांची काव्यप्रतिभा

भा.रा.तांबे यांच्या काव्यलेखनास १८९० मध्ये प्रारंभ झाला असला तरी त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९२० मध्ये प्रसिद्ध झाला आणि दुसरा १९७२मध्ये. 'पद्यपंक्तींनी जग उलथवू पाहणाऱ्या, सुधारणेची 'तुतारी' फुंकणाऱ्या, काव्याला नवतेची स्फूर्ती देऊन 'जुने जाऊ द्या मरणालागुनि' असे म्हणणाऱ्या 'मूर्तिभंजक' केशवसुतांच्या रोमॅंटीसिझमपेक्षा थोडीशी वेगळी व परंपरागत मूल्ये जपणारी, सौंदर्याचा शोध घेत त्याच्या आत्म्यापर्यंत जाणारी अशी अलिप्ततेकडे झुकलेली तांबे यांची प्रकृती आहे. केशवसुतांप्रमाणेच नव्या सौंदर्यवादाचा ध्यास, आनंदमय सौंदर्याचा शोध घेणारी त्यांची कविता प्रकाशमय, संगीतमय व 'माधुर्यचि माधुर्य भरे' अशी आहे. सौंदर्याचा शोध घेताना त्याही पलिकडे असलेल्या चैतन्यरूप प्रीतीचा, सौंदर्यात परिणत होणाऱ्या प्रेमाच्या शक्तीचा, ईश्वररूपाचा प्रत्यय घेणारी त्यांची दृष्टी इंद्रियसंवेदनेच्या पलिकडे जाणारी आहे.अर्वाचिन कविपरंपरेत 'गीति कविता' हा प्रकारही सुरू होतो तो तांब्यांपासूनच. भारतीय पारंपरिक मूल्ये जपून, आधुनिक सौंदर्यवाद अंगिकारणारी, गेयतेचे मधुर स्वरूप लेवून येणारी त्यांची कविता रसिकास निराळाच काव्यानंद देते. गेय कवितेचे जनक म्हणून भा. रा. तांबे यांना श्रेय जाते. तांबे यांची कविता सूरमय आहे. सुरांचे लेणे घेऊनच ती जन्माला येते. त्यांच्या अनेक काव्यांतील प्रतिमांमधूनही हे सूरसंगीत प्रतीत होते. अंत:प्रवृत्तीतूनच सूरमय कविता भावाभिव्यक्ती व अर्थसौंदर्य घेऊन येते. ''भावकविता ही निर्मिती असते तर गीत ही रचना असते'' ही गं. ना जोगळेकरांची व्याख्या तांबे यांना नुसता गीतकार ठरवू शकत नाही. तांबे यांनी मधुर स्वर आणि सौंदर्य या दोहोंच्या साह्याने कवितेला अधिकाधिक भावसघन रूप दिले. प्रकृतित: आत्मलीन असलेले तांबे कवितेतील डामडौलापेक्षा अंतरीच्या उमाव्याला कल्पनेपेक्षा भावनेला महत्त्व देतात. तरल संवेदनाक्षम भाववृत्ती जपत तरीही जीवनातील विदारकतेतून अदम्य आशावाद घेऊन कवितेला विश्वात्मता देऊन पाहतात.

भा. रा. तांबे यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमा

भा. रा. तांबे यांच्या सर्वच भावकवितांमधून त्यांचा स्त्री विषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो. त्यांच्या कवितेत त्यांच्या मनातील स्त्रीची, स्त्रीरूपाची एक साधीसुधी, सुंदर सोज्ज्वळ प्रतिमा दिसते. तांब्यांचे सर्व प्रेमकाव्य आत्मानुभवातून फुलले आहे. त्यांच्या जीवनातील यशाचे, तृप्तीचे रहस्य त्यांच्या पत्नीप्रेमात आहे; व पत्नीप्रेमाची उत्कटता ही कवितेत उतरली आहे. पत्नीप्रेमही दैवी प्रेमाचाच अंश आहे असे ते मानतात. सौंदर्यनिर्मिती आणि शुद्ध निरपेक्ष आनंद हेच तांब्यांच्या कवितेचे मूळ उद्दिष्ट होते. तांबे विशिष्ट

विचार वा तत्त्वज्ञान मांडण्याच्या हेतूने कविता लिहित नाहीत तर त्यांची भावनाच एवढया उच्च अवस्थेला पोहोचते की तिची अभिव्यक्ती ही एक विचार बनते.

प्रेयसी

भा. रा. तांबे स्त्रीला उद्देशून 'सुंदरी' हा शब्द फारवेळेस वापरतात. याशिवाय सखी, रमणी, कांता, प्रिया इत्यादि संबोधनेही त्यांच्या काव्यात दिसतात. उपलब्ध असलेल्या त्यांच्या कवितांमध्ये विवाहपूर्वकाळात लिहिलेल्या दोन कविता आहेत. 'तुजवीण' या कवितेत विरहाकुल कवीची स्थिती भग्न बासासारखी झालेली आहे. तरीही तांब्यांच्या कवितेत प्रेमवंचनेचे उद्‌गार क्वचित निघतात. प्रेमभंगाचा किंवा प्रणय वंचनेचा अनुभव तांब्यांच्या जीवनात आल्याचे कोठे दिसत नाही. विवाहपूर्व प्रेमाचा मुळीच अनुभव नसल्याचे तांबे यांनी वेळोवेळी कबुली दिली आहे.

पत्नी

भा. रा. तांबे आपल्या खऱ्या अनुभूतीने प्रेरित काव्य निर्माण करतात हे विवाहानंतरच. 'तांब्यांच्या सौंदर्यदर्शी कल्पनेला चालना देणारी सौंदर्यवती रमणी म्हणजे त्यांची साधीसुधी प्रिय पत्नी. तिचे नेत्र त्यांच्या मनात विविध काव्यतरंग उठवतात. तिचे 'सहज पाहणे' ही त्यांना मोहिनी घालते. पत्नीचे डोळे हेच तांब्यांच्या स्फूर्तीचे उगमस्थान. 'सखि लोचन कासारि', माझी कवनें फुलती बहारी'. पत्नीकडे पाहण्याची त्यांची दृष्टि काव्यमय आहे. पत्नीच्या साध्या साध्या हालचालीतही त्यांना सौंदर्य दिसते. डोव्व्यांतून पत्नीप्रेमात उतरण्याची त्यांची रीत त्यांच्या प्रेमाची निराळी तऱ्हा दर्शविते. 'मिळे गे नयनां नयन जरी', 'डोळे हे जुलमी गडे', 'अगाध दुर्मिळ जनी, दिसे मज काही तुझ्या लोचनी', 'या डोव्व्यांच्या खिडक्या भीतरि, अफाट अनुपम दिसे माधुरी', 'ते डोळे नच छे! विलासगृह की माहेर चिच्छविक्तचे', 'जेव्हा लोचन हे तुझे विहरती या माझिया लोचनी' यासारख्या कवितेतून प्रीतीचे कितीतरी रंग व मनोहारी रूप तांब्यांनी केवळ डोव्व्यांतून दाखविले आहेत. प्रीतीच्या विलोभनीय छटांना व्यक्त करण्यासाठी डोव्व्यांचा आधार घेतला आहे. यातून त्यांची दृष्टि बाह्य सौंदर्यासोबत अंतर्गत सौंदर्याला महत्त्व देते व त्यांच्या मनाचा विकासही याच दिशेने होतो हे स्पष्ट होते.वैफल्याचे, प्रेमभंगाचे भाव त्यांच्या कवितेत दिसत नाहीत. पत्नीप्रेमाला दैवी प्रेमाचा अंश मानल्यामुळे तांबे यांचे काव्य तृप्त आहे, सुफलित आहे. प्रेम श्रद्धता व प्रेमतृप्ती हे दोन महत्त्वाचे सूर त्यांच्या कवितेने आळविले आहेत. ज्ञानसमृद्धी, सुसंपन्नता, प्रेमार्द्र हृदय व ईश्वरनिष्ठा या गोष्टी त्यांच्या कवितेला समृद्धी, संपन्नता, प्रेम व श्रद्धा देऊन गेल्या. त्यांच्या मनातील स्त्रीप्रतिमा त्यामुळेच एका उच्च पातळीला पोहोचली. तिच्या अंतर्बाह्य सौंदयाची, प्रवित्रतेची, निरागसतेची एक मूर्ती त्यांच्या काव्यातून प्रकटते ती यामुळेच. ही पवित्रता ओढून ताणून आणण्यालाही त्यांचा विरोध आहे. प्रेमातून नैसर्गिक शृगांरभावना वगळून विशुद्ध उदात्त काव्य हेतुपुरस्सर निर्माण करण्यातील यांत्रिकताही त्यांना पसंत नाही. 'प्रेमतरंग', 'प्रेमरस', 'सखये या स्थानी', 'प्रेममहात्म्य', 'जीवन संगीत' या कविता 'पत्नी' या स्त्रीप्रतिमेला स्पष्ट करणाऱ्या आहेत. भक्ताला जसे जग परमेश्वरमय वाटते, तसे प्रत्येक वस्तूत पत्नीची मूर्ती तांबेंना दिसते. प्रेममहात्म्य व पत्नीभक्ती एकत्रितपणे त्यांच्या कवितेत दिसून येते.

तांबे स्त्रीचा रमणी, गृहिणी व देवता अशा शब्दांनी श्रद्धेने वर्णन करतात. जी सुंदर आहे, स्वयंपूर्ण आहे त्या स्त्रीशक्तीला ते प्रेमादराने 'प्रिया हेच सर्वस्व' अशा भावनेने हाक घालतात. 'प्रिया हेच सर्वस्व' हे कवितेचे शीर्षकच बोलके आहे.

तू मंगल, तू सुख! गे तुजवीण
भुताटकीची माया त्रिभुवन

पत्नीचा मानसिक तोल, अंतरिक सौंदर्य तिने संसारासाठी दिलेले योगदान, प्रतिकूल परिस्थितीत दिलेली साथ या सर्व गोष्टींसाठी तांबे तिला सन्मानाचं स्थान देतात. पत्नीचा स्थायीभाव प्रेम, संयम, त्याग व वत्सलता आहे व यातच तिचे विशाल, विनम्र, व्यक्तिमत्त्व दडलेले आहे.

आपल्या हृदयातील निर्मल प्रीतीला तांब्यांनी पत्नीविषयक कवितांमधून आविष्कृत केले. कल्पनारम्यता असूनही खऱ्या भावनांची उत्कटताही त्यांत भरलेली आहे. त्यांची जीवन दृष्टी व कवितेचा आत्मा हे त्यांच्या पत्निप्रेमावरच आधारित आहे. त्यांच्या प्रीतीमुळेच त्यांच्या कवितेतील पत्नीची प्रतिमा उज्ज्वल झाली आहे. सौंदर्य, सर्जन, मार्दन, लाघव, प्रेम, करूणा या साऱ्या विभ्रमांनी युक्त अशी तिची प्रतिमा तांब्यांच्या संपूर्ण काव्यातून स्फुटित होते. तिचे कवितेच्या माध्यमातून फुलणारे स्त्रीत्व कवीच्या प्रेमभावनेला–आकर्षणाला निष्ठेचे रंग व सात्विकतेची प्रभा देतात.

''पूर्ण विश्वलयि अति एकांती

तुझी ज्योति पसरो स्थिर कांती''

तांब्यांनी निर्मिलेली ही स्त्रीप्रतिमा सर्वगुणसंपन्न स्त्रीरूपाला सामोरी जाणारी आहे.

स्त्रीची 'शक्ती', 'देवी' ही रूपे रंगविण्यासाठी तांब्यांनी काव्य केले या विचाराकडेच रसिक वळण्याचा जास्त संभव आहे. परंतु तांब्यांनी अभिजात कलाकाराच्या विशुद्ध नजरेने जीवनाकडे पाहिले. जीवनात व कलेच्या सृष्टीत निरामय आनंदाशिवाय काही नसावे असे त्यांना वाटते. सौंदर्याचा साक्षात्कार झाला की त्या सौंदर्यनिर्मात्या ईश्वराचे स्मरण व्हायलाच हवे असे त्यांना वाटते. सुंदर स्त्रीला पाहून ज्यांच्या मनाला वासनेचा स्पर्श होईल त्याच्याबद्दल तांबे म्हणतात–

पापाची स्मृति राहिली जर नरा पाहून ही सुंदरी
धिक् धिक्! त्या कळली अगाध हरीची नाहीच कारागिरी

तांब्यांना सौंदर्यवती पाहताच चिद्शक्तीचे रूप पाहत आहोत असे वाटते. ते स्त्रीला अबला लेखत नाहीत तर स्त्रीच्या सामर्थ्याची विविध रूपे ते स्पष्ट करतात.

माता

तांब्यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन कसा होता या दृष्टीने त्यांच्या काव्यातील स्त्रीप्रतिमांचा शोध घेताना चारूता, ऋजुता, प्रीती इत्यादि स्त्रीसुलभ भावरंगांनी रंगलेली प्रतिमा हाती आली. तरीही स्त्री हृदयाचा भगिनी, जननी या रूपातून चैतन्याकडे नेणारा उदात्त सौंदर्याविष्कार तांब्यांनी रंगविला आहे–

भूत निघाला तव उदरातून
वर्तमान घे अंकी लोळण
भविष्य पाही मुली, रात्रंदिन
तव हाकेची वाट मनी

तांबे परमेश्वरात मातेचे स्वरूप पाहतात. मनुष्याला जन्माला घालण्यापूर्वीच त्याची सारी व्यवस्था तो लावत असतो, सर्व त्याचीच लेकरे आहेत. ''जेथे जाई तुझ्या दयेचा तेथे आई सदा पहारा ठायी ठायी'' हे सांगून परमेश्वराच्या आज्ञेवाचून पानही हलणार नाही अशा प्रकारचा विश्वास ते व्यक्त करतात. 'निजल्या तान्ह्यावरी' या कवितेत मुलास पदराखाली घेऊन झोपविणाऱ्या व वरचेवर चुंबणाऱ्या वत्सल आणि श्रद्धाळू अंत:करणाच्या मातेत ते त्रिभुवनजननीस पाहतात.

तांब्यांनी श्रद्धेने काव्य केले. जे काव्य हातून घडले त्यात स्वत:चे काही नसून सरस्वतीमातेच्या प्रेरणेने केले अशी विनम्रता त्यांचे अंगी आहे. सरस्वतीच्या रूपात माताप्रतिमा पाहणारी त्यांची दृष्टी आहे.

नाही नाही माझी वाणी
आई सरस्वती तव ही गाणी

पौराणिक कथांमधील बालकांच्या सत्याग्रह वृत्तीची उदाहरणे देऊन भारतमातेच्या प्रति स्वाभिमान जागवतात. भारतमातेला आई म्हणून गौरवितात. अंगाई गीतातून बाळाला भावणाऱ्या भाषेत त्यांची कविता मातेची गाणी गाते.

घरी मुले तशी फुले म्हणणारे तांबे त्यांच्या 'अंगाईगीत' या कवितेतून लहान मुलांकडे वत्सल दृष्टीने पाहतात. बाह्य जगापासून लांब असलेल्या निरागस बाल्यामध्ये रंगून जातात. वत्सल प्रेमाच्या उदात्त भावनेतूनच त्यांची माता प्रतिमा स्पष्ट होत जाते. 'कुणी असेल ग' या कवितेत लहान मुलीच्या प्रीतीचे सोनेरी स्वप्न रंगविणारी माता दिसते. जगाच्या असह्य त्रासाने कंटाळून जीव द्यायला निघालेली आई मुलाच्या ओढीने परत फिरते; असे हृदयद्रावक वर्णन असलेली 'नदी तिरी उभी ती' या कवितेतील माता वात्सल्याला टाळू शकत नाही.

मातेची महती, वात्सल्याचा गाभा समजून घेणारे, मातेच्या ममतेवर श्रद्धा ठेवणारे तांबे कवितेतून मातेच्या प्रतिमेला उज्ज्वल करतात. नवनिर्मितीची शक्ती, ममतेतील मृदुता वात्सल्याचे अमृत देणारी माता तांब्यांनी तिच्या वैशिष्ट्यांनी विचारली आहे.

बहिण

बहिण भावातील प्रेम, थट्टा, विनोद, दादाचे चिडवणे, ताईचे लटके रागवणे सारे काही हवे हवेसे, दोघांतील निर्व्याजता, निष्कपटता, भावा बहिणीचे प्रेम हे सारे तांब्यांनी सहजतेने चितारले आहे. यातून बहिणीची निर्व्याज प्रतिमा साकारली आहे.

तुज कंठी, मज अंगठी

आणखी गोफ कोणाला?
वेड लागले दादाला
मला कुणाचे? ताईला!

तांबे यांचा 'माझ्या अंगणात' या कवितेतील भाऊ–बहिणीचे प्रेम बाल्यावस्थेतून प्रोढावस्थेत गेले आहे.

भ्रताराच्या राजी उणी ठेवीणारे देव
बहिणीच्या मनी चोळीची आशा ठेव

विधवा विषयक दृष्टिकोन व स्त्री प्रतिमा

भा. रा. तांबे यांच्या जीवनकालात प्लेग, महामारी इत्यादि साथींमुळे बालविधवांची समस्या मोठया प्रमाणावर निर्माण झाली होती. जीवनाच्या या कठोर वास्तवाचा, तांब्यांच्या कविमनावर विलक्षण प्रभाव पडला असावा. सामाजिक सुधारणेचा विषय म्हणून नव्हे किंवा सुधारकाची भूमिका घेण्यासाठी म्हणून नव्हे तर काळजाला भिडणाऱ्या या समस्येला अंत:स्फूर्तीने तांब्यांनी काव्यात उतरविले. विधवा स्त्रीच्या मानसिक अवस्थेचे चित्रण करणाऱ्या अत्यंत प्रभावी अशा कविता लिहिल्या. 'विधवेचे स्वप्न', 'हिंदू विधवेचे मन', 'नि:शब्द आत्मयज्ञ', 'शांती निवास', 'ते कांत यापुढे', 'चरणाखालील हाय मीच रज', 'बघुनि तया मज होय कसेसे' या कवितांमध्ये तारूण्यात आलेल्या दुर्दैवी वैधव्यात विविध अंगांनी उद्ध्वस्त झालेल्या भावजीवनाचा दु:खद, असह्य अनुभव तांबे यांना हे असह्य वाटे. विधवा गीतांमधून तांबे यांनी सुधारणेचा बडिवार न माजवता विधवेच्या भावभावना, व्यथा, वेदना काव्यातून प्रकाशात आणल्या. तमाम विधवांच्या दु:खाला चित्रित करून हा सामाजिक प्रश्न पुढे आणला.

नीरस वेलिस फुले उमलती
खिन्न नभाला तारे भेटति
रिक्त सरोवरि कमळे फुलती
का मज कथिता हे विधवेला?

विचारालाच परिणामकारक भावाचे स्वरूपही त्यांच्या काव्यात आलेले दिसते. 'दे पूर्ण हृदय सुंदरी' या कवितेतही विधवेच्या भावना व्यक्त केल्या आहेत. समाजाची विधवेविषयी 'कोण कुणाचे जगती देवा?.....कुठला मायेचा ओलावा?' (नदी तिरी उभी ती) अशी दृष्टी असण्याचा तो काळ होता. विधवा बाबत शांती, प्रीती, सुख हे पोकळ, अर्थशून्य शब्द होते. रूढ अर्थाने तांबे सुमाजसुधारणेसाठी काव्य करीत नसले तरी त्यांच्या काव्यातील सामाजिकता दिसतेच. अनेक सामाजिक अन्यायांपैकी विधवा प्रश्नातील विदारकता व समाजातील विसंगत परंपरा यांविरूद्ध त्यांची भूमिका कवितेतून स्पष्ट दिसते. विधवेच्या अंतरंगाचे दर्शन घडवून त्यांनी अधिक परिणाम साधला आहे. 'नि:शब्द आत्मयज्ञ' ही कविता अर्थपूर्ण व अप्रतिम आहे. वैधव्यात विविध अंगांनी उद्ध्वस्त झालेल्या भावजीवनाचा असह्य दु:खद अनुभव घेत, सर्व सुखांची आहुती देत जगायचे आणि ते ही नि:शब्द!

कधी भेटतां एकान्ती ती नाही कुणा दिसली
कधी बोलता परस्परांशी नाही पाहिली

पतीच्या चिरविरहाचे दु:ख घेऊन जगणाऱ्या या स्त्रियांच्या मन:स्थितीतील विविध चढउतार तांबे यांनी अत्यंत तन्मयतेने उलगडले आहे. सामाजिक परिवर्तनाच्या विचारापेक्षा तांब्यांना विधवा स्त्रीच्या अंतरंगातील विविध कोमल, नाजुक भावभावनांचे विशुद्ध रूप आविष्कृत करावयाचे होते. स्त्रीत्वातील महन्मंगल मातृत्वाचा, प्रीतीयुक्त भावनांचा सुखाच्या आशेचा कलात्मक आविष्कार तांब्यांना करावयाचा होता. हेच विधवा गीतांच्या निर्मितीमागील तांबे यांचे तत्त्व असावे.

भा. रा. तांबे यांच्या दृष्टिकोनातून 'स्त्री'

तांबे उदार व आदर युक्त भावनेने, विश्वनिर्मितीचे आदितत्त्व या भावनेतून स्त्रीकडे पाहतात. स्त्री ही ईश्वरी देणगी व तिचे सौंदर्य हे 'हरीची कारागिरी' आहे असे ते मानतात. स्त्री सौंदर्याकडे ते उदात्त दृष्टिकोनातून पाहतात. स्त्रीकडे जे वासनेच्या दृष्टीने पाहतात त्यांचा 'धिक् धिक्! त्या कळली अगाध हरिची नाहीच कारागिरी!' या शब्दात ते धिक्कार करतात. स्त्रीचे सामर्थ्य अमृत, हलाहल आणि वारूणी यांच्यासारखेच आहे. 'स्त्रीचा दरारा पहा! आता कोण म्हणे स्त्रियेस अबला? स्त्रीला नमस्कार हा' अशा प्रकारचे स्त्रीचे सामर्थ्य आहे असा तांबे यांचा दृष्टिकोन आहे.

तांबे यांनी मानवतावादी दृष्टिकोनातून स्त्रीच्या जीवनाचा विचार केला. तिचा प्रेमाचा अधिकार, मातृत्वाच अधिकार या बाबत सहिष्णुता व विश्ननिर्मितीच्या तत्त्वाचा आदर करून कल्पना ही विचाराच्या पातळीला पोचवून कविता केली. त्यांच्या काव्यातील प्रेमभाव असा सर्वव्यापी तरीही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, स्वत:चा असा उच्चतम भाव आहे. प्रेम ही स्वर्गीय भावना, प्रीती ही जीवनव्यापी भावना तर कविता ही जीवनकलेचे संगीत होय. प्रेम–श्रद्धता, प्रेम–तृप्ती हा तांबे यांच्या काव्यनिर्मितीचा मूलस्त्रोत आहे.

संदर्भ

१. राजकवी तांबे, जयंत वष्ट, साहित्य अकादेमी, पहिली आवृत्ती, १९८२.
२. मराठी काव्याचे मानदंड, खंड पहिला, स. रा. गाडगीळ, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००५.
३. मराठी कविता एक ध्यास आणि अभ्यास, जामकर मधु, गोदावरी प्रकाशन, २००१.

"मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा"

अक्षय बालाजी रत्नपारखे

दयानंद कला महाविद्यालय लातूर

बहुत काळापासून महाराष्ट्राच्या भूमीला थोर कर्तृत्वशाली संतांचा व पराक्रमी शूर वीरांचा सहवास लाभलेला दिसतो. जन्मापासून ते शेवटपर्यंत आपली मातृभूमी व कर्मभूमी महाराष्ट्रच लेखून आपलं सबंध आयुष्य समाजाच्या सर्वांगीण उद्धारासाठी प्रबोधनासाठी वेचले अशा पुण्यपावन विभूती या मायभूमीला लाभले हे अहोभाग्यच समजावे. महाराष्ट्राला संत परंपरा १३व्या शतकात लाभलेली दिसते महानुभावपंथा पासून जरी मराठी साहित्य दृष्टीक्षेपात आले असले तरी त्यापूर्वी कवी मुकुंदराजांने साहित्य लेखन केलेले दिसते. तरी संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम या चार संतांवर वारकरी संप्रदायाने भर दिला आहे त्यातही ज्ञानेश्वर आणि तुकाराम महाराज यांचे स्थान महत्त्वाचे आहे याचा अर्थ इतर सर्वजण कमी महत्त्वाचे असे मुळीच नाही सर्वांबद्दल आस्था आदर प्रेम भक्ती आहेच पण भागवत धर्माचा पाया माऊली ज्ञानेश्वर यांनी घातला आणि संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम यांनी त्यावर कळस चढविण्याचे थोर कार्य केले असे आपण मानतो तुकोबांनी सर्वांच्या विचारांचे सार काढले त्यात सगळयांचा विचार एकत्रित आला ज्ञानोबा - तुकोबा या दोघांचा उल्लेख केला की सर्वांचा समावेश होतो अशी वारकऱ्यांची भावना आहे जवळपास सर्वच कीर्तनात तुकोबांचा अभंग आलेला दिसतो मधल्या काळात पिढी बदलली दृष्टिकोन बदलला भाषा बदलली त्यामुळे नव्याने मांडणी करणे गरजेचे होते समाजात सर्वत्र अस्थिरता आणि अनागोंदी माजली असताना समाजाला स्थिरतेकडे न येण्यासाठी मार्ग प्रशस्त करून देण्यासाठी समाजाचा दुय्यम घटक असा समजला जाणाऱ्या अज्ञानी लोकांच्या वर्गाला प्रबोधनासाठी संत विचार सतत सांगणे तितकेच आवश्यक आहे जात धर्म यांच्यात वाढलेला तनाव संपवणे हे केवळ ही संतपरंपरा करू शकते असे ठामपणे म्हणता येते साहित्य हे आत्माविष्काराचे एक महत्त्वाचे साधन असून व्यक्तीची मूळ मजेत आत्मजाणीव तिच्या भोवतालचा परिसर परिस्थितीचे तिच्यावरचे संस्कार तिच्यासमोर परंपरा ठेवण्यात आलेली मुले व आदर्श आणि तिच्या प्रत्यक्ष जीवनातील समस्या व अनुभव या साऱ्यांतून तिचे मनोविश्व व तिची अस्मिता घडत असते व ती तिच्या साहित्यातून सहज-असहजतेने व्यक्त होत असते.

मराठी स्त्री संतांच्या साहित्यातून व्यक्त झालेल्या म्हणून विश्वाचे दर्शन कशाप्रकारचे आहे त्यातून तिची प्रतिमा उभी राहते व ती कशी आहे याचा शोध आरंभ केला तेव्हा मराठी साहित्य निर्मितीच्या मुळात प्रथमतः महानुभाव पंथातील महादाईसाजीकी एक स्त्री कवयित्री असून ती प्रामुख्याने मराठी भाषेतील आद्य कवयित्री म्हणून ही ओळखली जाते महादाईसा पासून स्त्रियांच्या लेखनाची सुरुवात झालेले पुरावे दिसून येतात तिच्या अगोदरच्या किंवा नंतरच्या काळात बाईसा, आऊसा, हिराइसा पोमाइसा, कमलाईसा इत्यादी अनेक विद्वान व कर्तबगार महानुभाव स्त्रिया होऊन गेलेल्या आढळतात त्यानंतरच्या काळात मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, निर्मला, भागू महारिन या वारकरी स्त्रियांची रांग दिसते थोड्या अंतरावर वेश्या कन्या कान्होपात्रा दिसतात त्यानंतर च्या काळातसंत सखुबाई व प्रेमाबाई येतात. मग सुमारे दोनशे वर्षाच्या अंतराने वारकरी बहिणाबाई आणि वेणाबाई व अंबाबाई या रामदासी स्त्रिया भेटतात. १३ ते १७ व्या शतकांच्या दरम्यान स्त्री संतांची व संत कवयित्रींची अशी एक रांगच होऊन गेलेली दिसते प्रस्तुत लेखात संत साहित्यातून आलेल्या स्त्री प्रतिमांच्या संदर्भात मी पाच प्रमुख संत कवयित्रींची निवड केली आहे श्री चक्रधर शिष्या महादाईसा, निवृत्ती ज्ञानेश्वर यांच्या भगिनी मुक्ताबाई, संत नामदेवांची दासी जनाबाई संत तुकाराम शिष्या बहिणाबाई व समर्थ रामदास शिष्या वेणाबाई रामदासी या पंच कवयित्रींची निवड करण्याचे कारण या सर्व कवयित्रीचे काव्य पुष्कळ असल्यामुळे त्यांच्या प्रतिमांची आखणी करता येईल या पाचही कवयित्री साचेबंद जीवन जगणाऱ्या समाजाच्या दुष्ट रूढी परंपरांना बळी पडलेल्या त्यामुळे समाजजीवनाच्या प्रवाहाबाहेर

फेकलेल्या स्त्री पण त्यांना मार्गदर्शक गुरु म्हणून थोर संतमंडळी लाभले व त्यांनी या स्त्रियांची व्यक्तित्वेघडवली त्यांनी निवडलेली वाट तत्कालीन समाजाला मान्य नव्हती ती समाजविघातक वाटत होती त्यांचा आत्मशोध म्हणजे मराठी स्त्रीच्या आत्मजाणीवेची पहिली चाहूल संत साहित्याचे एक वैशिष्ट्य असे की ते केवळ साहित्य निर्मिती करण्याच्या प्रेरणेतून लिहिले गेले नाही त्यामागे धार्मिक असमानतेची तीव्र जाणीव व प्रचलित दुष्ट रूढी मागील अन्यायाचे खोल दुःख होते सामाजिक-धार्मिक सुधारणेच्या त्यामागे हेतू होता म्हणून हे मराठी संत धर्मसुधारक होते तसेच नवपंथप्रवर्तक ही बनले त्यांनी सुरू केलेली धर्मसुधारणा चळवळ ही पर्यायाने समाजसुधारणा चळवळ ही होती हे कार्य त्यांनी आपल्या वाणी लेखणी व राहणे केले त्यामुळे महाराष्ट्रातील सुधारणा चळवळीचा प्रारंभ या संत चळवळीपासून झाला तसा मराठी साहित्याचा जन्महीत्यांच्या या बंडखोरीतून झालेला दिसून येतो महानुभावांच्या लीळाचरित्रात श्री प्रभुचरित्र व स्मृतिस्थळ या ग्रंथातून आपल्याला महादाईसाभेटते. लिळाचरित्रातील पूर्वाश्रमीची व नंतर चक्रधरांची शिष्या मग श्री प्रभुचरित्रातली व शेवटी स्मृतिस्थळातील अशी चार रुपात दिसते ही भिन्न रूपे तिच्या बदलत गेलेल्या अस्मितेची चित्र म्हणता येतील वैधव्य आल्यानंतर ती वडिलांकडे रावस गावी जाते दादोसच्या भेटी पर्यंतचे आयुष्य तिथेच जाते तारुण्यात आलेली उच्च जातीत जन्म वडील दशग्रंथी ब्राह्मण म्हणून विद्या ही मिळाली आहेत सर्व कामे तिलाच करावी लागेल याने तिने परमार्थाचा मार्ग स्वीकारला विशेष म्हणजे तिला काव्याचे देणे आहे व ते उपजत आहे ते चक्रधरांच्या संस्काराने निर्माण झाले नाही पण हे कवीत्व त्यांच्या सहवासात फुलले असे म्हणता येईल पूर्वीची महदाइसा म्हणजे प्रपंचातून निघालेली परमार्थाची ओढ असलेली पण रूढ परमार्थ मार्गाला अनुसरून जाणारी अशी तिची प्रतिमा आहे विधवेच्या समाजप्रतिमेपेक्षा ची फारशी वेगळी नाही आद्य कवयित्री महादाईसाने 'धवळे', 'मातृकी रुक्मिणीस्वयंवर', 'गर्भकांड ओव्या' नामक प्रकरण काही स्फुट ओव्या व आरती ही महादाईसाची एकूण रचना या सर्व रचनांचा विषय श्रीकृष्ण किंवा चक्रधर स्वामी हे आहेत तिच्या स्फुट ओव्या या चित्रात येतात महादाईसाला श्रीकृष्ण चारित्रांबद्दल कुतूहल आहे पुराण ऐकून आल्यावर ती चक्रधरांना त्याबद्दल प्रश्न विचारत असे त्यातून तिचे श्रीकृष्ण चरित्राबद्दल चे आकर्षण दिसून येते तिची उत्कट भक्ती व समर्पण भाव पाहून श्री गोविंदप्रभूंनी 'धवळे' रचण्याची प्रेरणा महादाईसेला दिली धवळयाची निर्मिती ही लीळाचरित्रातील 'विवाही स्वीकारू' या लीळेत येते एकदा वाटेत एक तेलिंग बाशिंग नेताना पाहून महादाईसाने एक बाशिंग गुरुंसाठी घेतले व ते त्यांच्या डोक्याला बांधले त्याबरोबरच श्रीगोविंदप्रभूना विवाह करण्याची इच्छा झाली या विवाह लिळाप्रसंगी त्यांनी महादाईसेला कृष्ण रुक्मिणी स्वयंवराचे गाणे गायला सांगितले त्यांनी त्या गाण्याला स्फूर्ती दिली ते गाणे म्हणजेच महादाईसाचे विवाह प्रसंगी गायले जाणारे धवळे होय.

निवृत्ती ज्ञानेश्वर सोपान यांच्या भगिनी मुक्ताबाई एक अलौकिक व्यक्तिमत्व मुक्ताबाई यांचे चरित्र पाहिले की तेजस्वी प्रतिमा मनावर उमटते एवढ्याशा वयात एवढे ज्ञान कुठून व कसे आले? याला निरुत्तरच व्हावे लागेल जसा कर्णदैवीय कवचकुंडलासह जन्माला आला तशी ही निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताई ही चारभावंडे अध्यात्मातून जन्माला आली असावी अशी ही भावंडे म्हणजे संन्याशाची पोरं संन्यासाश्रम सर्वश्रेष्ठ संन्याशाने गृहस्थाश्रम स्वीकारणे म्हणजे वरून खाली येणे असा धर्म भ्रष्ट व आश्रम भ्रष्ट विठ्ठलपंतांना आळंदीच्या ब्राह्मणांनी वाळीत टाकले वाईट टाकलेले जीवन म्हणजे समाजापासून वेगळे बहिष्कृत जीवन, त्यांची कामे कोणीही करायची नाहीत गावातले बारा बलुत्या त्यांनी ही संपर्क मोडायचा असा कडक आदेशच तेव्हा गावाबाहेर इंद्रायणी काठावर बारा वर्ष म्हणजे जणू एक तपच तिथे राहून पूर्ण केला पुढे ब्राह्मणांच्या आज्ञे प्रमाणे त्यांना मुंजीसाठी पैठणच्या ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र मिळवण्यासाठी या भावंडांना धडपड करावी लागली. संत मुक्ताबाईचे साहित्यलेखन कमी असले तरी त्यांनी विविध ग्रंथलेखन केले आहे "ज्ञानबोध" या ग्रंथामध्ये संत निवृत्तीनाथ आणि संत मुक्ताबाई यांचा संवाद आला आहे समाधी घेण्याच्या अगोदर केलेले हे लेखन असावे मुक्ताबाईंनी रचलेले ताटीचे एकूण ४२ अभंग प्रसिद्ध आहेत या अभंगांमध्ये त्यांनी रुसून बसलेल्या ज्ञानेश्वरांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देऊन त्यांचीसमजूत घालते इथे वेगळी मुक्ताबाई दिसते ती म्हणजे एक प्रेमळ बहिणीचा रूपात या भावंडांना छळणाऱ्या लोकांच्या

समाजनिंदेचीतिला पूर्ण जाणीव होती व अनुभवलीही होती म्हणून भावाच्या दुःखाने समदुःखी होऊन मुक्ताबाई इथे तिच्या अभंगातून व्यक्त होतात.

"योगी पावन मनाचा | साही अपराध जनाचा ||
विश्व झाले रागे वन्ही | संतसुखे व्हावे पाणी||
शब्द शस्त्रे झाले क्लेश | संती मानावा उपदेश ||
विश्वपट ब्रह्म दोरा | ताटी उघडा ज्ञानेश्वरा ||"

"जीभ दातांनी चाविली | कोणेबत्तीशी तोडिली?
मन मारून उन्मन करा | ताटी उघडा ज्ञानेश्वरा ||"

मुक्ताबाईच्या जगण्यातून व काव्यातून तिची जी प्रतिमा आपल्या मनावर आहे ती एका तडफदार स्पष्ट वक्त्या ज्ञानी परमार्थी स्त्रीची तिला ज्ञातेपणाची प्रखर जाणीव व अभिमानही आहे ज्ञानी मुक्ताबाईकडून जनाबाई कडे वळताना विजेकडून पणतीच्या मंद प्रकाशात आल्यासारखे वाटते नामयाची दासी जनी हिचे एक भावसंपन्न व्यक्तित्व, वात्सल्याची सुवर्णमूर्ती, संत वाटिकेतील जाईचे वेल, भक्तीची माधुरी व योगाची खोली दोन्ही अथांग असलेल्या काव्याची करती अशी जनाबाईची बिरुदावली आपले शूद्रत्व, दास्यत्व, अनाथपण व भरीला स्त्रीत्व असे सामाजिक अडसर ओलांडून तिने संतत्व गाठले. जनाबाई सारखे खडतरले जीवन इतर संत कवयित्रींच्या वाट्याला आले नाहीत या कवयित्री पंचकात जनाबाई एकटीच शूद्र जातीची आहे आपण पोरक्या आहोत एकट्या आहोत ही जाणीव मात्र तिच्या मनात सततटोचते तिचे दबलेले दुःख तिच्या शब्दांतून नकळत वाट शोधते ते असे.

"माय मेली बाप मेला | आता संभाळी विठ्ठला ||"
" तुजविण सखे कोण | माझे करील संरक्षण ? "
"तुजविणरे विठ्ठला | कोणी नाही रे मजला ||"
"आपली म्हणवूनी | अपंगावीदासी जनी ||"
" माझ्या जनीला नाही कोणी | म्हणूनी देव घाली पाणी ||"

संत नामदेवाच्या सहवासात जनाबाईंनी विठ्ठलाच्या भक्तीचा ध्यास घेतला 'दळीता कांडिता तुज गाईन अनंता' असे त्या म्हणत असत संत नामदेव यांचे गुरु होते श्री संत ज्ञानेश्वर-विसोबा खेचर-संत नामदेव-संत जनाबाई अशी गुरुपरंपरा आहे. 'विठु माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा' || हा प्रसिद्ध अभंग जनाबाईचाच आहे गवऱ्याशेणवेचतानाघरातील इतर कामे करताना सतत देवाचे नामस्मरण करत जनाबाईचे एकूण ३५०अभंग सकळ संत गाथा या ग्रंथात मुद्रित आहे त्यांचे अभंग कृष्णजन्म, थाळीपाक, प्रल्हादचरित्र वबालक्रीडा या विषयांवर आहेत संत जनाबाईची भावकविता ही भगवंताच्या प्रेमाने ओतप्रोत भरलेली आहे पूर्ण निष्काम होऊन लौकिक ऐहिक भावना विसरून त्या विठ्ठलाला शरण गेलेल्या आहेत एक आख्यायिका अशी की संत म्हणून जनाबाईंची थोरवी सांगणारी आहे झाले असे की जनाबाईला सुळावर देण्याची शिक्षा झाली विठ्ठलाचे पदर चोरले या आरोपावरून जनाबाईला ४० धटिंगण काढण्या लावून धरून नेतात त्याबद्दल तिला सुळावर चढविण्याची शिक्षा होते सुळतयार होतो पण वाटेत जनाबाई देवाचा धावा करते व देवकृपेने सुळाचे पाणी होते अशी भक्तिपर भावना जनाबाईच्या व्यक्तित्वात होती पुढे त्यात संत परंपरेतल्या संत तुकारामशिष्या संत बहिणाबाई 'महायोगिनी' म्हणून नावाजलेली तिचा मूळ पिंड योगभ्रष्ट स्त्रीचाअसे सांगतात हा यौगिकप्रवास अनेक दैवी घटनांनी भरलेला आहे पण तिचालौकिक प्रवास एकटीने केलेला आहे इतर कवयित्रीप्रमाणेतिला गुरुचा सहवास व मार्गदर्शन लाभले नाही त्याअगोदरच संत तुकारामांनी वैकुंठगमन केल्यानेप्रत्यक्ष कधीही भेट झाली नाही शेवटी बहिणाबाईंची निष्ठा पाहून तुकोबांनी कार्तिक वद्य ५शके१५६९ रोजी स्वप्नात येऊन तिला साक्षात दर्शन व गुरूपदेश दिला. बहिणाबाईचे सारे जीवन गुरुबोधामुळे बदलून गेले

तिने आपले गुरु संत तुकाराम महाराज व त्यांची ही गुरुपरंपरा आपल्या अभंगात वर्णन केलेली आहे तुकाराम महाराजांविषयी प्रत्यक्ष माहिती असलेल्या कवयित्रीचे हे अभंग आहेत त्यामुळे या अभंगांना विशेष महत्त्व आहे बहिणाबाईंच्या व्यक्तित्वाचा आणखी एक पैलू इतर कवयित्रींपेक्षा साजेसा व आधुनिक स्त्रीला अनुकरणीय वाटावा असा आहे तो म्हणजे ज्ञानलालसा व बौद्धिक विकास तिची ज्ञानउत्सुकताविलक्षण आहे तिचा अनेक विषयांचा अभ्यास तिची विद्वत्ता विवेचकशक्ती विद्वान पुरुषालाही लाजवेल. "वज्रसुची" हे दुर्मिळ उपनिषद अभ्यासणारी बहिणाबाई एकटीच. वेद वाचण्याची आवड पण स्त्री म्हणून वेदांचा अभ्यास करता येत नाही म्हणून खंत वाटणारी बहिणाबाई ही एकटीच संत स्त्री तिचे योगज्ञान अविश्वसनीय आहे. बहिणाबाई यांना शरीराने प्रपंचाशी ठेवले आहे तिची शर्थ प्रपंचाशी म्हणण्यापेक्षा तो स्त्रीत्वाची आहे त्यातही तो स्त्रीदेहाशी आहे त्याचे विवेचन करताना "स्त्रियेचे शरीर पराधीन देह | चाले उपावविरक्तीचा" हि तीची खरीवेदना आहे. मनाने विरोधक असलेल्या विवाहित स्त्रीला आपले शरीर दुसऱ्याला भोगासाठी द्यावे लागणे ही स्त्रीच्या पराधीन देहाची विटंबना बहिणाबाईला भोगावी लागते ही जाणीव ती व्यक्त करते म्हणून स्त्रीदेह परमार्थाच्या आड येतो असे ती वारंवार सांगते ते तो तिचा स्वअनुभव आहे म्हणून विवाहित विरागी स्त्रीची ही दैहिक विटंबना इतर चार कवयित्रींच्या वाट्याला आली नाही कारण त्यातल्या दोघीजणी ब्रह्मचारी व दोघी बालविधवा म्हणजे शरीराने कुमारिकाच राहिल्या त्यांच्या परमार्थ साधनेत अशा भोगांचा व्यत्यय आला नाही बहिणाबाईचे हे दुःख वेगळे व तिचे एकटीचे आहे. तरीही तिची ईश्वर भक्ती किती थोर आहे प्रत्यक्षात गुरु सानिध्य नसताना त्यांना मनोभावे गुरु मानून जणूकाही महाभारतातील द्रोणाचार्य व एकलव्याचा जीवनपट डोळ्यासमोर आल्याचे वाटते तिची गुरुनिष्ठा तिच्या अभंग रचनेतून दिसून येते त्यात तिने इथपासून येथपर्यंतच्या रचनेत सर्व संतांची एकाच अभंगात मांडणी केली आहे.

संतकृपा झाली | इमारत फळा आली ||
ज्ञानदेवे रचिला पाया | उभारिले देवालया ||
नामा तयाचा किंकर | तेने र**चिले ते आवार ||**
जनी जनार्दन एकनाथ | खांब दीदीला भागवत ||
तुका झालासे कळस | भजन करा सावकाश ||

बहिणाबाई या इतक्या अलौकिक स्त्री की त्या एकमेव तुकारामांच्या स्त्री शिष्या होत्या पण त्यांचे गुरूछत्र न लाभले तरीही आपल्या आयुष्यातील घटना सांगणारी एकमेव आत्मचरित्रकार मरणादारी उभी असताना आपल्या १२ पूर्वजन्मांचा वृत्तान्त सांगणारी साक्षात मृत्यूचा अनुभव सांगणारी महायोगिनी विविध विषयांचे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी धडपड करणारी, बुद्धिमान जागरूक स्त्री इतकी प्रचंड जागरुकता व विद्वत्ता इतर कवयित्रीत दिसून येत नाही. पंचक कवयित्रीतील शेवटची कवयित्री संत वेणाबाई या समर्थ रामदासांच्या अनुयायातील एक तेजस्वी स्त्री रामदासांची सर्वात श्रेष्ठ शिष्या समर्थांच्या मठ जीवनातील आचारधर्माचे कठोर पालन करून पंथात आपल्या योग्यतेमुळे उच्च अधिकार व प्रतिष्ठा मिळवणारी वेणास्वामी 'रामायण' आणि 'सीता-स्वयंवर' ही दीर्घकथा काव्य रचणारी संत कवयित्री आणि विदुषी होत्या. विवाहानंतर काही काळातच वयाच्या बाराव्या वर्षी विधवा झाल्या तेथेच त्यांनी समर्थ रामदासांचे शिष्यत्व स्वीकारले समर्थांनी त्यांना कीर्तन करण्याची अनुमती दिली होती त्या मध्ययुगीन काळात विधवा स्त्रीने किर्तने करणे ही एक क्रांतीच होती समाजाच्या उद्धारासाठी क्रांतिकारक पाऊल उचलणार या सर्व संतांना जण निंदेला सामोरे जावे लागले. वेणाबाई, अक्काबाई, अंबिकाबाई या स्त्रियांना त्यांनी अभ्यास प्रवृत्त केले आणि मठपती बनविले. याचा तिरस्कार व चीड मनात धरून एकदा कोल्हापूरच्या मंडळींची मजल तर बहिणाबाईंना विष प्रयोग करण्यापर्यंत गेली तरीही तिने ते विष पचवून दाखवले निंदकांना त्याचा पश्चाताप झाला त्यांनी वेणाबाई आणि समर्थांची क्षमा मागितली. वेणाबाईंनी उदात्त अंतकरणाने सर्वांना क्षमा केले तशी वेणाबाईची चरित्रविषयक माहिती फार थोडी आहे तिचे शिष्य गिरीधर याने अनेक ग्रंथ लिहिले पण आपल्या गुरुचे चरित्र लिहिले नाही वेणाबाईची स्वतःची कविता मुख्यत: कथात्म स्वरूपाची आहे त्यात ती स्वतःबद्दल काही बोलत नाही

तिच्यासंबंधी त्रोटक माहिती रामदासी वाङ्मयात विखुरलेली आढळते तिच्या आधाराने समर्थभक्त शं.श्री.देव यांनी वेणाबाईकृत 'सीता स्वयंवर' ग्रंथाच्या प्रस्तावनेत दिलेले आत्मचरित्र आणि पुन्हा एक पुरुषोत्तमाने लिहिलेला 'समर्थशिष्या' हा चरित्रात्मक लेख एवढीच माहिती मिळते वेणाबाईची शांत, सौम्य, विरक्त प्रकृती आत्मानुभव व्यक्त करण्याकडे झुकत नाही तर ती कथात्म व कथा निवेदनपर काव्याकडे झुकणारी आहे त्यातून तिचे 'संक्षिप्त रामायण' 'सीता स्वयंवर' हे कथा निवेदनपर ग्रंथ अवतरले शिवाय 'कौल' व 'रामगृह संवाद' ही छोटी प्रकाशने ही कथा आहेत तिच्या कथात्म प्रकृतीला रामदासाची उपदेशपर कविता भावली नसावी वेणाबाईच्याकाही स्फुट कविताही आहेत पण ती अनुभवपर नसून निवेदनपर आहेत समर्थांनी वेणाबाईंकडून जे काव्य लिहून घेतले ते 'समर्थप्रताप' आहे.

"समर्थ देवे वेणाबाईसी वरदाने दिधली |
सीता स्वयंवरे रामायणेवदविली||"

वेणाबाईचे अनुभवपर किंवा आत्मपर लेखन नगण्य असल्याने तिच्या कवितेतून वेणाबाई फारसी सापडत नाही उपलब्ध वाङ्मयातून तिचीजी प्रतिमा साकार होते ती एकेरी, एकरंगी, सौम्य सपाट आहे असे का ? इतक्या बुद्धिमान कर्तृत्ववान स्त्रीची प्रतिमा सपाटका वाटावी? बौद्धिकव आत्मिक विकासाच्या दृष्टीने पाहिले तर इतर कवयित्रीपेक्षा तिची योग्यता कमी नाहीत आपल्या मनाचे रंग ओतूनतिनेपात्र रेखाटने ही चांगली केली आहेत तिचे वाचन भरपूर होते तिची परमार्थ भक्तीही कमी नव्हती तिला साक्षात्कार झाल्याचे समजते खुद्द समर्थांनी तिच्याबद्दल 'कैवारी जियेचा कोदंडधारी' असे म्हटले आहे या पाच संत कवयित्रींच्या एकत्रितपणे विचार केला तर त्यांच्या काव्यातून अनेक विषयांची मोठी कुवत दिसून येते महादाईसाच्या प्रेमविषयक भावना व्यक्त करणाऱ्यालीळा, मुक्ताबाईच्या जीवनविषयक तत्वज्ञान व्यक्तकरणारे भक्तीकाव्य, हृदय पिळवटून बाहेर पडलेले व्यावहारिक जनाबाईंचे काव्य अतिशय चिंतनात्मक व स्वतःचा शोध घेणारे बहिणाबाईंचे काव्य आणि भाविक श्रद्धामयअशी वेणाबाईंची रचनाअशा अशा वैविध्याने नटलेली साहित्यक्षमता या संत कवयित्रीकडे होती तशी मराठी साहित्यातील स्त्रीयांची प्रतिमा ही पूर्वीजरीरूढी परंपरेच्या विळख्यातील चूल आणि मूलही एकच धारणा मनी बाळगून आपले आयुष्य हुंदकत एखाद्या नेमून दिलेल्या क्षेत्रातच घालवायचे हे निंदनीय होते त्यांना कोणता सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय कार्यात सहभागी होण्याचा विचारजरी केला तर पूर्णपणे मज्जाव होता. त्यामुळे तोंड दाबून बुक्क्या मारल्यासारखे पराधीन जीवन जगावे लागत असे परिणामी काळानुसार स्त्रियांची सर्वस्तरातून २१ व्या शतकात सुधारणा झाली असली तरी ही शहरी क्षेत्र वगळता ग्रामीण भागात अजूनही स्त्रियांची स्थिती म्हणावी तशी विकसित झालेली दिसत नाहीत थापि ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवन शहरांसारखे मुक्तस्वैर झाले तर ग्रामीण भागातील स्त्रियांचे वर्चस्व प्रत्येक क्षेत्रात दिसून येईल आत्मसन्मान आत्मजाणिवेने मनुष्य म्हणून वेगळी ओळख स्त्रियांची समाजात दिसून येईल.

संदर्भ:

१) अ.ना.देशपांडे ; 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' पूर्वार्ध भाग पहिला.
२) इंदुमती शेवडे ; 'संत कवयित्री' पहिली आवृत्ती पॉप्युलर प्रकाशन,मुंबई.
३) मराठी स्त्री संत कवयित्री ; गुगल शोध.
४) ल. रा. नसिराबादकर ; 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' फडके प्रकाशन, कोल्हापूर.
५) संत वेणाबाई ; विकिपीडिया

आसाराम लोमटे यांच्या कथांतील स्त्री प्रतिमा

संशोधक विद्यार्थी

संजय नामदेवराव आठवले

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. दत्ता रुस्तुमराव शिंदे

संत तुकाराम कला आणि विज्ञान महाविद्यालय, परभणी

प्रस्तावना :-

आसाराम लोमटे हे २००० नंतरचे महत्त्वाचे ग्रामीण कथाकार आहेत. आसाराम लोमटे यांनी आपल्या कथामधून मराठवाडयातल्या सामान्य माणसाच्या वास्तव कथा लिहिल्या आहे. आसाराम लोमटे यांचे दोन कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत. त्यांचा 'इडा पीडा टळो' हा कथासंग्रह २००६ साली प्रसिध्द झाला. तर त्यांचा 'आलोक' हा दुसरा कथासंग्रह २०१० साली प्रसिध्द झाला आहे. त्यांच्या 'आलोक' या कथासंग्रहाला २०१६ साली साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला आहे. त्याचप्रमाणे आसाराम लोमटे यांचा 'धूळपेर' हा ललित लेखसंग्रह प्रसिध्द आहे. तसेच 'तसनस' ही कादंबरी २०२० साली प्रसिध्द झाली आहे. आसाराम लोमटे यांनी त्यांच्या कथांतून समाजातील उपेक्षित, दुर्लक्षित, नागवलेल्या, चेहरा नसलेल्या, तळपातळीवरच्या वंचित माणसांच्या व्यथा, वेदना मांडल्या आहेत. त्यांच्या अनेक कथांमधून त्यांनी ग्रामीण स्त्रियांच्या व्यथा, वेदनांचे वास्तव आणि हृदयस्पर्शी चित्रण केले आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून आसाराम लोमटे यांच्या कथांतील स्त्री प्रतिमांचा अभ्यास करण्यात आला आहे.

आसाराम लोमटे यांनी ग्रामीण स्त्रियांची नानाविध रुपे आपल्या कथांमधून आविष्कृत केली आहेत. त्यांच्या कथेतील स्त्री ही गावात राहणारी पारंपरिक वळणाची स्त्री आहे. त्यांच्या कथेतील स्त्री ही आपल्या शिलाला जपणारी आहे. त्यांच्या कथेतील स्त्री ही जिद्दी, धाडसी, स्वाभिमानी, अन्यायाविरुध्द लढा देणारी, जुल्म-अत्याचाराविरुध्द संघर्ष करणारी आहे. आसाराम लोमटे यांच्या कथेतील स्त्री ही लढाऊ वृत्तीची आहे. भारतीय संस्कृतीची मूल्ये आणि संस्कार जपणारी आहे. त्यांच्या कथेतील स्त्री घरादारासाठी, कुटूंबासाठी आणि शेतासाठी राबणारी, कष्ट उपसणारी आहे. त्यांच्या कथेतील स्त्री समजूतदार पत्नी आहे. शेतकरी स्त्री आहे. ती हंगामी कामगार आहे, शेतमजूर आहे. ती मेहनती आहे. तिच्या अंगी उदात्त् ध्येयवाद पावित्र्य, मांगल्य आणि उदात्त् नीतीमत्ता आहे. आसाराम लोमटे यांच्या कथेतील स्त्री प्रतिकूल परिस्थितीशी झगडणारी आहे. ती निश्चयी, निडर, एकनिष्ट आणि समतेचा पुरस्कार करणारी आहे. ती माणुसकी जपणारी व मानवतावादी भूमिका जोपासणारी आहे. आसाराम लोमटे यांच्या कथेतील स्त्री स्वभावाने कोमल, दयाळू आणि प्रेमळ आहे. तशीच ती वेळ प्रसंगी बंड करणारी, संकटाशी झुंज देणारी आहे.

'बेईमान' या कथेतील 'राही' ही खेड्यात राहणारी पारंपरिक स्त्री आहे. ती कुटूंबातल्या सर्व माणसांची काळजी घेते. घरचे सर्व कामे करून ती शेतातले कामे करते. संसारात काटकसरीने वागते. सर्वा वेचते, मोलमजूरीचे कामे करते. ती समजुतदार आहे. तिचा देवावर विश्वास आहे, श्रध्दा आहे. ती नेहमी नवऱ्याच्या सुखादु:खात साथ देते. परंतू तिच्या नवऱ्याच्या राजकारणाला तिचा विरोध होता. तिला चांगल्या वाईटाची जाण आहे. तिला दोन मुली होत्या. ती भावनिक, मृदु आणि कोमल स्वभावाची होती. ती जशी घरादाराची काळजी वाहते तशीच ती शेताची काळजीही करते. राही प्रेमळ, दयाळू, मायाळू होती. तशीच ती कौटूंबिक अन्यावरूध्द भांडणारीही होती नवरा जेव्हा सरपंचपद टिकावे म्हणून तिला तिसरे अपत्या पाडण्यास सांगतो, तेव्हा ती संतापते. अपत्य पाडण्यास विरोध करते. ती सडेतोडपणे भाष्य करते. या कारणास्तव तिला मारही सहन करावा लागतो. तिला मानसिक त्रास सहन करावा लागतो. ती गर्भपाताच्या असह्य वेदना, कळा सहन

करते. ती नवऱ्याच्या प्रेमापोटी गर्भपात करण्यास तयार होते. नवरा राजकारणाच्या नादी लागून तिची घोर फसवणूक करतो.

'जिनगानीचा जाळ' या कथेतील प्रयागबाई, मैनाबाई आणि देवकी या स्त्रिया आपापल्या कुटूंबासाठी मेहनत करणाऱ्या, कष्ट उपसणाऱ्या स्त्रिया आहेत. प्रयागबाई ही नवऱ्याच्या मृत्यूनंतर खंबीरपणे जीवन जगण्यास सामोरे जाते. परभणीच्या मराठवाडा कृषी विद्यापीठात ती हंगामी मजूर म्हणून काम करते. घरादारासाठी, मुलगा महेंद्र आणि मुलगी देवकी यांच्यासाठी राबराब राबते. मुलाला उच्चशिक्षण देण्यासाठी धडपडते तिचे तिच्या कुटूंबावर जीवापाड प्रेम होते. तिला मुलगी देवकीच्या लग्नाची काळजी वाटते. म्हणून ती तिचे लग्न लावून देते. कामगारांच्या मागण्या मान्य करण्यासाठी मुंबईला मोर्चात गेली असता ती भ्रष्ट व्यस्थेला बळी पडते. मुंबईतील पोलीस कामगार झुंजीमध्ये तिला गोळी लागून ती हुतात्मा होते. ती हंगामी कामगारांच्या रास्त मागण्यांसाठी लढा देते. प्रयागबाई ही स्वभावाने स्वावलंबी, कष्टाळू आणि गरीब होती. या कथेतील 'देवकी' ही प्रयागबाईची मुलगी आहे. आईच्या निधनानंतर ती मराठवाडा कृषी विद्यापीठात मजूरीचे कामे करते. लग्नानंतर काही दिवसांनीच तिला कौटूंबिक अत्याचाराला सामोरे जावे लागते. तिचा नवरा तिला दारू पिऊन मारहाण करतो. नवऱ्याकडून मिळणाऱ्या यातना ती सहन करते. ती हळव्या मनाची, प्रेमळ व मायाळू होती तिला रक्ताच्या नात्याची ओढ होती. ती परीस्थितीशी झगडणारी आहे. ती सहनशील वृत्तीची आहे. ती धैर्य ठेवणारी, धीर देणारी आहे. वाईट वेळेला निभावून नेण्यासाठी ती खंबीरतेने वागते. या कथेतील मैनाबाई ही स्त्री मराठवाडा कृषी विद्यापिठात हंगामी मजूर म्हणून काम करते. ती कष्टाळू, मायाळू व प्रेमळ आहे. ती माणुसकीच्या नात्यांना जपणारी आहे. रक्ताचे नाते नसतांनाही ती प्रयागबाईच्या कुटूंबाशी आपुलकीने, माणुसकीने वागते. त्यांच्या अडचणीत, संकटात धीर देते. त्यांना मदत करते. ती स्वाभिमानी आणि निस्वार्थी आहे. ती माणुसकीचा धर्म जाणते. ती पावित्र्य जपणारी नीतीवान स्त्री आहे.

'चरक' या कथेतील 'राधा' ही स्त्री गावात राहणारी पारंपरिक आणि शेतकरी स्त्री आहे. ती मनाने हळवी आणि संवेदनशील आहे. ती घरची आणि शेतातील कामे करते. नवऱ्यासोबत शेतात कष्ट करते. ती नवऱ्याला त्याच्या सुखादु:खात साथ देते. त्याच्या प्रकृतीची काळजी घेते. ती समजुतदार आहे. ती प्रेमळ, संयमी आणि धीर देणारी आहे. तिला जमीनीपेक्षा, पिकांपेक्षा आणि पैशापेक्षा माणसाचा जीव महत्त्वाचा वाटतो. ती माणुसकीला जाणते. ती मानवतावादी भूमिका स्विकारते. ती संकटाचा सामना करते. आणि नवऱ्यालाही संकटाचा सामना करण्याचे बळ देते. ती स्वावलंबी, पवित्र आणि नवऱ्याची सेवा करणारी आहे. ती मळयातले माळवे काढून विकते. घरासाठी खाण्या-पिण्यापुरता पैसा मिळवते. जेव्हा तिच्या नवऱ्याची प्रकृती बिघडते, तेव्हा ती खंबीरपणे धैर्याने परिस्थितीशी लढा देते. दागदागीने मोडून त्याला दवाखाण्यात घेवून जाते. जीवाचा आटापीटा करते. ती अडचणीच्या वेळी कच खात नाही, डगमगत नाही.

'इडा पीडा टळो' ही स्त्रीप्रधान कथा आहे. या कथेतील सीताबाई ही स्त्री अल्पभूधारक शेतकरी आहे. ती गावातल्या पारंपरिक स्त्रियांप्रमाणे केवळ चूल आणि मूल सांभाळणारी नाही. ती चार भिंतीत राहून समाधान मानणारी नाही. ती गावात राहणारी संसारीक स्त्री आहे. ती लढावू वृत्तीची आणि कृषी कर्मावर निष्ठा ठेवणारी आहे. ती कष्टकरी स्त्री आहे. सीताबाई ही कर्तृत्ववान आणि हिंमतबाज स्त्री आहे. ती निरक्षर आहे. पण प्रगतशील, परिवर्तनीय विचारांची आहे. तिचे शेतीवर खूप प्रेम आहे. तिला शेती करणाऱ्या शेतकऱ्यांबद्दल खूप कळवळा आहे. ती स्वत: शेतकरी असल्यामुळे तिला शेतकऱ्याच्या शेतातील प्रश्नांची पूर्ण जाण आहे. घरातले सर्व कामे करून ती शेतातही काम करते. ती संयमी, धाडसी, निडर आहे. ती स्वभिमानी आहे. तिच्या अंगी दांडगा आत्मविश्वास आहे. ती समतेचा पुरस्कार करते व विषमतेचा धिक्कार करते. ती स्त्री-पुरूष असा भेद मानत नाही. तर पुरूषाप्रमाणे स्तिऱ्यांनाही अन्यायाविरूध्द, सामाजिक विषमते विरूध्द पेटून उठले पाहिजे असे तिला वाटते. ती कुटूंब वत्सल आहे, त्यागी आहे. ती विवेकशील आणि जागृत आहे, ती निरक्षर आहे पण तिला शिक्षणाची प्रचंड ओढ आहे. ती पुरूषाप्रमाणेच शेतकरी संघटनेत काम करते. सरकार शेतकऱ्यांच्या सरकार शेतकऱ्यांच्या मालाला रास्त हमीभाव देत नाही

म्हणून ती सरकारला धारेवर धरते. सरकाला जाब विचारते. सीताबाईला अन्यायाची चीड आहे. शेतकऱ्याचे प्रश्न दूर व्हावेत यासाठी ती तळमळते. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी, उन्नतीसाठी सरकारी व्यवस्थेशी लढा देते. 'चुलीचं लाकुड कव्हरक चुलीत घालायचं ? आता ते सरकारच्या पाठीत बी बसायला पाह्यजी'असा विचार सीताबाई व्यक्त करते. भांडल्याबीगर, व्यवस्थेशी संघर्ष केल्याशिवाय काहीच मिळत नाही याचा तिला ठाम विश्वास आहे. सीताबाई ही स्त्री निडर आहे. ती अन्यायाला खपवून घेत नाही. ती जिद्दी आणि कणखर आहे. ती शोषणाचा प्रतिकार करणारी आहे. ती माणुसकीचे नाते जपणारी आहे. ती स्वभावाने कोमल, मृदू आणि दयाळू आहे. पण वेळ प्रसंगी ती कठोर बनते, बंड पुकारते. अन्यायाचा प्रतिकार करते. सीताबाई ही नातेसंबंधांना जपणारी व त्यांच्यावर जीवापाड प्रेम करणारी स्त्री आहे.

'होरपळ' या कथेतील ताई ही स्त्री नानासाहेब मालधुरे पाटील यांची बहिण आहे. ती शांत, संयमी आणि दयाळू वृत्तीची आहे. ती घरातल्या माणसांची काळजी वाहते. तिच्या बोलण्या – वागण्यातून संस्कार डोकावतो. ती घरात वावरताना अत्यंत कमी बोलते. थोरा- मोठयांचा आदर करते, त्यांना सन्मान देते. तिला सामान्य तळातल्या गरिब, दलित, माणसांविषयी फार कळवळा आहे. ती इतरांच्या दु:खात समरस होते. दळीत माणसांविषयी ती दयाळू वृत्तीने, सहानुभूतीने वागते. ती मनाने हळवी, संवेदनशील आणि प्रेमळ आहे.

'चिरेबंद' या कथेतील आजी ही जिद्दी निर्भय आणि स्वाभिमानी आहे. ती संकटांचा सामना करणारी, संघर्ष करणारी वृद्ध् स्त्री आहे. नवऱ्याच्या मृत्यूनंतर ती एकटीच धैर्याने जीवन जगते. स्वत: अडाणी असून मुलाला शिकवते. आयुष्यभर दु:ख सहन करते. नातेसंबंधाना जपण्यासाठी धडपडते. ती संस्काराची धनी आहे. संस्कृतिक मूल्य जोपासणारी आहे. ती प्रतिकूल परिस्थितीशी झगडणारी आहे. ती संकटात खचून जात नाही. ती कठीण प्रसंगात डगमगत नाही. ती संयमी आणि समजूतदार आहे. ती नात्यांविषयी खूप भावनिक आहे. ती उदात्त् ध्येयवादी विचारांची आणि पावित्र्य जपणारी आहे. ती धार्मिक वृत्तीची आहे. तिला नवऱ्यांच्या मृत्यूचे दु:ख आयुष्यभर टोचत राहते. जशी ती हळवी आणि संवेदनशील आहे, तशीच ती कर्तबगार आणि जीवनातल्या संकटाशी संघर्ष करणारी आहे. तिचे जीवनावर नितांत प्रेम आहे. जीवन जगण्यासाठी आणि जगवण्यासाठी ती धडपडते, खंबीरतेने व हिमतीने वागते.

'कुंभाड' या कथेतील गवळणबाई ही दलित स्त्री आहे. ती जगण्यासाठी धडपडणारी आहे. ती गावातल्या अंगणवाडीत मदतनीस म्हणून काम करते. ती आपल्या कामाच्या बाबतीत प्रामाणिक आणि इमानदार आहे. ती कुंटुबावर प्रेम करते. त्यांच्यासाठी कष्ट करते.गवळणबाई सुशिक्षित आहे. कर्तव्यनिष्ठ आहे. शिक्षणामुळे तिच्यात आत्मभान जागे झाले आहे. ती अन्यायाचा प्रतिकार करणारी आहे. ती अस्मितेला जपणारी स्त्री आहे. ती जिद्दी निडर आणि स्वाभिमानी आहे. गावातला मालीपाटील जेव्हा तिच्या लहान मुलाला चापट मारतो तेव्हा ती त्याचा प्रतिकार करते. समाजातील दुष्ट प्रवृतीविरूध्द आवाज उठवते.अन्याय, अत्याचाराविरोधात पेटून उठते. त्यामुळे तिचा गावातील प्रस्थापित व्यवस्थेकडून छळ होतो. तिला मानसिक त्रासही सहन करावा लागतो. ती समाजातील अपप्रवृत्ती विषयी चीड व्यक्त करते. तरी ती प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देते. गवळणबाई निश्चयी, संयमी व नीतीवान आहे. ती मानवतावादी दृष्टिकोन बाळगणारी आहे. अन्यायाविरुद्ध् बंड पुकारणारी आहे.

'जीत' ही आसाराम लोमटे यांची स्त्रीप्रधान कथा आहे. या कथेतील कौसाबाई ही सामान्य अल्पभूधारक शेतकरी स्त्री आहे. ती स्वभावाने जिद्दी, निडर, स्वाभिमानी आणि लढाऊ वृत्तीची आहे. तिचा नवरा हारी भोसले हा राजकारणाचरा बळी ठरतो. तेव्हा ती न डगमगता, न भिता गावातील गामपंचायतीच्या निवडणुकीला उभी राहते. ती स्वभावाने खंबीर, एकनिष्ठ आणि उदात्त् ध्येय ठेवणारी आहे. ती गवातली पारंपरिक स्त्री आहे. ती परिस्थितीशी धैर्याने लढणारी आहे. ती चारित्र्य संपन्न, संवेदनशील आणि दयाळू मनाची आहे. ती माणूसकीचे तत्त्व पाळणारी आहे. तिला अन्यायाची चीड आहे. नवऱ्याने पक्षात राहून प्रामाणिकपणे कामे केली. पण त्याच्या पदरी काहीच पडली नाही. म्हणून ती संतापते. भ्रष्ट व्यवस्थेला खडसावून जाब

विचारते. कौसाबाई ही स्त्री कष्टकरी आहे. शेतात राबणारी आहे. माधव हा तिचा एकुलता एक मुलगा आहे. ती सतत त्याच्या भवितव्याचा, लग्नाचा विचार करते. ती स्वभावाने साधी सरळ असली तरी प्रसंगी ती अन्यायाविरुध्द पेटून उटते. आपल्या हक्कासाठी लढा देते. व्यवस्थेशी संघर्ष करते. कौसाबाई संवेदनशील आणि भावणिक वृत्तीची आहे. कौसाबाई ही स्त्री नैतिकता तपणारी खंबीर, आणि धैर्यवान आहे. प्रामाणिक काम करताना ती कुणाच्याही निंदेची पर्वा करत नाही. तिच्या शब्दाला, वाणीला तिखट0 धार आहे. ती निर्धाराने वागणारी आहे.ती कष्टाळू महेनती आणि इमारती आहे. नव्या बदलाला स्वीकाणारी आहे. परिवर्तनाशी नाते जुळवणारी आहे. ती कुणाचेही बोलणे सहन करुन घेत नाही. समाजातील दुष्ट प्रवृर्तीना प्रत्युत्त्र देण्याचे ती सामर्थ्य ठेवते. अशा प्रकारे आसाराम लोमटे यांच्या कथांतून स्त्री जीवनाचे लिलया दर्शन घडते.

समारोप :-

आसाराम लोमटे यांच्या कथातील स्त्रिया अन्यायाविरुध्द, अत्याचाराविरुध्द पटून उठणाऱ्या आहेत. मराठवाडयाच्या ग्रामीण भागात राहणारी स्त्री ही आपल्या जपणारी आहे. पांरपरिक वळणाची असली तरी आत्म्ासंमान जपणारी आहे. आपल्या अस्मितेला सांभाळणारी आहे. ती पत्नी आहे, शेतकरी आहे, शेतमजूर आहे, हंगामी कामगार आहे. राजकाणात जावू पाहणारी इमानदार कार्याकरती आहे. आसाराम लोमटे यांच्या कथांतील स्त्री या भारतीय संस्कृतीची मूल्ये जोपासणाऱ्या आहेत. त्या स्त्री या नीतीवान आहेत. समतेचा पुरस्कार करणाऱ्या, मानवतावादी दृष्टिकोन ठेवणाऱ्या आहेत. आसाराम लोमटे यांच्या कथांतील स्त्रीया नवपरिवर्तवनवादी विचारांना स्वीकारणाऱ्या आहेत. संकटाशी नेटाने झुंज देणाऱ्या संघर्ष करणाऱ्या, लढाऊ बाना अंगीकारणाऱ्या आहेत.

संदर्भ सूची :-

१) लोमटे आसाराम :– 'इडा पीडा टळो' (कथासंग्रह), शब्द पब्लिकेशन, मुंबई, चौथी आवृती, २०१७ पृष्ठ – ९, ३९, ९३, ११९, १४५.

२) लोमटे आसाराम :- 'आलोक' (कथासंग्रह), शब्द पब्लिकेशन, मुंबई, चौथीआवृती, २०१७ पृष्ठ – ९, ७९, १०६

३) जाधव वामन:- ग्रामीण साहित्य: प्रवाह आणि परिस्थिती, स्नहेवर्धनप्रकाशन, पुणे – प्रथमावृत्ती – २०१३, पृष्ठ – १०४

४) मोरे नंदकुमार :-(लेख) 'आसाराम लोमटे यांच्या कथा खेडयाच्याउजाडीकरणाची कर्म कहाणी' (संपा.) डॉ. पुरुषोत्त्म काळे, महाराष्ट साहित्य पत्रिका जाने ते मार्च, २०१७, पत्रिका क्र. ३५८, पृष्ठ – १३,१४,१५

मध्ययुगीन साहित्यातील स्त्री जाणिवा

गोविंद शंकरराव रामदिनेवार

मराठी विभाग, वै. धुंडा देगलूरकर महाविद्यालय देगलूर

मध्युगातील साहित्याच्या विचार केल्यास साहित्यातील स्त्री या नात्याने सर्वप्रथम महदंबेच्या धवळ्याचा विचार करावा लागतो. मराठी साहित्यातील पहिले काव्य महानुभाव संप्रदायाच्या माध्यमातून आणि एका स्त्री व्यक्तिरेखेतून रेखाटताना स्त्री व्यक्तिरेखांचा आणि धवळ्यांचा फार जवळचा संबंध आहे.

जैन धर्मा प्रमाणे महानुभव पंथ संन्यासप्रवण व अत्यांतिक निवृत्तीवादी आहे,पंथात संन्याशी व गृहस्थ अशी दोन वर्ग अनुयायांनी केलेले आहेत पण महदंबा चक्रधर स्वामी च्या सानिध्यात येऊन गोविंदप्रभू च्या अवताराच्या माध्यमातून धवळ्याची निर्मिती केली पण या धवळ्यातून एक सामाजिक आणि मानसिक संदेश देण्याचा प्रयत्न केलेला आपणास दिसून येतो.त्या काळातील रुक्मिणी ही एक उपवधू आहे आणि या उपवधूच्या जीवाची घालमेल महदंबा अप्रतिम काव्यातून मांडतांना आपणास दिसते. तसा महानुभव वांड्.मयाचा विचार केल्यास या वांड्.मयामध्ये श्रीकृष्ण कथेला प्राधान्य मिळाले आहे. महदंबेचे धवळे हे प्राचीन मराठी किंवा मध्ययुगीन मराठी साहित्यातील उत्कृष्ट भावकविता ठरते. म्हणून मराठीतील आद्य कवयित्री महदंबा हिचा कालखंड पाहिल्यास इ.स१२३०ते १३०२ असल्यामुळे या काळात निर्माण झालेले काव्य हे अवर्णनीय असेच आहे.महदंबेने गोविंदप्रभू कडील कृष्ण विवाह उत्सवाच्या वेळी 'करवली' म्हणून गायलेले धवळे (लग्नात गावयाची वर (=धव) विषयक गीते किंवा धवळा वृत्तातील म्हणजे मुक्त ओवीतील गीते) म्हणजेच कृष्ण रुक्मिणी विवाह वरील मराठीतील पहिले काव्य होय धवळ्याचे एकूण दोन भाग आहेत त्यातील पहिले पर्वार्ध या पूर्वार्धाचा रचनाकाळ साधारणता इसवीसन १२८६ भारतीय संस्कृतीतील या काव्यात कृष्ण रूपाचे तसेच विवाहातील सोहळ्यांची वर्णन महादंबेने तन्मयतेने केले आहे. सहज प्रेमाने झालेला भक्तीभावाचा उद्रेक आणि सर्वांचे सौंदर्य तिच्या डोळ्यात दिसून येते .काव्यातील सौंदर्याचा मुर्तीमंत आविष्कार म्हणजे धवळे आहेत. या धवळ्यामध्ये साधेपणा आहे भाषा सौंदर्य यासोबत साधेपणा सुद्धा भाषेत प्रकर्षाने जाणवतो. या कार्यामध्ये विचार हे मानवी मनाला गवसणी घालणारे आहेत म्हणून या काव्यातील रुक्मिणीच्या मनातील भावना, श्रीकृष्ण विषयी असलेले प्रेम, त्या प्रेमाची उत्कटता आणि त्या उत्कट भावनेतून श्रीकृष्णाची पहिली दृष्टभेट व्हावी ही आतुरता महदंबा आपल्या कवितेतून रेखाटते.

या धवळ्यात एकूण दोन भाग आहेत त्यापैकी पूर्वार्ध हा ८३ओव्यांचा आहे आणि उत्तरार्ध ६५ओव्यांचा आहे यासोबतच महादाईसेचा शीघ्र काव्यरचनेचा अनुभव या धवळ्यांतून प्रकर्षाने जाणवतो.

महदंबा शीघ्र काव्यरचना करण्यामध्ये खूपच तरबेज होत्या महदंबेच्या नावावर नाटकी रुक्मिणीस्वयंवर या नावाची ११० अभंग आहेत.

मुक्ताबाईः- इ.स १२७० ते १२९७ मुक्ताबाई ला वीस वर्षांचा आयुष्य लाभले सर्व भावंडात लहान असली तरी संत मंडळी व संत साहित्यात तिची योग्यता सर्व दृष्टीने खूपच मोठी आहे. तिला निवृत्तीनाथा कडून गुरुपदेश झाला आणि त्यांच्याकडूनच ज्ञानाचा अधिकार प्राप्त झाला योगाच्या अनुभवामध्ये ती खूपच निष्णात होती चांगदेवा सारख्या महान ज्ञानी व्यक्तीची ती गुरु झाली. नामदेवाचा अहंकार दूर केला, एवढेच नाही तर ज्ञानेश्वरला सुद्धा ती कार्यप्रवृत्त केली. म्हणूनच संत साहित्यात तिचा अधिकार मोठा आहे याबाबतीत तिचे वर्णन करताना असे म्हटले जाते की

"लहानशी मुक्ताई जशी सणकांडी।
केले देशोधडी महान संत।

असेच म्हटले जाते.

नामदेवाला ती उपदेश करताना असे म्हणते की.

अखंड जयाला देवाचा सेजार।

कारे अहंकार नाही गेला ।।

अशा परखड आणि तिखट शब्दाच्या माध्यमातून ती नामदेवाला उपदेश करते या उलट ज्ञानेश्वर जेव्हा समाधि घेतले तेव्हा ती उदास होते, दुःख व्यक्त करते, यात बंधु प्रेमाबरोबर तिच्या अंतःकरणातील स्पष्टता आणि मवाळता दिसून येते.

मुक्ताईच्या ताटीचे अभंगातून ती विश्वाचा आधार हे ज्ञान आहे हे सांगताना योगा अनुभव याचा उल्लेख वारंवार करते त्यातच

'मुंगी उडाली आकाशी।

तिने गिळले सुर्याशी।

माशी व्याली घार झाली।

देखोनि मुक्ताई हांसली।।

अशा प्रकारची कुट रचनाही. तिच्या लेखनातून स्पष्ट रीतीने येते.

ताटीच्या अभंगातून

तुम्ही तरोन विश्व तारा। असे म्हणून ती ज्ञानेश्वर आला तिचा लाडी बालपणा आणि धीटपणा हे कौतुकास्पद असल्याचे आपणास दिसते ज्ञानेश्वरा सारख्या ज्ञानियाचा राजांचे रुसवा-फुगवा धाकट्या बहिणीने काढावा हा प्रसंग फार भावपूर्ण आणि नाट्यपूर्ण वाटतो हे सामर्थ्य मध्य व साहित्यात स्त्री लेखनातून दिसून येते आणि या स्त्री लेखनात समाजाचा उद्धार करून पुढील वाटचालीस प्रेरित करणारा हा विचार आहे. आणि तो फक्त स्त्री साहित्यातून दिसतो.

स्त्रीवादी साहित्य आणि समीक्षा

प्रा. आहेर डी. के.

मराठी विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,मुखेड

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय समाज आणि माणसाच्या मनात राजकीय आशा-आकांक्षा वाढल्या. शिक्षण आणि शिक्षणासोबतच लोकशाहीचा विचार खेड्यापाड्यातील अनेक घटकापर्यंत जाऊन पोहोचला. या सर्वाचा परिणाम निरनिराळ्या भूप्रदेशातील लोक, खेडे, खेड्यातील दलित, भटके विमुक्त, आणि आदिवासी समाज शिक्षणाच्या प्रसारामुळे जागे होऊ लागले. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, कामगार वर्ग आणि स्त्रिया यांच्यापर्यंत शिक्षणाचे लोण पसरलं. यातूनच हळूहळू शिक्षणाचे लोकशाहीकरण सुरू झालं. स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक विषमतेची दरी मोठ्या प्रमाणात होती. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि स्वाभिमान या मानवी मूल्यांची जाणीव प्रत्येकाला होऊ लागली. समाजमनात एक क्रांतिकारक बदल घडून आला, तो म्हणजे विषमतेविरुद्ध बंड. समाज मनात निर्माण झालेल्या वेदना आणि विद्रोह साहित्यातून दिसू लागले आणि यातूनच एक महत्वाचा साहित्यप्रवाह जन्माला आला तो म्हणजे 'स्त्रीवादी साहित्य' होय.

स्त्रीवादी साहित्याचे स्वरूप :-

ज्या साहित्यात प्रामुख्याने स्त्रियांचे प्राधान्याने चित्रण आलेले आहे असे साहित्य वाङ्मय इतिहासाच्या सर्व काळात दाखविता येण्यासारखे आहे. स्त्रीवादी साहित्य जसे स्त्रियांनी लिहिले आहे तसे पुरुषांनीही स्त्रीवादी साहित्य लिहिले आहे.स्त्रीवादी समीक्षेच्या संदर्भात ते सगळे साहित्य अभ्यासाचा विषय होऊ शकतो स्त्रीवादी साहित्य आणि समीक्षा यांना स्त्रीमुक्तीचा चळवळीचा एक संदर्भ आहे. स्त्री-मुक्ती चळवळीची परंपरा

"स्त्री जन्म म्हणून न व्हावे उदास

ऐसे साधुसंत केले जनि"

असे म्हणणाऱ्या जनाई पासून मराठी साहित्य शोधता येते. तरीही तिचा आधुनिक संदर्भ तेवढा लक्षात घेणे सोयीचे होणार आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षांत स्त्रीमुक्तीची जाणीव व्यक्त करणारे स्त्रियांचे लेखन स्त्रीवादी संदर्भात येथे विचारात घ्यावयाचे आहे.

१९६० नंतर मराठी साहित्यात जोमाने घुसलेले वाङ्मयीन नवप्रवाह वर्ग, जाती, परिसर यांची बांधिलकी पत्करणारे आहेत. दलित, ग्रामीण, जनवादी, स्त्रीवादी अशा विरुदांनी ते ओळखले जाताना त्यांच्या मागे अनेक वर्गीय असा नवजागृत समाज आहे. त्यांच्या दबल्या गेलेल्या अस्मितेची गर्जना आहे.

स्त्रीवादी साहित्याचा जन्म :-

स्त्रीवादी साहित्याचा जन्म आणि त्यातून निर्माण झालेल्या साहित्याची मानवी मीमांसा केवळ साहित्यापुरती विचारात करून देता येत नाही. त्यासाठी साहित्य घडवणाऱ्या जीवन क्षेत्रांमध्ये उतरावे लागते. साहित्याचे क्षेत्र स्वायत्त असले तरी पूर्णतः स्वातंत्र्य असते भोवतालच्या जीवनाशी असलेली नाळ त्याला तोडता येत नाही आणि तशी तोडली तर टिकू शकत नाही. साधी टपाल व्यवस्था अस्तित्वात येत नाही तोपर्यंत पत्रात्मक कादंबरीचा जन्म होऊ शकत नाही. साहित्याला सौंदर्य प्रदान करणारी अशी तंत्रे जीवनातून येतात त्याचा आशय हा जीवनाची अनुभूती हाच असतो. साहित्य ही केवळ एखाद्या फुलासारखे वास घेऊन कौतुक करण्याची वस्तू नाही त्याहून तिला गंभीर अर्थ आहे. समाजात भाषा ज्या रीतीने वापरली जाते

ती पसंत नसते. म्हणून कवी भाषा वेगळ्या तऱ्हेने वापरतो. भोवतालचे जग आहे तसे मान्य नसते. म्हणून लेखक आपल्या साहित्यातून एक नवीनच जग निर्माण करीत असतो.अशा बंडखोरीच्या भूमीतच साहित्याचा जन्म होत असतो.

नव जागृत स्त्री

मराठीतील स्त्रीप्रधान साहित्यप्रवाहामागे मराठी समाजाच्या परिवर्तनाचा संदर्भ आहे. मध्ययुगीन, आधुनिक युगात आपण जो प्रवेश केला तो स्वाभाविक क्रमाने केलेला नाही, येथल्या जड स्थितिशील, धर्मनिष्ठ, कृषिप्रधान, ग्रामकेंद्रित, विषमता मुल्य संस्कृतीवर पाश्चात्य संस्कृती, गतिशील विज्ञानोमुख, उद्योग व्यक्तिवादी आणि स्वातंत्र्य समतेच्या नव्या मूल्यांवर आधारलेली होती. या दोन संस्कृतींच्या संघर्षातून समन्वयातून आपल्या जीवनाची जडणघडण झाली स्वातंत्र्योत्तर अर्वाचीन कालखंडाचे प्राण तत्वे मुक्तीची प्रबळ प्रेरणा हेच होते. त्यातून स्त्रीदास्य मुक्तीच्या चळवळीचा जन्म झाला. स्वातंत्र्याच्या चळवळीला दिलेली सामर्थ्याची जाणीव आणि समाज प्रबोधनातून लाभलेले आत्मभान यामुळे स्त्रीची अस्मिता जागी झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिक गरजेपोटी स्त्री अर्थार्जन करू लागल्या. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही जिवंत प्रणालीचा स्वीकार आणि स्त्री शिक्षणाचा पुरस्कार यांनी तिच्या अस्मितेला फुलवलेली नवजागृती, स्त्री स्वतःकडे आणि अवतीभोवतीच्या जगाकडे नव्या नजरेने पाहू लागली. पुरुषी वर्चस्वाखाली दडपलेल्या आपल्या स्त्रीत्वाची आपल्या हक्काची जाणीव विभावरी शिरूरकर यांच्या 'कळयांचे निश्वास' मधून प्रगट झाली कळयांच्या निश्वासापासून प्रिया तेंडुलकरांच्या 'ज्यांचा त्यांचा प्रश्न' पर्यंत विस्तारलेल्या लेखनाला स्त्रीप्रधान किंवा अधिक योग्य शब्द वापरावयाचा म्हटले तर स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह म्हणता येईल.

स्त्रीविषयी मतप्रणाली :-

स्वातंत्र्यपूर्व काळात विभावरी शिरूरकर यांनी स्त्रीच्या संक्रमणकालीन मनोव्यवस्थेची चित्रे रेखाटली. काल्पनिक आदर्शवाद आणि संवर्गरंजनवाद यातून मार्ग काढून त्यांनी आपल्या वास्तव जाणिवांच्या अकृत्रिम कलारूप सिद्ध केले. अलीकडे 'शबरी' सारख्या कादंबरीतून काळाबरोबर बदलणाऱ्या स्त्री जीवनाचा एक गुंतागुंतीचा आलेख त्यांनी उभा केला आहे. मंगला गोडबोले, छाया दातार यांच्या लेखनातून स्त्रीच्या विद्रोहाचे दर्शन घडते पण आपल्या जाणिवांचे प्रभावी कलारूप त्यांना घडविता येते असे दिसत नाही. विजया राजाध्यक्ष, सानिया यांचे लेखन करुणात्मक उंची गाठते. पण त्यात स्त्रीच्या नव्या जाणिवा अंधुक व अस्पष्ट दिसतात. कमल देसाई, गौरी देशपांडे, अंबिका सरकार, शांता निसल, प्रिया तेंडुलकर, आशा बगे यांच्या लेखनात मात्र सामाजिक व कलात्मक जाणिवांचा एकमेळ दिसतो. त्या लेखनाला सुकन्या आगाशे म्हणतात त्याप्रमाणे स्त्रियांच्या दुःखाचे कारण आहे बंडखोरीची धग आहे आणि स्वप्नांचा रंग आहे. आपल्या लेखनाकडे व जीवनाकडे गांभीर्याने व मूल्यदर्शी नजरेने पाहणाऱ्या अशा लेखनातून स्त्रीवादी लेखनाची धार येऊ घातली आहे.

स्त्री जीवन :-

सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांचे केंद्रीकरण करणारा पुरुषनिष्ठ प्रथम पुरुषप्रधान असे आजची समाज व्यवस्था आहे. या व्यवस्थेने स्त्रीला तत्वता समानता दिले आहे, पण तिला दुय्यम दर्जाचे स्थान दिले आहे. प्रबोधनाच्या पहिल्या टप्यावर अपेक्षित असलेल्या सुधारणा प्रत्यक्षात आल्या तरी स्त्रियांविषयी चा पुरुषी दृष्टिकोन किंवा व्यक्ती विकासाच्या नव्या जाणिवा दिल्या. पण त्या प्रमाणात भोवतालचे समाजजीवन बदलले नाही. यातून निर्माण होणाऱ्या तानात तगमगणारे स्त्री मत अल्पप्रमाणात का होईना स्त्रीवादी साहित्यात दिसू लागले. स्त्रीजीवनाच्या बाह्य आणि अंतर वास्तवाकडे डोळसपणे पाहण्याचा हा काळ आहे.

वाचक समीक्षकांची संवेदनप्रवृत्ती :-

सौंदर्याचे संवेदन जसे काळातीत असते. तसे बऱ्याच प्रमाणात देश, काल, परिस्थिती यापेक्षाही वेगळे असते. काळाच्या ओघात आशय अभिव्यक्तीचे स्वरूप बदलते आणि म्हणून त्या त्या साहित्याचे डोळे आणि कान वापरले पाहिजेत. या

अर्थाने स्त्री प्रधान साहित्याची समीक्षा स्त्रीवादी समिक्षीने करावयास हवी. स्त्रीवादी समीक्षा म्हणजे नव्या साहित्यशास्त्राची मागणी आहे. स्त्रीवादी समीक्षा साहित्याकडे पाहणाऱ्या वेगवेगळ्या साहित्यदृष्ट्या व अभ्यास पद्धतीची मागणी आहे. बहुतेक आधुनिक समीक्षा पद्धती सहितेच्या चिकित्सक विश्लेषक व काळजीपूर्वक वाचनावर भर देणाऱ्या आहेत. सहितेचे वाचन करताना आपल्या सर्व पूर्व कल्पना घेऊन वाचक साहित्यकृती वाचीत असतो. इकडे आज लक्ष वेधले जात आहे. समाजामध्ये प्रबळ असलेल्या श्रद्धा आणि समाजावर प्रभुत्व असलेली मूल्ये ठरविणे म्हणजे अनुभवाबद्दल निर्णय घेणे त्यांचे मुल्य ठरविणे म्हणजे त्याची व्यवस्था लावणे होय. त्यामुळे साहित्याकडे पहाण्याची भूमिका जाणीवपूर्वक आहे.

पुरुषी वर्चस्व :-

समाजामध्ये प्रबळ असलेल्या पुरुषी वर्चस्वाचा दृष्टीपेक्षा वेगळ्या दृष्टीचा शोध घेऊन साहित्याकडे पाहण्याचा प्रयत्न समीक्षा करते. लिंग भेदाच्या साहित्यावर कोणता परिणाम होतो. स्त्री-पुरुष परस्पर संबंधाचे चित्र साहित्यातून कसे आले आहे, त्यात कोणते बदल जाणवतात ? का? त्यामागे कोणती मूल्य व्यवस्था उभी आहे. या सारख्या प्रश्नांचा विचार पारंपारिक मराठी साहित्य समीक्षेने समाजावर टाकला आहे. पुरुषी वर्चस्वाच्या वातावरणात वाढलेल्या समीक्षकांच्या हातून हे जाणता-अजाणता घडत आले आहे. संहितेबाहेर जाण्याचे नाकारणाऱ्या कलावाद्यांनी त्याला हातभार लावला आहे. स्त्रियांनी लिहिलेले आणि स्त्रियांना प्राधान्य असलेले साहित्य या दृष्टिने तपासावे असे त्यांना वाटत नाही. जणू चर्चा करण्याइतकेही हे साहित्य महत्वाचे नाही.

स्त्रियांच्या लेखनावर हल्ला :-

डॉ. य. दि. फडके यांच्या सारख्या सहृदय जीवनवादी साहित्यचिंतक दलित साहित्यातील वेदना आणि विद्रोह सहानुभूतीपूर्वक समजून घेऊ शकतात. तथापि स्त्रियांच्या लेखनाचा विचार करताना त्यांना चिंतनापेक्षा चिंताच अधिक करावीशी वाटते. लक्ष्मीबाईची स्मृतिचित्रे, बहिणाबाई गाणी, इंदिरा संतांची कविता, दुर्गा भागवत आणि इरावती कर्वे यांचे 'ललितगद्य', विभावरी शिरुरकर, कमला देसाई, गौरी देशपांडे यांचे 'कथात्मक साहित्य' यासारख्या शिखरांकडे त्यांनी ओझरती नजर टाकली आहे. आणि स्त्रयांच्या लोकप्रिय वळणाच्या लेखनावर हल्ला चढविला आहे. असेच लेखन पुरुषांनीही केले आहे. हे ते विसरले आहेत. एकूणच सामाजिक संदर्भ आणि वाङ्मयीन अर्थशास्त्र यांच्या चौकटीतून फक्त स्त्री साहित्य बाजूला काढून टीका करणे योग्य ठरत नाही. इंदिरा संतांच्या कवितेला गंगाधर गाडगीळ, माधव अचवल, रमेश तेंडूलकर आणि गंगाधर पाटील यांच्या सारखे अव्वलदर्जाचे भाष्यकार लाभले पण या कवितेतील स्त्रीत्वाचे आशय विश्लेषण करावे असे मात्र त्यांना वाटलेले नाही. लक्ष्मीबाई टिळकांची साहित्यकृती 'अक्षर' साहित्यकृती म्हणून गृहीत धरली गेली. परंतु त्यांचे वाङ्मयीन महत्व उलगडून दाखविणारी समीक्षा क्वचित लिहिली गेली.

स्त्रीवादी समीक्षक :-

पुरुषांनी स्त्रियांकडून अपेक्षिलेली भूमिका मनोमन नाकारून स्वतःच्या शोधाची वाट तुडविणाऱ्या लेखिका असता. त्यांच्यापैकी फारच थोड्या पुरुषांनी निश्चित केलेल्या साहित्याच्या मध्यवर्ती धारेत सामाविल्या जातात. पण पुष्कळ जणांचे लेखन दुर्लक्षित केले जाते. त्यावर गौणत्वाचा छाप मारला जातो. यासंदर्भात 'स्त्री-पुरुष तुलना' करणाऱ्या ताराबाई शिंदे यांचा उल्लेख करणे महत्वाचे ठरते. अशा अपेक्षिणाऱ्यांना साहित्याच्या मध्यवर्ती प्रवाहात योग्य ते स्थान मिळवून देण्याचे काम स्त्रीवादी समीक्षेला करावे लागते.

पुरुषी टीकेची परंपरा प्रदीर्घ आहे. आणि तिचा प्रभाव दांडगा आहे. त्यामुळे अनेक गोष्टी समीक्षकांच्या लक्षात येऊ शकत नाही.किंवा आल्यावर तरी ते तिकडे दुर्लक्ष करतात.

जुन्या साहित्याचे नवे दर्शन :-

स्त्रीवादी सामिक्षेच्या नव्या जाणीवेतूनआपण वाचू लागलो की परिचित साहित्याचे त्यातील स्त्रीप्रतिमेचे वेगळे दर्शन घडू लागते. स्त्री पुरुषांच्या प्रीतीचा रेशमी गोफ हळूहळू काव्यात्मक संवेदनाची विणणारी 'तलावातल चांदणं' सारखी गंगाधर गाडगीळांची ही कथा मग निराळी दिसू लागते. यातला नायक स्मृती, संवाद करताना म्हणतो, 'माझ्या मुलाची तू आई होणार आहेस' तेव्हा आपल्यातला ऐकणाऱ्याला 'माझ्या' हा स्वामित्वसूचक शब्द बोलू लागतो आणि मग या रमणीय चांदण्याचे बीज क्षेत्र न्यायासारख्या विषम कल्पनांचा अंधार घनदाट केल्याचे लक्षात येते. सहज तुझी हालचाल जणू मोहिते. अशी मन मोकळी कबुली देणारे तांबे जेव्हा

"अपूर्व शक्ती सगुण
झाडितसे मन अंगण
हे माझे भाग्य बघून
जळफळतील देव ते"

असेही म्हणतात. म्हणजे देवांना पत्नी भाग्याने लाभली आहे. तरी तिच्या नशिबाचे भांडण काही चुकत नाही. स्त्रीचा सांस्कृतिक गौरव तिचा सामाजिक दर्जा बदलू शकत नाही याचीच ही खून नाही का ? प्रेयसीच्या मनोगताची दखल घेण्याची जरुरी माधव ज्युलियनच्या संगमोत्सुक डोहाला किंवा गोविंदग्रजांच्या 'प्रेम आणि मरण' मधील वृक्षाला वाटत नाही. ध्येयामागे धावणारे पुरुष आणि स्वप्नांची समाप्ती झाली तरी त्यांच्या प्रेमामागे धावणाऱ्या स्त्रिया यांनी कुसुमाग्रजांची काव्यसृष्टी गजबजून गेली आहे.

अमर्याद मित्रा तुझी थोरवी अन
मला ज्ञात मी एक धूली कण
अलंकारण्याला परी पाय तुझे
धुळीचेच आहे मला भूषण (पृथ्वीचे प्रेमगीत)

असे दुय्यम स्थान त्यांच्या नायिकांनी आपण होऊन स्वखुशीने पत्करलेले आहे.

सहृदय आणि प्रागतिक प्रतिभावंताच्या लेखनातही स्त्रीचे चित्र असे विषमतेच्या कल्पनांनी रंगलेले आहे. मग भोगदासी म्हणून तिचे चित्र रंगविणाऱ्या दुय्यम साहित्याविषयी तर बोलायचे कारणच नाही. स्त्रीवादी समीक्षेच्या भूमिकेतून पाहू जाता जुन्या साहित्याचे असे नवे दर्शन घडते. आणि नव्या अंकुरणाऱ्या जाणिवांची चाहूल घेता येते.

समीक्षकांची पूर्वभूमिका पुष्कळदा अस्पष्ट आणि संदिग्ध असते. मार्क्सवादी सामिक्षंकाप्रमाणे स्त्रीवादी समीक्षाही आपल्या पवित्र्याबद्दल दक्ष असतात, जागरूक असतात. त्यांच्या साहित्यदृष्टी मागे स्त्री विषयीचे आणि एकुणच जीवन विषयीचे एक स्वतंत्र दर्शन असते. डॉ.कुडचेकर यांनी त्यांचे सूत्ररूप दर्शन घडविले आहे. स्त्री पुरुषांचे परस्पर संबंध आणि लिंगभेद ही साहित्याची मध्यवर्ती आशय सूत्रे असतात. ही महत्वपूर्ण बाब या समीक्षेने ठळकपणे आपल्या लक्षात आणून दिले आहे. हीदोन्ही निव्वळ मुलतत्वे आहेत. त्यांच्यात जसा परस्पर विरोध आहे. तसे परंपरा वर्णनेही आहे. स्त्री पुरुषांचे नाते हे चिरंतन व सर्वात जवळचे आहे. या नात्याची गुंफण आजवर पुरुषप्रधान व्यवस्थेत झोंबीच्या दृष्टीतूनच झाली.

स्त्री पुरुषांच्या परस्पर संबंधाचे चित्र :-

आज समाजात हे नातं बदलत आहे. त्याचा परिणाम एकूणच मानवी परस्पर संबंधावर कसा झाला, याबद्दलचा भाव संबंधाचे स्त्री पुरुषांच्या परस्पर संबंधाची चित्रे आजच्या साहित्यातून उमटत आहेत. तेव्हा त्याच्या आकलनासाठी आपण ही बदलती जीवनदृष्टी आणि तिच्याशी संवाद अशी साहित्यदृष्टी स्वीकारली पाहिजे. असा स्त्रीवादी समीक्षेचा आग्रह आहे. अस्तित्वाची पुरुषी पद्धती ही स्वामित्वासाठी झगडण्याची भाषा बोलणारी आहे. निसर्गावर, दुसऱ्या माणसावर, स्त्रीवर आणि स्वतःवरही प्रभुत्व मिळवण्याचा अट्टहास त्यात असतो. स्त्रीवादी भूमिकेचा, पुरुषी वर्चस्व जाऊन स्त्रियांचे वर्चस्व प्रस्थापित

व्हावे असे तिला वाटत नाही. एकूणच वर्चस्व भावनेतून मुक्त होऊन निर्भळपणे जीवनाकडे आणि साहित्याकडे पाहणे तिला आवश्यक वाटते. स्वतःच्या आणि इतरांच्या अस्तित्वात आनंद मानणाऱ्या अधिक प्रवाही आणि हळुवार अशा जीवनदृष्टीचा स्त्रीवादी भूमिका करते. पारंपारिक प्रतिभा नाकारून व्यक्ती म्हणून स्त्रीचा शोध घेणारे साहित्य स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल.

स्त्रीवादी जाणीवा व नवे वाङ्मय बंध :-

स्त्री जाणीव व्यक्त करावयाची असेल तर तिला नवी भाषा आणि नवे वाङ्मय यांचा शोध घ्यावा लागेल. भाषे विषयाचे औत्सुक्य हा स्त्रीवादी समीक्षेचा एक महत्वाचा विषय आहे. उपलब्ध भाषा पुरुषांनी घडविलेली पुरुषी अनुभवार्थ आणि पुरुषी मूल्य असणारी भाषा आहे. ही पुरुष घटीत भाषा आहे. ती स्त्रियांचे वास्तव संवेदन पुरुषकेंद्रित वर्गीकरणाच्या चौकटीत कोंबून बसवू पहाते. पुरुषांना काय आवडते. काय उचित वाटते याच्या खुणांनीच ती भरलेली आहे. स्त्रीच्या सत्वाला मारणारी अशीच ती आहे. मुल नसलेल्या स्त्रीसाठी 'वांझ' असा शब्द आहे. पण मुल नसलेल्या पुरुषासाठी स्वतंत्र असा शब्द नाही. आपल्या भाषेत 'कन्यादान' आहे पण पुत्रदान नाही. पतिव्रता आहे. पत्नीव्रताला मात्र एक पत्नीव्रत अशी जोड द्यावी लागते. स्त्रीच्या शरीरवर्णनात फळाफुलांच्या प्रतिमांचा सडा पडतो. त्यामुळे ती सजविण्याची आणि भोगण्याची बाब वाटू लागते. थोडक्यात शरीर, मन, बुद्धी या तिन्ही क्षेत्रात स्त्रीला अधिक सामनात नाही. आपल्या सामाजिक विषमतेचा ठसा आपल्या भाषेवर उमटला आहे.

स्त्रीवादी भूमिकेचा शोध :-

स्त्रीचे सत्व मारणारी ही भाषा आहे. त्यामुळे स्त्रियांचे वास्तवाचे संवेदन पुरुषकेंद्रित भाषेत यथार्थपणे व्यक्त होऊ शकत नाही. यासाठी परदेशी लेखिका आपली भाषा घडवीत आहेत हे पुरुषी वर्चस्व पुसून त्यात स्त्रीचे संवेदन भरणारी भाषा मराठीत अजून घडायची आहे. स्वतःचा शोध किंवा स्वानुभावांची अभिव्यक्ती याचा स्त्रीच्या दृष्टीने कोणता अर्थ आहे. आरंभ काळात स्त्रीवादी भूमिकेने स्त्री पुरुषामधील साधारण महत्व दिले होते. शारीरिकदृष्ट्या दुर्बल आणि स्वभावदृष्ट्या भावनाशील अशी परंपरागत प्रतिमा नाकारण्याचा त्यांचा प्रयत्न होता. स्त्री पुरुषातील शारीरिक भेदाला अशी चीटकवण्याची गरज त्यांना वाटत नव्हती. समानतेसाठी स्त्री पुरुषांच्या भेदापेक्षा साम्यवर भेद देणे त्यांना आवश्यक वाटले.

आजचे अत्याधुनिक स्त्रीवादी पुन्हा एकदा स्त्री पुरुषातील भेदावर भर देऊ लागलेले आहे. याचा अर्थ असा नाही तर पुरुषापेक्षा वेगळा असा स्त्री जाणीवेचा अविष्कार त्यांना तितकाच योग्य व उचित वाटतो. असा त्याचा अर्थ आहे. क्रियेला प्रतिक्रिया या न्यायाने स्वतःचे पुरुषीकरण म्हणजे मुक्ती नाही. हे आता सर्वच स्त्रियांना जाणवत असेल. अशा काळात पुरुषांच्या मार्गाने ध्येय शोधण्यापेक्षा, बाईच्या बाईपणात खोलबुडी घेऊन स्त्रीत्वाचे माणूसपणाचे श्रेय सापडले याचा आजच्या लेखिका शोध घेत आहे. गौरी देशपांडे यांचे कथात्म साहित्य यांचे चांगले उदाहरण ठरू शकेल. पुरुषसत्ताक समाजात स्त्रीचे दुय्यम व दडपलेले स्थान उघडे करणे त्या विषयीची निकोप जाणीव ठेऊन लेखन करणे, तसेच स्त्रीकडे एक शक्ती ज्योत म्हणून पहाणे गरजेचे आहे.

संदर्भसूची

१) डॉ.वरखेडे मंगला, 'स्त्रीवादी समीक्षा संकल्पना व उपयोजना' का.स.वाणी प्रगत अध्ययन संस्था,प्र.आ.१९९९

२) डॉ.पाटील शोभा, 'स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा' स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्र.आ.२००७

३) डॉ.घोंगडे अश्विनी, 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन,' दिलीपराज प्रकाशन पुणे प्र.आ.१९९३

४) शिंदे उषा, विभावरी शिरुरकर : ;स्त्रीवादी आकलन', अमृत प्रकाशन कळवण जि.नाशिक प्र.आ.१९९५

५) डॉ.व्यवहारे विद्या, 'साहित्य विमर्श,' चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद प्र.आ.१९९७.

मराठी कथा कादंबऱ्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

श्रीमती रतन अंबादास कराड
सहशिक्षिका, जिल्हा परिषद हायस्कूल हदगाव

मराठी साहित्याचा विचार करताना आपणास साधारणपणे प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचीन , आधुनिक, स्वातंत्र्यपूर्व कालखंड व स्वातंत्र्योत्तर कालखंड असे भेद करावे लागतात. प्रत्येक कालखंडात मराठी साहित्यात मोलाची भर पडलेली दिसते. तसेच प्रत्येक कालखंडाच्या प्रेरणा व प्रवृत्ती वेगवेगळ्या असल्यामुळे मराठी साहित्याचे स्वरूप ही भिन्न भिन्न स्वरूपाचे बनलेले दिसते.

प्राचीन कालखंड साहित्याची प्रेरणा अध्यात्माची, भक्तीची प्रबोधनाची, तत्वज्ञानाची असलेली दिसते. अध्यात्म आणि तत्वज्ञान यांचा सुरेख संगम झालेला दिसतो.मध्ययुगीन मराठी साहित्यात प्रबोधनाबरोबर नैतिकतेचा उद्देश, काव्यात्मकता, कथनात्मकता, आख्यान इत्यादींची वैशिष्टये आढळतात. वीर, रस, शृंगाररस सारखा तत्कालीन ,सामाजिक घटनांचा अविष्कार झालेला दिसतो .

अर्वाचीन कालखंडात इंग्रजी सत्तेच्या प्रभावामुळे अध्यात्मिक प्रवृत्ती बरोबर भौतिक विचारांचा प्रभाव दिसून येतो.

नव्या नव्या ज्ञानशाखांचा परिचय, व्यवहारिक, भौतिक ज्ञान, प्रचार, प्रसार,सामाजिक सुधारणा यावर भर दिलेला दिसतो. एतद्देशीय यांच्या पारंपारिक वैचारिकता, अंधश्रद्धा नष्ट करून विवेकपूर्ण व पुरोगामी दृष्टी रूजविण्याचा प्रयत्न होऊ लागला. भारतीय समाजाची अन्यायकारी असलेली वर्णाश्रम पद्धती, जातीव्यवस्था नष्ट करून शिक्षण, व्यवसाय, उद्योग यावर भर देण्याचा प्रयत्न झाला. तसेच पाश्चात्त्य ज्ञानामुळे स्वातंर्त्य समता इत्यादी गोष्टी जाणवू लागल्यामुळे भारतीय समाजात या मूल्यांची जाण झाली व या सर्वांचा परिणाम मराठी साहित्यावर झालेला दिसतो .

स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठी साहित्यातील स्त्री जीवनाचा, चित्रणाचा विचार केला तर लक्षात येते की, भारतीय स्त्री ही देव, दैव पुरुषप्रधान विचारात अडकलेली दिसते. आपले जीवन 'ठेविले अनंते तैसेची रहावे' या उक्तीप्रमाणे जगत होती. त्यामुळे तिच्या जीवनात आधुनिक विचारांचा मागमूसही आढळत नाही .

भारतीय समाज हा पुरुष प्रधान असल्यामुळे स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान प्राप्त झाले. शिवाय तिच्याकडे पाहण्याची दृष्टी गौण होती. त्यामुळे स्त्री जीवन अनेक तऱ्हानी समस्याग्रस्त बनले होते. वास्तविक पाहता स्त्रिया हा प्रमुख समाज घटक असून त्यांच्या अस्तित्वाला महत्त्व दिले जात नव्हते. सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात सतत अन्याय होताना दिसतो.

एकूणच स्त्री जीवनाचा विचार केला तर असे जाणवते की पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे, जातिव्यवस्थेमुळे, वर्णव्यवस्थेमुळे स्त्री परावलंबी, अन्यायग्रस्त, उपरी, दुःखी बनलेली दिसते. समाजातील स्त्रीचा दर्जा सतत वास्तवतेचा अभावदर्शक जाणवतो. तिला एकतर देवी, आदिशक्ती, अर्धांगी अशा उच्च पदावर नेऊन ठेवण्याचा प्रयत्न केला तर दुसरीकडे स्त्री ही विविध दोषांनी युक्त असणारी आहे असे मानून तिला वास्तवाची जाणीव कधी होऊ दिली नाही. तिला एक व्यक्ती, माणूस म्हणून पाहण्याचा प्रयत्न केला नाही. विविध कारणामुळे आणि हेतूने तिला सर्व क्षेत्रात सतत दुय्यम स्थान दिले गेले. स्त्रियांनाही तेच आपले स्थान आहे असे वाटून दुःख सहन केले. पुरुषांनी आपल्याला अनुरूप स्त्री धर्म सांगितला. जी स्त्री हा स्त्रीधर्म पाळील ती स्त्री आदर्श मानली जाईल अन्यथा ती आदर्श नाही असा संकेत निर्माण केला गेला. त्यामुळे 'स्व' अस्तित्व 'स्व' भान विसरून पुरुषाच्या मर्जीप्रमाणे जगू लागली. ती पुरुषाच्या हातचे बाहुले बनली.

मराठी साहित्यात मध्य युगापर्यंत अशीच स्थिती होती. आधुनिक काळात इंग्रजी भाषेच्या विचाराच्या प्रभावामुळे, नवविचारामुळे भारतीय समाजात जाणीव झाली आणि सुधारणा वाद्यांचा एक वर्ग निर्माण झाला. त्यांनी सामाजिक जीवनाचा सर्वांगीण विचार करण्याचा प्रयत्न केला.

धर्म सुधारणा व समाज सुधारणेस गती आणि लोकहितवादींनी (गोपाळ हरी देशमुख) यांनी ब्रह्मण शाहीवर आघात केले. विषमतेवर आसूड ओढले. आणि सर्वांनी शिक्षण घेतले पाहिजे असे सांगितले. आणि स्त्री जीवनावरही लक्ष केंद्रित केले. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यावर ही कोरडे ओढले.

महात्मा फुले यांनी जातिभेद, अस्पृश्यता यांचा कठोरपणे विरोध केला. महिलांसाठी स्त्री शिक्षण यावर भर दिला. तसेच शेतकरी शूद्रातिशूद्रांचा उद्धार करण्याचा प्रयत्न केला. विवाहसंस्था, कुटुंबसंस्था या व्यवस्थेच्या ढाचा बदलण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांनी केलेले हे कार्य अभूतपूर्व कार्य होते.

महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, गोपाळ बाबा वलगकर यांनी ही महत्त्वाची कार्य केले. म. कर्वे यांनी ही महिलांच्या उद्धारासाठी, शिक्षणासाठी मोलाचे कार्य केले.

राजे राजर्षी शाहू महाराजांनी दास्यमुक्तीसाठी मूलभूत असे प्रयत्न केले. सर्वांसाठी शिक्षण, विद्यार्थ्यांना वस्तीगृह , आर्थिक मदत यांची व्यवस्था केली.

डॉ.आंबेडकरांनी खऱ्या अर्थाने स्त्रियांना आत्मभान निर्माण केले. अस्मिता जागी केली समाज लाचारीतून खडबडून जागा झाला. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व सामाजिक न्यायाची मागणी केली. अन्यायाविरूद्ध झुंज दिली व्यवस्थेला टक्कर दिली. लोकशाहीवर लोकशाही मूल्यावर अगाध श्रद्धा ठेवून स्त्रियांची आत्मप्रतिष्ठा वाढविली. या सर्व सुधारकांच्या विचारवंताच्या कार्यामुळे समाजात आमूलाग्र बदल होऊ लागला. प्रत्येक जण शिक्षणाकडे वळू लागला.

१९३३ ते १९४५ या काळात विभावरी शिरूरकरांनी 'कळ्यांचे निश्वास' मध्ये परित्यक्ताच जीवन चित्रण रेखाटले आहे. बालविवाह, केशवपन , समाजातील दैन्य, दारिर्द्य यामुळे होणारी गुन्हेगारी यामुळे समाज जीवन दुःखाने ग्रासलेले होते. स्त्रिया बाहुल्या प्रमाणे जीवन जगत होत्या. त्यांनी कळ्यांचे निश्वास, हिंदोळ्यावर विरलेले स्वप्न, बळी, जाई, शबरी, उमा इत्यादीतून स्त्री जीवनाची चित्रे रंगविली. या साहित्यात मुलाला शिकविर्णाया ,नवऱ्याचा शब्द झेलणाऱ्या, तर कधी नवऱ्याला दटावणाऱ्या स्त्रियांची रूपे साकार केले. त्याचबरोबर काही चाकोरीबद्ध, चाकोरीत व पारंपारिक प्रतिमेत बंदिस्त असलेल्या स्त्रिया दिसतात. भा. रा. तांबे, बोरकर, मंगेश पाडगावकरांनी 'रोमँटिक वळणाची' रूपे साकारली. गझल, सलाम, तुझे गीत गाण्यासाठी, भटके पक्षी वगैरे ही त्यांची उदाहरणे होत.

१९४० ते १९६० या दशकात मराठी साहित्यात नवसाहित्याचे वारे वाहू लागले. दुसऱ्या महायुद्धाच्या भीषण उत्पाताने कुंठित झालेले मानवी जीवन, जीवनाच्या अस्तित्वाचीच अनिश्चितता, औद्योगिक क्रांती इत्यादी मुळे निर्माण झालेल्या समस्या जीवनातील ऐकारलेपणा या सर्वांमुळे वैफल्यग्रस्त बनलेले मानवी मन, साहित्यातून साकार झालेले दिसते. हे मन बाह्य वास्तवाला भांबावून आत्मकेंद्री बनले. आणि स्वतः खोल बुडून मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न करू लागलेले दिसते. बा.सी.मर्ढेकर, गंगाधर गाडगीळ,व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. भा. मिरासदार, रणजित देसाई, उद्धव शेळके इत्यादींनी महिलांच्या मनाचे दर्शन घडविले आणि तिच्यात होणाऱ्या स्थित्यंतराचा अविष्कार केला.

१९६० ते १९८० या कालखंडात आनंद यादव, रा. रं. बोराडे, चारुत्ता सागर, सखा कलाल, महादेव मोरे यांनी कथा कादंबऱ्या लिहिल्या. या साहित्यात विविध विषय आलेले दिसतात. दुष्काळ, आरक्षण, स्त्रियांच्या साठी चे आरक्षण, औद्योगिककरण, हरितक्रांती, जागतिकीकरण अशा अनेक घटकांनी स्थित्यंतर घडवून आणले. त्याचा परिणाम स्त्रियांच्या जीवनावर झाला आणि ग्रामीण स्त्रियांचे जीवन चितारले गेले.आणि र्बयाच लेखक आणि लेखिकांने 'आम्ही जगतो तेच लिहितो' अशी भावना व्यक्त करून वास्तव जीवनाचे चित्रण केले. वास्तवता आणि सामाजिक बांधिलकी, समाज परिवर्तन अनुभव यांना महत्त्व येऊ लागले. त्यातून आपआपल्याला जीवनाचे, कुटुंबाचे, जातीय घटकांचे, समाजाचे चित्रण होऊ लागले. आणि मराठी साहित्यात दलित, ग्रामीण आणि स्त्रीवादी या जीवनवादी प्रवाहाचा प्रबळ रूपाने अविष्कार होऊ लागला. दलित जीवनाची वेदना त्यात ही स्त्री जीवनाची कथा अतिशय संवेदनशील रूपाने व्यक्त झाली आहे. समाजव्यवस्थेने लादले गेलेले, दुःख, अन्याय-अत्याचार, गुलामगिरी आणि अस्पृश्यतेने ग्रासून गेलेली स्त्री साकार झाली हा एक 'मुक्तिसंग्राम' च आहे. यानिमित्ताने स्वतःला शोधण्याचा एक प्रभावी प्रयत्न करणारी स्त्री पुढे आली. ही नवीन स्त्री प्रतिमा होय.

१९७५ ते १९८५ या काळात पाश्चात्त्य स्त्रीवादाचा प्रभाव दिसतो. त्यात स्त्री ही जन्मता स्त्री नसते तर समाज व्यवस्था 'स्त्रीला' तिला एक भूमिका प्रदान करते. ही न्यूनत्वाची भूमिका, जाणीव लक्षात येऊ लागली. बालपणापासून स्त्रीची जडणघडण एक 'बाई 'म्हणून केली जाते पितृसत्ताक कुटुंबाने स्त्रियांवर अन्याय केला याची खंत मनाला लागलेली दिसते. या विचाराने लेखन करर्णाया लेखिका म्हणजे छाया दातार, विद्या बाळ, शांताबाई किर्लोस्कर या होत.

अलीकडील काळातील १९८५ ते आतापर्यंतच लेखन 'स्त्रीकेंद्री' दृष्टिकोनातून करत आहेत हे लेखन करणाऱ्या लेखिका आशा बगे,प्रिया तेंडुलकर, अश्विनी धोंगडे,माधवी देसाई, सानिया,सुनीता देशपांडे,कमल पांध्ये, मेघना पेठे,रजनी

परुळेकर, कविता महाजन, प्रभा गणोरकर, रजिया पटेल, शाहीफानशी, शाहेलुला, मेधा थत्ते, शांता रानडे, वसुधा जोशी, अशा कितीतरी लेखिका समर्थपणे लिहिताना दिसतात तसेच प्रज्ञा लोखंडे, मलिका अमरशेख, या कवियत्रीनी हि समर्थपणे लेखन केले आहे या सर्वांच्या साहित्याची वेगवेगळे वैशिष्ट्ये असली तरी या सर्व साहित्यातून जाणवणारी स्त्री प्रतिमा पुढीलप्रमाणे जाणवते.

1) या साहित्यातील स्त्रियांना विषमतेवर तोंड द्यावे लागत आहे.

2) आजच्या काळातील साहित्यातील स्त्रियांमध्ये आत्मभान, आत्मसन्मान जागा झालेला दिसतो.

3) आजची स्त्री काल्पनिक जगाबद्दल लिहित नाही तर वास्तवावर लक्ष केंद्रित करणारी स्त्री आहे.

4) भुकेचा प्रश्न सुटल्यानंतर हे नको ते हवे च्या पुढे गेली आहे. आत्मभानाशी जगण्याचा विचार करत आहे.

5) प्रत्येकीच्या समस्या वेगवेगळ्या आहेत कुणाच्या मुलाच्या, कुणाच्या शरीर भावनेच्या, कुणाच्या 'स्व' अस्तित्वाच्या , एकटेपणाच्या समस्या दिसतात.

6) स्वतःसाठी धडपडणारी, स्वाभिमानी, ठाम निर्णय घेणारी स्त्री या साहित्यातून जाणवते.

7) या साहित्यातून दिसणाऱ्या स्त्रिया विवाहित मुलावर, नवऱ्यावर आंधळे प्रेम करणाऱ्या दिसत नाहीत. डोळसपणे विचार करणाऱ्या आहेत.

8) आजची स्त्री पारंपरिक लादलेले जीवन जगणे नाकारणारी आहे.

9) नीतिमत्तेच्या संकल्पना बदलविणारे स्त्री साकार झालेली दिसते. आजची नीतिमत्ता, व्यवहाराशी, लैंगिक संबंधाची निगडितअसलेली दिसते. लग्नबाह्य संबंध, प्रेम, सहवास, शरीरमिलन वगैरे इत्यादी संदर्भातील नीती संकल्पना बदलत चालल्या आहेत.

10) या साहित्यात लग्न संस्थेची चौकट ढिली, खिळखिळी व लवचिक बनवणारी स्त्री जाणवते.

11) या काळातील साहित्यात स्त्रीचे शरीरनिष्ट अनुभव, विवाहानंतर अपरिहार्यपणे येणारे मातृत्व यावरही डोळसपणाने विचार करणारी स्त्री जाणवते.

12) या साहित्यातून जाणवणारी स्त्री आपल्या आवडीचे कार्यक्षेत्र निवडण्याचा आणि जगण्याचा प्रयत्न करणारी व स्वातंर्त्य मिळविणारी स्त्री प्रकट होते.

13) एकमेकांपासून मनाने दुरावलेली नाती परात्मभाव त्यांचे दर्शन घडवणारी स्त्री प्रतिमाही जाणवते. बदलत गेलेल्या कौटुंबिक जीवनात स्वतः स्त्रीचे स्थान निर्माण करणारी आहे.

14) करारी, हट्टी स्त्रियाही आढळतात .तशाच पुरुषकेंद्री व्यवस्थेत कोंडी झालेल्या स्त्रिया ही आढळतात. तशाच पुरुषकेंद्री अवस्थेत कोंडी झालेल्या स्त्रियाही आढळतात.

15) मी व्यक्त आहे. मला माझे स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. मन आहे हे प्रकर्षाने जाणवून देणारी स्त्री प्रतिमाही जाणवते .

थोडक्यात -

स्त्री आता पारंपरिक जीवन नाकारणारी आहे. नोकरीसाठी पायपीट करणारी, उनाड मुलांच्या छळाला सामोरे जाणारी, नैतिक सामर्थ्य असणारी, तसेच अबला ही भावना काढून टाकणारी, पुरुषाप्रमाणे काम करणारी, पैसा कमविणारी, घरातील इतरांकडून होणारा अपमान सहन न करणारी, माझ्या लग्नाचे मीच पाहील यामध्ये कोणीही पडू नये असे स्पष्टपणे सांगणारी, अन्याय सहन न करणारी, कुटुंबातील दबावाला भीक न घालणारी, स्वतःची अस्मिता जपणारी,'स्व' त्वाची जाणीव असलेली, ताबडतोब प्रतिक्रिया देणारी, आर्थिक स्वावलंबन स्वीकारणारी, अंतर्मुख होऊन विचार करणारी, दिसतं तसं नसतं म्हणून डोळसपणे पाहणारी, मी कुणाचे बाहुलेल नाही. प्रत्येकाच्या अत्याचाराला जबाब देणारी, संशयी वृत्ती चा पडदाफास करणारी, न जमल्यास घटस्फोटाचे कागद पुढे करणारी, आम्ही नोकरी करणारच, विवाह मनासारखा जोडीदार मिळाला तरच करणार, पण स्वाभिमान राखूनच. ज्या तडजोडी कराव्या लागतील त्या करणार ,आपल्या मतावर ठाम असणाऱ्या स्त्रीच्या प्रतिमा या मराठी साहित्यातील कथा, कादंबरी, कविता या वांग्मय प्रकारातून जाणवते जाणवते.

संदर्भ ग्रंथ

1) कुलकर्णी गो.म. - मराठी साहित्यातील स्पंदने.
2) यादव आनंद - ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या.
3) भोसले दत्ता- ग्रामीण साहित्यः एक चिंतन.

4) कोतापल्ले नागनाथ - ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध.
5) मुलाटे वासुदेव (सं) - ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही.
6) काळुंखे रामचंद्र -ग्रामीण कादंबरी आकलन आणि विश्लेषण.
7) डोळस अविनाश - मराठी दलित कथा.
8) डोईफोडे पंढरी - ग्रामीण कादंबरी बदलते स्त्री जीवन.
9) गोरे सरला -भटक्या-विमुक्तांची कादंबरी.
10) लिंबाळे शरणकुमार - साठोत्तर मराठी साहित्यातील प्रवाह.
11) लुलेकर प्रल्हाद - साठोत्तरी साहित्य प्रवाह.
12) विभुते शंकर- स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी वाटचाल.
13) भगत दत्ता - दलित साहित्य :दिशा आणि दिशांतर.
14) कांबळे त्र्यंबकेश- दलित कविता आणि अमेरिकन ब्लॅक पोएट्री.
15) श्रीवाणी.
16) प्रतिष्ठान.
17) महाराष्ट्र साहित्य पत्रिका.
18) पंचधारा.
19) युगवादी.

मराठी लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

प्रा. निखिता वासू गावकर

प्रस्तावना

लोकसाहित्य हा एक मौखिक वाड्.मय प्रकार आहे. तो अगदी पूर्वजाकडून ते आजच्या पिढि पर्यंत चालत आलेला वाड्.मय प्रकार आहे. लोकसाहित्यामध्ये आपण स्त्रीची प्रतिमा ही वेगवेगळ्या रूपाने बघत असते. कधी आई, मुलगी, बहिण, सासू, नणंद, या अशा वेगवेगळ्या रूपाने लोकसाहित्यामध्ये आपण स्त्रीची प्रतिमा पाहते. आपण नेहमी म्हणतो की स्त्री च्या मनामध्ये कुठलीही गोष्ट लपवून राहत नाही. तीला नेहमी शेअरिंग करायला आवडते. आपली सुख दु:खे इतरांना सांगावेसे वाटते. ती आपली सुख दु:खे कधी सण उत्सवाच्या लोकगीता मधून व्यक्त करत असते. तर यामध्ये आपल्याला स्त्रीचे एक नवे रूप पाहायला मिळते.

माहेरवाशीण स्त्री

आई - बाबा

काट्याचा गुलाब फुलला | भाऊ रे तु कित्या भागलास

आईची आठवण येते मला | जीव माझा ग टकमकला

या प्रमाणे बाबाची , ताईची, वगैरे घालून गीत पूर्ण करावे.

या गीतामधून स्त्रीने आपल्या माहेरची आठवण येते म्हणून भावना व्यक्त केलेली दिसून येते. पुढे आपण जाणून घेवूया स्त्रीने आपल्या सासर बदल कोणत्या भावना व्यक्त केल्या आहेत.

सकारात्मकता

उदा. सासू, सासरा, नणंद, दीर या सगळ्या बद्दल सकारात्मक भावना कशी गीतामधून व्यक्त केलेली आहे.

शेत माझे डोंगरी गं तेच माझे माहेर

आई म्हाजी चिंता करी धुव म्हाजी एकटी

नाही आई एकटी मी सासू आहे सांगती

या प्रमाणे बाबा- मांव , भाऊ- दीर , बहिण - नणंद वगैरे घालून गीत पूर्ण करावे.

या गीतामधून स्त्रीने आपल्या भावना व्यक्त केलेल्या दिसून येतात.

जसे सकारात्मक भावना व्यक्त केल्या आहेत त्याच प्रमाणे नकारात्मक भावना व्यक्त केलेल्या दिसून येतात.

नकारात्मकता

सासू कशी गे सासू कशी

चुलीतली घूस कशी

आपल्या सासू बद्दल तिने नकारात्मक दृष्टीने मांडणी केलेली दिसून येते.

बाजाराचो मसालो मांव माझो म्हातारो

सोप्यार बसतालो ग माव माझो सोप्यार बसतालो

अशा प्रकारे स्त्रीने सासू- सासरा असेल त्यांच्या बद्दल नकारात्मक दृष्टीने त्यांनी आपल्या भावना मांडलेल्या आहे.

स्त्री ही आपली दु:खे कधी कुणाला सांगत नाही. गावामध्ये काही ना काही सण उत्सव साजरे केले जातात तर त्या उत्सवामध्ये आपल्या मनातील सगळ्या भावना त्या गीतामधून व्यक्त झालेल्या दिसून येतात. या लोकगीतामध्ये आपल्याला स्त्रीयांची गीते दिसून येतात. तर ती पुढील प्रमाणे पाहू.

श्रीमगीते

श्रम म्हणजे आपण कष्ट करणे म्हणतो. पूर्वीच्या काळा पासून स्त्रीयांना नेहमी कष्ट करावे लागत असे. नाहीतर कुठली श्रमाची कार्ये त्यांना करावी लागत असे. ह्या श्रमापासून आपले मन किंवा ताण तणाव असेल तो मुक्त करण्यासाठी श्रमगीते गायली जातात. हे त्यांचे श्रम हलके करण्यासाठी स्त्रीगीतांची निर्मिती झालेली दिसून येते. श्रमगीते म्हणत असताना आपल्याला जात्यावरील ओव्या या किंवा जात्यावरील गाणी दिसून येतात. या श्रीमगीतां मधून आपल्याला स्त्रीच्या भावना चित्रित झालेल्या दिसून येतात.

विधिगीते

विधिगीते लोकजीवनात अत्यंत महत्त्वाची गीते दिसून येतात. गावामध्ये वेळोवेळी विधी पार पाडल्या जातात त्यावर नेहमी गीते गायली जातात. यामध्ये लग्न, बारसे या सारख्या विधी मध्ये गीते गायली जातात.

नृत्य - खेळ गीते

अविवाहित मुली अनेक प्रकारेचे खेळ खेळत असतात. लग्न झाल्यानंतरही माहेरी आल्यावर ही गीते गायली जातात. यामध्ये फुगडी ही महत्त्वाची दिसून येते. या मध्ये मन धुंद होवून फुगडी गायली जाते किंवा नाचली जाते.

सण - उत्सवाची गीते

एखाद्या सण उत्सव असेल त्यामध्ये गीते नेहमी गायली जातात किंवा सादर केली जातात.

या वरील सर्व अशा वेगवेगळ्या स्त्रीयांच्या गीतांची निर्मिती ही वेगवेगळ्या पध्दतीने होते. कुणी नाचून तर कुणी गावून आपल्या भावना उत्कट करत असतात. अशा प्रकारे स्त्रीयांचा सहभाग आपल्याला लोकसाहित्यामध्ये दिसून येतो.

लोकसाहित्यामध्ये बालगीते महत्वाची दिसून येते. या गीतातून स्त्री आपल्या मुलावर किती प्रेम करते. या बालगीतातून स्त्रीची वेगळी प्रतिमा पाहायला मिळते.

उदा.

सानूल्यारे माझ्या बाळा मीट पापण्या डोळयांच्या
चंद्र लागे परतीला सावळयाही झोपलेल्या
अंबराईच्या वनात चंद्र लागे परतीला

अशा प्रकारे या गीतामधून स्त्रीने आपल्या बाळाला झोपण्यासाठी गायलेले गीत दिसून येतात. प्रत्येक आईला आपल्या मुलांची ओढ नेहमी असलेली दिसून येते. तर ती आपल्या मुलांसाठी गीत गावून त्यांना एक वेगळ्या पद्धतीने आनंदित ठेवण्याचा प्रयत्न करत असते. अशा प्रकारे आपल्याला स्त्रीचे एक मातृत्व रूप लोकसाहित्याच्या बालगीतामधून पाहायला मिळते.

वरील सर्व माहिती गावातील स्त्रीयांना भेटून मिळविली आहे.

निष्कर्ष:

1. लोकसाहित्यामधून स्त्रीजीवनाचे सामाजिक रूपे पाहायला मिळते.
2. स्त्री जीवनांचे विविध पैलू दिसून येते.
3. लोकसाहित्यामधून स्त्रीच्या मनाचे एक वेगळे रूप दिसून येते.
4. स्त्रीच्या भावनांचे चित्रण लोकसाहित्यामध्ये कशा प्रकारे व्यक्त होते हे आपल्याला पाहायला मिळते.

मराठी कवितेतील स्त्री आत्मवेदना

प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे

मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, आदीवासी, स्त्रीवादी साहित्य प्रवाहाची निर्मिती झाली. हे प्रवाह उत्तरोउत्तर अधिकच विकसित झाले. प्रत्येक प्रवाहातील साहित्याच्याप्रकारात जिवंत कसदार असे लेखनझालेआहे. साहित्यातून सामाजिक सांस्कृतिक धार्मिक राजकीय अशा विविध अंगाने साहित्य लेखन झाले. कवितेसारखा भावनात्मकता प्रगट करणारा लेखन प्रकार ही मोठ्या प्रचंड प्रमाणात निर्माण झालाआहे.

स्त्रीवादी साहित्यात स्त्रीचे भावविश्व साहित्यातून प्रतिबिंबित झाले. आहे. कुटूंब, समाज, संस्कृतीच्या माध्यमातूनस्त्रीचे शोषण झाल्याची खंत स्त्रीवादी साहित्यातून व्यक्त झाली आहे. स्त्रीयांनी आपल्या साहित्यातून मनातील विचाराला दुःखाला अन्याय –अत्याचाराला त्याच बरोबर आपल्यातील क्षमतांना मोकळी वाट करून दिलेली दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्याप्रमाणे म्हणतात, ठोठवा म्हणजे उघडेल, मागा म्हणजे मिळेल त्याचप्रमाणे, स्त्रियांनी आपल्या जीवनपटातील खाचखळगे, स्वानुभव साहित्यातून उलगडलेले आहेत, त्यात जास्तीत जास्त वेदनानुभवच असल्याचे सिद्ध होते.कविता या साहित्य प्रकाराचा त्यांनी वापर केलाकवितेचा जन्म कसा होतो, हे सांगताना वैशालीपाटील म्हणते

"होतो मनाचा आक्रोश, बाई तरी मी सोसते
माझ्या बोटांच्या पेराला, फूल कवितेचे येते..."१

जीवनातील दुःख सोसताना मनात निर्माण झालेल्या अशांती मुळे उत्स्फूर्तपणे कवितेचा जन्म होतो. ते शब्द लिहिण्यासाठी बोटाचीमदतहोते.कविता हा स्त्रीमनाचा विसावा असल्याने त्यांनी आपल्या मनातील दुःख, वेदना यांना कवितेतून वाट करून दिलेलीअसल्याचे स्पष्ट होते. पूर्वीच्या काळी निरक्षर स्त्रियांनी ओवीगीताचा वापरही केलेला आहे.जसे

"लेकीचा जन्म, नको घालू देवादत्ता।
संसारी येऊन, परायाचीसत्ता।।"
लेकीचा जन्म कुण्या घातला वेड्यानं।
पराया घरी बैल राबतो भाड्यानं।।"२

जणू घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे त्यांना कष्ट सोसावे लागतात. आपल्या जन्मावर पुरूषांचीच मालकी असते हे मनातील दुःख यातून स्पष्ट होते.

अश्विनी धोंगडे बाईचा जन्म मिळाल्याबद्दल दुःख व्यक्त करताना लिहितात,

"बरे झाले देवा । केलासी उपकार ।
घातलेस जन्मा । बाईच्या ह्या ।
न कळे कोणा । अर्थ बोलण्याचा ।
भाषेनेही मुके । केले आम्हा ।।"३

स्त्रीनीआपलीबाजू कितीही तळमळीने मांडली, आपल्या दुःखाचा पट कुणापुढेही उलगडला तरी त्याच्यातील तथ्य, वेदना, वास्तव, आर्त किंकाळ्या कोणालाही उलगडत नाहीत. तसेच ह्या वेदना मुखातून व्यक्त करण्यास आणि त्या लिपीकबद्ध करण्यासही मुभा नाही. मग मनातच त्यांना साठवायचे व कुढत बसायचे. येथे भाषाही कमी पडते. कारण सगळेच स्वानुभव भाषेतून मांडता येत नाहीत.

तसेच अनुराधा पाटील लिहितात,

"ती वयात येत ,तेव्हाच संपून जाते

उंच उचं झोके, अन् सागर गोटे
मागील दारी , अन् पुढ्यात
भरजरी साडी , पुढील आयुष्याला लक्तरांचे
आमंत्रण म्हणून...."४

स्त्री जेव्हा वयातयेते. तेव्हाच तिच्या आयुष्यात दुःखाचा प्रवेश होतो. तिचे स्वातंत्र्य संपून पारतंत्र्यातील जीवनाला सुरूवात होते. तिचे स्थान मागील दारात आणि भरजरी साडीच्या ओझ्यात ती गुरफटली जाते. म्हणजेच पुढील आयुष्य हे लक्तरांसारखे आहे याचीच ही जणू सुरूवातच असते.

स्त्रीला गृहीत धरण्याची पुरूषीप्रवृत्ती युगानुयुगाची आहे. यामध्ये ती माणूस आहे, तिलाही भावना, मन आहे. ह्याचा विचार केला जात नाही. म्हणूनच ती म्हणते,

"चाळीशी उलटली तरी,त्यांच्या लक्षात आले नाहीत
स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचे कंगोरे ,आपण बोलालले यांच्या रक्तात मिसळायला
काही वर्षे जावी लागतील,आणि कृतीत कधी उतरेल
ते तर सांगताच येणार नाही आता तरी "५

स्त्री म्हणजे एक यंत्रच आहे. स्त्रीच्या मनाचा, भावनांचा, क्षमतांचा, गुणांचा विचार करण्याची जणू गरजचनाही, ती ही एक सजीव घटक आहे, तिलाही थोडी मोकळीक हवी, तिलाही भावनीक, मानसिक आधार लागतो. या गोष्टीचा सर्वांना विसर पडलेला दिसून येतो. लग्न, संसार, मुळेबाळे, रांधा, वाढा-उष्टीकाढा, रात्रीची गरज एवढ्यापुरतीच स्त्रीचीगरज म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. अनेक वर्षे संसार केला जातो. मात्र, स्त्रीला ओळखले गेलेले नाही. लग्नात जे-जे मंत्र-तंत्र म्हटले, एकमेकांच्या बरोबरीने संसार करण्याचे निश्चय केले. स्त्रीच या गोष्टींना बांधील ठरली. पुरूषांनी मात्र यातून केव्हाच फारकत घेतली. आणखी किती काळ स्त्रीला या गोष्टी सोसाव्या लागणार. हे स्त्री जीवन कवितेतून व्यक्त होताना दिसते.

जीवनात जाणवणारी उणीव येथे रजनी परुळेकर व्यक्त करतात. कुटुंब म्हणजेच संस्कृतीच एक | अभिन्न अंग मात्र या कुटुंबाच्या चुकीच्याच कल्पना फक्त समाजाने अंगीकारल्या व निखळ सत्त्व, त्यातील आदर्शवादी विचारधारा मागे पडली. याचा परिणाम स्त्री जीवनावर झाला तेच मांडताना कवयित्री रजनी परुळेकर लिहितात,

"मी समाजाच्या दृष्टीने लग्नाची बायको
प्रतिष्ठित, पण खरं तर एका वेश्याच
मात्र एकाच पुरुषाची"६

स्त्री जीवनात कुटुंब, लग्न, संसार या खरोखरच उदात्त संकल्पना आहेत. मात्र तीचे अवमूल्यन झालेले आहे. स्त्रीला लग्नाच्या संस्कारातून जणू बांधून टाकलं जातं आणि सुरू होते ते एका वेश्याचच जीवन. जिथं रोजच या शरीरावर जणू बलात्कारच होतो. मन मारून स्त्रीने रहावे, दाद मागणार कोणाला? जणू जीवनभराचाच हा वेश्याव्यवसायाचा सौदा केल्याप्रमाणे जीवन वाट्याला येते. बाहेर वेश्या स्त्रियांच्या नशिबात नवनवीन पुरूष मात्र ह्या घरातील वेश्येच्या नशिबात तोच पुरूष फरक फक्त थोडा आहे. जीवन, यातना, भावना मात्र त्याच आहेत. ज्या कधीच मेलेल्या आहेत. पुन्हा कधीही जीवंत न होण्यासाठीच. अशी खंत, व्यथा, वेदना ही स्त्री व्यक् करते.

संत कान्होपात्रा एका गणिकेची मुलगी म्हणून समाजाने तिला नाकारले. तिच्या आईने राजघराण्यातल्या पुरूषाशी संधान जुळविण्याची तयारी केली तेव्हा ती नकार देते. बादशहाचे शिपाई तिला जबरीने नेण्यासाठी येतात ती टाहो फोडते,

"नको देवराया अंत आता पाहू ।
प्राण हा सर्वथा, फुटो पाहे ।।७

अशा घातक प्रथेला बळी पडलेल्या स्त्रीचा हा टाहो व्यक्त होतो. देवाला शरण जाते. माझा अंत पाहू नको, मला यातून सोडव असे ती आर्ततेने करुणा भाकू लागते. माझ्या शरीरातून प्राण निघून चाललेला आहे. अशा शब्दात ती विठ्ठालाचा धावा करते. संत कान्होपात्राच्या दुःखाला तर सीमाच नाही असे दिसून येते.

संत बहिणाबाई ही आपल्या मनातील स्त्रीदेह, स्त्रीजन्म याबाबत उदासिनता दर्शवितात. त्याबद्दल त्यांच्या मनात दुःख असल्याचे जाणवते. त्या लिहितात,

"स्त्रियेचे शरीर पराधीन देह । नचलावे उपाय विरक्तीचा ।।
पडिले अंतर विवकाचे बळ । काय निर्मियले राघोबाने ।।"८

स्त्रीचा कुमार वयात वडील, तारूण्यात पती आणि वृद्धावस्थेत मुलगा अशा पद्धतीने सांभाळ केला जातो. तिचे संरक्षण केले जाते जणू ती म्हणजे अकार्यक्षम, अबला, स्वतःचे संरक्षण न करू शकणारी आहे. अशी समाजाची धारणा झालेली दिसून येते. असे असले तरी खरोखरच स्त्रीला आपण पारतंत्र्यात असल्याचे जाणवते.

आपल्या देहावर पूर्णपणे दुसऱ्याचाअधिकार आहे. त्यातून विरक्त हस्त्रीकडे पाहताना लिंगाधिष्ठीत तेच्या दृष्टीकोनातून पाहिले जाते. त्यामुळे स्त्रीचे मन दुःखी, होते.

स्त्रीला देवाची भक्ती करण्याचा अधिकारही डावलला गेला होता. कारण तिला अपवित्र चंचला, कपटी, पापाचे आगार, पुरूषाला मोहिनी घालणारी अशाखुळचट, ज्याला कसलाही आधार नाही अशा दुर्गणांशी बांधले गेलेले होते. हीच खंत वेणाबाई व्यक्त करतात ती अशी

"कोणी निंदिती, कोणी वंदिती
वास मी त्यांची पाही ना ।।९

वेणाबाईनाही अशा निंदेला सामोरे जावे लागले. त्याच्यावर स्त्री म्हणून परमेश्वराची सेवा, नामस्मरण करण्यावर बंधने आली होती.

स्त्रीचे स्त्री म्हणून जे अनुभव असतात. त्याचा अनुभव, कल्पना पुरुषाला मुळीच येत नाही. त्यामुळे त्यातील अनुभव हे तिचे स्व चे अनुभव असतात. अशा अनुभवातील वेदना नीरजा काव्यातून व्यक्त करतात.

"रजस्व:ला, संभोग, बाळंतपण, शरीराभोवती फिरलेलं
आयुष्यासकट माणसाचं चक्र, मुक्या वेदनाचं वेटोळं.."१०

स्त्री रजस्वला असताना तिला येणारे अनुभव हे बऱ्याच वेळा दुःखद असतात. पूर्वीपासन तो कालावधी हा अपवित्र म्हटला जातो. त्याचप्रम संभोगाचे अनुभव त्यातील दाहकता बऱ्याच वेळा बळजवरीने होणारा बलात्कार यातूनही तिच्या शरीरवमनाला वेदनाच सहन कराव्या लागतात. बाळंतपण स्त्रीच्या जन्म मरणाचीच वेळ म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

अनुराधा पाटील यांच्या कवितेतून स्त्रीवेदन उलगडते. त्या लिहितात,

"रहा उभी तू तुझ्याच चितेवर
आयुष्याचे पुरवीत इंधन..'११

ही स्त्री खरोखरच दिवसागणीक आपल्याच चितेवर जळत असते. याचे तिळमात्रही दुःख समाजालामुळीच होत नाही. प्राचीन कालापासूनकितीतरीस्त्रियासतीगेल्या. त्यांचा शारीरिक-मानसिकछळझाला. ही स्त्री दुःखाची चिता आजही विझायला तयार नाही. प्रत्येक स्त्री त्या चितेचा बळी ठरत आहे.

कवयित्रीललिता गादगे लिहीतात,

"बाई म्हंजी कणकीचा गोळा
मदी ठिवावा उंदीर टोकन त्यात
भाईर ठिवावा तर कावळं"१२

स्त्रीच्या शोषणासाठी घरात आणि बाहेरही कावळे, गिधाडे टपून असतात. एवढे जपून तिला वागावे लागते. हीस्त्रीवेदनाआहे.

निष्कर्ष:-

स्त्रियांनी कवितातून स्त्री जन्मच नको. अशी आत्मवेदना प्रकट केली आहे. जीवनातील दुःखाचे सर्वात मूळ कारण असेल तरस्त्री जन्म आहे. पुरुषसत्ताक कुटूंब पद्धतीमध्ये स्त्रीला स्वातंत्र्याने जीवन जगण्याचा अधिकारच ठेवला नाही. स्त्री म्हणून जन्म झाला तेव्हा पासून समाजाचा पाहण्याचा दुष्ट्रीकोणवाईट आहे. कुटूंब,समाज व्यवस्थेने तिला हीन दर्जा दिला आहे.

धर्मव्यवस्थेने तिला मानसिक गुलाम बनविले आहे. तिच्यावर अन्यायकारक बंधनेलादली. तिची कोणतीही चूक नसताना तिला दंड दिला जातो.अतिशूद्रापेक्षाही तिची अवस्था दयनीय करण्यात आलीआहे.स्त्रीलावडिलांच्या पतीच्या मुलांच्याअधिकाराखालीजीवनजगावेलागते.

तिलारूढी, प्रथा आणिपरंपरेच्या दुष्टचक्रात अडकविण्यात आले. तिच्यारजस्व, संभोग, बाळंतपण या नैसर्गिक अडचणीच्याकाळातहीवेदनादिल्याजातात.स्त्रित्वाचदु:ख तिच्या आत्मवेदनेतून व्यक्त झालेले दिसते.

पुरूषीवृती, कुटूंब पध्दती, समाजव्यवस्था,धर्म संस्था, संस्कृती या सर्वांनी लादलेली बंधने स्त्री जीवनातून वजा केली. आणि पुरुषासम स्त्रीला अधिकार दिला गेला तर तिच्या आत्मवेदना कमी होतील.

संदर्भ : -

१) वैशालीपाटील: सुखाचेपापुद्रे ,अभिनंदन प्रकाशन, मंगळवार पेठ, कोल्हापूर प्रथमावृत्ती २४ डिसेंबर २०२०पृ.१६

२) संकलितओवीगित.

३) जाधव रा.ग., आधुनिक मराठी कवयित्रींची कविता प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८६, पृ.८७

४) सरकटे सदाशिव, १९८० नंतरची स्त्रीवादी कविता,पृ.२१७

५) नीरजा (संपा), निद्राहीन रात्रीच्या कठोर कातळावर निवडक रजनी परुळेकर, लोकवाङ्मयगृह, मुंबई, पहिली आवृत्ती, २०११, (प्रस्तावनापृ. ३१)

६) तत्रैव, उ.नि.पू. (प्रस्तावना पृ.३१)

७) भवाळकर तारा, स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर, लोकवाङ्मयगृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, २०१२, पृ.६९

८) तत्रैव, उ.नि. पृ.७१

९) तत्रैव, उ.नि. पृ.११२

१०) जाधव रा.ग., आधुनिक मराठी कवयित्रींची कविता प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८६, पृ.५०

११) तत्रैव, उ.नि. पृ.८४

१२) पाडगावकर कांचन, मराठवाड्यातील कवयित्रींची कविता, रुपवेध प्रकाशन, परभणी, प्रथमावृत्ती, २००७, पृ.८६

मराठी आदिवासी कादंबरीतील स्त्री जाणीव

प्रा. नवनाथ निवृत्ती बेंडे

मराठी विभाग, श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय लोहा जि नांदेड

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय समाजमनांत राजकीय,सामाजिक, शैक्षणिक आकांक्षा विस्तारल्या. स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या लोकशाही मूल्यांचा प्रचार व प्रसार झाला. निरनिराळया प्रदेशातील लोक गाव, गावकुसा बाहेरील, भटके-विमुक्त आणि आदिवासी यांच्यापर्यंत शिक्षणाचा प्रसार झाला. शिक्षणाच्या प्रसारामुळे हे सर्व जाती समूहातील लोक जागे झाले. दलित, शेतकरी, शेतमजूर, स्त्रिया व जंगलात कड्याकपारीत राहणारा आदिवासीसमुह शिक्षण घेऊ लागला. शिक्षणाचे लोकशाहीकरण सुरू झाले. पण समाजात फार मोठ्या प्रमाणात सामाजिक विषमता होती. लोकशाही मूल्यांमुळे राष्ट्र,समाज आणि व्यक्ती यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत असला तरी विषम समाज व्यवस्थेमुळे समाज मनात वेदना आणि विद्रोहाचे वातावरण तयार झाले. हा विद्रोह व्यक्त करण्यासाठी अनेक चळवळी उभ्या राहिल्या व पुढे याच चळवळीमधून वाङमयीन प्रवाह सुरू झाले.या प्रवाहातील महत्वाचा प्रवाह म्हणून आदिवासी साहित्य प्रवाहाचा उल्लेख करता येईल

1960 नंतरच्या कालखंडात दलित प्रवाहावापासून प्रेरणा घेऊन प्रवाहित झालेला प्रवाह म्हणून आदिवासी साहित्य प्रवाहाचा उल्लेख करता येईल.जंगलात व निसर्गाच्या सानिध्यात रमणारा निसर्गालाच जीवन वर्चस्व माननारा समुदाय म्हणून ओळखला जाऊ लागल. शिक्षणाचा प्रचार व प्रसार यामुळे तो उच्चविद्याविभूषित झाला.निसर्गालाच प्रेरणा मानून तो वाङमाचे सर्जन करू लागला. आपले दुःख, वेदना, प्रस्थापितांना कडून होणारे शोषण, जंगल अधिकारी, शेठ सावकार,शासकीय कायदे यामुळे तो दडपला गेला. शेकडो वर्षापासून होत असलेला छळ, अक्रोश, संताप, पिळवणूक तो साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करू लागला.कथा कादंबरी साहित्यातून चित्रित करू लागला. हजारो वर्ष मुक, अबोल असलेला आदिमानव हा प्रथमच साहित्याच्या माध्यमातून बोलता झाला. आपलं वास्तव जीवन कथा, कादंबरी, कविता या प्रमुख वाङमय प्रकारातून मांडू लागला.

इ.स. 1875 पासून सुरू झालेला कादंबरी वाङमय प्रकाराचा प्रवासअनेक रंगरूपानी बहरत गेला. इ.स. 1875 ते 1947 पर्यंत अनेक लेखकांनी कादंबरीलेखन केले. पण कुठल्याही कादंबरीकाराने आदिवासी जीवनाला उजागर केले नाही. तिच्या जन्म काळापासून ते दुसऱ्या महायुद्धापर्यंत सुमारे शंभर वर्षाच्या कालखंडात या वाङमय प्रकाराने आदिवासी जीवनाची गांभीर्याने नोंद घेतल्याचे वाङमय इतिहासात दिसत नाही. सुरुवातीच्या कालखंडात कोणत्याही कादंबरीकाराने आपल्या कादंबरीचा विषय म्हणून आदिवासी जीवनाची निवड केली नाही. इ.स.1885 ते दुसरे महायुद्ध या कालखंडात अनेक मान्यवर व सिद्धहस्त कादंबरीकार होऊन गेले. मात्र आदिवासी त्यांच्या दृष्टीतून का व कसा हद्दपार झाला. हे सांगणे कठीण आहे.असे मत आदिवासी साहित्याचे अभ्यासक डॉ. विनायक तुमराम यांनी व्यक्त केले. पण इ.स.1947 नंतर मात्र काही कादंबरीकारांनी आदिवासी समाजाचे जीवन आपल्या कथा कादंबरी मधून चित्रित केले आहे .पण त्यातील चित्रण वास्तवतेच्या किती जवळ आहे .हा संशोधनाचा विषय आहे.

अदिवसी कादंबरीमध्ये धर्म, परंपरा, रुढी, रितीरीवाज, विवाह संस्था, जातपंचायत, सण-उत्सव त्यांच्या जीवनातील दारिद्र्य, भुक, विषमता, अन्याय, अत्याचार, त्यांचा व्यवसाय शैक्षणिक व कौटुंबिक जीवन, अंधश्रद्धा,त्यांचे शोषण, प्रस्थापितांचे वर्चस्व, जमीनदार, भांडवलदार यांचे शोषण या सर्वां बरोबरच आदिवासीच्या आदिम स्त्री जीवनाचे चित्रणही केले आहे. स्त्रियांचे शोषण, यांच्यावरील अन्याय अत्याचार, शेठ सावकारांच्या वाईट नजरा, त्यांच्यावरील बलत्कार त्यांच्या व्यथा, वेदना कादंबरीतून कादंबरीकाराने मांडल्या आहेत. मानवी जीवनाचा अभ्यास केल्यानंतर मानवजातीच्या

इतिहासा इतकाच स्त्रियांवरील अत्याचार सनातन आहे .या अन्याय अत्याचाराची जंगलात, गिरी कुंदरात राहणारी आदिवासी स्त्री देखील बळी पडली आहे. आदिवासी समूह जीवनाचे चित्रण करत असताना अनेक कादंबरीकारांनी स्त्री व्यक्तिरेखांच्या माध्यमातून आदिवासी स्त्रियांची करून कहाणी समाजासमोर मांडली आहे. यामध्ये भिल्ल, कातकरी, वारली, माडिया, कोरकू, ठाकर, या सारख्या आदिवासी जमातीतील स्त्री दुःखांचा उहापोह केला आहे. यात प्रामुख्याने आनंतराव पाटील, नजुबाई गावित, राजन खान, दुर्गाबाई भागवत, सुरेश द्वादशीवार, मधुकर वाकोडे व शंकर भिसे यासारख्या कादंबरीकारानी आदिवासी जमातीतील स्त्री दुःखाच्या वेदनेचा हुंकार समाजासमोर मांडला आहे.

अनंतराव पाटील यांनी 'झाडीचे दिवस' या कादंबरीतून खानदेशातील भिल्ल जमातीचे चित्रण केले आहे. या कादंबरीत खानदेशातील स्त्रीलंपट, भोगवादी दृष्टीने पाहणाऱ्या शोषक अन्यायी प्रवृत्तीचे चित्रण केले आहे. भिल्ल स्त्रियांचे सौंदर्य, तिचे प्रचंड आकर्षण खानदेशातील पाटील वर्गात आहे. देह सौंदर्याचा अनुभव घेणे, तरुणीशी लगट करणे, स्त्रियांची थट्टामस्करी करणे, स्त्री म्हणजे आपल्या शरीर सुखाचे साधन आहे असे मानणे, एकूणच भिल्ल तरुणीला रखेल म्हणून ठेवणे. हे पाटील वर्गात प्रतिष्ठेचे लक्षण आहे. खानदेशातील पाटील वर्ग हा स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक लैंगिक शोषणाचे प्रतीक म्हणूनच स्त्री रूपात कादंबरीकारांनी उभा केला आहे.

नजुबाई गावित ह्या आदिवासी मराठी साहित्यातील पहिल्या बंडखोर लेखिका म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी 1999 मध्ये 'तृष्णा' नावाची आत्मवृत्तपर कादंबरी चार भागात लिहिली नजुबाई गावित यांनी धुळे जिल्ह्यातील भिल्ल व मावची या आदिवासी जमातीचे चित्रण केले आहे. या कादंबरीत स्त्री शोषणाचा इतिहास आला आहे. पहिल्या पिढीचे नेतृत्व करणारी बिजू जंगल बिगारी कामावर जाणारी एक स्त्री आहे. आपल्या पतीबरोबर काम करत करत पुढे काही दिवसांनी आदिवासी पाड्यात मानमोडीची साथ आल्यानंतर मरण पावलेली बिजू आदिवासी पाड्यातील स्त्री शोषित म्हणून पुढे येते. कादंबरीमध्ये दुसऱ्या पिढीचे नेतृत्व करणारी आट्या व इसरीची जोडी ही अशीच आदिवासी शोषणाचे प्रतीक म्हणून दिसते. इसरी ही एक आपले दुःख व्यथा, वेदना यामध्ये जगणारी, कौटुंबिक जीवनाला वैतागलेली व्यक्तिरेखा आहे. दहा अपत्याचे संगोपन करणारी इसरी स्वाभिमानी व बाणेदार वृत्तीने जीवन जगण्याचा प्रयत्न करते. शेवटी परिस्थितीला शरण येऊन इसरी हतबल होते. कादंबरीची समजूतदार व स्नेहभाव जपणारी नायिका म्हणुन इसरी उभी केलीआहे. आपले गणगोत असो की परका प्रेमाचा वर्षाव सर्वांवर सारख्याच मायाळूपणाने करते. दुःख कष्ट गरिबी व वाईट दशा इसरी हे सारे दुःख सहन करून आनंदाने जगते. पतीच्या निधनानंतर थकल्यावर भूक व उपासमारीने इसरीचा करून अंत होतो.

इसरी सारख्याच व्यथा-वेदना तिसरे पिढीतील तिची मुलगी आशालाही सहन कराव्या लागतात. आट्याने शिक्षणाचे महत्त्व ओळखून आपल्या मुलीला चौथीपर्यंत शिक्षण दिले होते. शिक्षण हेच आपल्याला मुक्त करेल या जिद्दीने व ध्येयाने आशाही शिकली होती. आपल्या आईचे हाल-अपेष्टा दुःख दारिद्र्या खितपत पडलेले जीवन साक्षात आशाने अनुभवले होते. आशाच्या जीवनात फुल्याचा प्रवेश होतो. संशयखोर अडाणी व अकुशल फुल्याबद्दल तिच्या मनात तिटकारा असतो. पुढे आशाचा कौटुंबिक छळ होतो कौटुंबिक छळाबद्दल जंगलातील साप वाघ परवडतील असे तिला वाटते. नवरा व गावचा पाटील या स्त्री शोषकांची तिला भीती वाटते. परंतु या सर्वांना ती खंबीरपणे तोंड देते. विवाहाच्या अगोदर शिक्षण घेत असताना आशावर शाहू मास्तर बलात्काराचा प्रयत्न करतो तेव्हा प्रसंगाचा योग्य समाचार घेते. फुल्याचा जाच, संशयखोर सासूचा छळ,पाटलाची वाईट नजर या सर्वांना ती यशस्वी सामोरे जाते. शेवटी हतबल होऊन परिस्थितीला शरण जाणारी आदिवासी स्त्रीआशाच्या रूपाने नुजुबाई गावित यांनी साकार केली आहे. याशिवाय जंगल अधिकारी गावचे पाटील यांच्याकडूनही स्त्रियांचे लैंगिक शोषण होते मातृसत्ताक असूनही मावची व भिल्ल स्त्रियांवर पुरुषांकडून अन्याय होतो. एकंदरीत आदिवासी स्त्री दुर्बल नवरयापेक्षा अतिशय सक्षमपणे संकटाना सामोरे जातात .

भिल्ल स्त्रियांच्या शोषित जीवना प्रमाणेच आदिवासीतील कातकरी जमातींच्या स्त्रियांची ही परिस्थिती याच प्रमाणे आहे. शंकर भिसे यांनी 'जंगलातील छाया'या कादंबरीतून कातकरी स्त्रियांचं केले जाणारे लैंगिक शोषण, सावकाराची स्त्रियांवरील जोर जबरदस्ती, जंगल अधिकाऱ्याकडून होणारी पिळवणूकीचे चित्रण केले आहे. रतन या नायिकेवर गावातील सुभान सेठ जेव्हा अतिप्रसंग करण्याचार प्रयत्न करतो तेव्हा त्वेषाने त्याच्यावर चालून जाते 'खबरदार मेल्या अंगाला हात लावशील तर तुझं नरड फोडीन मेल्या पांढरपेशी बायकांनाच अब्रुची चाड असते आणि आम्हा जंगली बायकांना नाही काय' असा विद्रोह करून स्त्रीलंपट, कामपिसाट सुभानशेठ चा खून करते.

भिल्ल कोरकू या आदिवासी समाजाबरोबरच राजन खान यांनी ठाकर समाजातील स्त्री शोषण आधोरेखित केले आहे. 'ह्यात आणि मजार' या कादंबरीत वेध घेतला आहे. ठाकर समाजातील बोली ही इमानदार पैशाच्या लोभापायी नैतिक संबंध ठेवावे म्हणून बोली भागी वर दबाव आणते पण भागी मात्र अनैतिक संबंधाना झिडकारते.जंगलात त्यांच्यावर वाईट नजर ठेवणारे जंगल अधिकारी अब्रू लुटण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी भागी चिडून कोयत्याने त्याची मान तोडते.आपल्या अब्रु साठी धाडस करणारे प्रसंगी खून करून आपली अब्रू वाचविणाऱ्या नायिका आली आहे एकूणच कादंबरीत स्त्रियांचे लैंगिक शोषण करणारे, स्त्रियांकडे एक उपभोग्य वस्तू म्हणून आपल्या शरीर सुखाचे साधन म्हणून पाहणारे,स्त्रीशोषक वर्ग आला आहे.

दुर्गाबाई भागवत यांनीही 'महानदीच्या तीरावर 'या कादंबरीतून माडिया गोंड या आदिवासी जमातीचे चित्रण केले आहे. या कादंबरीत जंगो व फुलिया या आदिवासी पती-पत्नीची करून कहाणी आली आहे. फुलिया म्हणजे जखीण, चेटकिन, भूत पिशाच आहे असे सर्व आदिवासी लोकांना वाटते. पण आपण भुत नाही माणूस आहे हे सिद्ध करण्यासाठी फुलियाला शेवटी आपले प्राणही द्यावा लागतो अशी शोकात्म कादंबरी आहे. सुरेश द्वादशीवार यांनी महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड येथील माडिया गोंड या आदिम जमातीचे जीवन चित्रण हाकुमी या कादंबरीतून केले आहे. हाकुमी मधील लक्षणीय व बंडखोर व्यक्तिरेखा म्हणून पवरी ही स्त्री व्यक्तिरेखा आली आहे. गोंड जमातीत विवाहानंतर अंगभर वस्त्र परिधान न करने असा पोचमआईचा दंडक आहे. पण या प्रथेविरुद्ध जाउन पवरी अंगभर वस्त्र परिधान करते व आपल्या भूमिकेशी शेवटपर्यंत ठाम राहते. पवरी नंतर दुसरी प्रभावी व्यक्तिरेखा म्हणून रुपिचा उल्लेख करता येतो. डॉक्टर सोबत विवाह व्हावा म्हणून ती डॉक्टर कन्नाच्या धाकटया भावासोबत लग्न करते व डाँ.कन्नाच्या घरात प्रवेश करते. माडिया गोंड जमातीत तरुणींना आपला साथिदार निवडण्याचा अधिकार आहे .घोटूलमध्ये आदिवासी तरुण-तरुणी एकत्र येऊन न्रत्य करून जंगलात जाऊन शरीर संबंध प्रस्थापित करतात व भावी जीवनाचा साथीदार निवडतात. म्हणजे स्त्रियांना विवाहाचा मुक्त अधिकार आहे. एकूणच हाकुमी या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा या बंडखोर प्रवृत्तीच्याआपल्या जमातीतील वाईट प्रथा, परंपरा, या विरोधात आवाज उठवणार आहेत.

झेलझपाट 'या कादंबरीतून मधुकर वाकोडे यानी कोरकू आदिवासी जमातीचे चित्रण केले आहे. या कादंबरीत स्त्री नायिका म्हणून फुलयची व्यक्तिरेखा साकार झालीआहे. फुलय ही जंगलातील मोहफुलं तोडून आपला व आपल्या वडिलांचा उदरनिर्वाह करणारी एक आदिवासी स्त्री आहे. केरू व फुलय यांची प्रेम कहाणी कादंबरीमध्ये आली आहे. कोरकू स्त्रियांकडे वाकड्या नजरेने पाहणारा, स्त्री स्वातंत्र्याचा गैरफायदा घेणारा वल्लभदास खंडेलवाल, पंचायत सभापती ,बी.डी.अ. साहेब हे स्त्री शोषण करणारे शोषक म्हणून कादंबरीत आले आहे.

एकूणच आदिवासी जमातीतील स्त्रिया ह्या कष्टकरी असून कुटुंबाचाउदरनिर्वाह व्हावा म्हणून झटणारी, कणखर स्वाभिमानी बाण्याच्या आहेत 'तृष्णा' मधील इसरी असो की ह्यात आणि मजार मधील भागीअसो की जंगलातील छायामधील रतन असो की झेलझपाट मधील फुलय ह्या सर्व स्त्रिया आदिवासी लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या आहेत. प्रसंगी त्यांच्यावर अतिप्रसंग करणाऱ्या सेठ सावकाराचा, जंगल अधिकाऱ्यांचा खून करायलाही मागेपुढे न पाहणाऱ्या धाडसी पराक्रमी स्त्री व्यक्तिरेखा आहे.

संदर्भ ग्रंथ

1)आदिवासी साहित्य :स्वरूप आणि समीक्षा - डॉ. विनायक तुमराव

2)मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह - शरणकुमार लिंबाळे (संपा)

3)झडीचे दिवस - अनंतराव पाटील

4)तृष्णा - नजुबाई गावित

5)हयात आणि मजार - राजण खान

6) महानदीच्या तीरावर - दूर्गाबाई भागवत

7)झेलझपाट - मधुकर वाकोडे

मराठी दलित साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

श्रीमती चंद्रकला सटवाजी कोलगाने

बी.एड. प्रथम वर्ष, मु. पो. तुप्पा ता. जि. नांदेड-431604

'मी स्त्री - मुक्तीसाठी, स्त्री उन्नतीसाठी लढणारा एक योध्दा आहे. स्त्रियांची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी आवश्यक जो संघर्ष केला त्याचा मला सार्ध अभिमान आहे'. असे डॉ. बाबासाहेबांनी रमाबाई आंबेडकरांना लिहीलेल्या पत्रात म्हटले आहे. मराठी साहित्यामध्ये 1960 नंतर खज्या अर्थाने दलित साहित्याचा प्रारंभ झालेला दिसतो. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरणा घेऊन दलितांनी सर्वत्र मुक्तिलढा उभारला. अनेक क्षेत्रात स्वत:चा ठसा उमटवला. दलित साहित्य त्याचाच एक भाग होय. पहिल्या पिढीतील बाबुराव बागुल, शंकरराव खरात, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. यशवंत मनोहर अशा अनेक साहित्यिकांनी दलित साहित्य हिच संज्ञा स्वीकारून त्याची मांडणी केली आहे. दलित साहित्याकडे केवळ एक वाङ्मयीन चळवळ म्हणून पाहता येत नाही. तर ती एक जीवनदृष्टी आहे. एकाच जातीच्या लेखकांचे ते साहित्य नाही. त्याची प्रेरणा ही विश्वात्मक आहे. जातीपेक्षा इथे लेखकाची दलित जाणीव महत्त्वाची असते.

19 व्या शतकात खज्या अर्थाने स्त्री परिवर्तनाला सुरुवात झाली. या बाबतीत ब्रिटीशांचे आगमन महत्त्वाचे ठरले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, न्या. रानडे, पंडिता रमाबाई, आगरकर इत्यादींनी स्त्री-शिक्षणासाठी प्रयत्न केले. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेने प्रभावित होऊन जी दलित चळवळ उभी राहिली, तिने मराठी साहित्यात स्वत:चा असा वेगळा ठसा उमटविला आहे. दलित साहित्यामध्ये प्रथमत: 'कविता' हा वाङ्मय प्रकार मोठ्या प्रमाणात लिहिला गेला. पुढे कथा, कांदबरी, आत्मकथन यातूनही दलित लेखक-लेखिका स्वत:ला व्यक्त करू लागल्या. त्यामध्ये कविता आणि आत्मकथन यावर मोठ्या प्रमाणावर लेखन झालेले दिसते. दलित कवितेबरोबरच आत्मकथनेही स्वानुभावातून मांडली गेली. बहुतांशी दलित आत्मकथने ही वयाच्या 35 ते 40 च्या आसपास लिहिली गेली आहेत. दलित साहित्यामध्ये पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनीही मोठ्या प्रमाणात लेखन केलेले दिसते. त्यामध्ये शांताबाई काळे, जनाबाई गिज्हे, सिंधूताई सपकाळ, कुमुद पावडे, उर्मिला पवार, नंदा मेश्राम इत्यादींनी बिनधास्तपणे आपल्या व्यथा मांडल्या आहेत. दलित स्त्रिया आणि सवर्ण स्त्रिया यांच्या जीवनात फार मोठा फरक आहे. दलित स्त्रिया फक्त `घर, संसार व पतीचे जीवन रेखाटतात. असे अनेक वेळा म्हटले जाते. पण त्याला खोडून काढण्याचे काम या स्त्रियांनी केले आहे. खरेतर दलित स्त्रिया खुप कष्ट, दैन्य, दारिद्रय भोगतात. समाजाशी सतत त्यांचा संघर्ष चालू असतो. उदा. 'जीणं आमुचं' हे बेबी कांबळे यांचे आत्मकथन. या स्त्रिया स्वत:वर होणारे अत्याचार, अन्याय, व्यथा, वेदना, जगण्याची लढाई, भाकरीची लढाई रेखाटतात. त्याचप्रमाणे स्वत:चे जीवन, राजकीय, सामाजिक, शौक्षणिक जीवनही रेखाटतात.

दया पवारांचे 'बलुतं', लक्ष्मण मानेंचे 'उपरा', लक्ष्मण गायकवाडांचे 'उचल्या', प्र. ई. सोनकांबळेंचे 'आठवणींचे पक्षी' अशा अनेक आत्मकथनांनी आणि त्यातल्या भयान वास्तवाने मराठी साहित्यात खळबळ उडाली. दलित साहित्याने शोषित पीडित माणसाचे जीवनचित्रण पहिल्यांदा घडवले. आत्मकथन या वाङ्मय प्रकारात विपुल लेखन झाले. पण यामध्ये मात्र स्त्री उपेक्षितच राहिली. तिला स्वत:चे अस्तित्व दिसत नाही. फक्त एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहिले जाते. स्त्री ही कोणाची तरी माता आहे, बहीण आहे, बायको आहे. स्त्री ही पुरुषप्रधान संस्कृतीची बळी गेलेली आहे. दलित साहित्यात देखिल तिच्या वाटयाला हे दु:ख कमी-अधिक प्रमाणात आलेले आहे. स्त्रीकडे स्त्री म्हणून नाही, तर माणूस म्हणून पाहिले पाहिजे. दलित साहित्यामधील स्त्री रूढी, परंपरा यातच अडकलेली दिसते. अनेकदा तर पराभूत झालेलीच दाखवली जाते.

महात्मा फुले, ताराबाई शिंदे, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लेखनी हातात `öोऊन स्त्रियांना लिहिण्याचे बळ दिलं. त्यांच्या मूक वेदनांना त्यांनी वाट करून दिली. आंबेडकरांनी त्यांना 'मानवतावाद' शिकवला.

दलितांसाठी बाबासाहेबांनी संपूर्ण आयुष्य झिजवले. त्यांनी उभारलेल्या समाज परिवर्तनाच्या चळवळीत स्त्रियांनाही सहभागी करून घेतले. स्त्रीनेही पुरुषाच्या बरोबरीने सक्षम झाले पाहिजे. तिच्या अस्तित्वाची जाणीव बाबासाहेबांनी करून दिली. 1927 चा महाडचा सत्याग्रह, 1930 चा काळाराम मंदिर सत्याग्रह यांत सहभागी स्त्रियांनी तुरूंगवास भोगला आहे. तरी त्या डगमगल्या नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी त्यांना आत्मभान आले. त्यांनी तिच्यातील सामथ्र्य जागे केले. तिला आत्मसन्मान दिला. तिच्या लढाऊ बाण्याचे दर्शन घडवले.

दलित साहित्यिकांनीही स्वत:च्या लेखनात स्त्रिचित्रण केले आहे. पण ती स्त्री रूढी, परंपरा ग्रस्त, पराभूत मन:प्रवृत्तीची आणि दुय्यमस्थानी अशीच वार्णिली आहे. स्त्रीच्या मनाचा विचारच त्यांनी केलेला नाही. दलित आत्मकथनातील स्त्रियांचे शोषण इतर वर्गातील लोक तर करतातच पण, दलित लोकही स्त्रीचे शोषण करतात. दलित स्त्री प्रस्थापित स्त्रीच्या तुलनेत माणूसकीच्या हक्कांसाठी उभारलेल्या संघर्षात अग्रस्थानी आहे. लक्ष्मण मानेंच्या 'उपरामध्ये' स्त्रीला जनावरांप्रमाणे वागणूक दिली जाते. तिची विटंबना केली जाते. तिची खरेदी-विक्री केली जाते. पौसे घेऊन तिला गहाणही ठेवले जाते. स्त्रीचे सुंदर दिसणे सुध्दा तिला शापच आहे. त्याचा प्रत्यय उपरामधील पारुमामीच्या व्यक्तिरेखेवरून दिसून येतो. दया पवारांच्या 'बालुतं' मधील स्त्री सुध्दा दारिद्र्यात पिचलेली आहे. पण ती मध्यमवर्गीय स्त्रीपेक्षा धीट आहे. मध्यमवर्गाच्या संस्काराचे अणुकरणही करताना ती दिसते. त्याचबरोबर ह्या स्त्रिया हिंदू मूल्य जपण्याचा प्रयत्न करताना दिसतात. दगडूची आई व आजी विधवेचं जीवन वाट्याला येऊनही पुनर्विवाह करत नाही. जी जमनामावशी दया पवारांसाठी देहविक्रय करते. तिच्याकडे दया पवार मोठे झाल्यावर दुर्लक्ष करताना दिसतात.

एकंदरीत दलित आत्मकथानातील स्त्रीवर, तिच्या जीवनावर नजर टाकली तर असे दिसून येते की दलित स्त्री ही अठराविश्व दारिद्र्यात भरडली गेली आहे. तिचे शारीरिक आणि मानसिक शोषण होताना दिसते. तिच्या वाट्याला मारझोड, काबाडकष्टच आलेले दिसतात. पुरुष दारू पिऊन तिला मारहाण करतात. तिच्या कष्टावर जगतात. सर्वच स्तरांवर तिचे शोषण होताना दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जो समाज अभिप्रेत होता, जे परिवर्तन हवे होते ते येथे आत्मकथनात जाणवत नाही. स्त्रीयांचे शोषणच पाहावयास मिळते.

'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे', 'तराळ-अंतराळ', 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातील स्त्रियांच्या वाट्यालाही असेच दु:ख आलेले आहे. भारतीय राज्य`घटनेने स्त्रीला मूलभूत हक्क दिले. समतेचे तत्त्व दिले. पण ही 'समता' तिला अनुभवायला मिळत नाही. स्त्रिला माणूस म्हणून वागणूक मिळत नाही. तिला सतत संघर्षच करावा लागतो आहे. पण बाबुराव बागुल यांच्या साहित्यातील स्त्री मात्र विद्रोही भूमिका `öोताना दिसते. 'सूड' या दीर्घकथेतील नायिका जानकी स्वत:चे स्त्रीत्वच नाकारते. स्वत:चे बाईपण ती नाकारते. स्त्रीचे माणूसपण बागुल अधोरेखित करतात. ज्या पुरुषी व्यवस्थेने स्त्रिच्या देहाचा चोळामोळा केला. त्या पुरुषी व्यवस्थेलाच ती धडा शिकवताना दिसते. त्याचप्रमाणे स्त्री लेखिकांनीही आपल्या लेखणीद्वारे स्वत:चे जीवन चित्रण रेखाटले आहे. बेबी कांबळे काव्य पंक्तीच्या आधारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल आदर व्यक्त करतात.

"माझ्या जवळ आहेच काय वाहू भीमा तुला
तुझ्याच चरणी वहाती पुष्प फोडली वाचा दु:खाला
फूल वाहते एक एक सगळे स्फुलिं्लग दु:खाचे
डोळ्यातून पडते थेंब धुते पाय भीमा तुझे
आत्म्यातून भडकती आग त्याचीत पेटवली ही ज्योत
धडधडत्या ह्या ज्योतीतून बुध्द भीमच दिसतात."

'मरणकळा' मध्ये जनाबाई गिज्हे यांनी गोपाळ समाजाच्या वेदनेला वाट करून दिली आहे. एका भटक्या स्त्रीच्या मनातील हुंदके, दु:ख, आसवांची गाथा आहे. एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रयींचा

स्वीकार करणारी, विषमता नाकारणारी स्त्री अपेक्षित आहे. स्त्री मुळेच पृथ्वीतलावर मानवाचे अस्तित्व आहे. ती जगाची निर्माती आहे. माता आहे. ह्या विचारांची दलित साहित्यिकांनी जोपासना केली पाहिजे.

संदर्भ ग्रंथ :

1. डॉ. मनोहर जाधव, दलित स्त्रियांची आत्मकथने: स्वरूप आणि चिकित्सा, सुविधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2006.
2. डॉ. अविनाश सांगोलेकर, दलित साहित्य : प्रवाह आणि प्रकार, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2009.
3. डॉ. योगेंद्र मेश्राम, दलित साहित्य : उद्गम आणि विकास, श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, 1998.

वा .म .जोशी लिखित मराठी कादंबरीतील स्त्री प्रतिमा

प्रा. राजकुमार मोरे

दयानंद कला महाविद्यालय लातूर

स्त्रियांचे प्रश्न हे मानवी अधिकाराच्या दृष्टिकोनातून अत्यंत चिंतेचे आणि गंभीर प्रश्न आहे हे प्रश्न केवळ एखाद्या राष्ट्रा पुरते मर्यादित नाही तर ते संपूर्ण जगात अस्तित्वात आहे जागतिक स्तरावर स्त्रियांच्या हक्कांचा मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले आहेत पुरुष प्रधान संस्कृतीमुळे युगानुयुगे स्त्रिया वर आणले होत आलेले आहेत एकोणिसाव्या शतकापर्यंत हा अन्याय अत्याचार स्त्रिया निमूटपणे सहन करत होत्या स्त्रियांनाही मन आहे एक व्यक्ती म्हणून त्यांच्याही काही इच्छा आकांक्षा असतील त्यांनाही व्यक्ती स्वातंत्र्य विचार स्वातंत्र्य दिले पाहिजे ही गोष्ट पुरुषप्रधान संस्कृतीने सोयीस्करपणे लावलेली दिसते आणि स्त्रियांना या गोष्टीची जाणीव होऊ नये म्हणून तिला गृहलक्ष्मी देवता अशी उपाधी दिलेली दिसून येते एकीकडे स्त्रीचा माणूस म्हणून जगण्याचा अधिकार हिरावून घ्यायचा तर दुसरीकडे तिला देवकीची उपमा द्यायची हा विरोधाभास लक्षात घेण्यासारखा आहे यांना त्यांच्या हक्कांची जाणीव व्हावी त्यांच्यामध्ये हे परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न वामन जोशी यांनी आपल्या कादंबरी लेखनातून अभिव्यक्त केलेला दिसून येतो

वामन जोशी यांचे व्यक्तिमत्व अत्यंत आदर्श होते आणि या आदर्श तत्त्वांचे पडसाद त्यांच्या सर्वच वांग्यावर पडलेली दिसून येतील सामान्यपणे लेखक जे लेखन करतो त्या लेखनावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाची छाप उमटणे अपरिहार्य असते त्यामुळे साहित्याचा अभ्यास करताना लेखकाचे वैयक्तिक जीवन समजून घेणेही आवश्यक असते त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून सामाजिक प्रश्नांचा वेध घेतलेला दिसून येतो विवेक हा त्यांच्या कादंबरीचा प्राण आहे मुळातच त्यांचा स्वभावच विवेकवादी आहे त्यांनी आयुष्यात प्रत्येक गोष्टीकडे सामान्यपणे आणि समन्वय यानेच बघितले आहे त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून स्त्री प्रश्नांची चर्चा केली स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला पण स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना स्त्री आणि टोकाची भूमिका घेऊ नये हेच मत त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून मांडलेली दिसते त्यांनी स्त्री व पुरुष असा लिंग भेद केलेला नाही पण दोघांनीही सामाजिक जीवनात समन्वय साधला पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी आपल्या लेखणीद्वारे केले आहे ह्या सर्व गोष्टी समजून घेण्यासाठी वामन जोशी यांचे व्यक्तिमत्व स्त्री जीवन विषयक त्यांचे विचार त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेले विविध संस्कार या सर्व गोष्टी समजून घेणे आवश्यक आहे वामन जोशी यांच्या साहित्याविषयी वा.ल.कुलकर्णी असे म्हणतात ,"वामन मल्हार यांचे लेखन वाचल्यानंतर चित्तवृत्ती स्थिरावतात. मनाला प्रसन्नता येते अंतःकरणातील सत्य प्रवृत्तींना नवी पालवी फुटते .जीवनावरील विश्वास वृद्धिंगत होतो वृत्ती अंतर्मुख परंतु आशायुक्त बनते व जीवन विषयक ज्या प्रश्नांनी डोके भरून जाते ते श्रेष्ठ दर्जाचे असतात. "वा. ल. कुलकर्णी यांचे वरील विचार, वा.म. जोशी यांच्या सर्व व्यक्तिमत्त्वाचे सारच आहे.

वा.म.जोशी यांच्या कादंबरीतील सर्वच नायिका या सुसंस्कृत आणि पांढरपेशा घरातील आहेत.याला फक्त आश्रमहरिणी ही कादंबरी अपवाद आहे. रागिनी कादंबरीची नायिका रागिनी आणि सहनायिका उत्तरा या दोघीही शिक्षित घरातील मुली आहेत रागिनीची आई आणि उत्तराची आई दोघींनीही घरी इंग्रजी शिक्षण घेतलेले आहे उत्तरेच्या आई-वडिलांनी तर मुलाप्रमाणेच तिचा सांभाळ केला होता ती मुलगी आहे म्हणून कोणत्याही प्रकारचे बंधन तिच्यावर लादलेली दिसून येत नाही म्हणूनच तिच्या स्वभावात अत्यंत स्पष्टता आणि बाणेदार वृत्ती दिसून येते .सुशीलेचा देव मधील सुशीला चे वडील विनायक राव व रावबा चे वडील गिरीधर राव यांची मैत्री ही किती अतूट आहे त्यांचे येणाऱ्या पीडी वरती होणारे संस्कार हे किती मोलाची आहेत याचे वैशिष्ट्यपूर्ण वर सर्वच कादंबऱ्यांमध्ये आलेले दिसून येते. कादंबरी मधील सर्व पात्रे सुशिक्षित आणि सुसंस्कृत आहेत प्रत्येकाची स्वभाव वैशिष्ट्ये वेगवेगळी जरी असली तरी पुढील पिढीवर कोणकोणते संस्कार

होत गेले याचे वैशिष्ट्य पूर्ण वर्णन सर्वच कादंबऱ्यांमध्ये आलेले दिसून येते वामन मल्हार यांनी ज्या काळात कादंबरी लिखाण केले त्या काळातील कौटुंबिक व्यवस्थेपेक्षा त्यांच्या कादंबरीतील कौटुंबिक व्यवस्था आदर्श स्वरूपाची होती आणि विशेष म्हणजे या कुटुंबव्यवस्थेत स्त्रियांवर बंधने नाहीत. त्या मनमोकळेपणाने पुरुषांमध्ये उठबस करू शकतात. पुरुषांची चर्चा करू शकतात आणि स्पष्टपणे आपले मत मांडू शकतात थोडक्यात वामन मल्हार जोशी यांनी आपल्या कादंबरीत कथानकाची मांडणी करताना कुटुंब संस्थेचा आधार घेतला आहे .यात कुटुंब पद्धतीतील व्यक्ती -व्यक्ती तील संबंध, नातेसंबंध त्यातून निर्माण होणारी भावनिक गुंफण याचे विवेचन कादंबरीत येते .सुशिक्षित आणि सुसंस्कृत कुटुंबातील नव्याने शिक्षित होणारी स्त्री आपल्या आयुष्याकडे एका नव्या दृष्टिकोनातून पाहते याचे प्रत्ययकारी चित्रण वामन मल्हार यांनी आपल्या कादंबरी लेखनातून अभिव्यक्त केले आहे.

वा. म. जोशी यांनी १९१५ ते १९३५ या कालखंडात कादंबरी लेखन केलेले असून या कालखंडामध्ये स्त्री जीवन विषयक बराच महत्वपूर्ण सुधारणा महाराष्ट्रात घडून आलेल्या होत्या. समाजातील बऱ्याच लोकांचे विचार स्त्री शिक्षणासाठी अनुकूल होते रागिनी आणि उत्तरा दोघांचेही वडील सुधारक होते त्यामुळे त्यांनी आपल्या मुलींना शिकविले व त्यांचा बालविवाह केला नाही रागिनी कादंबरी ची निर्मिती केव्हा झाली त्या कालखंडात समाजात बराच वैचारिक संघर्ष चालू होता याचे पडसाद आणि सर्व जुन्या-नव्या आचार विचारांचे स्त्री जीवनावर झालेले परिणाम ही निदर्शनास आणून देण्याचे महत्वाचे कार्य लेखकाने कादंबरीतून केले आहे. स्वदेशप्रेमाने प्रेरित झालेली तरुण पिढी त्यातून स्त्रीजीवनाची होणारी अवहेलना या सामाजिक समस्या नलिनी या कादंबरीत अभिव्यक्त झालेल्या आहेत त्याच बरोबर अर्धवट शिक्षणामुळे स्त्रीच्या आयुष्यात होणाऱ्या समस्यांचा विचार कमळा या व्यक्तिरेखे द्वारे केलेला आहे समाजातील दिवानजी सारखे दृष्ट प्रवृत्तीचे लोक अननुभवी मुलीचा फायदा कशाप्रकारे उठवतात आणि त्यातून मुलीच्या आयुष्याची कशी ससेहोलपट होते याचे वर्णन कादंबरीतून करण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. जोशी यांनीही जी कादंबरीलेखन केले आहे त्या सर्व कादंबरीच्या नाही का या सुशिक्षित सुसंस्कृत व जीवनामध्ये तडजोड करणाऱ्या आहेत याचे प्रतिबिंब त्यांच्या कादंबरीतून अभिव्यक्त होताना दिसून येते.

रागिनी कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा

या कादंबरीची नायिका रागिनी अत्यंत कोमल मनाची आहे. एक पारंपरिक हिंदू स्त्रोत्र असावे असे सर्व संस्कार रागिनी वर झालेले होते बालपणापासूनच ती प्रेम रसाची मूर्ती भासते. आयुष्यामध्ये त्यांनी कधी कोणाशी उद्धटपणे बोललेले आढलून येत नाही. लग्न झाल्यानंतर थोड्याच दिवसात भैय्यासाहेब तिला सोडून जातात पण ती डगमगत नाही माहेरी न जाता सासऱ्यांची सेवा करण्यात धन्यता मानते मला पुनर्विवाह करावासा वाटत नाही असे ती म्हणते रागिनी म्हणजे हिंदू स्त्रीचे रूप वाटतं. शिक्षणाने तिच्यात थोडाफार बदल होतो एवढेच. उत्तरा मेडिकल कॉलेजची विद्यार्थीनी आहे. तिची बुद्धिमत्ता प्रखर असते त्याचबरोबर ती वादविवादात निपुण असते स्त्री यावर वर्षानुवर्षे अन्याय करणाऱ्या पुरुष प्रधान संस्कृती बद्दल तिच्या मनात संताप असतो स्त्री-पुरुष समानता असावी आणि स्त्रियांनाही पुरुषाप्रमाणे सर्व क्षेत्रे खुली असावीत ह्या मताचा ती पुरस्कार करते याविषयी कुसुमावती देशपांडे असे म्हणतात," महाराष्ट्रातील सामाजिक व कौटुंबिक जीवनाला एक नवीन वळण लागत होते त्याचीही स्पष्ट प्रतिबिंब रागिनी ते दिसून येते शिक्षणाने सुसंस्कृत व स्वतंत्र विचाराच्या झालेल्या दोन मुली व त्यांच्या भोवती गुंफले जाणारे दोन अंतरीची कौटुंबिक जीवन हा या कादंबरीतील मुख्य प्रवाह आहे त्यातच या दोघांची परस्पर संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत."रागिनी ही नायिका प्रधान कादंबरी आहे रागिनी आणि उत्तरा यांची मैत्री अतूट आहे या मैत्रीला एक नवीन परिमाण प्राप्त करून देण्याचे कार्य लेखकाने केले आहे .स्त्री प्रश्नाचा विचार एका नव्या दृष्टीने कादंबरीत केलेला आढळतो. रागिनीतील नायिका केवळ परस्पर संबंधाचा व स्त्री प्रश्नांचा विचार करीत नाही तर शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि सात्त्विक या सर्व प्रकारच्या चर्चेत पुरुषांच्या बरोबरीने सहभागी होतात. रागिनी सुशिक्षित पण

परंपरावादी स्त्री आहे स्त्री आणि पुरुष दोघांमधील समन्वय असावा असे मत मांडणारी एक प्रखर स्त्री लेखकाने कादंबरीतून रेखाटली आहे.

आश्रमहरिणी कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा

आश्रम हरिणी ही लघु कादंबरी आहे या कादंबरीची नायिका सुलोचना आहे होय कादंबरीमध्ये सुलोचना च्या भावना फारशा प्रगट झालेल्या नाहीत आश्रमात बागडणारी सुलोचना जीवनात पदार्पण करते आणि गुरूंच्या आज्ञेवरून धौम्य ऋषिशी विवाह करते त्याच्या मृत्यूनंतर तिचे मन गभस्टिंगतिकडे ओढले जाते एकाच स्त्री विषयी आकर्षण निर्माण झालेल्या दोन तपस्वी मनातील संघर्ष दाखविण्याच्या दृष्टीने ही व्यक्तिरेखा कादंबरीत अधिक परिणाम करून जाते असे लक्षात येते विधवा स्त्रियांनी आत्महत्या करण्यापेक्षा पुनर्विवाहाचा स्वीकार करून जीवन सुखाने जगावे हा विचारही लेखकाने या स्त्री व्यक्तिरेखेतून सूचित करताना व्यक्त केला आहे या कादंबरीतील उच्च सात्विक वातावरण आश्रमाचे रम्य वर्णन शुद्ध धर्मभावना आणि पावित्र्य ह्या सगळया गोष्टींमुळे संपूर्ण कादंबरी चे वातावरण फारच उच्च वाटते या कादंबरीविषयी वामन जोशी म्हणतात," या ग्रंथाच्या लेखनाच्या वेळी मला 'ब्रह्मानंदसहोदर 'म्हणून ज्याला म्हणतात त्या रसाचा जितका व जसा आस्वाद घेता आला तितका आस्वाद इतर ग्रंथाच्या वेळी साक्षेपतेने क्वचित प्रसंगीच घेता आला." या कादंबरीची नायिका सुलोचना पौराणिक कथेची नायिका सोज्वळ, सुसंस्कृत, विनयशील, आज्ञाधारक व वास्तव परिस्थितीचा स्वीकार करणारी रेखाटली आहे.

नलिनी कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा

नलिनी कादंबरीत प्रामुख्याने तीन स्त्री व्यक्तिरेखा पुढे येतात त्या म्हणजे नलिनी कमळा आणि आवडी त्यापैकी नलिनी आणि कमळा या शहरात राहणाऱ्या सुशिक्षित व्यक्तिरेखा आहेत तर आवडी ही खेड्यात वाढलेली आणि अशिक्षित आहे. नलिनी या कादंबरीची मुख्य नायिका आहे ती सुशिक्षित आहे परंतु आपले लग्न वसंतरावांची करायची की रंग रावा सी करायचे याचा निर्णय ती शेवटपर्यंत घेऊ शकत नाही स्त्री शिक्षण विषयक आणि सुशिक्षित स्त्री विषयक मत मांडताना नलिनी आढळून येते नलिनी विवाहाचे जे स्वप्न पाहते ते स्वप्न स्वप्नच राहतात तर कमळा कुमारी मातेचे दुःख अनुभवत जीवन जगत आहे व शेवटी आत्महत्या करून घेते आवडी ही विवाह करून संसार करते पतीच्या संरक्षणासाठी स्वतः bb4 केला असे खोटे सांगून जीवन संघर्षाला सामोरे जाणारी स्त्री व्यक्तिरेखा लेखकाने रेखाटली आहे नलिनी सुशिक्षित पण अपरिपक्व विचारांची, आवडी अशिक्षित पण गंभीर विचारांची, कमळा दिवाळीच्या कपट नाट्याला बळी पडल्यामुळे आयुष्याची शोकांतिका झालेली कुमारी मातेचे दुःख अनुभवणारी अशाप्रकारे या तिन्ही स्त्री व्यक्तिरेखांच्या भावविश्वाची गुंफण करीत लेखकाने कादंबरीचे कथानक अभिव्यक्त केले आहे.

सुशीलेचा देव कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा

सुशीलेचा देव ही कादंबरी नायिकाप्रधान कादंबरी म्हणून ओळखली जाते या कादंबरीची नायिका सुशीला ही आहे सुशीलेचा देव या कादंबरीत सुशील याचे बालपणापासून ते बळवंत रावांशी पुनर्विवाह होण्यापर्यंत चे वर्णन लेखकाने केलेली आहे यात आयुष्यातील प्रत्येक संकटामुळे सुशील ए मध्ये कसे कसे परिवर्तन होत गेले हे लेखकाने दाखविलेले आहे आई-वडिलांकडून लहानपणीच देव बाप्पा ची पूजा करावी हा संस्कार तिला लाभला दगडाला फुले वाहण्यात तिला देवासी हितगुज करण्यात समाधान मिळत असे परंतु दगडात देव नाही हे तिला बाळूच्या कूच एस टी वरून समजते लग्न झाल्यावर आपल्या पतीच्या विचाराने ती प्रभावित होते व पती हाच देव असे तिला वाटायला लागते कालांतराने पतीच्या विचित्र वागण्यामुळे पती देखील मातीच याची जाणीव तिला होते परत एकदा तिच्या देव विषयक संकल्पनेत बदल होतो परंतु अशा संकटाने सुशीला कोसळत नाही जमीनदोस्त होत नाही तर त्यातूनच एका उच्च तर हे वादाकडे तिची वाटचाल सुरू होते आणि देहाच देवो या संकल्पने पर्यंत सुशीला येऊन पोहोचते नवऱ्याच्या विचित्र वागणुकीमुळे सुशीला त्याला सोडून जाते आणि एका नव्या

आयुष्याला सुरुवात करते परंतु नवरा आजारी आहे हे कळल्यावर ती परत येते त्यांची सर्वतोपरी काळजी घेते त्याचा मृत्यू झाल्यावर तिला वाईट नक्कीच वाटते पण ती दुःख उगाळत बसत नाही तर पुन्हा एकदा आपल्या ध्येयाकडे वाटचाल करते अशाप्रकारे दगडाचा देव मानणाऱ्या सूशिलेचे' ध्येय हेच देव 'मानण्याच्या भावस्थिती चे दर्शन कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीतून रेखाटलेले आहे. 'सुशीलेचा देव' ही कादंबरी संपूर्णपणे सुशीलेच्या भोवतीच गुंफलेली आहे. सुशीलेच्या विचारातून अनेक आधुनिक विचारांचा आढावा लेखकाने घेतलेला आहे. राजकारण, समाज सुधारणा, जहाल व मवाळ पक्षाची मते इथपासून ते विश्व कुटुंब वादा पर्यंत चे संस्कार आजूबाजूच्या वातावरणामुळे सुशीलेच्या व्यक्तिमत्त्वावर होत गेली त्यातूनच तिच्या देव, धर्म आणि समाज याविषयीच्या संकल्पना बदलत गेल्या हा बदल इतका स्वाभाविकपणे घडून आला आहे की तो कुठेही विलग वाटत नाही. हे कादंबरीचे विशेष आहे .सुशीला ही व्यक्तिरेखा म्हणजे संवेदनशील स्त्री दगडात देव मानणारी पण परिस्थितीचे चटके बसल्यावर' ध्येय हाच देव 'या संकल्पने पर्यंत पोहोचणारी आदर्श स्त्री कादंबरीकारांनी कादंबरीतून अभिव्यक्त केलेली दिसून येते.

'इंदू काळे आणि सरला भोळे' कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा

'इंदू काळे व सरला भोळे 'या कादंबरीतील प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा असून इंदू काळे ही कला प्रिय असते तिला गाणे शिकण्याची आवड असते. इंदू बिंदुमाधव यांच्याकडे गायन शिकतअसते. ते तिचा फायदा उठवण्याचा प्रयत्न करतात परंतु त्याकडे ती दुर्लक्ष करून आपली शिकवनी पूर्ण करते आणि गायनामध्ये रममान होते .पतीला फसवणे पाप आहे हे तिला मान्य असते पती- पत्नी तला विश्वास हा किती महत्त्वपूर्ण असतो याची जाणीव करून देण्याचे कार्य कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीतून रेखाटला आहे. सरला भोळे ही श्रीमंतीत वाढलेली मुलगी असते पण लग्नानंतर मात्र तिची अवहेलना होते. तिचे पती विनायकराव हे गांधीजीच्या सत्याग्रहात सहभागी होतात पतीचे देशभक्तीचे ध्येय तिला खेड्यात घेऊन येतात पण या बाबतीत ती थोडा देखील विरोध दर्शवित नाही. पतीच्याध्येयाशी समरस होते. अस्पृश्य वस्तीत राहायला तयार होते याचा अर्थ या कादंबरीतील दोन्ही नायिका या सुशिक्षित आहेत जीवनामध्ये तडजोड पत्करून आपल्या पतीची सेवा करणे त्यांना मदत करणे हे किती महत्त्वपूर्ण असते याची जाणीव लेखकाने कादंबरीतून प्रकट केली आहे इंदू काळे ही व्यक्तिरेखा कलावादी व रसिक वैवाहिक जीवन व कलेची आवड यांच्या संघर्षात सापडलेली निष्पाप स्त्री अशी रेखाटली आहे तर सरला भोळे ही व्यक्तिरेखा कर्मयोगिनी स्त्री वास्तवाशी संघर्ष करणारी दुःखातून देहाकडे वाटचाल करणारी व्यक्तिरेखा म्हणून आपणास पहावयास मिळते.

निष्कर्ष

१) वामन मल्हारानी आपल्या' रागिनी'कादंबरीतून महाराष्ट्रात नव्याने उदयास येणाऱ्या स्त्रीचे भावनिक, सामाजिक, शैक्षणिक व वैवाहिक जीवन समजून देण्याचा प्रयत्न केला आहे.

२) आश्रमहरिनी 'या कादंबरीतून पुराण कथेचा आधार घेऊन पुनर्विवाह ही अभिनव कल्पना समाजासमोर आणली आहे.

३) 'नलिनी' कादंबरीतून स्त्रीच्या अधःपतनास स्त्री इतकाच पुरुष जबाबदार आहे .स्त्री विषयक समाजाची धारणा बदलायला हवी असे विचार त्यांनी कादंबरीद्वारे मांडले आहे.

४) 'सुशीलेचा देव' या कादंबरीतून सुशीला ही दगडाला देव मानणारी परंतु कालांतराने ती परिपक्व बनते आणि' ध्येय हाच देव 'या संकल्पनेपर्यंत पोहचते.

५) 'इंदू काळे व सरला भोळे' या कादंबरीतील कलाप्रिय इंदू आपल्या पतीच्या मागे खंबीरपणे कशी उभी टाकते याचे चित्रण अभिव्यक्त झाले आहे.

६) वा. म. जोशी यांनी आपल्या कादंबरी मधून स्त्री प्रश्ना विषयक यथार्थ चर्चा केली आहे हे मत मराठीतील मान्यवर लेखक समीक्षकांनाही मान्य आहे.

संदर्भ ग्रंथसूची-

1. डॉ. अश्विनी धोंगडे - स्त्रीवादी समीक्षा- स्वरूप आणि उपयोजन
2. चंद्रकांत बांदिवडेकर - मराठी कादंबरीचा इतिहास
3 .वा.ल. कुलकर्णी - वा.म.जोशी वाङ्मय दर्शन
4. डॉ. वंदना महाजन - मराठी कादंबरीतील स्त्रीवाद

महापुरूषांच्या मराठी लेखन साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा

संशोधक

अशोक चापटे

जि. प. माध्यमिक शाळा जळकोट

मार्गदर्शक

डॉ. भागिरथी गिरी

वरिष्ठ अधिव्याख्याता डायट मुरूड ता.जि.लातूर

जगाला निसर्गदत्त मिळालेली अनमोल भेट म्हणजे स्त्री होय. स्त्री ही जगाचे मध्यवर्ती केंद्र आहे. जगाला घडवण्यात, त्याच्या निर्मितीमध्ये सिंहाचा वाटा हा स्त्रीचा आहे. नवनिर्मिती करण्याची शक्ती स्त्रीमध्ये आहे. म्हणून स्त्री ही आई, बहीण, आजी, पत्नी आदी अनेक नात्यातून समाजाला निसर्गाने दिलेले एक वरदान आहे. आदीशक्ती, आदीमाया म्हणुनही स्त्रीचे महत्व आध्यात्मिकदृष्टीने सांगितले जाते. ज्या स्त्रीमुळे अनादी काळापासून आजपर्यंत हे जग उभं आहे. सजलं आहे, फुललं आहे, बहरलही आहे. त्या स्त्रीचे महत्व जेवढे सांगावे तेवढे कमीच आहे. आपण मानवजातीचा सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आध्यात्मिक इतिहास पाहिला तर तो स्त्री शिवाय पुर्ण होत नसल्याचे आपणास दिसून येते. या जगाचा रथ पुढे नेताना, प्रत्येक रथाला दोन चाके असतात. ती दोन चाके म्हणजे स्त्री आणि पुरूष हे आहेत. या दोन्ही चाकावर समान भार असतो त्यातला एकही निखळला तर हा जगाचा रथ जाग्यावर थांबेल. सातत्याने हे जग चालत राहिले पाहिजे. यासाठी स्त्री व पुरूष समानतेने सोबत पुढे गेले पाहिजेत. इतिहासाच्या पानापानात स्त्रीयांच्या पराक्रमाचा इतिहास आपणास वाचायला मिळतो. या जगातील जेवढे शक्तीशाली शब्द आहेत ते बहुतेक स्त्रीवाचक आहेत याला प्रत्यय येतो. जगात वावरताना स्वत:च्या लेकराला जीवापाड जपनारी, त्यावर संस्कार करून जगातील संस्कृती टिकवून ठेवणारी, स्त्री हीच व्यक्तीरेखा आहे.

स्त्रीची भूमिका महत्वाची असूनही इतिहासात पाहाताना, अवलोकन करताना, स्त्री ही शोषणाची शिकार राहिलेली दिसून येते. प्राचीन काळात स्त्रीयांना स्वातंत्र्य होते. प्राचीन इतिहासात डोकावल्यास स्त्रीसत्ताक पध्दती या संस्कृतीत असल्याचे आपल्या निदर्शनास येईल. बुध्दांच्या काळातही आपणास स्त्री स्वातंत्र्य असल्याचे आपल्याला दिसते. कारण बुध्द धम्म प्रसार करण्याचे कार्यही स्त्री भिकूंनी केल्याचे पुरावे आहेत. शिकण्याचे स्वातंत्र्य त्याकाळात होते. स्त्री स्वातंत्र्य होते पण मनुच्या काळापासून स्त्रीला एक बंदिस्त जीवनात अडकविण्याचे काम झाले. असे निदर्शनास येवून स्त्री जीवन हे पडदयाआड गेल्याचे चित्र दिसते. त्याचे अनेकप्रकारे पडसाद समाजात उमटल्याचे आपणास दिसून येते. चूल व मुल यातच स्त्री जीवन मर्यादीत करण्याचे काम आले.

स्त्रीयांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवण्याचे महापातक समाजात घडत गेले. त्यात सामाजिक एक बाजू पंगू झाल्याचे चित्र पाहायला मिळते. यातून स्त्रीला मुक्त करण्यासाठी सातत्याने प्रयत्न चालू आहेत. यात अनेक महापुरूषांनी पुढाकार घेतला. काहीनी त्याला अल्पशा प्रमाणात विरोधही केला हे आपणास दिसून येते. म्हणूनच आज आपण या शोध निबंधाच्या माध्मातून 'महापुरूषांच्या मराठी लेखन साहित्यातून अभिव्यक्त आलेली स्त्री प्रतिमा' याबाबत आढावा घेणार आहोत.

स्त्रीमुक्तीसाठी समाजात अविरतपणे लिखान चालू आहे. त्यातून अनेक मार्गांनी महापरुषांनी स्त्री समाजासाठी आपले विचार त्यांचे सक्षमीकरण व्हावे यासाठी व्यक्त केलेले आहेत. अशा अनेक महापुरुषांपैकी काही महापुरूषांच्या साहित्य लेखनातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमांचा अभ्यास करणार आहोत.

लोकमान्य टिळक :-

बाळ गंगाधर टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अग्रगण्य नेते होते. त्यांनी इंग्रजाविरोधात खुप मोठा संघर्ष उभा केला. भारतीय सामाजिक व राजकीय चळवळ चालवताना त्यांची स्त्री समाजाबद्दलची भुमिका असावी तेवढी सकारात्मक नव्हती असे दिसते. त्यांनी वेळोवेळी मराठा, केसरी इ. वृत्तपत्रातून जे लेखन केले त्यातून ते दिसून येते.

सन 1884 साली रानडे व त्यांच्या सुधारनावादी इतर सहका-यांनी मुलींची शाळा करावी व वय संमतीचा विषय मांडला. यावेळी स्त्री विरोधी द्वेषातून टिकळांनी अडथळा आणला. "कुनब्याच्या मुलांमुलीच्या शिक्षणावर खर्च करणे म्हणजे पैशाची उधळपट्टी आहे." तसेच ज्या गावात 200 लोकसंख्या आहे अशा गावात शाळा सुरू करण्याची मागणी पुना सार्वजनिक सभेने केली तेंव्हा ही टिळकांनी विरोध केला. मराठाच्या 15 मे 1881 रोजीच्या अंकातील लेखात ते म्हणाले "सरकारचा पैसा हा करदात्यांचा पैसा आहे आणि त्यामुळे ते पैसा कुठे खर्च करायचे हे करदातेच ठरवतील. म्हणजे कर देणारे बहुजन नव्हते किंवा स्त्री समाज नव्हता यातूनच त्यांचा कावेबाजपणा उघडकीस येतो. तसेच इंग्रजी शिक्षणाचा महिलांच्या स्त्रीत्वावर परिणाम होतो. आणि त्यांना आनंदी भौतिक सुख नाकारले जाते" (द मराठा 28 सप्टें. 1884)

मुलींना केवळ देशी शिक्षण, मुल्यशिक्षण आणि शिवणकाम शिकवले पाहिजे यावरच भर होता. मुलींना 11 ते 5 यावेळेत शाळेत जायलाही त्यांचा विरोध होता. संध्याकाळी किंवा सकाळी तीन तासच शाळा असावी बाकी वेळेत घरकाम करावे. (द मराठा 1887)

'जर हा अभ्यासक्रम बदलला नाही तर नव-याला त्यागणा-या रखमाबाई सारख्या मुली आढळल्यावर नवल वाटायला नको, असे रानडेला बजावले होते. रखमाबाई हे प्रकरण संमती वया संबंधात होते. त्यांचा विवाह बालपणी दादाजी भिकाजी या यजमाना सोबत झाला होता.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी 1915 साली महिला विद्यापीठ सुरू केले त्यावेळेस मुलींना स्वंयपाक, हिशेब, मुलांचे संगोपन इतकच शिक्षण दिले पाहिजे असही मत मराठयाच्या 27 फेब्रुवारी 1916 च्या अंकात लिहला आहे. याचबरोबर टिळकांनी महिलांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाला विरोध केला. (मराठा 17 ऑगस्ट 1919)

अशी भुमिका टिळकांची त्यांच्या साहित्यातून प्रकर्षाने जाणवते.

महात्मा गांधी :-

महात्मा गांधी हे टिळकांनंतरचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे दिर्घकाळ नेतृत्व केलेले, सत्याचे पूजक मानतो असे हे नेते होते. त्यांच्या जीवनात राजकीय परीवर्तन व्हावे म्हणून राजकीय चळवळ नेटाने चालवली पण त्यासोबतच सामाजिक परिवर्तन व्हावे म्हणून अस्पृश्यता निवार्णासोबत स्त्री सक्षमीकरणालाही महत्व दिले. त्यांनी त्यांच्या साहित्यातून वेळोवेळी प्रतिपादन केले आहे की, स्त्री ही समाजाचा अविभाज्य घटक आहे. स्त्री ही देशाच भविष्य घडवते. असे मत ते व्यक्त करत असत. त्यामुळे त्यांनी पुढील विचार मांडले आहेत.

'पुत्रा इतकाच वारसा हक्क कन्येला मिळावा'

'पतीची कमाई ही पतीपत्नीची सामाईक जिंदगी होय. कारण घरकामात पत्नी पतीला द्रव्यार्जनात मदत करीत असते'

'स्त्री पुरूषांच्या वेतनात विषमता असू नये' 'पुरूषांचे स्त्रीवरील प्रभुत्व संपूष्टात आले पाहिजे स्त्री स्वतंत्र असली पाहिजे.

स्त्रियांच्या समाजातील दुय्यम स्थानाच्या बाबतीत गांधीजी म्हणतात की, रुढी आणि कायदे बघता स्त्रियांचा दर्जा सर्वत्रहीन आहे आणि ते आमुलाग्र बदलण्याची गरज आहे. तत्कालीन शारदा बिलाला होणा-या विरोधा बाबत त्यांनी 'स्त्रीवर्गाच्या हक्कांच्या बाबतीत मी कसलीही तडजोड करायला केंव्हाही तयार नाही.' अशी स्पष्ट भुमिका घेतली होती.

गांधीजींनी त्यांच्या जीवनात सामाजिक बदलासाठी अहोरात्र मेहनत घेतली. समाजातील घातकी रुढीवर टिका केली. हया विरोधात चळवळ उभी केली. बालविवाह, हुंडापध्दती, पडदापध्दती या अतिमत: स्त्री विरोधी रुढी आहेत. म्हणुन त्या समाजासाठी ही पोषक नाहीत असे ते म्हणतात. याबाबींचे समाजातून उचाटन होवून यातून स्त्री मुक्त झाली पाहिजे या विचाराला त्यांनी साहित्यातून व कृतीतून प्रत्यक्षात विचार समाजात रुजविण्यासाठी काम केले.

महात्मा गांधीनी स्त्री समाजाबद्दल कार्य करताना आपल्या साहित्यातून अतिशय महत्वाचे विचार मांडले ते लिहतात की, 'कोणतीही गोष्ट प्राचीन आहे म्हणुन ती चांगली आहे, असे मी मानत नाही पुराण परंपरेपायी आपण आपली ईश्वरदत्त तर्कशक्ती गहाण टाकावी असा मी अग्रह धरत नाही. कोणतीही रुढी कितीही जुनी पुराणी असली तरी नितीत्त्वाशी तिचा विरोध असेल तर भुजलावरून उच्चाटन होण्यासा ती पात्र आहे, असे परखड आणि नि:संदिग्ध भुमिका गांधीजी घेतात. त्याशिवाय गांधीजींनी त्याही पुढे जावून आंतरजातीय विवाहांना बंदी करता कामा नये. विवाह ही वैयक्तिक बाब असली तरी गांधीजी स्त्री वरील पुरूषी प्रभुत्वाची, स्वामीत्वाची भावना संपली पाहिजे. स्त्री ही अगोदर व्यक्ती आहे. नंतर बाकी नाते आहेत. 'स्त्री आणि पुरूष एकच आहेत, म्हणुन त्यांचे प्रश्न वेगळे असता कामा नये हा विचार स्त्री पुरूष समतेकडे नेणारा मार्ग ते सांगतात. (8 मार्च 2019, लोकसत्ता)

महात्मा गांधी यांनी स्त्री स्वातंत्र्याला प्राध्यान्य दिले स्वत:च्या वैयक्तिक जीवनातही त्यांची पत्नी कस्तुरबा यांनाही बरोबरीचे स्थान दिले. त्यांनी त्यांच्या सार्वजनिक जीवनात अनेक स्त्रीयांना प्रोत्साहन दिले म्हणुनच सरोजीनी नायडू, विजयालक्ष्मी पंडीत, अवंतिकाबाई गोखले, दुर्गाबाई देशमुख, उषा मेहता, अरुणा असफअली, राजकुमारी अमृत कौर, बीबी अमतुरस्सलम. अशा कितीतरी स्त्री नेतृत्वस्थानी आल्या. संविधान समितीत 15 महिलांचा समावेश होता. शिक्षणातून स्त्री पुरूष समानता हा भाव रुजला पाहिजे म्हणून सन 1922 मध्ये गांधीजींनी 'बालपोथी' लिहली आहे.

महात्मा गांधीजींनी आपल्या साहित्यातून 'स्त्री त्याग आणि शांतीची मुर्ती आहे आणि युध्द संस्था नष्ट करून जगात शांतता निर्माण करण्याचे सामर्थ्य तिच्याच अंगी आहे' हा महत्वाचा विचार त्यांनी मांडला आहे. त्यांनी आपले आत्मचरित्र लिहले 'माझे सत्याचे प्रयोग' यात आपणास स्त्री सक्षमीकरणाचे अनेक उदाहरणे अनुभवायला मिळतील. त्यांच्या साहित्यातून त्यांनी स्त्री ही समाजातील स्वतंत्र व्यक्तीरेखा आहे हे सातत्याने त्यांच्या साहित्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे साहित्य व कृती यातून स्त्री बद्दलची भावना ही सकारात्मक पणे अभिव्यक्त स्त्री प्रतिमा आपणास वाचायला अनुभवायला मिळते. स्त्रीशिवाय समाजाचे उथान होणे नाही यावर त्यांची भुमिका ठाम होती. स्त्री शिक्षणाचा त्यांनी आपल्या साहित्यातून पुरस्कार केला आहे.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले :-

स्त्रीयांच्या उध्दारासाठी फुले दाम्पत्याची भुमिका ही स्त्रीजीवनाला कलाटणी देणारी आहे. अंधारलेल्या स्त्री जीवनाला ख-या अर्थाने प्रकाशामध्ये आणण्याचे काम हे म. ज्योतीबा फुले यांच आहे. त्यांनी त्यांच्या जीवनात समाजाचे एक महत्वपुर्ण अंग जे पंगू झालेल होत. त्यात प्राण फुंकण्याचे काम जीवापाड मेहनत करून केले आहे. त्यांच्या कार्याला इतिहासात तोड नाही. स्त्री जीवनाचे उध्दारकर्ते हे फुले दाम्पत्य होत. स्त्री शिक्षणाचा पाया घातला. स्त्री शिक्षणासाठी सावित्रीबाईंनी अंगावर दगड, चिखल शेण झेलले पण निमुटपणे त्या काम करत राहिल्या.

स्त्रियांचा खरा धर्म त्यांना शिक्षण देणे होय. स्त्रियांच्या मानसिकतेसाठी व सक्षम स्त्री घडविण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. हे ओळखून म. फुलेंनी आपल्या पत्नीस शिक्षण देवून तयार केले. त्याच बरोबर अहमदनगर येथे मिसेस फरार व पुणे येथे मिसेस मिचेल यांच्या नॉर्मल स्कुलमधून अध्यापनाचे शिक्षण पुर्ण केले आणि सावित्रीबाई फुले हया देशात अदय शिक्षका पहिल्या मुख्याध्यापिका म्हणुन परिचित झाल्या. त्यांनी जीवओतून महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची सुरूवात करून स्त्री शिक्षणाची दारे खुली केली.

महात्मा फुले हे आपले विचार प्रत्यक्षात आणणारे बंडखोर युगपूरूष होते. जाती प्रथा, ब्राह्मणी धर्माचे वर्चस्व, स्त्रियांचे शोषण या सर्व आघाडयांवर संघर्ष केला. त्यांचा संघर्ष सत्यशोधनावर आधारलेला होता. 1848 साली मुलींची पहिली शाळा पुण्यातील भिडे वाडयात सुरूवात केली. ज्योतिबांच्या शाळेत शिकणा-या 11 वर्षीय मुलीने लिहलेला निबंध महत्वाचा आहे. ही मातंग समाजाची होती. 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात स्त्री आणि पुरूष हा संवाद त्यांची विचारधारा सांगणारा आहे.

ज्येष्ठ विचारवंत (स्त्रीवादी) विद्युत भागवत यांनी व्यक्त केले आहे की, ज्योतिबांनी बालविवाह, सतीप्रथा, जरठ कुमारिका या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. फुलेंबरोबरीनी गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी यांनी स्त्री पुरूष समानतेचा विचार बंडखोर प्रवृत्तीने मांडला. न्या. रानडे यांनी पुर्नविवाह व विधवा विवाहाचे समर्थन केले पण विदूर झाल्यावर स्वत: कुमारीकेसी विवाह केला. त्यांचे पटशिष्य ना. गोखले यांनी पहिली बायको असताना दुसरी केली पण महात्मा फुलेंनी अपत्य नसताना दुसरा विवाह केला नाही. पण सावित्रीलाही बंधनात अडकवून न ठेवता सर्व स्वातंत्र्य बहाल केले होते. पण दोन्ही दाम्पत्यांनी प्रमाणिकपणे आयुष्यभर संसार केला व जनहितार्थ म्हणजे जे दीन दलित, शेतकरी-कष्टकरी, सामान्य लोकांसाठी काम केले. काशिबाई नावाच्या ब्राह्मण विधवा मातेच्या मुलाला यशवंतला दत्तक घेतले. त्यांनी आपल्या चळवळीच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले, फातिमाबी शेख, मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे, पंडीत रमाबाई, आनंदीबाई जोशी, या सारख्या असंख्य स्त्रियांच्या कार्यासाठीची प्रेरणा महात्मा फुलेच आहेत. महात्मा फुले हे स्त्री मुक्ती चळवळीचे अद्यप्रणेते ठरतात.

महात्मा फुले यांनी त्यांच्या साहित्यातून स्त्री शोषणावर लेखन केले, ब्राह्मणांचे कसब, गुलामगिरी, सत्सार, सार्वजनिक सत्यधर्म, काव्यरचना शिवाजीराजे भोसले पवाडा, हंटर कमिशन समोरील साक्ष, निवेदने, इशारा, तृतीयरत्न नाटक, इ. लेखनातून महात्मा फुलेंनी शेतकरी – कष्टकरी, सामान्य गोर-गरीब लोक, त्याच बरोबर स्त्रीयांबाबत आयुष्यभर तळमळीने काम केले. स्त्री शिक्षणासाठी प्रचंड मेहनत घेणारा इतिहासात दुसरा महापुरूष सापडने कठीण. सावित्रीबाई फुले यांनी त्यांच्या आयुष्यात महात्मा फुले सोबत कार्य करताना विधवा व कुमारीका, माता यांच्यासाठी प्रसतुतीगृह व बालसंगोपन केंद्र चालवले, विधवा विवाहाचा आग्रह धरला, स्त्री शिक्षणासाठी शाळा चालवल्या, दुष्काळात अन्नदान चालवली, रोगराईच्या काळात दवाखाने उभे केले, गोरगरीबांना सेवा पुरवली, पिडीत महिलांना आधार दिला. या दोघाही दाम्पत्यांनी रक्ताचे पाणी केले आणि समाजासाठी कष्ट उपसले.

वरीलप्रमाणे त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा होय. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून धार्मिक परीवर्तन करून स्त्री मुक्तीचा लढा उभे करणारे हे थोर पुरूष होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजासाठी खुप मोठा अभ्यासपुर्ण लढा उभा केला. त्यांनी त्यांच्या आयुष्यात खुप अभ्यास केला. अनुभव पचवले आणि जीवनात समाजासाठी अतिशय धाडसी निर्णय घेतले. जगाला वंदनीय असे संविधान त्यांनी भारतीय लोकांना समर्पित केले. त्यांच्या लेखन साहित्यातून स्त्री ही स्वतंत्र झाली पाहिजे यासाठी लेखन केले. स्त्री शोषणा विरुध्द आवाज उठवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटनेची निर्मिती करीत होते. तेंव्हा समाजातील स्त्री हा समाज घटक अत्यंत महत्वाचा आहे. भारतीय स्त्री पिडीत आहे. धार्मिक दहशतवादात गुरफटली आहे. यातून तिची मुक्ती झाली पाहिजे यासाठी घटनेत त्यांनी तरतुद केली. हिंदू कोड बील बनवले यातून स्त्रियांना कायदेशीर हक्क प्राप्त करून देण्याविषयी आणि विशेषत: वडीलोपार्जित संपतीत वाटा देण्याविषयी आग्रही होते. लग्न, वारस, दत्तक इ. संबंधी समान कायदे व्हावे यासाठी तरतूद केली.

'स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल. त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजित असतो. म्हणुनच हा समुदाय पाहिल्यावर मला खात्री वाटते व आनंद होतो की आम्ही प्रगती केली आहे.' 20 जुलै 1942 रोजी नागपूर येथे आयोजित ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वीमेंन्स कॉन्फरन्स मध्ये महिलांना उद्देशून बोलले होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीविषयक लेखन : महेंद्र गायकवाड यांनी त्यांच्या पुस्तकातून मांडले आहे.

19 जुलै 1942 रोजी नागपूर येथे झालेल्या अखिल भारतीय दलित महिला परिषदेला 25 हजार स्त्रीया उपस्थित होत्या. तेंव्हा तेथे स्त्रियांना घटस्फोट घेणे, स्थावर व जंगम मालमत्ता वाटा मिळणे असे महिला सक्षमीकरणाचे ठराव घेण्यात आले.

जातीअंताच्या चळवळीमध्ये स्त्री सबलीकरणाची शक्यता आहे. स्त्री मुक्त होणे आवश्यक आहे. सामाजिक स्वातंत्र्य, आर्थिक सुबकता मिळणे महत्वाचे आहे. म्हणुन त्यांनी समाजाला सोबत घेवून समाजावर जाचक बंधने लादणा-या मनुस्मृतीचे 25 डिसेंबर 1927 रोजी जाहीर दहन केले. त्यास पर्याय म्हणुन 'हिंदू कोड बील' दिला होता. हे बील रामाच्या काळात अस्तित्वात असते तर सीतेला घराबाहेर हकलून देण्याचे धैर्य पुरूषोत्तम म्हटल्या जाणा-या रामाला सुध्दा झाले नसते. या शब्दात त्यांनी बिलाची समकालीनता व मौलिकता पटवून सांगितली होती. 26 सप्टें. 1951 रोजी 'हिंदू कोड बील' कायमचे बारगळले. संसदेत सरदार पटेल व त्यांचे अनुयायी एवढेच नव्हे तर लोकसभेचे अध्यक्ष यांनीही हे बील मांडण्यास विरोध केला. तेंव्हा त्याचा क्लेश होऊन डॉ. बाबासाहेबांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा 27 सप्टें. 1951 रोजी दिला. ही तळमळ स्त्री समाजाविषयी डॉ. बाबासाहेबांची होती. त्यांनी वेळोवेळी आपल्या साहित्यातून लिहली आहे. प्रत्यक्षात व्यक्तही केली आहे. असे अनेक प्रसंगाचे दाखले देता येतात. बाबासाहेबांनी त्यांच्या शोधनिबंधातून असो की ग्रंथ लेखनातून असो समाजाप्रती कष्टाचा डोंगर उभा केला. समाजाच्या हितासाठी अभ्यासपुर्ण काम केले आहे. स्त्री प्रतिमा रेखाटताना स्त्री ही मुक्त झाली पाहिजे. स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. तिला एक व्यक्ती म्हणून जगण्याचा पुर्ण अधिकार मिळाला पाहिजे असे मत अभिव्यक्त केले आहे.

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे :-

अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या जीवनात जे काही भोगलं, सोसलं, अनुभवातून पचवल तेच सत्य लेखनीतून उतरवलं. बहुजन समाजाची व्यथा ही अण्णाभाऊंची कथा बनुन ती समाजापुढे आली. अगदी हुबेहूब वर्णन, जीवंत वर्णन लिहण्याची ताकत ही अण्णाच्या लेखनित होती. जीवन जगताना समाजात जे जे पाहिल ते ते त्यांनी समाजापुढे मांडल. त्यांनी अनेक कथा, कादंब-या, नाटक, पोवाडे. इ. अनेक प्रकारचे साहित्य लिहले.

अण्णाभाऊंनी माणूसपण स्विकारणार साहित्य लिहल, निर्माण केल. अनादी काळापासून जो समाज शोषितेचा स्विकार बनला आहे. त्याची वेदना त्यांनी कथेत मांडून त्यांना न्याय मिळावा यासाठी उजेडात आणलं. त्यांच्या साहित्यात स्त्रीच माणूसपण कोरलं गेल आहे. त्यांनी त्यांच्या कथेतून जी नायिका साकारली ती अन्यायाच्या विरोधात पेटून उठलेली आक्रमक अशी पाहायला मिळते. बंडखोर नायिका साकारण्याचे अत्यंत महत्वाचे कार्य साहित्यातून केले आहे.

स्त्रियांची जीवनरेखा त्यांच्या साहित्यातून साकारताना स्त्री-पुरूष समानता नांदावी याकरिता त्यांनी तळमळीने प्रयत्न केले. त्यांनी त्यांच्या लिखाणाचा स्त्री ही केंद्रबिंदू मानून लिखाण केलेले आहे. त्यांनी समाजाचा अनुभव घेताना त्यांच्या जीवनात त्यांनी पाहिलं की स्त्रीयांचं खुप मोठया प्रमाणात लैंगिक, आर्थिक, शोषण होत होते. या शोषणातून स्त्री मुक्त झाली पाहिजे. ही तळमळ अण्णाभाऊंची होती.

अण्णाभाऊंनी खुप मोठ लेखन केलं. चित्रा, चंदन, चिलखलातील कमळ, वारणेचा वाघ, रुपा, पाझर, फरारी, मथुरा, रत्ना, वैजयंता, वैर, आवडी इ. कादंब-या लिहल्या. खुळवाडी, गजाभाऊ, निखारा, जिवंत काडतुस, तारा, पिसाळलेला माणूस, फरारी, बरबाद्या कंजारी, असे अनेक कथासंग्रह लिहली. पुढारी मिळाला, देशभक्त घोटाळे, पेंग्याच लगीन, माझी मुंबई,

सुलतान अशी नाटक, लोकनाटय, प्रवास वर्णन, कविता वेगवेगळया प्रकारे त्यांनी मराठीत साहित्य लेखन केलेल आहे. परंतु या सर्व लेखनाचा केंद्रबिंदू पिडीत स्त्री, पिचलेला माणूस आहे. माणसाला माणूसपण मिळावे यासाठी त्यांनी लेखन केल आहे. अण्णाभाऊनी 35 कादंब-या लिहल्या आहेत.

अण्णाभाऊंच्या कादंब-यातील चंदन, हरणा, तारा, सिता, चंद्रा, राधा, आवडी, वैजयंता, रुपा अशा अनेक नायिका साकारताना ही नायिका स्त्री कणखर, बंडखोर, लढणारी, नैतिकता पाळणारी आहे. स्वातंत्र्याचा हक्क, स्वावलंबन, तिच्या इच्छेप्रमाणे जगायला लावणारं साहित्य निर्माण केल आहे. मानवतेचा, समतेचा, नैतिकतेचा, स्त्री ही अबला नाही तर सबला आहे हा दृष्टीकोन सातत्याने मांडला आहे.

अण्णाभाऊंनी साकारलेल्या स्त्री भुमिकांचा अभ्यास करताना काही उदाहरणे आपण पाहुया 'आवडी' ही भुमिका साकारताना समाजातील जी अस्पृश्यतेची भावना कशी संपुष्ठात आणावी लागेल याचे चित्र साकारताना दिसते. बरबाद्या कंजारी या कादंबरीतील नायिका ही सैद्या सोबत लग्न झाल्यानंतर तो रोगी होता. त्यात त्याचं लवकरच मृत्यू झाला. तिच्या तारुण्याच्या वयात ही घटना घडली तेंव्हा ही नायिका तिच्या मनाप्रमाणे तिला आवडणारा सैदया यासोबत पळून जाते व लग्न करते. सामाजिक रूढींना ती नाकारते. कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाण्यास तयार राहते. म्हणजे मनाप्रमाणे जगता न येणारी स्त्रीची आयुष्यभर कुचंबना होते. कुढत जगाव लागत. बंधनात सहावं लागत, माणूसपण विसरावं लागतं, यांना झुंगारणारी ही नायिका आहे. 'निली' नावाची नायिका धर्मरुढी नाकारते. पती वारल्यानंतर होणारे विद्रुपीकरण झुंगारून देते. ही होणारी अवहेलना ती स्विकारत नाही. यातुन आपणास असे समजते की, अण्णाभाऊंनी स्त्री-पुरूष समानता, नैतिकता माणूसपणाचा दर्जा, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, सर्व क्षेत्रात स्त्री ही अबला नसून सबला आहे. हे चित्र उभारले आहे. म्हणून समानतेचा दर्जा मिळाला पाहिजे. शोषणमुक्त स्त्री ही समाजाचा उध्दार करू शकते हे अण्णाभाऊंनी आपल्या लेखनातून दाखवून दिले आहे. शौर्य, धैर्य, निर्णायक क्षमता आणि समाजाला योग्य दिशेला नेण्याचा मार्ग हा स्त्री समर्थपणे दाखवू शकते. अण्णाभाऊनी अशाप्रकारे त्यांच्या लेखनातून अभिव्यक्त केलेली स्त्री प्रतिमा आहे.

इतिहासाचे अवलोकन करताना छत्रपती शिवराय यांनीही स्त्रीयांचा मानसन्मान वाढवण्याचे काम केले. 'परस्त्री माते समान' हे त्यांचे शिवसुत्र होते. तर छ. संभाजी महाराज यांनी त्या विचारावर कळस चढवला. त्यांनही लेखन करून स्त्री सन्मानावर लिहले आहे. भेदनायिका व नखशिख रचले आहे. त्यांनीही आयुष्यभर स्त्रीयांचा मानसन्मान झाला पाहिजे, अन्याय अत्याचार यातून स्त्री मुक्त झाली पाहिजे हेच विचार कृतीतून सिध्द केले.

वारकरी संप्रदायातही संत तुकाराम, नामदेव, ज्ञानेश्वर, चोखामेळा अन्य संतानीही स्त्रीयांविषयी लेखन केले आहे. संत कबीर यांनी दोहयातून स्त्री महती वर्णन केलेली आहे.

वरीलप्रमाणे लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे इत्यादी महापुरूषांच्या मराठी लेखन साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा यावर शोध घेताना त्यांच्या महत्वपूर्ण साहित्यातील स्त्री विचाराचा आढावा घेतला आहे.

संदर्भ :-

१) महात्मा फुले समग्र वाङमय व अण्णाभाऊ साठे समग्र वाङमय
२) स्त्री शिक्षणाची वाटचाल, महाराष्ट्र राज्य शिक्षण, 1968
३) डॉ. विद्युत भागवत - महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दिशेने स्त्री अभ्यासकेंद्र, पुणे विद्यापीठ 1997
४) तत्कालीन मराठा वृत्तपत्र लेख

'जावे तिच्या वंशा' या कथासंग्रहातून अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा

श्रीमती. दुर्गा सुदिन जांभळे
फोंडा, गोवा

प्रस्तावना

कथा हा तसा फार पूर्वीपासूनचा, परंपरागत व मौखिक तसेच पिढ्यानपिढ्या चालत आलेला खूप समृध्दीअसा साहित्य प्रकार आहे. पूर्वी तिला गोष्ट म्हणायचे ती मौखिक स्वरुपात होती आता ती लिखित आहे म्हणून तिला कथा म्हणतात हाच त्या दोहोमधील काय तो फरक. या मराठी कथेचा विस्तार करण्याचे कार्य अनेक साहित्यिकांनी केले पण तिची खोली वाढविण्याचे कार्य मोजक्याच साहित्यिकांनी केले आहे त्यात प्रिया तेंडुलकरांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. प्रामुख्याने त्यांनी स्त्रीमनाची स्पंदने नेमकेपणाने व अचूक टिपलेली आहेत. केवळ स्त्रीजीवनाकडे नव्हे तर एकूणच जीवनाकडे पाहण्याची त्यांची एक स्वतंत्र दृष्टी आहे.

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवत:' असे स्त्रीच्या बाबतीत म्हटले जाते कारण स्त्री म्हणजे प्रेरणेचे स्त्रोत, जीवन सफल करणारी एक महान शक्ती, तिच्यामुळेच जीवनाला पूर्णत्व येते आणि जीवनाच्या केंद्रस्थानी तीच असते. 'स्त्री म्हणजे मांगल्याचा मुर्तीमंत आविष्कार, परमेश्वराला प्रत्येक घरात वास्तव्य करणे शक्य नाही आणि म्हणूनच त्याने स्त्रीची निर्मिती केली असावी' असे सानेगुरुजी म्हणतात. तिच्याशिवाय जगणे ही कल्पना सहन होत नाही. अशी स्त्री आजच्या काळात सुशिक्षित असून घर व करिअर या दोन्हीच्या मध्येतारेवरची कसरत करते आहे पण तिच्या भावनांना तिलांजली वाहूनच कारण दोन्हीकडेही तिची अवहेलना होतच असते, अपमान सहन करावा लागतो. अशा तिच्या व्यथा, वेदना, यातना याचे यथायोग्य चित्रण करण्यासाठी अनेकांनी आपली लेखणी झिजवली पण स्त्री लेखिकेने अत्यंत जिव्हाळ्याने स्त्रीजीवनाची कहाणी चितारलेली आहे. त्यापैकी प्रिया तेंडुलकर या होत.

संशोधन पध्दती

"प्रिया तेंडुलकर यांच्या 'जावे तिच्या वंशा' या कथासंग्रहातून अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा" हा माझ्या शोधनिबंधाचा विषय असून यासाठी मी आंतरजालावरील काही लेख व संदर्भ ग्रंथ यांचा वापर केला आहे. यासाठी वर्णनात्मक शोधपद्धतीचा वापर केला आहे.

प्रिया तेंडुलकर - परीचय

प्रिया तेंडुलकर यांना लिखाणाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून म्हणजे श्री. विजय तेंडूलकर याच्याकडून लाभलेला आहे. या अधिक धाडसाने व बेछूटपणे लिहिणाऱ्या स्त्रीवादी लेखिका. १९७०नंतरच्या काळात चित्रपट, नाट्य आणि लेखन या तीनही क्षेत्रात स्वत:च्या स्वतंत्र प्रतीभेचा कलात्मक आविष्कार घडविणारे एक प्रतिभावंत व्यक्तिमत्व म्हणून प्रिया तेंडुलकर यांना ओळखले जाते. आधुनिक काळातील स्त्री प्रतिमा कशी आहे, तिला कोण कोणत्या समस्येतून जावे लागत आहे यासंदर्भात त्यांनी केलेले चिंतन मोलाचे आहे.

'जन्मलेल्या प्रत्येकाला', 'जावे तिच्यावंशा', 'ज्याचा त्याचा प्रश्न', 'तिहार' हे कथासंग्रह तसेच 'असंही' ललित लेख, 'पंचतारांकित' स्वत:विषयीचे अनुभव लेख व 'फर्स्ट पर्सन' हे आत्मचरित्र अशी त्यांची साहित्य संपदा आहे.'जावे तिच्या वंशा' या कथासंग्रहाला पुरस्कार लाभलेला आहे.

आजची स्त्री शिकूनही परावलंबी का? आधुनिक जगातील असूनही व्यक्तिगत स्वातंत्र्य का मिळत नाही? ती घराबाहेर पडून अर्थार्जन करते तरी तिला दोन्ही पातळ्यांवर लढावे लागते का? तीच वासनेची शिकार का होते? अशा अनेक प्रश्नांचा ठाव प्रिया तेंडुलकरांनी आपल्या कथातून घेतला आहे.

प्रिया तेंडुलकर आपल्या कथांतून सांकेतिक वैवाहिक जीवनाच्या प्रस्थापित साच्याच्या आणि जीवनविषयक मूलभूत प्रश्नांचा शोध घेताना दिसतात. मध्यम व उच्चवर्णिय तरुण स्त्रीचे दु:ख हा त्यांच्या कथांचा केंद्रबिंदू आहे. या स्त्रियांच्या आयुष्यातील मैत्री, प्रेम, लग्न, लग्नानंतरही स्वत्व जोपासण्याची तीव्र इच्छा, आंधळा पुरुषी अहंकार, त्याविरुद्धचा लढा आणि

शेवटी एकाकी बाहेर पडून स्वतःच्या करिअरचा प्रश्न, पुरुषाविना वाटणारी असुरक्षितता, घटस्फोटानंतर परत घरी आल्यावर आई, वडील, भाऊ यांच्या बदलेल्या भूमिका यातून निर्माण होणारा संघर्ष, दुःख यांचे दर्शन त्यांच्या कथातून घडते.

'जावे तिच्या वंशा' या कथासंग्रहातून अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा

'जावे तिच्या वंशा' या प्रिया तेंडुलकर यांच्या कथासंग्रहात एकूण बारा कथा आहेत. या साऱ्या कथेतून स्त्री मनाची आंदोलने आली आहेत

'जेन मारियाची बहिण'या कथेतील जेन ही स्त्री आहे. तिच्या वाट्याला डोंगराएवढी संकटे आली. वडिलांचा पत्ता नाही, आई दारूडी ,एक भाऊ असूनही नसल्यासारखा व दुसरा भुरट्या चोऱ्या करणारा. तिच्या बहिणीची अवस्थाही केविलवाणी होती कारण तिने तीन लग्न केले पण एकापासूनही तिला सुख लाभले नाही. पहिल्या दोन नवऱ्यापासून एकेक मूल आणि तिसऱ्या नवऱ्याने गरोदरपणी मारून बदडूनतिला घराबाहेर काढले. अशा सर्वांची जबाबदारी जेनवर आली होती. जेन ही एका फुलाच्या दुकानात नोकरी करत असे, त्यातून मिळणाऱ्या पैशावर सर्व कुटुंबाचे पालन पोषण करीत असे. साहजिकच या सर्व जबाबदारीतून तिला आपल्या जीवनाकडे लक्ष देता आले नाही आणि या सर्वांच्या आयुष्याला ठिगळ जोडता जोडता हिच्याच वाट्याला सगळी दुःख क्रमाक्रमाने येत राहिली आणि ज्या वयात मौजमजा करायची त्या वयात तिला घरातील सर्वांच्या ओझ्याखाली जगावे लागले अशा कितीतरी जेन समाजात असतील आणि अशा मुलींची दुःख कधी संपणार असा प्रश्न प्रिया तेंडुलकर यांना पडतो आहे.

'अनुची आई'या कथेतील आई ही आजच्या आधुनिक जगातील आई असून या परिघाभोवतीच न राहता ती त्यातूनही बाहेर पडलेली आहे पण आज पूर्वीपेक्षा जग वेगवान झाले तसेच नव्या नव्या समस्या यांचीही भर त्यात पडत आहे. आजच्या आईला केवळ माणसे नव्हे तर त्या प्रत्येक माणसांची मने सांभाळावी लागत आहेत आणि अनुच्या आईच्या बाबतीतही हेच घडले आहे. खरं पाहायला गेलं तर अनुची आई किती सुखी आहे, तिचा संसार किती सुखाचा आहे असे सर्वांना दिसत होते कारण तिचा नवरा मिळवता होता. शिवाय अनु ही तिची मुलगी सुंदर होती. सगळं काही व्यवस्थित होतं पण आतून मात्र ती पोखरून गेली होती कारण अनुच्या आईचा संघर्ष हा दोन पातळ्यावरती होता एक म्हणजे नवरा व दुसरं तिची वयात आलेली पोर. तिचा आणि तिच्या पतीची कधीच नाळ जुळली नाही. कारण लग्नापूर्वी गोड गोड बोलणारा तिचा नवरा लग्नानंतर मात्र तिचे उणीदुणी काढून तिला सतत बोलायचाआणि राग काढत असे, वाद-विवाद होत. शेवटी तो तिला सोडून दुसऱ्या स्त्री बरोबर राहण्यास जातो. दुसरीकडे चवदा वर्षाची मुलगी समाजाच्या घाणेरड्या नजरेपासून अलिप्त कसं ठेवावं हा प्रश्न तिला सतत टोचत असे. या वयात तिचं टीव्हीसमोर बसणं हे आईला आवडत नव्हतं शिवाय नवराही बाहेरख्याली वृत्तीचा,आपण सधवा असूनही विधवेचं जगणं जगत आहोत या भावनेनं ती आपल्यावर आलेला दुःखाचा डोंगर पचवत होती. एकूणच आजच्या आधुनिक जगातील आईला अशा भयानक गोष्टीशीही झुंज द्यावी लागत आहे.

तनुजा ही एक डॉक्टर, अत्यंत हुशार व मनमिळावू अशी मुलगी आहे. स्वतः जिद्दीने शिकून डॉक्टर झाली. आपल्या भावंडांना मोठं करता करता तिच्या लग्नाला विलंब झाला, शेवटी एका खुशाल चेंडू पाटलाच्या मुलाबरोबर नाईलाजाने वय निघून गेल्यावर लग्न करावं लागलं. लग्नानंतर सात-आठ वर्षे उलटून गेल्यावरही तिची कूस उजवेना म्हणून तिने सारे प्रयत्न केले. भारतातील सारे उपचार करून पाहून अमेरिकेत तिला एका फर्टिलिटी क्लिनिक मध्ये उपचारासाठी ठेवले ते पण एकटीला. तेंडुलकर यांनी **'फर्टिलिटी क्लीनिक'**या कथेतून नेमकेपणाने अपत्यहीन महिलेची व्यथा मांडलेली आहे. कारण मातृत्व व स्त्री यांचा अतूट संबंध आहे पण एखादी स्त्री या सुखापासून वंचित राहिली तर तिच्याकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन कसा असतो किंवा तिलाच सारे जण कसे दोष देतात याचे चित्रण या कथेतून आले आहे.

नव्या कोऱ्या पांढऱ्या साडीचे टोक'या कथेतील नायिकासुलू तशी दिसायला साधी होती, दात थोडेसे बाहेर होते त्यामुळे तिचे लग्न जुळत नव्हते शिवाय घरची परिस्थिती बेताचीच होती. अचानक अण्णा काळे ज्याची पहिली पत्नी वारली होती आणि हा थोराड अरसिक व बाहेरख्यालीवृत्तीचा, वयही वाढलेलं होतं त्यामुळे त्यालाही कोणी मुलगी देत नव्हतं ,सुलूला दाखवायला म्हणून नेली होती तिथेच विवाह ठरला व झाला. या विवाहापासून सुलूला सुख लाभलेच नाही. नवरा दारू पिऊन यायचा, वरचेवर भांडणे करायचा, जेवायलाही धड मिळत नसे, माहेरचाही दरवाजा देण्याघेण्याच्या वाटाघाटीतून आधीच बंद झाला होता, त्यात भरीस भर म्हणून नवऱ्याचं असलं वागणं. त्यामुळे ती कधीच नटली, सजली नाही की आनंद साजरा केला नाही सारे आयुष्य मुकेपणानी जगली त्यातच तिला व्याधी जडली पण तिने त्यावर औषधोपचार सुद्धा केले नाही व

स्वतःला संपवून टाकले. प्रिया तेंडुलकर लिहितात 'आर्थिक समस्या बहुतेकांना असतात मानसिक आजारही अनेकांना असतात पण या सगळ्याची गोळाबेरीज इतकी भयाण असू शकते? सुलू मेल्यानंतरही एखादया बेवारशाप्रमाणे अंत्यसंस्कार केले. तिच्या जाण्याने कोणालाच दुःख नाही की कोणाच्या डोळयात पाणी नाही आले.ही कथा कारुण्यानी भरलेली आहे.

सविता शहाणे ही शिकलेली स्त्री. लग्न झाले आहे. तिला आपलं करियर घडवायचं असतं पण तिला पदोपदी पतीचा आणि अनुषंगाने येणाऱ्या जबाबदरयांचा अडथळा होऊ लागतो शेवटी ती घटस्फोट घेते व वेगळी होते. आपलं सार लक्ष आपल्या व्यक्तिमत्वावर व व्यवसायावर केंद्रित करते व सफलही होते पण व्यक्तिगत जीवनात मात्र विफल व निराश असते. तिच्या एकाकी जगण्याचा फायदा घेण्यासाठी अनेकजण टपलेले असतात, रात्री अपरात्री फोन करून तिला सतावत असतात अशावेळी तिला आधाराची गरज भासते,पण तिने स्वतःच तोआधार तोडलेला असतो. **'लेजर'**यातून लेखिकेनी संसार का करियर यावर भाष्य केले असून या दरडीवरून चालताना कसरत करतांना मनस्ताप होतो पण वेळप्रसंगी एकाकी जीवन जगणाऱ्या स्त्रीची कथा व व्यथा यात मांडली आहे.

'घसरण'या कथेतील नायिका आईवडिलांची लाडकी लेक आहे. स्वतःच्या पसंदीने आंतरजातीय विवाह करते पण सुखी होत नाही कारण तिला लग्न संस्थेतील बंधने नको आहेत मुक्त व स्वतंत्र रहावं, कुणाच्या ताब्यात राहायचं नाही, आपण बक्कळ कमावत असताना त्यांचं का ऐकावं? हे प्रश्न तिला छळतात शेवटी ती घटस्फोट घेते. यातून संसारात विश्वास असावा तरच तो सुखाचा होतो. नुसतं शिकून नोकरी करून पैसे कमावले की होत नाही तर तिला काही ना काही गमावते.

'लफडं'या कथेतील नायिका निशा हिला करियरच्या पाठी न धावता सुखी संसार करावा हे स्वतःच ठरवते पण तिच्याही जीवनाची शोकांतिकाच होते. तिचा नवरा मात्र तिच्याकडे पाहात नाही. कामाच्या नावाखाली सतत बाहेर जाणे, रात्री अपरात्री स्त्रियांचे कॉल्स, त्यांच्याशी गोड बोलणे हे चालायच. अशा त्याच्या वागण्याने ती कोलमडून जाते. एकदा एकटी सिनेमा पाहायला जाते पण तू कोणाबरोबर गेली होतीस? अशा नवऱ्याच्या प्रश्नाने खूप दुःखी होते.स्वतः नवरा लफडं करतो पण बायको साधी असली तरी तिलाच दोष देतो.

'बायको'या कथेची नायिका नंदिनी ही श्रीमंतांच्या घरची. खूप चांगली, आज्ञाधारक, घर स्वच्छ ठेवणारी, नवऱ्याची सेवा करणारी, त्याची मर्जी सांभाळणारी अशी होती. पण तिच्या नवऱ्याला हे तिचं असं वागणं खटकत होतं. त्याला तिचा गर्विष्ठ स्वभाव असल्यासारखा वाटायचं. तिच्या वागण्याचा त्याला त्रास होई आणि म्हणूनच शेवटी घटस्फोट घेतो. सुखही जाचत व शेवटी तीही काही न बोलता बापाच्या घर जाते. श्रेष्ठत्वाच्या आविर्भावात मृत्यूला सामोरी जाते.

'तिच्या लग्नाच्या शोक सभेची रात्र'या कथेतील नायिका अपर्णा. तिने स्वतःच आनंदशी लग्न केले पण तो स्वैर होता. लग्नानंतर दोन मुले झाली आणि यांनी तिला सोडून दिली व आपण दुसऱ्या स्त्रीकडे वळला. तरीही अपर्णा खंबीरपणे आपला व्यवसाय सांभाळते व मुलांचा सांभाळ करते. कालांतराने व्यवसाय बुडतो व देणेकऱ्याचा ससेमिरा पाठीशी लागतो धमक्याचे फोन येतात अशा अवस्थेत ती जगणार कशी? नवराच आयुष्यात काळ बनून आल्यावर एकाकी पडलेल्या स्त्रीने पाहायचे कोणाकडे हाच प्रश्न लेखिकेनी मांडला आहे.

'आई नावाची बाई'ही एक भावपूर्ण कथा आहे. आई सर्वांची काळजी घेणारी, घर जाग व्हायच्या आधी जागी होणारी वसारे शांत झोपी गेल्यावर अंथरुणावर पाठ टेकवणारी, जेव्हा ती आजारी असते तेव्हा तिच्या मनातल्या भावना कशा असू शकतात याच विश्लेषण केलं असून, ती जेव्हा जग सोडून निघून जाते तेव्हा ती सर्वांना पुन्हा हवीहवीशी वाटते. या कथेतून आईची महती सांगितली आहे.

'ठाकुबाई जळगाववाले'या कथेतून आंतरजातीय विवाहाचे परिणाम काय होऊ शकतात याचे वर्णन आले आहे. सर्वच आंतरजातीय विवाह सफल व विफल होतात अस नसत. या कथेतील नायिका सुशिक्षित डॉक्टर आहे ती महाराष्ट्रीयन असून तिचाप्रेम विवाह एका पंजाबीमुलाशीहोतो. दोघांचीही संस्कार व संस्कृती वेगळी, त्यामुळे पटत नाही म्हणून ती माहेरी येते पण माहेरी तिला स्थान नाही म्हणून परत सासरी येते व आपल्या नशीबाचे भोग समजून जगते व त्याच्यासोबत राहते.

'मात'या कथेतील नायिका शिकलेली असून नोकरी करते आहे. तिचे लग्न झालेले आहे तरीही तिने विवाहबाह्य संबंध ठेवलेले आहेत. ते संबंध आपल्या नवऱ्याला कळू नये म्हणून ती त्याची जास्त काळजी घेते पण नवरा यावर कधीच काही बोलत नाही.बाहेर गेला की आनंदी असायचा व घरी अबोल. तिला शंका आली की, त्याची कोणी मैत्रीण नाही ना? आणि या भीतीने ती खंगूलागते. अशी ही कथा मानवी मनातील वादळ टिपणारी आहे.

निष्कर्ष

१) 'जावे तिच्या वंशा' या प्रिया तेंडुलकरांच्या कथासंग्रहात त्यांनी स्त्रीमनाची स्पंदने विस्मयकारक टिपलेली आहेत.

२) स्त्री शिकून संसार व करीयर करत असताना तिला आधुनिक काळातही त्रास सहन करावा लागतो, म्हणावी तशी ती सुखी झाली नाही.

३) स्त्रींनी स्वातंत्राचा विचार केला, ती स्वतंत्र राहिली तरी समाजातील विखारी नजरा तिला जगू देत नाही.

४) आजही तिच्या वाट्याला उदासीपण आलेले आहे.

५) स्त्रीच जीवन कात्रीत सापडल्यासरखे झाले आहे.

६) मनातील सा़ऱ्याच भावभावना ती शब्दातून व्यक्त करत नाही.

७) पुरुषी अहंकाराला ती आजही बळी पडतेच आहे.

८) पुरुष स्वैरपणे वागला तर चालतो पण स्त्रीला मित्र असता कामा नये.

९) आंतरजातीय विवाह करतात पण स्त्रीलाच तो निभावावा लागतो.

एकूणच प्रिया तेंडुलकर यांच्या 'जावे त्यांच्या वंशा' यातून स्त्रियांच्या संदर्भातील वडील, भाऊ, पती, मित्र यांचे वर्तन आणि त्यामुळे होणारा संकोच त्यामुळे तिच्या आयुष्यात येणारी अनपेक्षित वळणे याचा वेध आपल्या कथेतून घेतला आहे.

संदर्भ ग्रंथ

१) प्रदक्षिणाखंड २ कान्टिनेन्टल प्रकाशन

२) 'जावे तिच्या वंशा' - प्रिया तेंडुलकर

३) प्रिया तेंडुलकर – Wikipedia

४) bookganga.com

मराठी दलित स्वकथनांतून अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा:

प्रा. डॉ. रेखा वाडेकर

मराठी विभाग, सायन्स कॉलेज, नांदेड

आपल्या देशातील इंग्रजांचे आगमन ही अनेक दृष्टींनी महत्वपूर्ण ठरलेली घटना आहे. इंग्रजांबरोबर भारतात इंग्रजी भाषा आली. इंग्रजी भाषेतील वाङ्मयाचा मराठी माणसाला परिचय होऊ लागला. मराठी लेखकही इंग्रजी वाङ्मयाचे अनुकरण करू लागले. त्यातूनच मराठीमध्ये वेगवेगळे वाङ्मय प्रकार उदयाला येऊ लागले. इंग्रजी वाङ्मयाच्या संपर्काने मराठी साहित्य आणि भाषा यात परिवर्तन घडले. स्फुट काव्य, कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र इत्यादी वाङ्मयप्रकार मराठी भाषेत निर्माण होऊ लागले. या विविध वाङ्मय प्रकारातून मध्यवर्गीय पांढरपेशा लोकांचे चित्रण आलेले होते. समाजातील तळागाळातल्या गावकुसाबाहेरच्या लोकांचे चित्रण त्यात आलेले नव्हते.

इंग्रजांच्या उदारमतवादी धोरणामुळे शिक्षण सर्वांसाठी खुले झाले. त्यामुळे भारतीय समाजात शिक्षितांचा नवा का उदयाला आला. तो वर्ग भारतीय समाजव्यववस्थेची चिकित्सा करू लागला. भारतामध्ये परिवर्तनवादी चळवळीमधील म.फुले, राजर्षी शाहू व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य अत्यंत महत्वाचे आहे. डॉ. आंबेडकरांनी चालवलेल्या व्यापक अशा मानवमुक्तीच्या चळवळीच्या परिणामातून 1960 नंतर मराठी साहित्यामध्ये एक नवा प्रवाह उदयास आला. तो प्रवाह म्हणजे "दलितसाहित्य" प्रवाह होय. या साहित्याचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्या नानाविध चळवळीचे एक फलस्वरुप दलित साहित्य चळवळ होय. दलितांच्या जीवनाचे डॉ. आंबेडकरांनी आपल्या चळवळीद्वारे मानसिक संवर्धन केले. त्यामुळे दलितसमाज शिक्षित होऊ लागला. व या शिक्षणामुळे त्यांच्या जीवनात परिवर्तन होऊ लागले.

1960 नंतर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित लेखक लेखन करू लागले. गावकुसाबाहेर राहणाऱ्या, दलितांच्या वाट्याला जे जीवन आलेले आहे, ज्या विकास संधीपासून हा समाज वंचित राहिला त्या विकाससंधी या माणसांना मिळाल्या पाहिजेत, यासाठी ही चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केली. या चळवळीतून दलित माणसांला आत्मभान आले. या आत्मभानातूनच तो स्वत:च्या अस्तित्वाचा शोध घेऊ लागला. तेव्हा त्याला आपल्या जीवनातील दु:ख, दैन्य व दारिद्र्य तीव्रतेने जाणवू लागले. परंपरागत प्रस्थापित साहित्यातून जो सांस्कृतिक आशय व्यक्त होत होता. त्याच्याशी गावकुसाबाहेरच्या लोकांचा कुठलाही संबंध नव्हता. हजारो वर्षाची गुलामी दु:ख दारिद्र्य बरोबर घेऊन हा समाज जीवन जगत होता. या समाजाला अस्मिता मिळाली ती डॉ.बाबासाहेबांच्या तत्वज्ञानामुळे आणि आरंभलेल्या मुक्तिलढ्यामुळे.

दलित लेखकांनी कविता, कथा, कादंबरी, आत्मचरित्राच्या माध्यमातून स्वत: भोगलेल्या वेदनादायी जीवनाबद्दल लेखन केले, आपल्यावरील होणाऱ्या अन्याय, अत्याचार, छळ, वेदना त्यांनी व्यक्त केल्या. आपणही माणूस आहोत आपणालाही माणसांसारखे जगण्याचा अधिकार आहे ही जाणीव दलितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिली. या जाणिवेतूनच दलितसाहित्य लिहिले गेले. दलित साहित्याने जात, पंथ, रुढी, परंपरा विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेला नाकारून समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, प्रेम इत्यादी मानवीमूल्यांना महत्व दिले. त्यांना प्रमाण मानले.

दलित आत्मकथन / स्वकथने ही याच प्रेरणेतून लिहिली गेली. दलित लेखकांनी आत्मकथन हे आत्मचरित्रापेक्षा वेगळे आहे, हे दाखविण्यासाठी "आत्मकथन" हा शब्द वापरला आहे. डॉ. यशवंत मनोहर यांनी आत्मकथनांना "स्वकथन" हा शब्द पहिल्यांदा वापरला आहे. आत्मचरित्र, आत्मकथा, आत्मकथन या शब्दांमध्ये येणारे "आत्म" हे विशेषण त्यांनी नाकारले आहे.

'आत्म' हा शब्द सोबतीला कर्मविपाकाचा लज्जास्पद आणि खोटारडा सैध्दांतिक पसारा घेऊन येतो. येथील संस्कृतीने आत्म या विचाराद्वारे जगात कुठेही नसलेला शोषणाचा एक विलक्षण आकृतीबंध, विषमतेचा विषारी चक्रव्ह्यू साकार केला आहे. दलितांच्या शोषणाची केंद्रवृती आधारशीला असलेला आत्म हा शब्द दलितांच्या स्वकथनांना लावणे हे त्यांच्या नास्तिक

प्रेरणेला गुलालबुक्का लावण्यासारखे आहे त्यामुळेच दलितांच्या या अनुभव कथनपर लेखनाला "स्वकथन" हा शब्दच वापरणे डॉ. यशवंत मनोहरांना उचित वाटते.

प्रा. डॉ. आरती कुसरे ही स्वकथन हे आत्मचरित्रापेक्षा वेगळे असून ते 'स्व' बरोबर स्वत:च्या समाजाचे प्रबोधन घडून आणते म्हणून त्यांना स्वकथन म्हणणे योग्य आहे असे मत मांडतात.

दलित स्वकथन लिहिणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार व कार्याने प्रभावित होऊन स्वत:कडे व स्वसमाजाकडे फार मोठ्या आशावादी दृष्टिकोनातून पाहतो. दलित स्वकथनकार स्वत: व स्वत: च्या समाजाने भोगलेले जीवन आपल्या लिखाणातून मांडतो हे मांडताना दलित लेखकांनी पारंपारिक काही संकल्पना नाकारलेल्या आहेत. 'स्व' पेक्षा स्वकथनात त्याच्या समाजाचे चित्रण येते , तो समाजाचा घटक म्हणून आलेला असतो. या सर्वांचे त्याने केलेले वास्तव चित्रण असते म्हणून याला स्वकथन असेच म्हणणे संयुक्त ठरेल.

दलित साहित्यामध्ये दलित काव्यलेखन फार मोठ्या प्रमाणावर जसे झाले आहे. त्याप्रमाणे दलित स्वकथने ही फार मोठ्या प्रमाणावर लिहिली गेली आहेत. तराळ- अंतराळ शंकर खरात, बलुतं- दया पवार, उपरा- लक्ष्मण माने, उचल्या- लक्ष्मण गायकवाड, कोल्हाटयाचं पोर- किशोर शांताबाई काळे, आभरान पार्थ पोळके, अक्करमाशी- शरणकुमार लिबाळे, आठवणीचे पक्षी- प्र.ई. सोनकांबळे, गबाळ- दादासाहेब मोरे, जिणंआमुचं-बेबी कांबळे, मरणकळा- जनाबाई गिन्हे, आयदान- उर्मिला पवार माज्या जल्माची चितरकथा- शांताबाई कांबळे इ. स्वकथनांची नावे सांगता येतील-

दलित साहित्यिक हा स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व मानवता या मूल्यांचा पुरस्कार करतात, विषमतावादी समाजव्यवस्थेने स्वसमाजावर केलेल्या अत्याचाराविरुद्ध संताप व्यक्त करतात. या दलित साहित्यीकांच्या लेखनांमध्ये स्त्रियांना कोणते स्थान आहे तशीच ती कशी अभिव्यक्त झाली आहे, याचा शोध पुढील प्रमाणे आपणाला घेता येवू शकतो. 'तराळ अंतराळ' मध्ये ठळक व्यक्तिरेखा म्हणून आपणाला शंकर खरात यांचा आई सावूबाई यांच्याकडे पहावे लागते. या स्वकथनांतील ती महत्वाची व्यक्तिरेखा आहे. वर्णाधिष्ठितसमाज व्यवस्थेने जे जगणं दलित समाजाला दिले ते जगणे आपल्या मुलांच्या वाट्याला येऊ नये म्हणून शंकर खरात या आपल्या मुलाला ती शाळेचे महत्व पटवून सांगते. ती स्वत:अनक्षर आहे पण आपला उद्धार हा शिक्षणाशिवाय होऊ शकणार नाही. याची जाण सावूबाईला झालेली आहे. ती स्वाभिमानी आहे, कष्ट करून कुटुंबाला हातभार लावणारी आहे. म्हणून तराळकी पासून शंकर खरात यांचा सुरु झालेला प्रवास कुलगुरू पर्यंत झालेला आहे, तो सावूबाईमुळेच होय. 'शकुंतला' हे तराळ- अंतराळ मधील दुसरे महत्वाचे स्त्री पात्र. शकुंतला ही शंकर खरातांची पत्नी होय. लग्नानंतर शंकर खरात तिला शिकवण्याची संधी देतात ती शिकुन एम.बी.बी.एस. होते. आपल्या समाजाला एक डॉक्टर स्त्री मिळाली याचे श्रेय शंकर खरातांना जाते. कारण तिला संधी देवून स्वाभिमानी बनण्यात त्यांचे ही खूप मोठे योगदान आहे असे हे रचकथन वाचताना लक्षात येते.

'बलुतं' हे दया पवार लिखित महत्वाचे स्वकथन होय. या स्वकथनात सखुबाई, सई, देवकी, सलमा या महत्वाच्या स्त्री व्यक्तिरेखा आहेत. प्रत्येकीचा स्वभाव हा वेगवेगळा आहे. या स्त्रिया दया पवारांच्या जीवनात आई, पत्नी, आजी, प्रेयसी म्हणून येतात. सखुबाई ही दया पवारांची आई आहे. ती प्रचंड गरीबीत दया पवारांच्या वडिलांचा संसार करते, त्याचे व्यसनांचे लाड पुरवते, त्याच्या मृत्यूनंतर मुलांसाठी खंबीरपणे उभी राहून त्यांना मोठे करते. तिचा स्वभाव संयमी, शांत व हळवा असा आहे. तर सई ही दया पवारांची पत्नी आहे. तिच्यावर दया पवार जीवापाड प्रेम करतात, तिला सुखासमाधानात ठेवतात पण सर्व मिळून ही सई महेबुब नावाच्या माणसाशी बोलते, सर्व ते राहत असलेल्या मुंबईच्या कावाखाना परिसरात तिची व महेबूबच्या प्रेम प्रकरणाची चर्चा होते. नवरा समजून घेणारा. जीवापाड प्रेम करणारा असूनही ती अशी का वागते हे कळत नाही. तिच्या चुकीची शहनिशाही ती करत नाही, खरे काय हे ही नवऱ्याला सांगत नाही, परंतु या घटनेमुळे तिचे आयुष्य मात्र उध्वस्त होवून जाते. पुढे सलमाच्या मुळे दया पवारांच्या जीवनात परिवर्तन होते, सलमा ही दया पवारांची प्रेयसी, ती दया पवारांवर मनोभावे प्रेम करते परंतु जातीने मुस्मिम असल्यामुळे हे प्रेम दोघांच्या मनातच विरून जाते, तिचे लग्न झाल्यावर दया पवारांना दुसरे लग्न करण्याचा ती सल्ला देते.

उपरा- या स्वकथनांतील महत्वाचे स्त्री पात्र म्हणून त्यांची आई अनुसयाबाईकडे पहावे लागते. गावोगाव भटकंती करतांना तिच्या जीवनात कुठे स्थिरता आलेली दिसत नाही. प्रचंड मोठ्या दारिद्र्यात अनसुयाबाई जगते. प्रत्येक गावातील रानात जाऊन अनसुयाबाई फोक आणते त्याचे दुरड्या, बुरडं करून अनेक छोट्या-छोट्या खेड्यात विकायला जाते. आपले जगणे आपल्या मुलाच्या वाट्याला येवू नये म्हणून लक्ष्मण मानेच्या शिक्षणासाठी ती पुढाकार घेते, गावोगाव फिरतांना अनेक वाईट प्रसंगाना ती सामोरी जाते. एकदा तर एका गावात तिच्या नवऱ्या समोर तिला बेअब्रू करण्याचा प्रयत्न उच्चवर्णीय माणसे करतात. अनसुयाबाई ही भटक्या जमातीची, गावोगाव फिरणारी जमात तिची परंतु कष्टावर तिचा प्रचंड विश्वास आहे. 'शशी' ही लक्ष्मण मानेची पत्नी. ती मराठा समाजाची स्त्री आहे. त्यांचा आंतरजातीय विवाह आहे. शशी आपल्या आई-वडिलांच्या विरोधात जाऊन लक्ष्मण मानेशी विवाह करते. परंतु शशी मराठा समाजाची असूनही कैकाडी जमात तिला स्विकारत नाही. लक्ष्मन मानेचे आई-वडिल ही या लग्नाच्या विरोधात जातात- त्यांची जमात त्यांना पुन्हा त्यांच्या जमातीनुसार लग्न करावयास लावते, हे लग्न लावल्यावर जमात त्यांना स्वीकारते शशी ही कमालीची समजस स्त्री आहे.

उचल्या- या स्वकथनातील अत्यंत महत्वाचे स्त्रीपात्र म्हणून लक्ष्मण गायकवाड यांच्या आई धोंडाबाई कडे पहावे लागते. खरेतर उचल्या या स्वकथनांत अनेक स्त्रीव्यक्तिरेखा आलेल्या आहेत. पाथरूट जमातीला कुठलाही ठराविक असा व्यवसाय नसल्यामुळे चोरी करणे हाच एक पर्याय या जमातीसमोर उरलेला आहे. त्यामुळे ही जमात चोरी करून जीवन जगते. या स्वकथातील अनेक स्त्रिया चोरी करतात. पण धोंडाबाई कधी चोरी करायला जात नाही. आपल्या गावावरून पायी लातूरला ती दूध विकायला जाते. स्वत:च्या संसारासाठी प्रचंड मेहनत करते. समाजव्यवस्थेने जे जगणे पाथरुट जमातीला दिलेले आहे, ते अत्यंत वेदनादायी असे आहे. पाथरुट ही जमात समाजव्यवस्थेने चोर ठरवलेली आहे, त्यामुळे अनेकदा चोरी न करताही पोलिस स्त्रियांना मारहान करतात, त्यांची बेअब्रू करण्याचा प्रयत्न करतात. धोडांबाईलाही अनेकदा पोलिसांचा मार खावा लागतो. परंतू इलाज नसतो. धोंडाबाई अशा परिस्थितीतही स्वाभिमानाने जगण्याचा प्रयत्न करते. ती कधीच चोरी करायला जात नाही. उलटं दूध विकण्यास जाते कष्टाचे काम करून ती संसाराला हात भार लावते. लक्ष्मण गायकवाड घडण्यामध्ये धोंडाबाईचा खूप मोठा वाटा आहे.

किशोर शांताबाई काळे लिखित – कोल्याट्याचं पोरं स्वकथनातील शांताबाई काळे ही या स्वकथनातील महत्वाची व्यक्तिरेखा आहे. ती कोल्हाटी जमातीची आहे. कोल्हाटी जमातीमध्ये सुंदर मुलींना मिळालेले सौंदर्य शाप वाटायला लागते कारण या जमातीमध्ये सुंदर मुली त्यांचे वडील नाच-गाने करण्यासाठी घरीच ठेवून घेतात. त्यांचा विवाह करत नाहीत, शांताबाईच्या आयुष्याचे असेच मातरे झालेले आहे. शांताबाई, सुशीला, बेबी, रंभा या स्त्रीव्यक्तिरेखा या स्वकथनात आढळतात. नाच-गाणे करून त्या आपल्या वडीलांचे घर सांभाळतात; या स्त्रियांच्या जीवनात रडण्याशिवाय वाट पाहण्याशिवाय काहीच असत नाही. किशोर काळे कोल्हाटी स्त्रियांच्या जगण्याबद्दल या स्वकथनात लिहितात. कोल्हाटी पुरुष आपल्या मुलींचा बहिणींचा सौदा करतात त्यामुळे नाच-गाणे करून या स्त्रियां आपल्या वडिलांचा कुटूंबाचा उदरनिर्वाह करतात.

'अक्करमाशी' या शरणकुमार लिंबाळे लिखित स्वकथनांतील स्त्री प्रतिमा एका भयान वास्तवाचे चित्रण घेऊन येणाऱ्या आहोत.

'मसामाय' ही शरणकुमार लिंबाळे यांची माई अक्करमाशी या स्वकथनांचा केंद्रस्थानी मसामाय आहे. विठ्ठल कांबळे या माणसांशी तिचा विवाह होतो तिला त्याच्या पासून तीन अपत्य होतात पण पुढे अनेक पुरुष तिच्या जीवनात येतात. त्यामुळे तिचे चारित्र्य नष्ट झालेले आहे तिचे पावित्र्यही नष्ट झालेले आहे, केवळ पालापाचोळ्या सारखे तिचे आयुष्य झालेले आहे. मसामाय स्वाभिमानी नाही. हणमंता लिबाळे शरणकुमार लिबांळेचा बाप उच्चवर्णीय समाजव्यवस्थेतील हणमता लिंबाळे किंवा सिद्राम पाटील तिला त्यांच्या जीवनात रखेली शिवाय दुसरे स्थान देत नाहीत. कुठेच हे रखेलीपण झिडकारताना मसामाय दिसत नाही. या स्वकथनांतील मसामांय संतामाय, सेवंता या स्त्रिया यात भेटतात. या स्वकथनांतील स्त्री ही कुठेच सुरक्षित दिसत नाही. जीवनात कोणत्या ना कोणत्या कारणामुळे त्यांची घसरण झालेली दिसते. अक्करमाशीतील स्त्रीजीवन अनैतिकतेच्या खोल गर्तेत सापडलेले दिसते.

'जिणं आमुचं' – या स्वकथनांतील महत्वपूर्ण स्त्रीव्याक्तरेखा म्हणून बेबी कांबळे यांच्याकडे पहावे लागते. या स्वकथनात आपल्या समाजाला उच्चवर्णीय समाजाकडून मिळालेली हिनत्वाची वागणूक याचे परीक्षण त्यांनी या स्वकथनांतून केले आहे. दलित समाजातील स्त्री ही कुठल्या अवस्थेत जीवन जगत होती याचा इतिहास त्या यातून मांडतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे आपण जनावराचे माणूस झालो. हा कृतज्ञताभाव त्या या स्वकथनांतून व्यक्त करतात, शिक्षण घेवून त्या परिस्थितीवर मात करतात.

माझ्या जन्माची चित्ररकथा – या स्वकथनातील अत्यंत महत्वपूर्ण व्यक्तिरेखा म्हणून गवळाबाई व शांताबाई कांबळे यांच्याकडे पहावे लागते. शांताबाईची आई गवळाबाई अत्यंत स्वाभिमानी आहे. ती अंगारे धुपारे वर श्रद्धा ठेवणारी आहे. आपल्या वाट्याला आलेले जीवन आपल्या लाडक्या मुलीच्या वाट्याला येवू नये असे तिला सतत वाटत राहते. धार्मिक स्वभावाची असली तरी शांताबाईच्या शिक्षणासाठी प्रयत्न करते. शांताबाई कांबळे हे या स्वकथनातील दुसरे महत्वाचे व्यक्तिचित्रण होय. शांताबाई त्या काळात शिकून शिक्षिका होतात. शिक्षिकेपासून ते शिक्षणाधिकाऱ्या पर्यंत मजल मारतात. आपले आस्तित्व या स्वत:च शोधतात अंत:स्कोट हे प्रा. कुमुद पावडे यांचे स्वकथन- दलित समाजात जन्माला आल्यामुळे येणारे जातीयतेचे दु:ख इतर स्त्रियांप्रमाणे त्यांच्या ही वाट्याला येते. शाळेत असतांना संस्कृत विषय त्यांना ऐच्छिक म्हणून घ्यायचा असतो परंतू दलित असल्यामुळे त्यांना अनेक अडचणी येतात. प्रयत्न करून त्या संस्कृत विषय घेतातच. पुढे कॉलेज जीवनात संस्कृत घेवून एम.एम. करतात, जातीमुळे त्यांना लवकर प्राध्यापिकेची नोकरी लागत नाही. त्या मोतीराम पावडे या मराठा तरुणाशी विवाह करतात प्राध्यापिका म्हणून त्यांची निवड होते. पुढे अनेक सभा संम्मेलनातून, चळवळीतून त्या दलित समाजाच्या जाणीव जागृतीसाठी प्रयत्न करतात. यासाठी त्यांचे पती त्यांना फार मदत करतात.

'**आयदान**' हे उर्मिला पवार यांचे महत्वाचे स्वकथन आहे. या स्वकथनात लक्ष्मीबाई, उर्मिला, मंजुळा इ. व्यक्तिरेखा महत्वपूर्ण आहेत. लक्ष्मीबाई ही उर्मिला पवार यांची आई-वडिल गेल्यानंतर मोठ्या हिंम्मतीने आपली चार मुले ती वाढवते व त्यांना शिक्षित करते. शिक्षणाबद्दल अनेकदा ती उर्मिला पवारची चांगली कानउघाडणी ही करते. आयदान मधील उर्मिला पवार ही महत्वाची स्त्रीप्रतिमा आहे. त्या लहानपणा पासूनच बंडखोर स्वभावाच्या आहेत. नववीलाच त्या लग्न करतात त्यांचा प्रेमविवाह असतो. पण लग्नानंतर ही जिद्दीने शिक्षण घेवून मोठ्या होतात एम.ए. होतात तेव्हा त्यांच्या मध्ये एक वैचारिक परिवर्तन घडून येते. त्या विविध संघटना मधून काम करू लागतात. तसतसे त्यांना स्त्रियांचे प्रश्न अधिक समजू लागतात. अनेकदा पतीची मदत मिळत नाही. त्यामुळे अनेकदा त्यांचे खच्चीकरण ही होते, पण त्या आपले सामाजिककार्य सोडत नाहीत.

दलित स्वकथनांतील अभिव्यक्त झालेल्या स्त्रीप्रतिमा पाहत असतांना विविध स्त्रियांच्या व्यक्तिरेखा समोर येतात.

दलित स्वकथनांतून अभिव्यक्त झालेल्या स्त्रीप्रतिमा चा धावता आढावा येथे घेतला आहे. हा आढावा घेताना सगळ्याच स्वकथनांतील स्त्रिया ह्या स्त्री म्हणून व दलितस्त्री म्हणून दुहेरीपातळीवरचे जगणे कसे जगतात याचा प्रत्यय आपणाला येतो. दलित स्त्रियांना जातीमुळे आणि गरिबीमुळे अत्यंत हलाखीचे जीवन कसे जगावे लागले हे ही स्वकथन वाचतांना लक्षात येते. पण कुठेतरी आपल्या मुलाने – मुलीने शिकले पाहिजे ही त्यांची आंतरिक इच्छा असलेली दिसते. या स्त्रियांच्या राहणीमानाबद्दल विचार करायचा झाला तर मोलमजूरी करून जगणाऱ्या भटकंती करणाऱ्या, चोरी करणाऱ्या या स्त्रिया आहेत या स्त्रिया गरीबीत जगतात अनेकदा गरीबीचत त्यांचा मृत्यूही होतो. काही प्रचंड सोशिक व स्वाभीमानी स्त्रिया ही आहेत. अनेकदा त्यांच्या जातीवरून त्यांचा अपमानही होतो पण त्या प्रत्युत्तर देत नाहीत. बेबी कांबळे, शांताबाई कांबळे, कुमुद पावडे, उर्मिला पवार या स्त्रिया परिस्थितीला बदलण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखा किंवा त्यांच्या स्त्रीप्रतिमा उठून दिसतात.

अक्करमाशी मधील मसामाय ही स्त्री समाजव्यवस्थेत ती उच्चभ्रू लोकांकडून छळली गेलेली आहे. त्यामुळे तिचे संपूर्ण आयुष्य बदलून जाते आणि या व्यवस्थेवर सूड म्हणून ती अनेक उच्चभ्रू पाटलांशी संबंध ठेवते, यातून तिला अपत्य होतात. ती अशी का वागते ? तिचे सौदर्य तिच्यासाठी कसे शापदायी ठरते यातून तिच्या जीवनाची कशी शोकांतिका होते, ती भरल्या संसारातून कशी उठते या सर्वबाबी तिच्या व्यक्तिरेखांवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत.

दलित स्वकथनांतील अनेक स्त्रियां या शोशिक आहेत. या स्त्रीप्रतिमा जातीयतेच्या मध्ये होरपळून गेलेल्या आहेत. दया पवारांची आई सखुबाई, लक्ष्मण मानेंची आई अनसुयाबाई गबाळ मधील दादासाहेबांची आई गावकी मधील रुस्तुम अचलखांब यांची आई या व्यक्तिरेखा या दारिद्र्यात जगतात. घरात पुरुषसत्ताकपद्धती असल्याने नवऱ्याचा छळही सहन

करतात. त्यामुळे अनेकदा या व्यक्तिरेखा मूक जनावरा प्रमाणे वागतात. असे असले तरी तराळ-अंतराळमध्ये भेटणारी साऊबाई ही मात्र कमालीची धैर्यवान स्त्री दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या स्त्रीने पाहिलेले आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांचे विचार तिला मनोमन पटलेले आहेत. त्यामुळे ती अन्यायाचा प्रतिकार करताना दिसते. पुरुषांनी लिहिलेल्या स्वकथनांत अशा प्रतिकार करणाऱ्या स्त्रिया या अत्यंत कमीच आहेत.

जिणं आमुचं, माझ्या जन्माची चित्ररकथा, मरणकळा, अंत:स्फोट, आयदान या दलित स्वकथनकार स्त्रियांनी लिहिलेल्या स्वकथनातील स्त्रीप्रतीमा ही अत्यंत महत्वपूर्ण आहेत. जातीयतेचे चटके या स्त्रियांनाही सहन करावी लागली आहेत. पण यातून ही शिक्षणाच्या माध्यमातून या स्त्रियांनी आपला व्यक्तिमत्व विकास साधला आहे. अनेक प्रसंगाना तोंड देत या स्त्रिया प्रगतीकडे पोहचलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वात एक प्रकारचा निखार आलेला दिसतो.

साठोत्तरी दलित साहित्य प्रवाहातून व्यक्त झालेला स्त्रीवाद

माणसाच्या मूलभूत हक्क प्राप्तीसाठी विद्रोह या मूल्यांची देणगी दलित कवितेने दिली आहे तसेच स्त्रियांच्या मूलभूत हक्काची ही दिली आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांतुन ही बीज स्त्रीवादी साहित्यात आलेला आहे. स्त्रीवादी साहित्य म्हणजे काय? याबद्दल असे म्हणता येईल "स्त्रीवादी साहित्य याचा अर्थ केवळ स्त्री निर्मित साहित्य नव्हे तर पुरुष केंद्रीय विचार प्रवाहातून मुक्त आशा परिप्रेक्ष्यातून कोणीही स्त्री व पुरुषाने निर्माण केलेले साहित्य म्हणजे स्त्रीवाद साहित्य" अशी ही व्यापक अर्थाने म्हणता येईल. स्त्रीवाद ही एक समाज प्रति परिवर्तनाची राजकीय जाणीव आहे. या स्त्रीवादी जाणिवेचा विविध दृष्टिकोनातून भिन्नभिन्न पातळीवर अविष्कार स्त्रीवादी साहित्यातून आढळून येतो. म्हणून 2000 नंतरच्या दलित कवितेतून व्यक्त झालेल्या स्त्रीवाद हा या पातळीवरच्या स्त्रीवादाचा आविष्कार आहे येथे लक्षात घ्यावयाचे आहे.

दलित कविता एक विशिष्ट भूमिका घेऊन प्रकट होते. त्यामुळे आपोआपच दलित कविता नैतिकता प्राप्त झाली आहे. बाईपणाच्या उत्कट जीवघेण्या धगीची आच या कवितेला लागली असून, तिने लाभलेल्या बाईपणाच्या दुःखाचा पसारा मांडला आहे. दलित कवितेला आगीचे जबरदस्त आकर्षण आहे. सत्यशोधकी, आंबेडकरी विचारांमुळे दलित कवितेतील स्त्री नाडल्या गेलेल्या स्त्रियांच्या वतीने धीटपणे बोलत राहते. सडलेल्या संस्कृतीचा विटाळ करू पाहणारी स्त्री समूहमन अधिकाधिक आक्रमक पणे व्यक्त होताना दिसते. पुरुषी व्यवस्थेला आडवं मारणारी अनोखी भाषा प्रत्ययाला येते ; याचाच अर्थ दलित कविता प्रखर स्त्रीवादी विचार प्रकट करताना दिसते आहे.

2000 नंतरच्या दलित कवितेतील स्त्रीवादात प्रखर नकाराची जाणीव व्यक्त होते. उदाहरणार्थ :- 'होऊ दे मला तुझी सर्वात लाडकी लेक तुझी सावली नाकारणारी' हा स्वत्वाचा आत्मशोध आहे. प्रतिगामी समाज, संस्कृतीने इतिहासात स्त्रिला ओलीस ठेवलेल्या प्रवृत्तीला दिलेला हा नकार आहे. येथे व्यक्त झालेल्या स्त्री म्हणाला, स्त्रीला नवीन संस्कृती जगात ताठ मानेने उभे राहावयाचे आहे. दलित कवितेत स्त्री जगताची वेदना आलेली आहे. दलित, आदिवासी, वडार, कोल्हारी, देवदासी वेश्या अशा स्त्री जगताची भळभळती वेदना प्रकट झाली आहे. कविता स्त्री जगताच्या स्त्रीवादाचे आत्मभान जागृत करते. धर्माच्या आणि पुरुष व्यवस्थेच्या कट कारस्थान स्त्रीविश्वाला ती पूर्ण करू पाहते आहे. सनातनी व्यवस्थेने व प्रकृतीने जाव्यात ओढून ठेवलेला वृत्तीला जगासमोर आणून स्त्री जातीला शब्दबद्ध करू पाहते आहे. प्रतिगामी कावेबाज शक्ती आणि प्रवृत्तीची पोलखोल करताना ती अधिक प्रखर शब्द बाण सोडते आहे.

"प्रचलित मराठी कविता वैदिक वाङ्मयाचे स्त्रीवादी वाचन करायला तयार नाही. आपल्याकडील स्त्री - पुरुष नातेसंबंधाची कविता विवाहसंस्थेच्या पलिकडे जात नाही.प्रस्थापित वर्गातून आलेली कविता शरीर आणि मन यांच्य संबंधापलिकडे फारसा शोध घेताना दिसत नाही. त्यामुळे सामान्य पातळीवर विविध जातीस्तरावर स्त्रियांचे दुखणे आणि प्रश्न बाजूलाच राहतात. समकालीन जीवनात बाजारू वस्तू म्हणूनच स्त्रीला सजविण्याची चढाओढ सुरू आहे. तिचे लेदर करन्सीत रूपांतर केले जात आहे. चामडी नाण्याचं मूल्य आणि तिची क्रयशक्ती डॉटकॉम

युगव्यवस्थेने ठरवून दिली आहे. चलन आणि चामडी चलन या गोष्टी समांतर ठरू पाहात आहे. केवळ लिंग या एकाच आधारावर सर्व स्त्रियांची स्थिती समान नाही. श्रीमंत - उच्च - मध्यम - कनिष्ठ - दलित - आदिवासी या सर्व स्त्रीवर्गात भिन्नता दिसून येते. एक स्त्री म्हणून काही प्रश्न समान असले तरी जातीसंस्था आणि वर्णधर्माने काही विशिष्ट प्रश्न स्त्रियांच्या आयुष्याच्या ओटीत घातले आहे. त्यामुळेच दलित स्त्रीवादी कविता ते प्रश्न समूळ नष्ट करून पाहणे आहे सर्वच पातळीवर स्त्रियांची होणारी विशेषतः दलित स्त्रीचे दोन स्तरावर होणारी होरपळ या स्त्रीवादी कवितेला उद्ध्वस्त करावयाचे आहे." **1**

त्यामुळेच दलित स्त्रीवादी कविता ते प्रश्न समूळ नष्ट करू पहाते आहे. सर्वच पातळीवर स्त्री यांची होणारी विशेषतः दलित स्त्रीची दोन स्तरावर होणारी होरपळ या स्त्रीवादी कवितेला उध्वस्त करायवाचे आहे.

काही कवितांमधून हिरवळीचे ऋतू आपल्यापर्यंत पोहचू दिले नसल्याची तक्रारही मांडली आहे. जुलमी परंपरेचे निशाण फडकावून नाच करणाऱ्या प्रवृत्तीचे चेहरे ओरबाडून काढण्याचा चंग या कवितेने बांधला आहे. पुरुषी गनिमी चालीची चाहूल लागल्यामुळे कोंडी झालेले मन बांध फोडून प्रकट होते. तेव्हा रस्त्यावर उतरण्याची भाषा अपरिहार्यपणे या कवितेतून व्यक्त होते. पाश्चात्यांच्या शरीर अंगाने विकसीत होत गेलेला स्त्रीवाद जिथे स्त्रीयोनीच नाकारली गेली आहे तिथे कसा काय लागू करता येईल असा प्रश्न उपस्थित करून तथाकथीत स्त्रीवादाने अंतर्मुख व्हावे असे सुतोवाच कवयित्रींच्या कवितेने केले आहे.

जबरी संभोग सारखा पाऊस पडतो
हिंस्र दाह भोवतालात फेर धरतो.
तेव्हा तू कुठे असतोस ?

ही वासनेची कुस तर उपटून फेकता येत नाही. पण तिचे भीषण मनो दर्शन तर घडविता येते. हीच दलित स्त्रीवादी कविता आज करताना दिसते आहे.

स्त्रियांच्या कवितांनी अनुभवक्षेत्राच्या व्याप्तीसह कवितेतील भाषिक कृतींनी समर्थपणे अर्थप्राप्ती घडविली आहे. पौराणिक मिथकांना फुले आंबेडकरी जाणीवेतून नवा अर्थ प्राप्त करून दिला आहे. प्रतिमा संघटनातून बेगडी परिवर्तनवाद्यांवर प्रखर भाष्य केले आहे. नव प्रस्थापित आणि त्यांचे मठ यांना नकार देणारी डोळस जाणीव व्यक्त केली आहे. पारंपरीक संस्कृती आणि समकालीन वास्तव याची सांगड घालून सांस्कृतिक अंतर्विरोध स्पष्ट केले आहेत. गुलामीत जखडून ठेवणाऱ्या संकल्पनांबद्दल संतप्त भावनांना वाट मोकळी करून दिली आहे. पुरोगामीत्वाच्या नावाखाली गुलामीचे अलंकार सजविणाऱ्या प्रवृत्तीवरचे स्फोटक भाष्य केले आहे. या कवितेचा महत्त्वाचा विशेष म्हणजे वेदनांचे आभाळ मनावर कोसळले म्हणून स्त्रीमन आगतिक किंवा परागंदा होत नाही तर तें स्त्रीसुलभ अनुभूतीला संघर्षशील विचारप्रणालीशी जोडून नव्याच अर्थाची प्रतिती घडविते. वैश्विक पुरुषी प्रवृत्तीचा वेध घेणाऱ्या या कवितेचा आविष्कार पूर्वसूरीच्या स्त्रीवादी आविष्कारापेक्षा वेगळा आहे. हुंदक्याला वाट मोकळी करून देतानाच नव्या पहाटेचा ध्यास आणि हव्यास या कवितेने उराशी बाळगला आहे.

"या कवितेचे महत्त्वाचे कार्य आहे. स्त्रीच्या जगण्याला निर्थकता प्राप्त करून देणाऱ्या निर्दावलेल्या मूल्यांचा वेध घेतला आहे. तसेच स्त्रीमुक्तीच्या उदगात्यांना देवत्वाच्या मखरीत बसवू पाहणाऱ्या सनातन व्यवस्थेच्या मानसिकतेचा, धर्माच्या आवरणाखाली बाईला दडपून टाकणाऱ्या समकालीन वास्तवाचाही वेध

घेऊन स्त्रीजगताचे सांस्कृतिक भान जागवले आहे. देव-धर्म, स्मृती- श्रुती व्यवस्थेने पावलोपावली उभारलेले तुरुंग, कावेबाज वाटा, गनिमी रस्ते इ.सर्व गोष्टींचे कधी सूचक तर कधी स्पष्ट आणि परखड विवेचन केले आहे. हासकालीन आणि सामाजिक सांस्कृतिक वास्तवाचा फार मोठा परिणाम या कवितेवर झाला आहे.

दलित चळवळ आणि नेतृत्त्वाने समष्टीशी असलेला नातेसंबंध तपासून पाहिला नाही अशी खंत कवयित्रींच्या कवितेतून व्यक्त झाली आहे. शहरी वस्त्र पांघरलेल्या प्रदेशातील जाणीव केंद्रात आपले बस्तान बसविणाऱ्या प्रवृत्तीचा ठळक निर्देश केला आहे. जन्ममत्यूच्या प्रवासात दुःखाची साथसोबत करणाऱ्या असोशी स्त्रीत्वाचे जिवंत चित्र साकार केले आहे. स्त्रीकडे भोगाची वस्तू म्हणून पाहणाऱ्या व्यवस्थेची वखवख, पुरुषातील पशुत्व आणि पुरुषी शोषक क्षेत्राचे स्वरूप धिटाईने उघड केले आहे. आदिम स्त्रियांचे आत्मभान जागविण्याचा प्रयत्न केला आहे. बुद्धाचा विचार कानामनात भिनविण्याचा प्रयत्न उषाकिरण आत्रामसारख्या कवयित्रीनी केला आहे. एकजुटीचे तत्त्वज्ञान, संघर्षशक्तीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. पेटण्या जाळण्याचे तत्त्वज्ञान पेरण्याचे काम केले आहे. आदिम स्त्रीच्या जगण्याचे भेदक वास्तव मांडले आहे. सूर्याचे वारसदार असल्याचे घोषित केले आहे. रानातल्या स्त्रीची होणारी अवहेलना कथन केली आहे. स्त्रीजगत आणि पुरुषी व्यवस्था असे द्वंद्व साकारले आहे." **2**

उदा :- 'कुरवाळून भोगणारा पुरुष जुनाच
निमित्तमात्र राहिला नव्हता अख्ख्या
जगाच्या तळाशी गच्च रुतून बसला होता.'

हा द्वंद्व पुरुषी हुकूमशाहीने कोणत्याही प्रकाराने तिच्या जगण्याचा ताबा घेतलेला आहे. ते 'गच्च' या शब्दाने त्याची तीव्रता दर्शवितात.

उपरोध, नकाराने ठासून भरलेल्या दलित स्त्रीवादी कवितेने पुरुष व्यवस्थेचा दांभिकपणा स्पष्ट केला आहे माणूस माणसाची माणुसकी हरवत चालल्याची खंत ही कविता व्यक्त करते प्रतिगामी सनातनी वृत्तीचा समाचार घेते तर दुसरीकडे –

ते हुजरे खुर्चीचे गजरे करतात मुजरे
अंधाराला ते केव्हाच हरले
समाजाचा पिळ नीतिमत्तेच्या जुगारात

असे स्वकीय वर टीकास्त्र सोडले आहे. एकंदरीत दलित स्त्रीवादी कवितेने बंडाची सुरुवात केली आहे. त्यातून दलित कवितेला अनेक नवी मूल्ये प्राप्त झालेली आहे. स्त्रीच्या होणाऱ्या शोषणाच्या विरोधात स्त्रीच्या बाजूने उभे राहणाऱ्या दलित स्त्रीवादी कवितेचा स्वभाव आणि विचार प्रवाह अधिक धारदार व परिवर्तनशील पुरोगामी होत जाते आहे.

डॉ विजया खामनकर
बळीराम पाटील महाविद्यालय किनवट
dr.vijayakvv27@gmail.com

संदर्भ :-

१) दलित कवितेचे अर्धशतक / डॉ. महेंद्र भवरे / महा.श. सा. आणि सं. मंडळ, मुंबई / २०१८ / ४४९.

२) दलित कवितेचे अर्धशतक / डॉ. महेंद्र भवरे / महा.श. सा. आणि सं. मंडळ, मुंबई / २०१८ / ४४८.

स्त्री सक्षमीकरण

स्त्री सक्षमीकरणासाठी
मोप वाचार्थता करणार,
पण खरचं, तिच्या सबलीकरणासाठी
कोण पुढे धजणार.

तिच्या वेदना, तिच्या भावना,
कोण समजावून घेणार
पैसा, दागदागिने नको तिजला,
नको बंगला, गाडी
मायेनं, आपुलकीने बोलणारे
कौतुकाचे चार शब्दं
पुरेल तिला आयुष्यभरी.

तिला हवेत प्रगतीपथावर
प्रौत्साहन देणारे कर,
त्याच सोबत तिला देणारे
सदैव विश्वासाचे बळ.

मग कशास सक्षमीकरणाची
स्त्रिच्या भासेल आवश्यकता
अबला, दुर्बल असे ब्रीद लावून
तिला अवमानित का करता?

आहे ती मानिनी, सौदामिनी
आहे तिच या विश्वाची जननी
नतमस्तक होताना तिच्यासमोर
तिला ताठमानेन जगू द्या.
अस्तित्वाची तिच्या लढाई
तिची तिलाच लढू द्या.

तिच्याविना कोणास समजणार जीवनातील तिच्या यातना
तेव्हा समस्त स्त्रियांनी
संघटित व्हावे,
हीच एक प्रेरणा.

सौ. सागर गोविंदराव पांचाळ
महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर, नांदेड.